हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून
सर्व हक्क प्रकाशकांनीं आपले स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

म्याट्रिक्युलेशन, स्कूलफायनल्, व इतर परीक्षांचे विद्यार्थी, यांना मराठी भाषा हा विषय तयार करावा लागतो, व त्यांना संप्रदाय, म्हणी, वगैरेसंबंधानें प्रश्न विचारण्यांत येतात. म्हणून ह्या परीक्षांस जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं आम्हीं मराठी संप्रदाय, म्हणी, वगैरेंचा संग्रह तयार करण्याविषयीं रा. रा. **विद्याधर वामन भिडे** यांना विनंती केली, ती त्यांनीं मान्य करून हें पुस्तक रचिलें आहे. " मराठी म्हणींविषयीं चार शब्द, " व " मराठी शब्दांचें उद्घाटन " वगैरे पुस्तकांवरून रा. रा. भिडे यांचें मराठी भाषेविषयींचें प्रेम व विचार व्यक्त करण्याची शब्दरूपी व वाक्यरूपी जीं साधनें, त्यांचें अध्ययन हीं महाराष्ट्रीयांच्या प्रत्ययास आलेलींच आहेत. त्यावरून रा. रा. भिडे यांचें हें पुस्तक कितपत प्रमाणभूत होईल याची अटकळ सहज होण्याजोगी आहे.

ह्या पुस्तकाचीं सर्व मुद्रितें रा. रा. भिडे यांच्या नजरेखालून गेलेलीं आहेत. आतां हें पुस्तक ज्यांच्या उपयोगासाठीं आम्हीं तयार करविलें आहे, त्यांना तें खरोखरीं उपयोगी झालेलें असल्यास आमच्या व ग्रंथकर्त्याच्या मेहेनतीचें सार्थक झालें, असें आम्हीं समजूं. पैका टायपाच्या सुमारें पांचशें पानांच्या पुस्तकाला दीड रुपया किंमत आम्हीं ठेविली आहे, ती ग्राहकांना जड वाटणार नाहीं, अशी आमची उमेद आहे.

चित्रशाळा, पुणें.
ता० २५ आक्टोबर १९१०. } प्रकाशक.

# प्रस्तावना.

---*---

ह्या पुस्तकाचा उद्देश व त्यांतील विषय यांचे दिग्दर्शन प्रकाशकांनीं केलें आहे, त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. आम्ही इतकेंच म्हणतों कीं, मराठी भाषेचे संप्रदाय, म्हणी, इत्यादिकांचें शास्त्रीय पद्धतीनें आणि मोठ्या प्रमाणावर वर्गीकरण आणि निरूपण करणें, हें भिन्न भिन्न प्रांतांत राहाणाऱ्या अनेक विद्वानांच्या मंडळींचें काम आहे, आम्हासारख्या एकट्यादुकट्या व केवळ लिहिण्याची हौस असलेल्या माणसाचें काम नव्हे. तथापि प्रकाशकांचा फार आग्रह पडल्यावरून आम्हीं हें काम पथकरिलें आणि पुढील ग्रंथ रचिला. यांतील विषयाची मांडणी धोपट मार्गाची आणि निरूपण त्रोटक रीतीचें आहे, तथापि तेवढ्यानेंही विद्यार्थ्यांची बरीच सोय होईल अशी उमेद आहे.

मराठी भाषेचें गद्य वाङ्मय अगदीं थोडें आहे, त्यामुळें संप्रदाय, म्हणी, वगैरेंच्या अर्थासंबंधानें व उपयोगासंबंधानें साहजिकपणें मतभेद असावयाचाच. आम्हास जो उपयोग अधिक ग्राह्य, व जो अर्थ अधिक शुद्ध, वाटला, तोच उपयोग व तोच अर्थ देण्याविषयीं आम्हीं खबरदारी घेतली आहे. तथापि ह्या बाबतींत आमचे हातून कांहीं प्रमाद झालेले असल्यास ते आम्हांस कळविण्याची वाचकांनीं मेहेरबानी करावी. म्हणजे पुढच्या आवृत्तीचे वेळीं योग्य ते फेरफार करूं.

ह्या पुस्तकांत आम्हीं पुढील चार शब्द नवीन घडवून योजले आहेत. "वाक्प्रचार," "शब्दसंहति," "भाषेचा स्वभाव," आणि "समस्तकल्प शब्द." आमच्या काव्यांचीं नांवें छांदिष्टपणाचीं, व काव्याच्या विषयाचा बोध करून न देणारीं, असतात, असा महाराष्ट्रीयांचा आमचेवर आक्षेप आहे. हा आक्षेप अस्थानीं नाहीं असें जरी गृहीत घेतलें, तरी निदान वरील चार शब्द घडविण्यांत आमचे हातून कांहीं छांदिष्टपणा न व्हावा अशी आम्हीं पूर्ण खबरदारी बाळगिली

आहे. हे शब्द आमचे समजाप्रमाणें अर्थबोधक आहेत. त्यांच्याऐवजीं अधिक मधुर व अधिक अन्वर्थक असे शब्द कोणीं सुचविल्यास त्यांचा आम्ही मोठ्या आनंदानें स्वीकार करूं.

ह्या पुस्तकाच्या रचनेच्या कामीं प्रकाशकांनीं आम्हास दिलेलें प्रोत्साहन, व सढळ हातानें पुरविलेली सामग्री, ह्यांच्यामुळेंच हें पुस्तक ह्या रूपानें वाचकांच्या पुढें येत आहे, आणि ह्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों.

हें पुस्तक छापलें जात असतां रा. रा. **प्रल्हाद अण्णाजी ऋषि शास्त्री**, ह्यांनीं वेळोवेळीं अर्थांच्या संबंधानें वगैरे ज्या सूचना केल्या, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. तसेंच रा. रा. **कृष्णाजी गोविंद किनरे**, ह्यांनीं दोन परिशिष्टांचीं मुद्रितें तपासिलीं, ह्याबद्दल त्यांचेही उपकार मानणें अवश्य आहे.

पुणें.
ता. २५ आक्टोबर १९१०.

विद्याधर वामन भिडे.

# अनुक्रमणिका.


| विषय | लेखांक. |
|---|---|
| उपोद्घात ... ... ... ... | १—१८ |
| नामांवरून झालेले वाक्प्रचार ... ... | १९—६०३ |
| शरीरावयवदर्शकनामें ... ... | १९—६२ |
| इतर नामें ... ... ... | ६३—६०३ |
| सर्वनामांवरून झालेले वाक्प्रचार ... ... | ६०४—६६१ |
| विशेषणांवरून ,, ,, ... ... | ६६२—७६८ |
| क्रियापदांवरून ,, ,, ... ... | ७६९—८०३ |
| शब्दयोगी अव्ययांवरून ,, ... ... | ८०४—८१९ |
| क्रियाविशेषणां० ,, ,, ... ... | ८२०—८८० |
| एकेरी शब्द, इ० ,, ,, ... ... | ८८१—१२४१ |
| म्हणी ... ... ... ... | १२४२—१५२५ |
| संस्कृत न्याय ... ... ... ... | १५२६—१५४५ |
| प्रचारांतील संस्कृत वाक्यें ... ... | १५४६—१६१६ |
| ज्योतिषांतील पारिभाषिक शब्दोत्पन्न वाक्प्रचार | १६१७—१६३३ |
| परिशिष्ट क ... | |
| परिशिष्ट ख ,, | |

# मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इत्यादि.

## उपोद्घात.

१. मनांत आलेला विचार शब्दांच्या रूपानें व्यक्त करण्याची टापटीप, तसेंच वाक्यामध्यें योजावयासाठीं मूळ शब्दांचीं रूपें तयार करणें, व तीं रूपें तयार झाल्यावर वाक्यामध्यें तीं अमुक ठिकाणीं मांडणें, यासंबंधानें प्रत्येक भाषेचे विशिष्ट असे कांहीं तरी प्रकार असतात; उदाहरणार्थ, मराठी आणि गुजराथी ह्या भाषांमध्यें नामें आणि सर्वनामें ह्यांना तीन लिंगें असतात, पण हिंदी भाषेमध्यें दोनच असतात; मराठी, गुजराथी व हिंदी ह्या भाषांत क्रियापदांना दोन वचनें असतात, पण बंगालींत एकच वचन असतें. तसेंच वाक्यामध्यें शब्दांची जी मांडणी करणें, तिच्यासंबंधानेंही प्रत्येक भाषेचे कांहीं तरी विशिष्ट प्रकार असतात. मराठींत वाक्यामध्यें कर्ता, कर्म आणि क्रियापद असा सामान्यत: क्रम असतो; उ०—रामा गाय बांधतो; परंतु इंग्रजींत कर्ता, क्रियापद, आणि कर्म, असा क्रम असतो.

२. कोणताही विचार व्यक्त करण्याच्या साधनांची अनुकूलता, विचार तंतोतंत रीतीनें व्यक्त करण्याची ताकद; तसेंच मूळ शब्दांचीं रूपें तयार करणें, व रूपें तयार झाल्यावर तीं वाक्यामध्यें मांडणें, ह्यासंबंधानें कोणत्याही भाषेचा जो विशेष, किंवा विशिष्ट प्रकार, त्याला त्या भाषेचा "स्वभाव" असं म्हणतात. त्या त्या भाषेचें व्याकरण चांगलें शिकल्यानें त्या त्या भाषेचा स्वभाव आपणास समजतो. हा भाषेचा "उत्तान स्वभाव" होय.

३. भाषेचा उत्तान स्वभाव जाणावयाला व्याकरण हें साधन आहे; परंतु व्याकरणावरून भाषेचा गूढ स्वभाव समजत नाहीं. याचें उघड कारण हें आहे कीं, व्याकरणांत प्रत्येक शब्दाचें प्रत्येक रूप देणें शक्य नाहीं. मुख्य मुख्य शब्दांचीं मुख्य मुख्य रूपें मात्र व्याकरणकार देत असतो; आणि आपणास व्याकरणाच्या नियमांनीं व दिलेल्या रूपांच्या साम्यावरून बहुतेक शब्दांचीं रूपें तयार करून घ्यावीं लागतात. हीं अशीं रूपें तयार करतांना आपण तीं

रूपें भाषेमध्यें ग्राह्य होण्याजोगीं आहेत किंवा नाहींत, हेंही पाहिलें पाहिजे. तसेंच एकादा नवीन शब्द प्रचारांत आणावयाचा असल्यास तो भाषेमध्यें सुबक रीतीनें शिरकावतां येईल किंवा नाहीं, हेंही आपणास पाहिलें पाहिजे.

४. भाषेला देहाची उपमा दिली तर वरील विधान वेगळ्या शब्दांनीं असें करितां येईल. भाषारूपी देहाच्या कोठ्यांत हीं आपण तयार केलेलीं रूपें व हे नवीन बनविलेले शब्द पचतील किंवा बोचतील, इकडे आपण लक्ष्य दिलें पाहिजे. प्रत्येक भाषेचे ठायीं नवीन शब्द किंवा धाटणी बनविण्याची ताकद, व बनविल्यानंतर ते शब्द किंवा ती धाटणी सामील करून घेण्याची पात्रता कमीअधिक प्रमाणांत असते; ह्या पात्रतेला तिचा " गूढ स्वभाव " असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रमाणभूत म्हणून गणलेल्या ग्रंथकारांचे लेख वाचणें, चांगल्या वक्त्यांचीं भाषणें ऐकणें, विद्वान् लोकांशीं संभाषण करणें, इत्यादिकांवरून भाषेचा हा गूढ स्वभाव कळण्याजोगा असतो; तो केवळ व्याकरण शिकून कळण्याजोगा नसतो.

५. विशेषणाला " आवणें " हा प्रत्यय लाविल्यानें क्रियापद तयार होतें, असा नियम व्याकरणांत दिलेला असतो, आणि " जुनें " ह्यापासून " जुनावणें " ( जुनें होणें ह्या अर्थी ), " स्थिर " ह्यापासून " स्थिरावणें " ( स्थिर होणें ह्या अर्थी ), हीं किंवा असलींच दुसरीं उदाहरणें दिलेलीं असतात. परंतु " आवणें " हा प्रत्यय लावून ज्या ज्या विशेषणांपासून क्रियापदें तयार होतात, व ज्या ज्या विशेषणांपासून क्रियापदें तयार होत नाहींत, त्या सर्वांच्या यादी देणें अशक्य असतें. ह्या नियमांची व्याप्ति कोठपर्यंत करावयाची, हें भाषेचा गूढ स्वभाव ज्याला समजला आहे, त्यालाच ठरवितां येईल. " जुनें " ह्यापासून " जुनावणें " हें रूप होतें, तसें " नवें " यापासून " नवावणें ", आणि " कठिण " ह्यापासून " कठिणावणें, " हीं रूपें घडविणें हें भाषेच्या गूढ स्वभावाच्या विरुद्ध आहे.

६. तसेंच धातूच्या पुढचा " णें " हा प्रत्यय काढून टाकला, म्हणजे आज्ञार्थक क्रियापद होतें. बोलणें, बांधणें, जाणें, इत्यादिकांपासून " बोल, " " बांध, " " जा, " अशीं आज्ञार्थक क्रियापदें होतात; ह्या नियमाप्रमाणें इच्छिणें,

वांच्छिणें, अपेक्षिणें, इत्यादिकांपासून " इच्छ, " वांच्छ, " " अपेक्ष, " वगैरे आज्ञार्थक क्रियापदें घडविणें, हें भाषेच्या गूढ स्वभावास जुळत नाहीं, व तें कां जुळत नाहीं, ह्याचीं कारणें प्रत्येक उदाहरणांत देतां येतीलच असें नसतें.

७. भाषा शुद्ध रीतीनें वापरतां येण्यास तिचा स्वभाव आपणास चांगला अवगत असावा लागतो; तो व्याकरणाच्या अभ्यासानें, व प्रमाणभूत म्हणून गणलेल्या ग्रंथांच्या परिशीलनानें अवगत होतो. परंतु भाषा शुद्ध रीतीनें वापरावयाची असतां आणखीही एका बाबीकडे लक्ष्य द्यावें लागतें. ती कोणची म्हणाल तर रूढि. भाषेमध्यें रूढीचें प्राबल्य अतोनात असतें, व अमुक उदाहरणांत अमुकच रूढि कां असावी, आणि दुसऱ्या एका उदाहरणांत उलट रूढि कां असावी, हें आपणास सांगतां येण्याजोगें नसतें. 'ऊर' आणि 'छाती' हे शब्द अगदीं समानार्थक आहेत; आपण

क. त्याच्या उरावर दाट केश आहेत.

ख. त्याच्या छातीवर दाट केश आहेत.

ग. त्याचें दुष्कर्म पाहून माझी छाती दडपून गेली.

घ. त्याचें दुष्कर्म पाहून माझें ऊर दडपून गेलें.

असे वैकल्पिक प्रयोग करूं शकतों. पहिल्या जोडींत 'छाती' व 'ऊर', ह्या शब्दांनीं शरीराचा एक विशिष्ट भाग दर्शविला जातो; दुसऱ्या जोडींत 'धैर्य,' असा अर्थ आहे. सारांश 'छाती' आणि 'ऊर' हे दोन्ही शब्द दोन्ही अर्थांनीं एकमेकांबद्दल घालतां येतात, असें आपणास दिसतें. आतां पुढील वाक्यें पहा.

ङ. माझ्याशीं कुस्ती खेळावयाची कोणाची छाती आहे ?

च. माझ्याशीं कुस्ती खेळावयाचें कोणाचें ऊर आहे ?

छ. ह्या नारळीच्या झाडावर चढण्याची तुझी काय छाती लागली आहे ?

ज. ह्या नारळीच्या झाडावर चढण्याचें तुझें काय ऊर लागलें आहे?

आतां वरील वाक्यांपैकीं च आणि ज हीं वाक्यें ग्राह्य नाहींत. तीं कां ग्राह्य नाहींत, हें सांगणें अशक्य आहे. रूढीला तीं मान्य नाहींत, एवढें खरें.

८. आतां तुलनेसाठीं 'अगदी' आणि 'बिलकूल' ही जोडी आपण घेऊं.

क. माझें भाषण अगदीं योग्य होतें.

ख. त्याला मीं अगदीं चोख उत्तर दिलें.

ग. त्याचें वर्तन मला अगदीं संमत नाहीं.

घ. ह्या बाबतींत तुला अगदीं कांहीं समजत नाहीं.

ङ. त्याला बिलकूल अक्कल नाहीं.

च. माझ्या कामांत तूं बिलकूल पडूं नको.

ह्या सहा वाक्यांपैकीं क आणि ख हीं करणरूपी वाक्यें असून बाकीचीं सारीं अकरणरूपी आहेत, व तीं सहाही ग्राह्य आहेत. आतां पुढील वाक्यें पहा.

छ. तूं बिलकूल गाढव आहेस.

ज. तो बिलकूल शहाणा आहे.

येथें हीं दोन्ही वाक्यें अग्राह्य आहेत. 'अगदीं' हा शब्द विकल्पेंकरून करणरूपी व अकरणरूपी योजण्याची रूढीनें सवलत दिली आहे. परंतु 'बिलकूल' हा शब्द अकरणरूपीच योजला पाहिजे, अशी नियंत्रणा रूढीनें लावून दिली आहे.

९. अमुक विचार व्यक्त करावयाचा असतां अमुक शब्दांच्या शेजारीं अमुकच शब्द, अमुकच रूपानें, अमुकच क्रमानें, आले पाहिजेत, ही जी भाषेची रूढि म्हणजे प्रचार, तिला आपण "वाक्प्रचार" ही संज्ञा देऊं, आणि अशा रीतीचा जो शब्दांचा समुदाय, त्याला आपण "शब्दसंहति" असें म्हणूं.

१०. रूढि अमुक प्रकारची कां असावी, हें सांगणें जरी कठिण आहे, तरी रूढींच्या प्रकारांचें वर्गीकरण करणें कठिण नाहीं. ह्या पुस्तकांत ह्या विषयाचें शास्त्रीय रीत्या, सांगोपांग विवरण करावयाचें नसल्याकारणानें आम्ही येथें फक्त प्रसंग, साहचर्य, अनुक्रम, लक्षणा, साम्य, इत्यादिकांसंबंधानें रूढि कशी नियंत्रणा लावून देते, हें आणखी कांहीं उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखवितों.

११. 'घवाड' शब्द नाम असतां त्याच्या अर्थ 'लाभ' असा होतो; व तो शब्द विशेषणाप्रमाणें योजला असतां 'फार मोठा' असा त्याचा अर्थ होतो. ह्या अर्थानें तो फक्त मुहूर्त, माप, चुकी, दैव, आणि वशीला, ह्या पांच शब्दांच्या मागें येऊं शकतो. घवाड मुहूर्त, घवाड माप, घवाड चुकी, घवाड दैव, आणि घवाड वशीला, असे प्रयोग ग्राह्य म्हणून गणले आहेत. परंतु घवाड पेटी, घवाड शरीर, घवाड अंमलदार, घवाड दिवस, वगैरेसारखे प्रयोग हास्यास्पद होतील.

१२. वाक्प्रचारानें ज्या शब्दसंहति ठरून गेल्या आहेत, त्या तशाच योजाव्या

लागतात; त्यांच्यामध्यें यत्किंचित् फेरबदल करूं गेल्यास त्यांचा कांहींच अर्थ होत नाहीं, किंवा भलताच कांहीं अर्थ होतो, किंवा त्यांना कांहीं तरी हास्यास्पद असें रूप प्राप्त होतें. यासाठीं वाक्प्रचारांचा ज्यांच्यावर छाप पडला आहे, अशा शब्दसंहति ठरलेल्याच रूपानें योजावयास पाहिजेत. ' नाऱ्याच्या डोक्यांत एकदा जें वेड शिरलें, तें घालविणें हें महा कर्म कठिण आहे, ' ह्या वाक्यांत ' महा ' हें 'कर्म' ह्याचें विशेषण नसून 'कठिण' ह्याचें आहे; तरीही 'महा' हा शब्द वाक्प्रचारानें ' कर्म ' ह्याच्या अगोदर घालावा लागतो. " पोट पाठीस लागणें, " ह्या शब्दसंहतिचा अर्थ " आपला चरितार्थ चालविण्याची जबाबदारी एकाद्यावर असणें ", असा आहे; उदाहरणः—आम्हांला हीं कामें करावयाला फुरसूद आहे कोठें ? पोट पाठीस लागलें आहे ना ? परंतु " पोट पाठीस लागलें आहे, " ह्या शब्दसंहतींतील शब्दांची मांडणी थोडीशी बदलून जर " पाठीस पोट लागलें आहे, " असें आपण म्हटलें, तर " पोट वखाटीस गेलें आहे, " असा भलताच अर्थ होईल.

१३. तसेंच कांहीं शब्द अगदीं समानार्थक किंवा बहुतेक अंशानें समानार्थक असतात; अशा शब्दांच्या शेंकडों जोड्या आपण हरहमेश वापरतों. परंतु एका एका जोडींतील दोन्ही शब्द समानार्थक आहेत, म्हणून त्यांच्या स्थानांत अदलाबदल केल्यानें वाक्प्रचाराचें उल्लंघन केल्याचा दोष आपल्याकडे येईल. कोनाकोपरा ( किंवा कानाकोपरा ), ताळमेळ, चीजवस्त ( चीजवस्तु ), दिवाबत्ती, मुलेंबाळें, झाडझुडप, चूकभूल, चिरगूटपांघरूण, दाणागल्ला, गुरेंढोरें, लांकूडफाटा, निगरगट्ट ( निबरघट्ट ), भूतपिशाच्च, गप्पागोष्टी, साधाभोळा, कथावार्ता, वगैरे जोड्यांतील शब्द पुढचे मागें आणि मागचे पुढें केले, तर वाक्प्रचाराचें उल्लंघन होईल. कोपराकोना, मेळताळ, वस्तचीज, वगैरेसारख्या जोड्या करतां येणार नाहींत. तसेंच रंग दाखविणाऱ्या शब्दांच्याही जोड्या असतात. ह्या दुसऱ्या शब्दानें त्या त्या रंगाचा गडदपणा व्यक्त करावयाचा असतो. पांढरा सफेद, पिवळा जरद, तांबडा लाल, काळा कुळकुळीत, हिरवा चार, इत्यादि जोड्यांतील दोन शब्दांच्या स्थानांची अदलाबदल करतां येणार नाहीं.

१४. कित्येक शब्दसंहतींत लक्षणा समाविष्ट झालेली असते. एकाद्याला ' तोंड काळें कर ' म्हणून आपण म्हटलें, म्हणजे त्यानें आपल्या तोंडाला काजळ

फांसावें, अशी आपली इच्छा नसते, तर त्यानें निघून जावें, इतकाच आपला अभिप्रेत अर्थ असतो. तसेंच " रामभाऊंच्या आयुष्याची दोरी तुटली, " हीही लक्षणा आहे. ह्या वाक्याचा अर्थ " रामभाऊंचें आयुष्य संपलें, " किंवा " रामभाऊ मरण पावले, " असा होय. येथें आयुष्याला दोरीची उपमा दिली आहे, आणि अर्थात् " तुटणें " हें क्रियापद आपण योजिलें आहे. वाक्प्रचारानें आयुष्याला दोरीचीच उपमा दिली पाहिजे, आणि "तुटणें" हेंच क्रियापद योजिलें पाहिजे, असें ठरून गेलें आहे. म्हणून 'आयुष्याचें मडकें फुटलें', 'आयुष्याचा कागद फाटला', 'आयुष्याची काठी मोडली', वगैरेसारखे प्रयोग करतां येणार नाहींत.

गढणें, ( बुडणें मराठी ), निमग्न ( संस्कृत ) होणें, गर्क होणें ( फारशी ), ह्या तिन्ही शब्दांचा अर्थ ' पाण्याच्या पृष्ठभागाखालीं जाणें, ' असा एकच आहे. परंतु ते ते शब्द त्या त्या विशिष्ट प्रसंगींच योजले पाहिजेत, असें वाक्प्रचारानें ठरून गेलें आहे. ' ती मुलगी कादंबरी-वाचनांत गढून गेली आहे, ' किंवा ' गर्क झाली आहे. ' पण ' ती विधवा शोकसागरांत गर्क झाली आहे, ' किंवा ' गढून गेली आहे, ' असें म्हणतां यावयाचें नाहीं.

१५. साम्याच्या सरणीचा अवलंब करणें, हेंही पुष्कळ प्रसंगीं धोक्याचें असतें. उदाहरणार्थ, ' दुखणें ' या क्रियापदाचा कर्ता शरीराचा कोणताही अवयव, किंवा कोणतेंही इंद्रिय होऊं शकतें. " माझें पोट दुखत आहे, " " डोकें दुखत आहे, " " गुडघा दुखत आहे, " वगैरे सर्व प्रयोग शुद्ध आहेत. आतां "माझें पोट दुखत आहे" ह्याच्याबद्दल " माझ्या पोटांत दुखत आहे, " असें म्हटलें तरी चालतें, म्हणून साम्याच्या सरणीनें ' माझ्या डोक्यांत दुखत आहे, ' किंवा 'गुडघ्यांत दुखत आहे,' असे प्रयोग करणें हास्यास्पद होईल.

शरीरावर दागिने, कपडे, वगैरे यथास्थान घालावयाच्या क्रिया दाखविणारीं जीं वाक्यें, त्यांची रचनाही बहुतकरून विलक्षण आणि हास्यास्पद असते. परंतु ती रचना तशी असली, तरी ती वाक्प्रचारानें शुद्ध म्हणून ठरविलेली असते, त्यामुळें तिच्या अंगचा हास्यास्पद प्रकार नाहींसा झालेला असतो. असल्या विलक्षण रचनेबद्दल आपण जर शुद्ध आणि खरा अर्थ दाखविणारी रचना करूं गेलों, तर आपली रचना अशुद्ध होऊन हास्यास्पद ठरेल.

१६. अंगांत अंगरखा, कोट, सदरा, इत्यादि घालणें; पायांत जोडा, सांखळ्या वगैरे घालणें; हातांत बांगड्या भरणें; अंगांत चोळी घालणें; बोटांत अंगठी घालणें; वगैरे प्रयोग खरें पाहिलें असतां विचित्र आणि म्हणून हास्यास्पद असे आहेत. कारण, आपण अंगरख्यांत अंग घालतों, जोड्यांत पाय घालतों, बांगड्यांत हात घालतों, चोळींत अंग घालतों, आणि अंगठींत बोट घालतों; परंतु वाक्प्रचारानें शुद्ध म्हणून ठरविलेले प्रयोग आहेत, ते वस्तुस्थितीच्या दृष्टीनें हास्यास्पद असले, तरी ते तसेच योजिले पाहिजेत. त्यांत फेरबदल करून चालणार नाहीं. हा फेरबदल कांहीं विशेष कारणासाठीं करावयाला हरकत नसते. चांभारानें जोडा बांधून आणला, आणि सोनारानें अंगठी घडवून आणिली, तर जोडा व अंगठी हीं आपल्या पायाच्या व बोटाच्या मेजाचीं आहेत किंवा नाहींत, हें ठरवावयाचें असतां मात्र " मीं जोड्यांत पाय घातला, " " मीं अंगठींत बोट घातलें, " असे प्रयोग वाजवी होतील, अन्यथा होणार नाहींत.

कित्येक शब्दसंहतींतील वचनेंही वाक्प्रचारानें ठरलेलीं असतात. 'माझा किंचित् डोळा लागला होता, इतक्यांत तूं मला हाक मारलीस, ' येथें खरोखरी दोन्ही डोळे लागलेले असतात, तरी वाक्प्रचारानें एकवचनच शुद्ध ठरलेलें आहे.

१७. वाक्प्रचारांचें वर्गीकरण अनेक रीतींनीं करतां येण्याजोगें आहे. आम्हीं जी रीति ह्या पुस्तकांत स्वीकारिली आहे, ती अशी आहे. व्याकरणांत शब्दांच्या नाम, सर्वनाम, इत्यादि आठ कोटी आहेत. त्यांना अनुसरून आम्हीं वाक्प्रचारांचे समूह केले आहेत; ते समूह ८ असावयाचे; परंतु उभयान्वयी व केवलप्रयोगी ह्या अव्ययांवर अवलंबून असलेले फारसे वाक्प्रचार नाहींत, म्हणून आमचे समूह ६ झाले आहेत. ते असेः—

१. नामें.
२. सर्वनामें.
३. विशेषणें.
४. क्रियापदें.
५. क्रियाविशेषणें.
६. शब्दयोगी.

कोणत्याही कोटींतील शब्दावर अवलंबून असलेला वाक्प्रचार द्यावयाच्या आधीं त्या शब्दाचा मूळचा साधा अर्थ दिला आहे, आणि नंतर मूळचा अर्थ क्रमाक्रमानें बदलत जाऊन तो शब्द वाक्प्रचारांतर्गत होऊन त्या शब्दानें ज्या शब्दसंहति उत्पन्न झाल्या, त्यांचे अर्थ दिले आहेत. ह्या शब्दसंहति देतांना वर्णानुक्रम होतां होईतों राखिला आहे. एकाद्या शब्दाच्या अर्थाला जेथें म्हणीचें उदाहरण देतां आलें, तेथें तें दिलें आहे. अशा रीतीनें जितक्या म्हणी दिल्या आहेत, त्यांशिवाय ज्या कांहीं महत्त्वाच्या म्हणी आढळल्या, त्या एकत्र करून त्यांचा एक स्वतंत्र समूह केला आहे.

१८. कित्येक वाक्प्रचारांत दोन भिन्न भिन्न कोटींतील शब्द असतात. अशा प्रसंगीं एकादा विशिष्ट वाक्प्रचार शोधणें झाल्यास तो अगोदरच्या समूहांत आम्हीं दिला आहे, दोन्ही समूहांत दिला नाहीं. जसें, मान कापणें, पोटांत शिरणें, इत्यादि वाक्प्रचार 'मान,' 'पोट' ह्या नामांखालीं दिलेले आहेत; तेणें-करून असें झालें आहे कीं, पहिला समूह नामांचा आहे, तो सर्वांत मोठा आहे, त्याच्या खालोखाल विशेषणांचा, त्याच्या खालोखाल क्रियापदांचा इ०. कांहीं समूह ( सर्वनामें इ०) हे मात्र लहान झाले आहेत.

# नामें.

—*—

## शरीरावयवांवरून झालेले वाक्प्रचार.

### १९. अंग.

१. (क) शरीर, देह. उ० मातींत खेळून तुझें सारें अंग मळून गेलें आहे, चार तपेल्या अंगावर ओतून घेऊन स्वच्छ होऊन ये.

(ख) शरीराचा कोणताही अवयव, किं० भाग, किं० इंद्रिय. उ० हात, पाय, वगैरे शरीराचीं अंगें होत.

(ग) बाजू, दिशा, तरफ. उ० माझ्या डाव्या अंगाला बसला होता, तो माझा थोरला भाऊ, आणि उजव्या अंगाला बसला होता, तो माझ्या वर्गांतील एक मुलगा होता. उ० तुमचें पागोटें मागल्या अंगानें बेडौल दिसतें.

(घ) कोणत्याही शास्त्राचा, विषयाचा, कृत्याचा, किं० विधीचा विभाग. ह्या विभागांचे जे पोटविभाग, त्यांना "उपांगें" म्हणतात. उ० हत्ती, रथ, घोडेस्वार आणि पायदळ, हीं प्राचीन काळीं सैन्याचीं चार अंगें समजलीं जात असत. राजा, मंत्री, मित्रमंडळी, खजीना, देश, सैन्य, आणि किल्ले हीं राज्याचीं सात अंगें होत. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष, हीं वेदाचीं सहा अंगें होत.

(ङ) कर्तृत्व; संबंध. उ० त्या मसलतींत गोविंदपंतांचें अंग आहे, ह्यांत शंका नाहीं.

(च) गुप्त रीतीची मदत; किं० आश्रय. उ० गांवांत आलीकडे फार फार चोऱ्या होऊं लागल्या आहेत, आणि चोर तर पकडले जात नाहींत, ह्यावरून चोरांना पोलिसाचें अंग आहे, असें वाटतें.

(छ) कर्तृत्वाचें अधिष्ठान; ठिकाण. उ० त्याच्या अंगीं चित्रकलेचा गुण आहे. उ० हा दोष माझ्या अंगीं नाहीं, म्ह० माझ्याठायीं नाहीं.

(ज) शरीरांत कांहीं विघड झाल्यामुळें आंतील आंतडीं वगैरे स्थानभ्रष्ट होऊन शरीराच्या कांहीं द्वारांनीं बाहेर डोकावूं लागतात तीं.

(झ) कौशल्य, चातुर्य, एकाद्या गोष्टीकडे मनाची विशेष प्रवृत्ति म्ह० कल. उ० त्याला गाण्याचें अंग आहे.

(ञ) मदत करणारा; आपल्या बाजूनें खटपट करणारा माणूस; वशीला. उ० दरबारांत अंग असल्यावांचून कार्य सिद्धीस जात नाहीं.

२. **अंग ओढविणें**—स्वतःला पुढें लोटणें. उ०
आपुलेंच अंग तुम्हीं वोढविलें । त्याचें निवारिलें महादुःख ॥

३. **अंग काढणें अंग** किं० **काढून घेणें**—एखाद्या कामाशीं असलेला आपला संबंध तोडणें; एकाद्या कामांतून बाहेर पडणें. उ० त्यांची मसलत परिणामीं हितकर नसल्यामुळें तिच्यांतून मीं आपलें अंग काढून घेतलें.

४. **अंग घालणें**—मदत करणें. उ० आमच्या कामांत तूं अंग घातल्यानें आमची फार सोय होईल, ( म्ह० आम्हांला तूं मदत केलीस तर, इत्यादि. )

५. **अंग चोरणें**—

(क) कुचरपणानें काम करणें. उ० तो मजूर मला आवडत नाहीं, कारण, तो नेहेमीं अंग चोरून काम करीत असतो.

(ख) कसला तरी तडाखा चुकविण्यासाठीं शरीराचा विशिष्ट भाग आकुंचित करणें, किंवा दूर सारणें; उ० मीं त्या माकडाच्या वरगळ्यांवर नेम धरून धोंडा मारला, पण त्यानें आपली जागा न सोडतां अंग चोरून धोंड्याचा मार चुकविला.

६. **अंग झाकणें** किंवा **लपविणें**—एकाद्या कामाशीं आपला कांहीं संबंध आहे, हें लोकांस न कळूं देणें.

७. **अंग झाडणें**—नाकबूल करणें, अव्हेरणें.

८. **अंग टाकणें**—

(क) रोडावणें. उ० आई मेल्यापासून ह्या मुलानें अंग टाकलें आहे, ( म्ह० हें मूल वाळत चाललें आहे ).

(ख) फार श्रम झाल्यामुळें, किंवा दमल्यामुळें विश्रांतीसाठीं आडवें होणें. उ० आमच्या रामभाऊंची कचेरी फार लांब आहे. संध्याकाळीं ते घरीं येतात, तेव्हां घटकाभर झोपाळ्यावर अंग टाकून पडतात, आणि मग हात पाय धुवावयास जातात.

९. **अंगाबाहेर टाकणें**—एकादी गोष्ट किंवा कृत्य न पथकरणें; एकाद्या कृत्याशीं असलेला आपला संबंध तोडून टाकणें. उ० महाराजांची भेट घालून देण्यांत सदूभाऊंचा उपयोग होईल, अशी मला फार आशा होती. पण मीं त्यांच्यापाशीं ही गोष्ट काढतांच ती त्यांनीं अंगाबाहेर टाकली, ( म्ह० महाराजांच्या भेटीचा योग घडवून आणण्याचे कामीं मी तुम्हांस मदत करणार नाहीं, असें ते म्हणाले. )

१०. **अंग दर्शविणें**—एकाद्या कामाशीं आपला कांहीं संबंध आहे, हें प्रकट करणें. उ० ह्या कामीं महाराजांना तुम्हीं आपलें अंग न दर्शविलें, तर चांगलें होईल.

११. **अंग दाखविणें**—एकाद्या कामीं आपलें कर्तृत्व किंवा चातुर्य गाजाविणें.

१२. **अंग देणें**—सहायता करणें; मदत करणें.

१३. **अंग धरणें**—थंडीनें अंग दुखणें. उ० तुम्ही अंगणांत भिजूं नका; तुमचें अंग धरेल. [ येथें "धरणें" हें अकर्मक क्रियापद आहे. ]

१४. **अंग धरणें**—लठ्ठ होणें, गुटगुटीत होणें. उ० ह्या मुलाला तुम्हीं डोंगरे यांचें बालामृत द्या, म्हणजे तें अंग धरील. [ येथें "धरणें" हें सकर्मक क्रियापद. ]

१५. **अंग घेणें**—लठ्ठ होणें.

१६. **अंग मरणें**—त्वचा बधिर होणें ( पक्षघातादिकांमुळें ). त्याचें अंग मेलें आहे; त्याच्या उजव्या हाताला चिमटा घेऊन पहा, म्हणजे तुमची खात्री होईल.

१७. **अंग चोरणें** किंवा **मारणें**—शरीर किंवा शरीराचा कोणताही भाग आकुंचित करणें. उ० पिंजऱ्याचें दार अर्धवट उघडें राहिलें होतें, त्याच्या फटींतून पोपट अंग चोरून बाहेर पडला.

१८. **अंग मुरडणें**—ऐटीनें हातवारे वगैरे करणें. दिमाख दाखविणें. उ० नवी साडी नेसून गोदी पहा कशी अंग मुरडीत आहे ती!

१९. **अंग मोडून काम करणें**—आपली सारी शक्ति, करामत खर्च करून एकादें काम करणें.

२०. **अंग मोडून येणें**—ताप यावयाच्या पूर्वी गात्रें कसकसणें. उ० माझें अंग मोडून आलें आहे; लवकरच ताप भरेल, असें वाटतें.

२१. **अंग राखणें** किंवा **वांचविणें**—कुचरपणानें काम करणें; उ० असा अंग राखून काम करूं नको। सहा आणे मजुरी घेणार ती फुकटची आहे काय?

२२. **अंग सावरणें**—

(क) तोल संभाळणें; उ० केळ्याच्या सालीवरून माझा पाय घसरला, पण मी मोठ्या शिताफीनें अंग सावरलें, म्हणून पडलों नाहीं!

(ख) पूर्व स्थितीवर येणें.

२३. **अंगाखालीं घालणें**—स्वतःच्या उपयोगासाठीं किंवा उपभोगासाठीं ठेवणें, किंवा घेणें, किंवा राखणें.

२४. **अंगाखालीं पडणें**—परिपाठाचा होणें.

२५. **अंगाचा आंकडा होणें**—पेटके वगैरेच्या कारणानें गात्रें ताठ होणें, किंवा आखडणें.

२६. **अंगाचा आळापिळा करणें**—

(क) गात्रें पिळवटणें.

(ख) एकाद्या कामीं असेल नसेल ती शक्ति खर्चिणें.

२७. **अंगाचा खुर्दा होणें**—श्रमादिकांनीं अगदीं थकून जाणें; एकसारखे धक्के बसून बसून गात्रें खिळखिळीं होऊन जाणें. उ० खोडाळ्याची वाट किती खराब होती म्हणून सांगूं! बैलगाडींत बसून माझ्या अंगाचा खुर्दा होऊन गेला!

२८. **अंगाचा खुर्दा करणें**--गातें खिळखिळीं करणें. उ० माझ्यापासून जरा दूर खेळ, मघापासून माझ्या अंगाचा खुर्दा करून सोडला आहेस !

२९. **अंगाचा होरपळा होणें**–तापानें कि० रागानें अंग भाजत असणें. उ० तापानें माझ्या अंगाचा असा होरपळा होत आहे कीं, पुसून सोय नाहीं!

३०. **अंगाची चौघडी करणें**--अंग चार वेळां दुमडणें. उ० डोंबाऱ्यांच्या कसरतींत लहान लहान पोरें अंगाची चौघडी करतात.

३१. **अंगाची लाही होणें**--

(क) अंग अतिशय तापणें. अंगाचा भडका होणें. उ० उन्हाळ्याच्या दिवसांत वासुंदी फार खाल्ली असतां अंगाची लाही होते.

(ख) क्रोधानें खवळून जाणें; उ० माझ्या मुलानें तुमचा अपमान केला, हें ऐकून माझ्या अंगाची लाही झाली.

३२. **अंगाची लाही करणें**--

(क) अंग तापविणें, असह्य उष्म्यानें अंगाचा भडका करणें. उ० आजच्या उन्हानें माझ्या अंगाची लाही करून सोडली आहे.

(ख) क्रोधास चढविणें, राग आणणें; उ० अपमानकारक भाषणानें त्यानें माझ्या अंगाची लाही करून सोडली !

३३. **अंगाची होळी होणें**—तापानें किं० क्रोधानें अंग तापणें, किं० चरफडाट होणें.

३४. **अंगाची होळी करणें**--तापानें किं० क्रोधानें अंग तापविणें, किं० चरफडाट करणें.

३५. **अंगाचें अंथरूण करणें**—स्वतांच्या शरीराची किं० सुखाची पर्वा न बाळगतां दुसऱ्याची सेवाचाकरी करणें. उ० त्याला नोकरी लावून द्यावी म्हणून मी अंगाचें अंथरूण केलें, पण तो हे उपकार स्मरत नाहीं !

३६. **अंगाचें आंथरूण होणें**--ताप वगैरे आजारानें अशक्त होऊन अंथरुणाला खिळून राहणें.

३७. **अंगाचें कातडें काढून जोडा शिवणें**--एकाद्या माणसासाठीं पराकाष्ठेची झीज सोसणें.

३८. **अंगाचे चकदे काढणें**--खूप मारणें; झोडपणें.

३९. **अंगाचा तिळपापड होणें**--रागानें बेफाम होणें.

४०. **अंगाचे धुडके उडविणें**--एकाद्याला झोडपणें.

४१. **अंगाचें पाणी होणें**--एकाद्या कामीं फार कष्ट, त्रास, पीडा होणें.

४२. **अंगाचें पाणी करणें**--एकाद्या कामीं फार मेहनत करणें, कष्ट सोसणें, तसदी घेणें. उ० तुझ्यासाठीं मीं आपल्या अंगाचें पाणी केलें, आणि तुला तर कांहीं उपकार वाटत नाहींत !

४३. **अंगाबाहेर टाकणें** किं० **अंगानिराळें करणें**--एकादें काम न पत्करणें; एकाद्या कामाशीं असलेला संबंध तोडणें.

४४. **अंगानें, अंगीं,** किं० **अंगें**--स्वतः; उ० कोणतेंही काम अंगानें केल्यास चांगलें होतें.

४५. **अंगाला** किं० **अंगांत बसणें**--अंगाला ठीक, बेताचें होणें; उ० ही बंडी माझ्या अंगाला चांगली बसत नाहीं.

४६. **अंगाला येणें**--अंगांत घालावयाला पुरे इतका मोठा असणें; उ० ही बंडी माझ्या अंगाला येत नाहीं, ( म्ह० मला नीटशी पुरत नाहीं ).

४७. **अंगाबरोबर होणें** किं० **असणें**--अंगाला पुरण्याइतका, म्ह० कमी नाहीं आणि जास्तीही नाहीं, असा असणें; उ० हा सदरा मला अगदीं अंगाबरोबर होतो.

४८. **अंगावर**--दुसऱ्याच्या मदतीची, संमतीची, अनुकूलतेची वाट न पाहतां, किं० पर्वा न बाळगतां. उ० सऱ्याचे रुपये मीं अंगावर भरले.

४९. **अंगावर येणें** किं० **कोसळणें; अंगाशीं येणें**--एकादें काम फिसकटून त्याबद्दलची अडचण सोसावी लागणें. उ० ती मसलत माझ्या अंगाशीं आली.

५०. **अंगावर घेऊन**--आपलें असें समजून; प्रेमपूर्वक; जबाबदारी शिरावर वाहून; मनापासून. उ० आम्हीं ह्या गांवीं परकी आहों; आपणच हें लग्नाचें कार्य अंगावर घेऊन पार पाडलें पाहिजे !

५१. **अंगावर घेणें**-पथकरणें. उ० तो लक्ष्मणराव कृतघ्न मनुष्य आहे. त्याचें काम तूं कशाला अंगावर घेतोस ?

५२. **अंगावर तुटून पडणें**-एकाद्यावर निकरानें हल्ला करणें. उ० ते चोर आमच्या अंगावर तुटून पडले.

५३. **अंगावर येणें किं० जाणें.** एकाद्यावर हल्ला करावयास धावून येणें किं० जाणें. उ० ते चोर कुऱ्हाडी घेऊन आमच्या अंगावर आले.

५४. **अंगावर येणें**-एकाद्याला रागें भरूं लागणें; एकाद्यावर ताशेरा झाडावयास सरसावणें. उ० मी त्याच्या बुकाला नुसता हात लावला, तों तो माझ्या अंगावर आला!

५५. **अंगावर पडणें**—

(क) अप्रिय, किं० गैरसोयीची, किं० महागाईची जिन्नस पथकरावी लागणें. उ० आंबेमोहोर म्हणून मीं हे तांदूळ विकत आणिले, ते निघाले कमोदाचे; कमोद आमच्या यजमानांच्या माणसांना मुळींच चालत नाहींत. त्यामुळें हे पल्लाभर तांदूळ माझ्या अंगावर पडले.

(ख) एकाद्याला करावें लागणें; किं० निस्तरावें लागणें.उ० जेवण आटोपतांच सर्व बायका निघून गेल्या; तेव्हां उष्टींखरकटीं, शेणपाणी, हीं कामें माझ्या एकटीच्या अंगावर पडलीं.

(ग) एकाद्यावर ताशेरा झाडणें.

५६. **अंगावर शेकणें**-हानिकारक होणें. उ० हा व्यापार तुमच्या अंगावर शेकेल (म्ह० ह्या व्यापारांत तुम्हांस बूड लागेल ).

५७. **अंगावरचें मूल**-आईच्या अंगावरचें दूध पिण्याइतकें लहान मूल.

५८. **अंगावरचें मूल तोडणें**-मुलाचें स्तनपान बंद करून त्याला वरचें दूध, किंवा अन्न ( भात वगैरे ) देणें. उ० रामाला अंगावरचा तोडावयाला मला भारी प्रयास पडले.

५९. **अंगावरून वारा जाणें**-अर्धांगवायूनें आजारी पडणें, पक्षघाताचा रोग होणें. उ० त्याच्या डाव्या अंगावरून वारा गेला आहे.

६०. **अंगाला कुयले लागणें**-मत्सरानें व्याकुळ होणें; अंगाला ठणका

लागणें (लाक्षणिक अर्थानें); चरफडाट होणें. मला बढती मिळाली, तेव्हां गोंद्याच्या अंगाला कुयले लागले.

६१. **अंगास येणें किं० अंगीं येणें**–नुकसानीची बाब होणें. उ० चिंचेचा व्यापार हरिभाऊंच्या अंगास आला.

६२. **अंगास लागणें, अंगीं लागणें**––

(क) फलद्रूप होणें; लाभप्रद, हितकारक होणें. उ० तूं रोज अर्धा तास व्यायाम केलास, तर हें पितोस तें दूध तुझ्या अंगास लागेल.

(ख) एकाद्यावर शाबूद होणें. उ० हा खून त्याच्या अंगीं लागावयाचा नाहीं.

(ग) सोसावें लागणें; उ० हें नुकसान उगीचच्या उगीच माझ्या अंगास लागलें.

६३. **अंगीं असणें**–ठायीं असणें. उ० आल्याच्या अंगीं पित्त शमविण्याचा गुण आहे. त्याच्या अंगीं गायनाची कला आहे. त्याच्या अंगीं विनय नाहीं. लोहचुंबकाच्या अंगीं लोखंड आकर्षिण्याचा गुण असतो.

६४. **अंगीं आणणें**–ठायीं आणणें. उ० वक्तशीरपणा अंगीं आणण्याचा प्रयत्न कर. नसतें शौर्य अंगीं आणून त्यानें मजवर हल्ला केला.

६५. **अंगाची सावली करणें**–आपल्या संरक्षणाखालीं एकाद्याला घेणें. उ० साधुपुरूष आपल्या अंगाची सावली करून दीनाचें रक्षण करतो.

६६. **अंगीं जिरणें**–एकादी खोडी, व्यसन, लकब जडणें. उ० रामभाऊला वेडावून दाखवितां दाखवितां बोबडें बोलण्याची खोडी शिवरामाच्या अंगीं जिरली.

६७. **अंगीं ताठा भरणें**–मगरूरी येणें; उ० त्याला हेड क्लार्कची जागा मिळाल्यापासून त्याच्या अंगीं भारी ताठा भरला आहे.

६८. **अंगीं तुटणें**–रोड होणें. उ० आई मेल्यापासून तें मूल भारी तुटलें.

६९. **अंगीं नसणें**–अवगत नसणें; म्हशीचें दूध काढणें माझ्या अंगीं नाहीं.

७०. **अंगीं फुटणें**–लठ्ठ होणें; जाडी होणें. उ० त्यानें मलईचा खुराक सुरू केल्यापासून तो खूप अंगीं फुटला आहे.

७१. **अंगीं बसणें**-परिचित होणें.
७२. **अंगीं भिनणें**-जडणें. उ० नाऱ्याची संगति लागल्यापासून ह्याच्या अंगीं टवाळकी भिनली.
७३. **अंगीं माशा मरणें**-आळशी बसणें. उ० माझ्या अंगीं काय माशा मेल्या आहेत? (म्ह० मी काय आळशी बसलेला आहे?)
७४. **अंगीमाशीं भरणें** किं० **अंगीं भरणें**-लट्ठ, गुटगुटीत होणें. उ० द्वारकानाथ तालीम करूं लागल्यापासून अंगीमाशीं भरत चालला आहे.
७५. **अंगीं मिरच्या लागणें** किं० **झोंबणें**-चरफडाट होणें. उ० दुकानदारानें मला कापड स्वस्त्या दरानें दिलें, म्हणून तुझ्या अंगीं कां मिरच्या झोंबल्या? उ० वरिष्ठानें माझें काम दोन तास कमी केलें, म्हणून सर्व कारकुनांच्या अंगीं मिरच्या लागल्या.
७६. **अंगीं मुरणें**-पुरतेपणीं न फुटणें, उगवणें, पिकणें किं० बाहेर पडणें, पुरतेपणीं बरा न होणें. उ० त्याला केळें खायला द्या, म्हणजे कांजिण्या त्याच्या अंगीं मुरणार नाहींत. उ० योग्य उपचार न झाल्याकारणानें त्या मुलीच्या अंगीं ताप मुरला.
७७. **आपल्या अंगीं, अंगें,** किं० **अंगानें**-स्वतः.
७८. **आपल्या अंगीं विन्हाड देणें**-दुर्व्यसनाला आपल्या ठायीं थारा देणें. उ० मगरूरीला आपल्या अंगीं विन्हाड देऊं नको.
७९. **एका अंगावर असणें** किं० **होणें**-एका बाजूस राहाणें.

## २०. ऊर.

१. **ऊर**--छाती, वक्षःस्थळ.
२. **ऊर काढून चालणें**-ऐटीनें किं० बेपर्वाईनें चालणें किं० वागणें.
३. **ऊर दडपणें**-(भीतीनें, आश्चर्यानें, वगैरे) स्तब्ध किं० ग्रस्त होणें.
४. **ऊर दबणें, बसणें, फाटणें, उलणें**-आश्चर्यचकित होणें; भीतिग्रस्त होणें; घाबरणें; गांगरणें.
५. **ऊर दाटणें** किं० **भरणें**-
(क) छातींत बांध बसणें.
(ख) दुःख, प्रेम, वगैरे भावनांनीं हृदय भरणें.

६. **ऊर पिकणें**–
(क) छातींत कफ दाटणें.
(ख) फार श्रम केल्यानें छाती दुखणें.

७. **ऊर फोडणें**–फार श्रम करणें. उ० तूं हेकट मनुष्य आहेस! तुझ्या-पुढें ऊर फोडणें व्यर्थ!

८. **एखाद्याचें ऊर फोडणें**––त्याच्याकडून फार काम करून घेऊन त्याला दुःख देणें. उ० ह्या घोड्याला दामटून तुम्हीं त्याचें ऊर फोडलें!

९. **ऊर बडविणें**––दुखानें, आश्चर्यानें, वगैरे छातीवर हातांनीं ताडन करणें.

१०. **उराला किं० छातीला हात लावून, किं० उरावर, छातीवर, हात ठेवून**–भरंवशानें, निश्चयानें, खात्रीपूर्वक. उ० ह्या आर्येचा अर्थ मला समजला आहे, असें मी छातीला हात लावून तुम्हांला सांगतों.

११. **उरापोटावर उचलणें**––मोठ्या कष्टानें किं० श्रमानें उचलणें.

१२. **एकाद्याच्या उरावर असणें**–
(क) अगदीं करावयास पाहिजे असें काम त्याच्या शिरावर असणें. उ० तुमच्याबरोबर पत्ते खेळावयाला मला वेळ नाहीं. माझ्या उरावर हीं पांच समीकरणें मास्तराला दाखवावयाचीं अशीं आहेत ना?
(ख) त्याच्यावर अंमल करणारा, किं० अधिकार चालविणारा मनुष्य असणें. उ० कचेरींत उशिरां जाऊन कसें चालेल? आमच्या उरावर तो साहेब आहेना? (म्ह० आम्हांला रागें भरणारा इ०).
(ग) भारभूत झालेला असणें. उ० दहा रुपयांत माझा संसार कसा भागेल? माझ्या उरावर भावजय आहेना? (म्ह० तिला पोसण्याची जबाबदारी माझ्या शिरावर आहेना?)

१३. **उरावर घेणें**––एकादें कठिण काम करण्याचा पथकर घेणें, किं० तें करावयास निघणें.

१४. **एकाद्याच्या उरावर धोंडा ठेवणें**––त्याला अवघड काम करावयास सांगणें. [ 'धोंड' असा स्त्रीलिंगी शब्दही येथें योजण्यांत येतो.]

१५. **एकाद्याच्या उरावर बसणें**—
(क) करावयाला पाहिजेच असें त्याच्याकडे, किंवा त्याच्या वांट्याला, कांहीं काम येणें.
(ख) त्याला कैचींत धरणें. त्यांच्यावर जबरदस्ती करणें.

१६. **एकाद्याला उराशीं धरणें**—
(क) त्याला नम्रपणानें विनविणें, किं० प्रार्थणें.
(ख) त्याला प्रेमानें कवटाळणें.

१७. **उरीं डोंगर घेणें**—
(क) महत्त्वाचें किं० कठिण काम पथकरणें.
(ख) फार परिश्रम करणें.

१८ **उरींपोटीं करणें**—फार परिश्रमानें किं० कष्टानें करणें.

१९. **उरींपोटीं धरणें**—नम्रपणानें विनवणी करणें; दादाबाबा करणें.

२०. **उरीं फुटणें** किं० **भरणें**—जिवाविशेष श्रम केल्यामुळें छाती दुखूं किं० ठणकूं लागणें; अतिशय थकून जाणें.

## २१. ओंटी.

१. (क) लुगडें किं० धोतर नेसल्यावर त्याचा जो खोळीसारखा भाग होतो तो. उ०त्या मुलीनें आंब्याच्या झाडाखालीं पडलेल्या साऱ्या कैऱ्या आपल्या ओंटींत भरल्या.
(ख) तांदूळ, गहूं, हळकुंडें, वगैरे पदार्थ स्त्रीच्या ओंटींत घालतात ते.
(ग) बेंबीच्या खालचा व कंबरेच्या वरचा पोटाचा भाग.

२. **ओंटी भरणें**—
(क) स्त्रीच्या लुगड्याच्या ओंटींत तांदूळ, गहूं, नारळ, वगैरे पदार्थ यथाविधि घालणें.
(ख) एकाद्याच्या आवडत्या नातलगाला औषधें वगैरेंच्या योगानें, बरें करणें; जिव्हाळ्याच्या माणसाला जीवदान देणें. उ० वैद्यबोवा माझ्या मुलाला बरें करून माझी ओंटी भरा.

३. **ओंटींत घालणें**—

(क) एकाद्याच्या हवालीं करणें. उ० पोरीला मी तुमच्या ओंटींत घालीत आहे, तिचा पोटच्या मुलीप्रमाणें संभाळ करा.

(ख) अपराध, दोष, वगैरे एकाद्याच्या माथीं बसविणें. उ० हा अन्याय तुम्ही उगीचच्या उगीच माझ्या ओंटींत घालीत आहां!

(ग) दत्तक देणें. उ० जनाबाई आपला मुलगा कधींही माझ्या ओंटींत घालावयाची नाहीं.

४. **ओंटींत देणें**–दत्तक देणें. उ० मी आपल्या मुलाला कोणाच्याही ओंटींत देणार नाहीं.

५. **ओंटींत घेणें**–दत्तक घेणें.

६. **भरल्या ओंटीनें**–मुलासकट. उ० प्रसूत व्हावयास माहेरीं जाऊं निघालेल्या सुनेस सासू म्हणाली, "भरल्या ओंटीनें परत ये!"

## २२. ओठ.

१. **ओठ**–मुखाच्या वरचा आणि खालचा असे जे दोन अवयव, ते प्रत्येक.

२. **ओठ करपणें**—फजीती होणें. पराभव होणें. उ०

> कुरुगुरुसवें झगडतां त्या सुरगुरुचेहि ओठ करपावे ।
> विन्ध्यस्कंधग शिशुचा कां विधुच्या मंडला न कर पावे ॥
>
> मोरो०–विराटपर्व.

३. **ओठ फुटणें**––थंडीनें ओठाला चिरा, किं० भेगा पडणें.

४. **ओठाचा जार वाळणें**––जार ह्म० मूल जन्मतांच त्याच्या ओठावर, गालावर, वगैरे जो चिकट, बुळबुळीत पदार्थ असतो तो. ओठाचा जार वाळणें=अर्भकदशा समाप्त होऊन मोठें होणें. उ० अझून तुझ्या ओठावरचा जार देखील वाळला नाहीं. (म्ह० तूं अझून लहानच आहेस.)

५. **त्याचा (किं० तुझा) ओठ पिळला तर दूध निघेल!**–– तो (किं० तूं) अझून लहानच आहे (किं० आहेस). पाजलेल्या दुधाचीं पुटें अझून त्याच्या (किं० तुझ्या) ओठावर आहेत.

६. **ओठाबाहेर काढणें**––बोलून दाखविणें; प्रकट करणें.

७. **पोटांत एक आणि ओठांत एक**—मनांत एक विचार आणि बोलण्यांत दुसराच !

८. **एकाद्याच्या ओठापर्यंत येणें**—बोलून दाखविण्याच्या तो अगदीं बेतांत असणें.

९ **ओठापर्यंत आलें, पण पोटांत गेलें नाहीं !**–ऐन उपभोगाची वेळ प्राप्त झाली, पण ( दुर्दैवानें ) उपभोग घडला नाहीं !

## २३. कंठ.

१. (क) गळा; छातीच्या वरचा आणि हनुवटीच्या खालचा भाग. डोकें आणि धड ह्यांना जोडणारा शरीराचा भाग. उ०

सर्वांगीं सुंदर उटी शेंदुराची ।
कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥

रामदास.

(ख) घसा. उ० दुःखामुळें त्याच्या कंठांतून शब्द निघेना.

(ग) आवाजी ( गायनांत ); उच्चाराचा प्रकार. उ० त्या स्त्रीचा कंठ मधुर आहे.

(घ) प्रौढ, खणखणीत उच्चार. उ० त्या मुलाचा कंठ नुकताच फुटला. ( म्ह० त्याचा पोरकट किं० कोंवळा आवाज जाऊन आतां त्याला भारदस्त आवाज आला आहे. )

(ङ) राघूच्या किं० खबूतराच्या गळ्यावरील परांचें वर्तुल. ह्या पक्ष्यांचा आवाज स्फुट, किं० मधुरतर झाला, म्हणजे हें वर्तुल काळ्या रंगाचें असतें.

२. **कंठ दाटणें**, किं० **दाटून येणें**, किं० **सद्गदित होणें**—प्रेमातिशया-मुळें घसा भरून येणें. असें झालें असतां शब्दोच्चार, किंवा स्पष्ट शब्दोच्चार, होऊं शकत नाहीं.

३. **कंठ फुटणें**—

(क) शब्दोच्चार प्रौढ, किं० खणखणीत होणें.

(ख) घशांतून पिजका आवाज निघूं लागणें. उ० फार उंच स्वरांत गाऊं नको, कंठ फुटला तर अगदीं रंगाचा भंग होऊन जाईल !

४. **कंठीं प्राण उरणें**--आसन्नमरण होणें. उ० मला वाटतें त्याच्या कंठीं प्राण उरला आहे! आतां त्याला मात्राविंत्रा देऊन कांहीं उपयोग होईल असें दिसत नाहीं!

५. **कंठीं प्राण धरणें**--एकादी इच्छा, किंवा आशा सफळ झाल्यावर मरावें अशा इराद्यानें जीव धरून राहाणें. उ० मरावयाचे आधीं मुलाची भेट व्हावी, अशी त्या म्हाताऱ्याची फार इच्छा होती. तो येऊन भेटे तोंपर्यंत म्हाताऱ्यानें कंठीं प्राण धरून ठेविला होता. मुलगा भेटल्यावरोबर त्याणें प्राण सोडला.

६. **कंठीं प्राण येणें**--भयानें घाबरगुंडी वळणें; तीव्र दुःखानें किं० भुकेनें व्याकुल होणें.उ० मी रानांतून फिरत असतां त्या पिंपळापाशीं जातों, तों त्याच्या बुंधाशीं वाघ वसलेला मीं पाहिला; तेव्हां माझ्या कंठीं प्राण आले. उ० तुझें मूल केव्हांचें रडत आहे तरी? दुधावांचून त्याचे प्राण कंठीं आले आहेत! त्याला एकदम प्यायाला घे.

७. **कंठ मोकळा करून रडणें**--ओकसाबोकशीं रडणें. उ०

मोकळा करुनि कंठ तेधवां
आठवूनि मनिं जानकीधवा।
ते रडे, भरतही तसा रडे
जोंवरी नयन होति कोरडे॥

वामन-भरतभाव.

## २४. कपाळ.

१. (क) *भिवयांच्या वरचा व मस्तकाच्या खालचा जो प्रदेश तो.*
(ख) नशीब, दैव. पूर्वकर्माचा परिपाक.

२. **कपाळ उठणें** किं० **चढणें**—त्रास, पीडा, किं० उपद्रव होणें.

३. **कपाळ काढणें**—वैभवास चढणें. उ० ह्या मुलाच्या विद्येला पैसा खर्च करावयास तुम्ही कचरूं नका. तो चांगलें कपाळ काढील, असा मला रंग दिसत आहे.

४. **एकाद्यावर कपाळ टेकणें**—त्याच्यावर भरंवसा ठेवून असणें.

५. **कपाळ धुवून पाहणें**—नशीबीं काय आहे तें पाहणें.

६. **एकाद्याचें कपाळ फुटणें**—त्याच्यावर दुर्दैव ओढवणें. उ० त्या बाईनें नवऱ्यासाठीं किती पैसे खर्चिले ! किती नवस केले ! पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं तिचें कपाळ फुटलें ! (म्ह० तिचा नवरा मेला.)

७. **कपाळाचें कातडें नेणें**—दुर्दैवी स्थितींत पाडणें; विपत्तींत लोटणें.

८. **एकाद्याचें कपाळ जाणें**—तो दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडणें.

९. **एकाद्याच्या कपाळाची रषा उघडणें** किं० **उपटणें**—त्याला अकल्पित रीतीनें सुदैव प्राप्त होणें.

१०. **कपाळाला केस उगवणें**—अशक्य गोष्ट घडणें. उ० तो रामा पास झाला काय ? कपाळाला केस उगवले असेंच म्हटलें पाहिजे !

११. **कपाळावर हात मारणें**—आश्चर्यानें, दुःखानें, वगैरे कपाळावर ताडन करणें. नशिबास दोष लावणें.

१२. **एकाद्याच्या कपाळाशीं कपाळ घासणें**—त्याच्याशीं सहवास करणें; त्याच्या संगतींत राहणें; त्याच्या कच्छपीं असणें.

१३. **एकाद्याच्या कपाळाला अपकीर्ति, अपयश, दारिद्र्य इ० येणें**—त्याच्या भोगाला अपकीर्ति, इ० येणें.

१४. **एकाद्याच्या कपाळीं डाग लागणें**—त्याची बेआबरू, फजिती होणें.

१५. **एकाद्याच्या कपाळीं भद्रा असणें**—तो नेहमीं दुर्दैवीच असणें.

## २५. कंबर.

१. **कंबर**—कटि. उ० कंबरेला करगोटा घाला. उ० तिच्या कंबरेवर मोठी घागर ठरत नाहीं. उ० सिंहाची कंबर त्याच्या शरीराच्या मानानें बारीक असते.

२. **कंबर मोडणें** किंवा **मोडून जाणें**—कंबरेंत अशक्तपणा येणें. उ० आज विहिरीची मीं पन्नास घागर आणिली, माझी कंबर मोडून गेली.

३. **कंबर खचणें**, किं० **बसणें**, किं० **मोडणें**, किं० **मोडून जाणें**—निराश होणें, गलितोत्साह होणें. उ० माझ्या भावाची परीक्षा नापास

झाली असें ऐकून माझी कंबर खचली. उ० वशिल्याशिवाय येथें कोणतेंही काम होत नाहीं, हें ऐकतांच माझी कंबर बसली.

४. **कंबर ताठणें**—आजारामुळें, किं०अशक्तपणामुळें, कंबर हालविण्याची किंवा वाकविण्याची, ताकद नसणें.

५. **कंबर बांधणें**--कोणत्याही कामाला सिद्ध होणें, किं० तयार राहणें; उत्साह बाळगणें; धैर्य धरणें. उ० मांडव मांडव म्हणजे काय गोष्ट आहे ! हा मी कंबर बांधून तयार आहें ! अर्ध्या तासाच्या आंत तुमचा मांडव पुरता करून देतों. उ० यंदा नापास झालास म्हणून काय झालें ? कंबर बांध ! पुन्हा अभ्यासाला लाग ! पुढच्या वर्षी तूं खचित पास होशील.

६. **कंबर धरणें**, किं० **भरणें**--कंबर दुखत असणें. उ० आज चार पांच दिवस माझी कंबर धरली आहे.

टीप—ह्या प्रयोगांत धरणें हें क्रियापद अकर्मक आहे.

## २६. कान.

१. (क) प्राण्याचें श्रवणेंद्रिय.

(ख) मोदकपात्र, कढई, वगैरें भांडीं धरावयासाठीं, किं० उचलावयासाठीं, केलेलीं जीं साधनें तीं प्रत्येक.

(ग) कानाच्या पाळींत वगैरे दागिना अडकावण्यासाठीं पाडलेलें भोक. उ० माझ्या भिकबाळीचा कान बुझला आहे.

(घ) बंदुकीला वत्ती लावावयाची जागा (ह्या अर्थानें 'काना' हा शब्द अधिक प्रचलित आहे).

२. **एकाद्याचे कान उघडणें**--त्याचा मूर्खपणा दाखवून देऊन सन्मार्गावर आणणें. उ० त्याचे कान उघडण्यासाठीं मीं पुष्कळ प्रयत्न केले, परंतु व्यर्थ ! [ ह्याच अर्थानें **कानउघडणी** ह्या नामाचाही उपयोग होतो. उ० मीं त्याची चांगली कानउघडणी केली. ]

३. **एकाद्याचे कान उघडून सांगणें**–स्पष्ट शब्दांनीं बजावणें. उ० राघवेंद्राच्या संगतीस लागलास तर तुझें फार नुकसान होईल, असें मीं आपल्या मुलास कान उघडून सांगितलें.

४. **एकाद्याचा कान उपटणें–धरणें–पिळवटणें—पिळणें**––अपराधाला शिक्षा करण्यासाठीं त्याचा कान पिरगाळणें.

५. **कान कापणें**, किं० **कान कापून हातावर देणें**—

(क) फसविणें. उ० दुकानदारानें माझा चांगला कान कापला!

(ख) पराभव करणें; एकाद्याच्यावर चढ करणें. उ० त्यानें सर्व लोकांपुढें प्रतिज्ञा केली, कीं जर तुम्ही उद्यां सारे याल, तर मी तुमच्या समक्ष ह्याचे कान कापीन. (इसापनीति).

६. **कान किटणें**–तीच तीच गोष्ट वारंवार ऐकून कंटाळणें. उ० पुरे कर तुझें काशीयात्रेचें वर्णन! तें ऐकून ऐकून आमचे कान किटले.

टीप—प्रयोजक भेदीं "कान किटविणें" ह्याचा अर्थ "तीच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगून कंटाळा आणणें" असा होतो.

७. **कानाला खडा लावून घेणें**––एकदा ठेंच लागल्यामुळें पुन्हा तसें करणार नाहीं असा निर्धार करणें. उं० मी विकत आणलेल्या वांगड्या तुला आवडल्या नाहींत; मी कानाला खडा लावून घेतों; पुन्हा तुझ्यासाठीं कांहीं एक जिन्नस विकत म्हणून आणणार नाहीं.

८. **कान झाडणें**––

(क) विनंति अमान्य करणें. उ० मी त्याला नागपुरी धोतरजोडा विकत घेऊन द्यावयाला आज सांगितलें, पण त्यानें कान झाडले.

(ख) उपदेश झिडकारणें; बोधवचन न पथकरणें. उ० त्याला मीं परोपरीनें बोध केला, पण त्यानें कान झाडले.

९. **कान टवकारून ऐकणें**, किं० **पाहणें**––लक्ष्यपूर्वक ऐकणें. उ० अभ्यासाकडे तुझें लक्ष्य असूं दे; आमच्या गोष्टी असा कान टवकारून कशाला ऐकत आहेस?

१०. **कान टोचणें**–एकाद्याला एकादें काम करावयाला चेतविणें, चिथावणें, किं० उत्तेजन देणें. **सोनारानें कान टोचलेले पटतात**–वलिष्ट मनुष्याचा उपदेश पटतो, अगर दरारा वाटतो. शिरजोर माणसाचा हुकूम ऐकला जातो.

११. **एकाद्याचा कान धरून**, किं० **पिळून घेणें**–जबरदस्तीनें घेणें; हिसकावून घेणें; कोणाच्या कांहीं सबबी न ऐकतां घेणें; हक्कानें घेणें. उ० तें

जाजम माझें आहे, त्याचें नव्हे. मीं नाशकास जातांना तें त्याला वापरावयासाठीं दिलें होतें, इतकेंच; कान धरून तें त्याच्यापासून मी घेईन.

१२. **कान निवणें** किं० **थंड होणें**--आनंदकारक खबर ऐकून हर्ष पावणें. उ० तुझ्या मुलाचें एकदाचें लग्न झालें, हें ऐकून माझे कान निवले.

१३. **कान पाडणें**--गलितधैर्य होणें; निराश होणें; आशा सफल होण्याचा रंग न दिसल्यामुळें खचणें. उ० यंदा तें घर विकत जात नाहीं, हें पाहून त्यानें कान पाडले.

१४. **आपला कान पिळून घेणें**--एकादी गोष्ट करून ती बिघडली, किंवा ती ज्याच्यासाठीं केली असेल त्याला ती न आवडली तर, पुन्हा तसली गोष्ट न करण्याचा निश्चय करणें; उ० तुझ्यासाठीं ही कढई मीं मुद्दाम पुण्याहून आणली; आणि तुला तर ती आवडत नाहीं, पैसे माझ्या अंगावर पडले; आतां मी आपला कान पिळून घेतों, कीं पुन्हा कोणासाठीं कांहीं जिन्नस विकत घ्यावयाची नाहीं.

१५. **कानपूर ओस पडणें**--बहिरें होणें; उ० त्यांच्याशीं इतक्या हळू बोलून कांहीं उपयोग नाहीं; ओरडून बोला; त्याचें कानपूर ओस पडलें आहे.

१६. **कानपूर ओस करून बसणें**--आपणाला ऐकूं येत नाहीं असा बहाणा करणें.

१७. **कान पसरून ऐकणें**--लक्ष्यपूर्वक ऐकणें (पण करावयाला न उठणें). उ० अमुक अमुक वाटेनें, अमुक अमुक खुणा पाहून जा, म्हणजे तुला अमक्या इसमाचें घर दिसेल; त्या घरीं जाऊन अत्तरदाणी आणि गुलाबदाणी माझें नांव सांगून घेऊन ये, म्हणून त्याला मीं सांगितलें; त्यानें माझें सर्व बोलणें कान पसरून ऐकलें; पण तो जागेवरून कांहीं हालेना.

१८. **एकाद्याचे कान फुंकणें, भरणें, किं० भारणें**--त्याला दुसऱ्याबद्दल वाईट सांगून त्याचें मन कलुषित करणें. उ० वरिष्ठानें मला ही जागा देण्याचें कबूल केलें होतें; पण कोणी दुष्टानें त्याचे कान फुंकले; तेणेंकरून त्याचें मन फिरलें, आणि त्यानें ती जागा दुसऱ्याच एका माणसास दिली!

१९. **कान फुटणें**—

(क) बहिरा होणें. उ० अरे, तुला मघांपासून मी ती खिडकी लावा-वयास सांगत आहें, आणि तूं कांहीं ती लावीत नाहींस! तुझे कान फुटले आहेत काय?

(ख) कानामध्यें फोड येऊन कानांतून लस वाहूं लागणें. उ० तुमच्या मुलाचा कान फुटला आहे, त्यांत गायीचें दूध घाला, म्हणजे तो बरा होईल.

२०. **कान येणें**—ऐकण्याची शक्ति प्राप्त होणें. उ० गर्भांतील मुलाला तिसऱ्या महिन्यांत कान येतात.

२१. **कान लांब होणें**—अक्कल कमी होणें, मूर्ख होणें, विकळणें. उ० अलीकडे राम्याचे कान लांब झाले आहेत असें दिसतें. कारण, तो अगदीं कोणाचें कांहीं ऐकत नाहीं!

२२ **कानाच्या चावा घेणें**—भलभलत्या, किंवा खोट्यानाट्या गोष्टी सांगून दुसऱ्याचें मन कलुषित करणें.

२३. **त्याच्या कानाआड** किं० **कानामागें**, किं० **कानावरून ऊं जात नाहीं**—त्याला केलेला उपदेश, बोध अगदीं निष्फल होतो.

२४. **कानाचे कानवले होणें**—कान बेडौल होणें.

२५. **कानाच्या कोपऱ्याला कळूं न देणें**—कोणाच्याही जवळ न सांगणें. उ० तुझी माझी मैत्री म्हणून हा माझा बेत मी तुला सांगत आहें; तूं तो कानाच्या कोपऱ्याला कळूं देणार नाहींस, अशी माझी खात्री आहे.

२६ **कानाचे किडे झाडणें**—

(क) चाहाड्या ऐकून एकाद्याचें मन कलुषित झालें असलें तर, त्याला वस्तुस्थिति कळवून त्याचें मन शुद्ध करणें. उ० माझ्याबद्दल गोविं-दरावानें नानासाहेबांचें मत कलुषित केलें होतें; परंतु मला ह्या प्रकाराची शंका येतांच मीं नानासाहेबांच्या कानाचे किडे झाडले, तेव्हां माझ्याविषयीं त्यांचें मन निवळलें.

(ख) एकाद्याला बोध करणें; रागें भरणें.

२७. **कानांत जपणें किं० मंत्र सांगणें**--एकाद्याजवळ गुलगुल गोष्टी बोलणें. (त्याचें मन वळविण्यासाठीं.) उ० प्रेमचंदाच्या कानांत तूं जपत आहेस, पण सारें फुकट होईल, असें मी तुला आज सांगून ठेवतों!

२८. **कानांत तेल घालून निजणें**—बेफिकीर राहणें, किंवा असणें. उ० तो कानांत तेल घालून निजला आहे, त्याच्या भरंवशावर तुम्ही राहूं नका!

२९. **कानाबाहेर, किं० कानावेगळा करणें**---मनांत न घेणें. उ० मीं त्याची इतकी विनवणी केली, पण व्यर्थ! त्यानें माझी मागणी कानाबाहेर केली!

३०. **कानांत सुंठ फुंकणें**---एकाद्याला चिथावणें. उ० कोणीतरी तुझ्या कानांत सुंठ फुंकली आहे खास! एऱ्हवीं तूं त्या म्हाताऱ्याच्या पाठीस इतका लागला नसतास!

३१. **कानामागून येणें आणि तिखट होणें**--एकाद्याच्यामागून येणें, आणि त्याच्यावर आपला अंमल गाजविण्याला प्रवृत्त होणें.

३२. **कानामागें टाकणें**--न ऐकणें; झिडकारणें. उ० मी तुला हिताची गोष्ट सांगत आहें! माझा उपदेश तूं कानामागें टाकूं नको!

३३. **कानाला खडा लावणें लावून घेणें**—पुन्हा एकादी वाईट, किंवा दुसऱ्याला न रुचणारी, गोष्ट न करण्याचा निश्चय करणें. उ० मी कानाला खडा लाविला कीं, पुन्हा असल्या भानगडींत म्हणून पडावयाचें नाहीं!

३४. **उजव्या (डाव्या) कानावर पडणें, निजणें, लोळणें**----उजव्या (किंवा डाव्या) कुशीवर निजणें इ०; उजवें (किंवा डावें) अंग अंथरुणाला लागेल अशा रीतीनें निजणें इ०. उ० उजव्या कानावर नीज, म्हणजे तुझ्या डाव्या कानांत औषध घालीन!

३५. **कानावर मान ठेवणें**--आळसानें, किंवा बेफिकीरपणानें, एका अंगावर वळून तक्याला टेकून पडणें, किंवा लोळणें. उ० त्रिकमशेटजींला मी भेटावयाला गेलों, तेव्हां ते कानावर मान टेकून झोपाळ्यावर आडवे झाले होते.

३६. **कानावर हात ठेवणें**—

(क) आपणाला कांहींएक माहिती नाहीं, असें म्हणणें. उ०

राम म्हणे, " कर्णी कर ठेवू ती तरि न दक्षिणा आशा ।
मज फार दक्षिणेची, विप्रा जसि तशिच लागली आशा ॥

मोरोपंत–भारत.

(ख) न ऐकणें; हेळसांडीवर नेणें; न पथकरणें; अंगावर न घेणें. उ०

मला निरखितां भवच्चरणकन्यका आपगा.
म्हणे, " अगइ ! ऐकिलेंहि न कधीं असें पाप " गा !
कर श्रवणिं ठेविले, नुघडि नेत्र, घे भीतिला,
न घालिन भिडेस मी, जरिहि कार्यलोभी, तिला ॥

मोरोपंत–केकावलि.

३७. **कानांत तुळशी**, किंवा **तुळशीपत्र घालणें**, किंवा **घालून बसणें**–साधू लोक कानांत तुळशीचीं पानें घालतात, यावरून पुढील दोन अर्थ निघाले आहेत.

(क) प्रपंचांतील लबाडीचे धंदे सोडून देऊन आम्ही साधुत्वाचा मार्ग धरला आहे, असा बाह्यणा करणें.

(ख) तें ऐकूं येत नाहीं, किंवा तिकडे आपलें लक्ष्य नाहीं, किंवा त्याची आपणांस पर्वा नाहीं, असें दर्शविणें.

३८. **कानांत बोटें घालणें**, किं० **कान झाकणें**––एकादी गोष्ट आपणास माहीत नाहीं, असें म्हणणें; एकादी गोष्ट न पथकरणें.

३९. **कानावरून जाणें**—

(क) कानाला ओझरता स्पर्श करून जाणें. उ० चोरट्यानें गोफणीनें झोकलेला धोंडा माझ्या कानावरून गेला.

(ख) ऐकण्यांत येणें. उ० मुंबईला विहाड, तुळशी, आणि तानसा, येथील पाणी येतें, हें तुझ्या कानावरून तरी गेलें आहे काय?

४०. **कानाशीं कान लावणें**—गुप्तपणें मसलती करणें उ० गोविंदराव आणि लालजी यांनीं कानाशीं कान लावून माझी उचलबांगडी करण्याचा बेत ठरविला!

४१. **कानाशीं लागणें**, किं० **कानीं लागणें**—एकाद्याला गुप्त गोष्ट

सांगण्यासाठीं त्याच्या कानाजवळ आपलें तोंड नेणें. उ० तूं लक्ष्मण-रावाच्या कानाशीं इतका वेळ लागून त्याला काय सांगत होतास?

४२. **कानास कोन न कळूं देणें**—गुप्त ठेवणें; प्रकट न होऊं देणें.

४३. **कानास दडे किं० दट्टे बसणें**—कान बधिर होऊन त्यांची श्रवण करण्याची शक्ति नाहींशी होणें.

४४. **कानीं कपाळीं रडणें**, किंवा **ओरडणें**--एकसारखा बोध,उपदेश, वगैरे करून वस्तुस्थिति नजरेस आणून देणें. उ० रोज चार चार तास अभ्यास कर ह्मणून मी आज सहा महिने तुझ्या कानीं कपाळीं ओरडत आहें. पण तूं कांहीं माझें ऐकिलें नाहींस? आतां नापास झालास, तो योग्यच झालास!

४५. **कानीं कोचीं बसणें**,किं० **लागणें**--कोणाचें संभाषण ऐकण्यासाठीं गुप्त ठिकाणीं म्हणजे कोन्यांत कोपऱ्यांत बसणें.

४६. **कानीं मनीं नसणें**--ऐकण्यांत आलेलें नसणें व मनांतही आणलेलें नसणें. ह्याच अर्थी "ध्यानीं मनीं नसणें" हें अधिक प्रचारांत आहे. उ० सखूताईच्या मुलीचें लग्न यंदा होईल, ही गोष्ट माझ्या कानीं मनींसुद्धां नव्हती, (म्ह० ऐकण्यांत आली नव्हती,व मनांतही आलेली नव्हती.)

४७. **आमच्या कानीं सात बाळ्या!**—आम्हांला आतां, म्हणजे यानंतर, कांही एक ऐकूं येणार नाहीं, म्हणजे आम्ही ऐकणार नाहीं, किं० आम्हांला ऐकूं आलें तरी ऐकिलें नाहीं, अशा रीतीनें वागणार! लहान मुलांच्या भाषेंतील हें एक वाक्य आहे.

४८. **ह्या कानाचें ह्या ( किंवा त्या ) कानास कळूं न देणें**—अगदीं गुप्त ठेवणें; कोणालाही कळूं न देणें. उ० ती गोष्ट मजजवळ बोलायाला कचरूं नका. मी ह्या कानाचें त्या कानाला कळूं देणार नाहीं!

४९. **एकादी गोष्ट ह्या कानानें ऐकणें, आणि ह्या ( किं० त्या ) कानानें सोडणें**--ती गोष्ट ऐकल्यानंतर तिच्याबद्दल विचार न करणें; ती विसरण्याचा प्रयत्न करणें; ती जणों ऐकलीच नाहीं अशा रीतीनें वागणें. उ० कोणी आमच्याजवळ कोणाची निंदा केली ,तर आम्ही ह्या कानानें ऐकतों आणि ह्या कानानें सोडून देतों. उ० असल्या गोष्टी आम्ही ह्या कानानें ऐकतों आणि त्या कानानें सोडून देतों.

## २७. कास.

१. **कास**—

(क) स्त्री० गाय, म्हैस, शेळी, वगैरेंची दुधाची ओटी.

(ख) स्त्री० धोतर किंवा लुगडें नेसल्यावर त्याचे सोगे मागें खोवतात ते.

(ग) स्त्री० कंबर. उ०

गळां तुळसीहार कासें पितांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥

(घ) पु० गवत उगवण्यासाठीं राखून ठेविलेली जमीन.

(ङ) पु० जमीनीचा तुकडा.

(च) पु० भातशेतांतील केरकचरा सांठविण्यासाठीं वेगळा केलेला त्याच शेताचा एक भाग.

(छ) पु० पुरवणीदाखल दुसऱ्या ठिकाणीं बक्षीस दिलेली जमीन.

(ज) स्त्री० खोकल्याचा एक प्रकार.

२. **कास घालणें**—एकाद्या कामासाठीं सर्व सामग्री जुळवून तयार होऊन राहाणें. एकादी गोष्ट करावयास उत्सुकतेनें सिद्ध होणें. उ०

उत्तरहि पाण्डवार्ते वर्णुनि कळवी पुन्हा स्वजनकास ।
कीं, "हेचि घालणारे व्यसनीं तारावया स्वजन कास" ॥

मोरो०—विराट.

३. **कास कसणें**—एकादी गोष्ट ईर्ष्येनें किंवा उत्साहानें करावयासाठीं सिद्ध होणें. उ०—

हा सीते ! कशि कळली त्वद्व्यसनकथा पिकास ? हा सीते !
हा सीते ! जरि नत मी, कशितोंचि तथापि कास, हा सीते ! ॥

४. **कासेला लागणें**, किं० **कास धरणें**—स्वतःच्या संरक्षणासाठीं, लाभासाठीं, किंवा कल्याणासाठीं, दुसऱ्याचा आश्रय करून असणें. उ०

होतें सद्धर्मांच्या कासेला लागतां सदा शिव हो !!
येतों, वसा; प्रसन्न प्रभु मृत्यंजय तुम्हां सदाशिव हो ॥

मोरोपंत—वनपर्व, अ. १३, आर्या २७.

सुरभीच्या कांसेसि न सुज्ञें होऊनि वत्स लागावें ।
तुझियाचि दास होउनि लागावें तुजचि वत्सला गावें ॥ ३८ ॥

५. **कासेला लावणें**–कल्याण, सांभाळ करावयासाठीं जवळ घेणें-करणें. उ०
कीं दुस्तरारि सागरिं न बुडो कासेसि लाविला पार्थ ।

मोरोपंत.

## २८. काळीज.

१. **काळीज**—हृदय. देहांतील अत्यंत नाजूक भाग, मर्मस्थान. उ०
भेदोनि काळिजाला गेला लोकापवादशर इ०

मोरोपंत–भारती रामायण.

२. **काळीज उडून जाणें, कांपणें, थरथरणें, धडकणें**—भीतीनें वगैरे छाती उडूं लागणें.

३. **त्याच्यापुढें काळीज काढून टाकलें तरी त्याला विश्वास येणार नाहीं**—कोणत्याही प्रकारांनीं त्याची खात्री पटणार नाहीं

४. **काळीज काढून देणें**—आपली आवडती वस्तु देणें.

५. **एखाद्याचें काळीज खाणें**—त्याला फार उपद्रव देणें, किं० दुःख देणें.

६. **मी बोलूं नये तें बोललों म्हणून माझें काळीज मला खात आहे**—मला फार पश्चात्ताप होत आहे.

७. **त्याचें काळीज पाठीमागें आहे, किं० त्यानें काळीज पाठीमागें टाकलें आहे**—ज्याला कशाचीच भीति वाटत नाहीं असा मनुष्य.

८. **काळीज फुटणें**—दुःखानें, भीतीनें, आश्चर्यानें, वगैरे छातींत धक्का बसणें.

९. **एकाद्याचें काळीज फोडणें**—मर्मभेदक शब्द बोलून त्याचे हृदयास दुःख देणें.

१०. **काळजानें धीर सोडणें, काळजानें ठाव सोडणें, काळजाला भोंक पडणें**—अत्यंत दुःखग्रस्त, भीतिग्रस्त, किं० आश्चर्यचकित होणें.

११. **काळजाला घरें पडणें**—हृदयाला झोंबणें.

१२. **काळजाचें पाणी होणें.**—दुःखग्रस्त, नष्टधैर्य, हतोत्साह होणें

१३. **काळीज फाटणें, काळीज दो जागां होणें**—भीतीनें किं० दुःखानें अत्यंत ग्रस्त होणें.

१४. **एकाद्याच्या काळजाला फेस येणें**—त्यानें एकाद्या कामीं फार परिश्रम करून अगदीं थकून जाणें.

१५. **एकाद्याच्या काळजावर घाव घालणें**, किं० **डाग देणें**—त्याला अत्यंत दुःख देणें; त्याच्या मर्मावर आघात करणें.

१६. **काळजाला लागणें**, किं० **भिनणें**—मर्मस्थानापर्यंत जाऊन पोंचणें, खोल जाणें, आंत भिनणें, हृदयाला झोंबणें.

१७. **साता काळजांच्या पलीकडे ठेवणें**—फार फार जपणें.

## २९. खाक.

१. **खाक**—छाती आणि पाठ यांच्यामधील खांद्याखालचा खळगा; बगल.

२. **खाका वर करणें**—आपल्याजवळ कांहीं नाहीं असें दाखविणें, किं० सांगणें.

३. **त्यांनीं खाका वाजविल्या**—त्यांना अत्यानंद झाला.

४. **खाकेंतून काढून बाजारांत मांडणें**—आपली खोटी कृति खरी म्हणून सांगत फिरणें.

५. **एकाद्यास खाकेस मारणें**—आपल्या संरक्षणाखालीं, किं० आश्रयाखालीं घेणें.

६. **एकादी वस्तु खाकेस**, किं० **खाकोटीला मारणें**—ती पळवून नेणें; ती आपली आहे असें गृहीत धरून, किं० असा बहाणा, किं० आविर्भाव करून घेऊन जाणें.

## ३०. गळा.

१. (क) **गळा**—मानेच्या पुढचा भाग; डोकें आणि छाती यांच्या मधला भाग. उ०

शालीनतानतमुखी मिथिलेशबाला
घाली गळां प्रमुदिता पतिच्या सुमाला ।

विं० वा० भिडे–रा० प०, स. २, श्लो. ६७.

(ख) घसा.

(ग) गाण्यांतील आवाजी. उ० त्या गवयाचा गळा मधुर आहे.

(घ) घागरीचा, तांब्याचा, वगैरे गळ्याच्या आकाराचा भाग.

२. **गळा धरणें**—घशामध्यें विकृति, आजार, वगैरे उत्पन्न करणें; शब्दोच्चाराला, किं० बोलण्याला, हरकत करणें. उ०

त्वद्गुणकीर्तन करितां लज्जा हे पापिणी धरू न गळा ।
हे ताटकांतका! हा परमार्थ हिणेंचि बुडविला सगळा ॥

मोरोपंत–आर्याकेकावलि.

३. **केसानें गळा कापणें**–विश्वासघात करणें, गोड गोड बोलून, आपलेपणा दाखवून, किंवा प्रेम दाखवून हळूच एकाद्याचा घात करणें. उ० केसानें गळा कापण्याच्या कामीं गोविंदराव पटाईत आहे.

४. **गळा गुंतणें**, किं० **अडकणें**—अडचणींत, पेंचांत सांपडणें.

५. **गळा गोंवणें**-एकाद्याला वचनांत, किं० पेंचांत, अडकावणें; संकटांत घालणें.

६. **गळा दाटणें**, किं० **दाटून येणें**–शोकानें कंठ भरून येणें; दुःखानें, किं० प्रेमानें, कंठ सद्गदित होणें. उ०

दुर्योधन राजाचा मन पाहुनि दीन, बहु गळा दाटे ।

मोरोपंत–शल्यपर्व, अ. २, आर्या ६०.

७. **गळा तांगडून बोलणें**-तावातावानें बोलणें, ताशेरा झाडणें.

८. **गळा पडणें**, किं० **बसणें**, किं० **फुटणें**–फार बोलून, किं० गाऊन, घसा घोगरा होणें.

९. **कंठ फुटणें**–मुलगा प्रौढ दशेंत येऊं लागला म्हणजे त्याच्या आवाजाचा नाजुकपणा नाहींसा होऊन आवाज प्रौढ, भारदस्त होणें; पोपट वगैरे पक्ष्यांचा शब्दोच्चार स्पष्ट होणें.

१०. **गळा पिंजणें**–कंठांतून दुहेरी उच्चार निघूं लागणें. पित्त वगैरे ओकून पडल्यामुळें घसा नाजूक होणें, किं० सोलून निघणें.

११. **गळा बांधणें**–एकाद्याला नियंत्रित करणें; अडकावणें.

१२. **गळां बांधणें**, किं० **गळीं बांधणें**, किं० **गळयांत बांधणें**--

(क) वस्तु एकाद्याला पथकरावयास भाग पाडणें. उ० ही म्हैस त्याणें माझ्या गळयांत बांधली.

(ख) एकाद्याच्या माथीं विनाकारण दोष बसविणें. उ० पोपट उडून गेल्याचा दोष तुह्मी उगीच माझ्या गळयांत बांधतां !

१३. **गळा भरून येणें, गळा दाटून येणें**,--

(क) प्रेमादि मनोविकारांनीं कंठ सद्गदित होणें.

(ख) कफादिकांनीं गळा कोंदणें.

१४. **गळा लागणें**–गायनांत सूर, किं० आवाजी, यथाशास्त्र येऊं लागणें.

१५. **गळा सोडविणें**—

(क) एकाद्याचा गळा कापणें.

(ख) पेंचांतून, किं० संकटांतून, एकाद्यास मुक्त करणें.

१६. **गळीं पडणें, गळीं लागणें**--

(क) एकाद्याला आलिंगणें.

(ख) एकाद्याला फार फार भीड घालणें, किं० प्रार्थिणें.

(ग) अमुक गोष्ट तूंच केलीस असें विनाकारण एकाद्यास म्हणणें; एकाद्याच्या माथीं उगीचच्या उगीच दोष मारणें, किं० लादणें.

(घ) एकाद्यावर शिव्यांचा वर्षाव करणें.

(ङ) एकाद्यावर भारभूत होऊन राहाणें.

(च) एकाद्याला जडणें. उ० तें व्यसन माझ्या गळीं पडलें.

१७. **गळीं लागणें**--

(क) एकाद्याला भार होणें. उ० मुलगी गळीं लागली आहे; तिला हें तेरावें वर्ष.

(ख) आरडाओरडा करणें. उ० असा गळीं काय लागतोस? जरा हळू बोल !

१८. **गळयाखालीं उतरणें**--

(क) (शब्दशः). घशांतून खालीं जाणें. उ० घांस अडकला होता तो आतां गळ्याखालीं उतरला.

(ख) स्वाधीन होणें; पदरांत पडणें. उ० न्यायाधीशानें लांच खाऊन माझ्या दावेदारासारखा निकाल दिला; पण मी तो लांच न्यायाधीशाच्या गळ्याखालीं उतरूं देणार नाहीं, (म्ह० त्याला पचूं देणार नाहीं ).

१९. **गळ्याचा लाखोटा होणें**—कंठोच्चार बंद होणें; गळा लाखटणें.

२०. **गळ्याची फुंकणी होणें**--गळा घोगरा होणें.

२१. **तुला माझ्या गळ्याची शपथ आहे**--माझा गळा न तुटावा असें तुला वाटत असेल, तर तूं हें काम करावें ( आग्रह दाखविण्यासाठीं ह्याचा उपयोग करतात ).

२२. **गळ्यांत असणें**-एकाद्यावर अवलंबून असणें; एकाद्यानें केलेंच पाहिजे असें काम असणें. उ० माझ्या गळ्यांत सध्यां पुष्कळ कामें आहेत; तुझें काम मला करतां येणार नाहीं.

२३. **गळ्यांत गोणी येणें**--

(क) एकादें संकट टाळावयासाठीं केलेल्या प्रयत्नानें तें संकट जास्तीच त्रासदायक होणें. [ हा वाक्प्रचार ओझ्याच्या बैलाच्या वर्तनावरून रूढ झालेला आहे. पाठीवरची गोणी झुगारून देण्यासाठीं बैल धडपड करतो, पण तेणेंकरून गोणी खालीं न पडतां घसरून मानेवर येते, आणि गोणीचें ओझें मानेवर पडून मानच जमिनीस खिळून राहाते, आणि बैलाचा श्वासोच्छ्वास कष्टानें चालतो. बैलाच्या ह्या स्थितीवरून गळ्यांत गोणी आली हा वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे. ]

(ख) संकट ओढवणें.

२४. **गळ्यांत धोतर घालणें**--केलेलें विधान सत्य करून दाखवा म्हणून एकाद्याला आग्रह करणें.

२५. **गळ्यांत पाय येणें**--अडचणींत, पेंचांत सांपडणें. उ० त्याचे पाय त्याच्या गळ्यांत आले. ह्याच अर्थानें " त्याच्या तंगड्या त्याच्या गळ्यांत आल्या, " असेंही म्हणतात.

२६. **गळ्यांत माळ घालणें**--

(क) वरणें. (स्त्रीनें पति म्हणून पुरुषास, किं० पुरुषानें पत्नी म्हणून स्त्रीस, यथाविधि पथकरणें.)

(ख) एकाद्यावर कांहीं काम सोंपविणें.

२७. **गळ्यांत येणें**––एकादी अडचण येऊन पडणें. चांगल्या उद्देशानें एकादें काम करीत असतां त्याचा अगदीं अनिष्ट परिणाम होऊन पंचाईत होणें.

२८. **गळ्यांत धोंगडें येणें**––एकाद्यावर कांहीं तरी लचांड येणें. इच्छा नसतां एकादी गोष्ट करण्याचा, किं० पथकरण्याचा, प्रसंग येणें.

२९. **मुलगी गळ्याशीं (गळीं) लागली आहे**––लग्नाला योग्य होऊन गेली आहे.

३०. **गळ्यांत हात घालणें**––दादाबाबा करणें; एकाद्याची मर्जी सुप्रसन्न व्हावी म्हणून प्रेम दाखविणें.

३१. **गळ्यांत गळा आणि नळ्यांत नळा**––निकट मैत्री; घट्ट दोस्ती. उ० आलीकडे रंगोपंत आणि सदूभाऊ ह्यांचा गळ्यांत गळा असतो!

३२. **गळ्यांत पडणें**––हिताहिताची, रक्षणाची, पोसण्याची, बजावण्याची, निस्तरण्याची, वगैरे जबाबदारी येणें. उ० माझी बहीण मेल्यापासून तिचीं मुलें माझ्या गळ्यांत पडलीं आहेत. उ० रामभाऊ मेल्यापासून त्याची बायको दिराच्या गळ्यांत पडली. उ० हेडक्लार्क रजेवर गेल्यापासून पगार–आकारणीचें बिल माझ्या गळ्यांत पडलें.

३३. **गळ्यांत धोंड पडणें**––नावडतें, किं० कठिण, काम करण्याचें ओझें येणें. उ० त्या चाळीचें भाडें वसूल करण्याला मी अगदीं नाखूष होतों; सदूभाऊंच्या हट्टामुळें ही धोंड माझ्या गळ्यांत पडली.

३४. **गळ्यापर्यंत येणें**–अगदीं असह्य होणें.

३५. **गळ्याला फास, दोरी लागणें**-पंचाइतींत, पेंचांत, अडचणींत असणें, किं० येणें, किं० सांपडणें.

३६. **गळ्याला रसायन लागणें**–फिकीरींत, काळजींत असणें, किं० पडणें. उ० माझ्या गळ्याला त्या कामाचें रसायन लागलें आहे.

३७. **गळ्यावर गाणें**, किं० **म्हणणें**–मधुर, शास्त्रशुद्ध रीतीनें, किं० चालीवर, गाणें. उ० श्लोक नीट गळ्यावर म्हण, अशी घाई करूं नको.

३८. **गळ्यावर बोलणें**–भरकटल्यासारखें बोलणें; अविचारीपणाचें भाषण करणें.

३९. **गळ्यावर सुरी ठेवणें**–जीव घ्यावयाला सिद्ध होणें.

४०. **गळ्याशीं गळा मिळविणें**—आवाजाशीं आवाज मिळून जाईल अशा रीतीनें गाणें.

४१. **गळ्याशीं येणें**––नुकसानीची बाब होणें.

४२. **मोठा गळा करून रडणें**-मोठमोठ्यानें रडणें, शोकसाबोक्शीं रडणें.

## ३१. गाल.

१. मुखाच्या बाजूंचे जे दोहींकडील मांसल भाग ते प्रत्येक. उ० ज्या मुलाच्या गालांवर खळग्या आहेत तें मूल मला आवडतें. उ० ख्रिस्ती धर्माची अशी आज्ञा आहे कीं कोणी एका गालांत मारिलें असतां दुसरा गाल पुढें करावा.

टीप—" गाल " ह्या शब्दानें बनलेल्या शब्दसंहतींत " गालफड " हा शब्द विनोदानें, प्रेमानें, किं० तिरस्कारानें योजण्यांत येतो.

२. **गाल घडणें**––थोबाडींत मारणें.

३. **गाल रंगविणें**––थोबाडींत मारून एकाद्याचा गाल तांबडा लाल करणें.

४. **गालांत बसविणें**––मुसकटांत बसविणें.

टीप––" बसविणें " ह्याचें " चपराक " हें कर्म अध्याहृत असतें.

५. **गालांत बसणें**––थोबाडींत बसणें.

टीप––" बसणें " ह्याचा कर्ता अध्याहृत असतो.

६. **गाल निपटणें**––अशक्तपणानें, आजारानें, किं० उपासामुळें, गाल बसणें, खोल जाणें. उ० तापानें ह्या मुलाचें गाल निपटले.

७. **गाल फुगविणें**––बढाई मारणें; शेखी मिरविणें; ऐट करणें.

८. **गाल बसणें**––रोडावणें. उ० तापानें त्याचे गाल बसले.

९. **गालावर गाल चढणें**, किं० **येणें**--सुखासमाधानाच्या राहाणी-मुळें, किंवा खाणेंपिणें यथास्थित मिळत असल्यामुळें, लठ्ठ होऊन गालाची जाडी वाढणें. उ० हल्लीं त्याची काय चैन विचारावी ? रोज घृतकुल्या आणि मधुकुल्या चालल्या आहेत ! मग त्याचे गालावर गाल कां नाहीं चढणार ?

१०. **गालांत हसणें**, किं० **गालांतल्या गालांत हसणें**--मंदस्मित करणें. उ० रुपया दक्षिणा मिळणार हें ऐकून भटजीबोवा गालांतल्या गालांत हसले.

## ३२. छाती.

१. (क) ऊर, वक्षःस्थल.

(ख) धैर्य, धारिष्ट; निढळ्या छातीचा—अतिशय साहसी, धाडसी, किंवा उरफाट्या काळजाचा.

टीप—"छाती" आणि "ऊर" ह्या शब्दांचे बरेच वाक्प्रचार सारखे आहेत ते पाहा. त्याशिवाय जे वाक्प्रचार ते पुढें दिले आहेत.

२. **छातीचा कोट करणें**--येईल त्या प्रसंगाला टक्कर देण्याचा निश्चय करणें.

३. **छातीचा व्यापार**--

(क) ज्या व्यापारांत लवकर माल खपला नाहीं आणि लवकर पैसे हातीं पडले नाहींत तरी चालतें, असा व्यापार.

(ख) धोक्याचा व्यापार--प्रसंगविशेषीं ज्यांत तोटा होण्याचा संभव आहे असा व्यापार.

## ३३. जिव्हा.

१. (क) जीभ --उ०

पाथेय सोडुनि पटांतुनि खावयाला—
ते बैसले; मधुर तें गमलें तयांला ।
जिव्हा कदन्नहि सुधेपरि गोड मानी
भागे यदा नर उदंड तनुश्रमांनीं ॥ ९ ॥

वि० वा० भिडे, पद्यपण्डित.

(ख) *अग्नीची ज्वाळा.*
(ग) जिभेच्या आकाराची कोणतीही वस्तु.
(घ) वाचा. बोलण्याची प्रवृत्ति. योग्यायोग्याचा विचार न करतां *कांहीं तरी बोलण्याची प्रवृत्ति.*
(ङ) खाण्याची लालसा. खाद्य पदार्थांत आवडनिवड करण्याचा स्वभाव. चोखंदळेपणा.

२. **जिव्हा खाणें**—रागामुळें जीभ दातांनीं चावणें.

३. **जिव्हा वाकडी पडणें** (क)—अर्धांगवायूनें जीभ लटकी पडणें, किं० न हालेशी होणें.
(ख) न बोलावयाची गोष्ट गैरसावधपणें बोलून जाणें.

४. **जिव्हा विटाळणें**—
(क) जिभेची रसास्वादाची शक्ति नाहींशी होणें.
(ख) जीभ अपवित्र करणें ( शिव्या देऊन, किं० खोटें बोलून ).
(ग) नालायख मनुष्यासाठीं रदबदली करणें, किं० त्याची शिफारस करणें.

५. **जिव्हा हातीं धरणें**—
(क) शिव्या देत सुटणें.
(ख) खाण्याचे चोचले करणें; आधाशासारखें खाणें.

६. **जिव्हेला आडावेढा असणें**—भाषणाची नियंत्रणा असणें; बोलावयाला हरकत असणें. उ० हें काय तुम्ही भलभलतें बोलतां? जिव्हेला कांहीं तरी आडवेढा असूं द्या! (म्ह० जिभेला आळा घाला.)

## ३४. जीभ.

१. **जीभ**—
(क) प्राण्यांच्या तोंडांतील हालवितां येणारा मांसल अवयव; ज्याच्या योगानें खाद्य पदार्थांची रुचि समजते, व खाद्य पदार्थ चर्वणासाठीं दातांमध्यें किंवा दाढांमध्यें ढकलितां येतो; मानवी प्राण्यांत हा अवयव बोलण्याचेंही एक इंद्रिय असतो. जिव्हा.

(ख) जिभेच्या आकाराचा अवयव, किं० भाग.

(ग) अग्नीची ज्वाळा.

टीप— "जीभ" ह्या शब्दाचे बहुतेक वाक्प्रचार "जिव्हा" ह्या शब्दाशीं मिळतेच आहेत. विद्यार्थ्यानें ३३ आणि ३४ हीं कलमें बरोबर वाचावीं.

२. **जीभ चावलीशी करून बोलणें**—संकोचवृत्तीनें बोलणें; नियंत्रितपणें बोलणें.

३. **जीभ जड होणें**—उच्चार करावयाला जीभ असमर्थ होणें. उ० करवंदें खाऊन माझी जीभ जड झाली आहे. उ० मुलांनीं विडा खाऊं नये, तेणेंकरून जीभ जड होते.

४. **जीभ जड असणें**—

(क) स्पष्ट उच्चार करावयास जीभ असमर्थ असणें. उ० त्याची जीभ जराशी जड आहे.

(ख) लवकर पाठ करावयाला असमर्थ असणें. उ० त्याची जीभ जड आहे, (म्ह० त्याला लवकर पाठ होत नाहीं.)

५ **जीभ झडणें**—जीभ गळून पडणें. उ० ह्यांत कांहीं मी खोटें बोलत असेन तर माझी जीभ झडेल !

६. **जीभ नरकांत घालणें**—खोटें बोलणें; दिलेलें वचन न पुरविणें; बोललेली गोष्ट नाकबूल जाणें.

७. **जीभ पाघळणें**—अनियंत्रितपणें बोलून जाणें; स्वच्छंदानें बोलणें. उ० हा माझा बेत माझ्या मनांत कोणाला कळवावयाचा नव्हता, पण माझ्या दोस्ताची जीभ पाघळलीना ! तेथें मी काय करूं ?

८. **जीभ मोकळी सोडणें**—

(क) मन मानेल तें खाणें.

(ख) स्वच्छंदानें, अनियंत्रितपणें, बोलणें.

९. **जीभ मोडणें**—बोलण्याची शक्ति नाहींशी होणें (भीतीनें किंवा आश्चर्यानें).

१०. **जीभ वळवळणें**—बोलावयाला तयार होणें, किं० उत्सुक होणें; बोलण्याची उत्कट इच्छा होणें. उ० ह्या मुलाची जीभ वळवळूं लागली आहे, तें लवकर बोलूं लागेल असा रंग दिसतो.

११. **जीभ विटाळणें**--जीभ अपवित्र होणें; ( भलतेंच बोलल्यामुळें, किं० भलतेंच खाल्ल्यामुळें, किं० नालायख मनुष्याची शिफारस केल्यामुळें, किं० निष्फळ रदवदली केल्यामुळें. )

१२. **जीभ शिंदळ, किं० निसरडी आहे**--जिभेचा भरंवसा धरतां येत नाहीं ( म्ह० ती हावें तें बोलेल आणि हावें तें खाईल ).

१३. **जीभ सोकावणें**--जीभ चटावणें; (एकाद्या वस्तूचें सेवन करावयास.)

१४. **जीभ लालचावणें**—( खाण्याला ) उत्सुक असणें. उ० रोजरोज पेढे खायाला तुझी जीभ लालचावली आहे !

१५. **जिभा काढणें**--एकादा पदार्थ खावयासाठीं आशाळभुताप्रमाणें मागणें. उ० पेढ्यासाठीं अशा जिभा कशाला काढतोस ? कधीं पेढे खाल्ले नाहींस कीं काय ?

टीपः--एका मनुष्यास जीभ एकच असते, परंतु वाक्प्रचारानें " जिभा काढणें, " अशी अनेकवचनी शब्दसंहति ग्राह्य म्हणून ठरविली आहे, हें विद्यार्थ्यानें लक्ष्यांत बाळगावें.

१६. **जिभेचे फुटाणे फुटणें**--मुखांतून वक्तृत्वपूर्ण भाषण निघणें; उ० माधवराव कुंटे बोलूं लागले म्हणजे त्यांच्या जिभेचे जसे फुटाणे फुटत असत !

१७. **जिभेला चिमटा घेणें**—एकादी रुचकर वस्तु खाण्यापासून, किंवा एकादी समयोचित गोष्ट बोलण्यापासून, जिभेला निवृत्त करणें. उ० रामभाऊची लबाडी चार मंडळींत सांगण्याच्या मी अगदीं बेतांत होतों, पण तो लहान तोंडीं मोठा घास होईल, अशा भयानें मी आपल्या जिभेस चिमटा घेतला !

१८. **जिभेला डाग देणें**--जिभेला नियंत्रणा घालणें; जिभेला शिस्त लावणें.

१९. **जिभेला आडवा वेढा नसणें**—मन मानेल तसें बोलणारी जीभ असणें. उ० गोपाळरावाच्या जिभेला आडवा वेढा नाहीं, ( म्ह० स्थल, काळ, वगैरेंचा विचार न करतां तो हावें तें बोलतो. )

२०. **जिभेचा लोळा होणें**--अति उष्ण, किं० तिखट, किं० गार, पदार्थ तोंडांत घातल्यामुळें जीभ हालविण्याची शक्ति नाहींशी होणें.

२१. **जिभेला टाका देऊन एकादें खाद्य दुसऱ्यासाठीं राखून ठेवणें**--आपली इच्छा आवरून धरून दुसऱ्याला खावयासाठीं एकादी वस्तु राखून ठेवणें. उ० हें पिठलें अतिरुचकर झालें होतें, तें सारें देखील मीं खाऊन टाकिलें असतें; पण मी जिभेला टाका देऊन तें तुझ्यासाठीं ठेविलें.

२२. **जिभेला हाड नसणें**--जिभेला नियंत्रणा नसणें. खोटें बोलणें हें ज्याच्या खिजगणतींत नाहीं, अशा मनुष्याविषयीं बोलतांना म्हणतात, " तो हावें तें बोलेल ! त्याच्या जिभेला हाड नाहीं ! "

२३. **जीभ लांब करून बोलणें**--स्थल, काल, वगैरे मनांत न आणतां, किं० उर्मटपणानें, बोलणें.

२४. **जीभ लांब होणें**--मन मानेल तसें, खोटेंनाटें, पाजीपणाचें, किंवा मूर्खासारखें, बोलण्याकडे प्रवृत्ति होणें. उ०आलीकडे कासोबा घंटाळ्याची जीभ फार लांबली आहे !

## २५. टाच.

१. पायाची खोट.

२. **उंच टाच करून वागणें**--अमंगल, किं० अपवित्र, पदार्थांवर पाऊल न पडावें म्हणून चवड्यावर चालणें.

३. **टाचेला माती, किं० मळ, न लागूं देणें**—आपल्या पावलाला अपवित्र, किं० ओंवळ्या, वस्तूचा स्पर्श न होईल अशा रीतीनें नीट काळजीनें चालणें.

४. **टाचेचें काळीज**--

(क) जिवाचा कलिदा; प्यारी वस्तु; आवडतें माणूस; उ० त्याला तुम्हीं वाईट म्हटलेलें मला खपावयाचें नाहीं. तो माझ्या टाचेचें काळीज आहे !

टीपः—बायकोचा भाऊ, श्यालक, या अर्थी " टाचेचें काळीज " ही शब्दसंहति विनोद, किं० तिरस्कार दाखवितें, किं० खरें प्रेमही दाखवितें.

## ३६. टाळी.

१. (क) एका तळहातावर दुसरा तळहात मारणें; ही मारण्याची क्रिया, किं० तिजपासून झालेला आवाज.

टीप—अनुरूप क्रियापदः—वाजविणें, मारणें, पिटणें, वाजणें. उ०

टाळ्या पिटोनि जन तेथ सुरम्य घोष—।
तेव्हां करी; अमित हो सकलांसि तोष ।

वि० वा० भिडे, रा. प., स. ३, श्लो. ६१.

(ख) गायनाच्या सुरावर हातावर हात मारणें.

(ग) सट्टा, किं० व्यवहार ठरल्याची खूण म्हणून दोन व्यापारी एकमेकांच्या हातावर हात मारतात ती टाळी.

२. **ब्रम्हानंदीं टाळी लागणें**—सच्चिदानंदस्वरूपांत लय होणें. उ०
ब्रह्मानंदीं लागली टाळी । तेथें कोण देहातें संभाळी ॥

३. **एकदाची टाळी वाजली**—एकदाचें लग्न लागलें. (आतां जुळविलेलें लग्न कोणालाही मोडतां, किंवा फिसकटतां यावयाचें नाहीं ! )

४. **टाळीस टाळी देणें**—खुशामत करणें; वरिष्ठाच्या मूर्खपणाच्या भाषणास अनुमोदन देणें; होस हो म्हणणें.

५. **कानावर, किं० कर्णी, टाळी बसविणें**—कानठळ्या बसविणें; ऐकण्याची शक्ति मोठ्या आवाजानें घालविणें. उ०

तों गर्जोनि कुरुकटककर्णी बसवी ध्वजस्थ कपि टाळी ॥

मोरोपंत.

## ३७. डोकें.

१. (क) मस्तक, शिर. उ० घाल डोक्याला पागोटें, आणि चल लवकर माझ्यावरोबर !

(ख) एक व्यक्ति. उ० घारापुरीचीं लेणीं पाहावयाचीं असलीं, तर दर डोक्याला चार चार आणे फी द्यावी लागते. उ० झिजिया कर दर हिंदू डोक्यावर घेतला जात असे.

(ग) पिढी. उ० ह्या गांवांत माझ्यासकट आमच्या पांच डोया, (म्ह० डोकीं), झाल्या, ( म्ह० ह्या गांवांत आमच्या पांच पिढ्यांचें वास्तव्य आहे. )

(घ) बुद्धि; मति; सारासारविचार करण्याची शक्ति; लक्ष्य; मेंदू. उ० गणितांत त्याचें डोकें अगदीं चालत नाहीं. उ० त्याचें डोकें बिघडलें आहे.

(ङ) कोणत्याही वस्तूचा शिरोभाग. उ० काठीचें डोकें; मुसळाचें डोकें.

२. **डोकें उचलणें**—नांवालौकिकास चढणें.

३. **डोकें उठणें**—

(क) डोकें दुखूं लागणें.

(ख) त्रास, उपद्रव होणें. उ० तुझी ही चर्पटपंजरी आतां बंद कर, माझें डोकें उठलें !

४. **डोकें काढणें**—उदयास, वैभवास येणें, किं० येऊं लागणें. उ० आमच्या वडील चिरंजीवांनीं विद्याविद्या कधींच सोडून दिली, आणि ते सुखवस्तु होऊन राहिले; मधलेही त्यांच्याच वळणावर जातात कीं काय अशी भीति होती, परंतु अलीकडे त्यांनीं डोकें काढिलें आहे.

५. **डोकें खरडणें, किं० तासणें**—अकुशलपणानें हजामत करणें. उ० धोंडोबा न्हाव्यानें माझी हजामत केली म्हणण्यापेक्षा माझें डोकें तासलें म्हणणें यथार्थ होईल.

६. **डोकें खाजविणें**—

(क) उपद्रव देणें; त्रास देणें. उ० तूं जा येथून ! उगीच माझें डोकें खाजवींत बसूं नको !

(ख) विचार साफ व स्पष्ट करण्यासाठीं डोकें चोळणें. उ० अभ्यास करावयाच्या वेळीं तूं खेळलास ! आतां डोकें खाजवून तुला ह्या प्रश्नांचीं उत्तरें कशीं देतां येतील ?

७. **डोकें टेकणें**--

(क) अवलंबून राहणें; भिस्त ठेवणें; आश्रयाची अपेक्षा, किं० इच्छा, बाळगून असणें. उ० तुला मीं दोन वेळां नोकरी लावून दिली, आणि दोन्ही वेळां तूं ती आपल्या गुणांनीं गमावून घेतलीस. यापुढें तूं माझ्यावर डोकें टेकून बसूं नको !

(ख) हार खाल्ली असें म्हणणें; निराशेनें सोडून देणें; आपला इलाज चालत नाहीं असें कबूल करणें.

(ग) अशक्त होणें; थकणें; खचणें; आजारी पडणें. उ० इतके दिवस त्याणीं कसेंबसें काम केलें, पण मागल्या सोमवारपासून त्याणीं डोकें टेकलें, (म्ह० काम करण्याची त्यांच्या अंगीं ताकद राहिलीं नाहीं.)

८. **डोकें ताविणें**-उन्हांत वगैरे काबाडकष्ट करून थकणें.

९. **डोकें देणें; डोकें देऊन बसणें.**—

(क) लोचटपणा, चिकटपणा करीत बसणें; निर्लज्जपणानें एकाद्यावर भार घालून बसणें. किं० राहणें.उ० परीक्षेसाठीं तो माझ्या घरीं पाहुणा म्हणून आला; परीक्षा संपून आठ दिवस झाले ! अझून डोकें देऊन बसला आहे !

(ख) एकाद्याला लुबाडून पुन्हा शांत, बिनदर्द असणें.

१०. **डोकें देणें**, किं० **मारणें**—

(क) एकाद्याला मदत करणें.

(ख) एकादी गोष्ट नेटानें करणें, किं० करीत राहाणें.

११. **डोकें फिरणें**-वेडें होणें; रागानें वगैरे बेफाम होऊन जाणें. उ० जगाची हरामखोरी पाहून त्याचें डोकें फिरून गेलें आहे, (म्ह० तो वेडा झाला आहे.)

**१२. डोकें मारणें—**

(क) शिरश्छेद करणें.

(ख) नुकसान करणें. नाश करणें; उ० रामावर कां तुझा राग ? त्यानें काय तुझें डोकें मारलें आहे ?

**१३. डोकें हालविणें—**

(क) वैभवाला चढणें.

(ख) संमति दर्शविण्यासाठीं, किं० अनुमोदन देण्यासाठीं, मान हालविणें.

(ग) वेडाच्या लहरींत, किं० अंगांत आल्यामुळें, डोकें जोरानें इकडून तिकडे फिरविणें.

१४. **डोक्याचे केस नाहींसे करणें;डोक्यावर केस राहूं न देणें**—शिव्या देणें; फजीती करणें; निर्भर्त्सना करणें; रागें भरणें. उ० आम्हीं श्रीमंतपूजनाचे वेळीं सबंध सुपाऱ्या दिल्या नाहींत म्हणून ह्या लोकांनीं आमच्या डोक्यावर केस राहूं दिला नाहीं !

१५. **डोक्यावरचें खांद्यावर येणें**—चिंता, काळजी कमी होणें. उ० माझ्या मुलाचें लग्न उरकलें. आतां डोक्यावरचें खांद्यावर आलें !

१६. **डोईचे वाटेनें कर्ज देणें**—उत्सुकतेनें कर्ज देणें; आढेवेढे न घेतां कर्ज देणें.

१७. **डोईचे वाटेनें घेणें**—नम्रपणानें घेणें, स्वीकारणें.

१८. **डोईचे वाटेनें देणें**—नम्रपणानें देणें.

१९. **डोक्यानें चालणें**—गर्वानें, अभिमानानें, ताठ्यानें वागणें. उ० सासऱ्याची दौलत मिळाल्यापासून रामभाऊ डोक्यानें चालूं लागला आहे. उ० नारायणरावाला बढती मिळाल्यापासून तो जसा डोक्यानें चालूं लागला आहे !

२०. **डोक्यानें चालत येणें**—नम्रपणानें येणें; आपल्या आपण येणें. उ० त्या पोराला जेवायाला येण्यासाठीं इतक्या कशाला हाका मारतोस ? असल रान चरचरलें म्हणजे पोर डोक्यानें चालत येईल ! ( म्ह० आपसुक येईल ! )

२१. **डोक्यावर खापर फोडणें**--एकाद्यान्या माथीं दोष लादणें, ( तो निरपराधी असतां ). उ० तुमचा मुलगा नापास झाला तो आपल्या गुणांनीं झाला ! मीं शिकविण्यांत कांहीं कसूर केली नाहीं. माझ्या डोक्यावर तुम्ही उगीच खापर फोडूं नका !

२२. **डोक्यावर खापर फुटणें**—एकाद्यावर एकाद्या गोष्टीबद्दल विनाकारण दोष येणें. उ० आमचे व्याही म्हातारे आणि दमेकरी होते. सृष्टिक्रमाप्रमाणें त्यांचा अंत झाला; परंतु त्याचें खापर आमच्या मुलीच्या डोक्यावर फुटलें !

२३. **डोक्यावर घेणें**— एकादी गोष्ट पत्करणें; एकाद्या गोष्टीची जबाबदारी घेणें. उ० दत्तूचें लग्न जुळवून देण्याचें काम तूं कशाला आपल्या डोक्यावर घेतोस ?

२४. **डोक्यावर चढणें**--एकाद्याला न जुमानणें. उ० तुम्ही मुलाचे इतके लाड करूं नका. तो डोक्यावर चढेल !

२५. **डोक्यावर सूर्य येणें**--माध्यान्ह होणें. उ० आतां येथेंच मुक्काम करावा. पालीस जाणें शक्य नाहीं. हा सूर्य अगदीं डोक्यावर आला आहे पहा !

२६. **डोक्यावर पदर येणें**--वैधव्य येणें.

२७. **डोक्यावर बसणें**--

(क) एकाद्याला न जुमानणें. उ० मुलांवर वचक बसविण्याचा प्रयत्न करा; नाहीं तर तीं तुमच्या डोक्यावर बसतील !

(ख) लायकी नसतां एकाद्याच्या वर जाणें, किं० पुढें सरणें, किं० अगोदर बढती मिळविणें. उ० वरिष्ठाची लाळ घोटण्याचें कसब गोविंदरावाच्या अंगीं चांगलें आहे, म्हणून तो माझ्या डोक्यावर बसला.

२८. **डोक्यावर बसविणें**--

(क) वाजवीपेक्षां अधिक मान देणें; एकाद्याचें फाजील गौरव करणें. उ० नोकर लोकांना तुम्ही असे डोक्यावर बसवूं लागलां, तर ते माझी अवज्ञा करतील !

(ख) एकाद्याला भक्तिभावानें भजणें.

२९. **एकाद्याच्या डोक्यावर मिरे वाटणें**—त्याला शिव्या देणें; दोष देणें; त्याच्यावर टपका ठेवणें. उ० आईबाप आधीं मुलीचे लाड करतात, तिला चांगलें वळण लावीत नाहींत. पुढें ती मुलगी बिघडली, म्हणजे विनाकारण सासूच्या डोक्यावर मिरे वाटतात!

३०. **डोक्यावर विळविणें**—एकाद्यावर विनाकारण दोष, टपका ठेवणें.

३१. **डोक्यावर शेकणें**—परिणाम भोगावा लागणें; नुकसान होणें. उ० फळफळावळीचा व्यापार आजकाल भारी धोक्याचा झाला आहे. त्यांत तुम्ही भांडवल घालूं नका! तो व्यापार खचित तुमच्या डोक्यावर शेकेल!

३२. **डोक्यावर हात घेऊन येणें**—रिकाम्या हातानें येणें; इष्ट वस्तु न मिळवितां तसेंच येणें. उ० तुला मोदकपात्र आणावयाला मीं पाठविलें! आणि तूं तर डोक्यावर हात घेऊन परत आलास! (म्ह० मोदकपात्र न आणतां तसाच आलास!)

३३. **डोक्यावर हात ठेवणें**—

(क) आशीर्वाद देणें.

(ख) फसविणें. उ० त्या लोकांच्या नादीं लागूं नको; ते बदमाष तुझ्या डोक्यावर हात ठेवितील!

३४. **डोक्यावर हात ठेवून जाणें**—रिकाम्या हातानें जाणें; जवळ असेल तें सारें गमावून घेऊन जाणें. उ० सोलापुरास मीं लुगड्याचा व्यापार करून हजार रुपये मिळविले; ते रुपये खर्चून मी आपलें कोंकणांतील मोडकें घर दुरुस्त करावें असें योजून घराकडे चाललों होतों, परंतु वाटेंत मला चोरांनीं लुटिलें. आतां डोक्यावर हात ठेवून मला कोंकणांत जावें लागत आहे!

३५. **एकाद्याच्या डोक्यावरून हात फिरविणें**—त्याला फसविणें. उ० एकनाथपंतांनीं आपली चीजवस्त आपल्या मेहुण्यापाशीं ठेवावयास दिली होती. मेहुण्यानें ती सारी बळकावली, आणि एकनाथपंतांच्या डोक्यावरून हात फिरविला.

३६. **डोक्यावरून पाणी जाणें**--

(क) लाचार, बेजार होणें; मोठी नुकसानी होणें. उ० आम्हासारख्याची १०० रुपयाची नुकसानी होणें म्हणजे डोक्यावरून पाणी जाणें होय !

(ख) अघळपघळ गणती करणें; पराकाष्ठा होणें; परमावधि होणें. उ० हें रानड्यांचें स्थळ तुमच्या मुलीला योग्य आहे. तुमचा खर्च फार होणार नाहीं. पांचशें रुपयांत सारें कार्य उरकेल ! डोक्यावरून पाणी गेलें तर आणखी ५० रुपये लागतील.

३७. **डोक्यास पाणी लावून ठेवणें**-शिक्षा भोगावयास तयार होऊन राहणें. [ न्हावी डोईचे केश तासावयाच्या आधीं डोक्याला पाणी लावतो. हजामत करणें म्ह० फजीती करणें. ]

३८. **सतरा जणांच्या डोक्यांस पाणी लावून ठेवणें**-पुष्कळ माणसांची खुशामत करणें. उ० मी एका यजमानाची मर्जी संभाळीन; सतरा जणांच्या डोक्यांस पाणी लावणें माझ्यानें होणार नाहीं!

## ३८. डोळा.

१.(क) रंग, रूप, वगैरे जाणण्याचें इंद्रिय; नेत्र, नयन. उ० त्याचे डोळे विशाल, आणि पाणीदार आहेत. उ०

डोळां घालितां अंगोळी । एकाचीं तीं दोन झालीं ॥

रामदास.

(ख) दृष्टि, नजर. उ० तो वक्ता वेदीवर येतांच सर्व प्रेक्षकांचे डोळे त्याच्याकडे लागले.

(ग) छिद्र, लहान भोंक. उ० सुईचा, दाभणाचा डोळा.

(घ) मोराच्या पिसाऱ्यावरील डोळ्याच्या आकाराचीं वर्तुळें; चंद्रक.

(ङ) अंकुर फुटण्याची जागा. उ० बटाट्याचा, उसाचा डोळा.

(च) पायाच्या घोट्याजवळ दोन खळगे असतात, त्यांपैकीं प्रत्येक.

(छ) गुडघ्याच्या वाटीजवळच्या दोन खळग्यांपैकीं प्रत्येक.

(ज) माहिती सांगणारा; हकीगत कळविणारा; ज्ञानाचा उगम. उ० हेर हे राजाचे डोळे होत.

(झ) डोळ्याच्या आकाराची आकृति. शिताफळ, रामफळ, वगैरें-वरचे खवले.

(ञ) धान्य वगैरेचें एक विशिष्ट माप, किं० परिमाण. उ० तीन डोळे म्हणजे एक पायली.

२. **चार डोळे होणें**--एकमेकांस मदत करावयास दोन माणसें जुळणें. उ० तुमचे आणि माझे असे चार डोळे झाले, म्हणजे चुकी होण्याचा संभव कमी.

३. **डोळा ओळखणें**--मनाचा कल जाणणें. उ० त्याचा डोळा ओळखतांच मीं आपलें भाषण आटोपतें घेतलें.

४. **डोळा चुकविणें**—दृष्टीस न पडणें; दृष्टीस न पडूं देणें. उ० ह्या पोराला सुपारीची चटक भारी आहे. माझा डोळा चुकवून त्यानें चंचींतून केव्हांच एक खांड काढून तोंडांत टाकलें!

५. **डोळा जाणणें-समजणें-ताडणें**—मनाचा कल ओळखणें.

६. **डोळ्यांत प्राण ठेवणें**—अमुक एक गोष्ट पाहिल्यावरोबर मरावयास तयार होऊन राहणें. उ० मुलाला भेटावयासाठीं तो मनुष्य डोळ्यांत प्राण ठेवून आहे.

७. **डोळाभर झोंप**—बरीचशी झोंप. हुशारी वाटण्याइतकी झोंप. उ० काल सारी रात्र मला जागरण झालें, आतां डोळाभर झोंप मिळाली तर बरें वाटेल.

८. **एकाद्यावर डोळे उगारणें**, किं० **वटारणें**—उग्र मुद्रेनें त्याच्याकडे पाहणें.

९. **डोळे उघडणें**—आपली स्थिति, कर्तव्य, हिताहित, वगैरेंकडे लक्ष्य देणें.

१०. **डोळा उघडत नाहीं**, किं० **उघडेनासा होणें**—गर्वानें, किंवा श्रीमंतीच्या मदानें, तिरस्कारयुक्त नजरेनें पाहाणें. उ० त्याला ही वडतीची जागा मिळाल्यापासून त्याचा डोळा उघडेनासा झाला आहे!

११. **पावसाचा डोळा उघडणें**--पाऊस खळणें. उ० आज चार दिवस पावसाचा डोळा क्षणभरही उघडला नाहीं.

१२. **डोळे उरफाटणें-फिरणें**--अधिकाराच्या, किं० श्रीमंतीच्या मदानें, किं० वरिष्ठाची मर्जी आपल्यावर असल्याकारणानें, उन्मत्त होऊन जाणें. उ० गोविंदरावाचे डोळे आलीकडे किती उरफाटले आहेत म्हणून सांगूं?

१३. **डोळे खाणें**--डुलक्या येणें. उ० तीन दिवस लागोपाठ जागरण झाल्यामुळें माझे डोळे खात आहेत. ( म्ह० मला डुलक्या येत आहेत.)

१४. **डोळेगांवचीं कवाडें लागणें**—अंध होणें.

१५. **डोळे चढणें**—उग्र दिसणें, ( अमली पदार्थाच्या सेवनानें, किं० उन्मादानें. )

१६. **डोळे चढवून बोलणें**—रागानें, किं० कठोरपणानें, किं० मगरूरीनें, बोलणें.

१७. **डोळे जळणें**-मत्सरानें बरें न पाहवणें. उ० माझें वैभव पाहून त्याचे डोळे जळत असतात.

१८. **डोळे जाणें**—अंधता येणें. उ० देवींचीं फुलें पडून आठव्या वर्षी त्याचे डोळे गेले.

१९. **डोळे झांकणें**—

(क) दुर्लक्ष्य करणें; बेपरवाई दाखविणें. उ० मुलाच्या वर्तनाकडे तुम्हीं डोळे झांकले तर पुढें पस्तावाल.

(ख) काणाडोळा करणें; मनावर न घेणें.

(ग) मरणें.

२०. **डोळे टळटळीत भरणें**—अश्रूंनीं डोळे भरणें.

२१. **डोळे ताटणें**—गर्विष्ठ होणें. उ० मलकाप्पाला पाटीलकी मिळाल्यापासून त्याचे डोळे किती ताटले आहेत म्हणून सांगूं?

२२. **डोळे तांवारणें**--उग्र नजरेनें पाहाणें. उ० माझ्यावर डोळे तांवारून तो माझ्याशीं बोलत होता.

२३. **डोळे थंड होणें**, किं० **डोळे निवणें**--एकादा प्रिय वस्तु पाहून समाधान पावणें. उ० मुलाचे दोन हातांचे चार हात झालेले पाहून माझे डोळे थंड झाले.

२४. **डोळे निवळणें**—
(क) डोळ्यांचा कांहीं रोग बरा झाल्यानंतर डोळे स्वच्छ, साफ होणें.
(ख) ताळ्यावर येणें (कोणत्याही वेडानंतर, किं० नादानंतर).

२५. **डोळे पठारास जाणें**—आजार, अशक्तपणा, उपवास, वगैरे कारणांनीं डोळे खोल जाणें.

२६. **डोळे पांढरे करणें**—
(क) डोळे पांढरे होत तोंपर्यंत मारणें, किं० शिक्षा करणें. उ० माझ्या वाटेस जाऊं नको, माझा राग कठिण आहे, मी एकदा मारावयास लागलों, कीं तुझे डोळे पांढरे करून सोडीन!
(ख) भीतीनें, किं० घाबरल्यामुळें, डोळे पांढरे करणें; घाबरून जाणें; भयामुळें गर्भगळित होणें. उ० मला पाहतांच त्यानें डोळे पांढरे केले.
(ग) मरणाच्या द्वारीं येऊन पोंचणें. उ० त्यानें डोळे पांढरे केले. आतां मात्राविंत्रांचा उपयोग काय व्हावयाचा?

२७. **डोळे पाताळांत जाणें**—अशक्तपणानें, किं० आजारामुळें, डोळे खोल जाणें. उ० हें नारायणरावांच्या जिवावरचें दुखणें गेलें; त्यांचे डोळे पहा कसे पाताळांत गेले आहेत ते?

२८. **डोळे पाहून वागणें**, किं० **चालणें**—एकाद्याच्या मनाचा कल लक्ष्यांत घेऊन वर्तन करणें. उ० रामभाऊ आपल्या वरिष्ठाचे डोळे पाहून वागत असतो, मग त्याला वढती कां नाहीं मिळणार?

२९. **डोळे पिंजारणें, फिंदारणें**, किं० **फाडणें**—एकाद्या मनुष्याकडे डोळे वटारून पाहाणें, किं० उग्र नजर करणें.

३०. **एकाद्याचे डोळे पुसणें**—त्याचें सांत्वन करणें.

३१. **डोळे पोंढळणें**—डोळे खोल जाणें. उ० तापांतून उठल्यापासून त्याचे डोळे फारच पोंडळले आहेत!

३२. **डोळे फाटणें**—
(क) मोठी आशा उत्पन्न होणें.

(ख) आश्चर्यचकित होणें. उ० त्या राजवाड्यांतील सामानसुमान पाहून माझे डोळे फाटले.

३३. **डोळे फाडणें**--

(क) डोळे वटारणें.

(ख) अंतकाळीं डोळे निश्चल उघडे ठेवणें.

३४. **डोळे फिरणें**--

(क) घेरीं येणें. उ० राजवाड्याच्या गच्चीवरून मीं खालीं पाहिलें तों माझे डोळे फिरले.

(ख) द्रव्यानें, किं० अधिकारानें, अंगीं मगरुरी येणें. उ० काशीनाथपंताला ती जागा मिळाल्यापासून त्याचे डोळे फिरले आहेत !

(ग) अंतकाळीं डोळे वटारले जाऊन निश्चल होणें.

(घ) एकादा करार रद्द करण्यास प्रवृत्त होणें.

३५. **डोळे फिरविणें**--

(क) डोळे वटारणें.

(ख) अंतकाळ आल्यामुळें डोळे उघडून निश्चल करणें.

(ग) रागानें डोळे उग्र करणें.

(घ) नापसंतीची नजर करणें.

३६. **डोळे फुटणें**--

(क) अंधता येणें. उ० गोफणीचा धोंडा लागून त्याचा उजवा डोळा फुटला

(ख) दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून मत्सरग्रस्त होणें. उ० गुणी मनुष्याचें वैभव पाहून शिवरामपंताचे डोळे फुटतात.

३७. **डोळे बांधणें**--वस्त्रादिकांच्या वेष्टनानें डोळ्यांना कांहीं न दिसेल असें करणें. उ० आंधळ्या कोशिंबिरींत ज्याच्यावर चोरपण आलें असेल, त्याचे डोळे बांधतात.

३८. **डोळे भरून पाहाणें**--तृप्ति होईतोंपर्यंत एकादी सुंदर, किं० आवडती, वस्तु पाहाणें.

३९. **डोळे मुरडणें**––वांकडी नजर करून पाहाणें.

४०. **डोळे मोडणें**––

(क) डोळ्यानें कांहीं तरी खुणा करणें.

(ख) गर्वाची, किं० मगरुरीची, नजर करणें.

४१. **डोळे येणें**—

(क) अंधता जाऊन पुन्हा दृष्टि प्राप्त होणें. उ०

शोकें रडतां डोळे जावे, गेले कधीं न यावे गा ! ।
दिसतें कल्याण पुढें, होऊंचि नको अधीन या वेगा ॥ ९७ ॥

मोरोपंत–वनपर्व, अ० १३.

(ख) डोळ्यांना रोगविशेष होणें. उ० आम्ही बैलगाडीनें, आणि उन्हाळ्या दिवसांत, सासवडास गेलों; हा प्रवास आमच्या धाकट्या मुलास बाधला, आणि त्याचे डोळे आले.

४२. **डोळा लवणें**––डोळ्याच्या पापणीचें स्फुरण होणें. उ० पुरुषांचा उजवा डोळा आणि बायकांचा डावा लवणें, हें शुभसूचक समजतात.

४३. **डोळ्यांच्या खाचा होणें**, किं० **डोळ्यांचें खोबरें होणें**, किं० **डोळ्यांची भिंत होणें**—डोळ्यांचा अवलोकनाचा व्यापार बंद होणें. उ० हल्लीं त्याला एक्याण्णवावें वर्ष आहे. त्याच्या डोळ्यांच्या खाचा होऊन गेल्या आहेत. उ० अरे, असा लोकांना पायाचे धक्के देत देत काय चालला आहेस ! मागें पुढें पाहून चालशील कीं नाहीं ? कीं तुझ्या डोळ्यांच्या खाचा झाल्या ?

४४. **डोळ्यांच्या वाती करणें**––डोळे ताणून पाहाणें ( अंधारांत ).

४५. **डोळ्यांचें पारणें फिटणें**––उत्कंठेनें अपेक्षिलेली वस्तु एकदाची पाहावयास मिळणें. उ० नातवंड केव्हां दिसेल केव्हां दिसेल म्हणून मी आतुर झालें होतें; आतां एकदा नातवंडाचें तोंड दिसलें; आतां माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें !

४६. **डोळ्यांत कुरूप**, किं० **कुरुंद**, **असणें**––

(क) मत्सरानें पीडित असणें. उ० शिवरामपंताच्या डोळ्यांत कुरुंद आहे ! त्याला माझी विद्वत्ता कशी दिसणार !

(ख) एकाद्याविषयीं द्वेषबुद्धि, किं० वैर, असणें.

४७. **डोळ्यांत**, किं० **नेत्रांत खुपणें**, किं० **सलणें**--पाहून डोळ्यांना वेदना होणें, ( मत्सरानें, द्वेषानें, वैरानें इ० ) उ०

ब्राह्मण कणसा खुपतो तुमच्या नेत्रीं, नसो, सवें काढा ।
युक्ताचि मरणाला हितपरिणामहि न सोसवे काढा ॥ २९ ॥
मोरोपंत–आदिप०, अ० ९.

४८. **डोळ्यांत जहर उतरणें**--दुसऱ्याचें वैभव पाहून मत्सरग्रस्त होणें.

४९. **डोळ्यांत तेल घालून**--काळजीनें, खबरदारीनें.

५०. **डोळ्यांत धूळ**, किं० **माती, घालणें**--फसविणें.

५१. **डोळ्यांत पाणी नसणें**--लाज न वाटणें.

५२. **डोळ्यांत पाणी असणें**--लाज वाटणें.

५३. **डोळ्यांत प्राण ठेवणें**—एकादी आवडती वस्तु डोळ्यांनीं पाहिल्या-बरोबर मरावयास तयार असणें.

५४. **डोळ्यांत प्राण उरणें**, किं० **येणें**—एकादी इष्ट वस्तु पाहतांच मरायास सिद्ध असणें.

५५. **डोळ्यांत बोट घातलें असतां दिसणार नाहीं इतका अंधार**—निबिड काळोख.

५६. **डोळ्यांत भरणें**--फार फार आवडणें. उ० ही अंगठी माझ्या डोळ्यांत भरली आहे ( म्ह० मला फार आवडते ).

५७. **डोळ्यांत माती पडणें**—मत्सर वाटणें.

५८. **डोळ्यांत न मावणें**, किं० **न समावणें**—पाहतांक्षणीं गर्भगळित न होणें; न भिणें. उ० मी कांहीं तुझ्या डोळ्यांत मावणार नाहीं.

५९. **डोळ्यांत वात घालून बसणें**--जागत बसणें.

६०. **डोळ्यांत शरम नसणें**—निर्लज्ज असणें.

६१. **डोळ्यांनीं उजाडणें**--सारी रात्र जागून काढणें, किं० घालविणें.

६२. **डोळे मारणें**--डोळ्यांच्या खुणांनीं संकेत कळविणें.

६३. **डोळ्यांनीं रात्र**, किं० **दिवस काढणें**, किं० **उगवणें**--एकसारखें जागत बसून रात्र, किं० दिवस, घालविणें.

६४. **उघड्या डोळ्यांनीं**--जाणूनबुजून; फसगतीनें नव्हे.

६५. **डोळ्यांपुढें काजवे येणें**--भोंवळ येण्याची भावना होणें.

६६. **डोळ्यांवर कातडें ओढणें**--एकाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष्य करणें; ती पाहिली न पाहिली असें दाखविणें; ती मनावर न घेणें.

६७. **डोळ्यांवर धूर येणें**--अधिकारानें, किं० संपत्तीनें, फुगून जाणें, किं० उन्मत्त होणें.

६८. **डोळ्यांवर पडल**, किं० **पटल**, **येणें**--उन्मत्त होणें.

६९. **डोळ्यांवर येणें**--डोळ्यांत सलणें.

७०. **एकाद्याच्या डोळ्याशीं डोळा मिळविणें**--त्याच्याकडे उद्धटपणानें टक लावून पाहात राहणें.

७१. **डोळ्याशीं डोळा लागणें**, किं० **डोळ्याला डोळा लागणें**--थोडीशी झोंप येणें.

७२. **डोळा लागणें**--थोडीशी झोंप लागणें. उ०

> चिंताज्वरांत माझा रात्रौ नाहींच लागला डोळा ।
> जायासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा ॥
>
> मोरो०--बृहद्दशम.

७३. **दोहीं डोळ्यांची मुरवत राखणें**--एकाद्याकडे पाहावयाला भिणें, किं० कचरणें

७४. **दोन डोळ्यांची भीड**--मनुष्य समोर उभें आहे तोंपर्यंत त्याच्याविषयीं आदर, किं० प्रेम वाटणें, आणि तें माणूस तेथून दुसरीकडे गेलें कीं, त्याचें स्मरणही नाहीं असें होणें; वरपांगी प्रेम.

७५. **रुप्याचे डोळे होणें**--अंतकाळ आल्यामुळें डोळे पांढरे होणें; मरणोन्मुख होणें.

७६. **डोळे ताणून पाहणें**--तीक्ष्ण नजरेनें, टवकारून, पाहणें.

७७. **वायाचा डोळा**--रुपया. [ भिक्षुकमंडळींत ह्या शब्दाचा प्रचार आहे. ]

## ३९. ताळू, किं० टाळू.

१. (क) डोक्याचा वरचा भाग.

(ख) मुलाचें जावळ केलें म्हणजे डोक्यावर जो केसांचा झुवका राखून ठेवतात तो.

(ग) तोंडाचा आंतील घुमटाकार भाग.

(घ) चत्रगाळ चिकणमातीचा थर, जो पाऊस पडल्यावर जमिनीवर सांठून राहतो तो. उ० परवांच्या पावसानें माझ्या शेतावर चांगली दाट ताळू धरली आहे. [ " धरणें " हें येथें अकर्मक. ]

(ङ) विहिरीच्या तळाला सांचलेला गाळ; उ० विहिरीची ताळू खणा, म्हणजे मुबलक पाणी लागेल.

२. **ताळूवर मिरीं वाटणें**—एकाद्यावर पूर्ण अंमल गाजविणें; एकाद्याच्या वरचढ होणें.

३. **ताळूला, किं० ताळवेस, किं० टाळयास, टिपरूं न लागूं देणें.**

(क) न खळतां रडत राहाणें. उ० काय मूल तरी तें! मघांपासून रडतें आहे! टाळयास टिपरूं लागूं देत नाहीं!

(ख) एकसारखें बोलत सुटणें.

(ग) एकाद्या गोष्टीचा सुगावा, किं० पत्ता, न लागूं देणें.

(घ) एकादी कामगिरी अंगाबाहेर टाकणें.

४. **ताळूचा दांत**—आवडती, किं० प्यारी, वस्तु, किं० मनुष्य. उ० त्याची कोणी निंदा केलेली मला खपावयाची नाहीं! तो माझ्या ताळूचा दांत आहे.

टीप—सापाच्या तोंडांतील वरचा दांत; ज्यांत त्याचें विष सांठलेलें असतें, आणि ज्याला तो आपलें संरक्षणाचें साधन म्हणून जपत असतो, असें समजतात.

५. **ताळू भरणें** ( " भरणें " सकर्मक )—लहान मुलाला न्हाऊं घालतांना त्याच्या ताळूंत तेल जिरविणें.

६. **ताळू भरणें** ( " भरणें " अकर्मक )—ताळूचा भाग पूर्णपणें वाढणें, किं० टणक होणें. उ० ह्या मुलाची ताळू अजून भरली नाहीं, त्याच्या डोक्याला हात लावूं नको!

७. **एकाद्याच्या ताळवेवरून हात फिरविणें**—त्याला फसविणें. उ० रंगोपंत प्रामाणिक मनुष्य आहे असें समजून त्याच्या हातीं मीं आपला सर्व कारभार दिला, पण अखेरीस त्यानें माझ्या ताळवेवरून चांगलाच हात फिरविला!

## ४०. तोंड.

१ (क) अन्न वगैरे द्रव्यें शरीराच्या उपयोगासाठीं ग्रहण करणारें, आणि शब्दोच्चार करणारें, इंद्रिय; मुख.

(ख) चेहेरा. उ० त्याच्या तोंडावर अद्यापि आजाऱ्याची कळा दिसूं लागली नाहीं.

(ग) कोणत्याही वस्तूचा पुढचा भाग, किं० दर्शन. उ० ह्या घराचें तोंड उत्तरेस आहे.

(घ) भोंक, छिद्र, वाट. उ० बाटलीचें तोंड. उ० ह्या फोडाला सुईनें तोंड पाड. उ० खिंडीच्या तोंडांतच वाघ बसला होता. उ० ज्वालामुखीचें तोंड.

२. **कोणत्या तोंडानें ?**—येथें तोंड=धैर्य; उजागरी. उ० एका व्यवहारांत त्याणें मला फसविलें. आतां दुसरा व्यवहार करा असें मला तो कोणच्या तोंडानें म्हणावयास येईल? (म्ह० त्याला धैर्य कसें होईल?)

३. **तोंड आटोपणें**, किं० **आवरणें**—भाषण बंद करणें; बोलण्याला आळा घालणें; जपून बोलणें. उ० तोंड आटोप, जास्ती बोललास तर मार खाशील!

४. **तोंड आंबट करणें**—असंतोषाची, निराशेची, मुद्रा धारण करणें. उ० तूं आणलेलें चीट रामाला आवडलें नाहीं. तो मघापासून आंबट तोंड करून बसला आहे. दुकानदारानें हें चीट बदलून दिलें तर पहा.

५. **तोंड आहे कीं तोबरा आहे ?**—किती खातोस? किती बोलतोस? उ० अरे, शेरभर पोहे संपविलेस! आणि आणखीही मागत आहेस! तोंड आहे कीं तोबरा आहे? (म्ह० तुझ्या खाण्याला कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं?) उ० मघापासून एकसारखा बोलतो आहेस! तोंड आहे कीं तोबरा आहे?

६. **तोंड उतरणें**--तोंडावरचें तेज नाहींसें होणें. ( आपला अन्याय उघडकीस आल्यामुळें, किं० आजारानें, किं० निराशेनें, किं० उपवासामुळें. ) उ० ह्या येवढ्याशा मुलीला एकादशी कशाला करावयाला लावतां? ती सकाळपासून नुसत्या रताळ्याच्या चार फोडींवर आहे! तिचें तोंड पहा अगदीं उतरून गेलें आहे!

७. **तोंड उष्टें करणें**--अल्पमात्र आहार करणें. उ० मला आगगाडीवर जावयाची घाई झाली, म्हणून मी नुसतें तोंड उष्टें करून उठलों. ( म्ह० फार न जेवतां उठलों. ) उ० पोटभरीचें अन्न नाहीं, मग तोंड उष्टें तरी कशाला करूं?

८. **तोंड करणें**--निर्लज्जपणें बोलणें; उद्धटपणानें बोलणें. उ० तूं खालीं न पाहातां चालत होतास म्हणून तें दूध सांडलें; आतां उगीच कशाला तोंड करतोस? ( म्ह० ठेवणारानें तें तेथें ठेवावयाचें नव्हतें, दूध ठेवण्याची ती जागा नव्हे, वगैरे वायफळ बोलणें कशाला बोलतोस? )

९. **तोंड करून बोलणें**--निर्लज्जपणें, किं० आपला लहान दर्जा विसरून, बोलणें. उ० तुझ्या मुलानें पहिल्यानें माझ्या मुलाची खोडी काढली; आतां उगीच तोंड करून बोलूं नको!

१०. **तोंडाला काळोखी आणणें**, किं० **लावणें**--अपकीर्तीला कारण होणें. उ० ह्या बदमाष पोरानें माझ्या तोंडाला काळोखी लावली!

११. **तोंड काळें करणें**--निघून जाणें; पळून जाणें. [ यांत निंदा किं० तिरस्कार गर्भित असतो. ] उ० तुला जर माझ्या म्हणण्याप्रमाणें चालावयाचें असेल, तर माझ्या घरीं रहा; नाहीं तर एकदाचें तोंड काळें कर! [ ह्या शब्दसंहतींत " तोंड " हा शब्द वगळला तरी चालतो ].

१२. **तोंड घालणें**--मध्यें बोलणें. उ० ज्यांत त्यांत तोंड घालावयाची तुझी खोडी वाईट आहे.

१३. **मध्यें तोंड घालणें**--दोन माणसांचें बोलणें चाललें असतां, व त्यांच्या बोलण्याच्या विषयाशीं आपला कांहीं संबंध नसतां, त्यांच्याबरोबर बोलणें. उ० आम्ही आपले घरगुती गोष्टी बोलत आहों, तूं कशाला मध्यें तोंड घालतोस?

१४. **तोंड येणें**--

(क) बोंबलत सुटणें, ताशेरा झाडणें.

(ख) तोंड यावें म्हणून पारा वगैरे खाणें. उ० मी वैद्यापासून तोंड घेतलें आहे. ( म्ह० तोंड सुजविणारें औषध घेतलें आहे. )

१५. **तोंडसुख घेणें**--यथेच्छ शिव्या देणें; खरडपट्टी काढणें.

१६. **तोंड चुकविणें**--

(क) आपल्या हातून कांहीं अपराध घडला असतां कोणी आपणास रागें भरेल ह्या भीतीनें त्याच्यापासून दूर असणें, किं० त्याच्या नजरेस न पडणें.

(ख) आपण एकाद्याच्या नजरेस पडलों असतां तो आपणास कांहीं कामधाम सांगेल, आणि तें आपणास करावें लागेल, ह्या भीतीनें त्याच्या दृष्टीस न पडणें. उ० मी त्याला भायखळ्यावर पाठविणार आहें, पण आज आठ दिवस तो तोंड चुकवीत आहे !

१७. **जळो त्याचें तोंड !**--आग लागो त्याच्या तोंडाला !

१८. **तोंड टाकणें**—

(क) शिव्यांचा वर्षाव करणें; अद्वातद्वा बोलणें. उ० तुझी जिन्नस तुझ्याच पेटींत सांपडली, तूं नोकर माणसांवर उगीच तोंड टाकिलेंस !

(ख) चावायासाठीं तोंड पुढें करणें. [ घोडा, वगैरेसंबंधानें ह्या शब्दसंहतीचा उपयोग होतो. ] उ० ह्या घोड्याला तोंड टाकावयाची भारी खोडी आहे, ती घालविली पाहिजे.

१९. **तोंड दाबणें**--लांच वगैरे भरून एकाद्याचें तोंड बंद करणें; आपलीं वर्मेंकर्मे प्रकट करूं नये म्हणून एकाद्याला पैसे देऊन गप्प करणें.

२०. **तोंड दिसणें**—निर्भर्त्सना केलेली लोकांच्या नजरेस येणें ( पण ज्याची निर्भर्त्सना केली, त्याचें वर्तन सुधारण्याची आशा नसणें ). उ० मी तुला रागें भरलों म्हणजे माझें तोंड मात्र दिसेल, पण तूं आपला आहेस तसाच राहाणार !

२१. **बोलणाराचें तोंड दिसतें, करणाराची कृति मात्र कोणाला दिसत नाहीं**—रागें भरणाऱ्या मनुष्याचे शब्द सर्वांना ऐकूं जातात, पण खोटें काम करणाऱ्याचे अन्याय मात्र कोणाला दिसत नाहींत. उ० सासू–"आतां हें दूध लवंडिलेंस, मघाशीं ती भाजी ओंवळी केलीस, हे तुझे अपराध लोकांना कळत नाहींत; पण मी रागें भरलें, म्हणजे माझें मात्र तोंड दिसतें! लोक म्हणतील, काय बाई तरी ही सासू ! सुनेला एकसारखी बोलत असते!"

२२. **तोंड देणें**—

(क) पारा वगैरे देऊन तोंडाची आंतली त्वचा सुजवून लाळेच्या रूपानें शरीरांतून रोग नाहींसा करणें. उ० वैद्यबोवा म्हणाले, "मी त्याला तोंड दिलें आहे." ( म्हणजे तोंड सुजविण्याचें औषध दिलें आहे. )

(ख) सैन्याच्या अग्रभागीं राहून शत्रूवर हल्ला करणें.

(ग) प्रतिपक्षी होऊन राहणें; लढावयाला सिद्ध होणें. उ० मराठ्यांच्या सैन्याला तोंड देण्याची औरंगझेबाची छाती होईना.

२३. **तोंड धरणें**--

(क) अन्नसेवन करण्याची तोंडाची शक्ति आजार वगैरेंच्या कारणानें नाहींशी होणें. उ० त्याचें तोंड धरलें आहे, त्याला चमच्या चमच्यानें दूध पाजावें लागतें. [ "धरणें" अकर्मक. ]

(ख) बोलण्याची शक्ति नाहींशी करणें. उ० मीं शाई सांडली नाहीं असें तूं मास्तराला कां नाहीं सांगितलेंस? तुझें तोंड कोणी धरलें होतें कीं काय? [ "धरणें" सकर्मक ].

(ग) एकाद्याला आपल्या कबज्यांत, तावडींत आणणें. उ० मीं त्याचें तोंड धरलें आहे. तो आतां काय करणार? [ "धरणें" सकर्मक. ]

२४. **तोंड धरून, किं० दाबून, बुक्क्यांचा मार**—एकाद्याला विनाकारण वडविणें आणि पुन्हा त्याला कागाळी करण्याचा मार्गही खुला न ठेवणें.

२५. **तोंड धुवून या!**—ही तुमची विनंति मी कदापि मान्य करणार नाहीं!
टीप—पुणें शहरीं, "नाकझरीवरून तोंड धुवून या," असेंही म्हणण्याचा प्रघात आहे.

२६. **तोंड निपटणें**—आजारानें, किं॰ उपासामुळें, गाल खोल जाणें. उ॰ आज महिनाभर हें मूल तापानें आजारी होतें; त्याचें तोंड पहा कसें निपटलें आहे तें! [ "निपटणें" अकर्मक. ]

२७. **तोंड पडणें**—
(क) सुरवात होणें. उ॰ लढाईस तोंड पडलें.
(ख) छिद्र पडणें. उ॰ ह्या गळवाला तुम्ही डिवचूं नका; आपल्या आपण तोंड पडेल तेव्हां पडूं द्या.

२८. **तोंड मातीसारखें, किं॰ शेणासारखें, होणें**—तोंडाची चव नाहींशी होणें. उ॰ तापामुळें माझें तोंड अगदीं शेणासारखें झालें आहे!

२९. **तोंड पसरणें**—
(क) हीनदीनपणानें याचना करणें.
(ख) खिन्नपणाची मुद्रा धारण करणें.

३०. **तोंड पाघळणें**—गुह्य गोष्ट बाहेर पडूं देणें. उ॰ मारवाड्याला चुकविण्यासाठीं मीं उद्यां मुकाट्यानें नाशकास जावयाचा बेत केला होता; सर्व तयारी झाली होती; पण आमच्या घरकरणीचें तोंड पाघळलें! तिणें हा बेत गोपिकाबाईच्या कानांत सांगितला; गोपिकाबाईनीं चंद्रिकाबाईच्या कानांत सांगितला; असें होतां होतां त्या मारवाड्यापर्यंत ही खबर जाऊन थडकली; तेव्हां तो माझ्या घरीं येऊन रुपये मागूं लागला.

३१. **तोंड पाहाणें.**—
(क) एकाद्याच्या आश्रयाची, मदतीची, अपेक्षा करून असणें. उ॰ आम्ही पडलों गरीब, म्हणून आम्हांला सावकारांचीं तोंडें पाहाण्याची पाळी वारंवार येते.
(ख) आपल्या शक्तीचा आजमास करणें. उ॰ तूं असें करीन म्हणतोस, पण आधीं आपलें तोंड पाहा.

३२. **तोंड फिरणें**—

(क) तोंडाची चव नाहींशी होणें. उ० तापामुळें माझें तोंड फिरलें आहे. ( म्ह० मला कोणताच पदार्थ तोंडांत घालावासा वाटत नाहीं. )

(ख) तोंडांतून शिव्यांचा वर्षाव होऊं लागणें. उ० तो रागावला म्हणजे कोणावर त्याचें तोंड फिरेल ह्याचा नेम नाहीं !

३३. **तोंड फिरविणें**--

(क) शिव्यांचा वर्षाव करीत सुटणें. उ० तो भारी तापट आहे; त्याला चिडवूं नका; त्याला राग आला म्हणजे तो तुमच्यावर देखील तोंड फिरवावयाला कचरणार नाहीं !

(ख) तोंडाची चव नाहींशी करणें.

(ग) रंगांचा फरक दाखविणें ( वितळत असलेल्या धातूसंबंधानें योजतात ). उ० ह्या तांब्यानें अद्याप तोंड फिरविलें नाहीं; आणखी पुष्कळ आंच दिली पाहिजे.

३४. **तोंड फुटणें**—

(क) थंडीच्या योगानें तोंडाची बाहेरची त्वचा खरखरीत होणें, किंवा भेगाळणें. उ० पुण्याच्या थंडीनें माझें तोंड फुटलें आहे.

(ख) फजीती उडणें, पत नाहींशी होणें; नाचक्की होणें.

३५. **तोंड बंदावर राखणें**—खाण्याला, किं० बोलण्याला, आळा घालणें. उ० तूं आपलें तोंड बंदावर राखिलें नाहींस, तर अजीर्णानें आजारी पडशील !

३६. **तोंड बांधणें**—लांच देऊन एकाद्याचें तोंड बंद करणें; आपली गुप्त गोष्ट एकाद्याला ठाऊक असली तर ती त्यानें उघडकीस आणूं नये म्हणून त्याला पैसे देऊन गप्प करणें.

३७. **तोंड बाहेर काढणें**—

(क) राजरोसपणें समाजांत हिंडणें. उ० तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यानें आज दोन वर्षांत एकदाही तोंड बाहेर काढलें नाहीं.

(ख) फिरावयासाठीं, किं० कामाकाजासाठीं, घराच्या बाहेर पडणें. उ०

पावसाळा सुरू झाल्यापासून मीं दोन महिन्यांत तोंड बाहेर काढलें नाहीं.

३८. **तोंड भरून बोलणें**--कोणाची भीड, मुरवत, संकोच, न बाळगतां बोलणें.

३९. **तोंड भरून साखर घालणें**--एकाद्यानें उत्तम प्रकारें कांहीं कामगिरी केली असतां बक्षिशीदाखल तो खाईल तितकी साखर त्याला खाऊं घालणें.

४०. **तोंड माजणें**--

(क) पक्वान्नें खावयाची चटक लागणें; उ० त्याचें तोंड आलीकडे भारी माजलें आहे !

(ख) शिव्या देण्याची खोडी लागणें; उ० त्याचें तोंड भारी माजलें आहे (म्ह० तो ज्याला त्याला शिव्या देत असतो ).

४१. **तोंड येणें**—तोंडाच्या आंतल्या त्वचेवर फोड येऊन ती हुळहुळी होणें; उ० आज महिनाभर माझें तोंड आलें आहे; मला तिखट अगदीं चालत नाहीं.

४२. **तोंड रंगविणें**--

(क) थोबाडींत मारून एकाद्याचें तोंड लालभडक करून सोडणें; उ० असें भलभलतें मला बोललास, तर ऐसें तुझें तोंड रंगवीन कीं ज्याचें नांव तें !

(ख) विडा खाऊन ओठ तांबडेलाल करून घेणें. उ० गुडघ्यायेवढ्या पोराला असें तोंड रंगविणें शोभत नाहीं !

४३. **तोंड लागणें**—सुरुवात होणें. उ० समारंभास, लढाईस, तोंड लागलें.

४४. **तोंड लावणें**—सुरुवात करणें; बोलावयाला प्रारंभ करणें; प्यावयासाठीं एकादें पेय ओठाशीं नेणें.

४५. **तोंड वाईट करणें**—निराशेची मुद्रा धारण करणें.

४६. **तोंड वाईट होणें**—

(क) तोंडावर निराशेची मुद्रा येणें.

(ख) तोंडाची चव नाहींशी होणें.

४७. **तोंड वाजविणें**—बोलत सुटणें; गलागला बोलणें; निरुपयोगी बोलणें; बोलण्याची मेहेनत करणें.

४८. **तोंड वासणें**—निराशेनें, दुःखानें, तोंड उघडणें; याचना करण्यासाठीं तोंड उघडणें.

४९. **तोंड वासून पडणें**—शक्तीच्या क्षीणतेमुळें आ पसरून पडणें. सामर्थ्य, उत्साह, तेज, वगैरे नष्ट झाल्यामुळें लाचार होऊन आ पसरून पडणे. उ०

जो खळ म्हणे "पृथेची सांगुनि दासीस कोंडवा सून" ।
तो पडला सिंहनिहतमत्तद्विपसाच तोंड वासून ॥

मोरो०—गदापर्व.

५०. **तोंड विचकणें**—हीनदीनपणाची मुद्रा धारण करून, आणि केविलवाण्या स्वरानें, याचना करणें.

५१. **तोंड हातावर धरणें**—शिव्या देत सुटणें; उ० त्यानें आतांशा आपलें तोंड जसें कांहीं हातावर धरिलें आहे ! ( म्ह० ज्याला त्याला तो शिव्या देत असतो ! )

५२. **एकाद्यावर तोंड सोडणें**—त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव करणें. उ० आपल्या अंगणांत केर लोटला म्हणून बोलाईनें शेजारणीवर यथेच्छ तोंड सोडलें !

५३. **तोंड वेटाविणें**—एकाद्याला वेडावण्यासाठीं त्याच्या पुढें तोंड वांकडीं करणें.

५४. **तोंड संभाळणें**—जपून बोलणें; भलतेसलते शब्द न उच्चारले जावे, अशी काळजी घेणें; उ० वरिष्ठानें अन्याय केला आहे खरा, तथापि त्याच्याशीं तोंड संभाळून बोल, नाहींतर तो तुजवर दंश धरील !

५५. **एकाद्याचें तोंड सुटणें**—चराचरा, फडाफडा, किं० अद्वातद्वा, बोलण्याची त्याला प्रवृत्ति होणें. उ० आज तुझें भारी तोंड सुटलें आहे रे !

५६. **तोंड सोडणें**—शिव्या देणें; अद्वातद्वा बोलणें; तासडपट्टी, किं० खरडपट्टी, काढणें. [ "तोंड मोकळें सोडणें," असेंही म्हणतात. ] उ०

तिची फणी मीं नुसती कोठें आपल्या डोक्याला लाविली, तोंच तिणें मजवर दहा गाडे तोंड सोडलें !

५७. **तोंड सोडणें**—आधाशासारखें खात सुटणें; [ " तोंड मोकळें सोडणें," असेंही म्हणतात. ] उ० तूं ह्या लग्नांत एकसारखें तोंड मोकळें सोडलें आहेस, तुला दुखणें खास येणार !

५८. **तोंड हातीं धरणें**—
( क ) अद्वातद्वा बोलणें.
( ख ) आधाशासारखें खाणें.

५९. **एकाद्याला तोंडचा**, किं० **तोंडींचा, घास देणें**—वेळ पड-ल्यास आपण उपाशी राहून आपलें अन्न त्याला देण्याला सिद्ध असणें; ( म्हणजे त्याला अत्यंत प्रेमानें, किं० मायाळूपणानें, वागविणें. ) उ० तो मोठा प्रेमळ म्हातारा आहे, तो तोंडचा घास देखील काढून तुला देईल !

६०. **तोंडचा घास काढणें**, किं० **हिसकावून घेणें**—एकाद्याचीं चरितार्थाचीं साधनें नाहींशीं करणें; उ० मला बढती मिळावयाची संधि आली होती, पण त्या गोंदोपंतानें माझ्या तोंडचा घास काढला !

६१. **तोंडचें पाणी पळणें**, किं० **तोंडावरचें पाणी पळणें**, किं० **उडणें**—घाबरून जाणें; भयभीत होणें; उ० तो उन्मत्त हत्ती सुटून सैरावैरा धावत आहे, हें ऐकून सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. उ० माझ्या मुलाची नोकरी गेली, हें ऐकतांच माझ्या तोंडचें पाणी पळालें !

६२. **तोंडाचा तोफखाना सुटणें**—अद्वातद्वा बोलण्याची क्रिया चालणें; शिव्यांचा वर्षाव सुरू होणें; उ० शेजारणीनें आपल्या दारांत केर लोटला असें मथूबाईनें पाहिल्याबरोबर तिच्या तोंडाचा तोफखाना सुटला !

६३. **तोंडाचा पट्टा सुटणें**, किं० **चालणें**—चराचरा बोलणें सुरू होणें; शिव्यांचा वर्षाव होऊं लागणें.

६४. **तोंडाचा पट्टा सोडणें**, किं० **चालविणें**—शिव्यांचा भडीमार सुरू करणें; उ० गोपिकाबाईवर तिणें चोरीचा आळ घातला, तेव्हां, काय विचारतां ? गोपिकाबाईनें जो तोंडाचा पट्टा सोडला तो पुसूं नये !

६५. **तोंडाची गोष्ट नाहीं !**--नुसतें बोलून असलीं कामें कधीं होत नसतात ! उ० वाघ मारणें ही तोंडाची गोष्ट नव्हे !

६६. **तोंडाची वाफ दवडणें**--निरर्थक, निरुपयोगी, निष्फळ, असें भाषण करणें; जें बोलून फायदा नाहीं, जें कोणीही खरें समजणार नाहींत, असें भाषण करणें; उ० तुझ्या उपदेशाप्रमाणें तो कधीं चाला-वयाचा नाहीं, मग उगीच तोंडाची वाफ कां दवडतोस ?

**टीप**--ह्या शब्दसंहतींत "दवडणें" बद्दल "खरचणें," "गमावणें," "फुकट घालविणें," व एतदर्थक दुसरींही क्रियापदें घालतां येतात.

६७. **तोंडांत खाणें**--चपराक सोसावी लागणें; उ० आतां तुझी मस्ती पुरी कर, नाहीं तर तोंडांत खाशील ! [येथें "खाणें" याचें कर्म "चप-राक" हें *अध्याहृत असतें.* ]

६८. **तोंडांत देणें**--चपराक लगावणें. [ येथें "देणें" ह्या क्रियापदाचें कर्म "चपराक" हें अध्याहृत ठेविलें तरी चालतें. ]

६९. **तोंडांत मारून घेणें**--नुकसानी होऊन बोध मिळवणें. फजीती झाल्यावर शहाणपणा शिकणें; आपल्या हातून चुकी झाली, किं० आपण मूर्खपणा केला, असें कबूल करणें. उ० तुझें काम कमी करावें म्हणून मीं हे सर ओविले, आणि तूं म्हणतेस कीं, मीं तुझी गळेसरी विघडविली ! मी आपली तोंडांत मारून घेतें कशी ! पुन्हा म्हणून तुझ्या कामाला बोट लावावयाची नाहीं !

७०. **तोंडांत जडणें**--चपराक मिळणें; उ० पुन्हा त्याच्यावरोवर तूं बाजारांत जाऊं नको, नाहीं तर तोंडांत जडेल ( म्ह० तुला चपराक खावी लागेल ).

७१. **त्याच्या तोंडांत तिळभर राहात नाहीं**--तो गुप्त गोष्ट पोटांत ठेवूं शकत नाहीं; गुप्त गोष्ट त्याच्या तोंडांत राहत नाहीं; उ० त्याच्या-जवळ तुम्ही असल्या गोष्टी बोलत जाऊं नका ! त्याच्या तोंडांत तिळ-भर राहात नाहीं !

७२. **त्याच्या तोंडांत तीळ भिजत नाहीं**--गुप्त गोष्ट त्याच्यानें गुप्त ठेववत नाहीं ( म्हणजे तो गुप्त गोष्ट फट्दिशीं बोलून जातो ).

७३. **तोंडांत तोंड घालणें**--प्रेम, मैत्री, दोस्ती, वगैरेंच्या भावानें वागणें; उ० आलीकडे ते दोघेजण भारी तोंडांत तोंड घालीत असतात! कोणाला तरी बुडविण्याच्या त्यांच्या खटपटी चालल्या असतील असें वाटतें!

७४. **तोंडांत देणें**—चपराक लगावणें; थोबाडींत मारणें.

७५. **तोंडांत भडकावणें**—चपराक लगावणें.

७६. **तोंडांत बोट घालणें**--आश्चर्यचकित होणें; उ० त्यानें अर्ध्या तासांत दहा श्लोक पाठ केले, हें पाहून मीं तोंडांत बोट घातलें!

७७. **तोंडांत बोट घालून राहाणें**--आश्चर्यानें चकित होऊन स्तब्ध होणें; उ० रामानें रात्रीचा दिवस करून अभ्यास केला होता; तो नापास झाला, असें ऐकून मी तोंडांत बोट घालून राहिलों!

७८. **तोंडांत माती पडणें**--उपास काढावे लागणें; मरणें; उ० त्याच्या तोंडांत माती पडली! ( म्ह० तो मेला! )

७९. **तोंडानें पाप भरणें**--लोकांचीं पातकें उच्चारणें; लोकांचे दोष तोंडानें बोलून दाखविणें.

८०. **तोंडापरीस जबडा थोर!**--धन्यापेक्षां चाकराचा दिमाख जास्ती!

८१. **तोंडापुढें!**--अगदीं जिव्हाग्रीं! उ० ते श्लोक अगदीं माझ्या तोंडापुढें आहेत! ( म्ह० हावें तेव्हां मी ते म्हणून दाखवीन! ). उ० तो श्लोक अगदीं माझ्या तोंडापुढें आहे, पण आतां आठवत नाहीं!

८२. **तोंडापुरता गोड, किं० तोंडावर गोड**—खोटें प्रेम दाखविणारा; उ० काकोबा तोंडापुरता गोड आहे, पण मोठा कपटी आहे! त्याच्याशीं जपून वागा!

८३ **तोंडाला पानें पुसणें**—फसविणें; [ शब्दशः. पक्वान्नें सारीं आपण खाऊन उष्टया पत्रावळी दुसऱ्याच्या तोंडाला पुसणें. ] उ० त्याच्यावर

देखरेख करावयाला चार माणसें होतीं; पण त्याणें सर्वांच्या तोंडाला पानें पुसून आपला डाव साधला !

८४. **त्याच्या तोंडाला फाटा फुटला**—तो मन मानेल तें बोलूं लागला !

८५. **तोंडावर**—डोळ्यादेखत ! पाहातां पाहातां ! भीड, मुरवत, किं० संकोच, न बाळगतां; न कचरतां; निर्लज्जपणानें; उ० मी कसचा त्याला भितों आहें ? मी त्याच्या तोंडावर " तूं लुच्चा आहेस " असें म्हणेन !

८६. **तोंडाशीं तोंड देणें**--बरोबरीच्या नात्यानें एकाद्याशीं बोलणें, किं० वागणें, किं० व्यवहार करणें.

८७. **तोंडास येईल तें बोलणें**—योग्यायोग्याचा विचार न करतां बोलणें.

८८. **तोंडावर तोंड पडणें**—दोघांची गांठ पडून संभाषण सुरू होणें.

८९. **तोंडावर थुंकणें**—निर्भर्त्सना करणें; तुच्छ करणें; छीथू करणें. उ० म्हाताऱ्या आईला तूं लोकांच्या घरीं स्वयंपाकीबाईप्रमाणें राहण्याची वेळ आणलीस, तर लोक तुझ्या तोंडावर थुंकतील !

९०. **तोंडावर पदर येणें**--वैधव्यदशा येणें; उ० तिच्या तोंडावर पदर आला. उ० तूं स्वतांच कां नाहींस त्याला जाऊन भेटत ? तुझ्या तोंडावर पदर आला आहे कीं काय ? ( म्ह० तुला लाजावयाचें, किं० भ्यावयाचें, काय कारण आहे ? )

९१. **तोंडावर मारणें**—फजीती उडवणें; पराभव करणें.

९२. **तोंडावरून हात फिरविणें**—फसविणें.

९३. **तोंडास तोंड देणें**--आपला हलका दर्जा विसरून जाऊन एकाद्याशीं बरोबरीच्या नात्यानें बोलणें; शेफारटपणानें बोलणें. [ ह्याच अर्थानें " तोंडाशीं तोंड देणें " ह्या शब्दसंहतीचाही उपयोग करतात.]

९४. **तोंडास काजळी लावणें**—बेआबरू करणें; नाचक्की, नापत करणें. [ ह्याच अर्थानें " तोंडाला काळोखी आणणें, किं० लावणें, " असेंही म्हणतात. ] उ० सुनेनें माझ्या तोंडाला काळोखी आणली !

९५. **तोंडास कुत्रें बांधणें**--ताळतंत्र सोडून बोलणें; अद्वातद्वा बोलणें; शिव्या देणें; उ० त्यानें तर जसें तोंडाला कुत्रेंच बांधलें आहे !

९६. **तोंडास खीळ घालणें**--बोलणें बंद करणें; अगदीं न बोलण्याचा निश्चय करणें.

९७. **तोंडास येईल तें बोलणें**--आपलें बोलणें योग्य आहे कीं अयोग्य आहे, शाहाण्यासारखें आहे कीं मूर्खासारखें आहे, याचा विचार न करितां बोलणें; उ० त्याला चिडवूं नका, कारण तो चिडला म्हणजे तोंडास येईल तें बोलतो !

९८. **तोंडास बसणें**, किं० **तोंडीं बसणें**, किं० **तोंडाला लागणें**–स्पष्ट, बिनचुक, भरभर, म्हणतां येणें; उ० तो श्लोक दहा वेळां पुस्तकांत पाहून म्हण, म्हणजे तो तुझ्या तोंडाला लागेल.

९९. **एकाद्याच्या तोंडास लागणें**, किं० **तोंडीं लागणें**--त्याच्याबरोबर वादविवाद करणें; उ० तूं पराचा कावळा करण्यांत पटाईत आहेस ! तुझ्या तोंडाला कोणीं लागावें ?

१००. **तोंडासारखें बोलणें**--खुशामतीपणानें बोलणें; स्तुति करण्याकरतां बोलणें; उ० मी तुमच्या तोंडासारखें बोलतों आहे, असें समजूं नका ! मी खरें सांगतों, कीं तुमचें कालचें व्याख्यान अत्यंत उत्कृष्ट झालें !

१०१. **तोंडीं आणणें**, किं० **देणें**--रोग्याला पारा वगैरे देऊन त्याच्या तोंडांतून लाळेच्या रूपानें रोग बाहेर काढणें.

१०२. **तोंडीं घास येणें**--नोकरी वगैरेंच्यायोगें चरितार्थाचीं साधनें प्राप्त होणें.

१०३. **तोंडीं तृण धरणें**--शरण आलों असें कबूल करणें; मी आपला आज्ञांकित सेवक आहें असें म्हणणें. [ "दांतीं तृण धरणें," असाही प्रयोग करतात. ]

१०४. **तोंडीं देणें**--दहांच्या वतीनें मागणी, किं० विनंति करावयास, वरिष्ठाच्या पुढें त्यांच्यापैकीं एकाला उभें करणें; उ० मला तोंडीं देऊं नका; वरिष्ठाचे पुढें मी उभा राहिलों, कीं माझे पाय लटलटा कांपतात. दुसऱ्या कोणाला तरी पुढें करा.

१०५. **तोंडीं येणें**—अगदीं परिपक्व स्थितीस येऊन उपभोगक्षम होणें.

१०६. **तोंडीं येऊन बुडणें, किं० नासणें**—एकादी वस्तु अगदीं परिपक्व दशेला येऊन ती आपण उपभोगणार, इतक्यांत ती नाहींशी होणें; उ० माझीं शेतें यंदा काय सुंदर पिकलीं होतीं ? पण उपयोग काय ? वरचें धरण फुटलें, आणि तीं तोंडीं येऊन बुडालीं !

१०७. **तोंडीं लागणें.**—

(क) रोखठोक जबाब देणें. उ० तो माझ्या तोंडीं लागला; ( म्ह० मला रोखठोक जबाब देऊं लागला, किं० माझ्याशीं उद्धटपणें बोलूं लागला. )

(ख) युद्धाच्या, किं० मारामारीच्या, आघाडीस असणें; उ० त्या मारामारीच्या तोंडीं लागूं नको ! दूर उभा राहून पहा ! ( म्ह० फार पुढें जाऊं नको ).

(ग) आवडूं लागणें; उ० त्याच्या तोंडीं आंबेमोहोराचा भात लागला. त्याला आतां कमोद आवडणार नाहीं.

१०८. **तोंडीं लावणें**—

(क) विसारादाखल पैसे देणें. उ० गाडीवाला म्हणाला, "धनीसाहेब, आम्हाला तोंडीं लावायला आठ बारा आणे कांहीं तरी द्या !"

(ख) रुचि पालटविणें; उ० आज तोंडीं लावायला भाजीविजी कांहीं केली नाहींस काय ?

१०९. **तोंडें मागितली किंमत**—दुकानदारानें सांगितलेली किंमत; ग्याच्या उलट, गिऱ्हाईकानें ओढाताण करून उतरविलेली किंमत. उ० लुगड्याला तुम्हीं तोंडें मागितली किंमत मीं दिली; मग मला जुन्या घडीचें लुगडें कां दिलें ?

११०. **एकाद्याच्या पुढें तोंडें वांकडीं करणें**—त्याला वेडावणें, किं० टिवल्याबावल्या दाखविणें.

१११. **लहान तोंडीं मोठा घास घेणें**—आपला लहान दर्जा न ओळखतां एकादी गोष्ट करणें; आपल्याच्यानें होण्याजोगें नाहीं असें काम करावयास सिद्ध होणें.

११२. **एकाद्याच्या तोंडाला हात लावणें**--त्याचें मूर्खपणाचें भाषण बंद करणें; उ० तुझ्या तोंडाला कोणीं हात लावावा? ( म्ह० तुझें हें अविचारीपणाचें बोलणें कोणाला थांबवितां येईल ? )

११३. **तुझ्या तोंडांत साखर पडो !**--आनंददायक खबर सांगितल्याबद्दल तुझें तोंड गोड होओ ! शाबास ! !

११४. **त्याच्या तोंडावरची माशी उडत नाहीं**--तो बावळट आहे !

११५. **तोंड पाहणें**--बोलणाराचें भाषण नुसतें ऐकणें, पण त्याणें सांगितलेलें काम करावयास, किं० केलेला बोध अनुसरावयास, प्रवृत्त न होतां स्वस्थ बसून राहणें. उ०–

म्हणतो, " हाणा, मारा, पाडा, घ्या, काय पाहतां तोंडा ! ।
कोंडा, प्राणव्यसनीं बाळ बुडे, कर्दमीं जसा धोंडा ! ॥

मोरो०

## ४१. दंड.

१. (क) खांद्यापासून कोपरापर्यंत बाहूचा, किं० भुजाचा, भाग.

(ख) काठी, सोटा.

(ग) शिक्षा, शासन, सजा. उ० जो कोणी पातक करील त्याला देव दंड करीलच करील !

(घ) सरकारी न्यायपद्धतीनें एकाद्यावर गुन्हा शाबीत झाला म्हणजे सरकारांत जो पैसा भरावा लागतो तो; एकाद्या अपराधाबद्दल शिक्षा म्हणून जे पैसे द्यावे लागतात ते; एकाद्या इसमानें एकाद्या संस्थेचे नियम मोडल्याबद्दल त्याच्याकडून ती संस्था जे पैसे घेते ते.

(ङ) दोन शेतांच्या, किं० एका शेताच्या दोन भागांच्या, दरम्यान मर्यादा म्हणून केलेला गडगा, किं० बांध.

(च) बांधावरून नेलेला पाण्याचा पाट.

(छ) चिरगुटाचे दोन तुकडे जोडावयासाठीं घातलेली एक प्रकारची शिवण.

(ज) लांबी दाखविणारें एक विशिष्ट माप.

(झ) चोवीस मिनिटांचा काल.

(ञ) तालमींतील व्यायामाचा एक विशिष्ट प्रकार.

(ट) डोंगरावरून जाणारी अरुंद वाट. [ हिला "दंडवाट" म्हणण्याचा अधिक प्रचार आहे. ]

(ठ) डोंगराच्या माथ्यापासून तों पायथ्यापर्यंत वांकडीतिकडी गेलेली खडकांची उंच ओळ.

(ड) मोठ्या डोंगराला लागून असलेली लहान टेकडी.

(ढ) कवाइत, लढाई, वगैरे प्रसंगीं केलेली शिपायांची एक प्रकारची रचना.

२. **दंडाला काढण्या लावणें**, किं० **बांधणें**—कैद्याच्या दंडाला दोऱ्या बांधणें; ( त्याला पकडून नेत असतां. )

३. **दंड थोपटणें**—एका हाताचा दंड दुसऱ्या हातानें ठोकणें; ( कुस्तीला उभें राहतांना. )

४. **दंड थोपटून उभें राहणें**, किं० **ठाकणें**--

(क) वरच्याप्रमाणेंच अर्थ.

(ख) वाग्युद्धास तयार होणें.

५. **दंडाला माती लावणें**—कुस्ती खेळावयाचे वेळीं दंडाला माती लावून कुस्तीला तयार होणें. उ० मी तर केव्हांच दंडाला माती लावून उभा आहें! तुझ्याचकडून उशीर होतो! चल, ये आतां कुस्तीला!

६. **दंड धरून आणणें**, किं० **दंड खेचून आणणें**--एकाद्याची यावयाची इच्छा नसतां त्याला जबरदस्तीनें आणणें.

७. **दंड फुरफुरणें**--मारामारीची, कुस्तीची, वगैरे उत्कट इच्छा होऊन दंड स्फुरण पावणें.

८. **दंड भरणें**--

(क) तालीम वगैरेंच्या योगानें दंड बळकट व जाडी होणें; उ० तुम्ही रोज जोडी करून दुधाचा खुराक चालवा, म्हणजे तुमचे दंड भरतील. ( येथें "भरणें" हें अकर्मक क्रियापद आहे. )

(ख) शिक्षेदाखल पैसा देणें. उ० त्या साक्षिदारानें माझ्याविरुद्ध साक्षी दिली म्हणून मला ३०० रुपये दंड भरावा लागला. (येथें "भरणें" हें सकर्मक क्रियापद.)

९. **दंड दरदरून फुगणें**--आपल्याशीं कुस्तीला योग्य असा गडी पाहिला म्हणजे पहिलवानाचे दंड स्फुरण पावून फुगणें.

१०. **दंडास दंड लावून**, क्रिं० **घासून**---बरोबरीच्या नात्यानें; सारख्या संमानानें.

## ४२. दाढ.

१. (क) चावण्याच्या क्रियेला जरूर असे जे मुखांत मागच्या दोन्ही बाजूंस दांत असतात ते प्रत्येक.

(ख) जबडा.

(ग) बीजें पेरावयाचे अगोदर भाजलेली जमीन.

(घ) शेताच्या जमीनीवर जाळण्यासाठीं पानपातेरा, वगैरेंचा थर करतात तो.

(ङ) ज्या शेतांत भात पेरून मग भाताचीं रोपें उगवल्यावर तीं तेथून उपटून दुसरीकडे लावतात तें शेत.

२. **एकाद्याची दाढ बांधणें**--

(क) कांहीं मंत्राच्या योगानें अन्न वगैरे खाण्याची त्याची शक्ति नाहींशी करणें. उ० माझें लेंकरू आलीकडे जेवीनासें झालें आहे; जखिणीनें त्याची दाढ बांधली ह्यांत शंका नाहीं!

(ख) एकाद्याची बोलण्याची शक्ति नाहींशी करणें.

३. **एकाद्याची दाढसुद्धां न माखणें**---त्याच्या एका दाढेला देखील अन्न न पुरणें.

४. **एकाद्याच्या दाढेंत सांपडणें**---त्याच्या तावडींत जाणें.

## ४३. दाढी.

१. तोंडावर, विशेषतः हनुवटीवर, उगवलेले, किंवा उगवणारे, केश. उ० मी नुसती दाढी करविली (म्ह० तोंडावरचे केश मात्र न्हाव्याकडून

तासविले, ) डोक्यावरचे केश तसेच राहूं दिले. उ० " मिया मूठभर, दाढी हातभर. "

२. **घडी घडी लांब दाढी करणें,** किं० **मांडणें**—हरघडीला रागावणें, चरफडणें.

३. **दाढी करविणें**—तोंडावरील केश न्हाव्याकडून तासविणें.

४. **एकाद्याची दाढीहोटी करणें,** किं० **दाढी धरणें**—त्याची विनवणी करणें; काकळुतीनें त्याची प्रार्थना करणें.

५. **एकाद्याची दाढी धरून टाचा,** किं० **पाय, तुडविणें**—त्याला खुशामतीनें वश करणें; खुशामत करून त्याला फसविणें; मैत्रीचा आविर्भाव करून त्याचा घात करणें.

६. **दाढी पाहून वाढणें**—एकाद्याच्या बाह्यस्वरूपाकडे, किं० पोशाखाकडे, पाहून त्याचे मानपान, किं० आदरातिथ्य, करणें.

७. **एकाद्याच्या दाढीस कांदे बांधणें**—त्याची फजीती करणें.

८. **एकाद्याची दाढी हालविणें**—त्याच्यावर ताशेरा झाडावयास सरसावणें.

## ४४. दांत.

१. ( क ) चर्वणक्रियेच्या उपयोगीं पडणारे जे अस्थिविशेष ते प्रत्येक.
( ख ) फणीचा, करवतीचा, चक्राचा, नांगराचा, डंगाचा, वगैरे दांत.

२. **त्याचा माझ्यावर दांत आहे**—रोष आहे.

३. **दांत उठणें**—दातांनीं धरलेल्या पदार्थावर दातांचीं चिन्हें, ( म्ह० खळग्या ) उठणें. उ० हे पहा मांजराचे दांत माझ्या पोटरीवर उठले आहेत !

४. **दांत काढणें,** किं० **दाखविणें**—आपले दांत दुसऱ्याच्यापुढें विचकणें; उ० माकडानें दांत काढलेले पाहून मुलांना भीति वाटते. उ० त्या म्हाताऱ्याच्या पुढें हीं टारगीं पोरें दांत दाखवीत होतीं !

५. **दांत खाऊन,** किं० **दांत ओंठ खाऊन**—मोठ्या रागानें आणि अवमानानें; उ०—

नरवर गरधरखरतर शर करकर दांत खाउनी सोडी ।
फोडी कवच उरःस्थळ, वाटे तो वात त्या द्रुमा झोडी ॥
मोरो० शल्यपर्व.

६. **दांत खाऊन, किं० चावून, अवलक्षण करणें**—दांतओठ खाऊन नुसता राग दाखविणें; ( यथायोग्य पारिपत्य करावयाचें सामर्थ्य नसल्याकारणानें. )

७. **दांत खाणें, किं० चावणें**—दांतावर दांत घासणें ( झोपेंत वगैरे ). उ० त्याला झोपेंत दांत खाण्याची खोडी आहे.

८. **दांत खोंचरणें**—दांतांच्या फटींत, खळग्यांत, काडी घालून मळ वगैरे काढणें.

९. **एकाद्याचे दांत त्याच्याच घशांत घालणें**—त्याची लबाडी बाहेर काढून त्याच्या पदरांत माप घालून त्याची फजीती करणें.

१०. **दांत झिजणें**—निष्फळ उपदेश करून तोंडाला मेहेनत होणें; केलेली विनंति फुकट गेल्यामुळें तोंडाला व्यर्थ श्रम होणें; शिकविलेला विषय मूर्ख विद्यार्थ्याला न समजल्यामुळें तोंडाचे श्रम फुकट जाणें.

११. **एकाद्यावर दांत असणें**—त्याच्याविषयीं मनांत द्वेष, वैर, शत्रुत्व, असणें; उ० मी गोविंदरावांच्या उलट साक्ष दिल्यापासून त्यांचा मजवर दांत आहे.

१२. **एकाद्यावर दांत धरणें**—त्याच्याविषयीं मनांत शत्रुत्व बाळगणें; उ० मी त्या गार्डाविरुद्ध जनरल् ट्राफिक् म्यानेजर्‌कडे तक्रार केल्या-दिवसापासून त्या गार्डानें मजवर दांत धरला आहे !

१३. **एकाद्याचे दांत पडणें**—त्याची फजीती होणें.

१४. **एकाद्याचे दांत पाडणें**—त्याची फजीती करणें.

१५. **दांत पाजविणें**—एकादी वस्तु, ( विशेषतः खाण्याची वस्तु, ) मिळण्याजोगी नसतां तिच्याबद्दल उत्कंठित असणें.

१६. **एकाद्याचे दांत पाडून हातावर देईन असें म्हणणें**—तुझी कंबख्ती, किं० पारिपत्य करीन, अशी त्याला धमकी देणें.

१७. **दांत वठणें**--उच्चारलेला शाप फलद्रूप होणें.

१८. **दांत वासणें**--केलेले श्रम फुकट गेल्यामुळें खिन्न होऊन बसणें.

१९. **दांत घासून पडणें**--

(क) मेहेनत फुकट गेल्यामुळें हिरमुष्टें होऊन बसणें.

(ख) आजारानें अशक्त होऊन आंथरुणास खिळून जाणें.

२०. **एकाद्याचेपुढें दांत विचकणें**--

(क) त्याला वेडावणें.

(ख) नादान मनुष्याजवळ याचना करणें. उ० पूर्वी एकदा मी त्याच्याजवळ पैसे उसने मागितले होते. त्याच्याजवळ तेव्हां पैसे असून नाहींत असें त्याणें मला खोटेंच सांगितलें. आतां पुन्हा मी त्याच्यापुढें पैशासाठीं दांत विचकणार नाहीं!

२१. **दांतओठ खाणें, किं० चावणें**--रागानें दांतांवर दांत घासणें, किं० रागामुळें आपले ओठ दांतांनीं चावणें.

२२. **एकाद्याला दांताखालीं धरणें, किं० घालणें**--त्याचेवर करडा अंमल चालविणें.

२३. **एकाद्याच्या दांताचें विष बाधणें**--एकाद्याचे शापोद्गार फलद्रूप होणें.

२४. **दांतांच्या कण्या करणें**--एकसारखा उपदेश करीत राहणें; [उपदेश फुकट गेला म्हणजे योजतात.]

२५. **त्याच्या दांतांच्या चुगऱ्या झाल्या आहेत**--

(क) त्याचे दांत हालूं लागले आहेत, किं० खिळखिळे झाले आहेत.

(ख) उपदेश, विनवणी, वगैरे करून करून त्यानें आपल्या दांतास फार शीण दिला आहे.

२६. **त्याच्या दांतांवर मांस नाहीं**--तो दरिद्री आहे; तो असमर्थ, दुर्बल आहे; उ० त्याच्या दांतावर नाहीं मांस, आणि मोठ्याशीं घालीत असतो गांठ!

२७. **दांतीं येणें, किं० दांतांवर येणें**--एकाद्या कामांत, किं० व्यापारांत, अपयश, किं० नुकसानी, येणें.

२८. **दांतास दांत लावून बसणें, निजणें,** किं॰ **असणें**––उपाशी पोटीं बसणें, निजणें, किं॰ असणें.

५९. **दांतां ओठांवर जेवणें**––चोखंदळेपणानें जेवणें.

३०. **दांतीं तृण धरणें**––नम्रपणा स्वीकारणें.

३१. **दांतीं वळ धरणें**––अतोनात मेहेनत करणें.

३२. **दांतीं येणें**––रागावणें; अडचणींत, पेंचांत, सांपडणें.

३३. **सोन्यानें दांत किसणें**––श्रीमंतीचा उपभोग घेणें; श्रीमंत असणें.

३४. **हसतां हसतां एकाद्याचे दांत पाडणें**––राग न दाखवितां, न चरफडतां, त्याची फजीती उडविणें, किं॰ पराभव करणें.

## ४५. नख.

१. (क) मानवी हाताच्या, किं॰ पायाच्या, बोटांच्या टोकाला शिंगाच्या जातीचें जें पातळ चकचकीत कवच असतें तें.

(ख) पक्ष्याचा, किं॰ पशूचा, पंजा.

(ग) खवल्या मांजराच्या अंगावरचा एक एक खवला.

(घ) नखानें येईल, किं॰ नखावर राहील, इतकें. उ॰ औषधाचें नख; चुन्याचें नख; कुंकवाचें नख.

२. **जेथें नख नको तेथें कुऱ्हाड लावणें**––नखानें होण्याजोग्या कामीं कुऱ्हाडीचा उपयोग करणें; थोडक्या श्रमानें, किं॰ मृदुपणानें, जें कार्य होण्याजोगें आहे, त्याच्यासाठीं पुष्कळ शक्ति खर्च करणें, किं॰ फार कठोरपणा करणें. याच अर्थाचें मोरोपंताचें पुढील आर्यार्ध पहाः––

नखहि नको ज्या कार्या, त्या काढावा कशास करवाल ? ॥

३. **नख दृष्टीस न पडणें**––मुळींच न दिसणें; पडद्याच्या आंत राहाणें; अतिमर्यादशीलपणानें राहाणें; उ॰ ती मराठमोळ्यांतली स्त्री आहे, तिचें नख तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं !

४. **नख नख बोलणें**––ऐटीनें, किं॰ कुर्रेबाजीनें, बोलणें.

५. **नख शिरणें**––थोडासा शिरकाव होणें.

६. **नखाएवढा**––अगदीं थोडा.

७. **नखा वोटावर काम करणें**--नाजुकपणाचा आविर्भाव, किं० दिमाख, करून काम करणें.

८. **एकाद्याला नखावर खेळविणें, किं० चालविणें**—त्याची करमणूक करावयास झटणें

९. **नखावर चालणें**—नाजुकपणाची ऐट करून चालणें.

१०. **नखावर जेवणें**--चोखंदळेपणानें जेवणें; आपणाला भलतेंसलतें चालत नाहीं, अशा रीतीनें जेवणें.

११. **नखावर दिवस मोजणें**—उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करणें.

१२. **नखाला आग लागली**—संकटांस नुसती सुरवात झाली आहे; अजून पुष्कळ संकटें यावयाचीं आहेत.

१३. **नखें चावीत, कुरतुडीत, किं० वाजवीत, बसणें**—निरुद्योगी असणें; उद्योगधंदा न करतां राहाणें. हिरमुष्टें होऊन बसणें.

### ४६ नाक.

१. (क) घ्राणेंद्रिय; नासा, किं० नासिका.

(ख) बटाटा, आलें, धान्याचा दाणा, वगैरेंना ज्या ठिकाणीं मोड फुटतो किं० नवा अंकुर उत्पन्न होतो, तें ठिकाण.

(ग) सुईच्या माथ्याजवळचें छिद्र, ज्यांत दोरा ओवितात तें.

(घ) एकाद्या देशाचा, किं० गांवाचा, किं० संस्थेचा, अग्रगण्य माणूस, किं० पुढारी. उ० रामपाटील आमच्या गांवाचें नाक आहेत.

(ङ) एकाद्या देशाचा महत्त्वाचा किल्ला, किं० शहर, किं० स्थल; उ० मुंबई शहर हें हिंदुस्तानचें नाक आहे.

(च) नथ नाकांत घालण्यासाठीं पाडलेलें छिद्र; उ० गोदीला इतकी जड नथ घालावयास देऊं नका. तिचें नाक ओघळत चाललें आहे पहा!

(छ) आबरू; उ० माझें नाक गेलें, ( किं० गमावलें ) खरें, हें माझें मीच कबूल करतों!

(ज) "नायक" शब्दाचा अपभ्रंश; महारांच्या नांवापुढें बहुमानार्थी लावावयाचा शब्द. उ० रामनाक, भागनाक, इ०.

२. **कोणत्या नाकानें ?**—कोणच्या तोंडानें ? कसा ? उ० तें काम मी करीन म्हणून प्रतिज्ञा भोगिली होती. पण तें काम दुर्दैवानें फिसकटलें, आतां मी श्रीधरपंतांकडे कोणत्या नाकानें जाऊं ?

३. **आपलें नाक कापून दुसऱ्यास अवलक्षण करणें**—आपलें नाक कापून काढून त्याचेपुढें जाऊन त्याला अपशकुन करणें; दुसऱ्याचें नुकसान व्हावें, म्हणून आपलें कांहीं तरी नुकसान करून घेणें. [ विननाकाचा मनुष्य पुढें आला असतां अपशकुन होतो, अशी आपली समजूत आहे. ]

४. **उंच नाक करून**—निर्लज्जपणानें; बेशरमपणानें.

५. **एकाद्या स्त्रीचें नाक ओरबाडणें**—कठोर, निर्दय, हातानें तिच्या नाकांतील नथ वगैरे काढून घेणें.

६. **एकाद्याचें नाक कापणें**—त्याचा रेच उतरणें; त्याचा गर्व हरण करणें; त्याचा नक्षा उतरणें.

७. **एकाद्याचें नाक खालीं पडणें**, किं० **होणें**—त्याचा गर्व नाहींसा होणें.

८. **एकाद्याचें नाक खालीं करणें**, किं० **पाडणें**—त्याचा गर्व नाहींसा करणें.

९. **नाक गुंडाळणें**—आपला कमीपणा, पराभव, वगैरे कबूल करणें.

१०. **एकाद्याचे पुढें नाक घासणें**—त्याच्या पायीं नम्र होणें; त्याची क्षमा मागणें; दासाला योग्य असा नम्रपणा त्याचे पुढें स्वीकारणें.

११. **नाक जळणें**—नाकाला दुर्गंधी असह्य होणें.

१२. **नाक तोंड मुरडणें**, किं० **नाकें तोंडें मुरडणें**—नापसंती दर्शविणें.

१३. **नाक चेंचणें**—फजीती करणें; पारिपत्य करणें.

१४. **नाक मुरडणें**—नापसंती दाखविणें.

> खुशामत करावया मजकडे न येती जन,
> पर्थी मजासि देखतां न करिती मला वंदन ।

मला म्हणुनि मूर्ख ते मुरडितात नाकें अहा !
सरोनि अधिकार मी अहह ! दीन झालों पहा ! ॥

१५. **त्यानें (आपलें) नाक तोडून कडोसरीस खोवलें आहे**--तो भारी निर्लज्ज झाला आहे.

१६. **एकाद्याचें नाक धरणें**—त्याचा खोळंबा करणें.

१७. **(आपलें) नाक धरणें**, किं० **धरून बसणें**--धार्मिक कृत्यांत वेळ घालविणें; कर्तव्य न करतां वेळ गमावीत बसणें.

१८ **नाक**, किं० **नाकपुड्या फेंदारणें**, किं० **पिंजारणें**—नाक फुगवून राग दाखविणें.

१९. **नाक फेडणें**—नाक शिंकरणें.

२०. **नाक मोडणें**--नाक वांकडेंतिकडें करून नापसंती दर्शविणें.

२१. **एकाद्याचें नाक मोडणें**--त्याची फजीती उडविणें; त्याचा रेंच उतरणें.

२२. **नाक वर करून**—
(क) ताठ्यानें, गर्वानें, तिरस्कारानें.
(ख) निर्लज्जपणानें; उ० तुझ्या पदरांत मीं चुकी घातली, तरी पुन्हा नाक वर करून बोलतोस ? तुला म्हणावें तरी काय ?

२३. **एकाद्याच्या नाकांत काड्या घालणें**, किं० **सारणें**--त्याला खिजावणें; त्याची कुरापत काढणें; त्याला चेतविणें; त्याला राग आणणें.उ०

हरिच्या पुन्हा पुन्हा कां काड्या नाकांत घालिशी शशका ? ।
यश काय पक्षिपतिचें येइल हे चार करुनि तुज मशका ? ॥

मोरोपंत.

२४. **नाकांत बोलणें**--गेंगाण्या स्वरानें बोलणें.

२५. **नाकानें कांदे**, किं० **वांगीं, सोलणें**--नसता शुचिर्भूतपणा, पवित्रपणा, दाखविणें; नसता अभिमान दाखविणें; बढाया मारणें.

२६. **नाकाला झिमोटा घालणें**—तिरस्कार करणें.

२७. **एकाद्याच्या नाकावर लिंबू वासणें**, किं० **पिळणें**--त्याच्या हरकती न जुमानतां आपलें कार्य साधणें; त्याचा पराभव करणें.

२८. **एकाद्याच्या नाकावर पाय देणें**—त्याची पर्वा न करणें.

**टीप**—" नाकावर वाट करणें, " याचाही वरील अर्थानें उपयोग होतो.

२९. **नाकावर माशी बसूं न देणें**--अपमान, किं० तिरस्कार, अगदीं सहन न करणें.

३०. **त्याच्या नाकीं, ( किं० नाकाशीं ), सूत धरलें आहे**—तो आतां मरतो कीं घटकेनें मरतो, अशी त्याची स्थिति झाली आहे.

**टीप**--मरणोन्मुख मनुष्याचा श्वासोच्छ्वास चालतो आहे किंवा नाहीं, हें पहाण्यासाठीं त्याच्या नाकाशीं सूत धरतात; तें हललें नाहीं, तर तो मेला असें समजतें. ]

३१. **एकाद्याच्या नाकास चुना लावणें**--त्याची खजाली काढणें; त्याच्यापुढे धमकीनें भांडावयास सिद्ध होणें.

३२. **एकाद्याच्या नाकास पदर येणें**--त्याची बेआबरू होणें. त्याला लाज वाटणें.

३३. **नाकासमोर जाणें**--अगदीं सरळ मार्गानें जाणें.

३४. **नाकीं दुराही काढणें**--अतिनम्रपणानें विनविणें. शरण जाणें. [ " नाकदुऱ्या काढणें, " असाही प्रयोग आहे. ] उ० सुनेच्या बापाकडून जेव्हां नाकदुराद्या काढविल्या, तेव्हां तिला माहेरीं पाठविलें ! नाहीं तर तिला दोन वर्षें बापाचें घर अगदीं वर्ज्य होतें !

३५. **एकाद्याच्या नाकीं वेसण घालणें**--त्याला आपल्या कबज्यांत आणणें, किं० कह्यांत ठेवणें.

३६. **नकट्यापुढें नाक खाजविणें**—त्याला खिजाविणें.

३७. **नाक मुठींत धरून**--निरुपायास्तव; नाइलाजानें.

३८. **नाक गेलें तरी भोंकें राहिलीं आहेत असें म्हणणें**--निर्लज्जपणानें बोलणें, किं० वागणें.

३९. **एकाद्याचें नाक झाडणें**--त्याचा रेच उतरणें; त्याची फजीती करणें; त्याचें पारिपत्य करणें.

४०. **( आपलें ) नाक झाडणें**--

(क) नाक शिंकरणें.

(ख) नाकांतून जोरानें वारा बाहेर घालविणें (घोडे वगैरे प्राणी करतात तसे).

(ग) तिरस्कार दाखविणें; उ० मीं गणपतीची मूर्ति केली, तिला सर्व लोकांनीं नाकें झाडलीं !

४१. **नाक वर असणें**--वरचढ असणें.

४२. **नाकाची घ्राण मरणें,** किं० **जाणें**--वाईट वासानें त्रास होईनासा होणें (संवईमुळें, पडशामुळें, किं० अन्य कारणानें).

४३. **एकाद्याच्या नाकांत काड्या जाणें**--त्याला एकादी गोष्ट न आवडल्यामुळें तो रागावणें; उ० त्यानें गोविंदरावाशीं स्नेह केला, तर तुझ्या नाकांत कां काड्या जाव्या ?

४४. **नाका-तोंडाची गुंजडी करणें**—नाक-तोंड वांकडेंतिकडें करून राग, किं० नापसंती, दाखविणें.

४५. **नाकापेक्षां मोतीं जड होणें**—

(क) यजमानापेक्षां नोकराची मिजास, किं० मानमान्यता, अधिक होणें.

(ख) एकाद्याच्या अंगाचा खरा गुण लोकांच्या अपेक्षेहून कमी आहे, असें निदर्शनास येणें. (मोल्स्वर्थ.)

४६. **नाकाला जीभ लावणें**—तिरस्कार दाखविणें. गर्व, किं० ताठा, किं० दिमाख, दाखविणें.

४७. **नाकाला पदर लावणें**—अपकीर्तीमुळें तोंड झांकणें; लज्जेनें तोंड झाकणें.

४८. **एकाद्याच्या नाकावर रुपये (पैसे वगैरे) टिचणें**—ते देण्याला आपण नाखूष असलों तरी ते त्याला देणें. नाइलाजास्तव ते त्याला देणें.

४९. **नाकावर बोट ठेवणें**--एकाद्याला चूप रहा म्हणून आपल्या नाकावर आपलें बोट ठेवून खूण करणें. [रागानें किं० अन्य कांहीं

कारणानें.]

५०. **एकाद्या स्त्रीच्या नाकावर पदर येणें**—तिला वैधव्य येणें.

५१. **एकाद्याच्या नाकावर पदर येणें**--लज्जेनें तोंड झांकून राहण्याची स्थिति त्याला येणें.

५२. **नाका-ओठावर जेवणें**—चोखंदळेपणानें जेवणें.

५३. **एकाद्याच्या नाकीं नऊ, किं० नव, येणें**--कांहीं काम करतांना त्याला अतित्रास, श्रम, उपद्रव, दुःख, होणें.

५४. **त्याच्या नाकावर राग आहे**--तो जरा कांहीं कारण सांपडलें, कीं रागावत असतो.

५५. **एकाद्याच्या नाकांतला बाल**—त्याच्या आवडीचा, किं० प्रेमाचा, माणूस. उ० आलीकडे नारोबा हा शिवरामपंताच्या नाकांतला बाल झाला आहे !

५६. **नाका-डोळ्याचा, किं० नाका-कानाचा, वैद्य**--वैद्यविद्येंत वाकबगार नसलेला व वृथा वडवड करणारा वैद्य.

५७. **नाकाचा पडदा**--दोन नाकपुड्यांच्या मधला पडदा.

५८. **एकाद्याचें नाक ठेचणें,**—त्याची फजीती करणें.

## ४७. पाऊल.

१. (क) पायाच्या घोट्याखालचा भाग; उ० फार फार चालून माझीं पावलें लटकीं पडूं लागलीं.

(ख) पायाच्या घोट्याखालच्या भागाची ठेवण, ढब, किं० आकारमान. उ० माझ्या पावलाला बरोबर असा जोडा बांधून आण.

(ग) पायाचा तळवा. उ०

ऐशिया दुःखें चालतां पंथीं । सुकुमार पाउलें पोळतीं ॥
फोड उठोनि उले कांती । नखें निघतीं बोटींचीं ॥

मुक्तेश्वर—हरिश्चंद्र.

(घ) पायाच्या तळव्याचा जमीनीवर उठलेला ठसा, किं० आकृति. उ० पावलें निरखून मीं चोर हुडकून काढले.

(ङ) चालण्याचा वेग. उ० रामाचें पाऊल गोदीच्यापेक्षां सावकाश आहे.

(च) पायाच्या लांबीइतकी लांबी. उ० सगळ्यांचीं पावलें हत्तीच्या पावलांत.

(छ) चालण्याची तऱ्हा, किं० ढब; विशिष्ट प्रकारची चाल. उ० आमच्या तट्टाला तुर्की पाऊल चांगलें साधलें.

(ज) चालतांना जमीनीवरील दोन पावलांमधील अंतर. उ० ह्या खोलीची लांबी १५ पावलें, आणि रुंदी ११ पावलें, आहे.

२. **चांगल्या, किं० वाईट, मार्गांत पाऊल ठेवणें**—चांगल्या, किं० वाईट प्रकारें, वागणें. उ०

भोगील दुःख भारी ठेवील असत्पथांत पाउल तो ।
अवलोकुनि त्याच्या त्या दुःखाची तीव्रता उपल उलतो ॥

३. **पाऊल ओळखणें, जाणणें, समजणें**--एकाद्याचा कल, किं० स्वभाव, जाणणें.

४. **पाऊल जपून टेवणें**--काळजीनें वागणें.

५. **पाऊल पुढें ठेवणें**—एकादें काम पथकरावयाला सिद्ध होणें.

६. **पाऊल पुढें पडणें**—एकाद्या कृत्यांत गति होणें; पुढें जाणें. उ० वांटण्यासंबंधानें तुम्हीं तीन तास आतांपर्यंत वाटाघाट केली; पण कालच्यापेक्षां आज वांटण्यांच्या बाबतींत तुमचें पाऊल कांहीं तरी पुढें पडलें काय ?

७. **पाऊल माघारें घेणें, किं० काढणें**--माघार घेणें; मागें हटणें. उ० प्राण गेला तरी मी पाऊल माघारें घेणार नाहीं !

८. **पाउलें मोजीत चालणें**-सावकाश चालणें. उ० असा काय पावलें मोजीत चालला आहेस ? झपझप चाल !

९. **पाऊल वांकडें पडणें, किं० वांकड्या मार्गानें पाऊल पडणें**-सत्पथ, नीतिमार्ग, सुटून असत्पथानें, अनीतिमार्गानें, जाणें; उ० माझें कोठें वांकडें पाऊल पडलें तें दाखवून द्या, आणि मग बेलाशक माझा कान उपटा !

१०. **एकाद्याच्या पावलावर पाय ठेवून जाणें**--त्याचें अनुकरण करणें.

## ४८. पाठ.

१. (क) छातीच्या आणि पोटाच्या मागचा शरीराचा भाग; ( मानेपासून तों कंवरेपर्यंत. )

(ख) कोणत्याही वस्तूची मागली बाजू; उ० आरशाची पाठ; पुस्तकाची पाठ; तसबीरीची पाठ.

(ग) आश्रय, टेका, मदत, साहाय्य; [ अनुरूप क्रियापद ' देणें. ' ]

(घ) पृष्ठभाग, पातळी; उ० पृथ्वीची पाठ; समुद्राची पाठ.

(ङ) बाहेरचें आच्छादन; साल; कवच.

(च) वकऱ्याची पिढी; उ० ह्या वकऱ्याच्या चार पाठी माझ्या हयातींत झाल्या.

२. **पाठीवर मारावें, पण पोटावर मारूं नये**—कोणीं अपराध केला असतां त्याला वेलाशक शिक्षा करावी, परंतु त्याची कायमची नुकसानी होईल, असें कांहीं करूं नये; त्याचीं चरितार्थाचीं साधनें बुडवूं नयेत; उ०—

पाठीवर मारावें परि पोटावर कधीं न मारावें ।
खाया सुफळें मिळतां सुखवि धन्या शुक मनोरमारावें ॥

३. **आपली पाठ आपणास दिसत नाहीं**—एकादी गोष्ट अगदीं आपल्या शेजारीं घडत असते, पण आपणास तिची गंधवार्ता नसते.

४. **पाठचें भावंड**—मागून झालेलें भावंड. उ० रामाच्या पाठचीं तिन्ही भावंडें मेलीं.

५. **पोटचा द्यावा, पण पाठचा देऊं नये**--प्रत्यक्ष आपलें मूलही सोडावें, पण आश्रयास आलेल्या माणसास सोडूं नये. [ येथें " पाठचा" ह्याचा उपयोग " धाकटा भाऊ " ह्या अर्थानेंही करतात. ]

६. **एकाद्याची पाठ उघडी पडणें**--त्याच्या पाठचें भावंड मरणें.

७. **पाठ उचलणें**--सावरणें; पुन्हा वैभवास चढणें; गमावलेली शक्ति, सामर्थ्य, तेज, पुन्हा मिळविणें.

८. **पाठ भुईस लागणें**—चीत होणें; एकाद्या संकटाखालीं दडपून

जाणें; वैभव, सामर्थ्य, गमावणें.

९. **पाठ काढणें**—कुचरपणानें एकादें काम करणें.

१०. **पाठ कांपणें**--पाठ थरथर कांपूं लागणें; उ० कुऱ्हाड हातीं घेऊन आलेल्या त्या भामट्यास पाहातांच माझी पाठ कांपूं लागली !

११. **पाठ घेणें**—

(क) पिच्छा पुरविणें; एकाद्या गोष्टीबद्दल एकाद्यावर ओझें घालून राहाणें; अमुक एक वस्तु मला द्या म्हणून एकाद्यास सतावीत असणें; उ० माझ्या मुलीनें जिनगरी बाहुलीबद्दल आज आठ दिवस माझी पाठ घेतली आहे; ( म्ह० बाहुली घेऊन द्या म्हणून ती मला गळ घालीत आहे. )

(ख) एकाद्याच्या पाठोपाठ जाणें, किं० त्याचा पाठलाग करणें. उ० त्या चोरांनीं दोन कोश आमची पाठ घेतली; (म्ह० ते आमच्या मागोमाग येत होते. )

१२. **पाठ चोरणें**--

(क) कांहीं काम करतांना कुचरपणा करणें.

(ख) आपल्या पाठीवर फार सामान, किं० ओझें, लादलें जाऊं नये, म्हणून तें चुकविण्याचा, किंवा झुगारून देण्याचा, प्रयत्न करणें; ( बैल, घोडा, गाढव, वगैरेंसंबंधानें ).

१३. **त्यानें अमक्याची पाठ झांकली**--तो अमक्याच्या पाठीमागून झाला, किं० जन्मला.

१४. **पाठ टाकणें**--विश्रांतीसाठीं अंग आडवें करणें ( जमीनीवर, किं० बिछान्यावर ). उ० मी अगदीं दमून गेलों होतों, म्हणून जरा वेळ झोंपाळ्यावर पाठ टाकली.

१५. **पाठ थापटणें, किं० थोपटणें**--उत्तेजनार्थ पाठीवर प्रेमानें हात मारणें; वाहवा करणें. उ० मी त्याच्या तर्फेनें भांडलों, म्हणून त्याणें माझी पाठ थोपटली.

१६. **पाठ दाखविणें**--पळून जाणें; कर्तबगारी न दाखवितां भित्रेपणानें

निघून जाणें; उ० ह्या लढाईंत आम्ही मारूं किं० मरूं; शत्रूला पाठ म्हणून दाखविणार नाहीं !

१७. **पाठ देणें**—

(क) एकाद्याला एकाद्या (चांगल्या, किं० वाईट) कामीं मदत करणें; उ० तूं मला पाठ दिलीस, तर हें काम तडीस जाईल !

(ख) एकाद्याची विनंति ऐकिली न ऐकिली, अशा रीतीनें वागणें; उ० त्यानें माझे शब्दाला पाठ दिली.

(ग) एकाद्या वस्तूचा परित्याग करून जाणें.

१८. **पाठ धरणें**—एकाद्याच्या मागून जाऊन त्याला पकडणें; उ० तो चोर निसटून जात होता, पण मीं त्याची पाठ धरली.

१९. **पाठ निघणें**, किं० **रिघणें**—एकाद्याचा आश्रय मिळण्यासाठीं त्याच्या मागून जाणें.

२०. **एकाद्याची पाठ पुरविणें**—त्याला अतोनात गळ घालणें; उ० नखानें कागदावर उठाव वेलबुट्टी काढण्याची कला मला शिकवा, म्हणून आज दोन महिने श्रीनिवासानें माझी पाठ पुरविली आहे.

२१. **पाठ-पोट सारखें होणें**—उपासानें, किं० आजारानें, अत्यंत रोड होणें; उ० पहा त्याची पाठ-पोट सारखी झाली आहे !

२२. **एकाद्याची पाठ फोडून निघणें**—त्याच्या मागून त्याची बहीण, किं० भाऊ, जन्मणें; उ० अंबी माझी पाठ फोडून निघाली; (म्ह० माझी बहीण अंबी माझ्यानंतर जन्मास आली.)

२३. **पाठ भुईस लागणें**—द्रव्याकडून, किं० शक्तीकडून, खालावणें; उ० माझी पाठ अगदीं भुईस लागली आहे; (म्ह० मजजवळ पैसा मुळीं राहिला नाहीं; किं० मी आजारानें अशक्त होऊन गेलों आहें.)

२४. **एकाद्याची पाठ राखणें**—त्याला मदत करणें; उ० ह्या विपत्तींत गंगाधरपंतांनीं माझी पाठ राखली; (म्ह० मला द्रव्यादिकानें मदत केली.)

२५. **पाठ सोडणें**—

(क) एकादा व्यवसाय नेटानें चालविण्याचें सोडून देणें; उ० तुला पहिल्या पहिल्यानें हिंदी भाषा कठिण वाटेल, पण तूं तिची पाठ सोडूं नको; ( म्ह० तुझी मेहनत चालू ठेव. )

(ख) एकाद्याच्या मागोमाग जावयाचा क्रम सोडून देणें; उ० त्या मुलीनें साऱ्या दिवसांत माझी पाठ म्हणून अगदीं सोडली नाहीं; ( म्ह० ती एकसारखी माझ्या पाठीशीं होती. )

२६. **एकाद्याच्या पाठीं**—त्यावर अवलंबून; त्याच्या परिवारांत; त्याच्या आश्रितांत; त्याच्या नंतर, किं० मागोमाग; उ० माझ्या पाठीं, किं० पाठीशीं, चार पोरें आहेत, ( म्ह० त्यांना पोसण्याची जबाबदारी मजवर आहे. ) उ० माझ्या पाठीं नेहमीं चार पट्टेवाले असतात; ( म्ह० माझ्या खिजमतीला; )उ० नानासाहेबांच्या पाठीं कांहीं थोडीं-थोडकीं माणसें नाहींत; वेळेस पंक्तीला पंचवीस पान जेवतें आहे ! ( म्ह० त्यांचे आश्रित पंचवीस आहेत ! ) उ० चोरांनो, मला मुकाट्यानें जाऊं द्या. माझ्या पाठीं दोन मैलांवर दहा वाटसरू आहेत, ( म्ह० ते माझ्या मागोमाग, माझ्याच मार्गानें, येत आहेत. ) उ० माझ्या पाठीं हा सावकारीचा धंदा माझा भाऊसभाऊ पाहाणार आहे; ( म्ह० मी मेल्यावर. )

२७. **पाठीचे चकदे काढणें**—खूप मार देणें; उ० पुन्हा कोणाची कांहीं वस्तु चोरूं नको; चोरलीस तर तुझ्या पाठीचे चकदे काढीन !

२८. **पाठीचे चकदे निघणें**—खूप मार बसणें; उ० असलें कृत्य पुन्हा करशील, तर तुझ्या पाठीचे चकदे निघतील ! याद राखून अस !

२९. **पाठीचें साल जाणें**—नुकसानी सोसावी लागणें; उ० ह्या व्यापारांत माझ्या पाठीचें साल जाण्याचा रंग दिसतो, ( म्ह० मला नुकसानी सोसावी लागेल. )

३०. **पाठीं ना पोटीं**—त्याला धाकटे भावंडही नाहीं, आणि स्वतांची संततिही नाहीं. उ० दुष्काळ आला म्हणून त्याला कसली फिकीर ! त्याच्या पाठीं ना पोटीं !

३१. **पाठीमागें**--

(क) समक्ष नव्हे अशा रीतीनें; उ० ते माझ्या पाठीमागें माझी हवी तितकी निंदा करोत ! माझ्या समक्ष बोलण्याची त्यांची छाती नाहीं !

(ख) मेल्यानंतर.

३२. **पाठीमागें ठेवणें**--मेल्यावर मागें ठेवणें. (पैसा, किं० माणसें;) उ० त्या म्हाताऱ्यानें पाठीमागें कांहींसुद्धां ठेविलें नाहीं. (म्ह० त्याच्या कुटुंबीयांना कांहीं देखील पैसा मिळाला नाहीं;) उ० त्यानें पाठीमागें लग्नाच्या पुष्कळ पोरी ठेविल्या आहेत ! (म्ह० तो मरून गेला, पण त्याच्या पोरींचीं लग्नें करण्याचें काम दुसऱ्यांच्या अंगावर पडलें आहे.)

३३. **पाठीमागें देणें**--परत करणें; परत देणें.

३४. **पाठीमागें पडणें**--

(क) द्यावयाची रक्कम न दिल्याकारणानें तें कर्ज, किं० तो भार, होऊन राहणें; उ० तुझे चार हप्ते पाठीमागें पडले आहेत; (म्ह० चार हप्ते द्यावयाची मुदत टळून गेली आहे, हल्लीं तितके हप्ते तुझ्या अंगावर आहेत.)

(ख) जुनेंपुराणें होणें; जुनें झाल्या कारणानें महत्त्व कमी होणें, किंवा नाहींसें होणें. उ० अन्नपूर्णाबाईचा वीस वर्षांचा मुलगा मेला; तिला त्याचें अतोनात दुःख झालें; परंतु मुलाच्या मागून तिचा पतिही निवर्तला; तेव्हां पतिशोकानें पुत्रशोक पाठीमागें पडला. (कमी तीव्र झाला.)

३५. **पाठीवर**--रक्षण करण्यासाठीं, उपद्रव करण्यासाठीं, उत्तेजन देण्यासाठीं, मदत करण्यासाठीं, शेजारीं. उ० माझ्या पाठीवर दहा माणसें आहेत; (म्ह० माझ्या जवळ.)

३६. **पाठीवर टाकणें**--लांबणीवर, दिरंगाईवर. टाकणें; उ० तुम्ही आपल्या वरिष्ठाला एकदा भेटावयाला जा; तें काम महत्त्वाचें आहे, तें असें पाठीवर टाकूं नका.

३७. **पाठीला तेल लावून ठेवणें**--मार खावयाला सिद्ध असणें; उ०

पाठीला तेल लावून ठेव; मी जेवून उठल्यावर तुझा समाचार घेणार आहें !

३८. **पाठीवरून हात फिरविणें**--प्रेमानें कुरवाळणें.

३९. **पाठीवर पाय देऊन येणें**—मागून जन्मणें, किं० मागून येणें. उ० श्रीपति माझ्या पाठीवर पाय देऊन आला आहे ( म्ह० माझा भाऊ श्रीपति माझ्या पाठचा. )

४०. **पाठीस काळीज असणें**--धाडसी, साहसी, असणें; उ० त्याला माडावर चढ म्हटलें कीं तो चढेल ! त्याच्या पाठीस काळीज आहे !

४१. **पाठीस पोट लागणें**--

(क) अतिरोड असणें. उ० तुझें मूल भारी वाळलें हो ! पहा याच्या पाठीस पोट लागलें आहे !

(ख) उपासामुळें पोट वखाटीस जाणें.

४२. **पोट पाठीस लागणें**—पोटाला मिळवून खाण्याची जबाबदारी अंगावर असणें; उ० वरिष्ठानें शिव्या दिल्या, तरी ऐकून घ्याव्या लागतात ! पोट पाठीस लागलें आहेना ! नोकरी सोडतां येत नाहीं !

४३. **पाठीस लागणें**--पिच्छा पुरविणें; उ० बुटासाठीं माझा मुलगा आज महिनाभर माझ्या पाठीस लागला आहे, पण मला बाजारांत जावयास एका मिनिटाची देखील फुरसत सांपडत नाहीं; ( म्ह० मला बूट घेऊन द्या म्हणून तो मला गळ घालीत आहे. )

४४. **पाठीशीं**--अंगावर; उ० माझ्या पाठीशीं शंभर लचांडें आहेत ! तुझें काम केव्हां करूं ?

४५. **एकाद्याला पाठीशीं घालणें**--त्याला आश्रय देणें; उ० औरंगजेबानें संभाजीच्या मुलास पाठीशीं घातलें.

४६. **पाठीशीं घेणें**—अंगावर घेणें; पथकरणें.

४७. **झांकल्या पाठीनें**--अब्रू न गमावून घेतां; प्रतिष्ठितपणानें.

४८. **तापल्या पाठीनें**—अंगांत उमेद, शक्ति, ताकद, आहे तोंपर्यंत.

४९. **पुरती पाठ घेणें**, किं० **पुरा घेणें**--पिच्छेस लागणें; पथकरलेलें

काम नेटानें चालविणें; इष्ट वस्तु मिळविण्यासाठीं प्रयत्न सुरू ठेवणें. उ० मळखांबावर मला ताजवा करावयाला येईना, पण मी त्या उडीची पुरती पाठ घेतली, तेव्हां आतां ती मला चांगली येऊं लागली.

## ४९. पाय.

१. (क) घोट्याच्या खालचा तंगडीचा भाग. उ० नवऱ्या मुलाच्या पायांवर कुंकवाची स्वस्तिकें काढतात. उ० चांभाराला तुझ्या पायाचा मेज दिलास काय ?

(ख) सबंध तंगडी, ( म्ह० कंबरेपासून तों पायाच्या बोटापर्यंत सर्व भाग.) उ० तुझे पाय माझ्यापेक्षां लांब आहेत, पळतांना तूं माझ्या पुढें गेलास त्यांत नवल तें काय ?

(ग) टेबल, खुर्ची, पलंग, चौरंग, पोळपाट, घडवंची, वगैरेंचे खूर. उ० ह्या खुर्चीचे पाय बेडौल आहेत.

(घ) पायाच्या आकृतीची कोणतीही वस्तु.

(ङ) (लाक्षणिक अर्थानें) लक्षण, चिन्ह, रंग. उ० मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात. ( म्ह० मूल पुढें, किं० मोठें झाल्यावर, कोणच्या गुणांचें होईल ह्याची अटकळ अगोदरच करतां येतें. )

(च) (लाक्षणिक अर्थानें) कारण. उ० भिकेचा पाय; ( म्ह० भीक येईल असें वर्तन इ०. )

विष्णुपदीं पिंड तसा, शत्रुशिरीं देय पाय जो डावा--।
तो म्यां दिला अधिक याहुनि जन्मुनि अर्थ काय जोडावा ? ॥

मोरोपंत.

२. **आपले पाय माझ्या घरीं लागावें**--आपण माझ्या घरीं येऊन मला धन्य करावें.

३. **आपल्या पायांवर धोंडा पाडून, किं० ओढून, घेणें**--आपलें नुकसान आपणच करून घेणें; आपल्या नुकसानीस आपणच कारणीभूत होणें; उ० वरिष्ठांशीं ताठ्यानें वागूं नको, नाहींतर आपल्या पायांवर धोंडा पाडून घेशील !

४. **घोड्याच्या,** किं० **हत्तीच्या, पायांनीं येणें, आणि मुंगीच्या पायांनीं जाणें**--जलदीनें येणें, आणि सावकाश, धिमेंधिमें जाणें. ( आजार, संकट, अडचण, वगैरेंसंबंधानें योजतात. )

५. **मुंगीच्या पायानें येणें आणि हत्तीच्या,** किं० **घोड्याच्या, पायांनीं जाणें**--सावकाश येणें आणि त्वरेनें निघून जाणें. ( संपत्ति, वैभव, वगैरेसंबंधानें योजतात. )

६. **चहूं पायांनीं, दोहों पायांनीं, उतरणें**--शिंगरूं, वासरूं, पाडा, वगैरे चार पाय, किं० दोनच पाय, पुढें करून जन्मणें.

७. **जळता पाय जाळणें**--एकाद्या कामांत, व्यवहारांत, किं० व्यापारांत, नुकसान होत असतांही तो तसाच चालू ठेवणें.

८. **त्याच पावलीं**--तावडतोब; उ० हें पत्र श्रीकृष्णरावांला दिल्यावर त्याच पावलीं गणोबाच्या घरीं जा.

९. **पाऊल उचलणें**--जलदीनें चालणें; घाईनें चालणें. उ० अगे, मला येथें पाणी पाहिजे आहे, माझा खोळंबा झाला आहे; तूं आपली धिमेंधिमें पाणी घेऊन येत आहेस ! जरा पाऊल उचल !

१०. **एकाद्याला पाय उताऱ्यां,** किं० **पाय उतारा, आणणें**--त्याला नम्र करणें; त्याला तोरा कमी कमी करावयास लावणें.

११. **पाय उताऱ्यां,** किं० **पाय उतारा, येणें**--नम्र होणें; गर्व सांडणें.

१२. **पाय काढणें**--एकाद्या कामांतून बाहेर पडणें, किं० आपलें अंग काढून घेणें; उ०--राघू जरा भित्रा आहे; बागवानाशीं आमची मारामारी जुंपण्याचा रंग दिसतांच त्यानें तेथून पाय काढला; म्ह० तो तेथून निघून गेला, मुलुकादिशीं निसटला, नाहींसा झाला.

१३. **पाय खोडणें**--
( क ) मरणसमयीं पाय झाडणें.
( ख ) निजतांना पाय अंगाशीं घेणें.

१४. **पाय घेणें**--प्रवृत्ति होणें; उ० त्या कामाला माझा पाय घेत नाहीं; ( म्ह० तें काम करण्याकडे मला प्रवृत्ति होत नाहीं; तें करावें असें मला वाटत नाहीं. ) [ येथें "घेणें" अकर्मक. ]

१५. **पाय देणें—**
(क) पायाचा भार घालून चेपणें; उ० रामा, माझ्या पायांवर जरा पाय दे रे! उ० माझी पाठ दुखते आहे, पाठीवर पाय देतोस काय?
(ख) तुडविणें, उपद्रव देण्यासाठीं, कुरापत काढण्यासाठीं, एकाद्याला पायानें ताडन करणें; उ०

कृष्णा म्हणे, "पति कसे पाहुनि हें कर्म साहतलि? न द्या—।
पद सर्पशिरीं; तुमच्या रक्ताच्या स्पष्ट वाहतील नद्या ॥ १ ॥
मोरोपंत-सभा-अ० ५

१६. **एकाद्याचे पाय धरणें**—त्याला शरण जाणें; त्याचा आश्रय मागणें; उ० तुझी नोकरी जाऊं नये अशी तुझी इच्छा असेल, तर आपल्या वरिष्ठाचे पाय धर!

१७. **त्याचे पाय धरले आहेत**—थंडीनें, किं० दुसऱ्या कांहीं कारणानें, त्याचे पाय दुखत-ठणकत-आहेत. [ "धरणें" हें अकर्मक. ]

१८. **पाय धुऊन**, किं० **फुंकून, टाकणें**, किं० **ठेवणें**—खबरदारीनें किंवा काळजीनें वागणें.

१९. **पाय पसरणें**--पूर्णपणें उपभोगणें; उपभोगेच्छेला पुरी वाव देणें.

२०. **पाय फासटणें**— इच्छेविरुद्ध चालणें; एखादें काम करण्यासाठीं कोठें तरी पायानें चालत जाणें; तंगड्या तोडणें; उ० काडीचाही लाभ होण्याची आशा नसतां इतक्या लांब मी नाहीं पाय फासटीत जाणार!

२१. **एकाद्या पदार्थाला पाय फुटणें**--तो हळूच नाहींसा होणें; कोणाच्या नजरेस न पडतां एकाद्या ठिकाणाहून तो नाहींसा होणें; उ० मी येथें पांच पेढे ठेविले होते, आतां चारच उरले आहेत; एका पेढ्याला पाय फुटले असें दिसतें; (म्ह० तो कोणी तरी न कळत उचलला असेल!)

२२. **पाय फुटणें**—विस्तार पावणें; उ० तूं पहिल्यानें मला फक्त पोस्टांत पत्र टाकून ये म्हणून सांगितलेंस; आतां म्हणतोस कीं, चार आण्यांची तिकिटें आण; तुझ्या कामाला आणखी पाय फुटणार आहेत कीं काय? (म्ह० आणखीही कांहीं कामें सांगणार आहेस कीं काय?)

२३. **पाय फुटणें**--थंडीच्या योगानें, किं० जाळवातानें, पाय भेगाळणें. उ० मला पायमोचे घातल्याशिवाय अगदीं चालवत नाहीं. माझे पाय भारी फुटले आहेत!

२४. **पाय फोडणें**--विस्तार करणें; उ० तुमचें बोलणें विषयाला धरून चालवा आणि थोडक्यांत आटोपा; त्याला उगीच पाय फोडूं नका!

२५. **पाय लागणें**, किं० **पाय भुईशीं लागणें**--कायमपणा येणें; उ० त्या आफिसांत माझे एकदा पाय लागूं द्या, म्हणजे हळू हळू मी सारी आपली मंडळी आणीन!

२६. **पाय मोकळे करणें**--

(क) अडचणींतून बाहेर काढणें; उ० ह्या चिंचेच्या व्यापारांतून माझे पाय एकदा मोकळे करा, म्हणजे मग तुमचीं दुसरीं सतरा कामें असलीं तरी मी करीन.

(ख) फेरफटका करणें; उ० आज सकाळपासून तों आतांपर्यंत मी एकसारखा लिहीत आहें; अगदीं कंटाळा येऊन गेला आहे; आतां पाय मोकळे करावयाला व्याक्वेवर घटकाभर फिरून येतों.

२७. **पाय मोकळा होणें**--

(क) अडचणींतून बाहेर पडणें.

(ख) पायांचा आंखडलेपणा नाहींसा होणें.

२८. **पाय मोडणें**--

(क) पाय अशक्त होणें.

(ख) निराशेमुळें गलितधैर्य होणें; उ० माझा जोडीदार मेल्यापासून माझे पाय मोडले; म्ह० कांहीं करावयाला मला उत्साह वाटत नाहीं. [ ह्या दोन्ही अर्थांनीं "मोडणें" हें अकर्मक आहे. ]

२९. **एकाद्याचे पाय मोडणें**--त्याच्या कामांत हरकत आणणें; त्याला खचविणें; त्याला एकादें काम न करूं देणें; उ० गोवर्धनपंताला भेटल्यानें माझें काम खचित होईल, असें मला वाटतें; मी त्याला भेटायास जातोंच; तुम्ही उगीच माझे पाय मोडूं नका! (म्ह० मला खचवूं नका!)

३०. **पाय वाहणें**--एकाद्या स्थली जाण्याला मनाचा कल होणें; उ० काल दारूच्या पायीं इतकी तुझी छीः थू झाली, आणि आज पुन्हा दारूच्या गुत्याकडे जाण्याला तुझे पाय कसे वाहतात ?

३१. **एकाद्याचे पाय शिवणें**--त्याच्या पायांला स्पर्श करणें; [ शपथ घेतांना हे शब्द उच्चारतात. ] उ० मी तुमचे पाय शिवून सांगतों, कीं तुमच्याविषयीं माझ्या मनांत कपट नाहीं!

३२. **पायाची**, किं० **तळपायाची, आग मस्तकास जाणें**--संतापणें; रागानें जळणें; उ० तुझें उर्मटपणाचें वर्तन पाहून माझ्या पायाची आग मस्तकास जाते!

३३. **पायांतील वाहाण पायांतच बरी**, किं० **पायांतच ठेवावी**--हलक्या मनुष्याला फाजील महत्त्व देऊं नये.

३४. **आपल्या पायांची धूळ माझ्या घरीं झाडावी**--माझ्या घरीं आपण यावें. ( नम्रपणाचें आमंत्रण. )

३५. **पायांचो वळ भागविणें**--व्यर्थ खेटे घालणें, किं० फिरणें.

३६. **आपल्या पायांपाशीं मी आलों आहें**--मी आपल्याकडे आलों आहें. [ नम्रपणा दाखविणारा प्रयोग. ]

३७. **पायानें जेवणें**, किं० **खाणें**--मूर्ख, वेडा, असणें.

३८. **एकाद्याच्या पायां पडणें**--

( क ) त्याच्या पायांवर डोकें ठेवणें; प्रार्थना, किं० विनंति करण्यासाठीं.

( ख ) नम्रपणानें विनंति करणें, याचना करणें.

उत्तर म्हणे, "नको गे ! पायां पडतों, बृहन्नडे ! सोड ।
जोड दिली, दुखवुं नको, केवळ पितृकरतलस्थ हा फोड ॥ मोरोपंत.

३९. **पायांपाशीं पाहणें**--जवळ जें असेल त्याचाच विचार करणें. आपल्या परिस्थितीचा विचार करणें.

४०. **पायांला**, किं० **पायांत, आढी पडणें**--म्हातारपणामुळें एका पायाला दुसरा पाय चालतांना घासणें; उ० ह्या घोड्याच्या पायाला आढी पडूं लागली, आतां तुम्ही दुसरा घोडा विकत घ्या.

४१. **पायांला खुंट्या येणें**—एके जागीं फार वेळ बसल्याकारणानें पाय ताठणें.

४२. **एकाद्याच्या पायांवर कुत्रीं मांजरें घालणें**—फार फार प्रार्थना करून त्याला कांहीं काम करावयास उठविणें.

४३. **पायांवर पाय टाकून निजणें**—चैनींत निजून राहाणें.

४४. **एकाद्याच्या पायांवर पाय देणें**—त्याच्या पाठोपाठ जाणें, किं० चालणें, किं० करणें.

४५. **त्याच्या पायांवर भोंवरा आहे,** किं० **भोंवरा पडला आहे**—तो सदासर्वदा भटकत असतो; तो घरांत मुळींच नसतो.

४६. **एकाद्याच्या पायाशीं पाय बांधून बसणें**—त्याची पिच्छा पुरवून कांहीं मागणी मागणें.

४७. **पायास कुत्रें बांधणें**—शिव्या देत सुटणें.

४८. **एकाद्याच्या पायास,** किं० **पायावर, भोंवरा,** किं० **भिंगरी, असणें**—तो सदा भटकत असणें.

४९. **त्याच्या पायास वाहाण बांधलेली आहे**—तो सदा भटक्या मारीत असतो.

५०. **पायीं**—पायानें. उ० मी पायींच कुरल्यास गेलों.

५१. **एकाद्याच्या पायीं**—त्याच्यामुळें; उ० तुझ्या पायीं मला ही ठोकर बसली. उ० तुमच्या पायीं मी सर्वस्वीं बुडालों, किं० आपलें सर्वस्व बुडविलें; उ० तुझ्या विद्येच्या पायीं माझे पांच हजार रुपये खर्च झाले.

५२. **भरल्या पायांचा**—मळलेले पाय ज्याचे आहेत असा; उ० तूं शेतांतून आला आहेस, तर भरल्या पायांचा जाजमावर चालूं नको.

५३. **भरल्या पायीं**—बाहेरून चालून आल्यावर पाय न धुतां; उ० भरल्या पायीं बाळंतिणीच्या खोलींत जाऊं नये. [ "भरल्या पायीं जाऊं नये" याच्याबद्दल "पायीं भरलें जाऊं नये" असेंही म्हणतात. ]

५४. **( एकाद्याचा ) मागला पाय पुढें न घालूं देणें**—त्यानें आपली मागणी पुरविल्याशिवाय त्याला पुढें पाऊल टाकूं न देणें; उ० संध्या-

काळीं माझें मूल खळीस आलें. मी विहिरींचें पाणी भरीत होतें; त्यानें माझा मागला पाय पुढें घालूं दिला नाहीं. त्याला जेव्हां पाजलें, तेव्हां तें गप्प राहिलें!

५५. **मागला पाय पुढें न ठेवणें**—एकाद्याजवळ मागितलेली वस्तु त्यानें दिल्याशिवाय, किं० त्याला केलेली विनंति त्याणें मान्य केल्याशिवाय, त्याला सोडावयाचें नाहीं—त्याच्यापासून दूर जावयाचें नाहीं—असा निश्चय करून असणें.

५६. **मागला पाय पुढें नाहीं, आणि पुढला पाय मागें नाहीं, अशा नेटानें तो होता**—तो एका जागीं करारीपणानें बसून राहिला होता; तो केसभरही हालला नाहीं; उ० दहा चोरटे माझ्यावर तुटून पडले, पण मी मागला पाय पुढें नाहीं आणि पुढला पाय मागें नाहीं अशा करारीपणानें होतों!

५७. **मागल्या पायीं परत येणें**—निरोप पोंचविल्यानंतर, किं० दुसऱ्या ठिकाणीं काम करावयास जाऊन तें झाल्यानंतर, वेळ न गमावतां परत येणें. उ० हें पत्र तूं रामभाऊंला नेऊन दे, आणि मागल्या पायीं परत ये.

५८. **तूं आपल्या पायापाशीं काय जळत आहे तें पहा**—तूं आपल्या परिस्थितींतील जो दोष, किं० उणेपणा आहे, त्याचेकडे दुर्लक्ष्य करून असूं नको; उ० अमक्याचा मुलगा ओंवळ्यानें जेवतो, आणि तमक्याच्या मुलानें केश राखिले आहेत, वगैरे निंदा कशाला करतां? तुमच्या पायापाशीं तुमच्या काय जळतें आहे हें अगोदर पहा! (म्ह० खुद्द मुलाचे जे ढंग आहेत ते पहा!)

## ५०. पोट.

१.पोट—

(क) अन्नपचनाचें स्थान; जठर.

(ख) बरगड्यांच्या खालचा, व कंबरेच्या वरचा, भाग.

(ग) गर्भाशय. उ० तुझें ओझें नऊ महिने मीं पोटांत वाहिलें हो!

(घ) कोणत्याही वस्तूंचा फुगीर भाग; उ० गठ्ठ्याचें पोट.

(ङ) कोणत्याही वस्तूचा आंतला पोकळ भाग; पोकळी. उ०
" ज्याच्या पोटीं खर विष, मुखीं आज्य हैय्यंगवीन,
त्या कुंभाचे परि खल, " असें कोण बोले कवी न ? ।
वि० वा० भिडे,—पापात्म प०.

(च) अवकाश, किं० आधार,–ज्यांत लहान, किं० किरकोळ, किं० कमी महत्त्वाच्या, वस्तूंचा समावेश करतां येतो. उ० तुम्ही आम्हांपैकीं प्रत्येकाला वेगळें वेगळें आमंत्रण करीत बसूं नका. एक नारायणरावांना आमंत्रण केलें, म्हणजे पुरें आहे; त्यांच्या पोटांत आम्ही येतोंच. उ० वरप्रस्थान, वाङ्निश्चय, इ० हीं सर्व कर्मे विवाहाच्या पोटांत येतात; ( म्ह० विवाहाच्या विधींत समाविष्ट होतात. )

(छ) मन, अंतःकरण, आशय. उ० तो तुझ्याशीं गोड बोलला म्हणून फसूं नको; त्याच्या पोटांत कपट आहे.

(ज) पोटांतील हेतु; ( म्ह० शब्दांनीं बोलून न दाखविलेला हेतु. )

२. **माझें पोट गळ्याशीं लागलें आहे, आतां मला लाडवांचा आग्रह करूं नका**—मी खाल्लेलें अन्न अगदीं कंठापर्यंत येऊन पोंचलें आहे, आतां इ०.

३. **पोटचें पाडणें**—कृत्रिम उपायांनीं गर्भपात करणें; पोट पाडणें.

४. **पोट जाणें**—रेच होणें.

५. **पोट जाळणें**—

(क) पोट भरणें; ( निंदेंत, किं० वैतागांत, ह्याचा उपयोग होतो.) उ० समर्थांची लाळ घोटूं नको तर काय करूं ? हें पोट जाळावयाचें आहे ना ?

(ख) दुसऱ्याचें नुकसान करून आपला फायदा करून घेणें. उ० ह्या वेळीं मला बढती मिळावयाची, पण त्या शंकररावांनें आपलें पोट जाळलें ना ! ( म्ह० मला मिळावयाची जागा त्याणें उपटली !

६. **पोट जिरणें**—गर्भशमन होणें. उ० त्या स्त्रीचें पोट जिरलें आणि आज तीन वर्षें तिच्या पोटांत सल राहिला आहे.

७. **त्याचें पोट आज सकाळपासून ढाळत आहे.**--त्याला रेच होत आहेत.

८. **आज माझें जेवण फार झालें, पोट तडीस लागलें आहे,** किं० **पोटाला तडस लागली आहे.**—खालेल्या अन्नानें माझें पोट भरावलें आहे, आणि मला अस्वस्थपणा वाटत आहे.

९. **पोट दुखणें—**

(क) अजीर्ण वगैरेंच्या कारणानें पोटांत वेदना होणें. [ त्याच अर्थानें "पोटांत दुखणें," ह्याचाही उपयोग केला जातो. ]

(ख) मत्सर वाटणें; असह्य होणें; वाईट वाटणें; उ० खरचणाराचें खरचतें आणि कोठावळ्याचें पोट दुखतें!

१०. **त्याचें पोट पाताळास गेलें आहे**—त्याचें पोट रिकामें आहे, कारण तो जेवलेला नाहीं.

११. **त्याच्या पोटाची पत्रावळ झाली आहे,** किं० **त्याचें पोट वखारीस गेलें आहे**—जेवणाची वेळ टळून गेल्यामुळें त्याचें पोट खोल गेलें आहे.

१२. **पोट पिकणें**--मूल होणें. उ० त्या मुलीचें एकदाचें पोट पिकलें हो! ( म्ह० तिला बरेच दिवस मूल झालें नव्हतें, तें झालें हो आतां! )

१३. **पोट फुगणें**--

(क) अजीर्णादिकांमुळें पोटांत वायु सांठून पोट मोठें होणें.

(ख) एकादी गुप्त बातमी कोणाला तरी सांगण्याला संधि न मिळाल्याकारणानें अस्वस्थता वाटणें; उ० काय रे! ही बातमी कोणाला कळवूं नको म्हणून तुला मीं बजाविलें होतें ना! मग कां सांगितलीस? ती गुप्त ठेविली असतीस तर तुझें पोटबीट फुगलें असतें कीं काय?

१४. **पोटाला गांठी देणें**--चिकूपणानें, किं० दारिद्र्यामुळें, पोटाला पुरेसें अन्न न खाणें.

१५. **पोट बाहेर पडणें**--भोजनाचा खर्च बाहेर पडणें; उ० ह्या व्यापारांत माझें पोट बाहेर पडून दरमहा निदान दहा रुपये शिलकीस पडतात.

१६. **पोट फुटणें**--खरोखरी पोट फुटल्याप्रमाणें पोटाला वेदना होणें; उ० हसतां हसतां आमचीं पोटें फुटलीं!

१७. **पोट बुडणें**--चरितार्थाचें साधन नाहींसें होणें; उ० यंदा पाऊस चांगला पडला नाहीं. माझें पोट बुडालें; (म्ह० शेतें न पिकल्याकारणानें माझें चरितार्थाचें साधन नाहींसें झालें.)

१८. **पोट भरणें**--

(क) चरितार्थ चालविणें. उ० तो कारकुनी करून आपलें पोट भरतो; (म्ह० आपली उपजीविका चालवितो.)

(ख) ज्यास्ती अन्न खाण्याला पोटांत जागा न उरणें. उ० माझें पोट भरलें; आतां जिलब्यांचा आग्रह करूं नका!

१९. **पोट सरणें**--रेच होणें.

२०. **पोट सुटणें**—

(क) खायाला, प्यायाला, यथेच्छ मिळत असल्यानें दोंद येणें.

(ख) उदरनिर्वाहाचा खर्च बाहेर पडणें; (म्ह० आपल्या अंगावर न पडणें.)

२१. **पोटाचा डमामा, किं० नगारा, होणें**--पोटांत वायु धरल्यामुळें पोट फुगणें.

२२. **पोटाचे पाठीस लागणें**--चरितार्थाचीं साधनें मिळविण्याकडे सर्व वेळ, शक्ति, लावणें; उ० आम्ही पोटाच्या पाठीस लागलेलीं माणसें, आम्हाला कसचीं काव्यें, आणि कसचीं नाटकें?

२३. **पोटांत कालविणें**--दुःखामुळें, मळमळण्यामुळें, अस्वस्थ वाटणें.

२४. **अपराध पोटांत घालणें**--अपराधांबद्दल क्षमा करणें; उ०--

अपराध सर्व माझे घालीं पोटांत, जोड मज दे ही।
पात्रे सरी सुरांशीं मर्त्यहि दावुनि दया समज देही॥

२५. **एकाद्याला पोटीं घालणें**--त्याला ममतेनें आपल्या आश्रयाखालीं घेणें; उ०--

प्रेरणा न करितां संकटीं। कृपेनें अनाथ घाली पोटीं। केला उपकार न बोले ओठीं। तो एक धन्य पुरुष॥ मुक्तेश्वर.

२६. **पोटांत ठेवणें**—गुप्त ठेवणें, कोणाला न कळूं देणें.

२७. **पोटांत पोट चालणें**—एकाच्या अन्नांत दुसऱ्याचा समावेश होणें.

२८. **पोटांत शूल उठणें**, किं० **पोटांत सलणें**—मत्सर वाटणें.

२९. **एकाद्याच्या पोटांत शिरून एकादी गुप्त गोष्ट काढणें**-गोड-गोड बोलून, किं० आपल्याबद्दल दुसऱ्याच्या मनांत विश्वास उत्पन्न करून देऊन, त्याचा गुप्त बेत, किं० विचार, समजून घेणें; उ० आत्मारामपंताला दुसऱ्याच्या पोटांत शिरून त्याचे गुप्त विचार चांगले काढून घेतां येतात!

३०. **पोटावर मारणें, पोटावर पाय देणें, पोटाआड येणें**—दुसऱ्याच्या उपजीविकेचीं साधनें नाहींशीं करणें; उ० मी येथें चहा-काफीचें दुकान काढिलें आहे, तें चांगलें चालत आहे. आतां अगदीं माझ्या दुकानाशेजारीं तूंही चहाकाफीचें दुसरें दुकान काढणें, म्हणजे माझ्या पोटाआड येणें होईल. यासाठीं तूं पलीकडच्या आळीला दुकान काढ, म्हणजे तें दोघांनाही बरें!

३१. **एकाद्याच्या पाठीवर पाहिजे तर मारावें, पोटावर मारूं नये**—त्यानें कांहीं अपराध केला असतां त्याचीं चरितार्थाचीं साधनें बुडवूं नयेत. त्याला देहदंड खुशाल करावा.

३२. **पोटावारी नोकरी करणें**—फक्त जेवण हा मोबदला घेऊन नोकरी करणें.

३३. **पोटाशीं, पोटशीं, पोटिशीं, पोटेशीं, असणें**-गरोदर असणें.

३४. **एकाद्याला पोटाशीं धरणें**—त्याच्यावर प्रेम करणें; उ० लक्ष्मणरावाला तूं उगीच पोटाशीं धरिलें आहेस, तो केव्हां तुझ्यावर उलटेल ह्याचा नेम नाहीं!

३५. **पोटास तडस लागणें**—फार जेवल्यामुळें अस्वस्थता वाटणें.

३६. **त्याच्या पोटीं संतान नव्हतें**—त्याला अपत्यें नव्हतीं.

३७. **गोवर वगैरे रोग पोटीं पडणें**—तो लवकर बरा न होण्याच्या पायरीस पोंचणें.

३८. **पोट धरधरून हसणें**—मोठमोठ्यानें हसणें.

३९. **पोट मोठें करणें**—दया दाखविणें.

४०. **त्याचें पोट रसातळास गेलें आहे**—बराच वेळ खावयास अन्न न मिळाल्याकारणानें त्याचें पोट खोल गेलें आहे.

४१. **पोटचें दुःख सोसणें**, किं० **काढणें**—भुकेची वेदना सोसणें.

४२. **त्याच्या पोटांत कावळे ओरडूं, तोडूं**, किं० **टोंचूं, लागले आहेत**—त्याला अतिशय भूक लागली आहे.

४३. **त्याच्या पोटांत कोंबडीं चरूं लागलीं आहेत**—त्याला फार भूक लागली आहे.

४४. **पोटांत पाय शिरणें**—खचून जाणें; भ्रांत होणें. उ० त्याच्या मरणाची खबर ऐकिल्यापासून माझे पायच जणों पोटांत शिरले आहेत! (म्ह० मी अगदीं भांबावून गेलों आहें.)

४५. **त्याच्या पोटांत ब्रह्मराक्षस आहे**, किं० **उठला आहे**!—त्याला अतोनात खा खा सुटली आहे!

४६. **पोटाला पाटा बांधणें**—भुकेच्या वेदना बंद करण्यासाठीं धोतरानें पोट बांधणें.

४७. **पोटास चिब्बे घालणें**—उपास काढणें.

४८. **ज्याचें पोट दुखेल तो ओंवा मागेल**—ज्याला एकाद्या गोष्टीचा त्रास होत असेल, तो तिच्याबद्दल कांहीं तजवीज, किंवा उपाय, करीलच.

## ५१. बगल.

१. बगल—

(क) खाक; खांद्याखालचा भाग.

(ख) आंगरखा, बंडी, बंगरेच्या बाहीला जो त्रिकोणाकृति तुकडा शिवलेला असतो तो.

(ग) लंगड्या मनुष्याची कुबडी.

(घ) बाजू.

२. **एकादी वस्तु बगलेंत घालून चतुःसमुद्राचें स्नान करून**

येणें—ती वस्तु आपल्या खिजगणतींत नाहीं असें धरून वागणें.

३. **एकादी वस्तु बगलेंत मारणें**--छाती आणि बाहु यांच्यामध्यें ती दाबून धरणें; खाकोटीला मारणें.

४. **एकाद्याच्या बगलेंत असणें**--त्याच्या संरक्षणाखालीं असणें; त्याच्या वशील्याचा असणें; त्याचा अंकित असणें; उ० जो कोणातरी थोर माणसाच्या बगलेंत असेल, त्याला सारे लोक नमून असतात.

५. **तें काम त्याच्या बगलेंतलें आहे**--तें त्याला सहज करतां येण्याजोगें आहे.

६. **बगल, किं० बगला, वर करणें**--आपल्याजवळ कांहीं नाहीं असें सिद्ध करण्यासाठीं बाहू वर करून दाखविणें; आपणाजवळ कांहीं नाहीं असें म्हणणें.

७. **बगलेंतून एकादी गोष्ट काढणें**--एकादी खोटी गोष्ट बनवून ती खरी म्हणून सांगणें; बात झोकणें.

## ५२. बोट.

१. ( क ) हाताची किंवा पायाची अंगुलि.

( ख ) बोटाच्या लांबीचें परिमाण, किं० बोटाच्या रुंदीचें प्रमाण.

( ग ) बोटाला लागून येईल तितकें; उ० तुपाचें बोट, मधाचें बोट, गंधाचें बोट, कुंकवाचें बोट, इ०.

२. **बोट करणें, बोट दाखविणें**--बोटानें एकाद्या पदार्थाचा निर्देश करणें.

३. **बोटें मोडणें**--

( क ) बोटांच्या पेरांचे सांधे सइल करणें.

( ख ) निर्भर्त्सना करणें; शापणें.

४. **बोट शिरकणें**—एकाद्या कामांत प्रवेश मिळणें.

५. **बोटावर नाचविणें**--आपल्या ताब्यांत टेवणें; एकाद्या माणसावर ताबा चालविणें; उ० लक्ष्मणरावाला गोविंदराव बोटावर नाचवितो.

६. **ज्याचीं बोटें त्याच्या डोळ्यांत घालणें**--त्याच्याच युक्तीनें

त्याला पकडणें; त्याची हिकमत त्याच्याच विरुद्ध योजणें, किंवा लागू करणें.

७. **एकाद्याला दीड बोट, किं० दोन बोटें, स्वर्ग उरणें**--तो गर्वानें फुगून जाणें; उ० तिच्या नवऱ्याला मामलतदारी मिळाली, तेव्हां-पासून तिला दीड बोट स्वर्ग उरला आहे!

## ५३. मन.

१. (क) सुखदुःखादिकांचें ज्ञान करून देणारें इंद्रिय.
   (ख) संकल्पादिरूप मनाची वृत्ति.
   (ग) सदसद्विवेकबुद्धि; उ० तुझ्या मनाला जर तें योग्य दिसत असलें, तर कर.

२. **ज्याचें मन त्याला ग्वाही देतें**--योग्य अयोग्य, खरें खोटें, बरें वाईट, वगैरेसंबंधाची खातरी अंतर्यामाला झालेली असते, मग तो मनुष्य बाह्यात्कारीं कांहीं का बोलेना, किं० लोक त्याच्याबद्दल कांहीं का बोलेनात!

३. **मनाएवढा ग्वाही त्रिभुवनांत नाहीं**--[अर्थ वरच्याप्रमाणेंच.]

४. **मान सांगावा जना, अपमान सांगावा मना**--आपणास मिळालेल्या संमानाबद्दल आपण लोकांत बढाई मारावी; पण आपला अपमान मनांतच ठेवावा; त्याची वाच्यता करूं नये.

५. **मन घालणें, देणें, किं० लावणें**--मन एकाग्र करून एकाद्या वस्तूवर, किं० कार्यावर, आसक्त करणें, किं० व्यापृत करणें; उ० माझ्या कामांत तूं मन घालूं नको. तें काम माझें मी पार पाडीन. उ० तूं मन लावून अभ्यास केलास, तर यंदा तुझी परीक्षा खचित उतरेल.

६. **एकाद्या पदार्थावरून, किं० माणसावरून, मन उडणें**—तो आवडेनासा होणें; त्याचेपासून मन निवृत्त, किं० पराङ्मुख होणें; त्याचा मनाला वीट येणें. उ० ह्या सखलादी अंगरख्यावरून आलीकडे माझें मन उडालें आहे. उ० नारायणरावावरून माझें मन आतां पुरतें उडालें.

७. **मन तुटणें**—मन पराङ्मुख होणें; मनांत अप्रीति, किं० कंटाळा, उत्पन्न होणें; उ० 'फुटलें मोतीं, तुटलें मन, सांधूं न शके विधाता.'

८. **एकाद्याचें मन पाहणें**—त्याचे विचार काय आहेत, ह्याची परीक्षा करणें; त्याच्या मनाचा कल कोणीकडे आहे, हें त्याच्या भाषणादिकांवरून ठरविणें.

९. **एकाद्या पदार्थावर,** किं० **इसमावर, मन बसणें**—तो आवडीचा, किं० प्रेमाचा होणें; तो सुखाचें कारण होणें; त्याचेवर मन आसक्त होणें; उ० माझें मन ह्या खणावर बसलें आहे. आई, असल्या खणाचा परकर मला शिवशील ?

१०. **मन लागणें**—मन आसक्त, किं० व्यापृत, होणें. उ० गंगारामाचा मुलगा मेल्यापासून त्याचें मन दुकानाकडे लागेनासें झालें आहे.

११. **एकाद्याचें मन मनावणें**—त्याचें मन आपणाकडे ओढून घेणें; त्याला अनुकूळ करून घेणें.

१२. **मन मानेल तसें करणें**—आपल्या इच्छेला येईल तसें करणें; स्वैर वर्तन करणें; स्वच्छंदानें, उच्छृंखळपणानें, वागणें.

१३. **मन मोठें करणें**—उदारपणा दाखविणें.

१४. **एकाद्याचें मन मोडणें**—त्याच्या इच्छेच्या, मर्जीच्या, उलट जाणें; त्याची आशा विफल करणें.

१५. **मनांत गांठ ठेवणें**—अंतर्यामीं वैरभाव, द्वेषबुद्धि, सूड घेण्याची इच्छा, जागृत ठेवणें.

१६. **मनांत गांठ बांधणें,** किं० **घालणें,** किं० **बांधून,** किं० **घालून असणें**—नीट ध्यानांत धरून ठेवणें; पक्के लक्ष्यांत वाळगून असणें.

१७. **मनांत नव मण जळणें**—मनांत अंतानात क्रुद्ध, संतप्त, असणें; मनात द्वेष, सूड घेण्याची इच्छा, जागृत ठेवून असणें.

१८. **मनांत मांडे खाणें**—मनोराज्य करणें.

१९. **मनांत म्हणणें**—आपल्याशीं, किं० स्वगत, म्हणणें.

२०. **मनांतून उतरणें**—आवडेनासा होणें; उ० आलीकडे नागपुरी

धोतरजोड्यावरून माझें मन उतरलें आहे. ते कुजके असतात, असें माझें मत झालें आहे.

२१. **एकादें काम मनावर घेणें**--

(क) तें करण्याविषयीं उद्युक्त होणें; त्याच्यासाठीं कळकळीनें झटणें; तें पथकरून त्याच्या सिद्धीसाठीं आस्थेनें प्रयत्न करणें.

(ख) तें महत्त्वाचें समजणें; त्याला किंमत देणें; उ० तो वेडा आहे, तूं त्याचें बोलणें मनावर घेऊं नको ! उ० मी रागाच्या सपाट्यांत तुम्हांला अपशब्द बोललों, ते मनावर घेऊं नका; ( म्ह० ते विसरून जा. )

२२. **मनास येणें**—आवडणें; उ० हा खण तुझ्या मनास येतो काय

उ० कोण तूझ्या मनासि येतो सांग बो ! सीते ! आनंदतनय.

२३. **मनांत कालवणें**--अंतःकरणांत अतिकष्टी होणें; तीव्र दुःख पावणें; उ० दशरथाच्या आज्ञेनें राम वनाला निघालेला पाहून सर्व अयोध्यावासी जन मनांत कालवले.

२४. **मनीं धरणें**, किं० **वागविणें**—लक्ष्यांत बाळगणें.

२५. **एकादी गोष्ट मनीं मानसीं नसणें**--ती अगदीं मनांत देखील आलेली नसणें; उ० हीं मोत्यें तुला मिळू नयेत, असें माझ्या मनींमानसीं देखील नव्हतें !

२६. **मनानें घेणें**--मनाचा ग्रह होणें, मत ठरणें; उ० चाकवताची भाजी खाल्यानें ओकावयास होतें, असें त्याच्या मनानें घेतलें आहे.

### ५९. मनगट.

१. (क) हाताच्या पंज्याचा बाहूशीं जो सांधा तो.

(ख) घोडा, गाढव, वगैरे जनावरांची मूठ; ( म्ह० खुराजवळचा सांधा. )

(ग) शक्ति, सामर्थ्य, वगैरेंचें अधिष्ठान; उ० तुझ्या मनगटांत जोर असला तर घे हें काम अंगावर !

२. **मनगट येणें**—बोचलणें.

३. **एकाद्याचें मनगट धरणें**--एकाद्या अपराधांत त्याला पकडणें; त्याचेवर गुन्हा शाबीद करणें.

४. **एकाद्याच्या मनगटावर गोणी पडणें, किं० येणें**—एकाद्या कामाची जबाबदारी त्याच्यावर पडणें.

५. **तुझ्या मनगटावर कोणी गोणी दिली आहे?**—तूं ह्या कामाचा भार आपल्या शिरावर आहे असें कां समजतोस ?

६. **मनगटावर केस येणें**—एकादें काम करावयाला असमर्थ असणें.

७. **मनगटावर तेल, किं० तेल चुना, घालणें, किं० ओतणें**—बोंवलणें, किं० बोंवलण्याची तयारी करणें.

८. **त्याच्या मनगटावर तेल घालतें पाहिजे**—त्याच्या आळसाबद्दल त्याला रागें भरलें पाहिजे.

९. **मनगटासारखें मनगट पाहून कन्या द्यावी**—कन्येला अनुरूप वर पाहून त्याच्याशीं तिचें लग्न जुळवून द्यावें.

१०. **एकाद्याच्या मनगटाशीं मनगट घासणें**—त्याच्याशीं बरोबरीच्या नात्यानें वागणें.

## ५९. मान.

१. **मान**–(क) गळ्याच्या मागची बाजू.

(ख) गळ्याचा एक रोग.

२. **खालच्या मानेनें चालणें, किं० पाहाणें**—नम्रपणानें, किं० मर्यादशीलपणानें, चालणें, किं० वागणें; लाजेनें खालीं मान घालून चालणें.

३. **एकाद्याची मान कांट्यावर नसणें**—तो अतिगर्विष्ट, उद्दाम, किं० मगरूर, असणें.

४. **एकाद्याची मान कापणें**—त्याचा विश्वासघात करणें; त्याला फसविणें.

५. **मान हालविणें, किं० डोलविणें**—आनंदानें, किं० कौतुकानें, मान हालविणें; प्रशंसापूर्वक मान हालविणें; उ० माझें कीर्तन ऐकून सर्वांनीं माना डोलविल्या.

६. **माझी मान धरली आहे**—माझ्या मानेला कांहीं विकृति होऊन

ती मला इकडेतिकडे वळवितां येत नाहीं. [ “ धरणें ” अकर्मक. ]

७. **त्यानें माझी मान धरली**--ऐन वेळेला त्यानें माझ्या कामांत हरकत आणिली, माझें काम बंद पाडलें. [ येथें “ मान ” ह्याबद्दल “ मानगुटी ” असेंही म्हणतात. “ धरणें ” सकर्मक ].

८. **एकाद्याची मान**, किं० **मुंडी, मुरगाळणें**--त्याचा नाश, नुकसान, करणें.

९. **एकाद्या रकमेची मान मोडणें**--

(क) नाइलाजास्तव, किं० नाखुषीनें, ती रकम खर्च करणें; उ० पांचशें रुपयाची मान मोडली तेव्हां लग्न झालें !

(ख) थोडक्या खर्चासाठीं मोठ्या नाण्याला हात लावणें; उ० चार पैशासाठीं मला रुपयाची मान मोडावी लागली !

१०. **मान वर करणें**--हीन स्थितींतून वैभवास चढणें; आजारांतून उठणें; दिमाखानें वागणें.

११. **मान वर न करणें**--लज्जेनें, किं० नम्रपणानें, वागणें.

१२. **मान वांकडी करणें**--संमति, किं० पसंती, दाखविण्यासाठीं एका खांद्यावर मान वळविणें.

१३. **एकाद्याची मान सोडविणें**--त्याला अडचणींतून मुक्त करणें.

१४. **एकाद्याची मान अडकणें**--तो पेंचांत पडणें; संकटांत सांपडणें.

१५. **एकाद्याच्या मानेवर सुरी ठेवणें**--त्याला धमकी देणें; त्याचा नाश करावयास सिद्ध होणें.

१६. **एकाद्याच्या मानेस**, किं० **मानगुटीस, बसणें**--

(क) त्याला आग्रह करणें, त्याला अतिगळ घालणें.

(ख) त्याला पछाडणें; ( भूत, पिशाच्च वगैरेनें. )

(ग) केलेंच पाहिजे असें होणें; केल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें होणें; उ० तें काम माझ्या मानेस बसलें; ( म्ह० मला तें टाळतां येईना. )

## ५६. मिशा.

१. (क) वरच्या ओठावरील केशांचा झुबका.
(ख) मांजराच्या, डुकराच्या, तोंडावरचे लांब लांब केश.

२. **एकाद्याच्या मिशा खालावणें**—त्याची फजीती होणें, त्याचा नक्षा, तोरा, उतरणें. [ येथें " खालावणें " हें अकर्मक क्रियापद. ]

३. **एकाद्याच्या मिशा खालाविणें**—त्याची फजीती करणें; त्याचा तोरा कमी करणें.

४. **एकाद्याच्या मिशा भादरणें**, किं० **मिशी भादरणें**, किं० **उतरणें**—त्याची बेआबरू, फजीती, करणें.

५. **मिशांवर**, किं० **मिशीवर, ताव देणें; मिशा पाजविणें; मिशांना**, किं० **मिशीला, पीळ भरणें**—तिरस्कारानें, किं० सूड घेण्याच्या इरायानें, किं० रागानें, मिशा वळविणें.

६. **मिशांना तूप लावणें**—डामडौल करणें; नसत्या श्रीमंतीचा आविर्भाव करणें; उ० त्याला वेळेला खायाच्या अन्नाची मुष्कील आहे, पण मिशांना तूप लावून हिंडतो.!

७. **मिशी उतरून देईन!**—एकादी गोष्ट ठासून सांगावयाची असतां म्हणतात; उ० मी म्हणतों तें खोटें ठरलें, तर मिशी उतरून देईन.

## ५७. मूठ.

१. (क) हाताचीं बोटें तळहातावर वळवून घट्ट टेकिलीं असतां हाताच्या पंजाचा जो आकार होतो तो.

(ख) वरच्याप्रमाणें मूठ मिटली असतां तिच्यांत ज्या परिमाणाचा पदार्थ राहूं शकेल तें परिमाण, किं० मुठींत जितका पदार्थ राहूं शकेल तितका पदार्थ ( धान्य वगैरे ); उ० भाताच्या रोपांची मूठ, कोथिंबिरीची मूठ, इ०.

' आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढती पाहुं नको.'

अनंतफंदी.

(ग) मंत्रानें भारून शत्रूवर फेकण्यासाठीं हाताच्या मुठींत घेतलेले उडीद.

(घ) हत्ती, घोडा, वगैरे जनावरांच्या रोजच्या अन्नांतून त्यांच्या रखवालदारास द्यावयाचा जो मुठीच्या परिमाणाचा भाग तो.
(ङ) मुठीनें पेरलेलें भात; उ० यंदाची मूठ चांगली लागली.
(च) घोड्याच्या पायाच्या खुरांला लागून जो सांधा असतो तो. [ ह्या सांध्याशीं घोड्याचा पाय लहान घेराचा असल्यामुळें येथें बांधलेला दोरी खालीं, किं० वर, सरकत नाहीं. ]

२. **एका मुठीचीं माणसें**--एकाच कायद्याखालीं, किं० हुकमतीखालीं, येणारीं माणसें.

३. **एका मुठीनें**--एकदम, किं० एकाच हप्त्यानें; उ० उसने घेतलेले माझे पंचवीस रुपये मला देशील ते एका मुठीनें परत दे; ( म्ह० आज आठ आणे, उद्या एक रुपया, आणखी चार दिवसांनीं बारा आणे, असे पिचीपिची देऊं नको, एकदम सबंध पंचवीस रुपये दे. ) उ० त्यानें शंभर रुपये एका मुठीनें उधळले; ( म्ह० एकाच वेळीं. )

४. **झांकल्या मुठीनें**--गुप्तपणें; आपल्या संबंधाचा कोणास कांहीं मागमूस न लागूं देतां.

५. **मूठ आवळणें**--चिकूपणा करणें, किं० करूं लागणें.

६. **मूठ दाबणें, चेपणें, गार करणें**--लांचाची रक्कम मुठींत, किं० हातांत, देणें; लांच देणें; उ० त्यानें पन्नास रुपयांनीं फौजदाराची मूठ दाबिली, तेव्हां तो सुटला.

७. **मुठींत असणें**--पूर्ण कह्यांत, ताब्यांत, असणें; उ० नारायणराव पूर्णपणें त्या सावकाराच्या मुठींत आहे, म्हणून तुम्ही नारायणरावास वळविण्यासाठीं त्या सावकाराशीं संधान बांधा.

८. **मृत मनुष्याला मूठमाती देणें**--त्याला पुरणें.

## ५८. मुंडी.

१. (क) **डोकें**--( तिरस्कारव्यंजक ); उ०

> " हा उडवितों तुझी मी बकऱ्याची जेंवि शीघ्रतर मुंडी " ।
> ऐसें बोलुनि देता झाला गुरुपुत्र शीघ्र तरमुंडी ॥ ६७ ॥
> मोरो० प० द्रो०- अ० १७.

(ख) संन्यासी. ( संन्याशाचे सर्व डोक्यावरचे केश भादरलेले असतात, यावरून हा तिरस्कारव्यंजक शब्द प्रचारांत आलेला आहे. )

२. **एकाद्याची मुंडी मुरगळणें, पिळणें, पिरगळणें**—त्याचा सर्वतोपरी नाश करणें; उ० त्यानें माझ्याविरुद्ध चाहाड्या सांगून माझें नुकसान केलें आहे. आतां तो जर माझ्या तावडींत सांपडला, तर त्याची मुंडीच मुरगळून सोडतों !

३. **मुंडी हालविणें**, किं० **डोलविणें**—डोकें हालविणें; [ वरिष्ठाच्या म्हणण्यास खुशामत्यानें संमति देण्यासाठीं डोकें हालविलें, किं० एकाद्या शिष्यानें गुरूचें म्हणणें न समजतां, समजलें आहे असें डोकें हालवून दर्शविलें, म्हणजे "त्यानें मुंडी हालविली," असें म्हणतात. ]

४. **मुंडी फिरविणें**—डोकें वळवून विनाकारण नापसंती, किं० नावड, दाखविणें.

## ५९. शिर.

१, (क) डोकें.

> मोडुनि मदूरु, पाडुनि मज, माझें मर्दिलें शिर पदानें ।
> यापरिस चित्र दुसरें काय करावें अधार्मिक मदानें ? ॥
>
> मोरोपंत.

(ख) कोणत्याही वस्तूचा माथा; उ० झाडाचें, डोंगराचें, घराचें वगैरे शिर.

(ग) सैन्याची आघाडी.

(घ) ( घोड्यांची गणति करतांना ) व्यक्ति; उ० घोडा शिर चार; ( ह्म० चार घोडे. )

२. **शिर सुरी तुझ्या हातीं**—माझें डोकें तुझ्या ताब्यांत आहे, आणि सुरीही तुझ्या जवळ आहे; आतां मला मारणें, किंवा न मारणें, हें तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे; मी सर्वथैव तुझा दास आहें, मला तारणें, किंवा मारणें, हें तुझ्यावर आहे. मीं अपराध केला आहे खरा, आतां क्षमा करणें, किं० पारिपत्य करणें, तुझ्याकडे आहे.

३. **शिर हातावर घेणें**—धाडसाचें काम करावयास सिद्ध होणें; भीति सोडून देणें; उ० बाजीरावाबरोबर पांचशें घोडेस्वार शिर हातावर घेऊन पुढें सरसावले !

४. **शिरातोरा असणें, शिरातुरा असणें**--एकाद्यापेक्षां अधिक समर्थ, चतुर, किं० कर्तबगार, असणें; उ० तो चित्रकलेमध्यें माझा शिरातोरा आहे.

५. **शिरां तोरा,** किं० **शिरां तुरा, लावणें,** किं० **दाखविणें,** किं० **मिरविणें**—आपलें वर्चस्व दाखविणें, किं० गाजविणें; उ० रामभाऊला पाटिलकी मिळाल्यापासून तो भारी शिरांतोरा दाखवूं लागला आहे !

६. **एकाद्याच्या शिरीं,** किं० **शिरावर, असणें**—त्याचा रक्षक, किं० त्राता, ह्या नात्यानें त्याच्या जवळ असणें; उ० आपण शिरीं असतां आम्हांला कोणाची भीति ?

७. **शिरावर जागें राहणें** किं० **असणें**.--एकाद्याच्या संरक्षणासाठीं, किं० कल्याणासाठीं, तत्पर असणें; उ०

श्रीरामा ! तूं स्वामी अससी माझ्या शिरावरी जागा ।
आम्हांसि तुझ्या पायांवांचुनि निर्भय नसे दुजी जागा ॥
मोरोपंत–आर्याकेकावलि.

## ६०. शेंडी.

१. ( क ) डोक्याची हजामत करवून, किं० जावळ करवून, मध्यें जो केशांचा झुबका राखून ठेविलेला असतो तो; हिंदुत्वाची खूण.

हळुं हळुं झडो अहंता, सन्मनीं वार्द्धकीं जशी शेंडी ।
केडूं विवेक विषया, निस्पृह जन वस्तुतें जसा केंडी ॥
मोरोपंत.

( ख ) मोर, कोंबडा, वगैरेंच्या माथ्यावरील मांसल तुरा.

( ग ) शेंडें नक्षत्राचें शेंपूट.

( घ ) घोड्याच्या दोन कानांच्या दरम्यान कपाळावर लोंबणारे केश.

( ङ ) तेल्याचा घाणा, उसाचा चरक, वगैरेंच्या लाटावरील फळी, किंवा तक्का.

२. **शेंडी फुटणें**—एकाद्या कामांतून दुसरें एखादें बारीकसें नवीन काम निघणें. एकाद्या मोठ्या खर्चाबरोबर दुसरा एकादा लहानसा खर्च करण्याची जरूरी येणें.

३. **एकाद्याची शेंडी सांपडणें, हातांत येणें**—त्याला आपल्या कह्यांत आणण्याचें साधन आपणाला मिळणें; उ० तुझी शेंडी माझ्या हातांत सांपडली आहे; आतां कोठें जातोस तो पाहातों ?

४. **एकाद्याची शेंडी गुंतणें**—तो आडकलेल्या स्थितींत असणें; उ० त्याचें हें काम मी अंगावाहेर टाकलें असतें, पण सध्या माझी शेंडी गुंतलेली आहे, म्हणून माझा इलाज नाहीं !

५. **एकाद्याच्या शेंडीस फुलें बांधणें**—त्याला नटवून, सजवून, त्याची खुशामत करून, त्याचें मन आपल्याला अनुकूल करून घेणें.

६. **शेंडीस गांठ देणें**—आपल्याहून थोर अशा माणसाशीं बरोबरीच्या नात्यानें, किं० उर्मटपणानें, वागणें.

## ६१. हात.

१. (क) मनगटाच्या पुढचा जो बाहूचा भाग तो.

(ख) सबंध बाहु, म्ह० खांद्यापासून तो बोटांच्या टोंकापर्यंतचा शरीराचा अवयव.

(ग) कोपरापासून मधल्या बोटाच्या टोंकापर्यंत जी लांबी ती. उ० हा पंचा साडेचार हात भरला.

(घ) बाजू, तरफ; उ० आमचें घर मारुतीच्या देवळाच्या उजव्या हातास आहे.

(ङ) अधिकाराचा, किं० सामर्थ्याचा, टप्पा, किं० पोंच; उ० तुला मदती देणें माझ्या हातीं नाहीं.

(च) कोणतीही क्रिया करणारा ह्या नात्यानें कोणी विशिष्ट मनुष्य, किंवा त्या नात्यानें त्याचें कर्तृत्व. उ० भिडेखातर चांगल्याला वाईट म्हणणें आणि वाईटाला चांगलें म्हणणें, हें आपल्या हातून कधींही होणार नाहीं !

(छ) स्वामित्व, कबजा, मालकी; उ० रामभाऊचीं सारीं शेतें माझ्या हातांत आहेत. उ० हल्लीं माझ्या हातांत मुळींच पैसा नसतो.

(ज) डाव, खेळ; उ० मी तुझ्यावर पांच हात लाविले.

(झ) खेळण्याची पाळी; उ० आतां माझा हात आला आहे.

(ञ) कोणतेंही हत्यार, शस्त्र, वाद्य, इ० वापरण्याच्या कामीं कौशल्य, सफाई इ०; उ० ह्या सारंगीवाल्याचा हात चांगला आहे; उ० ह्या न्हाव्याचा हात हलका आहे; उ० त्याला चित्र काढण्याचा हात चांगला आहे.

(ट) एका पक्षांतील खेळणारे गडी. उ० अजून आमच्याकडचा एक हात खेळावयाचा आहे.

(ठ) (कुलुपाचा) हात—किल्ली.

(ड) मदतनीस, साहाय्य करणारा, कामकरी.

(ढ) तालमींत जोर काढतांना ज्या चिऱ्यावर, किंवा ओंड्यावर, हात टेकतात, तो; (ह्या अर्थी हत्ता, हत्ते, अशींही रूपें होतात.)

(ण) हातानें केलेले थर, दिलेले लेप, इ०; चुन्याचा पहिला आडवा हात झाला; त्यावर दुसरा उभा हात दिला, म्हणजे आमचें काम संपेल.

(त) हातानें मारलेला तडाका; उ० मला उगीच चिडवूं नको! माझा हात तुला ठाऊक आहे. मीं एकदा मारावयाला सुरवात केली कीं, तुझ्या पाठीचीं सालडीं लोंबविल्याशिवाय खळणार नाहीं!

(थ) तेलाच्या घाण्याचा एक बांकदार तुकडा, जो कातरीला लाविलेला असतो तो.

(द) हात टेकावयासाठीं, किंवा हातानें धरावयाचे, जे कोणत्याही पदार्थाचे भाग ते; हाताच्या आकाराची कोणतीही वस्तु; उ० खुर्चीचे हात; राहाटाचे हात; इ०.

२. **हात आटोपणें**—मारणें, वगैरे हातानें करावयाची कोणतीही क्रिया, बंद करणें.

३. हात ओंवाळणें—तुच्छता दर्शविणें.

४. हात करणें—मारणें, वगैरे. उ० स्त्रीच्या अंगावर हात करणें बरोबर नाहीं. [ पुढें अंक ११ पहा. ]

५. हात घालणें—

(क) पथकरणें, करावयाला घेणें. उ० जें काम आपल्याला होण्याजोगें नसेल, त्याला कधीं हात घालूं नये.

(ख) एकादी वस्तु घ्यावयासाठीं, धरावयासाठीं, किं० शोधावयासाठीं, हात पुढें करणें. उ०

मग विभु वसनासी त्यांचिया हात घाली ।
उकलुनि जंव पाहे मुष्टि पोहे निघाली ॥ आनंदतनय.

६. हात चालणें—एकादी गोष्ट करतां येणें. उ० कशीदावर माझा हात चालत नाहीं.

७. हात चेपणें—लांचाचे पैसे मुकाट्यानें एकाद्याच्या हातांत देणें.

८. हात जोडणें—

(क) नमस्कार करणें; प्रार्थना करणें; विनविणें; शरण जाणें, किं० येणें; उ०

अपराध फार केले, परि आतां हात जोडिले स्वामी ! ।
करुनि दया तारावें, आवडि वाढो सदा तुझ्या नामीं ॥
मोरोपंत–आर्याकेकावलि.

परि झाला त्या शिष्यस्नेहानें मूढ हा तपोराशी ।
स्तवितो भाट तसा कीं वाटे जोडील हात पोराशी ॥
मोरोपंत–द्रोणपर्व–अ० ३, आ. ६२.

(ख) नको असलेला पदार्थ हात जोडून आर्जवानें दूर सारणें, किं० आव्हेरणें. उ०

दानश्री त्याहुनि बहु, दुग्धासहि हात जोडितो मीन ।
मोरो०—बृहद्० अ० ८.

९. हात झाडणें—

(क) अगदीं नापसंत ठरविणें; झिडकारणें.

(ख) निराशेनें सोडून देणें.

१०. **हात टाकणें**--पोहोतांना पाण्यावर हात मारणें.

११. **हात टाकणें**--प्रहार करणें; मारणें; उ० वायको-माणसाच्या अंगावर हात टाकणें तुम्हांला शोभत नाहीं.

१२. **हात टेकणें**—

(क) म्हातारपणानें अशक्त होणें, थकणें.

(ख) एकादें काम करतां येत नाहीं, असें म्हणणें, किंवा कबूल करणें; उ० तुमच्या मुलापुढें मीं तर हात टेकले! उद्यांपासून तुम्ही त्याला दुसरा मास्तर पहा!

१३. **हात तोडणें**—लेखानें आपणास बांधून घेणें; उ० मी त्याच्याजवळ हात तोडून दिला आहे!

१४. **हात दाखविणें**--

(क) आपली शक्ति, सामर्थ्य, दाखविणें.

(ख) नाडीपरीक्षा करावयासाठीं वैद्यापुढें हात करणें.

(ग) हातानें एकाद्या पदार्थाचा निर्देश करणें.

(घ) बडवून काढणें, पारिपत्य करणें, सूड घेणें, उट्टें काढणें.

(ङ) अहितकारक परिणाम करणें.

(च) तळहातावरच्या रेषा पाहून भविष्य करण्यासाठीं हुडुक्क जोशापुढें हात करणें.

१५. **हात देणें**--मदत करणें; तारणें.

१६. **हातावर धरणें**—( मुलासंबंधानें ) एकसारखें रडत राहून आपणास घ्यावयास लावणें; उ० आज ह्या मुलानें मला सकाळपासून हातावर धरिलें आहे!

१७. **हात धुऊन पाठीस लागणें**--पिच्छा पुरविणें; सतावून सोडणें.

१८. **हात धुणें**—एकाद्या कामांतून आपलें अंग काढून घेणें.

१९. **हात नाचविणें**—चेष्टा करण्याच्या उद्देशानें दुसऱ्याच्या तोंडापुढें हातवारे करणें.

२०. **कपाळावर हात मारणें**--नशिबास दोष देणें.

२१. **ही ह्मैस आतां हातावर आली**, किं० **ही ह्मैस आतां हातावर दूध देऊं लागली**--ह्या ह्मशीला पान्हा फुटण्यास रेडकाची जरूरी उरली नाहीं; तिच्या कासेला हात घातला, म्हणजे ती दूध देऊं लागली आहे.

२२. **हातावर शीर घेऊन असणें**--कोणतेंही धाडसाचें कृत्य करावयास सदा सिद्ध असणें; उ० हातावर शीर घेऊन आम्हीं आपली नोकरी केली आहे!

२३. **हातावर पोट भरणें**, किं० **हातावर संसार करणें**--अंगमेहनतीनें पैसे मिळवून उपजीविका करणें.

२४. **हातावर हात देऊन**, किं० **हातावर हात मारून, पळून जाणें**--डोळ्यादेखत निसटून, किं० पळून, जाणें; उ० तो भामटया माझ्या हातावर हात मारून पळून गेला!

२५. **हाताला हात लावणें**—पति कांहीं धर्मकृत्य करीत असतां त्या धर्मकृत्याची सांगता व सफलता होण्यासाठीं स्त्रीनें त्याच्या हाताला आपला हात लावणें.

२६. **हातीं धरणें**—आपल्या देखरेखीखालीं घेणें; उ० माझ्या मुलाला तुम्हीं हातीं धरल्यास तो पास होईल.

२७. **मीं आपला हात कापून दिला आहे**, किं० **मीं आपला हात गुंतवून घेतला आहे**--मी लेखांत आपणाला बांधून घेतलें आहे.

२८. **हात गहाण ठेवणें**--उजवा हात देवाला वाहून कोणत्याही कामीं त्याचा उपयोग करावयाचा नाहीं, असा नवस करणें.

२९. **तळहाताचा मळ**—अल्प श्रमानें होणारें कोणतेंही काम; उ० चित्रें काढणें हें त्याला तळहाताच्या मळाप्रमाणें आहे.

टीप--ह्या अर्थानें 'हाताचा मळ,' असाही प्रचार आहे.

३०. **हाताच्या धारणेनें घेणें**—मारणें, बुकलणें.

३१. **हातावर घेणें, आणणें**--तारण, किं० गहाण, न ठेवितां पैसे उसने घेणें, आणणें, काढणें; उ० त्याची माझी नुसती तोंडओळख होती, तथापि त्याच्यापासून हे दहा रुपये मीं केवळ हातावर आणिले.

३२. **हातावर दिवस काढणें, लोटणें**--मोठ्या कष्टानें दिवस घालविणें.

३३. **हातावर मिळविणें**—मिळवावें आणि खावें अशा स्थितींत राहणें.

३४. **हातावर हात मारणें**, किं० **देणें**--एकादा सट्टा, किं० विचार, किं० कल्पना, आपणास पटली, किं० आवडली, म्हणून दुसऱ्याच्या हातावर आपला हात मारणें.

३५. **हातास, हातां, हातीं चढणें**—प्राप्त होणें; उ० तो किल्ला बाजीरावाच्या हातास चढला; उ० अदत्तापासून पैसा हातीं चढत नाहीं.

३६. **जीभ**, किं० **तोंड, हातीं धरणें**—मन मानेल तसें बोलणें, किं० खाणें; उ० त्यानें जीभ, किं० तोंड, हातीं धरलें आहे; (म्ह० तो वाटेल तें बोलतो, किं० खातो.)

३७. **हातीं धोंडे घेणें**--एकाद्याला धोंडे मारावयास उठणें.

३८. **हातीं भोपळा घेणें**--भिक्षा मागणें. [ भोपळ्याच्या शकलांत भिक्षेकरी भिक्षा घेतात, ह्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. ]

३९. **आपला हात आणि जगन्नाथ**--एकादी वस्तु आपल्या हातानें घ्यावयाची आपणास संधि मिळाली असतां कोण कमी करणार? हावें तितकें घेणारच !

४०. **दोन हाताचे चार हात करणें**--लग्न करणें. तसेंच, "त्याचे दोन हाताचे चार हात झाले," म्ह० त्याचें लग्न झालें.

टीप:--एकाद्या पुरुषाचें लग्न झालें, म्हणजे त्याच्या घरांत एक नवीन माणूस ( म्ह० त्याची बायको ) येते, आणि कामधाम वगैरे करावयास पूर्वी दोनच हात असत तेथें चार हात होतात.

४१. **हात धरणें**—आडविणें; हरकत करणें; प्रतिस्पर्धा करणें; बरोबरी करणें; उ० चित्रें काढण्यांत त्याचा हात कोणाच्यानें धरवेल?

४२. **ह्या हाताचें त्या हातास कळूं न देणें**--गुप्तपणें करणें.

४३. **ह्या हाताचें त्या हातावर**—जेव्हांच्या तेव्हांच, तावडतोब.

४४. **एकाद्या मनुष्यास हातीं धरणें**—त्याला मदत करण्यास तत्पर असणें. उ० समर्थानें ज्याला हातीं धरिलें असेल तोच वैभवास चढतो !

४५. **हात मारणें**—बळकाविणें; अधाशीपणें खाणें; उ० त्याच्या ताब्यांत असलेल्या पैशावर त्यानें चांगला हात मारला. उ० त्यानें आंबरसावर खूप हात मारला !

४६. **हात राखणें**—कुचराई करणें; उ० असे हात राखून जेवूं नका !

४७. **हात लावणें**—मदत करणें; उ० हें जातें भारी जड ओढतें; वहिनी, जरा हात लावतेस कां ?

४८. **हात चळणें**—सरावामुळें, परिपाठामुळें, हाताला सफाई येणें.

४९. **हाताचें पायांवर लोटणें**—आजची अडचण उद्यांवर ढकलणें; हल्लींचें संकट लांबणीवर टाकणें.

५०. **हाता तोंडास येणें, किं० हातीं तोंडीं येणें**—उपयोगीं पड-ण्याच्या स्थितीस येणें; उपभोगण्यास योग्य होणें.

५१. **हातावर असणें**—पूर्णपणें साध्य असणें.

५२. **हातावर तुरी देणें, किं० हातावर तुरी देऊन पळून जाणें**—फसविणें, किं० फसवून पळून जाणें.

५३. **हातावर येणें, किं० हाता बोटावर येणें**—अगदीं जवळ येऊन ठेपणें; हस्तगत होण्याच्या, किं० कबज्यांत येण्याच्या, किं० साध्य होण्याच्या अगदीं बेतांत, असणें; उ० मुक्कामाचा गांव आतां अगदीं हातावर आला आहे !

५४. **हात धरणें**—लांच देणें; उ० मीं जेव्हां त्याचा हात धरला, तेव्हां त्यानें ती जागा मला देवविली.

५५. **हात मोडणें**—अनाथ होणें.

५६. **हात वाहणें**—प्रवृत्त होणें; उ० मुलांनीं कितीही दांडगाई केली, तरी त्यांना मारावयाला सहसा माझा हात वाहत नाहीं; उ०

> समरीं ऐरावतही शोणितपूरीं नहात वाहेल ।
> परि परमप्रिय अर्जुन, त्यावरि याचा न हात वाहेल ॥
>
> मोरो०–उद्यो० स०–१२.

५७. **हात सोडणें**—
(क) संगति सोडणें.
(ख) पूर्वीप्रमाणें कृपा, लोभ, न करणें.

५८. **हाताखालीं घालणें**—देखरेखीखालीं घेणें; कबज्यांत, किं० ताब्यांत, घेणें.

५९. **हाताचे लाडू होणें**—खरजेनें हात सुजून ते साफ उघडतां न आल्याकारणानें मिटलेल्या स्थितींत राहणें; उ० खरजेनें त्या मुलाच्या हाताचे लाडू झाले आहेत.

६०. **हातांत कंकण बांधणें**—एकादें काम करण्याबद्दल प्रतिज्ञा करणें; एकादें काम पथकरणें, किं० अंगावर घेणें; उ० कोतवालानें चोर पकडण्याविषयीं हातांत कंकण बांधिलें आहे.

६१. **हातांत हात घालणें**—
(क) लांच देणें.
(ख) मैत्रीच्या भावानें वागणें, प्रेम करणें.

६२. **हाता तोंडाशीं गांठ पडणें**—
(क) बोंब मारणें.
(ख) घास तोंडांत पडणें; खावयाला सुरवात होणें; उ० दोन दिवसांच्या उपासानंतर एकदाची माझ्या हाता तोंडाची गांठ पडली !

६३. **हाताला येईल तें**—जें कांहीं हातांत सांपडेल तें; ज्याच्यावर हात पडेल तें; उ० घराला आग लागली, तेव्हां आम्ही सारीं माणसें घरांतले पदार्थ बाहेर काढूं लागलों; ज्याच्या हाताला जें येईल, तें तो उचलून आणून अंगणांत ठेवीत होता.

६४. **हाताला लागणें**—गमावलेल्या, किं० फुकट गेलेल्या, किं० नासलेल्या, किं० बिघडलेल्या, वस्तूंतून अल्प अंश मिळणें; उ० तुम्ही सोन्याच्या दागिन्यांत बेलाशक पैसा घाला; मोत्यांत किंवा कापडांत घालूं नका. कारण, शेवटीं मोत्यांतून किंवा कापडांतून हाताला कांहींसुद्धां लागत नाहीं.

## ६२. हात पाय.

१. **हात पाय गळणें—**

(क) खचून जाणें, नाउमेद होणें, धीर सोडणें; उ० अरे, एकदाच नापास झालास तों असा हात पाय कां गाळतोस ? यंदा नाहीं तर पुढच्या सालीं पास होशील !

(ख) अशक्त होणें.

२. **हात पाय चोळणें**—चरफडणें; रागानें तरफडणें.

३. **हात पाय पसरणें—**

(क) एकाद्या कामांत आळस करणें.

(ख) एकादें काम आपल्या हातून होत नाहीं असें म्हणणें; सबबी सांगणें

(ग) ठरलेल्या मर्यादेच्या, किं० पल्ल्याच्या, बाहेर जाणें; विस्तार पावणें.

(घ) मरणाच्या वेळीं हात पाय ताणणें.

४. **हात पाय पांघरून**, किं० **पोटाळून, बसणें**—आळशासारखें बसणें.

५. **हातीं पायीं अन्न येणें**—खालेलें अन्न जडसें वाटणें; उ० आजचें जिलबीचें जेवण माझ्या हातीं पायीं आलें आहे !

६. **हात पाय फुटणें—**

(क) लबाड्यांत, लुच्चेगिऱ्यांत, तरबेज होणें; उ० आलीकडे आमच्या नोकराला हात पाय फुटले आहेत !

(ख) थंडीमुळें हाता पायांना भेगा, चिरा, पडणें.

(ग) खर्चलें जाणें; उधळपट्टी सुरू होणें. उ० त्या दौलतीला आलीकडे हात पाय फुटूं लागले आहेत !

७. **हात पाय मोकळे करणें, ( किं० होणें )**—चालून, किं० फेरफटका करून, हात पाय सैल, किं० साफ, किं० हलके करणें; ( किं० होणें; ) उ० दुपारचें जेवण झाल्यापासून तों आतांपर्यंत मी मांडी घालून जमाखर्च लिहितों आहें. आतां देवदर्शनास जातों, म्हणजे जरासे हात पाय मोकळे होतील.

८, **हात पाय मोडणें**—

(क) बलहीन, किं० सामर्थ्यहीन, करून टाकणें; निःसत्त्व करणें; हरकत करणें.

(ख) ताप यावयाच्या अगोदरचा अशक्तपणा, (किं० निरंगळी) येणें. याच अर्थानें "हात पाय मोडून येणें", किं० "अंग मोडून येणें", याचाही उपयोग होतो.

९. **हात पाय सोडणें**—मरणकाळच्या यातनांमुळें हात पाय ताणणें, किं० ताठ करणें.

१०. **हात चोट लावणें**, किं० **हातभार लावणें**—मदत करणें.

११. **हात पाय गळणें**—

(क) अशक्त होणें; रोडावणें.

(ख) नाउमेद होणें; खचणें.

१२. **हात पाय गुंडाळणें**—

(क) अंतकाळच्या वेदनेमुळें हात पाय आखडणें; उ० त्यानें आपले हात पाय गुंडाळले. उ० त्याचे हात पाय गुंडाळतच आले आहेत.

(ख) हरकत करणें; अडथळा करणें; उ० मीं त्याचे हात पाय अगदीं गुंडाळून टाकिले आहेत, त्याला आतां कांहीं देखील उपद्रव करतां येणार नाहीं!

१३. **हात पाय चोळणें**—सूड घेण्याची प्रतिज्ञा करणें; उ० त्याच्यावर हातपाय चोळून तो म्हणाला, इ०

१४. **हात पाय झाडणें**—

(क) अंतकाळच्या वेदनांमुळें हात पाय इतस्ततः फेंकणें.

(ख) बचावासाठीं, सुटकेसाठीं, हाता पायांचा उपयोग करणें.

१५. **हात पाय ताणणें**—आरामानें, सुखानें, किं० कांहीं काळजी नसल्यामुळें, हात पाय पसरून पडणें.

१६. **हात पाय पाखडणें**—अंतकाळच्या वेदनांमुळें, किं० संतापानें, हात पाय इतस्ततः टाकणें.

१७. **हात पाय हालविणें**--उद्योग, प्रयत्न, परिश्रम, मेहनत, खटपट, करणें; उ० लोक तुझ्याबद्दल किती त्रास सोसतील? तूं स्वतां कांहीं तरी हात पाय हालविशील कीं नाहीं?

१८. **हातापायांचा चौरंग होणें**--पेटके वगैरेंच्या योगानें हात पाय आखडणें.

१९. **हातापायांचे डगळे होणें**, किं० **पडणें**, किं० **मोडणें**—अशक्तपणामुळें अंगाला कंप सुटणें.

२० **हाता पायांच्या फुंकण्या होणें**-आजार वगैरेंच्यामुळें रोड होणें.

२१. **हाता पायांचे ढोंग होणें**, किं० **पडणें**--भीतीनें, किं० आजारानें, अशक्त होणें.

२२. **हातां पायां पडणें**, किं० **हातीं पायीं पडणें**--गयावया करणें; नम्रपणें प्रार्थना करणें. नम्र होणें; शरण येणें; दया भाकणें; काकुतीनें विनविणें. उ० तो मारवाडी माझ्यावर फिर्याद करावयाला तयार झाला होता, पण मी त्याच्या हातीं पायीं पडलों, तेव्हां त्यानें मला आणखी एका महिन्याची मुदत दिली.

२३. **हातीं पायीं उतरणें, सुटणें**, किं० **मोकळी होणें**—प्रसूतीच्या धोक्यांतून निभावणें; उ० ती स्त्री ( घोडी, म्हैस, किंवा गाय, इ० ) हातीं पायीं सुटली, ( ह्म० नीटपणें प्रसूत झाली. )

## इतर नामें.

६३. नामांच्या अंतर्भावानें जे वाक्प्रचार सिद्ध झालेले आहेत, त्यांचे आम्हीं दोन विभाग केले आहेत. शरीराचे अवयव व इंद्रियें, ह्यांचीं द्योतक अशीं जीं नामें त्यांच्या अंतर्भावानें बनलेले जे वाक्प्रचार, ते आम्हीं येथपर्यंत दिले. आतां इतर नामें अंतर्भूत होऊन जे वाक्प्रचार सिद्ध झाले आहेत, ते वर्णानुक्रमानें देतों. दोन्हीही विभागांत नामें प्रायः क्रियापदांच्या साहचर्यानें आलेलीं आहेत, हें विद्यार्थ्यांच्या सहज लक्ष्यांत येण्याजोगें आहे.

६४. **अंगाई करणें**—मुलाला निजवितांना आया जें गाणें म्हणतात त्याच्या आरंभीं 'अंगाई' हा शब्द आहे; यावरून 'अंगाई करणें' म्हणजे निजविणें. मोठ्या माणसांच्यासंबंधानें हा वाक्प्रचार विनोदानें योजण्यांत येतो.

६५. **अग्निकाष्ठें भक्षण करणें**--अग्नींत प्रवेश करणें; स्वतःस जाळून घेणें; उ० आपला पति मृत झाल्याची खबर तिच्या कानीं पडतांच तिनें अग्निकाष्ठें भक्षण करण्याचा निश्चय केला.

६६. **अटकेस झेंडा मिरविणें**, किं० **लावणें**—सिंधु नदीच्या एका फांट्याचें नांव अटक असें आहे.

[ ही नदी हिंदुस्तान आणि अफगाणिस्तान यांच्या सरहद्दीवर आहे मऱ्हाठे वीरांची महत्त्वाकांक्षा अटकेपर्यंत राज्य काबीज करून तेथें आपले झेंडे ( म्ह० स्वामित्वाचीं निशाणें ) उभारण्याची होती. यावरून "अटकेस झेंडा लावणें," वगैरे शब्दसंहतींचा उपयोग शतकृत्य करणें, लोकोत्तर असें कांहीं तरी कृत्य करणें, ह्या अर्थानें होतो. ह्या उपयोगांत निंदा गर्भित असते. ]

६७. **अंडींपिल्लीं बाहेर काढणें**—काळजीपूर्वक लपवून ठेवलेलीं एका द्याचीं रहस्यें, किं० गुप्त गोष्टी, उघडकीस आणणें. [ पक्षी आपलीं अंडें आणि पिलें आपल्या घरट्यांत खोल लपवून ठेवितात. ]

## ६८. अंत.

१. (क) शेवट, मृत्यु, समाप्ति; उ० विषमज्वरानें त्या मुलाचा अंत झाला! उ० माझा ग्रंथ अद्यापि अंतास गेला नाहीं.

(ख) (व्याकरणांत) शेवटचा स्वर; उ० घोडा हा शब्द आकारान्त आहे. उ० वेणी हा शब्द ईकारान्त आहे.

(ग) काम करण्याची, उपयोगीं पडण्याची, ताकद; उ० ह्या धोतरांत आतां कांहीं अंत राहिला नाहीं! तें टाकून देऊन दुसरें घ्या.

२. **अंत पाहाणें**—पुरतेपणीं कसास लावणें; निघेल तितकें काम काढणें. एकाद्या जनावराचा, माणसाचा, किं० पदार्थाचा, होईल तितका उपयोग निर्दयपणें, किं० निःशंकपणें, करून घेणें; त्याची ताकद, जोर, सहनशक्ति, किं० कर्तृत्वशक्ति जितकी असेल, तितकीचा पूर्णपणें उपयोग करारीपणानें करून घेत राहणें; छळणें; गांजणें. उ० देवा, आतां माझा अंत पाहूं नको! सोडीव मला ह्या जाचांतून!

३. **अंत लागणें**—शेवट दिसणें; खोली समजणें, किं० सांपडणें; उ० लोहगडच्या किल्ल्यांत एक गुहा आहे, तींत मलकाप्पा एक मैल गेला, पण तिचा त्याला अंत लागला नाहीं! उ० ह्या विहिरींतील पाण्याचा अंत अद्यापि कोणासही लागलेला नाहीं.

४. **अंताला लागणें**—व्यवस्थित स्वरूप पावणें; शेवटास जाणें; उ० हें कार्य एकदाचें अंताला लागलें!

## ६९. अंतर.

१. दोन वस्तूंतील, किं० स्थितींतील तफावत.

२. **एकाद्याला अंतर देणें**—प्रेम कमी करून त्याचा परित्याग करणें; उ० माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी ह्या धाकट्या भावाला अंतर देणार नाहीं, अशी मी बाबांच्या पुढें शपथ घेतली.

३. **अंतर पडणें**—मित्रत्वांत, प्रेमभावांत, न्यूनता उत्पन्न होणें; उ०

प्रभु त्यासि पुसे, "भ्रात्यासीं हें अतिवैर कसें घडलें।
सांग सविस्तर कोणापासुनि कैसें अंतर पडलें" ॥ मोरो०

७०. **अत्तराचे दिवे जाळणें**—जेथें साध्या तिळाच्या तेलानें काम व्हावयाचें, तेथें तितक्याच प्रकाशासाठीं अत्तरें समयांत घालणें, ही मूर्खपणाची उधळपट्टी होय. यावरून अत्तराचे दिवे जाळणें, म्ह० पैशाची उधळपट्टी करणें.

७१. **अद्दल घडणें**--ठोकर बसणें; मोठें नुकसान होऊन धडा मिळणें. [ अद्दल हा शब्द अरबी असून, त्याचा त्या भाषेंत इनसाफ, न्याय, असा अर्थ आहे; परंतु जे कोणी आपला तंटा तोडून घेण्यासाठीं कोर्टांत जातात, त्यांच्या इच्छेविरुद्ध, ( निदान त्यांपैकीं एकाच्या तरी इच्छेविरुद्ध ), निकाल लागावयाचाच. त्यामुळें हा असंतुष्ट मनुष्य निकालास शिव्या देऊन म्हणतो, " मला मोठी अद्दल घडली ! " अशा रीतीनें "अद्दल" ह्याचा अर्थ मराठींत "ठोकर" असा झाला. पान ५१ मराठी श. उ.; वि. वा. भिडे. ]

## ७२. अन्न.

१. **अन्न**--खाद्य पदार्थ; चरितार्थाचीं साधनें.

२. **अन्न अन्न करणें**--खावयाला अन्न द्या, खावयाला अन्न द्या, अशी काकुळतीनें याचना करणें; अन्नाच्या अभावें हैराण होणें.

३. **एकाद्याला अन्नाला लावणें**--त्याला चरितार्थाचें साधन मिळवून देणें; त्याला नोकरी वगैरे लावून देणें.

४. **एकाद्याच्या अन्नांत माती कालवणें**—त्याच्या चरितार्थाचीं साधनें नाहींशीं करणें.

७३. **एकाद्याच्या अर्ध्या वचनांत असणें**--त्याची आज्ञा पाळण्याला, तो सांगेल तें तत्परतेनें करावयाला, सिद्ध असणें; उ०शिवरामपंत माझ्या अर्ध्या वचनांत आहे. त्याला मीं ही मुलगी सून करून घे असें सांगितल्यास तो तें मान्य करील.

७४. **अर्ध्या हाळकुंडानें पिवळें होणें**--थोड्याशा लाभानें अति आनंदित होणें, किं० फुगून जाणें. [ चांगल्या, किं० वाईट अर्थानें ह्याचा उपयोग होतो. ]

## ७६. अवदसा.

१. अवदसा=अवदशा.

( क ) निकृष्ट, कष्टमय स्थिति; दुर्दैव.

( ख ) द्वाड, भांडखोर, कजाग, स्त्री ( लाक्षणिक अर्थानें ).

२. **अवदसा आठवणें**--निकृष्ट स्थिति प्राप्त होईल, असें वर्तन करण्याची इच्छा होणें. उ०

> अहह ! आठवली मज ही अशी--
> अवदसा; वद साह्य करी कशी ? ॥
>
> लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

७७. **अवाक्षर न बोलणें**, किं० **काढणें**--अक्षरसुद्धां तोंडावाटें न काढणें; उ० तुला मी चतुःशृंगीला नेईन, म्हणून एकदा सांगितलें; आतां त्यासंबंधानें अवाक्षर बोलूं नको! [ ह्याचा उपयोग नेहमीं अकरणरूपीं होतो. ]

७८. **अव्यापारेषु व्यापार करणें**--नसता उद्योग करणें; ज्या उद्योगापासून स्वतःस फायदा होण्यासारखा नाहीं, असा उद्योग करणें.

७९. **अळंटळं करणें**--आपणास जें करावयाचें काम असेल, त्यांत चुकवाचुकव, किं० आळस, करणें; तें लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करणें; तें मन लावून न करणें.

## ८०. अक्षता.

१. कुंकुमानें तांबडे केलेले तांदूळ.

२. **अक्षत देणें**--लग्न, मुंज, वगैरेंच्या समारंभास ज्यांना बोलवावयाचें असेल, त्यांच्या घरीं जाऊन त्यांना कुंकवानें तांबडे केलेले तांदूळ देऊन आमंत्रण करतात, ह्या तांदुळांना "अक्षता" म्हणतात, व ह्या प्रकाराला "अक्षत देणें," असें म्हणतात.

३. **अक्षता पडणें**--विवाहाचे वेळीं वधू व वर, त्यांच्या मस्तकांवर "शुभमंगल सावधान !" असे शब्द उपाध्यायांनीं उच्चारले, म्हणजे अक्षता टाकतात. ह्यावरून "त्याच्या, किं० तिच्या, डोक्यावर अक्षता पडल्या," म्हणजे "त्याचें, किं० तिचें, लग्न झालें," असा अर्थ.

८१. **आ करणें**—तोंड उघडणें. तोंड वासणें. उ०

तूं जेविं देवकीला भेटसि तैसाच भेट आतेला ।
आम्हाहुनि तूंचि अधिक, घृत सोडुनि कोण करिल आ तेला ? ॥

मोरो०—कृष्णशिष्टाई.

## ८२. आकाश.

१. **त्याला आकाश पाताळ एक झालें आहे**—तो अतिगर्वानें फुगून गेला आहे.

२. **आकाश पाताळ एक होणें**—अतिजोराचा पाऊस पडत असणें. [ पाऊस जोरानें पडत असला, म्हणजे पृथ्वीचा पृष्ठभाग व त्याचे वरील घरें, झाडें, वगैरे दिसत नाहींतशीं होऊन जिकडेतिकडे आभाळच असल्याप्रमाणें देखावा दिसतो. ]

३. **आकाश पाताळ एक करणें**--क्षोभ, किं० कल्लोळ करणें; खूप जोरानें आणि मोठमोठ्यानें ओरडून एकाद्याला रागें भरणें; भुकेमुळें अतोनात रडणें ( मुलासंबंधानें ).

४. **आकाशाला घेरा घालणें**—प्रचंड पराक्रम, किं० अवाढव्य काम, करणें; अशक्य म्हणून समजलेलें काम करणें; उ० हें काम तूं पार पाडलेंस, तर तूं आकाशाला घेरा घातलास, असें आम्ही समजूं !

५. **आकाशाची चौघडी करणें**--"आकाशाला घेरा घालणें," ह्याचे प्रमाणेंच अर्थ.

आकाशाची करवेल चौघडी ।
महामेरूची बांधवेल पुडी ।
शून्याची मुरडवेल नरडी ।
परी मनाच्या ओढी अनिवार ॥

ज्ञानेश्वरी.

६. **अस्मान, किं० आकाश, ठेंगणें होणें**—गर्वानें फार फुगून जाणें; गर्वानें आकाशापेक्षांही जणों ज्यास्ती उंच होणें.

८३. **आखाड्यांत उतरणें**--पहिलवान लोकांची कुस्ती खेळावयाची जी जागा, तिला "आखाडा" असें म्हणतात. यावरून "आखाड्यांत

उतरणें," म्हणजे कुस्ती खेळावयास, दोन हात करावयास, किं० वाद-विवाद करावयास, सिद्ध होणें, असा अर्थ होतो.

## ८४. आग.

१. अग्नि; विस्तव.

२. **आग लावणें, किं० आग लावून देणें**—

(क) पेटविणें. उ० चोरट्यांनीं तो गांव लुटला, आणि मग त्याला आग लावून दिली.

(ख) दोन माणसांत कलह उपस्थित करणें; कलागत लावणें; उ० आम्ही सुनेला माहेरीं पाठवून देणार आहों, ही गोष्ट रखमावाईच्या कानावर गेली. तिणें ती गोष्ट लोकांला सांगितली. तेव्हां ती सूनच शेजारचे दहा लोक गोळा करून माझ्यापुढें तणतणावयास आली. एवढी आग लावण्यावांचून रखमावाईला दुसरा कांहीं उद्योग नव्हता काय ?

३. **आगींत तेल ओतणें**—भांडण, किं० राग, ज्यास्ती विकोपास जाईल, असें करणें; उ० मुलगा अभ्यास करीत नाहीं म्हणून नारायणराव अगोदरच त्याच्यावर रागावलेले होते; तशांत त्यानें मधाची कासंडी सकाळीं लवंडली होती, हें गोदीनें पोरस्वभावानें त्यांना सांगितलें. तेव्हां आगींत तेल ओतल्याप्रमाणें झालें. नारायणरावांनीं तिडकीसरशी उठून मुलाच्या पाठींत दहा पंधरा रपाटे हाणले !

[ आगींत तेल ओतल्यानें आग भडकते, ह्याचा उल्लेख पुढील आर्येंत आहे. ]

दीप्तालय विझवाया दाटुनि घालील कोण तेलातें ? ।

मोरो०–उद्यो० अ० ४.

४. **एकाद्यावर आग पाखडणें**—त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव करणें.

**८५. आघाडी साधणें**—इतरांच्या पुढें जाणें, इतरांच्या अगोदर इष्ट वस्तु मिळविणें.

**८६. अडकित्यांत धरणें**—पेंचांत धरणें; अडचणींत घालणें. [ अडकित्यांत सुपारी चांगली धरल्याशिवाय तिचीं चांगलीं शकलें करितां येत नाहींत. ]

८७. **आडवें होणें**--झोंप घेण्याच्या उद्देशानें अंथरुणावर पडणें; उ० दुपारचें जेवण झाल्यावर मी जरा आडवा होईन, आणि नंतर तुझें काम हातीं घेईन.

८८. **आडून गोळी मारणें**--लढाईचे वेळीं शिपाई लोक झाड, टेकडी, वगैरेंच्या आड उभे राहून शत्रूच्या फौजेवर बंदुका झाडतात; त्याप्रमाणें समाजांत कांहीं दुष्ट लोक स्वतः पुढाकार न घेतां दुसऱ्यांस पुढें करून एकाद्याचें नुकसान करतात. त्यांच्या ह्या करणीला "आडून गोळी मारणें," असें म्हणतात.

८९. **आपण मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाहीं**--आपण अंगानें कष्ट सोसल्याशिवाय सुखस्थिति प्राप्त होत नाहीं. ( आपण स्वतः अंगमेहनत केल्याशिवाय काम मनाप्रमाणें होत नाहीं. दुसऱ्यावर विश्वास टाकल्यास काम होतेंच असें नाहीं. )

९०. आभाळ.

१. आकाश; उ० ह्या वेळीं आभाळांत ढग आले आहेत.

२. **एकाद्यावर आभाळ कोसळणें**--त्याला पराकाष्ठेची विपत्ति प्राप्त होणें; त्याच्यावर फार मोठा अनर्थ गुदरणें.

३. **आभाळ फाटणें**, किं० **कोसळणें**--फार मोठा अनर्थ ओढवणें; उ० बाई, रडूं नका ! झाल्या गोष्टीला इलाज नाहीं ! आभाळ फाटलें त्याला ठिगळ कोण देणार ! [ फार पाऊस पडूं लागल्यास 'आज काय आभाळच फाटलें आहे कीं काय कोण जाणें' असेंही म्हणतात. ]

९१. **आयत्या पिठावर रेघा ओढणें**--श्रमावांचून मिळालेल्या संपत्तीवर चैन करणें. ह्याच अर्थाची म्हण. "आयत्या बिळावर नागोबा बळी."

९२. आव.

१. **आव**--धैर्य; उ०

गुरुहि म्हणे, "कर्णा, हा नक्रकचि गरल करुनि आ वमला ।
आहे संकोचें परि सांडुनि गेला मघाचि आव मला" ॥

मोरोपंत.

२. आव घालणें—अवसान दाखविणें; अमुक गोष्ट करावयाला आपण समर्थ आहों, असा डौल मिरविणें; धमकीचा देखावा करून एकाद्या गोष्टीला उपक्रम करणें.

९३. अढी धरणें—मनांत वैरबुद्धि गुप्तपणें जागृत ठेवणें; रुसवा, किं० प्रतिकूल ग्रह, गुप्तपणें कायम ठेवणें. उ०

माझ्याकडोनि घडला अपराध कांहीं
तेणें मनामधिं अढी धरिलीस कां ही ?।
नोहे तरी मजसि टाकुनि मुक्तिगेहीं
गेलीस केंवि अतिदूर पतिव्रताही ? ॥

लक्ष्मण गणेश शास्त्री लेले.

९४. आंवळा देऊन कोहळा काढणें—एकाद्याला लहान वस्तु देऊन त्याचेपासून मोठी वस्तु मिळविणें. ( त्याला गोड गोड भाषणानें फसवून, किं० खूप करून. ) आंवळा हें लहान फळ आहे, आणि कोहोळा हें मोठें फळ आहे, यावरून वरील शब्दसंहति निघाली आहे. [ "कोहळा" शब्दाबद्दल "बेल" हा शब्दही योजण्यांत येतो. ]

९५. आहारीं असणें—आटोक्यांत असणें. जिवाविशेष नसणें. [ जेवढें अन्न कोणा एकाद्या मनुष्यानें खाल्लें असतां सुखानें पचतें, तेवढ्या अन्नास त्याचा "आहार" म्हणतात; यावरून जें काम श्रम वाटल्या शिवाय करतां येण्यासारखें असतें, तें "आहारीं आहे," असें म्हणतात. ]

९६. आळा घालणें—मर्यादा, किं० नियंत्रणा, घालून देणें.

९७. आळशावर गंगा येणें—गंगेच्या उदकाचा कोणाही माणसाला स्पर्श झाला असतां त्या माणसाचा उद्धार होतो. यासाठीं गंगेचें स्नान घडावें, म्हणून सर्व लोक लांबलांबचे प्रवास करावयास सिद्ध होतात. आळशाला देखील आपला उद्धार व्हावा, अशी इच्छा असते; परंतु अंगांत अति आळस असल्यामुळे तो गंगास्नानासाठीं कोठेंही जात नाहीं. परंतु त्याच्यावर प्रसाद करण्यासाठीं गंगाच जर त्याच्याकडे वाहात आली, तर त्याचें मोठें भाग्यच समजलें पाहिजे ! " आळशा-

वर गंगा येणें," म्हणजे आपल्या कल्याणासाठीं मुळींच खटपट न करणाऱ्या माणसाचें सुदैवानें कल्याण होणें; उ० त्यानें नोकरीसाठीं अर्जविर्जं करावयाचे ते कांहींच केले नाहींत. तथापि त्याच्या गुणांवरून रावसाहेबांनीं त्याची एका जागीं नेमणूक केली; परंतु ह्या गृहस्थानें ती जागा नाकारली! आळशावर गंगा आली तरी भाग्य पाहिजे ना?

९८. **इकडचा डोंगर तिकडे करणें**—प्रचंड, किं० फार मोठें, काम करणें.

९९. **इंगा फिरणें**—इंगा म्हणून चांभारांचें हत्यार असतें. तें कातड्यावर जोरानें फिरवून तें कातडें मऊ आणि गुळगुळीत करतात. कातड्यावर इंगा फिरला म्हणजे तें टणक, खरखरीत, किं० राठ, असलें तरी मऊ, गुळगुळीत, व लुसलुशीत, होतें. त्याप्रमाणें "एकाद्या माणसावर इंगा फिरणें," म्ह० तो दुर्दैवाच्या, किंवा समर्थांच्या अवकृपेच्या, तडाख्यांत, सांपडून त्याचा ताठा जाऊन तो नरम होणें.

१००. **इतिश्री करणें**—समाप्त होणें. संस्कृत पुस्तकांच्या शेवटीं, किं० त्यांतील अध्यायांच्या शेवटीं, जें समाप्तिसूचक वाक्य असतें, त्याचे पहिले शब्द "इतिश्री" असे असतात. यावरून इतिश्री म्ह० समाप्ति, किं० शेवट. आणि "इतिश्री करणें, किं० होणें" (म्ह० नाश करणें, संपविणें, किं० नष्ट होणें, संपणें.)

१०१. **इमानास जागणें**—इमान नष्ट होऊं न देणें. इमान शाबूत ठेवणें. पूर्वींचे उपकार कृतज्ञतापूर्वक स्मरणें.

### १०२. ईर.

१. **ईर [सं० वीर्य.] ईर**—शक्ति, जोर, गुण, उत्कर्ष. "ईर" ह्या शब्दाचें "इरेस" असें एकच विभक्तिरूप योजण्यांत येतें.

२. **इरेस घालणें**—आपला बचाव करून घेण्यासाठीं दुसऱ्या कोणास तरी आपल्या पुढें घालणें, किं० टेवणें. [बुद्धिबळाच्या डावांत राजाला प्रतिपक्ष्यानें शह दिला, म्हणजे आपलें कांहीं तरी मोहरें राजाच्या बचावासाठीं पुढें सारतात, त्याला "इरेस घालणें" म्हणतात;] उ० एके प्रसंगीं नाना फडणविसांनीं निजामास इरेस घातलें होतें.

३. **इरेस चढणें**—चुरस लागून पुढें सरसावणें. आपला पराक्रम, हिंमत, वगैरे दाखविण्यासाठीं कंबर बांधून सिद्ध होणें. [“इरेस, किं० इरईस, पडणें” ह्याचाही वरील प्रमाणेंच अर्थ. “इरई” हा “वीरश्री” चा अपभ्रंश. ]

१०३. **उकळी फुटणें**—मनोविकाराचा जोर, किं० क्षोभ, अंतःकरणांत एकाएकीं होणें; उ० जय मिळवून आलेल्या बाजीरावास पाहतांच लोकांना आनंदाची उकळी फुटली. [ अग्निसंयोगानें पाण्याला, दुधाला, वगैरे उकळी फुटते, तें रूपक येथें आधारभूत आहे. ]

१०४. **उकिरडा फुंकणें**—गुरेंढोरें उकिरड्यावर उष्टया पत्रावळी वगैरे चाटीत असतात. यावरून “ उकिरडा फुंकणें ” म्ह० दारिद्र्यामुळें यःकश्चित् लाभासाठीं भटकणें; उ० तूं आतां विद्या करीत नाहींस ! मोठेपणीं उकिरडे फुंकणार कीं काय ?

१०५. **एकाद्याचें उखळ पांढरें होणें**—त्याला वैभव प्राप्त होणें.

१०६. **उखाळ्यापाखाळ्या काढणें**—वर्मेकर्में काढणें. एखाद्याच्या हृदयाला बोचण्यासाठीं त्याच्या पूर्वीच्या गोष्टी काढून त्या बोलून दाखविणें; उ० श्रीनिवासराव आणि पितांबरराव हे एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढून एकसारखे दोन तास भांडत होते !

## १०७. उच्छाद.

१. उपद्रव, सतावणूक, गांजणूक. [ क्रियापदें, आणणें, देणें, येणें. ]

२. **एकाद्याला उच्छाद देणें**—त्याला सतावणें.

३. **उच्छाद येणें**—त्रास, उपद्रव होणें; उ० मुलांच्या धिंगामस्तीनें मला उच्छाद आला आहे.

४. **उच्छाद काढणें**—गांजणूक सोसणें; उ० ह्या मुलांचा उच्छाद मी काढूं तरी किती ?

१०८. **उजेड पाडणें**—प्रकाश पाडणें; मोठें कृत्य करणें. [ याची नेहेमीं उपहासानें योजना होते. ] उ० आम्हीं तर हात टेकले ! आतां तुम्ही काय उजेड पाडतां पाहूं !

१०९. **उठतां लाथ आणि बसतां बुक्की**--सदासर्वदा मार; उ० तुला उठतां लाथ आणि बसतां बुक्की असें पाहिजे. एऱ्हवीं तूं ताळ्यावर येणार नाहींस !

११०. **उडत्या पांखराचीं पिसें मोजणारा**--पांखरूं उडत असतां त्याचीं पिसें मोजणें हें काम अशक्य, किं० दुर्घट, आहे. तें जो कोणी करूं शकेल, तो हुशारच असला पाहिजे. यावरून " उडत्या पांखराचीं पिसें मोजणारा, " म्हणजे हुशार, कावेबाज, पाताळयंत्री, माणूस असा अर्थ होतो. [ नेहमीं वाईट अर्थानें ही शब्दसंहति योजण्यांत येते. ]

१११. **उदक सोडणें**--ब्राम्हणाला दान करते वेळीं द्यावयाच्या वस्तूवर यजमान उदक, म्हणजे पाणी, सोडतो. यावरून "एकाद्या वस्तूवर उदक सोडणें," म्हणजे ती देऊन टाकणें, तिच्यावर आपली मालकी नाहीं असें म्हणणें; तिच्याबद्दल हळहळ वाटून न घेणें, असा अर्थ होतो.

११२. **उधे उधे करणें**—" उधे, उधे " हा शब्द अंबाबाईचे भक्त तिच्या-पुढें उच्चारतात. यावरून एकाद्या गोष्टीचा 'उधे उधे करणें,' म्हणजे तिचे अतोनात गोडवे गाणें, तिचा जयजयकार करणें.

११३. **उंबर फोडून कॅंबरें काढणें**--उंबराच्या फळांत जे क्षुद्र जंतु असतात, त्यांना "कॅंबरें" म्हणतात. मोठ्या कामाची नासाडी करून जेव्हां लहान काम कोणी करतो, तेव्हां "त्याणें उंबर फोडून कॅंबरें काढलीं," असें म्हणतात.

११४. **उंबरघांट**—उंबरा हाच कोणी घांट. पर्वताचा घांट वलांडणें, हें फार कठिण असतें. त्याप्रमाणें घराचा उंबरा वलांडून बाहेर निघणें, हें महा कर्म कठिण असतें. कारण घरांतून विद्या, नोकरी, धंदा, वगैरेंसाठीं बाहेर गांवीं पडणें प्रत्येकाच्या जिवावर येतें. तेव्हां तो म्हणतो, " हा उंबरघांट वलांडणें म्हणजे महा कर्म कठिण आहे ! "

११५. **घराचा उंबरठा चढणें**—घरांत प्रवेश करणें. उ० माझ्या घरांतील गोष्टी तूं चारचौघांत सांगतोस, हें बरें नाहीं. पुन्हा माझ्या घरचा क्षुल्लक

जरी गोष्ट तूं बाहेर कोणाला सांगितलीस, तरी माझ्या घराचा उंबरठा चढण्याची तुला मी मनाई करीन !

११६. **ऊत येणें**—भात, कढी, दूध, खीर, वगैरे पदार्थ चुलीवर ठेविले, म्हणजे ते उतूं जातात, म्हणजे त्यांतील पाण्याचा अंश फेस आणि वाफ यांच्या रूपानें बाहेर पडतो. हा अंश भांड्यांत राहूं शकत नाहीं. यावरून "ऊत येणें," म्हणजे आंत न राहण्याइतकें पुष्कळ होणें, किं० संख्या, अथवा परिणाम वाढणें; उ० हल्लीं व्याख्यानांना, प्रहसनांना, मारामाऱ्यांना, ऊत आला आहे. उ० यंदा आंब्यांना ऊत आला आहे.

११७. **ऊहापोह करणें**—चर्चा करणें. ऊह=तर्क; अपोह=उलटा तर्क. "एकाद्या विषयाचा ऊहापोह करणें," म्ह० त्याच्यासंबंधीं सर्व बाजूंनीं तर्कवितर्क करणें, किं० त्याची पुरती शहानिशा करणें.

११८. **एक नाहीं कीं दोन नाहीं**—मुळींच कांहीं उत्तर नाहीं; उ० "तुला कोणीं मारलें," म्हणून मी त्याला दहा वेळा विचारिलें. पण तो आपला स्वस्थ उभा ! एक नाहीं कीं दोन नाहीं !

११९. **एका नावेंत असणें**—एकाच परिस्थितींत असणें. हें एका इंग्रेजी संप्रदायाचें मराठी भाषांतर आहे. हा प्रचार मराठींत अद्यापि रूढ झालेला नाहीं.

१२०. **एका पायावर तयार असणें**—एकादी गोष्ट करावयाला अत्यंत उत्सुक असणें; उ० माझी मुलगी फिरायाला जावयाला एका पायावर तयार असते. उ० मारामारी करावयाला सटवाजी सदा एका पायावर तयार असतो !

१२१. **एकूण क्षेत्रफळ सारखेंच**—एकूण एकच. [ एकाद्या खोलीची लांबी ६ फूट, आणि रुंदी ४ फूट असली, तर तिचें क्षेत्रफळ २४ चौरस फूट होतें. तिची लांबी वाढवून ८ केली, आणि रुंदी कमी करून ३ केली, तरी तिचें क्षेत्रफळ चोवीस चौरस फूट होतें. यावरून एक पदार्थ कमी केल्यानें जर दुसरा वाढविण्याचा प्रसंग आला, तर "एकूण क्षेत्रफळ सारखेंच," असें म्हणतात. ]

१२२. **ओचा ठो करतां न येणें**—मुळींच कांहीं न येणें. मुलाच्या विद्येला सुरवात करतांना त्याला "ओनामासिधं," [ "ओम् नमः सिद्धम्" याचा अपभ्रंश] शिकवितात. "ओनामासिधं" याचें पहिलें अक्षर "ओ" हें आहे. तेंही ज्याला येत नाहीं, तो ठोंब्याच असावयाचा. "ठो" हें अक्षर "ओ" शीं यमक साधण्यासाठींच केवळ योजलेलें आहे.

१२३. **ओम्फस् होणें**--निष्फल होणें; लयास जाणें; उ० आम्ही आदित्यवारीं अंबरनाथास वनभोजनासाठीं जाणार होतों; परंतु आदित्यवार उजाडतो, तों अशी खबर आली कीं, त्या गांवीं पटकीचा उपद्रव आहे. तेव्हां आमचें जाणें रहित होऊन सारेंच ओम्फस् झालें !

१२४. **ओ म्हणतां ठो येईना**--अगदीं कांहीं येईना! अगदींच मतिमंद ! [ मागें अंक १२२ पहा. ]

१२५. **औषधाला नसणें**—औषधाला पदार्थ घ्यावयाचा, तो अगदीं अल्प प्रमाणांत घ्यावयाचा असतो. तेवढाही पदार्थ नसणें, म्हणजे मुळींच नसणें.

१२६. **कच्छपीं लागणें**—आपलें कार्य साधण्यासाठीं दुसऱ्याच्या कासोट्याप्रमाणें त्याच्या मागोमाग जाणें; स्वकार्यास्तव एकादाच्या मागें लागणें; पाठ पुरविणें; उ० रामराव कापडवाला आलीकडे गोवर्धनपंतांच्या कच्छपीं लागला आहे ! आपल्या दुकानांतील कापड त्यांनीं खरेदी करीत जावें, हाच त्याचा उद्देश दिसतो. [ कच्छ म्ह० कासोटा, त्याचें "कच्छप" हें विनोदी, किं० आडमुठें, रूप. ]

१२७. **एकाद्याची कणीक तिंबणें**--त्याला झोडपणें, किं० खूप मार देणें. [ पोळ्या करावयाच्या अगोदर कणीक मुठींनीं खूप मळावी लागते, तसें एकाद्याचें अंग खूप मळणें. ]

१२८. **कडेलोट**—पूर्वीच्या काळीं कोणाला अतिमोठा, किं० परमावधीचा, देहदंड करावयाचा असतां त्याला कड्यावरून खालीं लोटीत असत. ह्याला "कडेलोट करणें," असें म्हणत. यावरून "एकाद्या गोष्टीचा

कडेलोट होणें," म्हणजे तिचा परमावधि होणें; उ० आम्ही मुलीच्या लग्नासाठीं कडेलोट म्हणजे पांचशें रुपये खर्च करूं ! उ० त्या स्त्रीचा नवरा मेला. त्याच्या पाठोपाठ तिचा एकुलता एक मुलगा मेला ! तिच्या दुःखाचा कडेलोट झाला !

१२९. **कढी पातळ होणें**—आजारानें, किं० भीतीनें, जर्जर होणें.

१३०. **कण्या टाकून कोंवडीं झुंजविणें**--आपला पैसा वगैरे खर्चून दोघांत कलागत उत्पन्न करून देऊन ते भांडूं लागले असतां त्याची गंमत पाहाणें. [ " कण्या " बद्दल " दाणे " असाही शब्द योजतात. ]

१३१. **एकाद्याचा कपाळमोक्ष करणें**—त्याला खूप झोडपणें. त्याचा नाश करणें. [ चितेवर प्रेत ठेविलें म्हणजे दगडानें त्याच्या कपाळावर आघात करतात, ह्या चालीवरून वरील वाक्प्रचाराची उत्पत्ति आहे. ]

१३२. **कलम करणें**--छाटून टाकणें; उ० माझ्या हिशेबांत एक चुकी निघाली, तर मी आपला हात कलम करून देईन ! उ० चोरी करील त्याचा हात कलम करावयाची कित्येक देशांत चाल आहे !

१३३. **कल्पांत करणें**—ब्रह्मदेवाच्या एका दिवसास"कल्प"असें म्हणतात. ह्या दिवसाचा जो अंत, म्हणजे शेवट, तो कल्पांत. कल्पांताचे समयीं पृथ्वी, आप, तेज, वगैरे पंच महाभूतांचा भयंकर क्षोभ होऊन जगाचा नाश होतो, ह्यावरून "कल्पांत करणें," ह्याचा उपयोग मोठा क्षोभ करणें, भयंकर आक्रांत, किं० कल्लोळ करणें, ह्या अर्थानें केला जातो; उ० आमच्या मुलांना रोज दहा वाजतां जेवणाची संवय आहे. काल आमच्या येथें श्राद्धविधि व्हावयाचा होता, म्हणून जेवणाला बारा वाजले, तेव्हां मुलांनीं जो कल्पांत केला तो सांगतां सोय नाहीं !

## १३४. कस.

१. [ सं. कषाय ] सार, पौष्टिक अंश, सत्त्व, सामर्थ्य, शक्ति, जोर; उ० नदीकांठची जमीन कसाला चांगली असते; उ० अंबाबाई गवळणीचें दूध कसाला चांगलें असतें.

२. [ सं० कर्ष्–रेघा ओढणें ] कसोटीवर घासून सोनें, रूपें, वगैरेंची ठरविलेली शुद्धता, किं० शुद्धतेचें प्रमाण, किं० ही शुद्धता ठरविण्यासाठीं कसोटीवर काढलेली रेघा; उ० हें सोनें कसाला ज्यास्ती भरेल; उ० ह्या सोन्याला कस लावून पहा.

३. मनुष्याच्या अंगचे गुणांची योग्यता, किं० त्या योग्यतेची परीक्षा; उ०

नरहरिनामा पावे संत न सोनार दासमान कसा ? ।
तरला करुनि भवाचा अंत, नसो नारदासमान कसा ? ॥

४. **कसाला उतरणें**—कस लाविला असतां उत्तम ठरणें; परीक्षा केली असतां उत्कृष्ट असा आढळून येणें; उ०

तुजविणें दुसरें दिसतें न ज्या
जन कसा न कसा उतरे तुझ्या ? ।

लक्ष्मण गणेश शास्त्री लेले.

१३५. **कसपटाप्रमाणें मानणें**—कसपट म्हणजे लांकूड, गवत, वगैरेंचें कुसळ; त्याचे प्रमाणें मानणें, म्हणजे क्षुल्लक, कुचकिमतीचा, भिकार, मानणें.

१३६. **कळ लावणें**—दोघांत भांडण उपस्थित व्हावें म्हणून एकापाशीं दुसऱ्याची कांहीं तरी चाहाडी करणें; [ कळ=कलि=भांडण. ]

१३७. **कळस होणें**—देऊळ वगैरे इमारतीवर कळस ठेविला, म्हणजे बांधकामाची पूर्णता झाली, किंवा तें बांधकाम व्हावयाचें तितकें उंच झालें, असें होतें. त्याप्रमाणें "एकाद्या गोष्टीचा कळस होणें," म्हणजे ती पूर्ण वैभवास चढणें, किं० तिचा जोर, तीव्रता, विस्तार, वगैरेंची पूर्ण वाढ होणें. [ ही शब्दसंहति चांगल्या व वाईट अर्थानें योजण्यांत येते; ] उ० मऱ्हाठ्यांचा राज्याचा कळस; दुःखाचा कळस; इ०.

१३८. **कळी उमलणें**—फुलाची कळी उमलली, म्हणजे तें फूल विकास पावून सुंदर दिसूं लागतें. " एकाद्या माणसाची कळी उमलणें," म्ह० त्याचें औदासीन्य, किं० रुसवा, जाऊन त्याचा चेहेरा प्रफुल्लित होणें, आणि रंगेलपणानें संभाषण करण्याकडे त्याची प्रवृत्ति होणें.

## १३९. काकुळती.

१. (क) हीनदीनपणाची याचना; उ० मीं इतका वेळ तुझी काकुळती केली; तरी तुझ्या मनाला द्रव येत नाहीं काय ?

(ख) दया, अनुकंपा; उ० देवा, तुला माझी काकुळती येत नाहीं काय ?

२. **काकुळतीस येणें**––आपण हीन, दीन, अनाथ, आहों, ह्या भावनेनें नम्रपणा स्वीकारणें; उ० मी इतका वेळ काकुळतीस येऊन तुजजवळ दहा रुपये उसने मागितले, ते द्यावयाची तुला बुद्धि होत नाहीं काय ?

१४०. **कांकू करणें**—अनमान करणें, मागें मागें घेणें, कचरणें.

१४१. **कांगाव करणें**––आपणाला वाईट रीतीनें, अन्यायानें, किं० क्रूरपणानें, वागविण्यांत आलें, असें भासविणें; उ० तुला मुळींच लागलें नाहीं ! तूं उगीच कांगाव करीत आहेस !

## १४२. कांटा.

१. (क) वृक्षादिकांचें बुंध, फांद्या, पानें, फळें, वगैरेंवर जे ताठ, अणकोचीदार अवयव असतात ते. उ० बाभळीचा, बोरीचा, कांटा.

(ख) हर्ष, भयंकर देखावा, वगैरेंनीं अंगावर येणारा रोमांच.

(ग) ताजवा, तराजू, यांच्या दांडीस मध्याला जो दांडीची स्थिति दर्शविणारा अवयव असतो तो.

(घ) तराजू.

(ङ) ज्वरादिकांमुळें अंगावर पुरळ उठतो तो.

(च) ज्वर, हिंव.

(छ) कोयंडा बंद करणारा जो कुलपाचा अवयव तो.

(ज) विंचवाच्या नांगीचें अग्र.

(झ) वेळू, चिंचा, वगैरेंचा तुरा

(ञ) घड्याळाच्या तबकडीवरील तासांचे अंक, किं० मिनिटें, दाखविणारे जे अवयव ते प्रत्येक.

(ट) कांट्याच्या आकाराचा कोणताही पदार्थ.

(ठ) कंबर, मान, पाठ, यांचे आंत आधारभूत जो अस्थिविशेष तो.
(ड) गुणाकार व भागाकार, यांचा ताळा पाहातांना जी फुली × करतात ती.
(ढ) राघू, मैना, इत्यादिकांचे गळ्यांत एक रोग होतो तो.
(ण) शत्रु (लाक्षणिक अर्थानें).

२. **पाण्याचा कांटा मोडणें**--अग्निसंयोगानें पाण्याच्या अंगीं थोडीशी उष्णता येणें.

३. **कांट्यानें कांटा काढणें**--एका दुष्टाच्या हातून दुसऱ्या दुष्टाचें शासन होईल असें करणें.

४. **कांटा काढणें**—आपल्या मार्गांत असलेल्या, किं० आपणास पदोपदीं नडविणाऱ्या, शत्रूस दूर करणें, किं० त्याचा विध्वंस करणें.

५. **अंगावर कांटा उभा राहणें**—(क) रोमांच येणें. अत्यंत भयंकर, क्रूर, किं० धाडसी, कृत्य पाहून, वाचून, किंवा ऐकून, अंगावरचे केश ताठ उभे राहतात; असें झालें म्हणजे "अंगावर कांटा उभा राहिला," असें म्हणतात. उ० चोरांनीं मुलाचे वाळे काढून घेण्यासाठीं त्याचे पाय कुऱ्हाडीनें तोडले, आणि मग त्याचें प्रेत निवडुंगाच्या वनांत टाकिलें, ही बातमी ऐकून माझ्या अंगावर कांटा उभा राहिला! उ० औरंगजेबानें संभाजीचे कसे कसे हाल केले, ही हकीगत वाचून अंगावर कांटा उभा राहातो!
(ख) थंडीमुळें अंगाच्या त्वचेवरील केश ताठ होऊन उभे राहणें.

६. **कांट्याचा नायटा होणें**--यःकश्चित् कांटा अंगांत बोचून देखील त्याची दुखापत विकोपास जाऊन त्याला नायट्याचें स्वरूप प्राप्त होतें. क्षुल्लक गोष्टीचा परिणाम भयंकर होऊं शकतो.

७. **काळजी कांटा**--चिंता.

१४३. **काडीनें औषध लाविणें**--दुसऱ्याच्या गळवाला, फोडाला, किं० जखमेला, दुरून औषध लावणें, (बोटानें औषध लावल्यास त्याच्या दर्दाचें विष आपल्या अंगीं भिनेल ह्या भीतीनें). उठवळपणानें दुसऱ्याच्या अडचणीस उपयोगीं पडणें.

१४४. **काडी मोडून देणें**—हलक्या जातींत विवाहसंबंध तोडावयाचा असतां नवरा आणि बायको चार मंडळींसमक्ष गवताची काडी मोडून एकमेकांच्या हातीं देतात. " काडी मोडून देणें, " म्ह० वैवाहिक संबंध जाहीर रीतीनें मोडून टाकणें.

१४५. **काथ्याकूट करणें**—नारळाच्या कवचांतील जे तंतु, त्यांना " काथ्या " म्हणतात. ते तंतु कुटून, धुऊन, नंतर त्यांच्या दोऱ्या वगैरे करतात. हें काथ्या कुटण्याचें काम श्रमाचें असून नीरस व कंटाळवाणें असतें. यावरून " एकाद्या गोष्टीची काथ्याकूट करणें, " म्हणजे त्या गोष्टीसंबंधानें निष्फळ व कंटाळवाणी चर्चा पुन्हा पुन्हा करणें.

१४६. **कापूस महाग करणें**—कृश होणें. [ उपपत्ति खालीं १४७ त पहा. ]

१४७. **कापूस सवंग करणें**—कापूस थोडा असूनही पिंजारलेल्या स्थितींत तो पुष्कळ दिसतो. फोपश्या मनुष्यासंबंधानें विनोदानें ह्या संहतीचा उपयोग करतात; उ० कसें काय नारायणराव, आलीकडे कापूस भारी सवंग केला आहेत ! किं० कापूस फार सवंग झाला आहे वाटतें !

## १४८. काम.

१. (क) कर्म, कृत्य.

(ख) उद्योग; धंदा. उ० तुमच्या मुलाला काय काम आहे ? ( म्ह० कोणती नोकरी आहे ? त्याचा धंदा काय आहे ? )

(ग) प्रकरण; हातीं घेतलेला, किं० पथकरलेला व्यवसायविशेष.

(घ) साध्य वस्तु.

(ङ) उपयोग, जरूरी. उ० मला सध्या तुझ्या कोशाचें काम नाहीं.

(च) उपयोगीं पडण्याचा गुण, किं० काम करण्याची ताकद, हातोटी, इ०; उ० आमच्या सुनेच्या अंगीं कांहीं देखील काम नाहीं !

२. **काम चोरणें**—कुचरपणानें काम करणें; आळसानें, रेंगाळत, काम करणें; उ० हा गंवडी काम चोरणारा आहे !

३. **कामांत काम करून घेणें**—मोठें काम चाललेलें असतां त्याच्या साधनांनीं त्याच्याच जातीचें एकादें लहानसें काम साधून घेणें; उ०

आमच्या घराचा कारखाना चाललेला होता, तेव्हां मीं तीन घडवंच्या करविल्या ! कामांत काम करून घेतलें !

४. **एकाद्याचें काम काढणें**—

(क) त्याला जेरीस आणणें, किं० सतावणें.

(ख) त्याचा नक्षा उतरणें; त्याच्या गर्वाचा परिहार करणें.

(ग) त्याला ठार मारणें.

५. **कामांतून जाणें**—निरुपयोगी होणें; उ० हें उपरणें आतां कामांतून गेलें! ( म्ह० अंगावर घेण्याच्या लायकीचें नाहीं ! )

६. **एकाद्या वस्तूचें**, किं० **माणसाचें, काम करणें**—तत्संबंधानें बंदोबस्त करणें; ती वस्तु, किं० तें माणूस, आपल्या वेताआड न येईल, असें करणें.

७. **कामाला येणें**—

(क) उपयोगीं पडणें; उ०

पिता पुत्र हे, आप्तहि, मानुनि, गौरविलें सर्वां।
परंतु कोणी नये कामा ममता जिवभावा।
तेव्हां हे मायिक जाणुनि आठविले तव पाय ॥

मुकुंदराज.

उ० कठिण समय येतां कोण कामास येतो ? रघुनाथ पंडित.

उ० तो आप्तोत्तम, कामा ये जो धावोनि अवसरीं विषमीं ॥ मोरो०

(ख) लढाईत मारला जाणें, [ कामीं येणें, किं० पडणें, असाही प्रयोग होतो. ]

(ग) पथकरलें जाणें; सहन केलें जाणें; उ० तूं अशा रीतीनें वागलास, तर तें माझ्या कामास येणार नाहीं !

१४९. **कालवाकालव होणें**—

(क) कोणताही मनोविकार प्रबल झाल्यानें मनामध्यें अस्वस्थता उत्पन्न होणें; उ० रोम शहर जुलमी पोपाच्या व फ्रेंच राजाच्या ताब्यांत गेलेलें पाहून जोसेफ् ग्यारिबाल्डीचे मनांत कालवाकालव होऊन जात असे. ग्या० च०—न० चिं० केळकर.

(ख) पोटांत कालवाकालव होणें; भुकेनें व्याकुल होणें.

१५०. **किल्ली फिरविणें**-गुप्तपणें बंदोबस्त करून ठेवणें. उ० हल्लीं आमच्या कचेरींत कामें फार आलीं आहेत. नारायणरावांनीं एक महिन्याची रजा घेऊन काम चुकविण्याचा विचार केला आहे. ते गेले, तर सारें काम मजवर पडेल, म्हणून मी साहेबाजवळ किल्ली फिरवून ठेविली आहे ! आतां नारायणरावांस रजा मिळणार नाहीं !

१५१. **कीस काढणें**--बारकाईनें चर्चा करणें; फार फार चिकित्सा करणें.

१५२. **किंतू येणें**—संशय येणें; उ० मजविषयीं तुझ्या मनांत कांहीं किंतू आला आहे, असें मला वाटतें !

१५३. **कुत्र्याचे पाय मांजरावर, आणि मांजराचे पाय कुत्र्यावर घालणें**—लटपटी करणें; भलभलत्या खटपटी करणें; (आपलें कार्य साधण्यासाठीं, किं० केवळ गमतीखातर, किं० आडमार्गाची हौस असल्यामुळें.)

१५४. **एकाद्यावर कुभांड रचणें**—त्याच्यावर खोटा आरोप करणें; त्याच्यावर तोहमत घेणें.

१५५. **कुरघोडी करणें**— " कुरघोडी " म्हणून मुलांचा एक खेळ आहे. ज्याच्यावर डाव लागतो, त्याच्या पाठीवर खेळगडी स्वार होऊन बसतो. यावरून " एकाद्यावर कुरघोडी करणें, " म्हणजे त्याच्यावर आपलें स्वामित्व गाजविणें.

१५६. **एकाद्याचें कोड पुरविणें**—त्यानें आतुरतेनें मागितलेली वस्तु त्याला देऊन त्याला आनंदित करणें.

१५७. **कोलीत लावणें**—"कोलीत" म्ह० ज्याचें एक टोक पेटलेलें आहे, असें लाकूड, किं० अशी धलपी. एकाद्या पदार्थाला कोलीत लाविली असतां तें जळूं लागतें. ह्यावरून " कोलीत लावणें, " ह्याचा " कलागत लावणें, " " दोघांत भांडण होईल असें करणें, " असा लक्षणेनें अर्थ झाला.

१५८. **क्रिया करणें**—मृत मनुष्यासंबंधाचा जो विधि, तो करणें; उ०

करुनि क्रिया पित्याची गेला तो श्रितभवाब्धिसेतुकडे ।
पौर, सचिवहि, अग्राचे तच्चुंबकमणिकडे असे तुकडे ॥

मोरो०–वन०–अ० १०–आ० ८३.

## १५९. खडा.

१. ( क ) दगडाचा अगदीं लहान खंड.

( ख ) हिरा, माणिक, पाच, वगैरे कोंदणांत बसविलेलें मूल्यवान् रत्न.

२. **खडा टाकून ठाव पाहाणें**—पाण्याची खोली ठोकळ मानानें ठरवावयाची असतां पाण्यांत खडा टाकतात; म्हणजे आवाज, बुडबुडे, पाण्याच्या पृष्ठभागावरचीं वर्तुळें, वगैरेंवरून पाण्याची खोली समजते. त्याप्रमाणें एकाद्या माणसाला एकादा साधासा दिसणारा परंतु खुबीदार प्रश्न विचारावयाचा, किं० सहजपणाच्या आविर्भावानें त्याच्यापुढें एकादें विधान करावयाचें, आणि त्यावर त्याचे जे उद्गार निघतात, त्यांवरून त्याच्या मनाचा कल जाणावयाचा, ह्याला " खडा टाकून ठाव पाहाणें, " असें म्हणतात. [ वरील वाक्यांत " ठाव " हा शब्द न घातला तरी तोच अर्थ होतो. ]

३. **एकाद्याला खडे चारणें, किं० खावयास लावणें**—त्याची धूळधाण करणें; त्याला हालअपेष्टा भोगावयाला लावणें.

४. **एकाद्याच्या नांवानें खडे फोडणें**—त्याला व्यर्थ दोष देणें; त्याच्यावर उगाच टपका ठेवणें.

( क ) त्याला शिव्याशाप देणें.

५. **खड्यासारखा बाहेर पडणें**—निरुपयोगी ठरून वगळला जाणें, खपण्याजोगा नाहीं असें स्पष्टपणें ठरणें; उ० लांचखाऊ मंडळींतून तो खड्यासारखा बाहेर पडला. [ ' खड्यासारखा निवडून पडणें, " ह्याचाही वरील अर्थानें उपयोग होतो. ]

## १६०. एकाद्या माणसाची, किं० वस्तूची, खंत घेणें.—

( क ) त्याचेसाठीं जिवाला तळमळ लावून घेणें; उ० आई मेल्यापासून त्या लेकरानें भारी खंत घेतली आहे.

(ख) ती आवडेनाशी होणें; उ० माझ्या मनानें मेथकुटाची खंत घेतली आहे; (म्ह० मला मेथकुटाची किळस आली आहे.)

१६१. **एकाद्याची खरड, किं० खरडपट्टी, काढणें**—त्याची तासडपट्टी काढणें; त्याचा दोष, किं० अपराध, दाखवून त्याची निर्भर्त्सना करणें; त्याच्यावर ताशेरा झाडणें.

१६२. **खरपूस ताकीत करणें**––न विसरली जाईल अशी ताकीद देणें. निक्षून वजावणें, किं० सांगणें.

१६३. **खरपूस समाचार घेणें**––यथायोग्य पारिपत्य करणें.

१६४. **खसखस पिकणें**—खस् खस् असा आवाज करून एका, किं० अनेक, माणसांनीं रंगेलपणानें हसत सुटणें.

१६५. **खळखळ करणें**—एकाद्या गोष्टीविषयीं नाखुषी दाखवून ती न करण्याचा हट्ट घेणें; एकादी गोष्ट करावयाला मागें आढेवेढे घेणें.

१६६. **खाऊन ढेकर देणें**––दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करून ती आपलीशी करून टाकणें.

१६७. **खाखा सुटणें**––एकसारखें खात असावें अशी प्रवृत्ति होणें. क्षुधा अतोनात प्रदीप्त होणें. हांव सुटणें.

१६८. **खाजवून खरूज काढणें**—वळेंच कुरापत काढून भांडण उपस्थित करणें.

१६९. **खातेंपोतें बरोबर असणें**—आदा आणि खर्च हीं सारखीं असणें; जितका आदा तितका खर्च अशी स्थिति असणें; जितकें आपणास लोकांकडून येणें, तितकेंच आपण लोकांचें देणें असणें.

१७०. **एकाद्याच्या डोक्यावर खापर फोडणें**––त्याच्या माथीं उगीच दोष लावणें. त्याच्यावर विनाकारण टपका ठेवणें. "एकाद्याच्या डोक्यावर खापर फुटणें," (म्ह० त्याच्याकडे निष्कारण दोष येणें.)

१७१. **खाल्या घरचे वासे मोजणें**––कृतघ्नपणा करणें; आपल्या आश्रयदात्याचें नुकसान झालें, किं० त्याला दारिद्र्य आलें, तर आपला काय फायदा होईल, हा विचार करीत बसणें.

१७२. **एकाद्याच्या पदरास खार लागणें**--त्याला नुकसान सोसावें लागणें, किं० झीज सोसावी लागणें.

१७३. **खुंटी पिरगाळणें**--दुसऱ्या कोणी आपल्या योजनेच्या, किं० आरंभिलेल्या कार्याच्या, विरुद्ध कांहीं खटपट केली असतां ती सफल होऊं नये, म्हणून अगोदरच आपण सावधगिरीनें तजवीज करून ठेवणें; [ वीणेच्या तारा सुस्वर वाजावयासाठीं त्या तारा बेतानें ताणाव्या लागतात. हें ताणण्याचें काम खुंटयांनीं केलें जातें; यावरून ही शब्द-संहति उत्पन्न झाली आहे. ]

१७४. **खो घालणें**—" खोखो, " हा मुलांचा खेळ आहे. त्यांत एक धांवणारा मुलगा असतो. त्याच्या मनांत ज्याला उठवावयाचें असेल, त्याला तो " खो " म्हणून उठवितो. यावरून " खो घालणें, " म्ह० अधिकारापासून एकाद्याला भ्रष्ट करणें, किं० एकाद्या सुरळीतपणें चाललेल्या कामांत विघ्न आणणें.

१७५. **खोड ठेवणें**—बारीक नजरेनें पाहून दोष काढणें.

१७६. **एकाद्याची खोड मोडणें**--

(क) त्याच्या अपराधाबद्दल इतकी कडक शिक्षा करणें, कीं पुन्हा तसला अपराध तो करणार नाहीं.

(ख) त्याची वाईट संवय घालविणें.

१७७. **खोदखोदून विचारणें**—एकाद्याच्याकडून कांहीं वृत्तांत, किं० गुप्त गोष्ट, काढण्यासाठीं अनेक तऱ्हांनीं त्याला बारकाईनें आग्रहाचे किं० डावपेंचाचे, प्रश्न विचारणें.

१७८. **गंगेस घोडे न्हाणें**--मोठें कृत्य तडीस लागणें; उ० माझ्या मुलाची परीक्षा उतरून त्याला नोकरी लागली ! एकदाचे गंगेस घोडे न्हाले ! [ " गंगेंत घोडे न्हाणें, " असाही प्रयोग आहे. ]

१७९. **गचांडी देणें**—अर्धचंद्र देणें; उ० गलेलठ्ठ भिकारी त्याच्या दाराशीं गेल्यास तो त्यांना बेलाशक गचांडी देऊन हाकलून काढतो.

## १८०. गच्छंती.

१. नाश, पराभव, सामर्थ्यभंग. [ सं. गम्, गच्छ्, म्ह० जाणें. ]

२. **गच्छंती होणें**—शक्ति नाहींशी होणें; उ० ह्या बुंदांच्या लाडवांत माझी गच्छंती झाली; आतां जिलब्या काय खाऊं ?

३. **एकाद्याची गच्छंती करणें**—त्याचा नाश करणें.

४. **गच्छंती करणें**—सुळकुदिशी निघून जाणें; नजर चुकवून पळून जाणें.

१८१. **गट**, किं० **गट्ट, करणें**—खाऊन टाकणें; गिळून टाकणें; उ० त्या माकडानें हां हां म्हणतां अच्छेर दाणे गट्ट केले ! [ गिळतांना जो आवाज होतो, त्याचा अनुकरणवाचक शब्द ' गट् ' आहे. ]

१८२. **गडप करणें**—नाहींसा करणें; लपणें; खाऊन टाकणें.

## १८३. गंडा.

१. **गंडा**—गायनादि कला शिकविणारे लोक शिकणाराचे मनगटास दोरा बांधतात, आणि मग शिकविण्याला आरंभ करतात. त्या दोऱ्याला " गंडा " म्हणतात.

२. **एकाद्याला गंडा बांधणें**—त्याला शिष्य करणें; त्याला आपल्या मंडळींत अंतर्भूत करून घेणें.

३. **एकाद्याला गंडा घालणें**—त्याला फसविणें; उ० त्या दुकानदारानें मला तीन आण्याला गंडा घातला !

१८४. **एकाद्याची गडी फू करणें**—त्याची मैत्री, किं० सहवास, सोडून देणें. [ एका मुलाचें दुसऱ्याशीं भांडण झालें, म्हणजे तो त्याला " तुझी गडी फू ! " असें म्हणून त्याच्याशीं तिऱ्हाईतपणाच्या नात्यानें, किं० शत्रुत्वानें, वागूं लागतो. मोठ्या माणसांच्या संबंधानें ही शब्दसंहति विनोदानें योजण्यांत येते. ]

१८५. **गणेशटोपी घालणें**—मुलें खेळतांना एकाच्या डोक्यावर चिरगुट टाकून त्याला कांहीं दिसणार नाहीं, असें करतात आणि मग धोतराचा तोया त्याच्या पाठीवर मारतात. तोया कोणीं मारला, हें त्या अंध

केलेल्या मुलानें ओळखलें, म्हणजे त्याच्यावरचें चोरपण जातें. चिरगूट बांधून एकाद्याला अंध करण्याला " गणेशटोपी घालणें, " म्हणतात. ह्यावरून " एकाद्याला गणेशटोपी घालणें, " म्हणजे त्याला फसविणें. [ " एकाद्याला टोपी घालणें " असाही वरील अर्थानें प्रयोग होतो. ]

१८६. **गंध नसणें**—अल्प प्रमाणांत देखील नसणें; उ० वासुदेवाला ज्योतिषाचा गंधही नाहीं; उ० माझ्या मनांत लबाडीचा गंधही नाहीं. [ गंध म्ह० वास. ]

१८७. **गप्पा, किं० गफ्फा, छाटणें, मारणें, किं० ठोकणें**—इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत बसणें; उ० तूं आणि रामा असे दोघेजण अभ्यासाला म्हणून बसतां, पण खरोखरीं अभ्यास करतां, कीं गप्पा छाटीत बसतां ?

## १८८. गम.

(क) धीर, स्तब्धता. उ० अरे, पेढ्यासाठीं इतका कां तरफडतोस ? जरासा गम खा ! इतरांबरोबर तुलाही पेढा मिळेल ! [ " गम खा " म्ह० धीर धर, उतावळा होऊं नको. ]

(ख) क्षमा. उ० मीं अंगभर लुगडें नेसलें होतें, आणि तूं मला ओंवळ्यानें शिवलीस. मला तुझा इतका राग आला होता, कीं दोन कानशिलांत भडकावणार होतें. पण मीं तुझा गम केला. [ " मी गम खाल्ली, " "मला तुझी गम आली, " ह्यांचाही अर्थ तोच होतो.]

(ग) धोरण; पोंच. उ० तुझ्या बोलण्याचा गम माझ्या लक्ष्यांत आला नाहीं. [ व्युत्पत्ति, सं० गम्य. ]

## १८९. गमजा.

१. खोड्या; चेष्टा; वेडेवेडे चाळे; चोचले

२. **गमजा करणें**—वेडेवेडे चाळे करणें; उच्छृंखलपणानें वागणें; उ० गमजा करितां, मनिं उमजाना, हें सुख न पुढें पडेल वजा !

रामजोशी.

३. **एकाद्याच्या गमजा न चालूं देणें**,—त्याच्या चेष्टांना मोकळीक, किं० अवसर, न देणें; त्यांना प्रतिबंध करणें.

१९०. **गयावया करणें**—दीनपणानें क्षमा भाकणें. उ० त्या मद्याला गूळ चोरतांना मीं प्रत्यक्ष पाहिलें. मी त्याला पोलिसांच्या हवालीं करणार होतों. पण तो फारच गयावया करूं लागला, म्हणून त्याला मीं सोडून दिलें.

१९१. **गर्भगळित होणें**—अत्यंत भीतिग्रस्त होणें. [ भयानें गर्भिणी स्त्रियांचा गर्भ गळून पडतो, यावरून हा अर्थ झाला. ] उ० रानांत वाघ पाहातांच मी गर्भगळित झालों !

१९२. **एकाद्याच्या गवऱ्या मसणांत जाणें**—त्याच्या आयुष्याची मर्यादा अगदीं थोडी राहिलेली असणें; त्याचा मृत्युकाळ अगदीं जवळ येऊन ठेपलेला असणें; उ० तुझ्या गवऱ्या मसणांत गेल्या आहेत. आतां तूं मोठमोठे बेत कशाला करतोस ?

१९३. **गळ घालणें**—आग्रह करणें. उ० " माझी मुलगी तुम्ही आपल्या रामाला करून घ्या, " म्हणून गोपिकाबाईंनीं मला भारी गळ घातली; पण ती मुलगी दमेकरीण, म्हणून मीं ती पथकरली नाहीं.

१९४. **गांठ पडणें**—भेट होणें.

सर्व मग मम अज्ञानतम झडेल,
स्वजनसंघाशीं गांठही पडेल, ।
हीच आशा, विश्वास, ही उमेद,
दूर करिती संदेह, जन्मखेद ॥

वा. अ. भिडे.

१९५. **गाडी सुटणें**—पाठ म्हणण्याची, कि० बोलण्याची, क्रिया, वेगानें होऊं लागणें. [ आगगाडीचें रूपक येथें गर्भित आहे. ]

१९६. **गाढवाचा नांगर फिरविणें**—जमीनदोस्त करणें. [ पूर्वींच्या काळीं गुन्हेगाराला शिक्षा करण्याचा एक प्रकार असा असे, कीं त्याला त्याच्या घरांतून हकलून काढून, तें घर पाडून आणि खणून टाकून, त्या जमीनीवरून गाढव जुंपलेला नांगर फिरवून शेतजमी-

नीसारखी ती जमीन करीत. अशी शिक्षा फार मोठ्या गुन्ह्याला दिली जात असे. ]

१९७. **एकाद्याच्या गादीला पाय लावणें**--त्याचा अपमान करणें. [ गुरूची गादी आपल्यांत पूज्य मानिली जाते. तिला पाय लावणें, किं० तिच्यावर बसणें, हें पातक होय. ]

## १९८. गांव.

१. (क) शहर; उ० त्या गांवाची वस्ती पांच हजारांवर आहे.

(ख) सुमारें ५ मैलाची लांबी, किं० अंतर; उ०

त्या प्रभुतें चिंतुनि कपि झाला गांवें हा पन्नास ।

मोरो०--पंचशती. रा. साकी, २३६.

२. **गांवाला जाणें**—जवळ नसणें; दूर गेलेला असणें; ह्यावरून " माझे हात कांहीं गांवाला गेले नाहींत ! " (म्ह०रट्टा चढविण्याची वेळ आली, तर माझे हात रट्टा चढविल्याशिवाय स्वस्थ राहाणार नाहींत, रट्टा चढवितीलच ! ) उ० मार पाहूं कशी थोबाडींत मारतोस ती ! माझे हात कांहीं गांवाला गेले नाहींत ! अशाच अर्थानें " तरवार गांवाला जाणें, " ह्याचा पुढील आर्यैत उपयोग केला आहे.

खचशील कौरवा ! तूं, कीं बहु चढला तुझा मद सिगेला ।
लंघावया पहासी ? गांवाला काय रे ! मदसि गेला ? ॥ ३३ ॥

मोरो०-उ०-अ० १३.

[ " माझे हात कांहीं केळीं खावयाला गेले नाहींत !, " ह्याचाही अर्थ " हात गांवाला गेले नाहींत " ह्याप्रमाणेंच समजावा. ]

३. **त्या गांवचा नसणें**--त्या कामाशीं कांहीं संबंध नाहीं, असें दाखविणें; उ० गोंद्या मोठा विलंदर आहे ! तो कांहीं तरी खोड्या करतो, आणि मग साळसूदपणा दाखवितो. जसा कांहीं तो त्या गांवचाच नव्हे !

४. **एकाद्याच्या गांवीं नसणें**—त्याच्या खिजगणतींत नसणें; उ० मीं त्याला इतका वेळ बोध केला, पण तो त्याच्या गांवींही नाहीं !

( म्ह० त्यानें तिकडे अगदीं दुर्लक्ष्य केलें, आणि तो त्या बोधाच्या उलट वर्तन करीत आहे. )

१९९. **गाशा गुंडाळणें**—एकाद्या ठिकाणाहून निघून जाण्याच्या उद्देशानें आपल्या जिनसांपानसांची आवराआवर करणें, किं० ती करून निघून जाणें. उ० भटजीबोवांनीं आमच्यापुढें बरेंच लांबलचक रडगाणें चालविलें होतें, पण आमच्या येथें त्यांना थारा मिळणार नाहीं असा त्यांना रंग दिसतांच त्यांनीं गाशा गुंडाळला!

२००. **गाळण उडणें, किं० होणें**—धाबरगुंडी वळणें. धैर्य गलित होणें. उ० हातांत कुऱ्हाडी घेतलेले तीन चोर पाहातांच सखूबाईची गाळण उडाली! उ० एकामागून एक अशा अनेक अडचणी आल्या, तेव्हां माझी गाळण उडाली; ( म्ह० माझा सारा धीर गळून गेला. )

२०१. **एकाद्याला गुंगारा देणें**—त्याला फसवून, किं० त्याची नजर चुकवून, पळून जाणें. उ० मी घनश्यामाला हें पत्र टपालांत टाकावयाला देणार आहे म्हणून त्याला जरा वेळ थांबावयाला सांगितलें होतें. पण तो मला गुंगारा देऊन गेला! ( म्ह० माझी नजर चुकवून निघून गेला! )

२०२. **गुण उधळणें, किं० पाघळणें**—दुर्गुण प्रकट करणें. उ० केशव आतां सुधारला असेल अशा समजुतीवर मीं त्याला मामलतदार कचेरींत नोकरी लावून दिली. पण महिन्याच्या आंत त्यानें गुण उधळले! तेव्हां त्याला शिरस्तेदारांनीं राजीनामा देऊन निघून जावयास लाविलें!

२०३. **एकादी वस्तु गुलदस्तांत ठेवणें**—ती अगदीं लपवून ठेवणें; तिचा सुगावा, किं० मागमूस, कोणाला न लागूं देणें.

२०४. **गुळ-खोबरें देणें**—लहान मुलांना गुळ-खोबऱ्याची लालूच दाखविली, म्हणजे तीं आपल्याला वळतात. किं० आपलें काम करावयाला सिद्ध होतात. यावरून "एकाद्याला गुळ-खोबरें देणें," म्ह० त्याला आपल्या कामासाठीं लांच देणें, फसविणें, असे अर्थ झाले. गुळ-खोबऱ्यावरील मुलांची भक्ति पुढील आर्येत वर्णिली आहे.

गुळखोबरें विलोकुनि भलत्याहि जनास बाळक वळावा।
सत्य प्रेमाचि दावुनि सुज्ञें तो विश्वपाळ कवळावा॥

मोरोपंत-उद्योगपर्व.

२०५. **एकाद्याचे पुढें गोंडा घोळणें**—त्याची खुशामत करणें; त्याची थुंकी झेलावयाला तत्पर राहणें.

## २०६. गोता.

१. संकट, अडचण, नुकसान.

२. **एकाद्याला गोत्यांत आणणें, घालणें,** किं० **टाकणें** —त्याला संकटांत लोटणें.

३. **एकाद्याला दहा रुपयांच्या गोत्यांत आणणें**—दहा रुपये खर्चावयाचा त्याचेवर पाळी आणणें; त्याची दहा रुपयांची नुकसानी करणें.

२०७. **गोंधळ घालणें**—

गोंधळ म्ह० एक प्रकारचें कीर्तन. लग्न, मुंज, वगैरे कांहीं मंगल कार्य समाप्त झाल्यावर गोंधळ्यांकडून गोंधळ घालविण्याचा कित्येक कुटुंबांत रिवाज आहे. हा गोंधळ हरदासांच्या कीर्तनाप्रमाणें असतो. हरदास जसें कीर्तनांत एकादें आख्यान लावून त्याचें स्पष्टीकरण करतात, त्याप्रमाणें गोंधळांत गोंधळी एकादें आख्यान सांगतात; [ अनुरूप क्रियापद " घालणें." ]

२०८. **गोळा होणें**—एकत्र जुळणें; गर्दी करणें; गात्रें शक्तिहीन, निरुत्साह, होऊन चलनवलनादि व्यापारास असमर्थ होणें; उ० झोपेनें ह्या मुलाचा गोळा होऊन गेला आहे ! उ०

> चिंताज्वरांत माझा रात्रीं नाहींच लागला डोळा ।
> आयासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा ॥ मोरोपंत.

## २०९. घटका.

१. (क) विशिष्टकालपरिमाण. आडीच तास.

(ख) घटकेनें पाण्यांत बुडणारें तांब्याचें पात्र. [ घटका मोजण्यासाठीं ज्योतिषी ह्याचा उपयोग करतात. ]

२. **एकाद्याची घटका भरलेली असणें**—तो आतांच मरतो कीं घटकेनें मरतो अशा स्थितींत तो असणें.

३. **एकाद्याची घटका भरणें**—त्याचा विनाशकाळ जवळ येऊन ठेपणें.

२१०. **घडा भरणें**—एकाद्याच्या पापकृत्यांचा परमावधि होणें; उ० त्याचा घडा भरला, म्हणजे त्याला शासन होईलच होईल ! [ प्रत्येक मनुष्याचीं पापकृत्यें सांठवून ठेवण्यासाठीं एक घडा असतो, तो पुरता भरला, म्हणजे त्याला जें शासन योग्य असेल तें मिळतें, अशा कल्पनेवरून ही शब्दसंहति उत्पन्न झाली आहे. " पापाचा घडा भरणें, " असेंही म्हणण्याचा परिपाठ आहे. ]

२११. **घबाड साधणें**—आकस्मिक, अकल्पित, नफा होणें.

## २१२. घर.

१. ( क ) राहावयासाठीं बांधलेली जागा, वाडा, वगैरे.

( ख ) घरांत राहाणारीं, किं० एका कुटुंबांतील, माणसें.

( ग ) संसार, प्रपंच; उ० त्याला नोकरी लागतांच त्याणें स्वतंत्र घर थाटलें.

( घ ) एकाद्या व्यवसायांत जुटीनें काम करणारीं माणसें, किं० मंडळी.

( ङ ) बीळ, ( चिंचुंदरी, वगैरेंचें ); घरटें ( पक्ष्यादिकांचें ).

( च ) वसतीचें ठिकाण ( मालकाच्या इच्छेविरुद्ध मिळविलेलें ); बळकाविलेलें ठिकाण; उ० कांट्यानें माझ्या टाचेंत घर केलें. ढेकणांनीं ह्या कोपऱ्यांत घरें केलीं.

( छ ) एकादा पदार्थ शिरकावण्यासाठीं केलेला दरा, किं० केलेलें भोंक; उ० ह्या खांबासाठीं जाडी घर कर. उ० भिंतीस घर करून मग खुंटी ठोक.

( ज ) एकादी वस्तु सुरक्षितपणें ठेवावयासाठीं केलेली जागा; उ० माझ्या चष्म्याचें घर चामड्याचें आहे, आणि त्याच्या चष्म्याचें घर लाकडाचें आहे.

( झ ) पेटीतील कप्पा; खण.

( ञ ) सोंगट्यांच्या, किं० बुद्धिबळांच्या, पटावरील एक एक चौक.

( ट ) कुंडलीच्या कोष्टकांत सूर्य, चंद्र, वगैरे ग्रहांचीं स्थानें. (ज्योतिषांत.)

( ठ ) घराणें, किं० वंश. उ० त्यांचें घर कुलीनांचें आहे; उ० आमच्या

घरांत आजपर्यंत कोणाही स्त्रीस वैधव्य आलें नाहीं; साऱ्या स्त्रिया सुवासिनी मेल्या. उ० त्यांच्या घराला पदर आहे, (म्ह० त्यांच्या वंशांत परजातीची भेसळ झाली आहे. )

(ड) उत्पत्तीचें स्थान; उ० शरीरांत पित्ताचें घर कोठेंसें असतें ?

(ढ) उत्पत्तीचें कारण; उ० वांगें हें खरजेचें घर आहे. उ० आळस हें दारिद्र्याचें घर होय !

(ण) वादाचें कारण.

(त) ऐपत; एकादें काम करण्याचें सामर्थ्य, किं० ताकद. उ० जें कांहीं करणें तें आपलें घर पाहून करावें.

(थ) सतारीच्या दोन पड्यांमधील अंतर.

(द) शास्त्र, कला, वगैरेंचें मर्म, खुबी, इत्यादि; उ० तुम्ही गातां खरे, पण तुमच्या हातीं गाण्याचें घर लागलें नाहीं.

(ध) अडचणीच्या, पराभवाच्या, वेळीं निसटून जाण्यासाठीं करून ठेविलेली पूर्व योजना; उ० ह्याच्या बोलण्यांत घर आहे, किं० हा घर ठेवून बोलतो, ( म्ह० ह्याच्या बोलण्यांत आडपडदा आहे. )

(न) आपण स्वतां; उ० इच्छी परा, तें येई घरा (म्ह० दुसऱ्याचें अनिष्ट चिंतितो तें त्याच्या स्वताच्याच भोगाला येतें. )

२. घर उघडणें—

(क) लग्न करून संसार थाटणें.—उ० नारोपंतांनीं आतां घर उघडिलें आहे; ते पूर्वींचे नारोपंत नव्हत !

(ख) एकाद्याचें लग्न करून देऊन त्याचा संसार मांडून देणें.—उ० सदूभाऊंनीं आपली मुलगी त्या भटाच्या मुलास देऊन त्याचें घर उघडिलें.

३. घर करणें—

(क) बिऱ्हाड करणें; राहावयाला जागा घेऊन तींत जेवणखाण वगैरे करूं लागणें; उ० चार महिने मी खाणावळींत जेवीत असें, आतां घर केलें आहे.

(ख) एकाद्याला त्रास होईल अशा ठिकाणीं वास्तव्य करून राहणें; उ० कांट्यानें माझ्या टाचेंत घर केलें.

४. **एकाद्याचें घर घालणें**—त्याच्या घराचा नाश करून सोडणें.

५. **एकाद्याचें घर घेणें**—त्याला बुडविणें; त्याचा नाश करणें.

६. **घर चालविणें**—प्रपंचाची, किं० संसाराची, जबाबदारी शिरावर घेऊन त्याची व्यवस्था पाहणें. उ० घर चालवी तो घराचा वैरी.

७. **घर जोडणें**—एकाद्या घराण्याशीं मैत्रीचा, किं० विवाहाचा, संबंध करणें.

८. **घर डोईवर घेणें**—घरांत कलकलाट करणें; उ० चार पोरें एका ठिकाणीं गोळा झालीं, म्हणजे तीं घर जसें डोईवर घेतात !

९. **घर तुटणें**—एकाद्या कुटुंबाशीं असलेला मैत्रीचा, नात्याचा, वगैरे संबंध नाहींसा होणें.

१०. **दुसऱ्याचें घर दाखविणें**—अमक्याच्या घरीं जा असें सांगून एकाद्यास हाकून देणें, दूर करणें. उ० तो त्रागेवाला माझ्या घराशीं कटकट करीत बसला होता. त्याला मी रामकाकाचें घर दाखविलें.

११. **घर धरणें**—

(क) घरांतच बसून राहणें; घराच्या बाहेर न पडणें.

(ख) एकादा आजार पक्का जडणें. उ० दम्यानें माझ्या शरीरांत घर धरिलें.

१२. **एकाद्याचें घर धुणें**, किं० **धुऊन नेणें**—दुसऱ्याचें जें असेल नसेल तें सर्व लबाडीनें हिरावून घेणें आणि त्याला बुडविणें; उ० तुम्ही कारकुनावर फार भरंवसा टाकून राहूं नका; तो संधी सांपडल्यास तुमचें घर धुवावयास कमी करणार नाहीं !

१३. **घर नेसाविणें**—घरावर गवत घालून शाकारणें. [ कोंकणांत " घर शिवणें " म्हणतात. ]

१४. **लोकांचीं घरें पुजणें**—

(क) आपलें कर्तव्य न करतां लोकांच्या घरीं त्यांना भेटावयासाठीं जाणें.

(ख) आपलें काम करून घेण्यासाठीं लोकांच्या घरीं वारंवार जाणें.

१५. **घर फोडणें**–
(क) संसार आटोपणें.
(ख) कुटुंबांतील माणसांत फूट पाडणें.

१६. **घर बसणें**–घरांतील कर्ता, किं० मिळविता, पुरुष नाहींसा झाल्यामुळें कुटुंबाला विपन्न दशा प्राप्त होणें.

१७. **घर पहाणें**-घराकडे वक्रदृष्टि करणें; उ० कालानें एकाद्याचें घर पाहिलें, कीं तें बुडालेंच म्हणून समजावें.

१८. **एकाद्याचें घर बुडविणें**–त्याच्या घराचा, म्ह० कुटुंबाचा विध्वंस करणें,

१९. **घर फिरलें म्हणजे घराचे वांसे फिरतात**–एकाद्या माणसावर यजमानाची वक्रदृष्टि झाली, म्हणजे त्याचे नोकरचाकर देखील त्या माणसाचा तिरस्कार करूं लागतात.

२०. **घर बुडणें**–
(क) कुटुंबाची नासाडी, दुर्दशा, होणें.
(ख) संतति नसल्याकारणानें कुटुंबाचा लोप होणें.

२१. **घर भंगणें**–घराचा नाश होणें; घराचें वैभव, किं० महत्त्व, नाहींसें होणें; उ० बापलेंकांत तंटे लागल्यामुळें तें घर भंगलें.

२२. **आपलें घर भरणें**–दुसऱ्याच्या पैशाचा हळू हळू, गुप्त रीतीनें अपहार करून तो आपल्या घरांत आणणें; उ० मेहुण्याला बुडवून त्याणें आपलें घर भरलें.

२३. **घर भलें कीं आपण भला**–जो लोकांच्या उचापतींत न पडतां आपलें काम करीत असतो असा. जो लोकांकडे न जातां आपल्याच घरीं असतो तो.

२४. **घर मांडणें, किं० थाटणें**–घरामध्यें संसारोपयोगी जिन्नस, किं० वस्तु, आणून तें नीटनेटकें, किं० सोयीचें करणें.

२५. **घर भरणें**--घर लुटणें.

२६. **घर म्हणून ठेवणें**–नांदत्या घरामध्यें ह्या जिनसेचा उपयोग केव्हांना केव्हां तरी होईल, असें म्हणून ती जिन्नस संग्रहास ठेवणें.

२७. **घर वसविणें**-मुलांबाळांनीं घर भरून घराचा भयाणपणा नाहींसा करणें; उ० माझी बायको मेली म्हणून मीं मुलाचें लग्न करून दिलें. म्हटलें कीं सून तरी घर वसवील.
२८. **घर सांकड आणि बाईल माकड**—घर भिकार आणि बायको कुरूप; ( असें असलें म्हणजे भीति नाहीं. )
२९. **घराचा पायगुण तसा**-घरांतील माणसांची चालचलणूक असेल त्याप्रमाणें.
३०. **घराची खुंटीच तशी**-घराची रीतीच तशी.
३१. **घराचा वांसा ओढणें**-एकाद्या मोठ्या कामांतून जरूरीचें साधन नाहींसें करणें; उ० आमच्या मंडळींतून पाटीलबोवांनीं रामभाऊंस फितविलें, आतां आम्ही काय करूं शकूं ? त्यांनीं घराचा वांसाच ओढला !
३२. **घरांत विचारा, किं० दाखवा**-माझ्या पत्नीला, विचारा, दाखवा, इ०. "घरांत" ह्याच्या उलट "बाहेर"; "बाहेर", म्ह० पतीला, किं० यजमानाला.
३३. **घरांत समजणें**-घरांतल्या घरांत समजूत पाहून घेणें; आपला तंटा चवाठ्यावर न आणणें.
३४. **घरावर काट्या घालणें, किं० गोवरी ठेवणें, किं० निखारा ठेवणें**--एकाद्या कुटुंबाची बदनामी, किं० नाश, करणें.
३५. **घरावर कुभें चढविणें**-घरामध्यें कलागती लावून देणें, किंवा तंटे उत्पन्न करणें.
३६. **घरावर गवत रुजणें**-घर ओसाड होणें.
३७. **घरास कांटी लावणें**-घर ओसाड, उद्ध्वस्त करणें. घरास कांटी लागणें-घर ओसाड होणें.
३८. **एकाद्याच्या घरास हाड बांधणें, किं० घरावर टाहाळा टाकणें**—त्याला जातीच्या बाहेर टाकणें, वाळींत टाकणें.
३९. **मळा, शेत, वगैरे घरीं करणें**—खंडानें न देणें.
४०. **घरीं बसणें**-उद्योगधंदा नसल्यामुळें, किं० सोडून दिल्यामुळें, रिकामें असणें.
४१. **घरीं येणें**-सुवासिनीला वैधव्य प्राप्त होणें.

४२. **आपघर कीं बापघर**–नवऱ्याचें घर, किं० बापाचें घर, स्त्रीला योग्य; दुसऱ्याच्या घरीं तिनें राहाणें योग्य नाहीं.

४३. **दिलें घर कीं उपजलें घर**–ज्या घरीं स्त्री दिली असेल, तें, (म्ह० स्त्रीच्या नवऱ्याचें घर), किं० ती ज्या घरीं जन्मली असेल तें (म्ह० तिच्या बापाचें घर), हीं दोनच घरें काय तीं स्त्रीला राहावयास योग्य होत.

४४. **खाल्ल्या घरचे वांसे मोजणें**––कृतघ्न होणें.

४५. **वडा घर पोकळ वांसा**–दिसायाला भपकेदार, पण असायाला नादान.

४६. **घर ना दार आणि देवळीं बिऱ्हाड**–जो एकटा आहे, ज्याला बायको, मुलें वगैरे नाहींत, अशा मनुष्यासंबंधानें हे शब्द योजतात.

४७. **घरासारखा पाहुणा होतो, पाहुण्यासारखें घर होत नाहीं**–एकादा नवीन माणूस समाजांत आला, म्हणजे तो समाजाची चालरीति उचलतो, समाज त्याची चालरीति उचलीत नाहीं.

४८. **घरीं दारीं सारखाच**–सर्व ठिकाणीं सारखाच वाईट. जसा स्वताच्या घरीं उपद्रवकारक, तसाच लोकांच्याही घरीं उपद्रवकारक.

४९. **घरोघरीं एकच परी, किं० घरोघरीं मातीच्या चुली**–– जिकडेतिकडे एकच प्रकार !

५०. **आपलें घर बारा कोशांवरून दिसतें**––आपलीं कामेंधामें वगैरे आपणास कळतात, किं० उत्तम प्रकारें ठाऊक असतात.

२१३. **घाला घालणें**––हल्ला करणें, प्रहार करणें; उ०

नेणतां नारायणमहिमे। धावोनि घाला घातला कामें।
तेव्हां अवघींच पराक्रमें। स्वनिंद्य कर्में लाजलीं ॥

एकनाथ–नरनारायणाख्यान.

धर्मद्वेष करी सदा दुर्योधन। धाडिला छळानें वनवासा ॥ १ ॥
तरी दुष्टबुद्धि न राहे उगला। नानापरी घाला घालीतसे ॥ २ ॥

तुकाराम.

## २१४. घोडा.

१. (क) प्राणिविशेष; अश्व; उ० घोडा आपला दाणा वाढवून खातो; (म्ह० घोड्यानें चांगलें काम केलें, तर यजमान आपण होऊन त्याला ज्यास्ती दाणा खाऊं घालतो. नोकराचें काम पसंत पडलें, तर यजमान आपण होऊन त्याचा पगार वाढवितो.)

(ख) बुद्धिबळाच्या खेळांतील एक मोहरें; उ० घोडा आडीच घरें चालतो.

(ग) बंदुकींत ठिणगी पाडण्याचें एक साधन.

(घ) दोन पायांत काठी घालून मुलें खेळतांना धांवतात, तेव्हां त्या काठीला "घोडा" म्हणतात.

(ङ) मूर्ख, अज्ञान, बिनअकली, मुलगा.

(च) वस्त्रें वगैरे ठेवण्यासाठीं जी काठी बांधलेली, किं० टांगलेली, असते ती.

(छ) नदीवर, किं० समुद्रावर, मनुष्य स्नानासाठीं गेला असतां वस्त्रें ठेवण्यासाठीं जी काठी वाळवंटांत उभी पुरतात ती.

(ज) दोन पायांचा घोडा—चालावयाच्या उपयोगाच्या दोन तंगड्या; उ० आम्हाला घोडाबिडा कांहीं नको, आमचा दोन पायांचा घोडा आम्हांला हावे तेथें वाहून नेईल.

(झ) पाळणा टांगावयाची जी चौकट, किं० रचनाविशेष, ती. घोडी—पाळण्याचा आधार.

(ञ) जिच्या टोंकाला दुबेळकें आहे, अशी काठी; (पालखी, मेणा, वगैरे ठेवण्याच्या उपयोगाची).

(ट) मूल रांगतांना दोन हात व दोन गुडघे जमिनीवर टेकून जी शरीराची मांडणी करतें ती. (अनुरूप क्रियापद, "करणें,")

(ठ) हरदासाचा मृदंग ठेवण्याची घडवंची.

(ड) नारळाचें साल काढण्यासाठीं जो उभा खांब पुरलेला असतो, व त्याच्या टोंकाला सुरी बसविलेली असते, तो.

(ढ) लाटेचा उंच भाग.

(ण) घोडेस्वार ( लाक्षणिक अर्थानें. )

२. **घोडा उभा करणें**, किं० **बांधणें**—घाई न करणें.

३. **घोडा काढणें**—घरांत बांधून ठेविलेला घोडा फिरावयासाठीं, किं० फिरवावयासाठीं, बाहेर नेणें.

४. **घोडा हाकणें**--पळून जाणें; निघून जाणें; उ० तूं येथून घोडा हाक, ( म्ह० निघून जा ). उ० पंतोजीबावांस पाहातांच त्या पोरानें घोडा हाकला !

५. **कागदी घोडे नाचविणें**--प्रत्यक्ष व्यवहारांत फायदा, लाभ, किंवा सोय, हीं कांहीं नसून नुसत्या कागदोपत्रीं मात्र डौलाच्या आणि वैभवाच्या गोष्टी लिहिणें; [ घोड्यांच्या आकाराचे कागदाचे तुकडे कातरून ते दिव्यापुढें धरले, म्हणजे भिंतीवर त्यांच्या सावल्या घोड्यांच्या आकाराच्या पडतात. हा मुलांचा खेळ आहे. हे कागदी घोडे कितीही नाचविले, तरी त्यापासून फल कांहीं नाहीं. यावरून "कागदी घोडे नाचविणें," ह्याचा वरीलप्रमाणें अर्थ होतो. ]

६. **एकाद्याच्या घोड्यापुढें धांवणें**—त्याची कष्टाची सेवाचाकरी करणें. त्याची ओंगळ खुशामत करणें.

७. **घोड्यावर घोडा घालणें**-लिलावांत एकाद्या पदार्थाची एकानें देऊं केलेली जी किंमत, तिच्यापेक्षां ज्यास्ती किंमत आपण देऊं करणें.

८. **घोड्यावर बसणें**—दारू पिऊन झिंगणें.

९. **घोड्यावर बसून येणें**—घाईनें येणें. आवेशानें येणें. आपली आज्ञा लोकांनीं तावडतोब पाळावी, अशा मूर्ख इच्छेनें येणें.

१०. **घोडा मैदान जवळच आहे !**--ज्याची परीक्षा करावयाची तो पदार्थ, आणि परीक्षा करावयास लागणारी सामुग्री, हीं दोन्हीं येथें आहेत ! कोरडी बडाई कशाला पाहिजे ? किं० उगीच तर्क कशाला पाहिजेत ?

११. **सर घोड्या पाणी खोल !**, किं० **सर घोड्या पाणी पी !**—अरे घोड्या, मागें हट, कारण येथें पाणी खोल आहे. अरे घोड्या, मागें सरक, आणि जेथें आहेस, तेथलेंच पाणी पी. [ धोक्यांत शिरण्यापूर्वी

नीट विचार करा, असा कोणास उपदेश करावयाचा असतां ह्या वाक्याचा उपयोग करतात. ]

## २१५. घोडें.

१. (क) घोडा. ( सामान्य जाति, किं० प्रेम, किं० तिरस्कार, दाखविण्यास " घोडें " शब्द योजला जातो. ) उ० कृष्णाकांठचीं घोडीं सडपातळ, पण चपळ, असतात.

(ख) खटारा गाडीचीं दोन लांब लाकडें; ( ज्यांच्या टोंकाला आडवें जूं बांधलेलें असतें. )

(ग) चार भोपळ्यांवर रचलेला पाण्यावर तरंगणारा तराफा.

२. **आपलें घोडें पुढें ढकलणें**—दुसऱ्याच्या सोयीकडे दुर्लक्ष्य करून आपली सोय करून घ्यावयाला सरसावणें. आपली हौस, किं० इच्छा, तृप्त करून घेण्यासाठीं दुसऱ्याच्या हौसेकडे, किं० इच्छेकडे, काणा डोळा करणें; मंडळींचें संभापण चाललेलें असतां दुसऱ्यांचीं बोलणीं बंद पाडून आपलेच विचार त्यांच्यावर लादणें.

३. **आपलें घोडें पुढें दामटणें**—आपला कार्यभाग इतरांच्या अगोदर साधण्याच्या खटाटोपास लागणें.

४. **येथेंच घोडें पेंड खातें !**—

(क) मर्मस्थान तें हेंच ! छिद्र, कमीपणा, लबाडी, जी आहे ती येथेंच आहे !

(ख) दुर्निवार जी अडचण ती येथेंच आहे.

५. **एकाद्याचें घोडें मारणें**—त्याची कांहीं हानि करून त्याला रुसावयाला निमित्त करून ठेवणें. उ० मीं काय तुझें घोडें मारलें आहे ? ( म्ह० मीं काय तुझें नुकसान केलें आहे ? )

६. **घोडें थकणें**—शक्ति क्षीण होणें. उ० रामभाऊ, तुमचें घोडें थकलें कीं काय ? आणखी एक लाडू घ्या !

७. **माझेंच घोडें, आणि म्हणे जाऊं द्या पुढें**—माझें काम अगोदर झालें पाहिजे ( मग बाकीच्यांची कितीं का गैरसोय होईना ! );

आपलपोट्याचा तिरस्कार करावयाचा असतां त्याच्यासंबंधानें हें वाक्य योजतात.

## २१६. घोरपड.

१. " घोरपड " हा चिकाटी धरणारा असा एक प्राणी आहे. घोरपड ज्या पदार्थावर टाकावी, त्याला ती घट्ट चिलगून राहाते. लाक्षणिक अर्थानें " घोरपड " म्हणजे कांहीं लचांड, किं० अरिष्ट, किं० त्रासदायक माणूस.

२. **एकाद्यावर घोरपड आणणें**---त्याला संकटांत, पेंचांत, लोटणें. उ० त्या बिचाऱ्यावर त्यांणीं घोरपड आणून त्याला राजीनामा द्यावयाला भाग पाडलें.

३. **एकाद्यावर घोरपड येणें**---तो संकटांत, किं० अडचणींत, पडणें. त्याच्यावर कांहीं अरिष्ट गुदरणें. उ० तो जर असा अव्यवस्थितपणें वागूं लागला, तर त्याच्यावर खचीत कांहीं तरी घोरपड येईल !

२१७. **चक्री गुंग होणें**---अक्कल गुंग होणें. संभ्रांत होणें. कांहीं सुचेनासें होणें.

२१८. **चंग बांधणें**---मी असुक एक गोष्ट करीन असें ठासून सांगणें. ब्रीद बाळगणें. खात्रीपूर्वक सांगणें. आपलें म्हणणें खरें करून दाखविण्याची धमक बाळगून एकादें विधान करावयाला सिद्ध असणें.

२१९. **एकाद्याला चतुर्भुज करणें**---त्याच्या मुसक्या बांधणें. " मुलाचें लग्न करून देणें " असा ह्या शब्दसंहतीचा विनोदार्थीही उपयोग होतो. उ० आम्हीं आपल्या मुलाला चतुर्भुज केलें ! त्याचप्रमाणें " मी चतुर्भुज झालों, " म्ह० माझें लग्न झालें !

२२०. **चंदन करणें**---नाश करणें. [ चंदनाचें खोड उगाळून उगाळून संपून जातें, ह्यावरून वरील वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे. ]

२२१. **चंबुगवाळें आटोपणें**---" चंबू " म्हणजे लहानसा गडवा, आणि " गवाळें " म्हणजे मुकटा वगैरे ठेवण्याची पिशवी.

(क) "एकाद्या ठिकाणचें आपलें चंबुगवाळें आटोपणें," म्ह० दुसऱ्या ठिकाणीं

जाण्याच्या उद्देशानें आपलीं भांडींकुंडीं, कपडे, वगैरे सामानाची आवराआवर करणें.

(ख) एकाद्या ठिकाणीं राहिल्यास आपणास त्रास होईल, किं० आपणावर कांहीं तरी संकट येईल, अशा भीतीनें तेथून गुपचिप निघून जाणें.

२२२. **चऱ्हाट वळणें**, किं० **लावणें**--लांबलचक, किं० कंटाळवाणी, हकीकत सांगत बसणें.

२२३. **चवाठ्यावर आणणें**--उघडकीस आणणें; गुप्त गोष्ट जाहीर करणें; उ० घरगुती भांडणें चवाठ्यावर आणणें बरें नाहीं.

२२४. **चांदरात झडणें**--ज्या रात्रीं प्रथम चंद्रदर्शन होतें, तिला "चांदरात" म्हणतात. ह्या दिवशीं नोकर लोकांस पगार देण्याची चाल आहे. पगाराचे पैसे ज्याच्या त्याच्या हातांत खळखळत असतात, आणि जो तो आनंदित असतो. "चांदरात झडणें" म्हणजे आनंदाचा, चैनीचा, दिवस प्राप्त होणें.

२२५. **चांदी उडणें**--नाश होणें. अतोनात त्रास होणें. ["चंदी उडणें," असाही प्रयोग आहे.]

२२६. **चारी ठाव जेवणें**--ताटाच्या चारी बाजू चार खाद्यांनीं भरून जें जेवण, तें चारी ठाव जेवण. अनेक प्रकारचीं खाद्यें, व तोंडींलावणीं, यांचें जें जेवण तें; उ० आम्हाला कसचें चारी ठाव जेवण ? भात आहे तर भाजी नाहीं, भाकरी आहे तर तूप नाहीं, अशी आमची स्थिति !

२२७. **चारी दिशा मोकळ्या होणें**--वाटेल तिकडे जाण्याला मोकळीक प्राप्त होणें.

२२८. **चालत्या गाड्यास खीळ घालणें**--सुरळीतपणें चालत असलेल्या कामांत विघ्न आणणें; सुरळीत गतीला प्रतिबंध करणें.

## २२९. चाळा.

१. एकादी गोष्ट करण्याकडे मनाची विशेष प्रवृत्ति.

२. **चाळा लागणें**--नाद, किं० छंद, लागणें.

३. **चाळा लावणें**--नाद, किं० छंद, लावणें.

२३०. **चीत करणें**--पराजित करणें.

२३१. **चुकल्याचुकल्यासारखें होणें**--आपल्या संवयीचें माणूस, किं० वस्तु, जवळ नसल्यामुळें, किंवा परकी ठिकाणीं गेल्यामुळें, अस्वस्थ वाटणें.

२३२. **चुटपुट लागणें**--हळहळ, हुरहुर लागणें; अस्वस्थता वाटणें; उ० मी रागाच्या सपाट्यांत वडील भावाला थोडेंसें लावून बोललों, त्याची मला चुटपुट लागली आहे.

२३३. **चुडेदान देणें**--" चुडा " म्हणजे बांगड्या; स्त्रीचा पति मेला, म्हणजे तिच्या हातांतील बांगड्या फोडून टाकतात. यावरून " एकाद्या स्त्रीस चुडेदान करणें, " म्हणजे तिला बांगड्या देणें, तिच्या हातांतील बांगड्या कायम ठेवणें, म्हणजे तिच्या पतीचे प्राण न घेणें. उ०

रुखमादेवी म्हणे देई चुडेदान । संरक्षी रे । प्राण भ्रताराचा ॥

तुकाराम-हरिपाळचरित्र.

२३४. **चुरमुरे खात बसणें**--इच्छिलेली वस्तु न मिळाल्याकारणानें लजील होऊन बसणें. आशाभंग झाल्यामुळें दुःखी होणें. [ या शब्दसंहतींत विनोदाचा बराच भाग आहे. ]

२३५. **चुलींतून निघून वैलांत पडणें**—एका संकटांतून निघून दुसऱ्या संकटांत पडणें. एक संकट टाळावयाचा कोणी माणूस प्रयत्न करीत असतां तो त्याच जातीच्या दुसऱ्या कांहीं तरी संकटांत पडणें.

२३६. **चुलीला अक्षत देणें**—लग्न, मुंज, वगैरे मंगलकार्य ज्याच्या घरीं व्हावयाचें असेल, तो आप्तेष्टांच्या घरीं जाऊन त्यांना भोजनार्थ आमंत्रण करतो. ह्या प्रसंगीं तो कुंकू लावून तांबडे केलेले तांदूळ आमंत्रितांना देतो, त्याला " अक्षत देणें " असें म्हणतात. जेव्हां हें आमंत्रण घरांतील सर्व माणसांना, म्हणजे नोकरचाकरांना, व पाहुण्यांनासुद्धां दिलेलें असतें, तेव्हां अक्षत देणारा मनुष्य म्हणतो, " मी ही चुलीला अक्षत देतों, " म्हणजे तुमच्या चुलीनें आमच्या घरीं जेवावयास यावें, म्हणजे तुम्ही आपली चूल मुळींच पेटवूं नका. [ मागें लेखांक ८० पहा. ]

२३७. **चोराला सोडून संन्याशाला सुळीं देणें**--खऱ्या अपराध्याला सोडून देऊन निरपराध्याला शिक्षा देणें. [ संन्यासी हे ईश्वरचिंतनांत काळ घालवीत असतात; त्यांच्या हातून अपराध होणें संभवनीय नाहीं, त्यांच्यावर तोहमत घेणारा मनुष्य मूर्ख असावयाचाच. ]

२३८. **चोरी असणें, किं० होणें**--एकादी गोष्ट उघडपणें आणि उजळ माथ्यानें करण्याचा हक्क असतां ती लपूनछपून करण्याचा, किं० मुळींच न करण्याचा, प्रसंग येणें; उ० आमच्या जवळ दागिने असून ते ह्या खेडेगांवच्या राहाणीमुळें अंगावर घालण्याचीसुद्धां चोरी झाली आहे. उ० त्या दुष्टानें माझें भारी नुकसान केलें, पण त्याच्याविरुद्ध नकार शब्द काढण्याची मला चोरी झाली आहे!

२३९. **चोहोंचा आंकडा घालून बसणें**--आसनमांडी घालून सुखानें बसणें. [ आसनमांडी घातली असतां बैठक ४ ह्या आंकड्याप्रमाणेंच होते. आमचें " मराठी शब्दांचें उद्घाटन, " पान ३१ पहा. ]

२४०. **चौपदरी घेणें**--चौपदरी=चार पदर, म्ह० टोकें, किं० कोपरे, जिला आहेत अशी वस्तु, अर्थात् झोळी. " चौपदरी घेणें " म्ह० झोळी हातीं घेऊन भिक्षा मागणें; उ० आलीकडे तूं मुळींच अभ्यास करीत नाहींस, पुढें चौपदरी हातीं घेणार आहेस कीं काय?

२४१. **छक्केपंजे**--लबाड्या; डावपेंच. छक्के आणि पंजे म्हणजे पत्त्यांच्या डावांतील ६ ठिपक्यांचीं आणि ५ ठिपक्यांचीं पानें; एका जातीचें पान नाहींसें करून त्याच्या जागीं दुसऱ्या जातीचें पान उत्पन्न करणें, हा एक हातचलाखीचा खेळ आहे, त्याला " छक्केपंजे " म्हणतात; पुढें "छक्केपंजे" याचा अर्थ ओघानेंच हातचलाखी, नजरबंदी, फसवणूक, लबाडी, असा झाला. छक्केपंजे करणें, ओळखणें, जाणणें, चालूं न देणें, वगैरे शब्दसंहतींचा अर्थ सहज समजण्याजोगा आहे.

२४२. **जगांतून उठणें**--लोकाचाराविरुद्ध वागणें, लोकांची लाज सोडून देऊन उच्छृंखलपणें वागणें.

२४३. **एकाद्याला जंगजंग पछाडणें**--त्याच्यापासून एकादी वस्तु प्राप्त करून घेण्यासाठीं अतोनात प्रयत्न करणें, किं० शिकस्तीची खटपट

करणें. उ० सटवाजीला नारूवरचें एक औषध ठाऊक होतें; तें त्याणें मला सांगावें, म्हणून मी त्याला जंगजंग पछाडलें, परंतु त्याणें मला तें सांगितलें नाहीं ! आणि शेवटीं तो मरून देखील गेला ! [ एकाद्याशीं, किं० बरोबर, किं०, पुढें जंगजंग पछाडणें, असेंही म्हणतात. ]

२४४. **जपमाळ घेणें**—देवाचें नांव जपतांना जप करणारा हातांत एक माळ घेतो, तिला "जपमाळ" म्हणतात. देवाचें नांव एक वेळा उच्चारलें, म्हणजे जप करणारा मनुष्य माळेचा एक मणि बोटांनीं सरकावतो; माळेंतील मण्यांची संख्या ठरलेली असते, तीवरून जप किती झाला हें समजतें. जपमाळ घेऊन बसलेला मनुष्य देवाचें ध्यान करीत असतो. यावरून "एकाद्या गोष्टीची जपमाळ घेऊन बसणें," म्ह० त्या गोष्टीचा निदिध्यास घेणें; तिच्याकडे सर्व चित्त लावणें; ती मनांत घोळत ठेवणें. ह्या शब्दसंहतींत निंदेचा भाग असतो.

२४५. **जळत घर भाड्यानें घेणें**—एकादें काम, ( किं० व्यवहार, ) हानिकारक आहे असें उघड दिसत असतांही त्यांत पडणें, किं० तें पथकरणें.

२४६. **जातीवर जाणें**—मूळ स्वभावाला अनुसरून वागणें. एकाद्यानें अंगीं आणलेले आगंतुक गुण एकाएकीं लोपून त्याचें मूळच्या गुणांप्रमाणें वर्तन घडणें.

२४७. **जानवें तोडण्यास उठणें**—जानवें ही ब्राह्मणाच्या अंगावरची पवित्र वस्तु. तिचें रक्षण करणें हें ब्राह्मणाचें आद्य कर्तव्य. मनुष्य अति रागावला म्हणजे, त्याला योग्यायोग्याचा विचार राहात नाहीं, आणि तो हावें तें करावयास ( जानवें देखील तोडावयास ) प्रवृत्त होतो. यावरून "जानवें तोडावयास उठणें," म्ह० अति रागावणें, किं० चिडणें.

२४८. **जिभेवर असणें**—अगदीं उच्चारले जाण्याच्या बेतांत असणें.

२४९. **जिव्हाळीं लागणें**—मर्मस्थानीं लागणें. मर्मभेदक होणें. उ० दिनकरपंतांचें बोलणें नेहमीं जिव्हाळीं लागण्याजोगें असतें.

## २५०. जीव.

१. ( क ) प्राण; उ० जीव आहे तोंपर्यंत औषधोपचार चालविलेच पाहिजेत !

( ख ) प्राणी. उ० सर्व जीवांचें रक्षण ईश्वर करतो.

( ग ) कीड, मुंगी, आळी, वगैरे बारीक कृमि, किं० कीटक. उ० ह्या शेणांत जीव झाले आहेत.

( घ ) शक्ति, सामर्थ्य, तेज, कर्तबगारी, तडफ, ताकद, वगैरे अंगचे गुण; ज्यांच्या योगानें कोणतेंही काम चांगलें होतें.

( ङ ) पदार्थांतील उपयुक्त भाग; खरेपणा; लाभप्रदता; विश्वसनीयता; इ०. उ० तांदुळाच्या व्यापारांत आतां जीव राहिला नाहीं, ( म्ह० तो फायदेशीर होण्याचा संभव नाहीं. ) उ० ह्या बातमींत कांहीं जीव दिसत नाहीं, ( म्ह० ती खरी असणें संभवत नाहीं. )उ० छत्रीचा जीव हलका, म्हणून ती येवढ्याशा वाऱ्यानें फाटली. उ० ह्या चंद्रकळेंत आतां जीव राहिला नाहीं, ( म्ह० वापर सोसण्याची तिच्यांत ताकद उरली नाहीं ). उ० त्यानें प्रतिपक्ष्याच्या मतांचें ह्या पुस्तकांत खंडन करण्याचा यत्न केला आहे, पण त्यानें आणलेल्या प्रमाणांत कांहीं जीव नाहीं, ( म्ह० तीं प्रमाणें लंगडीं आहेत. )

( च ) मनाची प्रवृत्ति, किं० कल; उ० एक जीव म्हणतो जावें, एक जीव म्हणतो न जावें.

( छ ) आत्मा, अंतरात्मा. उ० त्याच्यासाठीं माझा जीव भारी तडफडतो.

२. **एकाद्याचा अर्धा जीव करणें**—त्याला त्रास देणें, किं० सतावणें. उ० छत्रीसाठीं त्यानें माझा अर्धा जीव केला.

३. **अर्धा जीव होणें**—

( क ) त्रास, कष्ट, काळजी, भीति, वगैरेंनीं जर्जर होणें.

४. **आपल्या जिवाला खाणें**—चरफडणें. झुरणें.

५. **एक जीव येणें, एक जीव जाणें**—आतां मरतो, कीं अर्ध्या घटकेनें मरतो, अशा अवस्थेप्रत पोंचणें.

६. **एक जीव होणें**—अगदीं मिळून जाणें. उ० नारळाचा चहू उकळला दुधांत घातला, म्हणजे त्या दोहोंचा एक जीव होऊन जातो.

७. **जीव अटणें**—दमणें, भागणें, थकून जाणें.

८. **जीव अटविणें**—दमविणें, सतावणें, त्रासविणें.

९. **जीव टांगणीला लागणें**—चिंताग्रस्त होणें. उ० मुलाला संध्याकाळीं घरीं यावयाला उशीर झाला, कीं माझा जीव टांगणीला लागतो, ( म्ह० मला भारी काळजी लागते; चैन पडेनासें होतें ).

१०. **जीव अधांतरीं उडणें**—संभ्रांत होणें; चिंताग्रस्त होणें.

११. **जीव अर्धा करणें**—फार कष्ट सोसणें; फार मेहेनत करणें.

१२. **जीव अर्धा होणें**—अगदीं थकून जाणें.

१३. **जीव कालवणें**—कासावीस होणें.

१४. **जीव कोरडा होणें**, किं० **पडणें**—दमणें, अशक्त होणें, कमजोर होणें, झिजणीस लागणें, व्याकुळ होणें ( आजारानें, भुकेनें, श्रमानें, इ० ).

१५. **जीव सुकणें**—म्लान, अशक्त, व्याकुळ, होणें.

१६. **जीव खरडून**—जोरानें; सर्व शक्ति खर्चून; उ० मुलाला भूक लागली आहे, त्याला दूध पाज; मघापासून तें जीव खरडून रडत आहे.

१७. **जीव खाऊन काम करणें**—सर्व शक्ति खर्चून काम करणें.

१८. **एकाद्याचा जीव घेणें**, किं० **खाणें**—त्याला सतावणें, किं० त्रास देणें.

१९. **जीव खालीं पडणें**—स्वस्थता येणें; चिंता दूर होणें; इच्छिलेली वस्तु प्राप्त झाल्यामुळें समाधान वाटणें.

२०. **जीव गोळा होणें**—भीति वाटणें, घाबरणें, अस्वस्थ होणें, अति श्रमामुळें जीव जातो कीं राहातो असें होणें; मरणोन्मुख होणें; उ०

जों जों देखे देव काखेंत बोळा ।
तों तों त्याचा होतसे जीव गोळा ॥

आनंदतनय.

२१. **जीव घेऊन पळणें**--प्राण वांचविण्यासाठीं पळत सुटणें.

२२. **जीव जाळणें**, किं० **मारणें**--इच्छा, किं० मनोविकार, नियंत्रित करणें.

२३. **जीव टाकणें**--

(क) प्राण सोडणें, मरणें.

(ख) निराश होणें, खचणें.

(ग) एकादा पदार्थ अति उत्कंठेनें इच्छिणें; एकादा पदार्थ मिळण्यासाठीं भारी धडपड करणें. उ० पेढ्यासाठीं असा जीव टाकूं नको.

(घ) जीव टाकून, म्ह० अति जोरानें, किं० कष्टानें, किं० श्रमानें.

२४. **जीव ठिकाणीं नसणें**--चिंताग्रस्त असणें; उ० गर्दीत हरवलेलें माझें मूल सांपडे तोंपर्यंत माझा जीव ठिकाणीं नव्हता!

२५. **जीव तोडून एकादें काम करणें**--मेहेनतीनें, काळजीनें, कुचराई न करतां, तें करणें. उ० त्यानें पत्राच्या तीन प्रती जीव तोडून केल्या, पण त्या त्याच्या वरिष्ठास आवडल्या नाहींत!

२६. **जीव थाऱ्यावर नसणें**--चिंताग्रस्त, अस्वस्थ, असणें.

२७. **जीव थोडथोडा होणें**--जिवाला काळजी, भीति, अस्वस्थता, वाटणें. उ० तुझ्या वांटयाचे चुरमुरे बाजूला काढून ठेवले आहेत. तुझा जीव थोडथोडा होऊं देऊं नको!

२८. **जीव देणें**--आत्महत्या करणें. उ० सासऱ्याच्या जाचामुळें त्या पोरीनें विहिरींत जीव दिला! उ०

> अंगदा ऐसा निलाजरा। पाहतां जनीं न दिसे दुसरा।
> मुख दाखविशी वानरा!। रिघोनि सागरीं जीव देईं॥ एकनाथ.

२९. **जीव धरणें**--न कोमेजणें. वाढणें. उ० मृगाच्या सुमारास हें झाड लावलें, तर तें जीव धरील.

३०. **जीव धरून**--उत्साहानें, मेहेनतीनें.

३१. **जीव पाखडणें**--रागानें तडफडणें.

३२. **ज्याचा त्याला जीव प्यारा**--प्रत्येकाला आपले प्राण आवडतात.

३३. **एकाद्या वस्तूवर जीव बसणें**--ती फार आवडणें. तिच्यावर प्रेम जडणें. उ० ह्या अंगठीवर माझा जीव बसला आहे.

३४. **एकाद्याचा जीव भांड्यांत पडणें**--तो स्वस्थ, शांत होणें. त्याची काळजी दूर होणें.

३५. **जीव मुठींत धरून**--गत्यंतर नाहीं म्हणून नावडती गोष्ट करावयास सिद्ध होऊन. मनाचा धडा करून, किं० मन घट्ट करून.

३६. **जीव मोठा करणें**--

(क) धैर्य धरणें; हिम्मत बाळगणें.

(ख) औदार्य करावयाचा निश्चय करणें; उ० मांडवासाठीं तो दहा रुपयांहून ज्यास्ती खर्च करावयाला अगदीं नाखूष होता. पण लोकांनीं त्याची थट्टा मांडली; तेव्हां त्यानें जीव मोठा केला, आणि तेरा रुपये खर्च करावयाची परवानगी दिली.

३७. **जीव राखणें**--कुचरपणा करणें. उ० तो मजूर जीव राखून काम करतो.

३८. **जीव वर धरणें**--उत्कंठेनें इच्छिणें; उ० थालीपिठासाठीं त्या पोरीनें जीव वर धरला होता.

३९. **जीव वारा पिणें**--उदास, खिन्न, असणें.

४०. **जीव सोडणें**--मरणें. आत्महत्या करणें.

४१. **एकाद्याच्या जिवाचा घोट घेणें**--त्याला सतावणें.

४२. **एकाद्याच्या जिवाचा लोळ करणें**--त्याला त्रास देणें.

४३. **जिवाची ग्वाही, किं० पाखी, देणें**--खात्रीपूर्वक सांगणें.

४४. **जिवाची हुल्लड करणें**--नेटाचा प्रयत्न करणें.

४५. **जिवाचे चार चार करणें**--चैन, विलास, वगैरेंनीं स्वतांला सुखी करण्याची खटपट करणें.

४६. **जिवांत जीव आहे तोंपर्यंत**--सबंध आयुष्यभर, मरण येई तोंपर्यंत, जन्मभर, सदासर्वदा, आमरण. उ० त्यानें जिवांत जीव आहे तोंपर्यंत भावजयीला पोसण्याचा पणकर घेतला आहे.

४७. **जिवाचा धडा करणें**--साहसाचा प्रयत्न करावयाला, किं० निरुपाय म्हणून एकादी दुःखाची स्थिति भोगावयाला, तयार होणें.

४८. **जिवाच्या गांठी बांधणें**--मनांत नीट ठसवून, किं० बिंबवून, घेणें. उ०

वेदशास्त्राचा मथितार्थ । मऱ्हाटिया होय फलितार्थ ।
तरी चतुरीं परमार्थ । कां न घ्यावा ? ।
देशी हो कां मऱ्हाठी । परी उपनिषदांचीच राहाटी ।
तरी हा अर्थू जिवाचिया गांठीं । कां न बांधावा ? ॥

४९. **जिवाला खाणें**—मनाला लागणें, किं० लागून राहाणें.

५०. **एकाद्याला जीव कीं प्राण करणें**—त्याला फार फार जपणें.

५१. **एकाद्याच्या जिवांत जीव घालणें**—त्याला उत्तेजन देणें; त्याचें सांत्वन करणें.

५२. **जिवांत जीव येणें**—पुन्हा धैर्य येणें; काळजी, भीति दूर होणें; समाधान होणें; उ० पुरुष गर्दींत चुकले तेव्हां मी फार घाबरून गेलें; ते पुन्हा दिसले, तेव्हां माझ्या जिवांत जीव आला. उ० मला भारी श्रम झाले आहेत; चहा प्याल्याशिवाय माझ्या जिवांत जीव येणार नाहीं.

५३. **जिवानिशीं**--जिवासकट; उ० चोरांनीं त्या पोरीला जिवानिशीं ठार मारलें. उ० वाघाच्या तावडींतून मी जिवानिशीं पळून आलों.

५४. **जिवानिशीं जाणें**—मरणें. उ० शेळी जाते जिवानिशीं आणि खाणार म्हणतो वातट !

५५. **जिवापरता**—

( क ) सोसण्याच्या शक्तीच्या पलीकडचा; असह्य. उ० ह्या मुलाला जिवापरता ताप आला आहे. उ० मला आज जिवापरते श्रम झाले आहेत.

( ख ) प्राणाहून प्रिय. उ० हा म्हातारपणचा मुलगा गोवर्धनपंतांस प्राणापरता वाटतो, ह्यांत नवल काय ?

५६. **जिवापलीकडे**—प्राणाहून प्रिय.

५७. **जिवाला खाणें**--पश्चात्तापजनक होणें. उ० म्हातार्‍या आईला मीं उद्धट उत्तर केलें, हें माझ्या जिवाला खात आहे.

५८. **जिवावर**--स्वताच्या धमकीवर, किं० बुद्धिसामर्थ्यावर. दुसर्‍याच्या मदतीवर अवलंबून न राहातां.

५९. **एकाद्याच्या जिवावर उठणें**--त्याचा जीव घ्यावयाला सिद्ध होणें.

६०. **एकाद्याच्या जिवावर पोट भरणें**--त्याच्या पदरचें खाऊन राहाणें. उ० लखूनानानें लहानपणीं विद्याविद्या कांहीं केली नाहीं. आतां म्हातारपणीं तो आण्णासाहेबांच्या जिवावर पोट भरीत पडला आहे.

६१. **एकाद्याच्या जिवावर उड्या मारणें**--त्याचा आश्रय, त्याची मदत, किं० त्याचा पैसा, मिळाला आहे, म्हणून, किं० मिळणार आहे ह्या भरंवशावर, आनंद मानणें, किं० बढाई मारणें, किं० चैन करणें. उ० तुला स्वताला एक कवडी मिळविण्याची देखील अक्कल नाहीं. बापाच्या पैशावर तूं उड्या मारीत आहेस!

६२. **जिवावर उदार**--*जीव जाण्याचा प्रसंग आला, तरी न कचरणारा;* जिवाची पर्वा न करणारा.

६३. **जिवावरचा**--ज्यांत जिवाला धोका आहे असा. उ० माझ्या मुलाला जिवावरचीं तीन दुखणीं गेलीं. [ "जिवावरचा," ह्या विशेषणाचीं विशेष्यें "प्रसंग," "पाळी," "गोष्ट," "दुखणें," किं० ह्या अर्थाचे शब्द. ]

६४. **जिवावरचें आधण उतरणें**--एकाद्या कठिण प्रसंगांतून बचावणें.

६५. **जिवावर येणें**--अप्रिय, दुष्कर, वाटणें. उ० मुलीला सासरीं पाठविणें माझ्या जिवावर आलें होतें, पण इलाज काय?

६६. **एकाद्याच्या जिवावर बेतणें**--जीव जाण्याच्या प्रसंगांत तो सांपडणें. उ० मी खेड्याच्या वाटेनें येत असतां तीन चोरट्यांनीं मला गराडलें. माझ्या जिवावरच बेतली होती. पण माझ्या सुदैवानें तेथें पांच सहा मुसाफर अकल्पित आले, तेव्हां ते चोरटे पळून गेले!

६७. **जिवाला करवत लागणें**—अतिशय चिंता लागणें; उ० मारवाड्याचें कर्ज फिटे तोंपर्यंत माझ्या जिवाला जशी करवत लागली होती!

६८. **जिवास जहानगिरी करणें**, किं० **होणें**—मोठें संकट आणणें, किं० येणें.

६९. **जिवास जीव देणें**—मित्राचा जीव जात असला तर आपला जीव देणें.

७०. **जिवास मुकणें**—मरणें. मृत्यु पावणें. उ० मी चोरट्याला म्हटलें, "मला मुकाट्यानें जाऊं दे. मला उपद्रव देशील, तर जिवास मुकशील!"

७१. **जिवाशीं**, किं० **जीवीं धरणें**, किं० **बांधणें**—प्रिय मानणें; मन अर्पिणें; चाहाणें. उ० त्या दत्तक पोराला म्हातारीनें दहा वर्षें जिवाशीं धरिलें होतें. पण अखेरीस तो तिच्या डवोल्यावर हात मारून जो पळून गेला, त्याचा आज सहा महिने झाले तरी पत्ता नाहीं. उ०

> काय इणें न धरावें अधनत्वें भूपजनवरा जीवीं? ।
> कां न प्राशावें मधु मधुपानें कूपज-नव-राजीवीं? ॥
>
> मोरो०—वनपर्व.

७२. **जीवीं लागणें**—

(क) आवडीचा असणें. प्रिय वाटणें.

(ख) मर्मभेदक वाटणें. उ० त्याचे शब्द माझ्या जीवीं लागले, पण मीं त्या वेळीं उत्तर दिलें नाहीं.

७३. **जिवें वांचणें**—एकादें संकट टळून जिवंत राहाणें; जीव जाण्याचा प्रसंग असतां जीव न जातां बचावणें.

२५१. **जोजो करणें**—मुलाला निजवितांना आया एक गाणें म्हणतात, त्यांत "जोजो" हा शब्द आहे. त्यावरून "जोजो करणें," म्हणजे निजणें, किं० निजविणें.

२५२. **जोडे फाडणें**—आपल्या कार्यासाठीं दुसऱ्याच्या घरीं खेटे घालणें. [खेटे घालतांना चालावें लागतें, आणि चालतांना जोडे झिजतात,

आणि झिजून फाटतात. ] उ० सहा महिने जोडे फाडले, तेव्हां हें स्थळ मुलीला मिळालें !

२५३. **झक मारणें**—चुकी करणें; न करावी ती गोष्ट केली असें कबूल करणें, किं० कबूल करून तिच्याबद्दलचा दोष आपल्या पदरांत घेणें. उ० मी तुझ्या कारभारांत पडलों, झक मारली.

२५४. **झक मारीत वसणें**—एकादी गोष्ट करावयाची मनांत असो वा नसो, ती नाइलाज म्हणून करणें; उ० तो जात नाहीं म्हणजे काय ? झक मारीत जाईल !

२५५. **झुरणीस लागणें**—शरीराच्या, किं० मनाच्या, व्यथेनें झिजणें, किं० झिजून कृश होत जाणें; उ०

> माझी ही तनु चंडभानुकिरणीं ग्रीष्मीं कृशा होइल,
> संतापाकुल पांथसंहति तदा कोणाकडे पाहिल ? ।
> लागे अंतरिं सारखें झुराणिला कासार या आधिनें,
> त्याचें जीवन धन्य होय भुवनीं, धिग् वारिधीचें जिणें ॥

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

२५६. **झेंडा नाचविणें**—आपण केलेला पराक्रम लोकांमध्यें जाहीर करणें.

२५७. **टकमक पाहणें**—कौतुकानें, आश्चर्यानें, विस्मयानें, पाहाणें; उ०

> टकमक पहात होते प्रभुमुखचंद्राकडेच चातकसे ।

मोरोपंत.

२५८. **टक्केटोणपे खाणें**—जगांतील, किं० व्यवहारांतील, संताप आणणाऱ्या, किं० त्रासदायक, गोष्टींचा अनुभव घेणें; उ० तो टक्केटोणपे खाऊनच हुषार झालेला आहे ! उ० टक्केटोणपे खाल्ल्याशिवाय कोणाला शहाणपणा येत नसतो !

२५९. **टंगळमंगळ करणें**—चुकारतट्टूपणा करणें; हयगय करणें; बेपरवाई करणें; उ० नारायण आलीकडे अभ्यासांत टंगळमंगळ करूं लागला आहे.

२६०. **ट फ करणें**—थोडेसें, किं० अडखळत, वाचावयाला मात्र समर्थ होणें, किं० असणें; उ० आमची मुलगी कधीं शाळेंत गेली नाहीं, घरींच बसून टफ करावयाला शिकली आहे.

२६१. **टला ट जुळविणें**—अक्षराशीं अक्षर जुळवून मोठ्या कष्टानें कशी-बशी कविता करणें; उ० टला ट जुळवून कोणी मोरोपंताची बरोबरी करूं शकेल काय ?

२६२. **टाकणें टाकणें**--केवळ उपचार म्हणून करणें; एकादी गोष्ट औप-चारिक म्हणून करणें; एकादी गोष्ट न केली तर चार लोकांत बरें दिस-णार नाहीं, एवढ्याच भावनेनें ती करणें, (म्ह० मनापासून नव्हे; ) उ० लक्ष्मणशास्त्री मुळीं देखील आपल्या ओळखीचे नाहींत; ह्या प्रसंगी त्यांना जेवायाला बोलावण्याचें कांहीं कारण नाहीं, परंतु ते ह्याच वाड्यांत बिन्हाडानें राहातात, म्हणून टाकणें टाकलें पाहिजे इतकेंच!

## २६३. टांकी.

१. पाथरवटांचें एक हत्यार.

२. **टांकी चालविणें**--तीच तीच गोष्ट एकसारखी करीत राहणें.

३. **टांकी चालणें**--

(क) इलाज चालणें.

(ख) एकाद्याचा तीच तीच गोष्ट पुन्हा पुन्हा करण्याचा एकसारख क्रम चालू असणें.

४. **टांकी लागणें**--प्रवेश, किं० थारा, मिळणें. केलेला इलाज ला पडणें.

५. **त्याच्या तोंडाला टांकी दिली आहे**—त्याच्या तोंडावर देवी च्या व्रणांच्या खळग्या आहेत.

६. **जांत्याला टांकी देणें**—दाणे चिरडणारे जे जात्याचे पृष्ठभाग, झिजून गुळगुळीत झाले असल्यास ते एका पोलादी हत्यारानें खरख रीत करणें; उ० ह्या जांत्याला बरेच दिवसांत टांकी दिली नाहीं.

२६४. **टांके ढिले होणें**--शिवलेल्या कपड्याचे टांके तुटले, म्हणजे त

जसा निकामी होतो, तसा माणूस अतिश्रमानें निकामी होतो; त्यावरून एकाद्याचे " टांके ढिले होणें, " म्हणजे त्याला अतोनात श्रम, किं० कष्ट, झाल्यामुळें कोणतेंही काम करण्याची त्याच्या अंगीं ताकद न राहणें; उ० मुलीला स्थळ पाहातां पाहातां माझे टांके ढिले झाले!

२६५. **टिवल्याबाहुल्या करणें**--नटणें, थाटमाट करणें, डौल करून टवाळकी करीत हिंडणें.

२६६. **टिवल्याबावल्या दाखविणें**--लोकांच्या पुढें तोंडें वेडीं वांकडीं करून त्यांना वेडावणें.

२६७. **टुरटुर लावणें**—

(क) थोडासा वेळ आपल्या कर्तबगारीचा डौल दाखविणें.

(ख) एकाद्यापाशीं कांहीं वस्तु मागून त्याला सतावणें; उ० बाहुलीसाठीं मुलीनें माझ्यामागें सकाळपासून सारखी टुरटुर लावली आहे!

२६८. **टेकीस येणें**---असमर्थ होणें; दमून जाणें. उ०

स्वजन गेले ज्या, ज्ञात तो न गांव;
इंद्रियांची पोंचे न तिथें धांव; ।
कल्पना ही टेकीस येइ येथें !
शैल चढतां पंगूस यश न येतें ॥

वा. अ. भिडे.

### २६९. टेंभा.

१. मशाल.

२. **टेंभा पाजळणें**—प्रकाश पाडणें; कर्तृत्व दाखविणें. ह्यांत निंदा गर्भित असते. उ० आमचे पुतणे ह्या परीक्षेस बसले आहेत. आतां काय टेंभा पाजळतात तें पाहावयाचें!

३. **टेंभा मिरवणें**--ऐट दाखविणें.

२७०. **ठाव घेणें**---खोली पहाणें; मनाची परीक्षा करणें.

२७१. **डबघाईला येणें**---उतरत्या कळेला आरंभ होणें; वैभव, सामर्थ्य, वगैरेंचा अंत व्हावयाची वेळ येऊन ठेपणें. [ डफावर म्हटलें जात अस-

लेलें गाणें समाप्त व्हावयाच्या वेळीं म्हणणारा फार घाईनें डफ वाजवितो. घाईनें डफावर थापा पडूं लागल्या, म्हणजे गाणें संपत आलें आहे, असें समजतें. यावरून डफघाई म्ह० समाप्तीचा समय. ] उ० माझी प्रकृति आलीकडे डबघाईला आली आहे ( म्ह० फार बिघडली आहे ).

२७२. **डल्ला मारणें**--एकाद्याच्या पैशाचा मोठ्या शिताफीनें अपहार करणें. उ० त्यानें अज्ञान भाऊसभावाच्या पैशावर चांगला डल्ला मारला !

२७३. **डांगोरा,** किं० **धांडोरा, पिटणें**--जाहीर करणें. [ चांगल्या, किं० वाईट, अर्थानें ह्याचा उपयोग होतो. ] उ० रात्रीं नवाच्या नंतर कोणी घराच्या बाहेर पडूं नये, असा डांगोरा पिटण्यांत आला आहे. उ० माझ्या मुलाची नोकरी निघाली म्हणून, सखूताईनें साऱ्या गांवांत डांगोरा पिटला !

२७४. **डाव साधणें**--योजलेल्या युक्तीनें इष्ट वस्तु मिळविणें; जिंकणें; एकाद्याविषयीं मनांत जी द्वेषबुद्धि असेल, तिनें प्रेरित होऊन त्याचें नुकसान करणें.

२७५. **डावें उजवें कळणें**--वांकडें कोणतें आणि सरळ कोणतें हें समजणें.

## २७६. डाळ.

१. धान्यविशेष. [ तुरीची डाळ शिजावयाची पंचाईत असते. अमुक प्रकारचें पाणी, अमुक प्रकारचें भांडें, वगैरे अनुकूल गोष्टी असल्या, तरच ती चांगली शिजते. यावरून पुढील दोन वाक्प्रचार रूढ झाले आहेत. ]

२. **एकाद्याची डाळ शिजणें**—त्याला थारा मिळणें; त्याची सोय जुळणें; त्याची दाद लागणें.

३. **डाळ शिजूं देणें**—थारा देणें; सोय जुळूं देणें; दाद घेणें. उ० येथें कोणी तुझी डाळ शिजूं देईल, असें वाटत नाहीं.

२७७. **एकाद्याच्या डोक्यावर केस न ठेवणें**—त्याची फजीती उडविणें; त्याला बोलून बोलून पुरेपुरेंसें करणें. [ पूर्वीच्या काळीं एकाद्याची मानखंडना करावयाची असतां त्याच्या डोक्यावरचे केश भादरीत असत. कधीं कधीं सबंध डोकें न भादरतां पाट काढीत असत.

ह्या चालीवरून वरील वाक्प्रचार उत्पन्न झालेला आहे. ह्यासंबंधानें पुढील आर्या पहा.

वधसम विडंबन असें समयींच स्मरण शाळपाटव दे।
अर्धेंदुशरें त्याच्या माथां काढूनि पांच पाट वदे ॥ मोरो०

२७८. **डोंगर पोखरून उंदीर काढणें**—मोठ्या प्रमाणावर आरंभ करून शेवटीं अत्यल्पच पराक्रम करणें, किं० अत्यल्प फल मिळविणें.

२७९. **डोळ्यांतील काजळ चोरणें**--चोर आला असतां त्याला पहाण्याचें इंद्रिय डोळा. त्या डोळ्यांतीलच काजळ चोरणें, म्ह० अतिशय कौशल्यानें चोरी करणें, किं० पाहातां पाहातां चोरी करणें.

२८०. **डोळ्यावर कातडें ओढणें**—एकादी वाईट गोष्ट आपल्या डोळ्यांदेखत घडत असतां तिच्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष्य करणें; तिच्याकडे डोळेझांक करणें; तिला प्रतिबंध करण्यास प्रवृत्त न होणें.

### २८१. तत्त्वमसि.

१. **तत्त्वमसि**—तत्+त्वम्+असि म्हणजे तें तूं आहेस. तूं ब्रह्मच आहस. सर्व वेदान्ताचें सार ह्या चार अक्षरांच्या एका वाक्यांत आहे. ह्यावरून पुढें "तत्त्वमसि" ह्याचा अर्थ सार, मूल्यवान् वस्तु, महत्त्वाची वस्तु, असा झाला. जगांत सर्व व्यवहाराचें आदिकारण, किं० मुख्य साधन, पैसा असल्याकारणानें "तत्त्वमसी", "तत्वमशी" हा शब्द पैशाचा वाचक झाला.

२. **तत्त्वमसीशीं गांठ घालणें**—पैशावर धोरण ठेवणें; एकाद्या कामीं द्रव्यप्राप्ति किती होण्याजोगी आहे, इकडे लक्ष्य देणें.

२८२. **एकाद्याला तंबी देणें, किं० भरणें**--त्याच्याकडून त्याच्या इच्छेविरुद्ध कांहीं गोष्ट करविण्यासाठीं, किं० त्याला योग्य मार्गानें चालावयासाठीं, त्याला धमकी देणें, किं० भीति घालणें. त्याला खरपूस ताकीद देणें.

२८३. **तळपट होणें, किं० वाजणें**—नाश होणें. उ०

म्हणति अदित्यादि सत्या "त्या मेल्याचें समूळ तळपट हो!"
मोरो०.

२८४. **तळी भरणें**—खंडोबाचे भक्त एका ताटांत पानें, सुपाऱ्या, वगैरे भरतात, त्याला " तळी भरणें, " असा त्या लोकांचा शब्द आहे. यावरून " एकाद्या कार्याची तळी भरणें, " म्हणजे तें कार्य करावयाला सर्वांनीं यथाशक्ति सिद्ध होणें. " तळी उचलणें, " म्हणजे तें कार्य सर्वांनीं एकदिलानें पथकरून पार पाडणें.

२८५. **तळीराम गार करणें**—उपभोग्य वस्तूचा उपभोग घेऊन, किं० इष्ट ती वस्तु मिळवून, शांत होऊन बसणें. [ चांगल्या व वाईट अर्थानें त्याचा उपयोग केला जातो. ]

२८६. **ताकापुरतें रामायण**—जितकें, किं० ज्या किंमतीचें ताक, तितकें, किं० त्या किंमतीचें, रामायण; ताक थोडें, तसें रामायण थोडें, म्हणजे संक्षिप्त. ताक जसें अल्प मोलाचें, तसें रामायणही रूक्ष. आपलें कार्य साधण्यापुरतें आर्जव, किं० खुशामत.

२८७. **तापल्या तव्यावर भाजून घेणें**—एकाद्या कार्यांत दुसरें कार्य सहजासहजीं होण्यासारखें असल्यास अवश्य करून घेणें.

२८८. **तांबडें फुटणें**—सूर्योदयाची वेळ प्राप्त होणें.

२८९. **ता म्हणतां ताकभात समजावा**—" ताकभात " हा शब्द उच्चारतांना प्रथम " ता " हें अक्षर उच्चारावें लागतें, नंतर " क ", नंतर " भा, " नंतर " ता. " ऐकणारानें " ता " हें अक्षर ऐकल्याबरोबर पुढें यावयाचीं अक्षरें क, भा, आणि त, हीं तर्कानें ओळखावीं. स्थळ, काल, वृत्त, वर्तमान, वगैरेंकडे लक्ष्य ठेवून कोणतीही गोष्ट झटकन् तर्कानें जाणावी.

२९०. **तारे तोडणें**—ताळमेळ न बाळगतां हावीं तीं विधानें करीत सुटणें.

२९१. **ताळ सोडणें**—धरबंध, मर्यादा, आपला दर्जा, वगैरेंकडे दुर्लक्ष्य करणें.

२९२. **तिखटमीठ लावून सांगणें**—खाद्य पदार्थाला तिखटमीठ लावल्यानें तो रुचकर होतो. यावरून जी हकीगत सांगावयाची असेल, ती ऐकणाराला मनोरंजक व्हावी, म्हणून तींत अतिशयोक्तीचा भाग घुसडून देणें; किंवा आपलें निवेदन चटकदार व्हावें, म्हणून त्यांत पदरच्या गोष्टी घुसडून देणें, असा वरील शब्दसंहतीचा अर्थ होतो.

२९३. **तिरपीट उडणें**--त्रेधा उडणें, गोंधळ होऊन जाणें. [ त्रिपथ=तीन वाटा. एकाद्याच्या डोळ्यापुढें तीन वाटा आल्या असतां कोणत्या वाटेनें जावें, त्याविषयीं त्याच्या मनांत गोंधळ होतो, यावरून "तिरपीट उडणें," ही शब्दसंहति उत्पन्न झालेली आहे. ]

२९४. **तिलांजलि देणें**—मृत मनुष्याला तिलांजलि, म्ह० तीळ घातलेलें पाणी, द्यावें, अशी धर्मशास्त्राची आज्ञा आहे. "एकाद्याच्या नांवानें तिलांजलि द्यावयास उठणें," किं० "तिलांजलि घेऊन उभें राहाणें," म्हणजे त्याच्या मरणाची वाट पहात वसणें, किं० त्याच्या नाशासाठीं टपून वसणें.

२९५. **एकाद्याच्या अंगाचा तिळपापड होणें**--त्याला अतिशय संताप येणें. उ० अन्याय आणि पक्षपात पाहून माझ्या अंगाचा तिळ-पापड होतो.!

२९६. **तीर्थी गेल्यावांचून मुंडन होत नाहीं**--तीर्थाचे ठिकाणीं गेलें असतां मुंडन केलें पाहिजे, अशी धर्मशास्त्राची आज्ञा आहे. जो कोणी तीर्थाचे ठिकाणीं जातो, त्याचें मुंडन तेथें होतें. कोणाचें ही मुंडन चुकत नाहीं. यावरून वरील वाक्याचे पुढें दिल्याप्रमाणें अर्थ निघाले.

( क ) दपटशा दिल्यावांचून कोणी नरम पडत नाहीं.

( ख ) श्रमाशिवाय, कष्टाशिवाय, मूल्यवान् वस्तु प्राप्त होत नाहीं.

२९७. **तीळ खाऊन व्रत मोडणें**--अगदीं क्षुल्लक लाभासाठीं आपली आब्रू गमावून घेणें, किं० कोणच्या तरी रीतीची हानि करून घेणें.

२९८. **तुणतुणें वाजविणें**--ऐकणारांना कंटाळा आला, तरी पुन्हा पुन्हा आपली आवडती हकीगत, किंवा गोष्ट, सांगत सुटणें, किं० आपला आवडता विषय कुटीत वसणें.

२९९. **आपली तुंबडी भरणें**—स्वतांला पाहिजे असेल तितकें पदरांत पाडून घेणें.

३००. **तुरुत दान महापुण्य**--जें कांहीं द्यावयाचें आपल्या मनांत असेल, तें जेव्हांच्या तेव्हां, किं० वेळेवर, दिलें असतां त्याचा उपयोग होतो.

आणि आपले उपकार घेणारावर होतात, व वेळेवर न दिल्यास आपलें जावयाचें तें जाऊन घेणाराला उपयोग होत नाहीं.

३०१. **तूट पडणें**—आवश्यक असेल,त्यापेक्षां कमी असल्यामुळें उणीव भासणें.

३०२. **तेरा बारा चालणें**—तेरा बारा म्ह० तेरा कीं बारा, अशाबद्दल वादविवाद; सामान्यतः कोणत्याही गोष्टीसंबंधानें वादविवाद; तेरा बारा चालणें, म्ह० वादविवाद चालणें.

३०३. **तोफेच्या तोंडीं देणें**—तोफेच्या तोंडापुढें उभें करून त्याच्यावर तोफेंतून गोळा सोडणें; तोफ उडावयाची असतां तिच्या तोंडापुढें एकाद्याला उभें करणें. लाक्षणिक अर्थ असा कीं, एकाद्या कामाचे दुष्परिणाम सोसण्यास एकाद्या माणसास पुढें करणें. उ० तुम्ही सर्वजण मागें राहतां, आणि दर खेपेस मलाच तोफेच्या तोंडीं देतां! ह्या खेपेला रजा मागण्यासाठीं आप्पारावांना साहेबांकडे जाऊं द्या! मी नाहीं जात!

३०४. **तोरा मिरविणें**—ऐट दाखविणें. उ० त्याला येत नाहीं कांहीं देखील, पण तोरा मोठा मिरवितो!

३०५. **तोलास तोल देणें**--बरोबरी करणें; बरोबरीच्या नात्यानें वागणें; आपली बाजू दुसऱ्याच्या बाजूहून कमी दिसणार नाहीं, असें करणें.

३०६. **त्राहि भगवान् करणें**--त्राहि भगवन्=हे देवा, माझें रक्षण कर. एकाद्याला "त्राहि भगवन् होणें," म्हणजे त्याला देवाला "सोडीव ह्या दुःखांतून," असें म्हणण्याची पाळी येणें, म्हणजे त्याला अतोनात त्रास, उपद्रव, वगैरे होणें. तसेंच "एकाद्याला त्राहि भगवान् करणें," म्हणजे त्याला "देवा, सोडीव मला ह्या संकटांतून," असें म्हणण्याइतका उपद्रव देणें.

३०७. **त्रेधा उडणें**, किं० **होणें**--धांदल उडणें; काय करावें हें सुचेनासें होऊन गोंधळ होणें. उ० पोळ्या करावयाला नी लागणार, इतक्यांत पुरुष येऊन पानांवर बसले; एकीकडे त्यांना वाढावयाचें आणि एकीकडे पोळ्या लाटावयाच्या, असें झालें तेव्हां माझी त्रेधा उडाली!

३०८. **थुंकी झेलणें**--श्रीमंत, किं० समर्थ, अशा लोकांच्या भोंवतीं कार्यसाधु माणसें असतात; तीं आपल्या यजमानाच्या तोंडांत थुंकी आली असतां पिकदाणी, किं० तस्त, वगैरे जवळ नसतां आपली ओंजळ त्यांच्या पुढें करून तींत ती थुंकी घ्यावयास सिद्ध असतात; यावरून "एकाद्याची थुंकी झेलणें," म्हणजे त्याची अतिनिंद्य प्रकारें खुशामत करणें,असा अर्थ होतो. उ० कासोबा प्रेमजीची थुंकी झेलण्याला सदा तत्पर असतो !

३०९. **थेर करणें**, किं० **थेर थेर करणें**--अंगीं नसलेल्या नाजुकपणाचा, किं० मोठेपणाचा, देखावा करणें; उ० एवढीशी कोठें शिंक आली, कीं तो आंथरुण घालून त्यावर आजाऱ्यासारखा पडून राहातो, ओंवळ्यानें जेवायाला बसतो, असे थेर थेर करतो !

३१०. **थैक म्हणतां ब्रह्महत्या होणें**--क्षुल्लक गोष्टीचा भयंकर परिणाम होणें.

## ३११. दगड.

१. **दगड**--फत्तर; शिला, दगड, धोंडे, माती, धूळ, इत्यादि शब्द अत्यंत अभाव दाखवितांना योजतात; उ० त्याला दगड समजतें ! उ० त्याला फारशी भाषा काय कळते आहे माती !

२. **दगड उचलणें**--एकाद्याविरुद्ध मसलत करणें; उ० माझ्यावर उगीच दगड उचलूं नको, (म्ह० माझ्याविरुद्ध कांहीं मसलत करूं नको.)

३. **दगड चोहोंकडे टाकून पाहाणें**--सर्व दिशांनीं उपाय, किं० खटपटी, करणें; उ० एकाच पोस्टखात्यांत नोकरीसाठीं अर्ज करून स्वस्थ बसूं नको ! चोहोंकडे दगड टाकून पहा (म्ह० इतर खात्यांतही अर्ज करून ठेव,) म्हणजे कोणत्या तरी खात्यांत तुला नोकरी मिळेल !

४. **दगड टाकून ठाव पाहाणें**--

(क) पाण्यांत दगड टाकून पाण्याच्या खोलीचा अजमास पाहणें.

(ख) एकाद्याला खुबीदार प्रश्न करून त्याच्या मनांतील विचारांची अटकळ करणें.

५. **दगडाखालीं हात सांपडणें**--दगडाखालीं हात सांपडला असतां

तो युक्तीनें काढून घ्यावा लागतो, दांडगाईनें काढल्यास तो खरचटून दुखापत होईल; मनुष्य अडचणींत सांपडलेला असतां, व हिकमत करून त्याची सुटका होण्याजोगी असतां, म्हणतात, " तुझा हात दगडाखालीं सांपडला आहे. तो सोयी सोयीनेंच काढून घेतला पाहिजे, घाई करतां कामा नये ! "

६. **दगडाशीं गांठ पडणें**--क्रूर, किं० न वळणाऱ्या, माणसाशीं संबंध येणें.

७. **दगडाशीं भांडणें**--समर्थाशीं असमर्थानें झगडा करावयास प्रवृत्त होणें; आपणाला न होण्याजोगें काम करावयास प्रवृत्त होणें.

८. **दगडाला पाझर, किं० पान्हा, आणणें**--अगदींच असंभवनीय गोष्ट करणें; उ० त्याला माफी करावयाला वळविणें, म्हणजे दगडाला पाझर आणणें होय.

९. **दगडाला पाझर, किं० पान्हा फुटणें**--अशक्य गोष्ट होणें; उ० त्यानें तुला पुन्हा नोकरीस ठेवून घेतलें, म्हणजे दगडाला पान्हा फुटला असें म्हटलें पाहिजे !

१०. **दगडाची साल काढणें, किं० दगडाचा दोर काढणें**--दुष्कर, अद्‌भुत, किं० अशक्य गोष्ट करणें; उ०

स्वल्पें कालें पुत्रे पाण्डव मथिले असेंच परिसाल ।
काढिन दगडाचीही मी, कोणाहि न निघेल परि, साल ॥
मोरो०-उद्यो०-अ० ५.

२१२. **दडी देणें**--लपून बसणें.

## २१३. दम.

१. ( क ) श्वास.
( ख ) एक श्वास घेण्यास लागणारा काळ.
( ग ) प्राण.
( घ ) जोराचा श्वासोच्छ्‌वास.
( ङ ) स्वताच्या कर्तृत्वाविषयीं अभिमान ( खरा असो, किं० खोटा

असो. ), वढाईखोरपणा; महत्त्वाकांक्षा. उ० त्याला अक्कल नाहीं कवडीची, आणि दम मात्र मोठा !

( च ) धमकदारी; कर्तृत्वशक्ति; ताकद; गुणावहता; अवसान. उ० ह्या काव्यांत कांहीं दम उरला नाहीं.

( छ ) श्वास निरोधून ठेवण्याचें सामर्थ्य. उ० तुझा दम मोठा, म्हणून तूं इतका वेळ पाण्यांत बुडून राहातोस.

( ज ) ओलावा. उ० ह्या जमीनीला अझून थोडा दम मारीत आहे.

२. **दम मारणें**—

( क ) चिलीम वगैरेंचा एक लांबलचक झुरका घेणें.

( ख ) आपल्या करामतीचा परमावधि करणें. उ० पुन्हा एकदा दम मार म्हणजे तो धोंडा सरकेल !

३. **दम भरणें**--तंभी देणें. भेडसावणें. दहशत घालणें. सक्त ताकीद देणें.

३१४. **दस गेले पांच उरले**--आयुष्याचा बराचसा मोठा भाग गेला, आतां अगदीं थोडा भाग अवशिष्ट राहिला आहे. दस आणि पांच म्हणजे दोन तृतीयांश आणि एक तृतीयांश.

३१५. **दहीं खाऊं कीं महीं खाऊं असे एकाद्याला होणें**--हें करूं कीं तें करूं, अशाविषयीं तो शंकित होणें.

३१६. **दादावावा करणें**--सौम्य भाषणानें एकाद्याचा राग घालविण्याचा, किं० मन वळविण्याचा, प्रयत्न करणें.

## ३१७. दिवस.

१. चोवीस तासांचा अवधि.

२. **दिवस करणें**--मृत मनुष्याचे दिवस करणें, म्ह० मृत मनुष्यासंबंधानें जे मरणानंतर दुसऱ्या, तिसऱ्या, वगैरे दिवशीं विधि करावयाचे ते करणें.

३. **दिवसा मशाल लावणें**--

( क ) दिवसा सूर्याचा प्रकाश असल्याकारणानें दिवा लावण्याचें कारण

नसतें. कोणी मनुष्यानें दिवसास मशाली लाविल्या, तर त्यानें तितकें तेल फुकट घालविलें असें होईल. यावरून "दिवसा मशाली लावणें," म्हणजे पैशाची उधळपट्टी करणें.

( ख ) कांहीं पराक्रम करून तो जाहीर करण्यासाठीं दिवसास मशाली लावणें.

## ३१८. दिवा.

१. उजेडासाठीं केलेला पदार्थविशेष; उ० अंधेर पडत चालला, आतां ह्या खोलींत दिवा लाव.

२. **दिवे ओवाळणें**––देवाची आरती करतांना देवापुढें दिवा ओवाळून त्याच्या महिम्याचीं स्तोत्रें गातात; ह्यावरून " एकाद्या वस्तूवरून दिवे ओवाळणें ", म्हणजे ती मूल्यवान् समजून तिचें वैभव गाणें, तिची वडीजाव करणें, कौतुक करणें; एकाद्या भिकार वस्तूविषयीं उपरोधिक भाषण करावयाचें असतां, ह्या शब्दसंहतीचा उपयोग करतात; उ० राम्या, तूं बाजारांत जाऊन आठ आण्याला शेरभर कांदे आणलेस ना ? आहाहा ! काय तुझी अक्कल ? तिच्यावरून दिवे ओवाळावे !

३. **दिवे लावणें**––

(क) प्रकाश पडणें, पराक्रम करून, कर्तबगारी दाखवून, कीर्ति मिळवून, लोकांचे डोळे दिपविणें, किं० त्यांना थक्क करून सोडणें; उ० इतका वेळ हें कुलूप उघडण्याचे आम्हीं प्रयत्न केले ते फुकट गेले. आतां तूं येऊन काय दिवे लावणार ?

(ख) दुर्लौकिक करून घेणें; उ० आमच्या मुलानें काय दिवे लावले ते तुम्हाला कोठें माहीत आहेत ! त्यानें आपल्या आईची मोहोरेची आंगठी फडताळांत ठेविली होती ती चोरली. ती एका सराफाला १६ रुपयांना विकली. मग आपल्या दोस्तांसह तो नागपुरास गेला, आणि तेथें एका नाटकमंडळींत नोकरीस राहिला.

४. **दिव्यानें रात्र उजाडणें**––सगळ्या रात्रभर दिवा तेवत ठेवून, न निजतां, कांहीं तरी काम करून, ( आजाऱ्याजवळ बसून, पत्ते खेळून

इ० ) रात्र घालविणें. [ बहुतेक लोक निजतांना दिवा मालवून निजतात, आणि कांहीं कामविम करावयाचें असतां मात्र दिवा तेवत ठेवतात, ह्या चालीवरून ही शब्दसंहति उत्पन्न झाली आहे. ]

## ३१९. दुःख.

१. कष्ट, पीडा, त्रास.

२. **दुःख वेशीस बांधणें**—

(क) वेस, म्ह० गांवचा दरवाजा. वेशीस बांधलेली वस्तु सर्वांस दिसत असते. यावरून " दुःख वेशीस बांधणें, " म्हणजे ज्याच्या त्याच्याजवळ आपल्या विपत्तीची कहाणी सांगत सुटणें.

(ख) आपली जी कांहीं अडचण असेल ती लपवून ठेवूं नये. लोकांमध्यें ती जाहिर करावी, म्हणजे कोणाला कांहीं तोड, किं० इलाज, ठाऊक असल्यास तो आपणास सांगतो, आणि अनायासें आपली अडचण दूर होते.

३. **दुःखावर डागण्या देणें**—अगोदरच जो दुःखी, त्याला मर्मभेदक भाषणानें ज्यास्ती दुःख देणें; उ० तो परीक्षेंत नापास झाला आणि त्याचें वर्ष फुकट गेलें, आतां " तूं खेळलास म्हणून नापास झालास, " " अमक्याच्या संगतीस लागलास म्हणून नापास झालास, " वगैरे बोलून काय उपयोग ? तेणेंकरून त्याच्या दुःखावर डागण्या दिल्याप्रमाणें होईल !

## ३२०. देव.

१. जगाचा नियंता, ईश्वर, परमेश्वर.

२. लांकूड, दगड, धातु, वगैरेंची जी मूर्ति, जींत विधिपूर्वक देवत्वाची प्रतिष्ठापना केलेली असते, ती मूर्ति; उ० आज एकादशी आहे, देव चिंचेनें घास.

३. **देव देव्हाऱ्यांत नसणें**—जो मालक तो स्थानावर नसणें; देखरेख करणारा ठिकाणीं नसणें; मन ( म्ह० शरीराचा मालक, किं० प्रेरक ) स्वस्थ नसणें.

२. **देव पावला**—देव प्रसन्न झाला; देवानें मनोरथ पुरविला; जें पा-

हिजे होतें, तें मिळालें, किं० घडून आलें; मनाजोगी गोष्ट घडली; उ० धोतरें आणावयाला पंढरीनाथ का जावयाला निघाला आहे? देव पावला म्हणावयाचा! [ कारण पंढरीनाथ कोणाचें कांहीं काम ऐकत नाहीं. ]

४. **देवाज्ञा होणें**--मरण येणें. [ शब्दशः अर्थः--देवाकडून "ये," किं० "स्वर्गास ये," अशा अर्थाची आज्ञा होणें. ]

३२१. **एकाद्याचे दोन हातांचे चार हात होणें**—त्याचें लग्न होणें. एकाद्याचे दोन हात असून काम करावयाला त्याला बायकोचे आणखी दोन हात मिळाल्यानें एकंदर चार हातांनीं काम होतें. [ मागें लेखांक ६१, ४० पहा. ]

३२२. **धडकी भरणें**--भीतीच्या अतिरेकामुळें ऊर धडधडूं लागणें. उ०

पाहुनि ज्याला प्रजाजनाच्या धडकी भरते हृदयांत।
क्षितिपति असुनी गणति तयाची कधीं न होई मनुजांत ॥

लक्ष्मण गणेश शास्त्री लेले.

३२३. **धरमधक्का बसणें**, किं० **मिळणें**—कार्य सफळ न होतां व्यर्थ हेलपाटे मात्र खावे लागणें. उ०

बसेल एकदा धरमधक्का.

राम जोशी.

## ३२४. धर्म.

१. परमेश्वरावर निष्ठा असून, तिला अनुसरून वागण्याच्या प्रवृत्तीनें जीं कर्मे, जे विधि, जो वर्तनक्रम, त्या सर्वांचा समुच्चय.

२. परोपकारबुद्धि. उ० महाराष्ट्रीयांपेक्षां गुजराथ्यांत धर्म अधिक.

३. परोपकारबुद्धीनें जें कोणास कांहीं फुकट देणें, किं० जें कांहीं दिलें जातें, तें. उ० अंधळ्यापांगळ्यास धर्म करावा.

४. **धर्म करतां कर्म उभें राहणें**, किं० **पाठीस लागणें**—एकाद्याचें बरें करावयास आपण इमानानें झटत असतां आपणावर कांहींतरी संकट ओढवणें, किं० आपण कांहीं तरी पंचाइतींत पडणें.

५. **धर्मावर सोमवार सोडणें**—सोमवार करणें, म्ह० सोमवारी

दिवसास यथाविधि उपास करून रात्रीं भोजन करणें. अशा प्रकारें उपास केला असतां, एका वेळेचें ( म्हणजे दुपारच्या जेवणाचें ) अन्न वांचतें. मग रात्रीचें जेवण जर लोकांच्या घरीं मिळालें, तर तेंही आपलें अन्न वांचतें. यावरून " धर्मावर सोमवार सोडणें, " म्ह० पदरचें कांहीं एक खर्च न करतां पुण्य जोडणें, अथवा मोठेपणा मिळविणें, किं० मोठेपणा मिळविण्याची युक्ति करणें.

६. **धर्मास येणें**—योग्य वाटणें, मर्जीस येणें. [ ह्या अर्थात वैतागाची छटा मारते ]. उ० तुला जो उपदेश करावासा वाटला, तो मीं केला. आतां तुझ्या धर्मास येईल तसें कर !

७. **धर्मास नको**—धर्मार्थ दिलेली वस्तु; ज्याला दिली जाते, त्याला ती फुकट मिळते. परंतु देणारा मनुष्य बहुतकरून टाकाऊ वस्तु धर्मार्थ देतो, आणि गरजू लोक ती निरुपाय म्हणून पथकरतात. यावरून " धर्मास नको, " म्हणजे तुम्हीं ही वस्तु फुकट दिली तरी मला ती नको. ती मी अगदीं घेणार नाहीं, ( कारण ती टाकाऊ, भिकार, कुचकामाची, असावयाची, किं० आहे ). " धर्मास नको, " ह्याच्यांतील मूळचा निंदेचा भाग लुप्त होऊन नंतर कालेंकरून त्याचा अर्थ " अगदीं नको, " " कृपा करा आणि तसें करूं नका, " " तें देऊं नका " असा झाला. , उ० " नानासाहेब, आणखी एक जिलबी आणवूं काय ? " यावर उत्तर, " धर्मास नको. " उ० तुला सौम्यपणानें वागविण्याबद्दल तुझ्या शेटना विनंति करूं काय? " यावर उत्तर, " धर्मास नको." ( कारण तुमच्याकडून मीं त्यांस सांगविलें म्हणून ते मजवर दांत धरतील ! )

३२५. **धार काढणें**—गायीम्हशींचें दूध काढणें. [ दूध काढते वेळीं जनावरांच्या आचोळांतून दुधाची धार पडते ह्यावरून ही शब्दसंहति उत्पन्न झाली ]

३२६. **धुमश्चक्री चालविणें**—गोंधळ, चैनबाजी, अव्यवस्थित कारभार, इत्यादि. दुसरीं अनुरूप क्रियापदें घालणें, माजणें, माजविणें, इ०. उ० मीं मावशीच्या घरीं चार दिवस राहावयास गेलें, ही संधी साधून सूनबाईनीं

घरांत जी कांहीं धुमश्चक्री माजविली, ती कांहीं सांगतां पुरवत नाहीं !

३२७. **एकाद्याला धूळ चारणें**––त्याचा पराभव, किं० मानभंग, करणें. [कुस्तींत, किंवा मारामारींत एक मनुष्य दुसऱ्यास जिंकतो, तेव्हां तो दुसऱ्यास जमीनीवर पाडतो, किं० लोळवितो, तेणेंकरून चीत झालेला माणसाच्या तोंडांत धूळ, म्ह० माती, जाते. ]

३२८. **धोंडभट्टी करणें**––अंघोळ न करतां कपाळावर भस्माचे पट्टे ओढून अंघोळ केल्याचा आविर्भाव करणें. कपाळावर भस्माचे पट्टे ओढणें.

३२९. **नव्याचे नऊ दिवस**—कोणतीही वस्तु नवीन नवीन आहे, तोंपर्यंत तिचें कौतुक केलें जातें; तीच जुनी झाली, म्हणजे कौतुक केलें जात नाहीं; येथें ' नऊ ' हा शब्द अल्प संख्या दाखवितो.

३३०. **नक्षत्र पडणें**—एकाद्या अवयवावर नक्षत्र पडणें, म्ह० त्या अवयवाचे ठायीं विशेष, किं० चमत्कारिक, असा कांहीं गुण असणें; उ० गोविंदाच्या हातावर नक्षत्र पडलें आहे असें वाटतें, कारण तो आल्यापासून माझ्या टेबलावरचे पैसे दोन तीन वेळां नाहींसे झाले. [ हातावर नक्षत्र पडणें, म्ह० चोरी करण्याचा गुण हातांत असणें; पायांवर नक्षत्र पडणें, म्ह० सर्वदा पायांनीं भटकत असणें; जिभेवर नक्षत्र पडणें, म्ह० एकसारखी वटवट करण्याचा दुर्गुण अंगीं असणें. ]

३३१. **एकाद्याच्या नाकाला चुना लावणें**—त्याला धिक्कारणें, उणें बोलणें, किं० चेतविणें; नाकास चुना लागला असतां तो असह्य होतो, व मनुष्य रागावतो, ह्याचा उल्लेख पुढील आर्यांत आहे; उ०

सोसे कुलजा मृत्यु, न अयशाचा सोसवे चुना नाकीं ।

मोरो०–द्रोण–अ० २१. आर्या ५८.

३३२. **नाकावर माशी न बसूं देणें**––नाकावर माशी बसली असतां ती असह्य होते, व ती उठविण्याचा मनुष्य प्रयत्न करीत असतो, व ती पुन्हा पुन्हा नाकावर बसत असली, तर तो चिडतो; ह्यावरून "नाकावर माशी न बसूं देणें," ह्याचा अर्थ दुसऱ्याकडून उपद्रव, किं० अपमान बिलकूल न व्हावा अशाविषयीं जागरूक असणें, व तो झालाच तर संतापणें; पुढील आर्या पहा.

ती धर्ममर्यादा सोसावी सर्वथा न रामाशी
जागृदवस्थेंत जशी नासाग्रीं बैसली नरा माशीं ॥
मोरो०–गदा० अ० ५, आर्या २.

३३३. **नांगी टाकणें**, किंवा **पाडणें**—हतवीर्य होणें; हातपाय गाळणें; शत्रूवर हल्ला करण्यापासून निवृत्त होणें; [ विंचवाचें शत्रूपुढें कांहीं चालेनासें झालें, म्हणजे तो आपली नांगी खालीं वळवितो, यावरून ही शब्दसंहति उत्पन्न झालेली आहे. ]

३३४. **नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावणें**--एकाला बुडवून मिळविलेल्या द्रव्यानें दुसऱ्याला खूष करणें; मोठ्या चोरीचें प्रायश्चित्त अल्प द्रव्य खर्चून घेणें.

३३५. **निमित्तावर टेकणें**—निमित्त सांपडेल केव्हां म्हणून टपून बसणें.

३३६. **नीळ नासणें**—निळीचा रंग विघडला असतां कांहीं तरी खोटी बातमी उठविल्यानें तो सुधारतो, अशी लोकांची समजूत आहे, यावरून " निळ नासणें, " म्हणजे खोटी बातमी उठविणें; कोणीं सांगितलेली बातमी आपणास खोटी वाटत असल्यास आपण म्हणतों, "नीळ नासली आहे असें वाटतें ! "

टीप:—ह्याच अर्थानें " नीळ रापणें, " किं० " निळीचा रंग नासणें " असेंही म्हणतात.

३३७. **पगडा बसविणें**--वर्चस्व स्थापित करणें; सोंगट्याच्या डावांत विवक्षित दान पडून एक पगडें पटांत बसलें, म्हणजे खेळणाराला विरुद्ध पक्षावर कांहीं ज्यास्ती हक्क प्राप्त होतात. यावरून " एकाद्यावर आपला पगडा बसविणें, " म्हणजे त्याला आपल्या म्हणण्याप्रमाणें चालावयाला लावण्याचें सामर्थ्य मिळविणें.

३३८. **पगडी फिरविणें**—ठराव मोडून विरोधी वृत्तीनें वागणें.

३३९. **पंच प्राणांची आरती ओवाळणें**—प्राण, अपान, वगैरे पांच प्राण शरीरांत असतात. हे आहेत, तोंपर्यंत मनुष्य जिवंत असतो. हे प्राण शरीराचे चालक होत. " पंच प्राणांची आरती ओवाळणें " म्ह०

ह्या पांचही प्राणांसहित आरती ओंवाळणें, म्ह० सर्वभावेंकरून आरती ओंवाळणें; खरी आणि उत्कट भक्ति, किं० प्रेम, दाखविणें.

३४०. **पड घेणें, किं० खाणें**—माघार घेणें; आपली बाजू खरी आहे, अशी आपली खात्री असूनही, प्रतिपक्षी चिरडीस जाईल ह्या भयानें, आपलें बोलणें आवरतें घेणें. उ० दोघेही जहांबाज कज्जेदलाल. पड घ्याव-यास एकही तयार नाहीं. मग सारी रात्र भांडण चाललें, ह्यांत नवल काय? उ०

कलहांत पक्ष वळकट असुनि घेऊनि पड तया मिटवा!
पुनरपि तेंच वदुनि न श्रोत्यांचे कान लोकहो! किटवा॥

विनोदी.

३४१. **पथ्यावर पडणें**—आपण खटपट न करतां एकादी वस्तु अपल्या सोयीप्रमाणें घडून येणें, किं० आपल्याला अनुकूल अशी होणें. उ० मी तुला संध्याकाळीं बोलाविलें होतें; आणि मीं सांगितलेली वेळ तुझ्या लक्ष्यांत न राहून तूं सकाळीं आलास. पण आतां आलास, तें माझ्या पथ्यावरच पडलें. कारण तुझ्याकडून मला दोन तोळे सोनें बाजा-रांतून आणून द्यावयाला आतांच कोणी तरी माणूस पाहिजे होतें.

## ३४२. पदर.

१. (क) धोतराचें, लुगड्याचें, किं० पागोट्याचें, टोंक; उ० वाङ्निश्चयाचे वेळीं कन्येचें दान करणारा व दान घेणारा, असे दोघेही इसम पागोट्याचे पदर सोडून बसतात.

(ख) नक्षी, वेलबुट्टी, वगैरेंनीं सुशोभित केलेलीं लुगड्याचीं, शालजो-डीचीं, वगैरे शेवटें. उ० ह्या लुगड्याचा आंतला पदर अगदींच भरट आहे!

(ग) सर. उ० तुमच्या कंठीला किती पदर आहेत?

(घ) वाईट जातकुळीचा संबंध; उ० गोविंदरावाची मुलगी तुम्ही करूं नका, त्यांच्या घराला पदर लागला आहे.

(ङ) लुगडें नेसून लुगड्याचा बहुतेक भाग कंबरेभोंवतीं गुंडाळल्यावर त्याचा जो थोडासा भाग उर, किं० टोंकें, झाकण्यासाठीं उर-

विलेला असतो, तो; उ० वाढावयाच्या वेळीं बायका खांद्याखालून पदर घेतात; रस्त्यांतून चालतांना डोक्यावरून पदर घेतात. उ०

ओढूं नको फरफरां, घेऊं दे सांवरोनि हा पदर ।

मोरो०.

(च) ताबा, कबजा, देखरेख, स्वामित्व, अधिकार. उ० हें भात तुम्ही आपल्या पदरांत घ्या. उ० ही कामगिरी मीं त्याच्या पदरांत घातली; (म्ह० त्याच्यावर सोपविली.) उ० त्याची चूक मीं त्याच्या पदरांत घातली. उ० मी तुमच्या पदरांत पडलों आहें, मला संभाळून घ्या. उ० माझ्या पदरीं मुलेंबाळें आहेत; उधळेपणा करून कसें चालेल ?

(छ) साल, पान, त्वचा; उ० ह्या कांद्यावरचे पदर जाडी जाडी आहेत.

(ज) डोळ्याच्या बुबुळावर किंचित् अपारदर्शक असा पातळ थर येतो तो.

२. **एकपदरीवर येणें**—एकाद्याशीं बोलतांना बहुवचनाचा उपयोग न करतां एकवचनाचा उपयोग करूं लागणें.

३. **पदर खर्चणें**, किं० **खाणें**—सांठविलेला पैसा खर्चणें.

४. **पदर खर्चणें**, किं० **खाणें**, किं० **मोडणें**—जवळ असलेला, किं० शिलकीचा, पैसा खर्चणें.

५ **पदर घालणें**—झांकण घालून एकादी गोष्ट उघडकीस न येऊं देणें.

६. **दिव्याला पदर देणें**, किं० **घालणें**—पदराचा वारा घालून दिवा मालविणें.

७. **पदर घालणें**, किं० **भरणें**, किं० **गमावणें**—एकाद्या कामीं नुकसान लागणें; गांठचा पैसा खर्च होणें.

८. **पदरचा**—स्वतःचा; खुद्द आपला; आपल्या कल्पनेनें योजिलेला, किं० ठरविलेला. उ० तूं मजजवळ दिलेल्या पैशांत आला तसला मी माल आणिला. मी पदरचे पैसे घालायाला थोडाच बसलों आहें ! उ० हा माझ्या पदरचा आश्रित. उ० मीं जी बातमी ऐकली, ती तुला सांगि-

तली; मी कांहीं आपल्या पदरची सांगितली नाहीं. उ० मूळाला धरून भाषांतर करावें; त्यांत पदरचें कांहीं घालूं नये.

९. **पदरचें घालणें**—

( क ) कमताई पडली असतां आपल्याजवळचा पैसा वगैरे घालून भरती करणें. उ० प्रेमजीनें कासोबाला हापुसचे आंबे आणावया-साठीं एक रुपया दिला. बाजारांत सव्वा आण्याला एक असे आंबे होते. तेव्हां प्रेमजीची शाबासकी मिळविण्यासाठीं कासोबानें पदरचे चार आणे घालून १६ आंबे विकत घेतले, आणि "रुपायाचे मीं १६ आंबे विकत घेतले," असें प्रेमजीस खोटेंच सांगितलें।

( ख ) मूळांत नसतां कल्पनेनें एकादें वाक्य वगैरे एकाद्या ग्रंथांत वगैरे घुसडून देणें.

१०. **तो पदरचें पापही देणार नाहीं**—पापासारखी टाकाऊ वस्तु देखील तो देणार नाहीं, मग उपयुक्त वस्तु कोठून देणार? ( म्ह० तो अत्यंत चिक्कू आहे. )

११. **एकाद्यापुढें पदर पसरणें**—त्याला नम्रपणें विनविणें, किं० प्रार्थिणें. त्याची काकुळतीनें प्रार्थना करणें. त्याला शरण जाणें, किं० येणें. त्याची क्षमा मागणें. उ० आतां अंत पाहूं नको! मी तुझ्यापुढें पदर पसरतों।

चापशरधरा! धीरा! आपद्ग्रस्तासि मज नको विसरूं।
या परम संकटीं मी श्रा! पदर तुझ्यापुढें किती पसरूं? ॥

मोरोपंत, आर्या-केकावलि.

१२. **पदर फोडून देणें**—लग्न वगैरेचा संबंध तोडणें.

१३. **पदरीं पडणें, किं० पदरांत पडणें**—

( क ) उपयुक्त होणें; फायदेशीर होणें; लागू होणें. उ० आजचा दिवस तर पदरांत पडला! आतां उद्यांची काळजी उद्यां!

( ख ) कबज्यांत येणें; ताब्यांत येणें; आश्रयाला, किं० संरक्षणाकरितां, येणें.

१४. **पदराला गांठ बांधणें, किं० मारणें**—एकाद्या कामीं मिळालेला अनुभव नीट लक्ष्यांत ठेवणें.

१५. **एकाद्याच्या पदराला खोच पडणें**--त्याला नुकसान लागणें.

१६. **एकाद्याच्या पदराला खार लागणें**--त्याला नुकसान लागणें. याच धोरणानें "पदराला खार लावणें," किं० "लावून घेणें," ह्याचे अर्थ समजावे.

१७. **एकाद्याच्या पदरीं असणें**--

(क) त्याच्या आश्रयाला, किं० त्याच्यावर अवलंबून, असणें; उ० भोज राजाच्या पदरीं पुष्कळ कवि होते.

(ख) त्याच्या मालकीचा, किं० सत्तेचा असणें; प्रारब्धाप्रमाणें मिळावयाचा असा असणें; उ० अंगीं असेल तें काम, आणि पदरीं असले तो दाम.

(ग) संग्रहाला, किं० जवळ, असणें; हावा तेव्हां उपयोग करतां येईल असा असणें. उ०

चिंतारत्न श्रीगुरुवरदान तुझ्या असेच पदरीं तें ।
मग साधिशील न कवण सिद्धि सुखें संहरून सदरीतें? ॥

मोरो०-भारत.

१८. **एकाद्याच्या पदरीं, किं० पदरांत, घालणें**--त्याच्या स्वाधीन करणें; उ० ही मुलगी मीं तुमच्या पदरांत घातली आहे; तिचा सांभाळ करणें तुमच्याकडे आहे.

(क) त्याची चुकी, अपराध, लबाडी, वगैरे त्याला पूर्णपणें दाखवून देणें; चुकी, लबाडी, किं० अपराध त्याचा आहे, अशी त्याची खातरी करून देणें. उ० दुष्ट लोकांच्या लबाड्यांचें माप त्यांच्या पदरांत घातलें, तरी त्यांना शरम वाटत नाहीं; ह्यः ह्यः ह्यः करून हंसतात आणि दांत विचकतात मात्र !

(ख) एकाद्याला जितकें कांहीं द्यावयाचें असेल, किं० ठरलेलें असेल, तितकें पूर्णपणें देणें.

२०. **पदरांत घेणें**--घेणें; स्वीकार करणें; स्वाधीन करून घेणें; कबूल करणें; उ० हा मीं सांखळ्यांचा जोड तुमचा तुम्हांला परत आणून दिला, तो पदरांत घ्या. उ० हे रुपये पदरांत घ्या. उ० तुमची मुलगी

आम्ही पदरांत घेतली, आतां तिची काळजी तुम्हाला नको. उ० माझी चुकी मीं पदरांत घेतली. उ०

शरणागत अरिबंधुहि रामें प्रेमेंचि घेतला पदरीं ।
खलदत्तीं अमृतफलीं न प्रभुरुचि वहु सदापिंतीं वदरीं ॥

मोरो०—भारत.

२१. **पदरीं धरणें**—चोर वगैरेंस चोरी वगैरे करीत असतांना पकडणें.

२२. **पदरीं पडलें पवित्र झालें**—तें चांगलें असो, किं० वाईट असो; तें माझ्या वाट्याला आलें आहे, तें मला पथकरिलें पाहिजे; रागावून किं० चरफडून उपयोग नाहीं. तें चांगलें असो, किं० वाईट असो; तें माझ्याकडे आले आहे, तेव्हां तें पवित्रच आहे असें मीं म्हटलें पाहिजे, किं० गृहांत धरलें पाहिजे.

२३. **पदरमोड करणें**—शिलकींतलि पैसा खर्च करणें. उ०

स्नेह्यासाठीं पदरमोड कर, परंतु जामिन होउं नको. !

अनंतफंदी.

३४३. **पळ काढणें**—भीतीमुळें, किं० संकट टाळण्यासाठीं, एकाद्या ठिकाणापासून पळून जाणें; उ०

पळ काढिलाचि तुमच्या पाहुनि तें कर्म तडक लेंकांनीं ।
गमला रुद्र वृकोदर धाकें काळीज तडकलें कांहीं ॥

मोरो०— द्रौ० अ० १६.

## ३४४. पांग.

१. (क) कोणत्याही गोष्टीसंबंधाची उत्कट इच्छा.

(ख) उणीव, कमीपणा; उ० मोठ्याच्या आश्रयाला राहिलें, म्हणजे पांग फिटतात. उ० म्हातार्‍या आईबापांचे पांग सुपुत्रच फेडतो. उ० येतील यांग तर फिटतील पांग. [ या अर्थी "पांग" शब्द अनेकवचनी योजिला जातो. ]

(ग) ओझें (कर्ज, वगैरेचें). आपणावर कोणी उपकार केलेले असल्यास त्यासंबंधानें मनाला वाटणारा संकोच, दाब, किं० अस्वस्थता. उ० त्या मारवाड्याच्या कर्जाचा मला पांग वाटतो.

(घ) तावेदारी; उ० त्याच्या पांगांत माझ्यानें राहावत नाहीं.

२. **पांग फिटणें**--मनोरथ सफल होणें; काळजी दूर होणें.

३. **पांग फेडणें**--मनोरथ सफल करणें; चिंता दूर करणें.

## ३४५. पागोटें.

१. डोक्याचें आच्छादन करणारा पोशाखाचा भाग. [ अनुरूप क्रियापद " बांधणें, " किं० " घालणें, " किं० " ठेवणें." ]

२. **आपलें पागोटें बगलेंत मारणें**—मारामारीस तयार होऊन राहणें.

३. **आपल्या पागोट्याशीं भांडावें, मग दुसऱ्याच्या पागोट्याशीं भांडावें**--अगोदर आपल्या घरची व्यवस्था नीटनेटकी करावी, आणि मग दुसऱ्याच्या घरच्या व्यवस्थेंत दोष काढावे.

४. **एकाद्याचें पागोटें खालीं करणें**--त्याचा दुर्लौकिक करणें; उ० माझा मुलगा वाईट निघाला, त्यानें माझें पागोटें खालीं केलें.

५. **पागोटें गमावणें**--फसविला जाणें; ठोकर खाणें; नुकसानी सोसावी लागणें; अपमानास, किं० बदलौकिकास, पात्र होणें; उ० मी एकनाथपंताच्या संगतीस लागलों, म्हणून पागोटें गमावून घेण्याचा प्रसंग मजवर आला.

६. **दुसऱ्याचें पागोटें गुंडाळणें**--त्याला फसविणें.

७. **एकाद्याचें पागोटें घेणें**--त्याला फसविणें; त्याच्याशीं व्यवहार करतांना आपण न फसतां त्याला फसवून आपला फायदा करून घेणें.

८. **पागोटें टाकणें**--सर्वसंगपरित्याग करून संन्यासी होणें.

९. **एकाद्याचें पागोटें पडणें**, किं० **वांकडें होणें**--त्याची फजीती होणें.

१०. **एकाद्याला पागोटें बांधणें**, किं० **बांधून देणें**—त्याला संमानपूर्वक पागोटें बक्षिस, किं० आहेर, म्हणून नजर करणें; उ० गोविंदरावाच्या सुनेला मुलगा झाला, म्हणून परवां तिच्या बापाला आम्ही बारा रुपयांचें चंदेरी पागोटें बांधलें.

११. **पागोटें वाळगणें**, किं० **पागोट्याची लाज धरणें**--आपला लौकिक कमी न होईल, अशाविषयीं जपणें.

१२. **पागोटें संभाळणें**, किं० **पागोट्याचे पेंच संभाळणें**, किं० **पागोटें वागविणें**—एकाद्या व्यापारांत, किं० व्यवहारांत, बूड न लागेल, किं० तो अंगावर न येईल, अशी खबरदारी बाळगणें.

१३. **पागोट्याचे पेंच गळयांत येणें**—स्वताच्या दुर्वर्तनाचें परिणाम भोगण्याचा प्रसंग येणें; मसलत फसणें; दुसऱ्याच्या नाशासाठीं रचिलेल्या व्यूहांत आपणच आडकणें.

१४. **एकाद्याच्या पागोट्यास फुलें बांधणें**--त्याची खुशामत करणें; त्याला आपल्या कार्यासाठीं खूष करणें.

३४६. **पांघरूण घालणें**—झांकणें; उघडकीस न येऊं देणें.

३४७. **पांचावर धारण नसणें**—अत्यंत विस्मित आणि भयभीत होणें. पंच प्राण निघून जातात कीं काय अशा स्थितींत पडणें.

३४८. **पाट लावणें**--विधवेनें दुसरें लग्न करणें. ( हलक्या लोकांच्या भाषणांतील हा प्रयोग आहे. )

३४९. **पाड नसणें**—थोरवी, किं० वरचढपणा, नसणें. ( " पाड " म्ह० बरोबरी, सर ). उ०

> तूं हरिसा हरि साचा, हरिणी सुरसिंधु, मीहि पाडससा ।
> पाड, ससाध्वस हो अरि; हरिशीं पावेल काय पाड ससा ? ॥
> मोरो० भीष्मपर्व.

३५०. **पाढा वाचणें**—सविस्तर हकीकत सांगणें; साद्यंत निवेदन करणें.

## ३५१. पाणी.

१. ( क ) उदक; सलिल.

( ख ) पाऊस; पर्जन्य; उ० आज फार पाणी पडलें. ( अशिक्षित लोकांत हा प्रयोग आहे. )

( ग ) हत्यारें भट्टींत तापवून नंतर तीं पाण्यांत बुडवून त्यांच्या अंगीं जी दृढता आणतात, ती. उ० पट्याशीला फार कडक पाणी देतां कामा नये. ( क्रियापद, "देणें," "चढविणें," किं० "उतरणें." )

(घ) धमक, अवसान, वीर्य, शक्ति, उत्साह. उ० तुझ्या अंगांत काय पाणी असेल तें दाखीव आतां !

(ङ) तेज, कांति, चकाकी. उ० मोत्याची किंमत त्याच्या आकारावरून आणि पाण्यावरून करावयाची असते. उ० गुरुनाथाच्या डोळ्याचें पाणी पहाण्याजोगें आहे.

(च) चेहऱ्यावरील टवटवी, किं० तजेला. उ० गजाननपंतांच्या चेहऱ्याचें पाणी अप्रतिम आहे.

(छ) सोन्याचा, किं० रुप्याचा, मुलामा. उ० ह्या वाटीला मी सोन्याचें पाणी देऊन ती देवाच्या नैवेद्याला रोज घेणार आहें.

(ज) हत्यार सहाणेवर घांसून त्याच्या अंगीं आणिलेली तीक्ष्णता. उ० कुऱ्हाडीला फार दिवसांत पाणी दिलें नाहीं.

(झ) संमान, अब्रू, लौकिक, कीर्ति. (क्रियापद "जाणें," "चढणें," "उतरणें.")

२. **अंगाचें, किं० रक्ताचें, पाणी होणें, (किं० करणें)**—अतिश्रमानें, त्रासानें, किं० दुःखानें, जर्जर होणें, (किं० करणें.)

३. **रक्ताचें पाणी आणि हाडाचा मणि करणें**—इमानानें आणि मेहेनतीनें कर्तव्य, किं० कामगिरी, करणें.

४. **एकाद्या कामांत (किं० व्यवहारांत) पाणी शिरणें**—तें काम, (किं० तो व्यवहार) विनकिफायतीचा, धोक्याचा, किं० त्रासाचा, होणें.

५. **खोल पाण्यांत शिरणें**—एकाद्या कामीं, किं० एकाद्या व्यवहारांत, फार मन घालणें. एकाद्या विषयाच्या गूढ, कठिण, किं० दुर्बोध, भागाचें ज्ञान करून घेण्याचा प्रयत्न करणें. आपल्या आवांक्याच्या पलीकडे जाणें.

६. **तापल्या पाण्याला चव नसते**—एकदा मैत्रीचा भंग झाला असतां, पुन्हा ती मैत्री पूर्वीप्रमाणें सुखकर होत नाहीं.

७. **पाणी होणें, किं० करणें**—एकाद्या वस्तूचा नाश होणें, किं० करणें; नासाडी होणें, किं० करणें. उ० मी तिसऱ्या प्रहरीं थोडेसें थालीपीठ खाल्लें, त्यामुळें संध्याकाळच्या जेवणाचें पाणी झालें.

८. **केस तोडण्याइतका पाण्याला जोर आहे**--पाण्याच्या प्रवाहाला इतका जोर आहे, कीं त्यांत केस धरला तर तो तुटेल. [ पावसाळ्यांतील ओव्याच्या पाण्याच्या जोराचें वर्णन करावयाचें असतां ही अतिशयोक्ति करतात. ]

९. **पाणी घालणें**--

( क ) शब्दशः--वृक्षादिकांच्या वाढीला जरूर तें पाणी त्यांच्या बुडाशीं ओतणें. उ० ह्या तोंडलीच्या वेलाला आठ दिवस नियमानें पाणी घातलें पाहिजे.

( ख ) लक्षणेनें:--एकाद्या गोष्टीच्या अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न करणें; एकाद्या वस्तूच्या जोपासनेबद्दल उपाय करणें.

( ग ) लक्षणेनें:--एकाद्या वस्तूवर पाणी घालणें, म्ह० तिचा नाश करणें; ती गमावून घेणें. उ० गिरिधरपंत अति अव्यवस्थित मनुष्य! त्यानें आपल्या हातानें आपल्या नोकरीवर पाणी घातलें! ( विस्तवावर पाणी घातल्यानें तो विझतो, ही लक्षणा ह्या प्रयोगाच्या मूळाशीं आहे. )

१०. **पाणी सोडणें**--ब्राह्मणाला जें कांहीं दान केलेलें असतें, त्याच्यावर पाणी सोडलें, म्हणजे त्याच्यावरचें आपलें स्वामित्व नाहींसें होऊन तें त्या ब्राह्मणाकडे जातें. यावरून ' एकाद्या वस्तूवर पाणी सोडणें,'' म्हणजे

( क ) ती स्वेच्छेनें कायमची देऊन टाकणें.

( ख ) तिची आशा सोडून देणें; ती गेली असें समजून स्वस्थ बसणें. उ० तूं गोपाळरावाला दहा रुपये उसने दिलेस, ते तो परत देईल असें दिसत नाहीं. त्या रुपयांवर तूं पाणी सोड कसा!

( ग ) नाइलाजास्तव ती सोडावयास, तिच्याकडे दुर्लक्ष्य करावयास, ती विसरून जावयास, किं० तिचा नाश करावयास, तयार होणें, किं० सिद्ध असणें. उ०

परि त्यांहीं आम्हीं त्या प्रेमासि रणांत सोडिलें पाणी ।
करितों तुझेंचि, जैसें करितां विधिनेंचि शासन प्राणी ॥

मोरो०-द्रोण० अ० १७.

११. **पाणी छाटणें,** किं॰ **कापणें**—पोहोणारानें आपल्या अंगाच्या जोरानें पाणी दुभागून पुढें सरणें. उ॰ आलीकडे मी अशक्त झालों आहें. ह्या खडकापासून तों त्या देवळाच्या पायऱ्यांपर्यंत देखील पाणी मला छाटावयाला, किं॰ कापावयाला, भारी श्रम झाले. [ "छाटणें," "कापणें," हीं सकर्मक क्रियापदें होत. त्यांचा " छाटलें जाणें, " किं॰ " कापलें जाणें, " असा अकर्मक प्रयोग ही होतो. उ॰ ह्या पाण्याला भारी जोर आहे. तें मला छाटत, किं॰ कापत, नाहीं. ]

१२. **पाणी जाळणें**—करडा अमल चालविणें; क्रूरपणानें वागविणें.

१३. **एकाद्याचें पाणी जोखणें,** किंवा **ओळखणें**—त्याची धमक, विद्वत्ता, पराक्रम, किं॰ कर्तृत्वशक्ति, आजमावणें, किं॰ पारखणें; त्याची लायकी पाहाणें.

१४. **एकाद्याच्या नांवानें (किं॰ नांवावर,) पाणी तावणें**—त्याचा सर्वस्वी घात करावयास झटणें. [ प्रेत घरांतून बाहेर काढावयाच्या पूर्वी त्यावर ऊन्ह पाणी ओतीत असतात. ह्या प्रघातावरून ह्या वाक्प्रचाराची उत्पत्ति आहे. ]

१५. **पाणी तोडणें**—[ मागें "पाणी छाटणें" क॰ ११ पहा. ]

१६. **पाणी तुटणें**—पोहणाऱ्याच्या अवयवांनीं पाणी दुभागलें जाणें.

१७. **हत्याराला पाणी देणें**—मागें क॰ १ पहा. [ " कडक, " " नरम, " " मध्यम, " हीं " पाणी " याचीं विशेषणें होतात. ]

१८. **पाणी देणें**—श्राद्धविधि करून मृताला तिलांजलि देणें. उ॰ मी दत्तक मुलगा घेणार! मी मेल्यावर मला पाणी द्यावयाला कोणी तरी पाहिजे ना? [ "एकाद्याच्या नांवानें पाणी देणें, किं॰ सोडणें," ह्याचाही वरील अर्थानें उपयोग होतो. ]

१९. **एकाद्या वस्तूवर पाणी पडणें**—ती फुकट जाणें; ती निरुपयोगी होणें; तिचा नाश होणें; तिचा सुखकरपणा नाहींसा होणें; उ॰ तूं कौमुदीची उजळणी करीत जा, नाहीं तर तिच्यावर पाणी पडेल. उ॰ चिंतामणरावांची बायको मेल्यामुळें त्यांच्या संसारावर पाणी पडलें.

[ डफ, ढोलकें, वगैरेंवर पाणी पडल्यानें त्यांचा आवाज बदबदीत होतो, ह्या सादृश्यावरून वरील वाक्प्रचाराची उत्पत्ति आहे. ]

२०. **एकाद्याला पाणी पाजणें**—

( क ) तो मेल्यावर त्याला तिलांजलि देणें.

( ख ) त्याला खूप झोडपणें.

( ग ) त्याला फसविणें, किं० पराजित करणें.

२१. **पाणी पाणी करणें**—"पाणी द्या!" "पाणी द्या!" असें म्हणणें; एकसारखें पाणी मागत राहणें. उ० मुलें मघापासून पाणी पाणी करीत आहेत. विहिरीच्या पाण्याची एक घागर भरून आण पाहूं!

२२. **एकाद्याचें पाणी पाणी करणें**—त्याच्याकडून अतोनात काम करून घेऊन त्याला दमविणें.

२३. **पाणी पाणी होणें**—एकसारखें, किं० पुन्हा पुन्हा, पाणी पिण्याची प्रवृत्ति होणें. उ० उन्हाळ्याच्या दिवसांत जिलबी, साखरभात, वगैरे पक्वान्नें खाल्लीं असतां पाणी पाणी होतें.

२४. **पाणी पी पिऊन भांडणें, किं० वाद करणें**—नेटानें, हट्टानें, निर्लज्जपणानें, भांडत राहाणें.

२५. **एकाद्याचे घरीं पाणी भरणें**—त्याच्या सेवेंत तत्पर असणें; त्याला पूर्णपणें वश, किं० अनुकूल, असणें. उ०

उद्योग्याचे घरीं । ऋद्धिसिद्धि पाणी भरी ॥

[येथें, "पाणी वाहणें," किं०"पाणी घालणें," असाही उपयोग होतो.]

२६. **पाणी मरणें**—

( क ) भिऊन जाणें; गर्भगळित होणें. उ० त्या मुसलमानास पाहातांच रामाचें पाणी मेलें!

( ख ) कमीपणा, खोटेपणा, पोकळपणा, असणें. उ० पितांबरराव लबाड माणूस आहे. त्याचे हिशेब नीट तपासून घ्या. त्यांत खचित कोठें तरी पाणी मरत असणार!

२७. **पाणी मागूं न देणें**—एकदम, तडाक्यासरशीं, ठार मारणें. चेंदून मारणें. उ० तूं माझ्या वाटेस जाऊं नको; तुला मी पडदिलें तर पाणी मागूं देणार नाहीं!

२८. **पाणी मारणें**—पोहोतांना पाणी दुभागणें.

२९. **पाणी मुरणें**—कमीपणा, वैगुण्य, मर्मस्थान, दोषाला जागा, वगैरे असणें. उ० जनोबाला हा कागद दाखवितों असें मी म्हणतांच बावुलनाथ कसा घाबरला तें तुम्हीं पाहिलें ना? तेथें कांहीं तरी पाणी मुरतें आहे, असा मला बळकट संशय आलेला आहे.

३०. **पाणी लागणें**—

( क ) वाईट पाणी पिण्यांत आल्यामुळें आजार येणें. उ० तुम्हांला सोलापुरचें पाणी लागलें खास! एऱ्हवीं तुम्हांला हा ताप कशानें जडला?

( ख ) ज्याची संगति धरली असेल त्याचे गुण, किं० जेथें वसति केली असेल तेथल्या लोकांचे गुणदोष, अंगीं जडणें.

३१. **पाण्याचा कांटा मोडणें**—पाणी थोडेंसें तापणें. उ० मला अंघोळीला फार ऊन पाणी लागत नाहीं. पाण्याचा जरासा कांटा मोडलेला असला, म्हणजे झालें. [ टीप–१. पाणी थंड असलें तर तें अंगाला कांट्याप्रमाणें बोचतें. टीप.–२. " मोडणें " हें ह्या अर्थानें सकर्मक, किं० अकर्मक, योजतां येतें. ]

३२. **पाण्यांत घाम येणें**—अतोनात संतप्त होणें; रागानें अंगाचा भडका होऊन जाणें.

३३. **एकादी वस्तु पाण्यांत घालणें**—ती बुडवून टाकणें; तिचा नाश करणें; तिजकडे दुर्लक्ष्य करणें.

३४. **एकाद्याला पाण्यांत पाहाणें**—त्याचा अति द्वेष करणें.

३५. **पाण्यांत दिसणें**—द्वेषपात्र असणें, किं० होणें.

३६. **एकाद्याला पाण्यापेक्षां पातळ करणें**—त्याची फजीती, किं० पाणउतारा, करणें; त्याला लाजविणें. त्याचा तेजोभंग करणें; उ०

जो किंकर पायांला स्वशिर करुनि पादपीठ आतळतो।
न करावा धिक्कारुनि प्रभुंनीं पाण्यापरसि पातळ तो ॥ २७ ॥
मोरो० शांति०– अ० ५.

२७. **ऊन्ह पाण्यानें घरें जळत नसतात**–निराधार निंदेनें कोणाचा बदलौकिक होत नाहीं. एकाद्यावर वृथारोप केल्यानें त्याची अपकीर्ति होत नाहीं.

२८. **त्याला पाणी देखील घोटत नाहीं.**—तो अगदीं मरणोन्मुख झाला आहे.

३५२. **पानें पुजणें**—पानावर थोडेंसें वाढणें. वाढलेंसें करणें.

३५३. **पान हलणें**—यत्किंचित् कार्य होणें; थोडें कार्य होणें. उ० रामरावावांचून आनंदरावाचें पान हालत नाहीं, ( म्ह० आनंदरावाला कांहींही करावयाचें असलें, तरी त्यांना रामरावांची सल्लामसलत, किं० मदत, जरूर पाहिजे लागते. ) टीपः—ह्या वाक्प्रचाराचा उपयोग नेहेमीं अकरणरूपींच होतो.

३५४. **पारडें फिरणें**, किंवा **फिरविणें**–तराजूला दोन पारडीं असतात. एकांत ज्यास्ती वजन झालें, म्हणजे तें खालीं बसतें, आणि दुसरें वर जातें. ह्या दुसऱ्यांत ज्यास्ती वजन झालें, तर तें खालीं बसतें, आणि पहिलें वर जातें. यावरून "पारडें फिरणें," किंवा "फिरविणें," म्ह० परिस्थिति वेगळी होणें, किं० करणें. स्थितीमध्यें परिवर्तन होणें, किं० करणें.

३५५. **पारणें फेडणें**–(क) उपवासानंतर भोजन करून उपवासाची यथाविधि समाप्ति करणें. ह्याच अर्थानें "पारणा करणें," ह्याचाही उपयोग होतो. उ०

ती संकल्पीं आहे सूर्यास्तीं पारणा करायाची ।

मोरो०– वनपर्व.

( ख ) वरील अर्थाचें पारणें फेडलें म्हणजे क्षुधा तृप्त होऊन जिवाचें समाधान होतें; यावरून "एकाद्या इंद्रियाचें पारणें फेडणें" म्ह० त्या इंद्रियाची उत्कृष्ट, किं० प्रिय, अशी भोग्य वस्तु त्याला देऊन तें तृप्त करणें. उ० एकादी चीज गाऊन माझ्या कानांचें पारणें फेड. "डोळ्यांचें पारणें" फेडणें, म्ह० डोळे तृप्त करणें; उ०

त्याचें रूप विलोकितांचि पडलें तल्लोचनां पारणें ॥

मोरो० वृद्द०– अ० ५५.

येथें "लोचना पारणें घडणें," म्हणजे डोळ्यांची तृप्ति होणें.

३५६. **पारावार नसणें**--मर्यादा नसणें; साधारण मर्यादेच्या पलीकडे असणें. उ० दिनूच्या खोडकरपणाला पारावार नाहींसा झाला आहे!

३५७. **पासंगास न पुरणें**, किं० **न लागणें**--तराजूचीं दोन्हीं पारडीं समतोल असल्याशिवाय पदार्थाचें खरें वजन करतां येत नाहीं. यामुळें जर दोहोंपैकीं एक पारडें हलकें असलें, तर त्यांत कांहीं तरी वजन घालून तें दुसऱ्याशीं समतोल करतात. हें जें वजन घालावें लागतें, त्याला "पासंग" म्हणतात. पासंगाला घातलेला पदार्थ वजनानें अर्थात् फार हलका असावयाचा (त्या पारड्याच्या मानानें). यावरून "पासंगालाही पुरेसा नसणें," म्ह० अगदीं थोडा, किं० कमी योग्यतेचा, असणें. उ० रामाचा निबंध गोविंदाच्या निबंधाच्या पासंगासही लागणार नाहीं.

३५८. **एकाद्याच्या पाळतीवर असणें**—त्याला न कळूं देतां त्याच्या हालचालींवर नजर ठेवणें. उ० तुमच्या मुलाला बाहेरख्यालीपणाची संवय लागेल, असा मला रंग दिसतो. तुम्ही त्याच्या पाळतीवर असा! उ० बदमाष लोकांच्या पाळतीवर राहून गुन्हा न होऊं देणें, हें पोलिसाचें खरें कर्तव्य! उ० रामा गडी पैसे चोरतो, असा मला बरेच दिवस संशय होता. एक दिवस मी त्याच्या पाळतीवर राहिलों, आणि माझ्या कोटाच्या खिशांत हात घालतांना त्याला पकडिलें!

३५९. **पिकलें पान**—अतिशय म्हातारा माणूस-जो केव्हां मरेल ह्याचा नेम नाहीं.

३६०. **पिंगा घालणें**--जागच्या जागींच घोटाळत राहणें. [मुलींचा "पिंगा" म्हणून एक खेळ आहे. यांत जागच्या जागींच आपल्याभोंवतीं फिरावयाचें असतें. त्याला "पिंगा घालणें", असें म्हणतात.]

३६१. **एकाद्याचे पितर उद्धारणें**--त्याला आईबापांवरून शिव्या देणें. ["उद्धरणें" असेंही क्रियापद योजलें जातें.]

३६२. **एकाद्याचें पित्त उसळणें**, किं० **खवळणें**—तो रागावणें, किं० संतापणें. उ० कोणी खोटें बोललें, म्हणजे माझें पित्त खवळतें!

३६३. **पुख्खा झोडणें**—लोकाच्या घरीं, किं० फुकट मिळालेल्या अन्नावर, चैन मारणें. उ० त्या खुशालचंदाला यजमानाच्या घरीं पुख्खा झोडणें आणि झोंप ताणणें, त्याशिवाय कांहींच धंदा नाहीं !

३६४. **पुंगी बंद करणें**—स्तब्ध बसावयास लावणें; गप्प बसविणें; बोलूं न देणें. उ० त्याची पुंगी बंद करायला मला कांहीं उशीर नाहीं.

३६५. **पुडीस जाणें**—संन्यासी कोठें जेवावयास गेला, म्हणजे "पुडीस गेला" असें म्हणतात. याचप्रमाणें "पुडीस बोलावणें," "पुडीस येणें," त्यांचे अर्थ समजावे. उ० अर्जुन संन्याशाला बलरामानें पुडीस बोलाविलें.

३६६. पेंच.

१. **पेंच**—कुस्तीच्या खेळांत प्रतिपक्ष्याला पाडण्याच्या ज्या युक्त्या, त्यांना "पेंच" असें म्हणतात.

२. **एकाद्याला पेंचांत धरणें**—त्याला न सुटून, किं० निसटून जातां न येईल, अशा रीतीनें त्याला धरणें, पकडणें, किं० आडकावणें.

३. **एकाद्याला पेंचांत घालणें**—त्याला संकटांत, किंवा अडचणींत, लोटणें.

३६७. **पेठे चारणें**—फसविणें.

३६८. **पैजेचा विडा उचलणें**—मी अमुक अमुक कृत्य करीन अशी प्रतिज्ञा करून चार मंडळींच्या समक्ष विडा उचलणें. उ०

विडा पैजेचा उचलुं नको !
उणी तराजू तोलुं नको ! ॥

अनंतफंदी.

३६९. **पैठणी आदर, किं० प्रेम, किं० आग्रह**—वरपांगीचा, किं० बाह्यात्कारी, आदर वगैरे.

३७०. **एकाद्याच्या घरांत पैशाच्या धूर निघत असणें**—तो अति श्रीमंत असणें.

३७१. **पोटीं घालणें**—आश्रयास घेणें. सांभाळ करावयासाठीं पदरीं घेणें. उ०

प्रेरणा न करितां संकटीं ।
कृपेनें अनाथ घाली पोटीं ।
केला उपकार न बोले ओठीं । ·
तो एक धन्य पुरुष ॥

मुक्तेश्वर.

३७२. **पोपटपंची करणें**—वडवडणें; अर्थ न समजतां पाठ केलेलें असेल तें म्हणून दाखविणें.

३७३. **पोवाडे गाणें**—स्तुति करणें ( विशेषतः नालायख मनुष्याची, किं० खऱ्या योग्यतेला न शोभेशी ).

## ३७४. पोळी.

१. खाद्यविशेष.—

२. **एकाद्याची पोळी पिकणें**—त्याची चैन होणें.

३. **आपल्या पोळीवर तूप ओढणें**--दुसऱ्याच्या फायद्याकडे लक्ष्य न देतां आपला फायदा करून घेणें; आप्पलपोटेपणा करणें.

३७५. **पोबारा**, किं० **पावबारा, करणें**--पळून जाणें; एकाद्याची नजर चुकवून निसटून जाणें. [ तिफांशी सोंगट्यांच्या खेळांतील हा पारिभाषिक शब्द आहे. ]

३७६. **प्रताप**, किं० **गुण, उधळणें**--वाईट स्वभाव, दुर्गुण, वगैरे प्रकट करणें. उ० गोविंदरावांच्या पोरांनीं भिवंडीस खूपच गुण उधळले!

३७७. **एकाद्याचें प्रस्थ करून ठेवणें**, किं० **माजविणें**--त्याची अतोनात तारीफ करणें; त्याचें महत्त्व अतिरेकाला नेऊन पोंचविणें. उ० त्या फकीराचें लोकांनीं फारच प्रस्थ माजविलें आहे!

३७८. ( क ) **प्रस्थान करणें**--निघून जाणें.

( ख ) **प्रस्थान ठेवणें**--निघून जाण्याची तयारी करणें.

३७९. **प्राणप्रतिष्ठा करणें**.--

१. धातु, काष्ट, इत्यादिकांच्या मूर्तींवर मंत्रादिकाच्या संस्कारानें देवत्व आणणें. देवळामध्यें एकाद्या मूर्तीची स्थापना करतेवेळीं हा संस्कार करावयाचा असतो.

२. स्थापना करणें; उ० दक्षिणेंत शिवाजीनें मराठी राज्याची प्राणप्रतिष्ठा केली.

३८०. **फट् म्हणणें**--तिरस्काराचा, किं० निंदेचा, शब्द उच्चारणें. उ० मी कोणाचें फट् म्हणून घेणार नाहीं; (म्ह० कोणी माझा तिरस्कार केलेला ऐकून घेणार नाहीं.)

३८१. **फडशा उडविणें**--संपवून टाकणें; संहार करणें. उ० आम्ही च. वघाजणांनीं पाऊणशें केळ्यांचा फडशा उडविला!

३८२. **फत्ते होणें**--फताह्=जय. "फत्ते होणें," म्ह० जिंकणें. "फत्ते मिळविणें," म्ह० जय मिळाविणें. कार्य सिद्धीस नेणें.

३८३. **फरारी होणें**--पळून जाणें.

३८४. **फशीं पाडणें**--फसवून संकटांत पाडणें; "फशीं पडणें," म्ह० फसून अडचणींत पडणें.

३८५. **फळास येणें**--फलद्रूप होणें. उ०

मत्पुण्य तें पूर्णफळासि आलें। या रे! तुझें दर्शन आजि झालें।
स्मरूनियां तूं मज भेटलासी। सुधानिधीसंनिभ वाटलासी॥

आनंदतनय.

### ३८६. फांटा.

१. (क) नदी, झाड, डोंगर, वगैरेंची शाखा, भाग, किं० अवयव.
   (ख) लिहिलेला मजकूर खोडावयाचा असतां जी रेघ मजकुरांतून ओढतात ती.

२. **फांटा देणें**--कमी करणें; नाहींसा करणें. उ० मला पोटदुखी जडल्यापासून आम्ही वरणाला फांटा दिला आहे. उ० रामभाऊ आपल्या नोकरीच्या गांवावर गेले, तेव्हांपासून मी घरांतील एका नोकरास फांटा दिला (म्ह० तो काढून टाकला). उ० काल दुपारीं जेवण फार झालें, म्हणून मीं संध्याकाळच्या जेवणास फांटा दिला.

३. **फांटा फुटणें**--एका कामांतून दुसरें काम निघालें म्हणजे, "त्याला फांटा फुटला" असें म्हणतात.

४. **फांटे फोडणें**--नसल्या अडचणी उपस्थित करणें. एकादें काम टाळावयासाठीं त्यांत हरकती काढणें.

३८७. **फारकत होणें**—संबंध सुटणें. ताटातूट होणें. उ० शहाणपणाची आणि गोविंदरावाची फारकत झाली आहे, ( म्ह० गोविंदराव मूर्खा. सारखा वागत असतो. )

३८८. **फावड्यानें**, किं० **खोऱ्यानें, पैसे ओढणें**--अतोनात पैसे मिळविणें. उ० सुमारें ४० वर्षामागें ज्यांनीं वऱ्हाडांत वकीली केली, त्यांनीं खोऱ्यानें पैसे ओढिले

## ३८९. फांसा.

१. ( क ) ( सं. पाश ) आंकडा. उ० ह्या सरीचा फांसा मोडला आहे.
   ( ख ) पक्षी वगैरे धरावयाचें जाळें.
   ( ग ) एकाद्या माणसास फसविण्यासाठीं केलेली युक्ति.
   ( घ ) ( सं. पाशक ) सोंगट्यांच्या खेळांत जे लाकडी, किं० हस्तिदंती, तुकडे घेण्यांत येतात तें.

२. **फांशीं देणें**--गळ्याला दोरीचा फांस लावून प्राण घेणें. उ० मारुत्यावर खुनाचा आरोप शाबीद होऊन त्याला काल फांशीं दिलें. [ याचप्रमाणें " फांशीं जाणें, " ह्याचा अर्थ समजावा. ]

३. **फांसा टाकून पाहाणें**--एकादी वस्तु प्राप्त करून घेण्यासाठीं एकादी धाडसी युक्ति करणें. नशीबावर हवाला टाकून एकादें जोखमीचें काम पथकरणें.

४. **एकाद्याचा फांसा जाणणें, समजणें**, किं० **उमगणें**—त्याची गुप्त योजना, किं० मसलत, ओळखणें.

५. **फांसा सोयीचा पडणें**—अनुकूल गोष्ट घडून येणें; योजलेल्या कृत्याला सुरळीतपणें चालण्याचें स्वरूप येणें.

६. **फांसा टाकणें**--आपलें म्हणणें कळविणें, किं० एकादी गोष्ट करणें, ( आणि परिणाम काय होतो, त्याची वाट पाहात बसणें, किं० फलाविषयीं तर्क करीत बसणें. )

३९०. **फुटाण्यासारखा उडणें**--ऐटीनें, रागानें, किं० गर्वानें, जोरदार रीतीचे अंगविक्षेप करणें. उ० ती बाई भरपंक्तींत येऊन फुटाण्या-सारखी उडत होती !

३९१. **फुली घालणें**--अडथळा करणें. शरीराचा एकादा भाग दुखत असला म्हणजे तेथें बिब्याची फुली घालतात, म्हणजे रोगाच्या जो-राला प्रतिबंध होतो. यावरून "एकाद्या कामांत फुली घालणें," म्हणजे त्यांत विघ्नें आणणें, असा अर्थ झाला.

३९२. **फुलें विकलीं तेथें गोंवऱ्या विकणें**--जेथें पूर्वी वैभवानें दिवस घालविले, तेथें दरिद्री स्थितींत राहणें.

३९३. **फुसकुली सोडणें**--कुचकें, किं० मर्मभेदक, किं० एकाद्याची हानि होईल अशा प्रकारचें, भाषण गुप्तपणें, किंवा हळूच, करणें.

३९४. **फू करून टाकणें**--उधळेपणानें खर्चून टाकणें.

३९५. **बजबजपुरी करणें**, किं० **मांडणें**, किं० **माजविणें**--अव्यव-स्था, किं० गोंधळ, करणें.

३९६. **बडीजाव करणें**-गौरव करणें.

## ३९७. बत्तीशी.

१. **बत्तीशी**-बत्तीस दांतांचा समुदाय.

२. **बत्तीशी रंगविणें**—दातांतून रक्त निघेल, आणि त्या रक्तानें बत्ती-सचे बत्तीस दांत रंगतील, इतक्या जोरानें थोबाडींत मारणें.

३. **बत्तीशी पाडणें**--थोबाडींत मारून बत्तीसचे बत्तीस दांत पाडून टाकणें; सारे दांत पडतील इतक्या जोरानें थोबाडींत मारणें.

४. **बत्तीशी दाखविणें**—हसणें. [ हसतांना दांत दिसतात, आणि दांत बत्तीस असतात, यावरून ही शब्दसंहति उत्पन्न झाली आहे. हींत अतिशयोक्ति आहे; कारण हसतांना सारे, म्हणजे बत्तीस दांत, कधींच दिसत नाहींत ].

३९८. **बंब वाजणें**--फजिती होणें; अखेरीस कांहीं नाहीं असें होणें.

३९९. **बभ्रा करणें**--बोभाटा करणें.

## ४००. वलवलपुरी.

१. **वलवलपुरी**—घोटाळा, अव्यवस्था.

२. **वलवलपुरी होणें**--घोटाळा, किं० गोंधळ, होणें.

४०१. **वस्तान बिघडणें**--बिघाड होणें; अव्यवस्थित होणें.

४०२. **वळी पडणें**—भक्ष्यस्थानीं पडणें; नाश करणाऱ्याच्या तावडींत सांपडणें; विध्वस्त होणें; नाश पावणें. मरणें. उ०

भक्ष्य लक्षुनि तोंडावरचें फसतो मासा जसा गळीं ।
विचार सोडुनि चार करी तो मनोविकारां पडे वळी ॥

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

४०३. **एकाद्या गोष्टीचा वाऊ करून ठेवणें**--भीति वाटण्याइतकें तिला महत्त्व देणें. ती अतिविकट, धोक्याची, किं० दुर्घट, आहे, असा विनाकारण आपला ग्रह करून घेणें, किं० दुसऱ्याचा ग्रह करणें.

४०४. **वाऊ वाटणें**—भीति वाटणें.

## ४०५. वांगडी.

१. कंकण. कांकण. उ० आलीकडे काळ्या वांगड्या चांगल्या होत नाहींत.

२ **वांगड्या फुटणें**--

( क ) स्त्रीचा पति मृत झाला असतां तिच्या वांगड्या फोडितात. यावरून " वांगड्या फुटणें, " म्ह० वैधव्य येणें, किं० पुरुष मरून तितक्यांच्या स्त्रिया विधवा होणें.

( ख ) फजीती होणें. नक्षा उतरणें. उ माझ्या अंगचे गुण जगजाहीर आहेत. कासोबासारख्या हलकटानें माझी निंदा केली, तर माझ्या काय वांगड्या फुटणार आहेत?

३. **वांगड्या वाढणें**--स्त्रीच्या हातांतील वांगड्या फुटल्या, म्हणजे त्या "फुटल्या" असा अशुभ शब्द न योजतां "वांगड्या वाढल्या," किं० " वांगड्या वाढवल्या," असें म्हणतात. लाक्षणिक उपयोगानें " वांगड्या वाढणें, वाढवणें, पिचणें, फुटणें, " वगैरेंचा अर्थ फजीती होणें, नक्षा उतरणें, किं० हानि होणें, असा होतो. उ० त्यानें मला न कळ-

वितां मुकाव्यानें तो कारभार केला; करू दे बापडा! त्यांत माझ्या काय बांगड्या पिचल्या ?

४. बांगड्या भरणें—नामर्द होणें. पराक्रमशून्य होणें, किं० असणें. उ० तो माझ्या अंगावर आला, तर मी त्याला दहा गुद्दे चढवीन! मीं काय बांगड्या भरल्या आहेत ?

४०६. बाजार करणें—

(क) हाव्या असतील त्या वस्तु बाजारांतून विकत आणणें; उ० लोकांनीं तुमच्या जिनसा विकत आणून देणें हें किती दिवस चालणार ? तुमच्या मुलांनीं बाजार करावयास शिकलें पाहिजे।

(ख) बाजार मांडणें—अनेक पदार्थ इतस्ततः अव्यवस्थितपणें पसरणें.

(ग) बाजार भरविणें—अनेक माणसें--(ज्यांचा कांहीं उपयोग नाहीं, किं० ज्यांच्यायोगें घोटाळा मात्र होतो अशीं माणसें---)एके ठिकाणीं गोळा करणें.

### ४०७. बाजू.

१. बाजू राखणें--आबरू संभाळणें. फजीती, किं० दुर्लौकिक, होण्याचा संभव असतां तो न होऊं देणें.

२. बाजू राहणें--फजीती, किं० दुर्लौकिक, होण्याचा संभव असतां एकाद्या अनुकूल गोष्टीमुळें तो न होणें.

४०८. बाणा मिरविणें--अभिमान बाळगणें.

४०९. बात झोकणें--खोटी बातमी सांगणें.

४१०. बापदोघांची पेंड--हवें त्याणें हवी तितकी न्यावी अशी वस्तु.

४११. बार उडविणें--कठिण, दुर्घट, काम पार पाडणें. अकल्पित रीतीनें काम फत्ते करणें. [ " बंदुकीचा बार उडविणें," ह्या प्रकारावरून ही शब्दसंहति निघाली आहे ].

४१२. बार भरणें —पढवून ठेवणें; अमुक प्रसंग आला असतां अमुक करावयाचें, अशा संबंधाच्या सूचना त्या त्या माणसांस देऊन ठेवणें. इष्ट हेतु सफल होण्यासाठीं जरूर जी तजवीज, ती अगोदरच शहाणपणानें करून ठेवणें.

४१३. **बोलवाला होणें**—उत्कर्ष होणें. उ० आंधळ्याला भिक्षा वाढा, बाई! तुमचा बोलवाला होईल! [ ह्या शब्दाचा स्त्रीलिंगीही ह्याच अर्थानें उपयोग होतो. ]

४१४. **बारा पंधरा करणें**--असंबद्ध, म्हणजे ताळमेळाशिवाय, बोलणें. [ एकदा बारा, तर नंतर पंधरा, असें म्हणणें. ]

४१५. **बारा वाजविणें**—दुपारचे बारा वाजले, म्हणजे दिवसाला उतरती कळा लागते, आणि रात्रीचे बारा वाजले, म्हणजे रात्रीला उतरती कळा लागते. यावरून "बारा वाजणें," म्ह० उतरती कळा लागणें, (आणि अतिशयोक्तीनें ) समाप्त होणें. "बारा वाजविणें" म्हणजे उतरती कळा लागेल असें करणें; ( आणि अतिशयोक्तीनें ) समाप्त करणें. विध्वस्त करणें. नाश, हानि, नुकसान करणें.

४१६. **बाळकडू असणें**--गोडी असणें; उपजत असलेली प्रवृत्ति, किंवा गुण, असणें. उ० सृष्टिसौंदर्याच्या अभिरुचीचें मात्र त्याला ( ग्यारिबाल्डीला ) बाळकडूच होतें म्हटलें तरी चालेल.

न० चिं० केळकर-ग्यारिबाल्डी.

४१७. **बिब्बा घालणें**--एकाद्या सुरळीतपणें चाललेल्या कामांत हरकत आणणें, किं० तें बिघडविणें-

४१८. बिऱ्हाड.

१.( क ) राहावयासाठीं भाड्यानें घेतलेली जागा, घर, इ०; उ० हें आमचें बिऱ्हाड हवाशीर आहे.

( ख ) एकाद्या ठिकाणीं राहणें. वसति. वास्तव्य. उ० माटेकरांच्या वाड्यांत आमचें बिऱ्हाड सतत बारा वर्षे आहे.

( ग ) सामानसुमान, चीजवस्त. उ० आमचें बिऱ्हाड दोन हेल-कऱ्यांच्या डोक्यांवर जाण्याइतकें थोडें आहे.

( घ ) स्पष्टपणें न बोलतां चोरून ठेवलेला मजकूर. उ० आपण घरो-ब्यानें बोलत आहों. बिऱ्हाड ठेवण्याचें कारण नाहीं.

२. **बिऱ्हाड उचलणें**--एकाद्या ठिकाणाहून आपली चीजवस्त घेऊन निघून जाणें.

३. **बिऱ्हाड करणें**--

( क ) कायमचें वास्तव्य करावयाच्या उद्देशानें आपल्या सामानासुमानासह, बायकांमुलांसह, एकाद्या ठिकाणीं राहणें.

( ख ) एकाद्याच्या इच्छेविरुद्ध त्याच्या घरीं, किं० शरीरांत, ठाणें करून राहणें. उ० कफानें माझ्या छातींत बिऱ्हाड केलें आहे.

४१९. **बुद्धि फांकणें**—

( क ) बुद्धीचें सामर्थ्य, किं० आवांका, विस्तृत होणें.

( ख ) मति, किं० विचार, संभ्रांत होणें, किं० गोंधळणें.

४२०. **एकाद्याचे बेचाळीस उद्धरणें**—त्याच्या बेचाळीस पिढ्यांच्या पितरांना शिव्या देणें. [ "उद्धरणें" हा शब्द लाक्षणिक अर्थानें घ्यावयाचा कारण त्याचा अर्थ स्वर्गास चडविणें, किं० पोंचविणें, असा न घेतां, नरकांत लोटणें, असा घ्यावयाचा आहे ].

४२१. **बेंड बाहेर पडणें, किं० बेंड फुटणें**—गुप्त गोष्ट बाहेर पडणें. एकाद्या गुप्त ठेवलेल्या गोष्टीचा हास्यास्पद, किं० निंद्य, भाग, किं० प्रकार, उघडकीस येणें.

४२२. **बेलभंडार उचलणें**--बेलाचीं पानें आणि हळद–जीं देवाच्या मूर्तीवर वाहिलेलीं असतात–तीं काढून तीं हातांत धरणें. शपथ घेतेवेळीं असें करण्याची चाल आहे. उ० मी बेलभंडार उचलून असें म्हणेन कीं माझ्या मनांत यत्किंचित् कपट नाहीं !

४२३. **बोऱ्या उडणें**—फजीती होणें.

## ४२४. बोल.

१. ( क ) भाषण, शब्द. उ० माझा बोल कधीं खोटा होणार नाहीं.

( ख ) टपका, दोष. ( क्रियापद "ठेवणें", किं० "लावणें". ) उ० मला उगीच बोल लावूं नको. उ०

पटुनि असें गहिंवरला महिवर लावून बोल भावास ।

मोरोपंत.

२. **बोल बोलूं देत नाहीं**--एक अक्षर देखील बोलूं देत नाहीं. उ० त्याणें अतिमोठा गहजब केला, आणि रामभाऊला बोल बोलूं दिला नाहीं !

३. **त्याच्या बोलांत बोल नाहीं, किं० त्याच्या बोलण्यांत बोलणें नाहीं**--त्याचें भाषण मेळ सोडून असतें. तो एकदा एक बोलतो आणि नंतर दुसरेंच कांहीं बोलतो. उ० तुझ्या वचनावर मी अवलंबून कसा राहूं? कारण तुझ्या बोलण्यांत बोलणें नाहीं !

४. **बोलण्यावर जाणें**--बोलण्यावर विश्वास ठेवून वागणें.

५. **बोलाफुलास गांठ पडली**--जसें भाकीत करण्यांत आलें होतें, तसा परिणाम घडून आला. जें होईल म्हणून तर्क करण्यांत आला होता, तें घडून आलें. कर्मधर्मसंयोगानें तसें घडून आलें.

४२५. **एकाद्याची बोळवण, किं० बोळवणी, करणें**--त्याला निरोप देणें.

४२६. **बोळ्यानें दूध पिणें**—दुसऱ्याच्या सांगीप्रमाणें वागणें. स्वताची अक्कल नसल्यामुळें दुसऱ्याच्या मतानें चालणें. बुद्धिहीन असणें. उ० त्याच्या मानभावी शब्दांना कां मी फसणार ? मी कांहीं बोळ्यानें दूध पीत नाहीं ! [तान्ह्या मुलांना स्वता दूध पितां येत नाहीं, म्हणून त्यांना बोळ्यानें दूध पाजावें लागतें. यावरून "बोळ्यानें दूध पिणें," म्हणजे मुलांप्रमाणें बुद्धिहीन, किं० अडाणी, असणें, असा अर्थ झाला. ]

## ४२७. ब्रीद.

१. **ब्रीद**--एकाद्या चांगल्या गुणावरून मिळालेलें जें यश, त्याला "ब्रीद" असें म्हणतात, आणि तें यश न जाऊं देणें याला "ब्रीद पाळणें, किं० राखणें, किं० ब्रिदास जागणें" असें म्हणतात. उ०

अनाथासी संभाळावें । ब्रीद पाळावें आपुलें ॥ एकनाथ.

२. **ब्रीद सत्य करणें**--संपादिलेलें यश अर्हित आहे, असें कृतीनें, किं० वर्तनानें, सिद्ध करून दाखविणें. उ०

मग कंठनाळ चरचर तो सत्य करावया विरुद कापी ।
मिटक्या देउनि मटमट घटघट त्या स्वाहितासृगुदका पी ॥
मोरो० कर्ण० अ० ४५ आ० १४.

[ "विरुद" हें "ब्रीद" याचें मूळचें शुद्ध रूप. ]

### ४२८. भट्टी.

(१) **भट्टी साधणें**--एकादें काम करण्याची खुबी, किं० हातोटी, कळणें, किं० प्राप्त होणें. उ० आमचा स्वयंपाकी सारे पदार्थ चांगले चांगले करतो, पण त्याला अझून चहाची भट्टी साधली नाहीं.

(२) **भट्टी बिघडणें**--एकादी गोष्ट करण्याच्या क्रियेंत कांहीं तरी क्रमभंग, किं० चुकी, झाल्यामुळें ती व्हावी तशी चांगली न होणें. [ "भट्टी बिनसणें," असाही वाक्प्रचार आहे. ]

४२९. **एकाद्याच्या नांवें भंडार उधळणें**--त्याची स्तुति करणें.

### ४३०. भर.

१. ( क ) ( पुल्लिंगी ) पूर्णता. विपुलता. विकासाचा कळस. उ० तारुण्याचा भर.

( ख ) ( पुल्लिंगी ) ओढा. उ० ह्या मुलाचा अभ्यासापेक्षां खेळण्याकडे भर ज्यास्ती आहे.

( ग ) ( स्त्रीलिंगी. ) भरतां येईल तितकें सामान; सोसतां येईल इतकें ओझें; करतां येईल इतकें काम; उ० आतां गाडीची भर झाली. तींत ज्यास्ती सामान राहणार नाहीं. उ० तुला आणखी दोन श्लोक सांगितले, म्हणजे उद्यांच्या धड्याची भर झाली.

( घ ) ( स्त्रीलिंगी. ) पोकळ, किं० रिकामी जागा, खड्डा, किं० उणीव, भरून काढण्यासाठीं जें कांहीं भरावयाचें, किं० घालावयाचें, तें. उ० पडवांची जमीन वीतभर खोल आहे; भर घालून ती ओटीच्या जमिनीबरोबर करावी असें माझ्या मनांत आहे.

२. **आपल्या भरानें चालणें**—स्वच्छंदानें वागणें.

३. **भर करणें**--न्यूनता भरून काढणें.

४. **एकाद्याची भर करणें**—आपण न भोगतां त्याला देऊन टाकणें. उ० भाऊबंदकीचा निकाल लागून त्याच्या वांट्याला जे पैसे आले, त्यांचे त्यानें काय केलें? सावकाराची भर केली! उ० त्या कृपणानें आपण खाल्लें नाहीं, दुसऱ्यांसही खाऊं घातलें नाहीं, आणि शेवटीं चोरांची भर केली!

५ **भर घेणें**—घेतां येईल तितकें पूर्णपणें घेणें.

६. **भर देणें**--उत्तेजन देणें. चेतविणें. उ० तुला द्राक्षांच्या व्यापारांत पैसे घालावयाला कोणीं भर दिली !

७. **भरीस घालणें**--न्यूनता नाहींशी करण्यासाठीं कमी असेल तें घालणें. उ० तुला भिक्षावळीचे आलेले तेरा रुपये. त्यांत मीं चार रुपये भर घालून ही अंगठी तुझ्यासाठीं करविली.

८. **एकाद्या गोष्टीच्या भरीस पडणें**—

( क ) ती पथकरून मग तीं पार पाडण्याच्या खटाटोपांत पडणें. तिच्या नादीं लागणें. उ० त्या मुलाची समजूत पाडण्याच्या भरीस तूं पडूं नको. त्याची कधीं समजूत पडावयाची नाहीं. बसूं दे रडत त्याला ! उ०

सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ॥ १ ॥
नको पृथकाचे भरीं । पडों, एक मूळ धरीं ॥ २ ॥ तुकाराम.

( ख ) त्याची सर्व संपत्ति रांडांच्या भरीस पडली-त्याची सर्व संपत्ति रांडांच्या भक्ष्यस्थानीं पडली.

९. **भरीं भरणें**--

( क ) एकाद्या वस्तूचा अतोनात नाद घेऊन एकसारखी तीच करीत सुटणें. उ० त्याला आलीकडे तसबिरींचा भारी नाद लागला आहे. त्याणें ५०० तसबिरी आतांपर्यंत विकत घेतल्या; आणि आतां भरी भरल्यासारखा आणखी ५०० तसबिरा विकत घ्यावयाला तो निघाला आहे !

( ख ) आपण कोण, आपली योग्यता काय, हें विसरून जाऊन एकाद्या वस्तूच्या नादीं लागणें.

४३१. **भरतें येणें**--जोर येणें; समृद्धि प्राप्त होणें. उ०

तत्सुखदुःखीं योग्य प्रसंगीं विभाग तो घेतां ।
आनंदें वा सद्गदतेनें भरतें ये चित्ता ॥ राजहंस.

४३२. **भरारी मारणें**--उडणें. उड्डान करणें. जलदीनें प्रवास करणें. मधला भाग अजीबात गाळून, किं० त्याच्याकडे पोंचवावें तितकें लक्ष्य न पोंचवितां, एकदम पुढच्या भागावर जाणें. उ० जी हकीकत घडली ती साद्यंत सांग. भराऱ्या मारूं नको.

४३३. **भांडण, किं० कलह, उकरून काढणें**—मागल्या गोष्टींचें उच्चारण, किं० उल्लेख, करून भांडण उपस्थित करणें. प्रतिपक्ष्याला क्षोभ येईल, अशा गत गोष्टी बोलून शमलेलें भांडण चेतविणें.

## ४३४. भिजत कांवळें.

( १ ) **भिजत कांबळें ठेवणें**--एकाद्या गोष्टीचा निकाल तावडतोब न लावतां ती तशीच पुष्कळ वेळ पडून राहूं देणें. [ कांबळें लोकरीचें असतें, तें भिजवावयाला फार वेळ लागतो, म्हणून तें पुष्कळ वेळ पाण्यांत बुडवून ठेवावें लागतें; " कांबळें " ह्याच्याबद्दल " घोंगडें " हाही शब्द योजण्याचा परिपाठ आहे. ]

( २ ) **भिजत कांबळें पडणें**—कोणतेंही काम तावडतोब निकालास न लागतां कांहीं तरी विघ्नें आल्यामुळें तें लांबणीवर पडणें.

## ४३५. भीक.

१. **भीक**—

( क ) भिक्षा. याचना.

( ख ) याचना करून मिळालेला पदार्थ. उ०

असल्यावरि भिक मागूं नको. अनंतफंदी.

उ० तुका म्हणे मूर्ख वागवी पुस्तक । दारोदारीं भीक मागावया ॥
तुकाराम.

( ग ) कमताई. उणीव, टंचाई; उ० तुझे खिशांत पैसे असतांना अशी भीक कां ?

२. **भीक घालणें**—वचकून असणें. उ० तो माझ्यावर आपला अंमल चालवूं पाहतो, पण मी कोठें त्याला भीक घालायाला बसलों आहें !

३. **भीक काढणें**--अडचण सोसणें.

४. **भीक घालणें**--मागितलेली वस्तु देणें. एकाद्याची विनंति मान्य करणें; उ० मीं त्याला परोपरीनें विनविलें, पण त्याणें माझ्या शब्दाला भीक घातली नाहीं.

**टीप**--हा प्रयोग नेहेमीं नकारार्थी असतो.

५. **भीक लागणें**--कमताई असणें; उ० लोकांजवळ तोंड वेंगाडून हे पदार्थ तूं कां मागतोस ? तुला जें पाहिजे आहे तें विकत घे; तुला काय भीक लागली आहे ? तुझ्या बापाला तर चारशें रुपये पगार आहे ?

६. **भिकेचे डोहाळे**--दारिद्र्य आणणाऱ्या गोष्टी करण्याकडे प्रवृत्ति. उ० अरे, तूं आलीकडे अगदीं अभ्यास करीनासा झाला आहेस ? तुला भिकेचे डोहाळे आठवले आहेत खास !

७. **भिकेवर लक्ष्य ठेवणें**--भीक मागण्याचा प्रसंग येईल, अशा रीतीनें वर्तन करणें, म्ह० निष्काळजीपणा, आळस वगैरे करणें.

८. **भिकेची हंडी शिंक्यास चढत नाहीं**---जो मनुष्य भिकेच्या अन्नावर पोट भरतो, त्याच्याजवळ अन्न शिंक्यावर झांकून ठेवण्याइतकें विपुल असावयाचें नाहीं. त्याला थोडेंच मिळणार, आणि जें त्याला मिळणार तें सारेंच तो खाणार; तेव्हा शिलकीस अन्न कसें पडणार ?

९. **भीक नको पण कुत्रा आटोप**---मजवर उपकार करावयाचे तुझ्या मनांत नसले तर नको करूं, पण निदान अपकार तरी करूं नको. मी जें मागतों आहे तें मला देऊं नको, पण ह्या अकल्पित संकटांतून सोडीव. [ एकादी गोष्ट आपण मोठ्या उत्कंठेनें मिळवावयाचा प्रयत्न करीत असतां जर एकादें अकल्पित संकट आलें, तर त्या प्रसंगीं ही म्हण योजतात. ]

१०. **भीक असून दारिद्र्य कां ?**---भीक मागावयाचा क्रम सुरू झाल्यावर मग अडचण कां सोसावी ? दहा घरीं भिक्षा मागून पुरेसें मिळालें

नाहीं, तर वेलाशक पंचवीस घरीं भिक्षा मागावी; त्याला काय हरकत आहे ?

११. **सदा पीक सदा भीक**—एकापेक्षां अधिक वेळां कांहीं जमीनींतून पीक काढीत असतात. परंतु तें पीक तुटपुंजें असल्या कारणानें शेताच्या मालकास नेहेमीं अडचण सोसावी लागते.

१२. **अतिरागा भीक मागा, त्याहून रागा देश त्यागा**--ज्याला राग फार, त्याला भीक मागण्याचा प्रसंग येतो; ज्याला अत्यंत राग, त्याला देश सोडून जाण्याचा प्रसंग येतो.

१३. **भिकेची भाकरी आणि म्हणे शिळी कां ?**—भिक्षा मागून जें मिळालें असेल, त्यांत दोष काढणें हा निर्लज्जपणा होय ! भीक मागावयाची आणि पुन्हा दात्यानें दिलेली वस्तु चांगली नाहीं म्हणून त्याला दोष द्यावयाचा, हें बरोबर नाहीं.

१४. **भिकेवर कोठें श्राद्ध होतें ?**--तुटपुंज्या सामुग्रीवर एवढें मोठें काम कसें होईल ? किंवा येवढी मोठी गरज कशी भागेल ?

## ४३६. भीड.

१. **भीड**—भीति, संकोच, मनाचा कोंवळेपणा. वजन, संमान, धाक. त्याच्यापुढें येणारीं क्रियापदें धर, राख, ठेव, सुट, चेप, मर, घाल, खर्च इ०.

२. **मला भीड तुटत नाहीं**—कोणी मजजवळ कांहीं जिन्नस मागितला असतां मला भीड तुटत नाहीं, म्हणजे देत नाहीं असें म्हणवत नाहीं.

३. **वडील माणसांची कांहीं तरी भीड राख**—त्यांचा मान ठेव; त्यांच्याशीं उर्मटपणानें वागूं नको. उ० रामभाऊंनीं तुला तें काम करावयास सांगितलें आणि तूं तें साफ नाकारलेंस; तुला त्यांची अगदींच कशी भीड पडली नाहीं ?

४. **भीड घालणें, कि० भिडेस घालणें**--आग्रह करणें, विनंति करणें, गळ घालणें. एकाद्याला अनुकूल करून घेण्यासाठीं त्याची विनवणी करणें. उ०

न घालिन भिडेस मी जरिहि कार्यलोभी तिला
मोरो०—केकावली.

५. **भीड खर्चणें**—आपल्याविषयीं दुसऱ्याच्या मनांत जो आदर आहे, त्याच्या जोरावर त्याला कांहीं विनंति करणें, किं० त्याच्या जवळ कांहीं तरी मागणें; उ० आजपर्यंत मीं तुला तीन वेळां नोकरी लावून दिली, आणि तिन्ही वेळां तूं नोकरी सोडून दिलीस; आतां मी तुझ्यासाठीं कोणाच्याहीपाशीं भीड खर्चणार नाहीं, (ह्म० कोणालाही विनंती करणार नाहीं.)

६. **भीड भिकेची वहीण**—भिडेला गुंतून जर आपण एकाद्याची भलतीच विनंति मान्य केली, तर तेणेंकरून आपलें मोठें नुकसान होतें, किंवा आपणास फार अडचणी काढाव्या लागतात.

७. **भिडेला गुंतणें**—भिणें; संकोच वाळगणें; कचरणें. उ० ही मुलगी तुम्हांला पसंत असली तर लग्न जुळवा; उगीच भिडेला गुंतूं नका.

८. **भीड धरणें**—लाजणें. भिऊन, वचकून असणें. मर्यादेचें अतिक्रमण न व्हावें म्हणून जपणें. उ०

शिष्ट नसावा महाभ्याड । शिष्टें न धरावी भीड ।
शिष्ट बोलका सुघड । निवडा प्रौढ निजबुद्धि ॥
एकनाथ—अंगदशिष्टाई.

९. **भीड चेपणें**—परिचयाच्या योगानें भीति, किं० दरारा, नाहींसा होणें.

## ४३७. भोग.

१. **भोग येणें**—सुखदुःखादि दैवगति प्राप्त होणें; उ०

आलिया भोगासि असावें सादर ॥ तुकाराम.

२. **भोगास येणें**—अनुभवण्याचा प्रसंग कपाळीं येणें.

४३८. **भोंवऱ्यांत सांपडणें**—लवकर नाहींसा न होणाऱ्या अडचणींत गुंतणें.

४३९. **भ्रमाचा भोपळा फुटणें**—एकादी वस्तु भारी किंमतीची आहे,

असा आपला ग्रह झालेला असतां तिचें खरें स्वरूप प्रकट होऊन ती कुचकामाची आहे असें निदर्शनास येणें.

४४०. **एकाद्या गोष्टीचा मक्ता घेणें**--ती आपण करूं, किं० पुरवूं, अशी हमी घेणें; उ० तुला काड्याची पेटी पाहिजे तर विकत आण. तुला काड्या पुरविण्याचा मीं काय मक्ता घेतला आहे ?

४४१. **एकाद्या गोष्टीवर मखलाशी करणें**—तिला नीटनेटकेपणाचें स्वरूप देणें. [ आपण एकादा कागद पाहून त्यांत कमजास्ती जें करणें तें केलें आहे, व आतां तो आपणास कबूल आहे, हें सुचविण्यासाठीं त्यावर केलेली जी सही, किं० निशाणी, तिला " मखलाशी " म्हणतात. ]

४४२. **जीव मट्ट्यास येणें**--अगदीं थकून जाणें; उ० सकाळपासून पन्नास पन्नास पानांच्या सहा पंगतींना वाढून वाढून माझा जीव मट्ट्यास आला आहे.

४४३. **त्या दोघांच्या मधून विस्तव जात नाहीं**—त्यांच्यांत वैमनस्य आहे.

४४४. **मन मिळणें**--मनाच्या आवडीनिवडी वगैरे सारख्या असणें, किं० असणाऱ्या, होणें; उ० स्त्रीपुरुषांचीं मनें मिळालीं नाहींत, तर त्यांचा संसार सुखावह होऊं शकत नाहीं.

४४५. **मनांतल्या मनांत जळणें**—आंतल्या आंत जळफळणें, किं० चरफडणें. मनांतील राग शब्दांनीं व्यक्त न करतां धुमसत राहणें.

४४६. **मनाला द्रव येणें**—मनांत दया, किं० प्रेम, ह्या भावनांचा प्रादुर्भाव होणें.

४४७. **मरतां मरतां हातपाय झाडणें**--सर्व शक्ति नष्टप्राय झाली असतां पुन्हा एकदा उरली असेल तितकी शक्ति वेंचून प्रयत्न करणें.

४४८. **मरेमरेसें करणें**—अतोनात गांजणें, किं० उपद्रविणें.

४४९. **एकाद्याच्या गोंवऱ्या मसणांत जाणें**—तो आसन्नमरण होणें, किं० मरणाच्या पंथास लागणें.

## ४५०. माग.

१. **माग**—( संस्कृत मार्ग ) रस्ता, वाट.

२. **माग येणें**—मार्गक्रमणाची खूण येणें, किं० दिसणें. उ०

देवाजीचा माग येथवरी आला । येथें गुप्त झाला, काय करूं ?

तुका०—सांवता-चरित्र.

३. **माग काढणें**—एकादा मनुष्य कोणच्या वाटेनें गेला, ह्याचा तपास लावणें.

४. **माग लागणें**—पत्ता, तपास, लागणें.

४५१. **अंगांत मांग शिरणें, किं० येणें**—अंगांत तीव्र क्रोधाचा संचार होणें; उ० आलीकडे तो ज्याच्यात्याच्यावर तोंड टाकीत असतो. त्याच्या अंगांत मांग शिरला आहे खास ! [ फांशीं देण्याचें काम मांगाकडे असतें. यावरून " मांग," म्ह० क्रूर, कठोर, तामसी, इत्यादि अर्थ झाले. ]

४५२. **मागून आलेलें लोण पुढें पोंचविणें**—पूर्वीपासून चालत आलेले परिपाठ पुढें चालू ठेवणें. [ आट्यापाट्यांच्या खेळांत एक गडी सर्व पाट्या वलांडून परत येऊं लागला, म्हणजे तो " लोण घेऊन येत आहे, " असें म्हणतात ].

४५३. **माटमुट करणें**—भिऊन जाणें; कसें होईल, काय होईल, ह्या विचारानें घाबरून जाणें. उ० सासूस पाहतांत तिचा जीव माटमूट करूं लागला.

४५४. **मात करणें**—

( क ) बुद्धिबळाच्या डावांत प्रतिपक्ष्याच्या राजाला आडविणें.

( ख ) बुद्धीचें, किं० कुशलतेचें, कृत्य करून प्रतिपक्ष्याला जिंकणें. अघटित, अप्रतिम, विचित्र, किं० लोकोत्तर, कृत्य करणें. उ०

दुसरी द्वारका देवें रचियेली । तुका म्हणे केली मात तेणें ॥ तुकाराम.

## ४५५. माती.

१. ( क ) मृत्तिका, धूळ.

(ख) नासाडी; उ० दारूच्या व्यसनानें त्याच्या संसाराची माती झाली. उ० अति त्यांत माती, (म्ह० कोणतीही गोष्ट अतिरेकाला नेल्यानें नुकसान होतें.) उ०

जातां परार्थेहि बहू तापातें पावली सुरामा ती।
न करील कां पित्याची दुर्गतिची माउली सुरा माती ? ॥

मोरो०–विराट० अ० १, आ० ५०.

याच अर्थानें "मातेरें" हाही शब्द योजला जातो. उ०

यास्तव म्हणतों आम्ही हाणून नायकोस हातेरें।
करिती सर्वस्वाचें, परि न यशाचें, सुबुद्धि मातेरें ॥

मोरोपंत.

(ग) अगदीं कांहीं नाहीं. उ० तुला काय कळतें माती ?
(घ) अगदीं निरुपयोगी, किंवा विनकिंमतीचा, पदार्थ. उ० मला पैशाची फार जरूरी होती, म्हणून मला आपलें सामान मातीच्या मोलानें विकावें लागलें.

२. **मातीआड करणें, घालणें, ठेवणें,** किं० **टाकणें**—पुरून टाकणें; विसरून जाणें, किं० पुन्हा पुन्हा त्याच गोष्टीचा उल्लेख न करणें.

३. **एकाद्या वस्तूची माती करणें**—तिची नासाडी करणें; तिची सुखप्रदता हिरावून घेणें.

४. **माती टाकणें, घालणें,** किं० **लोटणें**—बुझविणें; विसरण्याचा प्रयत्न करणें. उ० त्या वादावर आतां माती लोटली पाहिजे.

५. **माती देणें**—प्रेताला मूठमाती देणें; प्रेत पुरणें.

८५६. **मात्रा न चालणें**—इलाज न चालणें; सामर्थ्याची प्रौढी कुचकामाची ठरणें. खात्रीनें गुणावह अशीं जीं औषधें त्यांत मात्रांची गणना होते. मात्रा अनेक प्रकारच्या असतात. सूतशेखराची मात्रा वगैरे. वैद्यानें रोग्याला मात्रा दिली असतां ती लागू पडली नाहीं, म्हणजे "मात्रा चालली नाहीं," असें म्हणतात. यावरून एव्हवींच्या व्यवहारांत "मात्रा लागू पडणें," म्ह० इलाज फलद्रूप होणें. "मात्रा लागू

न पडणें, किं० न चालणें," म्ह० इलाज निष्फळ होणें, असे प्रयोग होतात.

४५७. **माय विणें**--माय, म्हणजे आई, प्रसूत होणें. विशिष्ट गुणांनीं युक्त अशा पुत्रास जन्म देणें. उ० मला शिवी देण्याला कोणाची माय व्याली आहे तें पाहातों? ( म्हणजे मला शिवी देण्याचें धाडस ज्याला आहे, असा पुत्र कोणची आई प्रसवली आहे. तें पहातों.) ह्या स्पष्टीकरणावरून "कोणाची माय व्याली आहे?" ह्याचा अर्थ "कोणाचें धाडस होतें?" हा कसा निघतो, हें विद्यार्थ्यांना समजण्याजोगें आहे.

४५८. **माशा मारीत बसणें**--निरुद्योगी बसणें.

४५९. **माशी शिंकणें**—हरकत होणें; विघ्न येणें. माशीच्या शिंकण्यामुळें काम बंद ठेवावें लागणें. एकाद्या मनुष्यानें कांहीं काम करावयाचें, तें आळसावर ढकालिलें, आणि तें कां न केलें याबद्दल तो कांहीं तरी पुळपुळीत सबवी सांगूं लागला, तर त्याच्या उपहासार्थ वरील वाक्य योजतात. उ० पत्र टपालांत टाकावयाला तूं गेलास, आणि तें टाकिलें नाहींस. वाटेंत जातां जातां माशी शिंकली कीं काय?

४६०. **एकाद्या कामाची माळ एकाद्याच्या गळ्यांत घालणें**-- तें काम सर्वथैव त्याच्याकडे सोंपविणें. [ लग्नाचे विधींत वधू आणि वर एकमेकांच्या गळ्यांत माळा घालतात म्हणजे आपलें सर्वस्व एकमेकांच्या हवालीं पूर्णपणें करतात, म्ह० आपल्या सुस्थितीची जबाबदारी एकमेकांच्या हवालीं करतात. यावरून "माळ घालणें," ह्याचा वर दाखविल्याप्रमाणें प्रयोग केला जातो. ]

४६१. **मिरच्या लागणें**—चरफडाट होणें. उ० रामभाऊंचे दोप काढले, म्हणजे गणपतरावाला मिरच्या लागतात. [ "अंगाला, नाकाला, मिरच्या लागणें," असाही याच अर्थानें वाक्प्रचार आहे ].

४६२. **मिशांवर ताव देणें**--समाचार घेईन, उट्टें काढीन, अशी प्रतिज्ञा करून मिशांना ऐटीनें पीळ भरणें.

४६३. **अंगाला मुंग्या येणें**--वातादि आजारामुळें अंगाला एक प्रकारची बधिरता येणें.

४६४. **मुली उजविणें**--मुलींचीं लग्नें करून देऊन त्यांच्या ऋणांतून मुक्त होणें.

४६५. **मूग गिळणें**, किं० **मूग गिळून बसणें**—न बोलतां, स्वस्थपणें, मुकाट्यानें बसणें, [ कोणी आपला अपमान केला असतां, किं० आपणास उत्तर द्यावयाला येत नसतां, किं० उत्तर दिल्यास अनर्थ होईल म्हणून. ] उ० प्रेमजी हा कासोपंताला कितीही टाकून बोलला, तरी कासोपंत मूग गिळून बसतो; कारण, कासोपंताला प्रेमजीपासून पुष्कळ हित करून घ्यावयाचें आहे !

४६६. **मूळ जाणें** --आमंत्रण करावयाला जाणें, ( मुलीला माहेरीं आणावयाची असतां ).

४६७. **मेख मारणें**--प्रतिपक्ष्याचें कांहीं न चालेल, अशी तजवीज करून ठेवणें.

४६८. **मेतकूट जमणें**--स्नेह जुळणें; मनास मन मिळून जाणें.

४६९. **मेल्या म्हशीस मणभर दूध**--मनुष्य जिवंत आहे, तोंपर्यंत त्याच्या गुणांचें कौतुक केलें जात नाहीं. तो मेला, म्हणजे त्याच्या गुणांचें कौतुक केलें जातें, इतकेंच नव्हे, तर ते गुण वाढवून प्रशंसिले जातात !

४७०. **एकाद्याची मोट बांधणें**--त्याची इच्छा नसतां त्याला एकादें काम करावयास भाग पाडणें. त्याच्या इच्छेविरुद्ध त्याच्यावर एकादें काम लादणें.

४७१. **एकाद्याची मोडशी जिरविणें**—त्याला खूप चोप देणें; त्याची खोडकी मोडणें; त्याचें पारिपत्य करणें.

४७२. **मोळी बुचकळणें**--स्नान करणें. अंघोळ करणें. लांकडाच्या काटक्या एकत्र बांधल्या, म्हणजे त्या जुड्याला " मोळी "म्हणतात. त्याप्रमाणें शरीर हें अनेक हाडें एकाशीं एक अशीं जुळून बनलेलें आहे. यावरून शरीराला तिरस्कारानें " मोळी " असें म्हणतात.

४७३. **योगक्षेम चालविणें**--" योग "म्हणजे इष्ट वस्तु मिळविणें, आणि "क्षेम" म्हणजे मिळविलेल्या वस्तूचें रक्षण करणें. यावरून "एकाद्या मनुष्यानें योगक्षेम चालविणें " म्ह० त्याला पाहिजे असेल तें मिळवून

देणें, आणि नंतर त्याच्या रक्षणाची काळजी वाहणें; त्याच्या संबंधाची सर्वप्रकारची जबाबदारी आपल्याकडे घेणें; अनुरुप क्रियापदें "वाहणें," "पाहणें," "चालविणें," इ०.

४७४. **रग जिरविणें**—खोडकी मोडणें. उद्दामपणाला प्रतिबंध करणें. शासन करून एकाद्याचा ताठा नाहींसा करणें.

४७५. **रंगणांत येणें**—प्रतिपक्ष्याशीं लढावयासाठीं पुढें सरसावणें.[ "रंगण" हा "समरांगण" ह्याचा अपभ्रंश. "समरांगण," म्ह० लढण्याची जागा.]

४७६. **रंगारूपास आणणें, किं० येणें, किं० चढणें**—फलद्रूप, वैभवशाली, सुखावह, सर्वांगसुंदर, किं० पूर्ण, करणें, किं० होणें; उ० माझ्या ग्रंथाचा मीं नुसता कच्चा खरडा तयार केला आहे. तो रंगारूपास आणावयास वर्ष दीड वर्ष लागेल ! [ चितारी चित्राला रंग वगैरे देऊन रूपाची हुबेहूब आकृति बनवितो, ह्यावरून ही शब्दसंहति उत्पन्न झाली आहे.]

४७७. **रंगास येणें**--खुलून दिसणें. पूर्णतेस येणें. विकास पावणें. उ० त्याचा संसार रंगास येणार, तोंच त्याची बायको मरण पावली !

४७८. **रजाचा गज करणें**--अगदीं क्षुल्लक वस्तूला अतोनात महत्त्व देणें. ज्यांत कांहीं अर्थ नाहीं, अशी गोष्ट फुगवून सांगणें, किं० वर्णिणें. अतिशयोक्ति करणें. [ रज=कण, अणु. गज=कापड मोजावयाची धातूची, किं० लांकडाची, पट्टी. ]

४७९. **रंजक पिणें**--बंदुक, किं० तोफ, उडवावयाची असतां तिच्या कान्यावर थोडीशी दारू घालावी लागते. ती दारू पेटवून दिली, म्हणजे बंदुक, किं० तोफ, बार होऊन उडते, आणि गोळी लक्ष्यावर जाऊन आदळते. रंजक पेटवून बार झाला नाहीं, तर "बंदूक, किं० तोफ, रंजक प्याली," असें म्हणतात.

४८०. **रडकुंडीस येणें**--अतिशय दगदग झाल्यामुळें रडण्याच्या स्थितीस येणें. रडें कोसळण्याइतका त्रास होणें; उ० माझ्या मुलीला स्थळें शोधतां शोधतां मी अगदीं रडकुंडीस आलों. याच अर्थानें "जीव रडकुंडीस येणें," असेंही म्हणतात. ]

**४८१. रडत राव, किं० रडत राऊत, घोड्यावर बसविणें**—ज्याला ज्या गोष्टीची हौस नाहीं, त्याला ती गोष्ट जुलमानें करावयास लावणें. [ राऊत=स्वार. ]

**४८२. रमारमी होणें**—अगदीं बेतास बात होणें; शिल्लक न राहणें; जितक्याची जरूर असेल, तेवढ्यालाच पुरून शिल्लक न राहणें.

**४८३. राईचा पर्वत करणें**—"रजाचा गज करणें," ही शब्दसंहति पहा. [ राई=मोहोरीचा दाणा. ]

**४८४. राखरांगोळी करणें**—पूर्ण विध्वंस करणें.

## ४८५. राग.

१. कोप, गुस्सा; उ० तुझा बाप लांच खाऊन कैदेंत गेला, असें मीं त्यास म्हटलें, तेव्हां त्याला राग आला.

२. **एकाद्याला राग आणणें**—त्याला कोपयुक्त करणें.त्याला खिजविणें.

३. **राग गिळणें**—अतिशय राग आलेला असतां तो प्रयत्नानें आवरून धरणें; उ० माझ्या वरिष्ठानें मला " सूवर " म्हटलें तेव्हां मला अति राग आला, पण तो मीं गिळला !

४. **एकाद्याचा राग करणें**—तो दृष्टीस पडला, किं० त्याची गोष्ट निघाली, कीं रागावणें. त्याचा कंटाळा करणें; उ० इतके दिवस माझें काम धनीसाहेबांना आवडत होतें, परंतु बाईसाहेब माहेराहून आल्यापासून ते दोघेंही माझा भारी राग करूं लागलीं आहेत.

५ **राग नाकावर असणें**—क्षुल्लक कारणानें रागावण्याकडे प्रवृत्ति असणें; उ० आमच्या सुनबाईंना मुळींच कोणी बोललेलें खपत नाहीं. राग अगदीं नाकावर आहे !

**४८६. रातांबे पिकणें**—गाल तांबडे लाल होणें, ( उन्हांत चालल्यामुळें, किं० विशेष कष्ट केल्यामुळें. )

**४८७. रान खवळणें**—कोपानें, किं० भुकेनें, व्याकुल होणें. [ शिकारी लोकांनीं जनावरांना त्यांच्या वसतिस्थापासून हुसकून लाविलें, म्हणजे तीं घाबरून सैरावैरा पळत सुटतात. तेव्हां " रान खवळलें," असें

म्हणतात. क्रोधानें, किं०भुकेनें, मनुष्याचें शरीर क्षुब्ध झालें, म्हणजे तें खवळलेल्या रानाप्रमाणें होतें, यावरून ही शब्दसंहति उत्पन्न झाली आहे.]

४८८. **राम म्हणणें**—मरणसमयीं रामाचें नांव मुखानें उच्चारावें म्हणजे उत्तम गति प्राप्त होते, अशी हिंदूंची समजूत आहे. यावरून पुढील प्रयोग प्रचारांत आले आहेत. उ० त्याणें राम म्हटला, (म्ह० तो मेला.) तो राम म्हणावयाच्या बेतांत आहे, ( म्ह० तो मरणोन्मुख झाला आहे. ) त्या पेटीनें राम म्हटला, ( म्ह० ती पेटी मोडली. ) राम म्हण, ( म्ह० मरावयाला तयार अस, किं० सिद्ध हो. )

४८९. **राळ करणें**—फजिती करणें; विध्वंस करणें.

४९०. **रेच उतरणें**—खोड मोडणें; गर्वाचा परिहार करणें. उ०

उतरी वैराग्यबळें षडरींचा तो दिसांदिसां रेच । मोरो०-मंत्र भाग०.

४९१. **रेषा उमटणें**—प्रत्येक मनुष्य च्या आयुष्यांत ज्या गोष्टी घडाव याच्या, त्या त्याच्या कपाळावर लिहिलेल्या असतात, असें आपण समजतों. अक्षरें ह्या एक प्रकारच्या रेषाच होत. कोणी मनुष्य भाग्यास चढेल असा संभव नसतां जर तो अकस्मात् भाग्यास चढला, तर त्याच्या कपाळावरील अक्षररूप रेषा स्पष्ट नव्हती ती आतां स्पष्ट दिसूं लागली असें होतें. यावरून " रेषा उमटणें, किं० उपटणें, " म्हणजे भाग्याची रेषा स्पष्ट दिसूं लागणें, किं० भाग्यवंत होणें.

४९२. **लकडा लावणें**—तगादा, किं० निकड, लावणें. उ० त्याच्या मागें मी एकसारखा आठ दिवस लकडा लावला, तेव्हां त्यानें चिंगीच्या परकरासाठीं मला चीट विकत आणून दिलें.

४९३. **लघुशंकेस जाणें**—लघवीस जाणें.

४९४. **लवनभंजन करणें**—नम्रपणानें गोड गोड भाषण करणें. व्युत्पत्तिः—लवणें+भजणें=नमणें आणि मान देणें.

४९५. **एकाद्याची लाज राखणें**—तो निंदेस, किं० उपहासास, पात्र न होईल असें करणें.

४९६. **एकाद्याचे लाड पुरविणें**—त्याची हौस पुरविणें, किं० भागविणें. तो मागत असेल ती वस्तु त्यास देणें.

४९७. लांडे कारभार करणें--दुसऱ्याच्या कारभारांत अधिक प्रसंगीपणानें ढवळाढवळ करणें, किं० ढवळाढवळ करून तें विघडविणें.

४९८. लावालावी करणें--इकडच्या चाहाड्या तिकडे, आणि तिकडच्या इकडे, सांगून दोन माणसांत भांडण, किं० वैमनस्य, उत्पन्न करून देणें.

४९९. लाही होऊन जाणें--संतापणें. " अंगाची लाही होणें, " असाही प्रयोग " संतापणें, " ह्या अर्थानें होतो.

५००. लेंड्या टाकणें--घाबरणें.

५०१. एकाद्याचें वकीलपत्र घेणें—त्याच्यावद्दल वोलावयाचा, किं० त्याची वाजू खरी म्हणून सिद्ध करावयाचा, पथकर घेणें.

५०२. वचपा काढणें—एका कामांत जें कांहीं कमी जास्ती झालें असेल, तें दुसऱ्या कामांत सुधारून घेणें; नुकसान भरून काढणें.

५०३. वज्रलेप होणें--कायम टिकणारा होणें; उ० लहानपणीं मुलांस केलेला उपदेश वज्रलेप होतो.

५०४. वडाची साल पिंपळाला लावणें--नसता संबंध जोडणें; अतिशयोक्ति करणें.

५०५. वड्याचें तेल वांग्यावर काढणें--एकावरचा राग दुसऱ्यावर काढणें.

५०६. वणवण करीत हिंडणें--फार श्रम करीत हिंडणें; विशेष कारणावांचून हिंडण्याची दगदग करणें. [ संस्कृत-वनात् वनम्=एका रानांतून दुसऱ्या रानांत ].

५०७. एकाद्याला वनवास आणणें--त्याला सतावणें, गांजणें, किं० उपद्रविणें; उ० या पोरांनीं मला वनवास आणिला आहे !

५०८. वयांत येणें--

(क) तारुण्याचे भरांत येणें.

(ख) वालपण जाऊन संसाराची जवाबदारी वहावयाला योग्य अशा वयाचें होणें.

(ग) कायद्याचें दृष्टीनें मुलगा २० व्या वर्षी, आणि मुलगी १८ व्या

वर्षी वयांत येते; म्हणजे ह्या वयानंतर त्यांच्याकडून जे अपराध होतील, त्यांना सवलतीची सजा देण्यांत येत नाहीं.

५०९. **वरवंटा फिरविणें**--पाट्यावर पदार्थ ठेवून त्याच्यावर वरवंटा फिरविल्यानें त्या पदार्थाचा चुराडा होतो; "एकाद्या वस्तूवर वरवंटा फिरविणें," म्हणजे तिचा विध्वंस करणें, किं० तिची पायमल्ली करणें.

५१०. **वरचष्मा करणें**, किं० **होणें**--वरचष्मा=वरचढपणा, मोठेपणा, श्रेष्ठपणा."वरचष्मा मिळविणें,"किं० "वरचष्मा करणें,"म्ह० श्रेष्ठ होणें, किं० ठरणें. "एकाद्याचा वरचष्मा होणें," म्ह० तो श्रेष्ठ ठरणें.

५११. **वांकुल्या दाखविणें**--तोंडें वांकडींतिकडीं करणें; वेडावणें; थट्टा मस्करी करणें; तुच्छता दर्शविणें. उ०

स्वानंदें खेळती । वांकुल्या दाविती । स्वर्गींचे देव टाकिती ।
उच्छिष्ट ज्यांचें ॥ जयराम स्वामी.

दिवसांत वांकुल्या शत दावित होतेंच नंदनवसतितें ॥
मोरोपंत.

## ५१२. वाचा.

१. ( क ) भाषण, बोलणें. उ० माझी वाचा कधीं असत्य नसते.
( ख ) भाषण करण्याचें इंद्रिय, किं० सामर्थ्य. उ० देवानें मानवी प्राण्यांस मात्र वाचा दिली आहे, पशूंस दिली नाहीं.
( ग ) आकाशवाणी.

२. **वाचा नरकांत घालविणें**—खोटें बोलणें. दिलेलें वचन न पाळणें.

३. **वाचा फुटणें**—बोलण्याची शक्ति येणें. उ० हा मुलगा अशक्त आहे. तो दोन वर्षांचा झाला असून त्याला अद्यापि वाचा फुटली नाहीं. उ० आमच्या पोपटाला थोडथोडी वाचा फुटूं लागली आहे. उ० अशा संकट्याच्या वेळीं कोणास तरी वाचा फुटो! ( म्ह० तो माझी तरफदारी करूं लागो ).

४. **वाचा बसणें**--बोलण्याची शक्ति नाहींशी होणें. उ० काय हकीकत झाली असेल ती सांगत कां नाहींस? तुझी वाचा कशानें बसली?

५. **वाचा विटाळणें**—खोटें बोलणें. भलत्याच माणसाची प्रार्थना, किं० याचना, करणें. उ० खोटें बोलून उगीच वाचा विटाळतोस कशाला ? उ० मी तुझ्याबद्दल कोणापाशींही रदबदली करून वाचा विटाळणार नाहीं !

५१३. **वाचाळपंचविशी लावणें**—गलागला बोलणें. नीरस भाषण करीत सुटणें.

५१४. **वाच्यता करणें**—परिस्फुटता करणें. गुप्त ठेवण्याच्या गोष्टीचा बोभाटा करणें.

## ५१५. वाट.

१. (क) रस्ता, मार्ग. उ० खडकीला कोणच्या वाटेनें जावें बरें ?

(ख) लाक्षणिक अर्थानें:—वर्तनक्रम. पद्धति. परिपाठी. उ० काशीनाथपंतानें अन्यायाच्या वाटेनें पैसे मिळविले.

(ग) परिणाम, गति, निकाल, शेवट. उ० मी पाटलाकडे फिर्याद दिली आहे. तिची काय वाट होते ती पाहावी !

(घ) तऱ्हा. प्रकार. रीति.

(ङ) बेंबीच्या खालीं पोटांत वाटीच्या आकाराचा उंचवटा असतो तो. जड ओझें उचलल्यानें ही वाट सरून, (म्ह० स्थानभ्रष्ट होऊन), पोट दुखूं लागतें, किं० अन्य तऱ्हेनें उपद्रव होतो.

२. **तिघांच्या तीन वाटा करणें, किं० चौघांच्या चार वाटा करणें**—त्यांची दाणादाण, फाटाफूट, करणें; त्यांच्यांतील ऐक्याचा भंग करणें. उ०

केला तुवां देखत भर्तृघात, क्षणें तिवाटा रचिल्या तिघांत ।

वामन-भरतभाव.

३. **चार वाटा, किं० दहा वाटा, किं० बारा वाटा, मोकळ्या**—विस्तीर्ण जगांत हिंडावयाची परवानगी. उ० माझ्या सांगण्याप्रमाणें तूं चालत नाहीस, मग माझ्या घरीं तरी कशाला राहातोस ? येथून निघून जाईनास ! तुला दहा वाटा मोकळ्या आहेत !

४. **ह्याला तिवाटांची माती येत नाहीं,** किं० **समजत नाहीं**—तो अत्यंत अडाणी आहे.

५. **देखली वाट पाहाणें,** किं० **करणें**—ज्या वाटेनें कोणी आला असेल, त्याच वाटेनें त्याणें परत जाणें. तो जसा आला तसा जाणें.

६. **मधल्या वाटेस येणें**—इष्ट वस्तु न मिळवितां येणें. [ " जाणें, " " नेणें, " किं० " आणणें, " हीं ही क्रियापदें योजण्यांत येतात. ]

७. **वाट करणें**—

(क) रस्ता करणें. उ० सतरंजीचा कोपरा दुमडून मला वाट करून दे.

(ख) (लाक्षणिक अर्थानें), वर्तनक्रम ठरविणें, किं० दाखवून देणें. व्यवस्था, मांडणी, वगैरे करणें.

(ग) नाहींसा करणें. दूर करणें.

८. **एकाद्याची वाट धरणें**—त्याच्या गतीला प्रतिबंध करणें.

९. **वाट पाहणें**—अपेक्षिणें. उ० मी तुझी केव्हांची वाट पाहातों आहें तरी ? तुला पक्का एक तास उशीर लागला !

१०. **वाट मारणें**—रस्त्यांत लपून बसून मुशाफरांस लुटणें. उ०

रांडा, पोरें त्याचीं, झालें मोठकुटुंब खायास ।
वाटा पाडुनि मिळवी धन तेंव्हां उदरपूर्ति व्हायास ॥

११. **वाट लागणें**—

(क) दूर होणें. नष्ट होणें.

(ख) विल्हेस लागणें; निकालांत निघणें.

(ग) समाप्त होणें. शिल्लक न राहाणें.

१२. **वाट वाचरणें**—निरर्थक खेप घालणें; व्यर्थ हेलपाटा घालणें.

१३. **वाट वाहणें**—वाटेवर रहदारी असणें. मुशाफरांनीं, किं० प्रवाशांनीं, वाट गजबजलेली असणें. उ० आळंदीला जातांना तुला सोबतीची कांहीं जरूर नाहीं. रात्रंदिवस ती वाट वाहत असते !

१४. **वाट होणें**—गत होणें, परिणाम होणें. उ० माझ्याजवळ एक सुंदर कुलूप होतें, तें आतां कोठें दिसेनासें झालें आहे. त्याची काय वाट झाली कोण जाणें ?

१५. **वाटेवर येणें**—योग्य पद्धतीप्रमाणें, किं० समंजसपणानें, बोलूं, किं० वागूं लागणें. ताळ्यावर, योग्य मार्गावर, येणें.

१६. **एकाद्याच्या वाटेस जाणें**—त्याची खोडी करणें. त्याला राग आणणें, किं० त्याला चिडवणें. त्याची कुरापत काढणें. उ० माझ्या वाटेस कोणी जाऊं नका; गेला तर एकेकाची ऐशी हड्डी नरम करीन कीं ज्याचें नांव तें !

> कां दांत घेसि भंगुनि ? जाऊं माझ्या नकोच वाटेस !
>
> सौ० स० भि०.

१७. **वाटेस लावणें**—

(क) हाकलून देणें, निरोप देणें. उ० मी भिकाऱ्यांना फक्त आदित्यवारीं भिक्षा वाटतों, आणि इतर दिवशीं जे भिकारी येतील त्यांना " आदित्यवारीं या, " असें सांगून वाटेस लावतों.

(ख) योग्य मार्गास, किं० क्रमास, लावणें—उ० माझ्या तिन्ही मुलांसाठीं नोकऱ्या मिळवून देऊन मीं त्यांना वाटेस लावलें.

१८. **वाटेवर पडणें**—अल्प श्रमानें, किं० मुळींच श्रम न करतां, प्राप्त, किं० साध्य, होण्याजोगें असणें. उ० नोकऱ्या काय वाटेवर पडल्या आहेत ? त्यांच्यासाठीं किती खेटे घालावे लागतात !

१९. **वाट लावणें**—

(क) आपल्या वाटेंतून काढून टाकणें. उ० माझ्या अंगावर दोन चोर आले होते, त्यांची मी हां हां म्हणतां वाट लावली !

(ख) विल्हेवाट करणें. उ० दहा प्रकरणांची मीं तीन तासांत वाट लाविली.

(ग) खाऊन टाकणें. मोडून, तोडून टाकणें. उ० त्याणें एकट्यानें अर्धाशेर पोर्यांची वाट लावली. उ० माझ्या मुलांच्या हातीं ह्या जिनगरी बाहुल्या दिल्या, कीं तीं तीन दिवसांच्या आंत त्यांची वाट लावील !

५९६. **एकाद्याला वाटाण्याच्या अक्षता लावणें**—त्याची विनंति अमान्य करणें; त्याला नकारात्मक उत्तर देणें; त्याला निराश करणें. [वाटाणे गरगरीत वाटोळे असल्याकारणानें ते कपाळास लाविल्याबरोबर खालीं गळून पडतात. तेव्हां ही अक्षत लावून न लावून सारखीच ! कशा-

ळास ओलें कुंकूं लावून त्यावर तांदूळ चिकटावतात, ह्या विधीला " अक्षत लावणें, " असें म्हणतात. ]

५१७. **वाटोळें होणें**, किं० **करणें**—सर्वस्वीं नाश होणें, किं० करणें.

## ५१८. वारा.

१. वायु-

२. **वाजता वारा लागूं न देणें**--कोणत्याही प्रकारचा त्रास, किं० उपद्रव, सोसावयास सिद्ध नसणें, व त्याचा प्रतीकार करावयास तत्पर असणें. उ० त्याची सर कोणाला येणार आहे? तो वाजता वाराही लागूं देत नाहीं!

३. **एकाद्याचा वारा न घेणें**, किं० **न पडूं देणें**--त्याच्या संसर्गास न राहाणें. त्याच्यापासून दूर, किं० अलिप्त, राहाणें. उ० तूं दुर्गुणी माणसांचा वारा सुद्धां घेत जाऊं नकोस!

४. **वारा पडणें**--वारा वहावयाचा बंद होणें, किं० खळणें.

५. **वारा पिणें**—उदासीन, खिन्न, होणें.

६. **वारा वाहील तशी पाठ देणें**--परिस्थिति बदलेल, तिच्याप्रमाणें, किं० तिला अनुसरून, आपल्या ठायीं बदल करणें.

७. **वाऱ्याची मोट बांधणें**—जगांतील सारा वारा गोळा करून त्याचा एक गठ्ठा बांधणें. कोणी एकादें दुर्घट काम करावयास प्रवृत्त झाला म्हणजे म्हणतात, " तूं पथकरलेलें काम वाऱ्याची मोट बांधण्याप्रमाणेंच होय! "

८. **वाऱ्याशीं भांडणें**--भांडावयाला विशेषसें, किं० महत्त्वाचें, कारण नसतां भांडत सुटणें. [ भांडण्याला दोन पक्ष लागतात. भांडणाची इच्छा प्रबळ झाली, म्हणजे भांडखोर माणूस वारा हा दुसरा पक्ष धरून " तूं अमुक दिशेनें कां वाहतोस? तमुक दिशेनें कां वाहत नाहींस?" म्हणून त्याच्याशीं भांडत सुटतो. भांडखोर माणसाविषयीं हें अत्युक्तिगर्भ वर्णन आहे. ]

९. **एकाद्याच्या वाऱ्यास उभें न राहणें**—त्याच्याशीं यत्किंचित् संबंध न ठेवणें. उ० तूं त्या सद्याच्या वाऱ्यासही उभा राहात जाऊं नको! नाहीं तर त्याचे दुर्गुण तुला लागतील!

## ५१९. वारें.

१. ( क ) वारा. वायु.

( ख ) एकाद्या विशिष्ट ठिकाणाहून वाहात आल्यामुळें तेथील गुणांनीं युक्त असा जो वायु तो, किं० त्या गुणांचा समुदाय. उ० पटकीचें वारें. उ० पडशाचें वारें. उ० संपत्तीचें, किं० अधिकाराचें, वारें; ( म्ह० संपत्ति, किं० अधिकार, प्राप्त झाल्यामुळें अंगीं येणारे दुर्गुण. )

( ग ) गुणविशेषांची द्योतक अशी जी चेहेऱ्याची घडण ती. उ० त्याच्या तोंडावर कारकुनीचें वारें दिसतें आहे.

( घ ) एकादी गोष्ट करण्याकडे प्रसंगविशेषापुरता झालेला जो कल तो. उ० गोपाळाच्या अंगांत आतां वागडण्याचें वारें आलें आहेसें दिसतें !

( ङ ) सामर्थ्य. उत्साह. रग. उ० तारुण्याचें वारें.

( च ) आविर्भाव. देखावा. उ० चोरांच्यापुढें त्याणें पहिलवानगिरीचें वारें अंगीं आणण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला.

२. **अंगावरून वारें जाणें**—शरीरांतील कांहीं बिघाडामुळें तो विशिष्ट भाग, किं० अवयव लुला पडणें. उ० कमळाबाईच्या डाव्या अंगावरून वारें गेलें आहे. उ० चिंतूच्या हातावरून वारें गेलें आहे.

३. **वारें फिरणें**—अगदीं उलट प्रकारची वर्तणूक होणें. वस्तुस्थितींत विपर्यास, म्ह० बदल होणें. उ० गोंद्याला नोकरी लागल्यापासून सखूबाईचें वारें फिरलें; ( म्ह० तिची पूर्वीची साधेपणाची वर्तणूक पालटली ).

४. **वारें लागणें**—संसर्ग होणें. संगति लागणें. संबंध घडणें. उ० नारा- कास हा मुलगा सांगितलेलें काम ऐकत असे, पण पुण्याला आल्यापासून तो ऐकेनासा झाला आहे. त्याला पुण्याचें वारें लागलें खास !

५२०. **एकाद्याला वाळींत घालणें, किं० टाकणें**—त्याला बहिष्कार घालणें, किं० जातीच्या बाहेर टाकणें.

५२१. **वाहत्या गंगेंत हात धुऊन घ्यावे**—अनुकूल परिस्थिति जमून आल्यामुळें जर आपलें काम सहजगत्या होण्याजोगें असेल, तर तें ताब- उतोब, किं० अवश्य, करून टाकावें.

५२२. **वाहिली ती गंगा, राहिलें तें तीर्थ**--पाणी वाहून गेलें, तर ती गंगा किंवा पवित्र नदी होते, व पाणी तेथेंच सांचून राहिलें, तर त्याला "तीर्थ," म्ह० पवित्र पाण्याचा संचय, हें नांव प्राप्त होतें. सारांश, पाणी कोणत्याही स्थितींत असलें, तरी पवित्रच ! त्याप्रमाणें पैसा धर्मकृत्यांत खर्चिला तर पुण्य लागतें, आणि तो शिलकीस टाकला, तरी तो आपल्या अडचणींच्या वेळीं कामास येण्याजोगा असतो. सारांश, पैसा हा सर्व प्रकारें उपयोगी, किं० मूल्यवान्, आहे.

५२३. **विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणें**—आपल्या मागें कांहीं तरी उपद्व्याप, किं० लचांड, लावून घेऊन त्रास भोगीत बसणें. [ मृत माणसाची क्रिया, किं० श्राद्ध, करावयास पुत्र, किं० दुसरा कोणी नातलग, नसल्यास कोणातरी इसमास पैसे देऊन त्याचेकडून तो विधि करवितात. ह्या वेळेपुरता तो मृताचा पुत्र होतो. त्याला सव्यापसव्याची दगदग करावी लागते. परंतु कोणी मनुष्याचे आईबाप जिवंत असले, आणि दुसऱ्या कोणाबद्दल क्रियादिविधीनें सव्यापसव्य करण्याची संधि त्याला न मिळाली, तर तो मनुष्य आपल्या पदरचे पैसे दुसऱ्यास देऊन त्याच्या मृत नातलगाची क्रिया करून सव्यापसव्य करण्याची संधी मिळवितो. भिकार हौसांच्या आधीन होणाऱ्या माणसाच्या ह्या हास्यास्पद वर्तनावरून वरील शब्दसंहति प्रचारांत आली. ]

५२४. **एकाद्या कामाचा विडा उचलणें**—तें करण्याची प्रतिज्ञा भोगणें. उ० मुलांनीं दुपारीं धिंगामस्ती करून माझी झोंप मोडण्याचा जणूं काय विडाच उचलिला होता !

५२५. **पैजेचा विडा उचलणें**—एकादें दुर्घट कार्य करावयाचें असतां मंडळींचा जमाव करून त्यांच्यापुढें तबकांत एक विडा मांडावयाची पूर्वी चाल असे. जो कोणी तें कार्य करील, त्याला अमुक बक्षीस दिलें जाईल, असें त्यावेळीं जाहीर केलें जात असे. तें कार्य करावयाची ज्याची धमक असे, तो "तें कार्य मी पथकरतों," अशी सर्वांसमक्ष प्रतिज्ञा भोगून विडा उचलीत असे, त्यालाच "पैजेचा विडा" म्हणत.

५२६. **विधिनिषेध नसणें**—करावसास योग्य काय, आणि अयोग्य काय, ह्यासंबंधाचा तिळमात्र विचार नसणें. उ० तो महाराच्या हातचें देखील पाणी पिईल ! त्याला कसलाच विधिनिषेध नाहीं ! [ विधि=अमुक गोष्ट करावी असा नियम. निषेध=अमुक न करावें असा प्रतिबंध. ]

## ५२७. विभु.

१. ( क ) एकाद्याला गोत्यांत आणण्यासाठीं केलेली मसलत. उ० माझी नोकरी जावी, म्हणून गोंद्यानें मोठा विभु रचला होता, पण सुदैवानें तो ढासळला.
( ख ) मनोरथ. आरंभिलेलें मोठें कार्य. बेत.

२. **एकाद्याचा व्यूह ढासळून टाकणें**—त्यानें आरंभिलेल्या कृत्यांत विघ्न आणणें. व्यूह म्ह० बेत, किं० आरंभिलेलें मोठें कार्य.

५२८. **विरजण घालणें**—सामर्थ्य, सुखप्रदता, उल्हास, उत्साह, कमी करणें. [ दुधाचें दहीं करण्यासाठीं त्यांत जें ताक घालतात, त्याला " विरजण " म्हणतात. हें विरजण घातल्यानें त्या दुधाची मधुरता नाहींशी होते. यावरून " एकाद्यानें आरंभलेल्या कृत्यावर विरजण घालणें, " म्हणजे त्याचें सामर्थ्य, उत्साह, उल्हास, वगैरे कमी करणें, अर्थात् त्याला खचविणें. ] " विरजण पडणें," म्ह० एकाद्याचा उल्हास, किं० उत्साह, कमी होणें.

५२९. **एकादी गोष्ट बिल्हेस लावणें, किं० तिची विल्हेवाट लावणें**—ती निकालांत काढणें; तिचा निकाल करून टाकणें.

५३०. **विळा मोडून खिळा करणें**—विळा घडविण्याला श्रम ज्यास्ती पडतात, आणि खिळा घडविण्याला श्रम कमी पडतात. विळा मोडून-त्या लोखंडाचा जर कोणी माणूस खिळा घडवूं लागला, तर विळा घडविण्याला जे श्रम पूर्वी झालेले आहेत, ते तो फुकट घालवितो असें होतें, आणि शिवाय त्याच्या पदरांत खिळ्यासारखी कमी किंमतीची आणि कमी कौशल्याची वस्तु पडते. यावरून " विळा मोडून खिळा करणें," म्ह० यत्किंचित् लाभासाठीं फार मोठें नुकसान करून घेणें.

५३१. **विळ्या भोपळ्याइतकें वैर**—विळा आणि भोपळा यांच्यांत शत्रुत्वाचा संबंध आहे; कारण विळ्यानें भोपळा चिरतात. यावरून "त्या

दोघांचें विळ्याभोपळ्या इतकें उजू आहे," म्हणजे ते दोघे एकमेकांचे हाडवैरी आहेत. उजू, म्ह० मैत्री, आणि लक्षणेनें, शत्रुत्व.

५३२. **वीट येणें**—कंटाळा, किळस, येणें.

## ५३३. वेड.

१. मेंदूमध्यें कांहीं विघाड झाल्यामुळें उत्पन्न होणारा आजार.

२. **वेड घेऊन पेडगांवास जाणें**—वेड्याचें सोंग घेऊन आपला मतलब साधावयास झटणें.

३. **वेड पांघरणें**—वेड्याचें सोंग घेणें. मुद्दाम वेड्यासारखें वर्तन करणें.

४. **वेड भरणें**—वेड लागणें. "एकाद्या वस्तूचें वेड लागणें" म्ह० तिचा नाद लागणें. तीच वस्तु ध्यानींमनीं घोळत राहाणें. उ० आलीकडे त्याला किमयाचें वेड लागलें आहे.

५३४. **वेळ मारून नेणें**—प्रसंगीं कमीपणा दिसूं न देणें. युक्तिप्रयुक्तींनीं प्रसंग साजरा करणें.

## ५३५. शंख.

१. ( क ) समुद्रांत राहाणारा एक प्राणी.

( ख ) त्या प्राण्याचें घर ( ज्यांत तो राहातो). देवावर पाणी घालण्याकडे, किं० युद्धांत रणवाद्य म्हणून वाजविण्याकडे, व अन्य प्रसंगीं, त्याचा उपयोग होतो.

( ग ) बोटांवर ज्या शंखाकृति रेषा असतात त्या.

( घ ) मूर्ख, अडाणी, माणूस.

( ङ ) नवनिधींपैकीं एक निधि.

( च ) गालाचें हाड.

( छ ) एक संख्या.

( ज ) अभाव, शून्य. उ० ज्ञानाच्या नांवानें शंख! म्ह० मूर्ख, अडाणी. उ० बुद्धीच्या नावानें शंख, म्ह० बुद्धिहीन.

२. **शंख करणें**—बोंबलणें. ओरडणें. विलाप करणें. रडणें. ( दुःख, वेदना, वगैरेंचा अतिरेक होऊन तीं असह्य झाली म्हणजे मनुष्य बोंबलतो. ) उ०

एवं वदोनि वंदुनि घालुनि कुलगुरु रणांगणीं उजवा ।
सात्यकि लिघे म्हणे कुरुभट हो ! हूं शंख करुनि मुख सुजवा !
मोरो० द्रोण० अ० ११. आ० ३५.

३. **शंख वाजणें**—संपणें. न उरणें. पराभूत होणें. उ० आजमासापेक्षां ज्यास्ती पानें झालीं, त्यामुळें लाडवांचा शंख वाजला ! उ० म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेला चिंतामणरावांचा पुतण्या बसला होता, त्याचा शंख वाजला ! ( म्ह० तो नापास झाला.) "बंब वाजणें," ह्याचाही हाच अर्थ होतो.

४. **एकाद्याच्या नांवानें शंख करणें**—त्याच्या नांवानें ओरडणें. त्याचें नांव घेऊन त्याला मोठमोठ्यानें हाका मारणें, किं० त्याला शिव्या देणें, किं० त्याची निंदा करणें. उ० मी जें स्पष्टीकरण देतों आहे, त्याचेकडे तुझें लक्ष्य असूं दे ! नाहीं तर तूं परीक्षेत नापास होऊन माझ्या नांवानें शंख करशील !

५. **शंखासारखें**—स्वच्छ, निर्मळ. उ० ह्या टांक्याचें पाणी शंखासारखें आहे !

५३६. **शतपावली करणें**—भोजनानंतर अन्न चांगलें जिरण्याच्या मार्गास लागावें, यासाठीं घरांतल्या घरांत थोड्याशा फेऱ्या घालणें; [ शत=शंभर. "शतपावली करणें," ह्याचा शब्दशः अर्थ शंभर पावलें चालणें. ]

## ५३७. शब्द.

१. ( क ) कोणत्याही प्रकारचा ध्वनि. उ० पोपटाचा, गायीचा, वाघाचा, शब्द. चालतांना पावलांचा शब्द, (म्ह० आवाज.)

( ख ) एकाद्या वस्तूचा, कल्पनेचा, दर्शक, किं० व्यंजक, जो अक्षरसमूह तो. उ० व्याकरणांत शब्दांविषयीं विचार केलेला असतो.

( ग ) दोष. [ क्रियापदें, "येणें," "लावणें," "ठेवणें." ]

( घ ) आज्ञा. हुकूम.

२. **एकाद्याचा शब्द खालीं न पडूं देणें**—त्याच्या बोलण्यास उत्तर देणें. त्याच्या उत्तरास प्रत्युत्तर देणें. वादविवादांत, किं० भांडणांत, माघार न घेणें.

३. **शब्द खालीं पाडणें**—दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणें न करणें. त्याच्या शब्दाला किंमत न देणें. त्याचा आग्रह, किं० भीड, अमान्य करणें.

४. **शब्द झेलणें**—ज्याची सेवा, चाकरी, शुश्रूषा, खुशामत, वगैरे करावयाची असेल, त्याच्या तोंडून आज्ञा निघतांच तिच्याप्रमाणें करणें. आज्ञा झाल्याबरोबर ती बजावण्यास सरसावणें. उ० समर्थांचा शब्द झेलावयास सारीं माणसें तत्पर असतात. त्यांचे उणें कशानें पडणार ?

५. **शब्द ठेवणें,किं० लावणें**—दोष देणें. ठपका ठेवणें. उ०

एवं च चांद्रमानें, तेराही स्पष्ट सारिले अब्द ।
सत्यप्रतिज्ञ पांडव, लागों देती न आपणां शब्द ॥

मोरोपंत–उत्तरगोग्रहण.

५३८. **एकाद्याचीं शंभर वर्षें भरणें**—त्याचा मरणकाल येऊन ठेपणें. तो मरणें. उ० माझ्या वाटेस गेलास तर तुझीं शंभर वर्षें भरलीं असें समज! (म्ह० मी तुझें पारिपत्य करीन!) [ मनुष्याची आयुर्मर्यादा शंभर वर्षांची असें समजलें जातें. ]

५३९. **एकाद्याला शरण जाणें**—त्याचें वर्चस्व कबूल करून त्याची दया भाकणें; त्याची क्षमा मागणें. उ०

या लागीं तूं अर्पी सीता । शरण जाईं अयोध्यानाथा ।
लंकानिजराज्यीं स्वस्थता । तरीच तूंतें होइल ॥

एकनाथ—रामायण.

५४०. **शह देणें**—जेथून प्रतिपक्ष्यावर हावें तेव्हां तुटून पडतां येईल, अशा ठिकाणीं बसून त्याला भीति दाखविणें. [ प्रतिपक्ष्याच्या राजावर आपल्या मोहऱ्याची उडी पडेल, अशा ठिकाणीं आपलें मोहोरें आणून बसविलें असतां प्रतिपक्ष्याच्या राजाला "शह दिला," असा बुद्धिबळांच्या खेळांतील पारिभाषिक शब्द आहे. ]

५४१. **शहानिशा करणें**—चौकशी करणें. भवति न भवति करणें. एकाद्या गोष्टीची संदिग्धता नाहींशी करण्याचा प्रयत्न करणें.

५४२. **शास्त्रार्थ करणें**—थोडेंसेंच करणें. नांवाला करणें. केलें असें म्हणावयाला जितकें थोडें चालेल, तितकें थोडें करणें. उ० आम्ही गरीब

माणसें. आम्हां शास्त्राला तूप घेतों ! ( म्ह० अगदीं थोडें घेतों ! )
[ धर्मासाठीं, किं० शास्त्रासाठीं, जें करणें तें थोडें असतें. ]

५४३. **शिखरास हात पोंचणें**—मनोरथ पुरतेपणीं सफल होणें. मनाची महत्त्वाकांक्षा तृप्त होणें.

५४४. **शितावरून भाताची परीक्षा करणें**—वस्तूच्या लहानशा भागावरून त्या सर्व वस्तूची परीक्षा करणें.

५४५. **शितोडा टाकणें, किं० उडविणें**—थोडासा कलंक लावणें. थोडासा दोष देणें. जातां जातां एकाद्याविषयीं लहानसें कुत्सित विधान करणें.

५४६. **शिष्टाई करणें**—दोन पक्षांतील भांडण मिटविण्याच्या उद्देशानें एका पक्षाच्या तर्फेनें दुसऱ्या पक्षास चार बोधाच्या गोष्टी सांगणें. मध्यस्थी करणें. उ० अंगदशिष्टाई, कृष्णशिष्टाई, वगैरे.

५४७. **शुक होणें, किं० शुकशुकाट होणें**—जिकडे तिकडे स्तब्धता, किं० शांतता, होणें.

## ५४८. शेण.

१. गायी, म्हशी, वगैरे जनावरांची विष्ठा.

२. **शेण खाणें**—न करावी ती गोष्ट करणें, किं० न बोलावी ती गोष्ट बोलणें. भलतीच गोष्ट करणें, किं० बोलणें. करावयाचें, किं० बोलावयाचें, तें न करणें, किं० न बोलणें.

३. **शेणाचा दिवा लावणें. किं० लागणें,**—दिवाळें काढणें, किं० निघणें. उ० मोतीचंदानें शेणाचा दिवा लावला. आतां तूं हजार रुपयांला ठार बुडालास !

५४९. **शेतास शेंडी फुटणें**—शेतांच्या वार्ता, किं० कलमें, वाढणें.

## ५५०. शोभा.

१. **शोभा**—तेज, संमान. लाक्षणिक अर्थानें:—फजीती, बेआबरू, खरडपट्टी, अपमान.

२. **एकाद्याची शोभा करणें**—त्याची फजीती करणें. त्याची बेआबरू करणें.

३. **शोभा होणें**—फजीती होणें.

५५१. **संगनमत करणें**--आपला कांहीं हेतु साधण्यासाठीं, किं० एकाद्या पक्षाला बळकटी आणण्यासाठीं, दोन, किं० अधिक, माणसांनीं अगदीं एकसारखीं विधानें करणें, किं० एकाच धोरणानें वागणें. उ० भोळ्या ब्राह्मणाला फसविण्यासाठीं तीन धूर्तांनीं संगनमत केलें.

## ५५२. सत्त्व.

१. ( क ) मायेचे जे तीन गुण त्यांतील पहिला. ह्या गुणाच्या उत्कर्षानें शांति, क्षमा, दया, इत्यादि गुणांची वृद्धि होते.

( ख ) अस्तित्व.

( ग ) पदार्थांचा कस, म्हणजे सारभूत अंश. उ० गुळवेलीचें सत्त्व तापावर देतात.

( घ ) ज्या गुणावरून एकाद्या माणसाची प्रसिद्धि झालेली असते, तो त्याच्या अंगचा गुण. उ० हरिश्चंद्रानें अनेक दुःखें सोशिलीं, पण सत्त्व सोडिलें नाहीं!

२. **एकाद्याचे सत्त्व घेणें**, किं० **हरण करणें**--त्याचा बाणा, किं० अभिमान, सोडून द्यावयाला त्याला भाग पाडणें. उ० रुगुणाबाई उसनें पदार्थ फार फार मागते, जणों काय लोकांचें सत्त्व हरण करावयाचा तिणें विडाच उचलिला आहे!

३. **सत्त्वास जागणें**--सत्त्व राखणें. अडचणीच्या प्रसंगींही सत्त्व न सोडणें.

४. **सत्त्व पाहणें**--परीक्षा पाहणें. परीक्षेंत कितपत टिकतो हें पाहणें. उ० विश्वामित्रानें हरिश्चंद्राचें सत्त्व पाहण्याचा भारी खटाटोप केला.

५५३. **संपुष्टांत येणें**--आकारमान आकुंचित होणें; विस्तार कमी होणें. उ० आमच्या सभेंतील सभासदांची संख्या अगदीं संपुष्टांत आली आहे!

## ५५४. समाचार.

१. **समाचार**--हकीगत. वृत्तांत. एकाद्याच्या हालहवालीची खबर, किं० वातमी. उ० आलीकडे दोन महिन्यांत आपला समाचार कळला नाहीं, म्हणून आम्हांला फार काळजी लागली आहे.

२. एकाद्याचा समाचार घेणें--

(क) त्याची तब्येत कशी काय आहे वगैरे संबंधाची विचारपूस करणें. उ० रामभाऊ आजारी आहेत असें मला कळतांच मी त्यांचा समाचार घ्यावयास गेलों. उ०

धौम्यापासुनि गोपापर्यंत जिणें स्वयें समाचार- ।
घ्याया, त्रितापहर श्रीगंगेचा जिवा समाचार ॥

मोरोपंत.

५५५. समीकरण बसविणें--दोन गोष्टींची एकता, किं० एकवाक्यता, आहे, असें ठरविणें. [ "समीकरण" हा बीजगणितांतील पारिभाषिक शब्द आहे. यांत दोन पदसंहतींची तुल्यता सांगितलेली असते; जसें, $(क+ख)\times(क-ख)=क^2-ख^2$ ].

५५६. समुद्रांत सुई शोधणें--अशक्य गोष्ट करावयाला प्रवृत्त होणें.

५५७. सर.

१. बरोबरी; तुल्यता.

२. सर येणें--योग्यता प्राप्त होणें. बरोबरीची किंमत पावणें. उ०

माझी न पाविजे त्वां, मत्ताताची तुझ्या न सरि तातें, ।
जें जन्हुकन्यकेचें भाग्य न पावेल अल्प सरिता तें ॥

मोरोपंत.

३. सर पावणें, किं० पवणें--बरोबरीचा होणें, किंवा ठरणें. उ०

गुरुसे म्हणाल जरी । देव न पवती सरी ।
ब्रम्हा वंदितो शिरीं । चरणधूळी ॥

जयराम स्वामी.

५५८. सर करणें--काबीज करणें. जिंकून घेणें. उ० शिवाजीनें तोरणा किल्ला इ० स० १६४६ मध्यें सर केला.

५५९. साखर पसरणें, किं० पेरणें--गोड गोड बोलून एकाद्याचें मन वश करणें. उ० रामभाऊ भेटला, म्हणजे साखर पसरतो मात्र. परंतु मला विश्वासाला जागा कांहीं देत नाहीं!

५६०. सांगड घालणें--संबंध जोडून देणें; मेळ घालणें. उ० राना आणि

विनायक हे दोघे एकाच इयत्तेंत आहेत. त्या दोघांची सांगड घालून द्या. म्हणजे हा त्याला गणितांत मदत करील, आणि तो ह्याला व्याकरणांत मदत करील. तेणेंकरून दोघांचाही फायदा होईल.

५६१. **मुलगी सांगून येणें**—मुलीच्या बापानें, किं० नातलगानें, "आमची मुलगी स्वीकारा," अशी मुलास, किं० मुलाच्या तर्फेच्या कोणा माणसास, विनंती करणें. उ० आमच्या मुलाला पुष्कळ मुली सांगून आल्या, पण त्या परगांवच्या असल्यामुळें आम्ही त्या नाकारल्या.

५६२. **साठी उलटणें**—म्हातारपण येणें. [ साठाव्या वर्षापासून मनुष्याच्या शक्तीचा ऱ्हास होऊं लागतो. ]

५६३. **सात पांच करणें**—एकदा एक बोलणें, आणि नंतर दुसरें बोलणें. ज्या बोलण्यांत ताळ मेळ नाहीं असें बोलणें. विसंगतपणाचें भाषण करणें.

५६४. **साता समुद्रांच्या पलीकडे ठेवणें**—फार जपून ठेवणें. साता समुद्रां पलीकडे=फार दूर. कोणास न दिसेल अशा ठिकाणीं, किं० अशा बंदोबस्तानें.

५६५. **साप साप म्हणून भुई धोपटणें**, किंवा **बडविणें**—खरोखर साप नसतां तो आहे अशी आपली खोटीच समजूत करून घेऊन, किं० खोटी सबब दाखवून, त्या काल्पित सापाला मारण्यासाठीं जमीन धोपटणें. यावरून ह्या शब्दसंहतीचा हा अर्थः—एकाद्यावर नसता दोष लादून त्याला शिक्षा करणें, किं० त्याच्या विरुद्ध ओरड करणें.

### ५६६. सूत.

१. **सूत**—कापूस, वगैरेंचा धागा, किं० दोरा.

२. **दोघांचें सूत असणें**—त्यांच्यांत निकट मैत्रीचा संबंध असणें.

३. **एकाद्याशीं सूत नसणें**—त्याच्याशीं मैत्रीचा संबंध नसणें. प्रथम मैत्री असून पुढें बिनसल्यास "पूर्वी सारखें सूत नाहीं," असें म्हणतात.

४. **एकाद्याच्या नाकीं सूत धरणें**—तो आतां मरतो कीं क्षणानें अशा स्थितींत असणें.

५. **सुतानें सूत लागणें**—एक गोष्ट शोधून काढल्यामुळें दुसरी सम-

जणें. थोडासा सुगावा लागून एकादी गुप्त गोष्ट क्रमानें आणि ओघानें समजत, किं० उकलत, जाणें.

६. **सुतास लागणें**--सुरळीतपणें चालूं लागणें. उ० माझ्या मुलाला मी मास्तर ठेविल्यापासून त्याचे अभ्यास सुतास लागले.

७. **सुतानें चंद्राला ओंवाळणें**--[पुढें "ओंवाळणें" क्रियापद पहा.]

८. **सुतानें स्वर्गास गांठणें**, किं० **जाणें**, किं० **चढणें**--यत्किंचित् सुगावा लागतांच सर्व वस्तूचें स्वरूप तर्कानें जाणणें.

५६७. **सूप फडफडणें**—विवाह वगैरे कार्य समाप्त होणें. [ विवाह, मुंज, वगैरे कार्य संपलें म्हणजे यजमान सूप फडफडवितो. मग कार्यासाठीं परगांवांहून आलेली मंडळी परत आपआपल्या घरीं जावयाला मोकळी होते. ]

५६८. **सुपारी देणें**--एकाद्या माणसाकडे आपण कांहीं काम विधिपूर्वक सोंपविलें म्हणजे त्याला सुपारी देण्याचा चाल आहे. सुपारी देण्यांत आली म्हणजे ठराव पक्का होऊन तो कोणत्याही पक्षाला मोडतां येत नाहीं. यावरून "एकाद्याला कांहीं एका कामाची सुपारी देणें," म्हणजे त्याचेकडे तें काम सर्वथैव सोंपविणें.

५६९. **सूं करणें**, **सूं बाल्या करणें**, किं० **सूं बाल्या हाकणें**, किं० **बाल्या हाकणें**-पळून जाणें.

५७०. **सूर्याचीं पिलें दाखविणें**--एकाद्याच्या कानशिलावर आपले तळहात जोरानें दाबून त्याला उंच उचलणें. उ० मुलांना सूर्याचीं पिलें दाखविणें हें फार वाईट आहे!

५७१. **सूर वाटणें**--संभवनीयता, शक्यता, असणें. रंग दिसणें. उ० मला नोकरी मिळण्याचा सूर वाटत नाहीं. उ० मुलाला हें स्थळ मिळेल असा सूर वाटत नाहीं.

५७२. **सोनारानें कान टोंचणें**--मुलाचे कान मुरक्यीं वगैरे दागिने घालण्यासाठीं टोंचावे लागतात. हे कान टोंचण्याचें काम घरचीं माणसें करूं लागलीं, तर मुलें रडून, ओरडून, गोंधळ करतात. पण सोनारापुढें

मुकाट्यानें बसून कान टोंचवून घेतात. यावरून वरील शब्दसंहतीचा अर्थ हा कीं, घरच्या माणसांनीं दिलेली ताकीद कोणाला रुचत नाहीं, पण तिऱ्हाइतानें दिलेली ताकीद मुकाट्यानें पाळली जाते.

५७३. १. **एकाद्याचें सोनें होणें**--मृत्यूमुळें त्याच्या हालअपेष्टा नाहींशा होणें.

२. **एकाद्या स्त्रीचें सोनें होणें**--वृद्ध पतीच्या अगोदर मरण आल्यामुळें तिची वैधव्यदशा चुकणें.

५७४. **एकाद्याच्या घरांत सोन्याचा धूर निघत असणें**--तो अतिशय श्रीमंत असणें.

५७५. **सोमवती घालणें**--सोमवारीं अमावास्या आली असतां तिला "सोमवती अमावास्या" म्हणतात. असा योग घडतो, त्या दिवशीं स्त्रिया ब्राम्हणांना १०८ फळांचें दान करतात. ह्या दानाला "सोमवती" म्हणतात, व ह्या कर्माला "सोमवती घालणें" म्हणतात. कोणी मनुष्य एकाद्या वस्तूची पुष्कळशी संख्या जुळवूं लागला असतां त्याची थट्टा करून म्हणतात "तुला ह्या वस्तूची सोमवती घालावयाची आहे काय?" उ० हीं इतकीं कुलपें कशाला घेतोस? तुला कुलपांची सोमवती का घालावयाची आहे?

५७६. **सोस करणें**—हावरेपणानें मिळविण्याची इच्छा करणें. अतिलोभ धरणें. उ० तूं खणांचा इतका सोस कशाला करतेस?

५७७. **सोक्ष मोक्ष होणें**—निकालास लागणें.

५७८. **एकाद्याचें स्तोम माजविणें**—त्याची फाजील प्रशंसा करणें. उ० गिरिधरराव मोठे वक्ते म्हणून लोकांनीं त्याचें फारच स्तोम माजविलें आहे! मला तर त्यांच्या भाषणांत वक्तृत्वाचा कांहीं विशेष गुण आढळत नाहीं. उ० स्वार्थसाधू लोक श्रीमंतांचें उगीच स्तोम माजवितात!

५७९. **स्वर्ग.**

१. देवांचें वसतिस्थान.

२. **स्वर्ग दोन बोटें उरणें**—गर्वानें अतिशय फुगून जाणें. उन्मत्त

होणें. यत्किंचित् वैभव प्राप्त झालें, म्हणजे हलक्या मनाचा माणूस गर्वानें फुगून जातो, तेव्हां त्याच्यासंबंधानें हा प्रयोग करतात. उ० कोयनाबाईच्या मुलाची मराठी सहाव्या इयत्तेची परीक्षा उतरली, आतां तिला स्वर्ग दोन बोटें उरला असें झालें आहे !

३. **स्वर्गास हात पोंचणें**—इच्छिलेलें जें अति उच्च पद, तें मिळणें. आतुरतेनें इच्छिलेली स्थिति प्राप्त होणें. पराधीनपणाच्या दशेंतून बाहेर पडणें. कृतकृत्य होणें.

४. **स्वर्गी ध्वज लावणें**—मोठें कृत्य करणें ( ह्यांत उपहासाचा अंश असतो ). " स्वर्गी " हा शब्द गाळल्यासही तोच अर्थ होतो.

५. **आपण मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाहीं**—आपण स्वता कष्ट केल्याशिवाय, किं० तसदी भोगल्याशिवाय, आपणास सुख होत नाहीं, किं० आपली सोय जुळत नाहीं.

५८०. **स्वाहा करणें**—गिळंकृत करणें. ( होमांत आहुति टाकतांना इष्ट देवतेचें नांव चतुर्थ्यंत करून त्यापुढें "स्वाहा" असें म्हणतात. )

५८१. **एकाद्याचा हट्ट जिरणें**, किं० **जिरविणें**—आडमुठेपणा, किंवा मगरूरी, नाहींशी होणें; त्याला पारिपत्य करून त्याचा आडमुठेपणा घालविणें; खोड मोडणें.

५८२. **हट्टास पेटणें**—जें होणें असेल तें होओ, मी अमुकच तऱ्हेनें वागणार, असा आग्रह, किं० हेका, धरून बसणें.

५८३. **एकाद्याच्या दारांत हत्ती झुलत असणें**—त्याची वैभवसंपन्न स्थिति असणें.

५८४. **हवेलंडी**—त्रेधा. फजीती. घाबरगुंडी. यावरून "हवेलंडी होणें, उडणें, करणें, उडविणें," इत्यादि शब्दसंहतींचे अर्थ विद्यार्थ्यांस कळण्याजोगे आहेत. [ व्युत्पत्ति--हिंदी भाषेंत हा ! ये ! लंवडी !=टीक ! अरे ! बापल्या !

### ५८५. हमरी तुमरी

१. **हमरी तुमरी**--वादविवाद. भांडण.

२. **हमरी तुमरी करणें**--शिवीगाळ करून भांडणें.

३. **हमरी तुमरीवर येणें**--भांडतां भांडतां शिवीगाळ करण्यापर्यंत येणें; एकेरीवर येणें.

५८६. **हरभऱ्याचे झाडावर चढणें**, किं० **चढविणें**--स्तुतीला भुलणें, किं० फसणें; स्तुति करून एकाद्याला फसविणें.

### ५८७. हरताळ.

१. पिवळ्या रंगाचा एक विषारी पदार्थ.

२. **हरताळ लावणें**--रद्द करणें. कुचकिंमतीचा करणें. खोटा करणें, किं० पाडणें. [ पूर्वीं हातानें पोथ्या लिहीत, तेव्हां एकादें अशुद्ध अक्षर पडलेलें असल्यास तें बुझविण्यासाठीं तेथें हरताळीचा लेप करून तें दिसेनासें करीत. ]

३. **हरताळ लागणें**--रद्द पडणें. चुकीचा ठरणें.

४. **हरताळ पडणें**--

( क ) राजा, किं० त्याच्या घराण्यांतील कोणी माणूस, मेलें असतां दुकानें बंद करण्यांत येतात. तेव्हां " हरताळ पडली, " असें म्हणतात.

( ख ) दुर्मिळ होणें. उ० हल्लीं सुतार लोकांवर हरताळ पडली आहे. ( म्ह० सुतार लोक कामाला मिळत नाहींत असें झालें आहे. )

५८८. **हरामाचा माल**--लबाडीनें, अन्यायानें, मिळविलेला माल, किं० पैसा.

५८९. **हसून गोड करणें**--आपल्या हातून कांहीं चुकी झाली असल्यास हसून आणि गोड गोड बोलून दुसऱ्याचा राग घालविणें. ह्याच अर्थानें "हसून साजरें करणें," ह्याचाही उपयोग केला जातो.

५९०. **हळकुंडासाठीं लग्न मोडणें**--एकादी क्षुल्लक बाब न जुळल्यामुळें मोठें कार्य जुळत आलेलें असून तें मोडून टाकणें.

### ५९१. हळद.

१. **हळद**--पिवळ्या रंगाचा कंदविशेष.

२. **हळद लागणें**--

( क ) विवाहाचे वेळीं वधूस आणि वरास अगोदर हळद लावून स्नान घालतात. यावरून "एकाद्या मुलीला, किं० मुलाला हळद लागली," ह्याचा अर्थ विवाहविधीला सुरवात झाली, किं० तो समाप्त झाला, असा होतो. उ० मुलीला स्थळें पाहतां पाहतां मी अगदीं दमून गेलों होतों. शेवटीं तिला एकदाचें स्थल मिळून हळद लागली!

( ख ) वैभवास, किं० मान मान्यतेस, चढणें.—

( ग ) दुर्मिळ होणें.––उ० हल्लीं गवंड्यांना हळद लागली आहे. त्यांना कामावर कामें येत आहेत! त्यामुळें आमचा ओटा करावयास आम्हाला कोणी गवंडी मिळत नाहीं!

३. **हळदीचा डाग लागणें, किं० विटाळ होणें**—विवाह झाल्याबरोबर ज्या मुलीचा पति मृत होतो, तिला "हळदीचा डाग लागला," असें म्हणतात.

४. **पी हळद आणि हो गोरी**––"मूर्खपणाचा मनोरथ करणें," किं० "आरंभिलेल्या कार्याचें फळ उतावळेपणानें अपेक्षिणें," ह्याचें वर्णन करावयाचें असतां ह्या म्हणीचा उपयोग करतात. [ पुढें म्हणींत ज्यास्ती खुलासा पहा. ]

## ५९२. हांक.

१. एकाद्याच्या नांवाचा उच्चार करून त्याला बोलाविणें; उ० मी तुझी हांक ऐकिली नाहीं.

२. **हांक देणें**—ओ देणें; बोलावल्याबरोबर उपयोगी पडावयास, किं० गरज भागविण्यास, तयार होणें. उ० वेळेला हांक देईल, तोच मित्र; उ०

किती सुंदर पांखरें, फुलें कैशी। खेळगडिही, टाकिलें कसें योशीं॥
परत नाहीं येणार कास येथें?। हांक नाहीं देणार काय मातें?॥
माणि०,

३. **हांका मारणें, किं० हांक मारणें**,––

( क ) एकाद्यानें नांव उच्चारून त्याला बोलावणें; उ० रामाला मीं हांक मारली, पण तो त्यानें ऐकिली नाहीं.

( ख ) आपण केलेल्या कुकर्माबद्दल दुःख भोगीत बसणें.

४. **हांका मारीत बसणें**—चरफडत, ओरडत, बसणें.

५. **एकाद्याच्या नांवानें हांका मारीत बसणें**—"त्यानें माझें नुकसान केलें," अशी विनाकारण ओरड करीत सुटणें.

५९३. **एकाद्या कामीं हातखंडा असणें**—तें काम हमखाशीनें पार पाडण्याचें कौशल्य, किं० पटाईतपणा, अंगीं असणें; उ० भांडण उकरून काढण्याचे कामीं मंजुळाबाईचा हातखंडा आहे. उ० प्यादेमात करण्यांत सिद्धेश्वरपंताचा हातखंडा आहे.

५९४. **हाय खाणें**, किं० **घेणें**—धास्ती घेणें. दहशत घेणें. जिवाला लावून घेणें.[ " हाय ! " हें दुःखसूचक अव्यय आहे. ] " हैवत घेणें, " ह्याचाही असाच अर्थ आहे.

५९५. **हायदोस घालणें**—" हाये दोस्त् दूल्हा " हा उद्गार मुसलमान लोक ताबुताचे पुढें काढतात. त्याचा अर्थ "हाय! हाय! मित्रा, नवरदेवा!!", असा आहे. इमाम हसन आणि इमाम हुसेन यांचीं लग्नें झालेलीं होतीं. त्यांना लवकरच करवबलाच्या ( करबलाच्या ) लढाईत मरण आलें. त्यांच्या संबंधाचा हा शोकोद्गार असून डोले हे त्यांच्या कबरा होत. हा उद्गार काढतांना मुसलमान लोक ताबुतांचे पुढें नाचून धिंगामस्ती करीत असतात. यावरून " हायदोस घालणें, " म्हणजे धिंगामस्ती करणें, असा मराठींत अर्थ झाला.

### ५९६. हार.

१. (क) नुकसान; हानि. [ अनुरूप क्रियापद येणें, किं० बसणें. ] उ० आंब्याच्या व्यापारांत मला मोठी हार आली!

(ख) पराभव. अंगावर डाव लागणें. उ० मऱ्हाठ्यांशीं लढतांना मुसलमान लोकांना अनेक वेळां हार आली. उ० सोंगट्याच्या डावांत मला हार आली.

२. **हार खाणें**—आपण कमी दर्जाचें आहों असें कबूल करणें. आपला पक्ष कमी जोराचा आहे असें कबूल करणें. चीत होणें. पराभव पावणें.

३. **एकाद्याला हार जाणें**—त्याच्याकडून पराभव पावणें. त्याच्याहून आपण कमी दर्जाचे आहों, असें म्हणावयाला लोकांना संधि देणें;

उ० नखानें चित्रें उठविण्याच्या कामीं मी कोणालाही हार जाणार नाहीं! ( म्ह० मीं उठविलेलीं चित्रें इतरांच्याहून वरच्या प्रतीचीं ठरतील ! )

४. **आजपर्यंत तो कोणालाही हारीं गेला नव्हता!**- कोणाकडूनही पराभूत झाला नव्हता! कोणापेक्षांही कमी योग्यतेचा ठरला नव्हता.

५. **हार मानली कीं झगडा तुटला**—आपण कमी आहों, किं० आपला पराभव झाला, असें आपण कबूल केलें, म्हणजे तंट्याचें कारणच राहिलें नाहीं ! तंटा मिटलाच !

६. **हार मानली, पण झगडा तुटो**—"आम्ही चुकलों," असें आम्ही कबूल करितों, कोणीकडून तरी तंटा मिटो, म्हणजे झालें !

५९७. **त्याचे हाल कुत्रा खाईना!**—त्याला अति विपन्न दशा प्राप्त झाली! उ० तुझे हाल कुत्रा खाणार नाहीं. तुला अतोनात हाल अपेष्टा काढाव्या लागतील !

५९८. **हिंग लावून विचारणें**—बेचव पदार्थ खाण्याजोगा करावयाचा झाल्यास त्याला हिंग लावतात, म्हणजे त्याला कांहीं थोडीशी तरी चव येते. परंतु जो पदार्थ अगदींच टाकाऊ—ज्याला हिंग लावूनही कांहीं चव येण्याजोगी नाहीं,—त्याला हिंग कोण लावणार? ज्याला कोणीही हिंग लावणार नाहीं, तो पदार्थ अर्थात् भिकार आणि नादान असाच असावयाचा. यावरून " त्याला कोणी हिंग लावूनही विचारणार नाहीं," याचा अर्थ तो अगदीं टाकाऊ, कुचकिमतीचा, आहे, असा होतो.

५९९. **हुतुतू घालणें**—आरडाओरडा करून धिंगामस्ती करणें. ["हुतुतू" हा एक मुलांचा खेळ आहे. त्यांत "हुतुतू! हुतुतू!" असा शब्द उच्चारीत उच्चारीत धावावयाचें असतें. ]

६००. **हो ना करणें**—कचरणें, अनमान करणें, कांकूं करणें.

६०१. **होस हो देणें, किं० मिळविणें**—संमति दर्शविणें; उ० समर्थांची मर्जी संपादन करावी, म्हणून खुशामतखोर लोक त्यांच्या मूर्ख विचाराला देखील होस हो देऊन देतात!

६०२.१. **एकाद्या वस्तूची होळी करणें**--ती जाळणें. तिचा विध्वंस करणें. उ०

होय प्रदीप्त सीतासंप्रार्थित वातसख न या पोळी ।
होळी करि लंकेची हरि, कर तो दुष्टधी चोळी ॥

आर्यारामायण, आर्या १२६.

२. **होळी होणें**—जळून जाणें.

६०३. **क्षिति न बाळगणें**--' क्षिति," ह्म० पर्वा, किं० काळजी. "क्षिति न बाळगणें," म्ह० पर्वा न करणें. अंतःकरणाला लावून न घेणें. ["क्षिति," ह्याचें शुद्ध रूप " क्षति. "] उ० त्याला कशाचीच क्षिति नाहीं. उ० बाळकृष्णाला कितीही रागें भरलें, तरी त्याला त्याची तिळभरही क्षिति ( म्ह० पर्वा ) वाटत नाहीं. उ० त्यानें मला लबाड म्हटलें तर म्हटलें ! मी त्याची क्षितिच बाळगीत नाहीं !

# सर्वनामें.

६०४. ज्यांत सर्वनामें अंतर्भूत झालीं आहेत, असे वाक्प्रचार संख्येनें थोडे आहेत. तथापि ते महत्त्वाचे आहेत. ते संभाषणांत पुष्कळ वेळां योजण्यांत येतात, आणि त्यांच्या योगानें संभाषणाला चटकदारपणा येतो. ह्या सर्व वाक्प्रचारांचा बरोबर अर्थ करणें, आणि सारख्या सारख्या वाक्प्रचारांतील सूक्ष्म भेद शब्दांनीं व्यक्त करणें कठिण आहे. आम्ही कांहींचे अर्थ देऊन त्यांच्या स्पष्टीकरणार्थ उदाहरणें दिलीं आहेत, आणि कांहींचा वाक्यांत नुसता उपयोग करून दाखविला आहे

जीं सर्वनामें आम्ही पुढें घेतलीं आहेत, त्यांचे लिंगवचनपुरुषादिकांवरून, किंवा अर्थांवरून, वेगळे वेगळे समूह किंवा गण पाडल्यानें विद्यार्थ्यांची विशेष सोय होईल असें न वाटल्यावरून नुसत्या वर्णानुक्रमानें तीं सर्वनामें दिलीं आहेत. कांहीं वाक्प्रचार, जे लिंगवचनपुरुषादिकांत ते योग्य फेरफार करून योजतां येतात, ते फक्त प्रथमपुरुषीं, पुल्लिंगीं, आणि एकवचनीं दिले आहेत. " माझा मी तें काम करीन, तूं लुडबुडावयाला येऊं नको !" ह्या वाक्यांत " माझा मी " ह्याचा " मी एकटा, " कि० "तुझ्या कि० दुसऱ्या कोणाच्या मदतीची अपेक्षा न करतां मीच" असा अर्थ होतो. येथें "माझा मी" ह्याचा जो अर्थ तोच "आमचे आम्ही," "तुझा तूं," "तुमचे तुम्ही," " तिची ती" वगैरेंचा अर्थ होतो. म्हणून " माझा मी " हाच एक वाक्प्रचार देऊन तेथें सर्व लिंगवचनपुरुषादिकांत याचा उपयोग करतां येतो असा मतलबाची टीप दिली आहे.

६०५. अष्टाक्षरी मंत्र—आठ अक्षरांचा मंत्र. "कसें करूं? काय करूं?" हीं आठ अक्षरें. उ० त्याला तें नर्मांकरण सुचत नाहीं. तो अष्टाक्षरी मंत्र जपांत बसला आहे !

६०६. असाच—सामान्य प्रतीचा. ज्याच्या अंगीं कांहीं विशेष गुण नाहीं,

असा. उ० आमच्या मुलाला औषध द्यावयाला असाच एक डाक्तर भेटला होता.

६०७. **असा तसा**--सामान्य प्रतीचा. [ टीपः—ह्याचा उपयोग करणरूपीं किंवा अकरणरूपींही होऊं शकतो ]; उ० आजच्या सभेचा अध्यक्ष होता कोणी असा तसा! ( म्ह० अध्यक्षपणाला नालायख ). उ० तो कारकून असा तसा नाहीं हो! ( म्ह० तो मोठा कर्तबगार माणूस आहे! )

६०८. **हा पंडित अशा तशांतला नाहीं**--हा सामान्य प्रतीचा नाहीं; हा झांडा पंडित आहे.

६०९. **अहंपणा**, किं० **अहंता**—वढाई. स्वताविषयींचें चांगलें मत. स्वतांच्या सुखदुःखाविषयींची जाणीव. धन, पुत्र, घरदार, वगैरे संबंधानें आपलेपणाची बुद्धि. उ०

> हळु हळु झडो अहंता सन्नमनीं वार्द्धकीं जशी शेंडी ।
> कैंडू विवेक विषया निस्पृह जन वस्तुतें जसा फेंडी ॥

मोरोपंत.

६१०. **अहमहमिका**--स्पर्धा, ईर्ध्या, चढाओढ. उ० त्याच्यापेक्षां मी विद्वान् होईन अशी अहमहमिका चांगली.

६११. **अस्मादिक**--ह्याचा मराठींतील अर्थ "आम्ही" असा आहे. वढाई मारावयाची असतां, किं० स्वताविषयीं विनोदानें बोलावयाचें असतां, ह्याचा उपयोग करतात. उ० रात्रीच्या वेळीं आह्माला त्या रानांतून जावयाला काय हरकत आहे? अस्मादिकांच्या कोण वाटेस जाणार आहे? [ अस्मादिकांच्या=आमच्या. ]

६१२. **आपआपला**, किं० **आपलाला**--ज्याचा जो असेल तो. उ० मुलांनो, आतां संध्याकाळ झाली. खेळ आटोपून आपआपल्या, किं० आपलाल्या घरीं जा. उ०

> नाना योग नाना मतें । पाहों जातां असंख्यातें ।
> जाती आपुलाल्या पंथें । सूर्य उदय झालिया ॥

रामदास--दासबोध.

६१३. **आपण**—( प्र० पु० )मी किं० आम्ही. उ० सदूभाऊच्या कारभारांत आपण नाहीं रे बोवा पडणार!

६१४. **आपण**—( द्वि० पु० ) तुम्ही ( बहुमानार्थीं ). उ० आजच्या सभेचे अध्यक्ष व्हावयाला आपण योग्य आहां!

६१५. **आपण होऊन**—स्वताच्याच प्रेरणेनें. दुसऱ्यानें सांगावयाच्या अगोदर. दुसऱ्यावर अवलंबून न राहातां. उ० मी आपण होऊन हें घड्याळ तुला बक्षीस देणार होतों. उ० माझ्या यजमानानें आपण होऊन माझा पगार आठ रुपये होता तो दहा रुपये केला. उ० आपण होऊन तो श्लोकाचा अर्थ करण्याचा मुळींच प्रयत्न करीत नाहीं, त्याला सारेंच लोकांनीं सांगावें लागतें.

६१६. **आपला, किं० आपला तो**—पादपूरक शब्द. [ हे शब्द दोन्ही वचनीं आणि तिन्ही लिंगीं योग्य ते फेरफार करून योजण्यांत येतात ]. उ० मी फिरावयाला गेलों होतों, तेव्हां मला कोण भेटला असा तुझा तर्क आहे ? आपला तो गोविंदा भेटला ( म्ह० गोविंदा भेटला ). याचप्रमाणें "आपली ती," "आपले ते," "आपल्या त्या," ह्यांचे अर्थ जाणावे.

६१७. **आपला**—कोणतीही विशिष्ट क्रिया करणारा जो कोणी असेल त्याचा. ( तिन्ही पुरुषीं, तिन्ही लिंगीं आणि दोन्हीं वचनीं. ) उ० सध्या मला आपलीं कामें पहावयाला फुरसूद नाहीं.

६१८. **आपला**—मी आपला, म्ह० मजविषयीं म्हणाल तर, ( तिन्ही पुरुषीं, दोन्ही वचनीं आणि तीन्हीं लिंगीं ). उ० मी आपला ह्याच वाटेनें जाणार! कोणी मजबरोबर या किंवा नका येऊं!

६१९. **आपल्या आपण**—दुसऱ्याच्या मदतीवांचून. दुसऱ्याच्या प्रेरणेशिवाय. अंगच्या जोरावर. दुसऱ्या कोणाच्या मध्यस्थीवांचून, किं० रदबदलीशिवाय. उ० तूं मुद्दाम गळूं फोडूं नको. आज त्याला पोटीस लावलें, म्हणजे उद्यां तें आपल्या आपण फुटेल. उ० त्यांना जेवावयाला कशाला बोलावितेस? त्याला भूक लागली म्हणजे तो आपल्या आपणच

येईल। उ० काठीभोंवतीं आपण वेल गुंडाळण्याचें कारण नाहीं. तो आपल्या आपणच काठीला वेटोळीं घालीत घालीत वर चढेल.

६२०. **आपसूक,** किं० **आपसुख**--आपल्या स्वताच्या सुखासमाधानानें, किं० इच्छेनें. लोकांनीं प्रेरणा न करतां. उ० जेवावयाला येण्यासाठीं त्याची इतकी आर्जव कशाला करतेस? रान चरचरलें म्हणजे तो आपसूकच येईल।

६२१. **आपला म्हणणें**—एकाद्या माणसाचें कल्याण करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर आहे असें समजून चालणें, किं० वागणें. उ० ज्यास मीं एकदां आपला म्हटलें, त्याच्यासाठीं मी हावी तितकी घस सोशीन.

६२२. **आपलासा म्हणणें,** किं० **समजणें**--एकादा मनुष्य आपल्याशीं स्नेहभावानें वागणारा आहे असें म्हणणें, समजणें, किं० समजून वागणें.

६२३. **आपली वाढवून खाणें**--आपलपोटेपणानें आपली सोय अगोदर करून घेणें.

६२४. **आपोआप**—बाह्यशक्ति न लाविली तरी. स्वयंप्रेरणेनें. खटपट, त्रास, मेहेनत, तसदी, न करतां, किं० सोसतां. उ० ती खिडकी मीं मिटविली नाहीं. ती आपोआप मिटली. उ० गवत लावावें लागत नाहीं. तें आपोआप उगवतें.

६२५. **आम्ही**—प्रथमपुरुषवाचक अनेकवचनीं सर्वनाम. उ० तुमची मदत असल्याशिवाय आम्ही काय करणार?

६२६. **कसा काय**--कोणच्या प्रकारचा. तुमची तबेत आज कशी काय आहे? उ० तिकडचा कसा काय बेत आहे?

६२७. **कसें?**--कोणच्या रीतीनें? उ० हें कोडें कसें सोडवावयाचें?

६२८. **कसाचसा**—मोठ्या कष्टानें उ० मी येथें कसेबसे दिवस घालवीत आहें, ( म्ह० अति कष्टानें. ) उ० मीं त्याच्यापासून कसेबसे दहा रुपये मिळविले, ( म्ह० भारी प्रयासानें. )

६२९. **कसा झाला तरी तो श्रीमंताचा मुलगा**—त्याच्यासंबंधानें कितीही प्रतिकूल गोष्टी असल्या, तरी तो श्रीमंताचा मुलगा आहे खरा।

६३०. **किती केलें तरी**—खरें पाहतां. उ० किती केलें तरी तो

पडला आडमुठ्या ! तो का वळावयाचा आहे ? म्ह० त्याला कितीही बोध केला तरी तो वळणार नाहीं।

६३१. मीं त्याची किती काकळुती केली ?—मीं त्याची अतोनात काकुळती केली.

६३२. १. कांहीं—कित्येक. उ० कांहीं लोक ह्या वाटेनें जात होते, आणि कांहीं लोक त्या वाटेनें जात होते.

२. कांहींच्या बाहींच—अतिविचित्र, किं० विलक्षण. उ० त्याची मागणी कांहींच्या बाहींच होती !

६३३. काय—उ० काय खाल्ल्यानें माझी पोटदुखी उठते, हें मला कळलें नाहीं.

६३४. कांहीं तरी—उ० यावर कांहींतरी तोड काढली पाहिजे. उ० कांहीं सोन्याचा गुण आणि कांहीं स्वागीचा गुण.

६३५. किती ?—उ० हपुसचा एक आंबा घ्यावयाला किती पैसे पडतात ? उ० तुझ्यासाठीं मीं किती दुःख भोगलें त्याची तुला कल्पना नाहीं !

६३६. किती तरी ?—उ० मीं त्याची किती तरी मनधरणी केली ! तो वळला नाहीं !

६३७. कोण ?—उ० त्याचें मन वळवावयाला मला कोण प्रयास पडले ! ( म्ह० फार, अतोनात. ) उ० दार कोण ठोठावीत आहे ?

६३८. कोणता का, किं० कोणचा का—हावा तो; उ० दोन्ही वाट्या सारख्या आहेत, कोणती का घेईनास ! [ तिन्ही लिंगीं आणि दोन्ही वचनीं. ]

६३९. कोणी का—हावा तो. [ तिन्ही लिंगीं आणि दोन्ही वचनीं याचा उपयोग होतो. ] उ० माझ्या सोबतीला कोणी का येईना ! उ० कोणी का धोतरें आणाना ! मला तीं मिळाल्याशीं कारण ! उ० कोणी का औषध देईना ! माझ्या मुलाला गुण आला म्हणजे झालें !

६४०. कोणी—हावा तो, हावें तें, इ० [ याचा उपयोग तिन्ही लिंगीं आणि दोन्ही वचनीं होतो ]. उ० कोणी ब्राम्हण सांगा; आमची त्याला हरकत नाहीं.

कोणी वंदा, कोणी निंदा । आम्हा स्वहिताचा धंदा ॥ तुकाराम.

६४१. कोणी तरी—ज्याचें महत्त्व नाहीं असा माणूस. भिकार, नालायक,

यःकश्चित् माणूस. ज्याचें नांवगांव मी तुम्हांस सांगूं इच्छित नाहीं, असा एक मनुष्य. उ० मुलीला लोटावयाची का आहे? आणला कोणीतरी मुलगा आणि दिलें एकदाचें लग्न लावून! असें करून कसें चालेल? उ० ही जबाबदारीची जागा आहे. येथें कोणीतरी माणूस नेमून चालावयाचें नाहीं. उ० मला तहान लागली आहे, कोणीतरी पाणी द्या रे!

६४२. **जो तो**—प्रत्येक मनुष्य; उ० आगबोट फुटली तेव्हां जो तो आपला जीव वचावण्याच्या मार्गाला लागला. दुसऱ्यांकडे तेव्हां कोण लक्ष्य देतो!

६४३. **ज्याला त्याला**—प्रत्येकाला; सर्वांनाच. उ० ज्याला त्याला मुलगी गोरी पाहिजे आणि हजार रुपये हुंडा पाहिजे!

६४४. **ज्यांत त्यांत**—प्रत्येक कामांत, किं० प्रकरणांत; प्रत्येक गोष्टींत; उ० गोविंदराव ज्यांत त्यांत असावयाचाच!

६४५. **जो उठला तो**—प्रत्येक माणूस. उ० जो उठला तो माझ्या लेंकराला चिडवितो. उ० आलीकडे जो उठला तो डोक्याला केश राखूं लागला आहे.

६४६. **जो पाहावा तो**—प्रत्येक माणूस. उ० जो पाहावा तो कपाळाला भस्माचे पट्टे ओढून आणि हातांत पळी पंचपात्री घेऊन चाललेला होता.

६४७. **ज्याचा तो**—एकएकटा. प्रत्येक माणूस. विशिष्ट इसम. दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून न राहाणारा. उ० ज्याचा तो पडला पुळपुळीत! मग दुसऱ्यांनीं सावरून काय होणार?

६४८. **ज्याचा त्याला**—सर्वांना. प्रत्येकाला. उ० ज्याची त्याला कांहीं तरी काळजी पाहिजे लागते; सारेंच दुसऱ्यांनीं पाहून कितीसा निभाव लागणार?

६४९. **ज्याचें नांव तें**—

(क) अगदीं, बिलकूल, मुळींच. उ० मीं त्याची परोपरीनें आर्जवें केलीं, पण तो ज्याचें नांव तें वळेना!

(ख) अतिउत्कृष्ट, किं० उत्कृष्ट रीतीनें. उ० माझें चित्र असें साधलें आहे कीं ज्याचें नांव तें!

६५०. **तुमचा**, किं० **तुमचा तो**—पादपूरक शब्द. [ हे शब्द दोन्ही

वचनीं आणि तिन्ही लिंगीं योग्य ते फेरफार करून योजण्यांत येतात. ]

६५१. **तेरी मेरी**—अरेतुरेपर्यंत आलेलें भांडण. हमरीतुमरीवर आलेलें भांडण. [ तेरी=तुझा. मेरी=माझा. ] उ० पहिल्यानें ते विनोदानें बोलत होते, पण पुढें अगदीं तेरीमेरीवर आले!

६५२. **हमरी तुमरी**—कडाक्याचें भांडण. संतप्त होऊन, किं० चिरडीस जाऊन, बोलण्याची स्थिति, किं० प्रवृत्ति, उ० त्याला त्याच्या मर्जीविरुद्ध कोणी कांहीं सांगतां कामा नये. तो लागलाच हमरीतुमरीवर येतो!

६५३. **देव तुमचें भलें करो**—देव तुमचें कल्याण करो ? [ बोलतांना शब्द,किं० मजकूर, सुचला नाहीं म्हणजे हें वाक्य वेळ भरून काढण्यासाठीं उच्चारीत असतात. ]

६५४. **नाहीं तेंच**—भलतेंच कांहीं तरी. उ० नाहीं तेंच मागत बसूं नको. उ० नाहीं तोच हट्ट घेतलास तर तुझी समजूत कोणीही करणार नाहीं.

६५५. **ममता**—माया. प्रेम. ही वस्तु माझी आहे अशी जाणीव, आणि तिच्यासंबंधाची काळजी.

६५६. **मी म्हणणें**—जोरांत असणें. उ० त्या वेळीं मी कसचा घराबाहेर पडतों ? तेव्हां पाऊस मी म्हणत होता !

६५७. **माझा मी**—मी एकटा, दुसऱ्याची मदत न घेतां.

६५८. **मी मी म्हणणें**—स्वताच्या पराक्रमाची, किं० कर्तृत्वाची, बढाई मारणें, किं० ऐट मिरविणें. उ० भिव्याशीं सामना करावयाला कोणी हीं पुढें येईनात. मी मी म्हणणारे सारे पहिलवान् कचरूं लागले !

६५९. **मी तूं करणें, मी तूं वर येणें.**—भांडणावर येणें. हमरी तुमरी करणें. उ० हीं दोन पोरें एकत्र झालीं कीं मी तूं वर येतात!

६६०. **युष्मादिक**--तुम्ही. दुसऱ्याविषयीं विनोदानें,किं० तिरस्कारानें, बोलावयाचें असतां "युष्मादिक" ह्या शब्दाचा उपयोग करतात. उ० हें कुलूप आम्हांला उघडतां येत नाहीं. आतां युष्मादिक काय दिवे लावणार तें पाहूं !

६६१. **येवढ्याशा तेवढ्याशावरून**—अगदीं थोडक्या कारणावरून. उ० माझी शेजारीण येवढ्याशा तेवढ्याशावरून चिरडीस जाते.

# विशेषणें.

—:o:—

६६२. ज्या वाक्प्रचारांमध्यें विशेषणें येतात, असे वाक्प्रचार मराठींत पुष्कळ आहेत, त्यांपैकीं कांहीं निवडक असे पुढें दिले आहेत.

## ६६३. अकरावा.

१. **अकरावा बृहस्पति**—दाट मैत्री. उ० गिरिधरराव आणि श्रीनिवासराव या दोघांत अकरावा बृहस्पति आहे. [ बारावा बृहस्पति=शत्रुत्व. ]

२. **अकरावा रुद्र**—अतितापट माणूस.

६६४. **अकुतोभय**—ज्याला कोणाच्याही दिशेकडून भय नाहीं असें, अत्यंत सुरक्षित. [ सं० अकुतः+भय–बहुव्रीहि समास; अकुतः=कोठूनही नाहीं, भय=भीति, ज्याला असा. ] उ० कोरलईचा किल्ला अकुतोभय असल्याकारणानें त्याचेवर फिरंग्यांचा कित्येक दिवसांपासून डोळा होता.

थोरास अधम निंदी जो चढला अकुतोभय स्थाना ।
जो अधम तो सदाधम पात्र बुधांच्या कधीं न हो माना ॥

सौ० स० भि०.

## ६६५. अक्रीत.

१. ( क ) फुकटचें. ज्याच्याबद्दल आपण किंमत दिलेली नाहीं असें. उ० मला कोणाचें अक्रीत नको. देवाच्या दयेनें मला पुष्कळ मिळत आहे !

२.( ख )–लबाडीनें मिळविलेला, किं० चालविलेला. उ० अक्रीताचा पैसा यशस्वी होत नाहीं.

२. **अक्रीताचा व्यवहार**, किं० **व्यापार**,—लबाडीनें चालविलेला व्यवहार, किं० व्यापार.

६६६. **अखंड दंडायमान**—लांबलचक. उ० रात्रीच्या अंधेरांत तो गडी अखंड दंडायमान पडून घोरत होता, त्याला पाहातांच मी घाबरलों !

## ६६७. अंगचा.

१. **अंगची बुद्धि**—जन्मजात बुद्धि; दुसऱ्याच्या शिकविण्यावरून, किं० ग्रंथांच्या अध्ययनानें, उत्पन्न, किं० संपादित, नव्हे अशी.

२. **अंगची गोष्ट**—

(क) स्वताची, व्यक्तिविषयक अशी, गोष्ट.

(ख) स्वता जाणलेली, किं० शोधिलेली, गोष्ट.

३. **अंगचा झरा**—पृथ्वीच्या गर्भापासून ज्याचा उगम होतो, असा झरा. ह्याच्या उलट "पावसाच्या पाण्यापासून उत्पन्न होणारा झरा." उ० ह्या विहिरीला अंगचे झरे सात आहेत; एकच काय तो पावसाळी झरा आहे.

४. **अंगचा धनी**—दुसऱ्याचा ताबा ज्याच्यावर नाहीं असा; स्वताचा मालक.

५. **अंगचा लिहिणार**—आपलें काम आपणच लिहून काढणारा, म्ह० कारकुनाकडून न लिहविणारा; उ० मोरोपंत कवि हा अंगचा लिहिणारा होता.

६. **अंगचे खूर, पाय, इ०**—त्याच द्रव्यांतून कोरून, किं० घडवून, केलेले. उ० ह्या चौरंगाला अंगचे खूर आहेत. उ० पाटाला अंगचे गंजवाल आहेत.

७. **अंगचा मळ**—आपल्या जवळची, अगदीं बिनकिंमतीची, किं० टाकाऊ, वस्तु. उ० तो भारी कंजूष आहे! तो अंगचा मळही देणार नाहीं! उ० यजमान खूष झाले आणि त्यांनीं दिलें काय? अंगचा मळ जसा काढून टाकावा, तसा त्यांनीं मला दिला एक पागोट्याचा धोटा झालें!

८. **अंगचा कल्पक**-ज्याला शिकविल्यावांचून, म्ह० जन्मजात बुद्धीच्या सामर्थ्यानें, कल्पना सुचते असा. [ टीपः—याच सरणीनें "अंगचा कारागीर," "अंगचा गाणारा," "अंगचा शहाणा," "अंगचा चितारी," "अंगचा वक्ता," इत्यादि शब्दसंहतींचे अर्थ जाणावे. ]

६६८. **अठरा गुणांचा खंडोबा**--
१. सर्व तऱ्हेच्या लुच्चेगिऱ्यांत पटाईत.
२. रोगी मूल. ज्याला नेहेमीं कांहींना कांहीं तरी दुखणें आहे असें मूल.

६६९. **अदत्त**--चिकू. कृपण. देण्याकडे ज्याची प्रवृत्ति नाहीं असा. [" अ-दत्त " ह्याचा खरा अर्थ "न दिलेला," परंतु व्यवहारांत त्याचा अर्थ " न देणारा", असा घेण्यांत येतो. ]

## ६७०. अंधळा.

१. ( क ) ज्याला डोळ्यांनीं दिसत नाहीं असा ( मनुष्य ).
( ख ) ज्या डोळ्यानें दिसत नाहीं असा ( डोळा ).
( ग ) ज्याला अंतश्चक्षु, किं० ज्ञानचक्षु, नाहीं असा; ज्याला सारासार विचार नाहीं असा; मूर्ख; अडाणी; बेअकली.

२. **अंधळी कोशिंबीर**--एक प्रकारचा खेळ.

३. **अंधळी गाय**--हीन, दीन, गरीब, निरुपद्रवी, असा माणूस.

४. **अंधळी वेळ**, किं० **अंधळें नक्षत्र**--( फलज्योतिषांत ) ज्या वेळीं, किं० ज्या नक्षत्रावर, हरवलेली वस्तु सांपडत नाहीं, अशी वेळ, किं० असें नक्षत्र.

५. **अंधळें गारुड**--लबाडी, लुच्चेगिरी; खलबत, कट, चक्रान्त.

६. **एकाद्याला अंधळें नक्षत्र लागणें**--एकादी वस्तु सहज दिसण्याजोगी असून ज्याला ती दिसत नाहीं, त्याला " अंधळें नक्षत्र लागलें आहे," असें म्हणतात. उ० पाटाजवळच फणी असून ती तुला दिसत नाहीं; तुला अंधळें नक्षत्र लागलें आहे कीं काय ?

७. **अंधळें वरण**--ज्या वरणांतील डोळ निवडून काढलेले नाहींत असें वरण. ह्याच्या उलट " डोळस वरण ".

८. **अंधळ्या** (स्त्रीलिंग, अनेकवचन)--चित्रा नक्षत्र, किंवा त्या नक्षत्रांत पडलेला पाऊस.

९. **अंधळ्याचा रस्ता**--सरळ रस्ता ( ज्या रस्त्यानें कोणीही माणूस गेला तरी चुकणार नाहीं ).

१०. **अंधळ्याची काठी**—अंधळ्या, अशक्त, पंगु, माणसाला वाट दाखविणारा, किंवा आश्रय देणारा माणूस.

११. **अंधळ्याची माळ**, किं० **माळका**— वाट दाखवावयास एक डोळस माणूस पुढें घालून, व एका अंधळ्याच्या पाठीवर दुसऱ्या अंधळ्यानें हात ठेवून, व अशा रीतीनें एक लांब रांग करून, रस्त्यानें भिक्षा मागणाऱ्या अंधळ्यांची रांग. मूर्ख, बेअकली, अशा माणसांची परंपरा, किं० समुदाय.

१२. **अंधळ्याची मिठी**—घट्ट मिठी.

१३. **अंधळा कारभार**—अव्यवस्थित, किं० मूर्खपणाचें, काम.

६७१. **अन्नास मोताद**—ज्याला खावयाला अन्न मिळत नाहीं असा.

६७२. **अलनत्यागलनत्या**—कोणी तरी यःकश्चित्, लुडबुड्या, माणूस.

## ६७३. अवघड.

१. कठिण—दुःखकारक. असह्य. उ० हें उदाहरण अवघड आहे. तें मला सुटत नाहीं. उ० आऱ्याबाऱ्याची घाटी कठिण आहे, ती देखील आमचा मुलगा चढून गेला. उ० माझ्या मुलावरून तीन अवघड दुखणीं गेलीं.

२. **अवघड वाटणें**—दुःखकारक, असह्य, होणें. दुःख वाटणें. उ० मुलगी सासरीं जावयाला निघाली, तेव्हां तिला अति अवघड वाटलें.

६७४. **अवजड**—अवाढव्य. बोजड. वागवावयाला कठिण. उ०

संसारशकट अवजड, पुरुष स्त्री दोन हीं तया चाकें ।
जरि एक उंच, दुसरें नीच, तरी शकट हा कसा हाके ? ॥

बाळकृष्ण अनंत भिडे.

६७५. **अष्टपैलू**—हिऱ्याला सहाणेवर घासून ज्या बाजू करतात, त्यांना "पैलू" असें म्हणतात. ज्या हिऱ्याला आठ पैलू आहेत, तो प्रकाशांत कसाही धरला, तरी तो चकचकणारच. यावरून "अष्टपैलू माणूस," म्ह० कोणत्याही कामांत घातला तरी तें काम उत्कृष्टपणें करणारा माणूस, असा अर्थ होतो.

६७६. **अस्त्युत्तर**—हुशार. योग्य, किं० खरी, गोष्ट नाकबूल करणारा। [ अस्ति=आहे, उत्तर=जबाब. कोणी कांहींही बोलले, तरी त्यावर उत्तर

देण्याला जो निर्लज्जपणानें तयार असतो तो. ]

६७७. **आगजाळी स्त्री**--भांडखोर, आगेखोर, स्त्री.

## ६७८. आडवा.

१. ( क ) समांतर नव्हे असा; काटकोनांत असलेला. उ० ह्या खांबाला ती फळी आडवी बांध.

( ख ) रुंद; उभा नव्हे तो; उ० नारायण आलीकडे आडवा वाढत चालला आहे, ( म्ह० तो उंचीनें न वाढतां जाडी होत चालला आहे. )

( ग ) प्रतिकूल; उलटा; नुकसान करणारा. उ० आडवें दैव. उ० त्याला दैव आडवें आलें ( म्ह० त्याचेवर दुर्दैव ओढवलें ).

( घ ) उलट परिणाम करणारा; विरुद्ध.

२. **आडवें उभें**—कुटिल नीति; उ० आडवें उभें करून मीं त्या घराचा कबजा घेतला.

३. **आडवें पाणी**—नदीचें, तळ्याचें, किं० विहिरीचें, पाणी. ( याच्या उलट "पावसाचें पाणी." )

४. **आडव्या अंगाचा**—लठ्ठ; ठेंगणा आणि जाडी. याच अर्थानें "आ-डव्या बांध्याचा," "आडव्या काठीचा," "आडव्या हाडाचा," हे प्रयोग होतात.

५. **आडव्या जिभेचा**--भांडखोर; रानवट, किं० गांवढळ, भाषण करणारा; संबंधरहित भाषण करणारा.

६. **आडवें जाणें**--

( क ) दुसऱ्याच्या जाण्याच्या मार्गाला काटकोन करून जाणें; उ० मांजर आडवें गेलें म्हणून मी परत फिरलों.

( ख ) हरकत करणें, अडथळा आणणें. उ० माझ्या विचाराला तूं नेहमीं आडवा जात असतोस, ही तुझी खोडी चांगली नाहीं.

७. **आडवें येणें**--

( क ) एकाद्याच्या वाटेंत येणें; त्याला अडथळा करणें, किं० हरकत करणें. त्याला खचविणें, किं० नाउमेद करणें; उ० मी हें काम हौसेनें करावयाला निघालों आहें, मला तूं आडवा येऊं नको.

(ख) सामोरें जाणें; उ० आम्ही काशीयात्रा करून परत आलों, तेव्हां सारे गांवकरी आम्हांला आडवे आले.

(ग) जन्माचे वेळीं मुलाचें डोकें पुढें न येतां मूल आईचे उदरांत वांकडें होणें; उ० आडवें आलें तर कापून काढावें.

८. **आडवें लावणें**—कुत्सित दृष्टीनें पाहाणें. दोष देणें.

९. **आडवें होणें**—विश्रांति घ्यावयाच्या उद्देशानें आंथरुणावर हातपाय पसरून निजणें; उ० तुम्हीं फार दमलेले आहां; जरा आडवे व्हा म्हणजे तुम्हांला बरें वाटेल.

१०. **आडवें घेणें**—दोषकदृष्टीनें पाहणें; उ० तो माझा प्रत्येक शब्द आडवा घेतो.

११. **आडवें नेसणें, किं० लावून घेणें**—लुगडें पुरतेपणीं न नेसणें. [ह्याच्या उलट "नीट नेसणें"].

१२. **आडवें आलें असतां कापून काढावें**—आपल्या कामांत कोणी हरकत करावयास आला, तर त्याची भीडमुरवत न बाळगतां त्याला वाटेंतून दूर केलें पाहिजे. अशा वेळीं मैत्रीभंग होईल कीं काय, हा विचार मनांत आणूं नये. [मागें ले० ६७८, ७ (ग) पहा.]

## ६७९. आंबट.

१. (क) आंबा, चिंच, वगैरेंच्या रुचीप्रमाणें ज्याची रुचि असा.

(ख) निरुत्साह, खिन्न.

२. **आंबट तोंड**—खिन्नतेची, निराशेची, मुद्रा.

३. **आंबट ओला**—अर्धवट ओला; अर्धवट वाळलेला; ओलसर.

४. **आंबट शोकी**—भलत्याच चैनी करणारा.

५. **आंबट करणें**—निराश करणें.

६. **आंबट होणें**—निराश होणें.

७. **आंबलेला**—

(क) आंबट झालेला; उ० आंबलेलें ताक.

(ख) खिन्न. हिरमुष्टा. असंतुष्ट झालेला.

## ६८०. आयता.

१. श्रमावांचून, किं० पैसा न खर्च करतां, मिळालेला. उ० मी घर बांधतेवेळीं पायासाठीं जमीन खणली, तों मला पूर्वीच्या काळच्या एका घराचा आयताच पाया लागला.

२. अकल्पित, किं० अनपेक्षित, रीतीनें प्राप्त झालेला.

३. **आयती वेळ**--ऐन कामाची, किं० घाईची, किं० जरूरीची, वेळ. उ० अगोदर सारी तयारी करून ठेव, नाहीं तर आयत्या वेळीं तुझी धांदल उडेल !

४. **आयत्या पिठावर रेघा ओढणें**, किं० **गुटका मारणें**--श्रमावांचून मिळालेल्या पैशावर चैनबाजी करणें.

५. **आयत्यावर कोयता**--श्रमावांचून मिळालेल्या पदार्थाची, किं० मालाची, नासाडी करावयास कोणी कचरत नाहीं !

६. **आयत्यावर रायतें करणें**--हल्लीं आपणाजवळ जें कांहीं आहे, तें खर्चून त्याचा उपभोग घेणें.

७. **आयत्या बिळांत नागोबा बळी**--दुसऱ्याच्या श्रमाचें फळ, किं० यश, जो आपण घेऊं पाहतो तो.

६८१. **आर्ष**--" ऋषि " ह्या शब्दापासून "आर्ष" हें विशेषण. "आर्ष" म्ह० ऋषींसंबंधीं. ऋषींनीं केलेलें, किं० उच्चारलेलें. एके काळीं संस्कृत भाषा प्रचलित असल्याकारणानें तिच्यांत फेरबदल होत असत. म्हणजे कांहीं शब्द व रूपें हीं नष्ट होऊन नवीन शब्द व रूपें भाषेंत येत असत. ऋषींनीं आपल्या ऋचांत योजलेले शब्द व रूपें हीं जेव्हां अप्रचलित झालीं, तेव्हां त्यांना " आर्ष " ( म्ह० ऋषींनीं योजलेलीं ) असें म्हणत, व असे अप्रचलित शब्द व रूपें चालू नसल्यामुळें कानांला विचित्र लागत. यावरून " आर्ष " या शब्दाचा विचित्र, तऱ्हेवाईक, रूढ मार्ग न अनुसरणारा, असा अर्थ झाला.

६८२. **आला गेला**--यहीपाहुणा. अतिथि, अभ्यागत. उ० रेवदंड्यास नेन्यांच्या घरीं आल्यागेल्याचा पाहुणचार चांगला होत असे.

६८३. **आला दिवस**--जो दिवस उगवतो तो, म्ह० प्रत्येक दिवस. उ०

आम्ही मुंबई सोडल्यापासून आमचा मुलगा आला दिवस खेळतो आहे। अभ्यास बिलकूल करीत नाहीं।

६८४. **आली गेली**--नफानुकसान. यशअपयश. उ० तुम्ही सांगतां त्याप्रमाणें मी खरेदी विक्री वगैरें कामें चालवितों. मी आपली अक्कल लढवीत नाहीं. असें असून तुम्ही आली गेली मजवर लोटतां, याचा अर्थ काय ?

६८५. **घरीं आलेली**--विधवा. [आमचें "मराठी शब्दांचें उद्घाटन," पान ५८ पहा. ]

६८६. **इजा बिजा तिजा**--एकामागून एक असें तीन वेळां.

६८७. **इनमीन सवातीन**--अगदीं अल्पसंख्या. [ई=ही; न्=अन्=आणि; मी=मी स्वतः; सव्वा=" सवा " या नांवाची स्त्री, मिळून एकंदर तीन माणसें. ] उ० त्या सभेंत फार थोडे सभासद आहेत. उ० इनमीन सव्वातीन आहेत.

६८८ **इकडचा तिकडचा**—नाना ठिकाणचा.

## ६८९. उघडा.

१. **उघडा**—

( क ) ज्याच्यावर झांकण, पांघरूण, पोशाख, आच्छादन, वगैरे नाहीं असा. उ० थंडीच्या वेळीं अंगणांत उघडा हिंडूं नको.

( ख ) स्पष्ट दिसणारा; विशेष श्रम न करतां समजण्याजोगा; उ० त्या श्लोकाचा अर्थ अगदीं उघडा आहे.

( ग ) ज्याला आश्रय नाहीं, ज्याला रक्षिणारा कोणी नाहीं, असा. उ० आईबाप मेल्यापासून हें पोर उघडें आहे.

( घ ) जगजाहीर; लपून नसलेला; उ० माझे सारे व्यवसाय उघडे असतात.

( ङ ) नागडा उघडा; उघडा बोडका; अगदीं वस्त्ररहित; अंगावर वस्त्रें न घेतलेला.

२. **एकाद्याला उघडा पाडणें**—त्याला देऊं केलेली मदत न दिल्यामुळें त्याला संकटांत, किंवा पंचाइतींत, पाडणें. उ० दुकान उघडायाला निमें

भांडवल मी देईन असें मोरोपंत म्हणाला होता. पण त्यानें एक पैही भांडवल दिलें नाहीं आणि मला उघडें पाडलें!

३. **उघडा करणें,** किं० **पाडणें**--प्रसिद्ध करणें; लपवून ठेवावयाची गोष्ट प्रकट करणें. ह्याच अर्थानें "उघड्यावर आणणें," याचा उपयोग होतो.

४. **उघड्या माथ्यानें**—

(क) न लाजतां; न कचरतां.

(ख) निर्लज्यपणानें.

## ६९०. उचलला, किं० उचललेला.

१. **उचललेला पगार**—ठरवून टाकलेला, किं० नेमस्त केलेला, पगार.

२. **उचललेलें काम**--अंगीकारलेलें, किं० पथकरलेलें, काम.

३. **उचलला हात**--स्वेच्छेनें द्यावयासाठीं पुढें केलेला हात; उ० आई-बाप जें उचलल्या हातानें मला देतील तें मी घेत असतों.

४. **उचलला संसार**--तुटपुंज्या प्राप्तीवर चालविलेला संसार.

६९. **उडाण टप्पू**--जो कोणी एका विषयावर फार वेळ गुंतून न राहतां एकावरून दुसऱ्यावर, व दुसऱ्यावरून तिसऱ्यावर जातो तो; अस्थिर; चंचल; हातीं घेतलेलें कोणतेंही काम पुरतेपणीं करीत नाहीं तो. ह्या शब्दाच्या अर्थाचें विवरण आमचे "मराठी शब्दांचें उद्घाटन," पान २३ मध्यें पहा. ]

## ६९१. उणा.

१. **उणा**--कमी. कमती. योग्य, नेहेमीचें, किं० आवश्यक, जें परिमाण-त्याचेपेक्षां कमी.

२. **उणादुणा**--कमी ज्यास्ती. मर्यादा सोडून असलेला. अपमानकारक. उ० कोणाला उणेंदुणें बोलणें बोलूं नये.

३. **उणें उत्तर**—अपमानकारक, किं० तिरस्कारव्यंजक, भाषण. उ० तें गुडघ्याएवढें पोर आहे, पण चुलत्याला उणीं उत्तरें करतें! हा काय त्यांच्या घरचा मोठा तरी! उ० मी कोणाला उणें उत्तर कधीं करीत नाहीं, आणि कोणाचें उणें उत्तर ऐकून घेत नाहीं?

४. **एकाद्याचें उणें काढणें**--त्याच्या अंगचा उणेपणा स्पष्ट शब्दांनीं बोलून दाखविणें. त्याचीं वर्मेंकर्में काढणें, किंवा काढून त्याला टोमणे मारणें. उ० शेजारणीचें उणें काढण्यांत मला गे बाई काय मोक्ष मिळावयाचा आहे ?

५. **उणा पुरा**—सुमारें. उ० मला पुण्यास आल्याला उणा पुरा एक महिना झाला.

६. **अंगीं उणा तर जाणे खाणाखुणा**—ज्याला आपला कमीपणा ठाऊक आहे, तो लोकांची टीका आपल्याला चिकटावून घेतो.

६९२. **उपटसुंभ**—हक्क नसतां एकाद्या स्थानावर, किं० अधिकाराच्या पदावर, येऊन बसतो तो. वशील्याच्या जोरावर जो मनुष्य इतरांस तुडवून वरच्या जागेवर जातो तो. [ **टीपः**—ह्या शब्दाचें "उपटसुंभ्या," असेंही रूप योजण्यांत येतें. ]

## ६९३. उभा.

१. **उभा**—

( क ) न वसलेला. उ० उभा राहून किती वेळ बोलशील ? या झोपाळ्यावर बैस.

( ख ) उभारलेला; आडवा न ठेवलेला. उ० हें कपाट येथें उभें करावयाला जागा नाहीं.

( ग ) सिद्ध, तयार; उ० माझें घर विकत घ्यावयास कोणी उभा राहिला, म्हणजे मी घराची किंमत सांगेन.

( घ ) चालू. उ० माझें घर बांधण्याचें काम आज उभें आहे.

२. **उभा पाहारा**—खडा पाहारा. काळजीपूर्वक केलेली राखण.

३. **उभें काम**—जरूरीचें, किं० चालढकलीवर न लोटण्याजोगें, काम. उ० माझीं अगदीं उभीं कामें तीन आहेत. वनभोजनास तुमच्या मंडळीबरोबर यावयाला मला अगदीं फुरसूत नाहीं.

४. **उभें वैर, उभा दावा** किं० **द्वेष**—जागतें, न विझलेलें, न विझणारें, न विझवावयाचें, वैर इ०.

५. **उभा बाजार**--सबंध बाजार-ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंतचा सर्व बाजार. उ० तूं दाखविलेल्या रंगाची लोकर उभ्या बाजारांत मिळत नाहीं.

६. **उभें पीक**--न कापलेलें पीक.

७. **उभें वर्ष**--सबंध वर्ष; आरंभापासून तों अखेरपर्यंतचें वर्ष; उ० उभ्या वर्षांत मी आईबापांना भेटलों नाहीं. उ० उभ्या वर्षाला पुरण्याइतकी हळद मीं चैत्रांत दळली, पण माझ्या सुनेनें ती चार महिन्यांतच संपविली.

८. **उभा दोरा**--धावरी शिवण; ह्याच्या उलट " टीप. "

९. **उभा वारा**--अस्खलित, न खळणारा, वारा.

१०. **उभा पाऊस**--

( क ) ज्याच्या धारा लंब रेषेंत पडत असतात असा पाऊस. याच्या उलट " वांकडा पाऊस."

( ख ) न खळणारा. एकसारखा पडत असलेला.

११. **उभा रस्ता**--सबंध, किं० सरळ, रस्ता.

१२. **उभा लगाम**--कमानदार लगाम.

१३. **उभी चाकरी**--त्रासदायक, जिकीरीची, नौकरी.

१४. **उभी चौथ**—कृष्णपक्षांतील चतुर्थीच्या दिवशीं सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत पायांवर उभें राहण्याचें व्रत पाळणारे लोक ह्या तिथीस " उभी चौथ," असें म्हणतात.

१५. **उभी दुपार**, किं० **उभे दोन प्रहर**--ऐन मध्यान्ह.

१६. **उभी रास**--वांटण्या पाडावयाच्या अगोदर रास करून ठेवलेलें पीक, किं० धान्य.

१७. **उभी विळी**—न मिटणारी विळी.

१८. **उभें दुखणें**--अंथरुणाला न खिळविणारें दुखणें; साधारण दुखणें.

१९. **उभी कुडी**--उंच आणि सडपातळ बांधा. उ० ही गाय उभ्या कुडीची आहे.

२०. **उभा खडपा, उभा सूळ**, किं० **उभा सुळका**--लंब रेषेंत असलेली डोंगराची बाजू.

२१. **उभा करणें**—

(क) थांबविणें; उ० गाडी उभी कर.

(ख) लंबरेषेंत ठेवणें; उ० समई आडवी पडली आहे, ती उभी कर.

(ग) परत मिळविणें; उ० चिंचेच्या व्यापारांत पडलेलें माझें भांडवल उभें केल्याशिवाय मी तांदुळांत एक पैसाही घालणार नाहीं.

२२. **एकाद्याला उभा धरणें**—त्याला छळीत राहणें; त्याला विश्रांति न घेऊं देणें. उ० तुझें मूल भारी रडकें; आज सारा दिवस त्यानें मला उभें धरलें आहे. उ० सावकारानें मला कर्जासाठीं आज आठ दिवस उभें धरलें आहे.

२३. **एकाद्याला उभा जाळणें**—त्याला जाच करणें, किं० छळणें.

२४. **घामानें उभा न्हाणें**—घामानें सर्वांगीं डवडवून जाणें; उ० तुमच्या गांवाला ऊष्मा फार; मी घामानें उभा न्हालों आहें (म्ह० घामानें चिंब भिजून गेलों आहें).

२५. **उभा राहणें**--

(क) मिळणें; परत मिळणें; वसूल होणें; उ० व्यापारांत घातलेलें माझें भांडवल अद्यापि सारें उभें राहिलें नाहीं.

(ख) सिद्ध होणें; तयार असणें; उ० माझ्याशीं वेदांतावर बोलावयाला तुमच्यापैकीं कोण उभा राहतो तो राहूं द्या, मी त्याला हार जाणार नाहीं!

(ग) जवळ येऊन ठेपणें; उ० माझ्या मुलीचें लग्न उभें राहिलें आहे; तुम्हांला द्यावयाला मजजवळ पैसे नाहींत.

(घ) प्रतिबंध, किं० अडथळा, करावयास वाटेंत येणें; उ० आम्हां-सारख्या गरीबांच्या हौसा कशा भागाव्या? जेथें तेथें पैशाची उणीव उभी राहते.

(ङ) घडून येणें; उ० त्यावेळीं एक गोष्ट उभी राहिली, तेणेंकरून माझा बेत जागच्या जागींच राहिला.

२६. **एकाद्याला उभा असणें**--त्याला मदत करावयाला तत्पर असणें; उ० आम्हांसारख्या गरीबाला कोण उभा राहाणार ?

२७. **उभ्यानें यावें आणि ओणव्यानें जावें**-येते समयीं आपण ताठ्यांत आलों, तरी जातांना नम्रपणानें जाण्याला कचरूं नये ( म्हणजे प्रसंग पडेल तशा रीतीनें वागावयास आपली तयारी असली पाहिजे ).

२८. **उभें नेसणें, उभें लावून घेणें**, किं० **उभें लावणें**--लुगडें वगैरे अंगाभोंवतीं अर्धवट गुंडाळून घेणें [ घाईच्या वेळीं लुगडें नेसण्याची ही एक बायकांची तऱ्हा आहे ].

२९. **उभा इंद्र करणें**--एकाद्या कामाला पुन्हा सुरवात करणें.

३०. **एकाद्याला उभें वारें सुटणें**--त्याला अस्वस्थ वाटणें, किं० चैन पडेनासें होणें; उ० तुझ्या पोरीला मी पुन्हा आपल्या घरीं राहावयाला नेणार नाहीं; मागल्या शनिवारीं तिला नेली होती, तेव्हां तिला जसें उभें वारें सुटलें होतें !

३१. **उभ्यानें मुतावयाचें मग गुरूला काय विचारावें?**--एकादी गैरशिस्त गोष्ट जाणूनबुजून करावयाची, आणि मग तिच्याबद्दल गुरुजीस विचारावयाचें, हा मूर्खपणा होय !

३२. **उभांग माणूस**—अंगापिंडानें ताठ आणि उभ्या कुडीचा माणूस. [ उभांग=उभें आहे अंग ज्याचें असा. ]

### ६९४. उष्टा.

१. **उष्टा**—

(क) खाऊन, किं० भोगून, उरलेला; उ० ही उष्टी भाकरी भिकाऱ्याला दे.

(ख) अर्धवट, किं० पुरतेपणीं, भोगून, किंवा वापरून, टाकून दिलेला; उ० तें खोबर नारायणानें उष्टें केलेलें आहे, तें तूं खाऊं नको.

(ग) खाणें, किं० पिणें, झाल्यानंतर तोंड, किं० हात , ज्यानें धुतलें नाहींत असा; उ० मी उष्टा आहें, आंचवून आल्यावर हीं मोतीं पाहीन.

(घ) खाणें, किं० पिणें, झाल्यावर न धुतलेले असे हात, किं० तोंड.

उ० उष्टया हातानें तो कावळा देखील हाकणार नाहीं, ( म्ह० तो अत्यंत चिक्कू आहे. न धुतलेल्या हातानें कावळा हाकल्यास एकादें शीत उडून कदाचित् कावळयाच्या जवळ पडेल म्हणून. )

२. **उष्टी कल्पना**--दुसऱ्या माणसानें पूर्वीं काढलेली, परंतु आतां नवीन म्हणून सांगण्यांत येणारी, कल्पना; उ० उष्टया कल्पनांनीं तुझें पुस्तक भरलें आहे. याच अर्थानें "उष्टा विचार," "उष्टें भाषण," वगैरेंचा उपयोग केला जातो.

३. **उष्टा बोल**—पूर्वीं कोणी तरी काढलेला, किंवा सुचविलेला, विचार आपला म्हणून सांगणारा माणूस.

४. **उष्टा विटाळ**—जेवीत असतां, किं० जेवणें झाल्यावर, आंचवाव-याच्या अगोदरचा अपवित्रपणा. उ० उष्टया विटाळानें मला, किंवा ह्या पाण्याच्या हंड्याला, शिवूं नको.

५. **उष्टी हळद**--वधूच्या घरीं देवदेवक बसावयाच्या आधीं वधूस न्हावयास घालून तिच्या अंगास लावून उरलेली हळद वराच्या अंगास लावण्यासाठीं वाजत गाजत नेतात; ती हळद, किंवा ती हळद नेण्या-चा विधि.

६. **उष्टेखळी**--उष्टें अन्न टाकून द्यावयासाठीं केलेला खड्डा.

७. **उष्टा नवरा**--विजवराचा नवरा; उ० इतके दिवस मुलीला स्थल पाहातां पाहातां शेवटीं उष्टा नवरा पथकरावा लागला !

६९५. **एकछत्री राज्य**--एका राजाच्या हाताखालचा प्रदेश; ( ज्या प्रदे-शावर दुसरा कोणीही मालकी सांगावयाला येऊं शकत नाहीं. )

६९६. **काळांतून ओढलेला**—खावयाला न मिळाल्यामुळें किडकिडीत. उपासमारीमुळें जो मरावयाचाच परंतु मेला नाहीं असा. अति हड-कुळा. उ० चंद्रिकाबाईचीं मुलें जशीं काळांतून ओढल्यासारखीं दिसतात.

## ६९.७ ओला.

१. (क) ज्यांत पाण्याचा अंश मुरला आहे असा. भिजलेला. कोरडा नव्हे तो.

(ख) रसाळ. वाळून शुष्क न झालेला. उ० ही गुळवेलीची मुळी ओली आहे तोंपर्यंत तिचें सत्त्व काढा.

(ग) पैकेवाला. कंगाल नव्हे असा. उ० श्रीरामपंत दिसतो भिकाऱ्यासारखा; पण तो आंतून ओला आहे हो!

(घ) फायदेशीर. उ० हा व्यापार पहिल्यासारखा आतां ओला राहिला नाहीं.

(ङ) ज्यांत पैसे खळखळत आहेत असा (हात); पैसे खर्चावयाला तयार असा (हात); उ० "हात ओला तर मैत्र भला."

२. **ओलें कोरडें पाहून जेवणें**—चोखंदळेपणानें जेवणें.

३. **ओलें जाळणें**—कडक अंमल चालविणें. क्रूरपणानें अधिकार चालविणें.

४. **ओली कोरडी भाकर**—अल्पस्वल्प, जाडेंभरडें, अन्न. उ० प्रामाणिकपणानें जी ओली कोरडी भाकर मिळेल, तिची योग्यता लुच्चेगिरीनें मिळालेल्या तूपसाखरेपेक्षां ज्यास्ती आहे. उ० लाळघोटेपणानें पंचपक्वानें मिळालीं, तरी स्वाभिमानानें मिळालेल्या ओल्या कोरड्या भाकरीहून तीं कमी दरज्याचीं होत!

## ६९८. कच्चा.

१. (क) अपक्व. पुरतेपणीं न शिजविलेला, किं० न पिकलेला. उ० साळूबाई, तुमचा आजचा भात कच्चा आहे.

(ख) अपुरता, ओबडधोबड. ज्यावर अद्यापि सफाईचा हात मारलेला नाहीं असा. उ० कच्चा खर्डा. कच्चा मसूदा. कच्चा वेत. कच्चें चित्र.

(ग) सरासरीचा, ठोकळ मानाचा. उ० कच्ची हकीकत. कच्चा हिशेब.

(घ) बळकट नव्हे असें. उ० मातीचें काम कच्चें असतें. चुन्याचें काम पक्कें असतें.

(ङ) इयत्तेहून कमी. उ० आम्ही एका तासांत एक कच्चा कोस चालतों.

२. **कच्चींबच्चीं**—कच्चा म्ह० अपक्व. बच्चीं म्ह० पिलें. कच्चींबच्चीं=लहान मुलें.

## ६९९. कागदी.

१. **कागदी**—कागदाचा; कागदाचा केलेला; कागदोपत्रीं चालविलेला.

२. **कागदी इमारत**—अशक्त, कमजोर, इमारत.

३. **कागदी आंबा**—ज्याची त्वचा, किं० साल, फार पातळ आहे, असा आंबा.

४. **कागदी चिवा**—पोकळ वेळू [ याच्या उलट "भरीव चिवा" ].

५. **कागदी जवान**—अशक्त माणूस.

६. **कागदी लिंबू**—लहान आकाराचें व पातळ सालीचें एका जातीचें लिंबू.

७. **कागदी घोडे नाचविणें**—कागदावर कोरडी वाटाघाट करणें.

७००. **काडीचा**—काडीइतका देखील. अगदीं थोडा देखील. उ० तूं जे कागद लिहिलेस त्यांचा मला काडीचा उपयोग नाहीं !

## ७०१. काणा.

१. (क) ज्याला एकच डोळा आहे असा. उ० कावळा हा काणा पक्षी आहे.
[ **टीपः**—हाच " काणा " ह्या शब्दाचा मूळचा अर्थ. ] उ० "क्वचित् काणा भवेत् साधुः" म्ह० जो मनुष्य एका डोळ्यानें अंधळा आहे, तो बहुतकरून लुच्चा असावयाचा.

(ख) ज्याला बुबुळें तिरकस केल्याशिवाय दिसत नाहीं असा. तिरळा. उ० अक्रोडाच्या दोन कवचांना मधोमध भोकें पाडून तीं काण्या डोळ्यावर बांधिली असतां दृष्टि सरळ होते.

(ग) ज्यांत पाहिजे तेव्हां पाहिजे तो पदार्थ मिळूं शकत नाहीं असा देश, किंवा गांव.

(घ) वांकडातिकडा; तिरवागडा. उ० काणा पलंग, किं० वाज. उ० काणी इमारत.

२. **डोळा काणा असावा पण मूलूख काणा नसावा**—डोळ्यांत कांहीं व्यंग असलें तरी हरकत नाहीं, परंतु आपला देश धनधान्यादिकांच्या बाबतींत अपूर्ण, किं० असमृद्ध, नसावा.

३. **अंधळ्यांत काणा राजा**—जेथें सारेच अडाणी आहेत तेथें एखाद्या थोड्याशा शहाण्याचें तेज पडतें.

## ७०२. काळा.

१. (क) कृष्णवर्ण. उ० कावळयाचा रंग काळा.

२. **काळें करणें**—निघून जाणें, पळून जाणें. [ह्याचा नेहमीं वाईट अर्थानें उपयोग होतो.] उ० माझ्या घरांत क्षणभरही राहूं नको! ऊठ! काळें कर! उ० हा गुन्हा करून त्याणें काळें केलें!

**टीप**:—येथें "काळें" ह्याचें "तोंड" हें विशेषण अध्याहृत आहे.

३. **काळ्याचे पांढरे होणें**—म्हातारा होणें. केशांचा काळा वर्ण जाऊन ते पांढरे होणें. उ० तुमचे काळ्याचे पांढरे झालें आणि अझून "विनंति विशेष" कोणाला लिहावें, आणि "विज्ञापना विशेष" कोणाला लिहावें, हें तुम्हांला समजूं नये काय?

४. **त्याचे पांढऱ्याचे पुन्हा काळे झाले**—तो इतका म्हातारा झालेला असून व्यभिचाराकडे तरुणाप्रमाणें त्याची प्रवृत्ति होत आहे.

५. **काळा उन्हाळा**—

(क) चैत्र आणि वैशाख हे महिने. ह्या महिन्यांत उष्णता फार असल्यामुळें मनुष्य काळा होतो.

(ख) लाक्षणिक अर्थानें:—टंचाईची, किं० अडचणीची, वेळ. उ० तूं काळ्या उन्हाळयांत मजजवळ पैसे मागतोस, ते मी देऊं कोठून?

६. **काळा फत्तर**—अगदीं मूर्ख, किं० अडाणी, माणूस.

७. **काळी कांव**—काळ्या ढगांची पंक्ति. उ० दुपारीं आभाळांत काळी कांव उठली होती आणि पाऊस पडेल असा रंग दिसत होता. परंतु संध्याकाळपर्यंत ती विरली.

८. **काळी रात्र, किं० काळी शिळी रात्र**—ऐन काळोखी रात्र (जेव्हां कोणाचीही मदत मिळणें संभवनीय नसतें). उ० तुम्ही सोन्यांत वेलाशक पैसा घाला, कारण सोनें काळ्या रात्रीं उपयोगीं पडतें.

९ **काळे तोंड**—मनुष्यानें लाजिरवाणीं कृत्यें केल्यामुळें कलंकित झालेलें तोंड. उ० तुझें काळें तोंड दृष्टीआड कर एकदाचा!

१०. **काळें पाणी**—मोठ्या अपराधाबद्दल शिक्षा म्हणून जो दूरचा

राहावयास ठरविलेला असतो तो. उ० खुनाच्या कृत्यांत सामील असल्याच्या आरोपावरून त्याला काळ्या पाण्यावर पाठविण्यांत आलें.

११. **काळें वेरें**—कपट. उ० माझ्या मनांत कांहीं काळेंवेरें नव्हतें.

१२. **काळानिळा**—अंशतः काळा आणि अंशतः निळा. उ० मीं त्याला इतका चोप दिला, कीं त्याची पाठ काळीनिळी झाली !

१३. **काळासांवळा**—साधारण काळा.

## ७०३. काळी.

१. काळी जमीन–शेतकीच्या उपयोगाची जमीन. शेतकीकडे लाविलेली जमीन. उ० काळी पिकली म्हणून पांढरी वांचली ( म्ह० शेतें चांगलीं पिकलीं म्हणून गांव, किं० गांवांत राहणारे लोक, वांचले ).

२. म्हैस. उ० " ज्याचे घरीं काळी त्याची सदा दिवाळी."

७०४. **कोरा करकरीत**—

( क ) अगदीं कोरा.

( ख ) ज्याच्यावर शिक्षणाचा, उपदेशाचा, वगैरे कांहीं परिणाम झाला नाहीं असा.

७०५. **गेला बाजार तरी**—बाजाराची घडामोडीची वेळ सरल्यावर देखील. पुष्कळ गिऱ्हाईक नसतांना देखील. किमान पक्षीं. उ० ह्या घड्याळाची मला गेला बाजार तरी सतरा रुपये किंमत येईल.

७०६. **घाशीरामी**—जुलमी, मूर्खपणाची, कारकीर्द. [ पूर्वी " घाशीराम " ह्या नांवाचा एक मूर्ख आणि जुलमी कोतवाल होऊन गेला, त्यावरून हा शब्द निघालेला आहे.

७०७. **चंगीभंगी**—चैनबाजींत, किं० रंगेलपणांत, निमग्न. गांजा वगैरे व्यसनांच्या अधीन. उ०

वेदशास्त्रपूर्ण निपुण । जाउनि ब्राह्मणगण ।
चंगीभंगी मूढ पूर्ण । तुजसि आज लाधले ॥

नरहर शंकर राहाळकर.

७०८. **चावून चिकट**—पुष्कळ वेळपर्यंत चावल्यामुळें चिकट झालेला. लाक्षणिक अर्थानें:—फार वेळ वाटाघाट केल्यामुळें कंटाळवाणा झालेला.

## ७०९. छांदिष्ट.

"छंदस्" ह्याचा पद्य, किं० वेद, असा मूळचा अर्थ. संस्कृत भाषा ही एकदा प्रचलित म्हणजे बोलण्याची भाषा असल्याकारणानें प्रचलित भाषेच्या नियमांप्रमाणें तींमध्यें हरएक फेरफार कालगतीनें होत गेले. × × × ह्या नियमांप्रमाणें कांहीं शब्द व रूपें वगैरे हीं संस्कृत भाषेंतून नाहींशीं झालीं तेव्हां त्यांस 'छांदस' म्हणजे वेदांतील असें पाणिन्यादि वैयाकरणांनीं नांव दिलें. × × × त्या वेळेस 'छांदस' शब्दांमध्यें निंदेचा अर्थ बिलकूल नव्हता. परंतु लोकव्यवहाराच्या बाहेरचा असा सामान्य अर्थ घेऊन लोकांनीं "छांदस" शब्दाचा अर्थ तऱ्हेवाईक, चमत्कारिक, जनाची पर्वा न बाळगणारा, असा निंदाव्यंजक केला.

मराठी शब्दांचें उद्घाटन—वि० वा० भिडे.

७१०. जागा—

१. अनिद्रित. झोंपेंत नाहीं असा. उ० ढेकणांच्या उपद्रवामुळें काल सारी रात्रभर मी जागा होतों.

२. दक्ष. काळजी वाहणारा. सावध. उ० गोविंदरावाशीं व्यवहार करतांना जागा अस, नाहींतर फसशील.

३. स्वस्थ. शांतचित्त.

१. **जागता**—दक्ष, सामर्थ्य, अधिकार, कर्तबगारी, शक्ति, इत्यादिकांनीं परिपूर्ण.

२. **जागतें देवस्थान**—जेथील देव कडक असें स्थान.

३. **जागता मंत्र**—इष्ट कार्य घडवून आणावयाला पूर्णपणें समर्थ असा मंत्र.

४. **जागतें औषध**—निश्चयानें गुण करणारें औषध.

५. **जागता धर्म**—लोकांकडून शुद्ध स्वरूपांत पाळला जाणारा धर्म.

६. **जागती भाषा**—प्रचलित, चालू, भाषा. उ० आज मराठी जागती भाषा आहे, संस्कृत जागती नाहीं.

७. **जागती ज्योत**—कडक देव, किं० मंत्र, अत्यंत दक्ष, म्ह० सर्व बाजूंस सारखी नजर ठेवून असणारा, माणूस.

८. **जागतें ज्ञान, जागती विद्या**—न विसरलेलें ज्ञान, किं० विद्या.

९. **जागती झोंप**—गाढ नव्हे अशी झोंप.

७११. **जातीचा**—

(क) खरा. इरसाल. जातिवंत. उ० जातीचा घोडा.

(ख) ह्याडाचा. स्वभावतः. उ० रामा जातीचा गरीब आहे.

७१२. **झांकल्या पाठीचा**—ज्याला कांहीं सबब सांगतां येईल, किं० जें फारसें अक्षम्य म्हणून समजलें जाणार नाहीं, असा ( अपराध वगैरे).

७१३. **टळटळीत दुपारीं**—भर दुपारीं. ऐन दोन प्रहरीं.

## ७१४. डोळस.

१. (क) डोळ्यांनीं पहावयाला समर्थ. ( ह्याच्या उलट अंधळा ).

(ख) ज्याची नजर भारी तीक्ष्ण अथवा सूक्ष्म आहे असा.

(ग) शाहाणा, चाणाक्ष, धूर्त, हुषार.

२. **डोळस वरण**—ज्यांतील डाळीचीं सालपटें शिजविण्याच्या पूर्वी निवडून काढलेलीं नाहींत, असें वरण. [ ह्या अर्थासंबंधानें मतभेद आहे. ]

७१५. **ताकपिठ्या**—खाद्यांमध्यें ताकपिठाची जी योग्यता, त्या योग्यतेचा माणूस. भिकार. हलक्या दर्जाचा.

## ७१६. तिखट.

१. (क) जिभेला झोंबणारा; उ० लवंगी मिरची भारी तिखट असते. उ० हा मसाला फार तिखट झाला आहे.

(ख) प्रखर. जीव कासावीस करणारा; उ० आजचें उन्ह भारी तिखट आहे.

(ग) तीक्ष्ण धारेचें; उ० ही विळी फार तिखट आहे.

(घ) लवकर जाणण्याची, समजण्याची, किं०ओळखण्याची, ज्याला ताकद आहे असा; उ० तिखट कान; तिखट डोळे; तिखट बुद्धि, इ०.

(ङ) मर्मभेदक; काळजाला घरें पाडणारें; उ० त्याचें भाषण फार तिखट होतें.

२. **तिखट जाळ**, किं० **आग**—फारच तिखट, अगदीं विस्तवाप्रमाणें.

३. **पदार्थांत तिखटमीठ घालणें**—त्यांत मसाला वगैरे घालणें.

४. **एखादी गोष्ट तिखटमीठ लावून सांगणें**—अतिशयोक्ति करून,

किं० रंगेलपणानें, एकादी गोष्ट सांगणें; उ० तेथें घडलेला वृत्तांत मीं तिखटमीठ लावून सांगितला.

५. **कानामागून आलें शिंगट तें झालें अतितिखट**—गुरांना जन्मतःच कान असतात, आणि नंतर कित्येक दिवसांनीं शिंगें फुटतात; परंतु हीं मागून उत्पन्न झालेलींच शिंगें कानांपेक्षा अधिक बोचणारीं, व अधिक उपद्रव करणारीं असतात; ह्या दाखल्यावरून लहान माणूस मोठ्या माणसाला उपदेश करूं लागला, किंवा त्याचे दोष दाखवूं लागला, म्हणजे त्याची निंदा करतांना ही म्हण योजतात.

६. **पुढें तिखट आणि मागें पोंचट**—पहिल्यानें अवसान दाखवून नंतर भ्याडपणामुळें मागें हटणारा.

७१७. **तैलबुद्धि**—बुद्धिमान् माणूस. पाण्यावर तेल जसें पसरतें, तशी ज्याची बुद्धि एकाद्या विषयावर पसरते, म्हणजे एकाद्या विषयाचें आक्रमण, किं० आकलन, करते असा माणूस.

### ७१८. थक्क.

१. आश्चर्यादि भावनांनीं स्तब्ध झालेला.

२. **थक्क करणें**—आश्चर्य वाटविणें. उ० आपला जोसेफ् जगाला थक्क करून सोडील × × हें त्या विचारीच्या स्वप्नांतही कधीं आलें नसेल !

न ० चिं० केळकर—ग्यारिबाल्डी.

७१९. **दर्भ्या**—मृताची उत्तरक्रिया सांगणारा ब्राह्मण. [ पुण्याकडे त्याला "कारटा" असें म्हणतात. तो हातांत दर्भ घेऊन तयार असतो, ह्यावरून त्याला "दर्भ्या" असा शब्द योजतात. व्यवहारांत त्याचा अर्थ "अपशकुनी, नाशकारक, उपद्रवी माणूस," असा होतो. ]

७२०. **दारिद्रनाम संवत्सरें**—अत्यंत दरिद्री. ज्या संवत्सराचें नांव "दरिद्र" असें आहे तें संवत्सर, म्ह० वर्ष. ज्या वर्षांत दारिद्र्य भोगावें लागतें, तें वर्ष, असा मूळचा अर्थ; नंतर अत्यंत दरिद्री असा अर्थ झाला.

७२१. **दिवटा**-बेअकली माणूस. "दिवटी" म्ह० मशाल. मशाल प्रकाश पाडते, तसा हा माणूस आपल्या कुळावर पराक्रमानें प्रकाश पाडतो. "प्रकाश" ह्याचा लाक्षणिक अर्थ काळोखी, किं० कालिमा.

७२२. **दीड शाहणा**—मूर्ख, बेअकली.

१. **दीड दमडीचा**—ज्याची किंमत दीड दमडी, म्ह० अत्यल्प, आहे असा. कुचकिमतीचा. भिकार. नादान.

७२३. **दीड दमडीचा शिपाई**—भितरा म्हणून लढण्याच्या कामीं ज्याचा कांहीं उपयोग नाहीं असा शिपायी.

७२४. **द्राक्षापाकात्मक**—अतिस्पष्ट, उघडा, आणि मधुर. क्लेश न देणारा. उ० द्राक्षापाकात्मक जी कविता तीच उत्कृष्ट होय.

७२५. **नसता**—निरुपयोगी. अनावश्यक. विनाकारण. उगीचच्या उगीच. उ० यमकादिकांच्या नसत्या अडचणी लावून घेतल्यानें मराठी कवितेंत कमीपणा आला आहे, असें कित्येकांचें म्हणणें आहे. उ० नसत्या पंचाइतींत तूं पडतोस कशाला? उ० तुला ही नसती खटपट हावी कशाला?

७२६. **नांवाचा**—

(क) खरा. त्या नांवाला खरोखरी योग्य. उ० हें काम मी त्याच्याकडून करवीन तरच नांवाचा!

(ख) नांवापुरताच. केवळ नांव धारण करणारा. नामधारी. उ० सारा कारभार वजीराचे हातांत असे. हा नांवाचा मात्र बादशाहा होता.

७२७. **न्हातीधुती**—वयांत आलेली स्त्री.

७२८. **लेखणीचा धड**—लेखनाच्या कामीं जो चतुर तो.

७२९. **पंडितंमन्य**—अंगीं विद्वत्ता नसून जो आपण पंडित म्हणून दिमाख करतो तो.

## ७३०. पांढरा.

१. **पांढरा**—श्वेतवर्ण, शुभ्र, सफेत.

२. **पांढऱ्या पायाचा**—वाईट गुणांचा. अपशकुनी. उ० हें पांढऱ्या पायाचें पोर घरांत आल्यापासून आमच्यामध्यें कलागती सुरू झाल्या!

३. **पांढरा कावळा**—निसर्गांत नसलेली वस्तु. खपुष्प, वंध्यापुत्र, वगैरेंप्रमाणें.

४. **पांढरा परीस**—लबाड माणूस. अट्टल सोदा.

५. **पांढरी पोळी**—साधी पोळी ( पुरणपोळी, गुळाची पोळी, इ०च्या उलट ).

६. **पांढरें पाणी**—पातळ ताक. उ० आम्हां कोंकणस्थांना मागल्या भातावर थोडें तरी पांढरें पाणी लागलेंच; तुम्हां देशस्थांचें अंबट वरणावर चालतें.

७. **पांढरीचा डाळा**—गांवचा महार.

८. **पांढऱ्यावर काळें करणें**—कागदावर नमूद करणें. लिहिणें. कागदाचा रंग पांढरा असतो, व शाईचा रंग काळा असतो, त्यावरून ह्या वाक्याचा अर्थ " कागदावर लिहिणें, " असा झाला. उ० तोंडानें हावें तें बोला, पण कधीं पांढऱ्यावर काळें करूं नका ( म्हणजे लेखानें आपणास बांधून किंवा अडकावून घेऊं नका ). उ० तो पाटील इतका श्रीमंत, वजनदार, आणि कर्तबगार माणूस आहे, परंतु त्याला पांढऱ्यावर काळें करतां येत नाहीं ( म्ह० त्याला लिहितां येत नाहीं ).

७३१. **पाताळयंत्री**—गुप्त मसलती करणारा. ज्याचें यंत्र पाताळांत ठेविलें असल्यामुळें दिसत नाहीं, पण तेथें कळ दाबल्याबरोबर फार अंतरावर कार्य घडवितें, असा माणूस.

७३२. **पायलीचे पंधरा**—अतिविपुल.

## ७३३. पालथा.

१. ज्याचें तोंड खालीं आहे असा. उ० पालथ्या घागरीवर पाणी ओतणें हें फुकट आहे.

२. **घर, गांव, वगैरे पालथें घालणें.**

( क ) हरवलेली वस्तु शोधण्यासाठीं घर, गांव, वगैरेंचा कानाकोपरा पाहाणें. उ० चमेलीबाईचा एक दोन आणे किंमतीचा फुटका चांदीचा मणि हरवला होता, त्याच्यासाठीं तिणें सारें घर पालथें घातलें !

( ख ) घर, गांव, वगैरेंमध्यें भटकणें. उ० ह्या मुलाला रांगतां येऊं लागल्यापासून तें सारें घर पालथें घालूं लागलें आहे. उ० रामाला सुटी असली म्हणजे तो सारा गांव पालथा घालतो.

३. **एखाद्याला पालथा घालणें**—त्याला पराजित करणें. उ० गोविंद-शास्त्री आरनाळकर मोठ्या ऐटीनें न्यायशास्त्रावर माझ्याशीं वादविवाद करावयास आले. पण त्यांना मीं असें पालथें घातले कीं यंवरे यंव!

७३४. **पोकळ**—रिकामा. ज्यांत तथ्य, सत्त्व, खरेपणा, नाहीं असा. उ०

लोक बोलती धर्म जया, केवळ पोकळ असे ध्वनी ।
कांहीं नसतां दृश्य जनीं, देइ कल्पना रूप तया ॥ माधवानुज.

७३५. **फाटक्या अंगाचा**—कृश, रोडका, हाडक्या.

७३६. **फुटक्या तिन्ही सांजा**—ऐन संध्याकाळीं, किं० अगदीं संध्याकाळच्या वेळीं. उ० फुटक्या तिन्ही सांजा मी तुम्हांला खायाला कांहीं देखील देणार नाहीं! (ही शब्दसंहति नामाप्रमाणेंही योजली जाते.)

७३७. **बट्टू होणें**—कलंकित होणें. उ० कोणाचेंही नांव एकदा बट्टू झालें म्हणजे त्याचा जन्म फुकट जातो!

७३८. **बत्तीसगुणी**, किं० **बत्तीसलक्षणी**—पुरुषांचीं व बायकांचीं लक्षणें ३२ कल्पिलीं आहेत, तीं सारीं ज्या पुरुषाच्या, किं० स्त्रीच्या, ठायीं आहेत असा पुरुष, किं० अशी बायको.

७३९. **बाजीराई**—बाजीरावी, म्ह० दुसऱ्या बाजीरावाप्रमाणें थाटमाट. ह्या बाजीरावाला थाटमाट आणि विलास फार आवडत असत.

७४०. **बारा घरचे बारा**—अनेक ठिकाणचे अनेक, जे परस्परांशीं कोणत्याही नात्यानें संबद्ध नाहींत असे.

७४१. **बारा बंदरचें पाणी प्यालेला**—चवचाल माणूस. अनुभाविक माणूस.

## ७४२. बालबोध.

१. मुलांना समजण्यासारखें, सोपें.

२. एक प्रकारची लिपि [ ज्या लिपींत हें पुस्तक छापलेलें आहे ती. याच्या उलट " मोडी लिपि." ]

३. **बालबोध माणूस**–सरळ मार्गानें चालणारा, ज्याला छक्केपंजे ठाऊक नाहींत असा, माणूस.

४. **बालबोध घर**–ज्या घरांत सारीं सरळमार्गी माणसें आहेत, असें

घर. ज्या घरांत आलीकडचे ढंग ( चारगटपणा, किं० पद्धति ) शिरल्या नाहींत असें घर. याचप्रमाणें "बालबोध घराणें," "बालबोध कुटुंब" हे प्रयोग योजतात.

७४३. **बाहेरचा**—अस्पृश्य जातीचा, म्ह० महार, मांग, कातकरी, वगैरे जातीचा.

**टीपः**—व्युत्पत्ति, जो घराच्या बाहेरच उभा राहतो तो. जो धर्मशास्त्राच्या नियंत्रणेप्रमाणें घरांत येऊं शकत नाहीं तो.

### ७४४. फुकट.

१. फुकट-( क्रियाविशेषण ) मोबदल्याशिवाय. किंमत न देतां. श्रम न करतां. विनाकारण. ( विशेषण ) ज्याला किंमत पडली नाहीं, किं० दिली नाहीं, किं० ज्याच्याबद्दल किंमत मिळाली नाहीं, असा.

२. **फुकट आणि चोखट**—पदार्थ फुकट मिळावा आणि पुन्हा तो चांगला असावा ( अशी इच्छा करणें ).

७४५. **बिलंदर लुच्चा**—अट्टल लुच्चा. "बुलंद" ह्या फारशी शब्दाचा उंच असा अर्थ असून मराठींत बिलंद, किं० बिलंदर, ह्याचा "अट्टल सोदा" असा अर्थ झाला आहे. ( आमचें "मराठी शब्दांचें उघ्दाटन," पान ५१ पहा. )

७४६. **बेगडी**—दिसण्यांत भपकेदार पण आंतून हलका, पोकळ, किं० नकली. उ० बेगडी मानमरातवाला भुलून पुष्कळ नराधम आपल्या नातलगांना शत्रूंच्या हवालीं करतात.

७४७. **मरतमढ्यासारखा**—अशक्त. उ० तुला खायाला यथेच्छ मिळत असून असा मरतमढ्यासारखा कां दिसतोस, किं० चालतोस, किं० काम करतोस? [ मढ्याच्या अंगांत कांहीं शक्ति, किं० काम करण्याचें सामर्थ्य, नसतें. त्याच्या मागें "मरत" हें पुनरुक्तिपर विशेषण अर्थ जोरदार करण्याकरितां जोडिलेलें आहे. ]

७४८. **माभळभट्टी**—अजागळ, गैबती, बावळट, असा जो मनुष्य त्याला माभळभटाची उपमा देतात; आणि बावळटासारखें जें कांहीं तें माभळभट्टी. उ० आज हें असें माभळभट्टी धोतर कां नेसलास? उ० माभळभ-

टासारखें पागोटें. "गोठणच्या गायी आणि माभळभट दान देई," ह्या म्हणींत "माभळभट" म्हणजे कोणी तरी मूर्ख, किं० वेडा ब्राह्मण असा आहे.

## ७४९. मुका.

१. (क) जिव्हेंत कांहीं उणेपणा असल्यामुळें ज्याला मुळींच शब्दोच्चार करतां येत नाहीं असा.

(ख) ज्यांना बोलतां येत नाहीं अशीं (जनावरें). उ० मुक्या जनावरांला मारूं नका.

(ग) जो रागानें, किंवा हिरवटपणामुळें, बोलत नाहीं असा.

२. **मुकें गळू**—ज्याला अझून तोंड फुटलें नाहीं असें गळूं.

३. **मुका नारळ**—जो कोंवळा असल्यामुळें वाजत नाहीं, असा नारळ.

४. **मुकें भिजाणें**—पाण्यांत भिजत घातल्यावर आणि मोड फुटावयाच्या अगोदरचें जें भिजाणें (हरभरे, पावटे, वगैरे) तें. उ० हे पावटे अजून मुके आहेत; त्यांची उसळ आज करूं नको.

५. **मुकें फुल**, किं० **पान**—पुरतें न उमललेलें, किं० कळीच्या स्थितींत असलेलें फूल, किं० पान.

६. **मुकें फळ**—पूर्णपणें परिपक्व न झालेलें फळ.

७. **मुकें यंत्र**—चालतांना, म्ह० काम करीत असतां, ज्याचा आवाज होत नाहीं, किं० विशेषसा आवाज होत नाहीं, असें यंत्र. (याचप्रमाणें "मुका चरक," "मुका घाणा," वगैरेंचा उपयोग होतो).

८. **मुका गोंवर**—ज्यांत पुटकुळ्या फुटत नाहींत असा गोंवर.

९. **मुकें दंद (द्वंद्व)**, किं० **मुका दावा**—मनांत ठेवलेलें वैर.

१०. **मुका मार**—वैरामुळें, किं० दुष्टपणानें, गुप्तपणें केलेली हानि. जो मार दिला असतां पुराव्याला अंगावर कांहीं खुणा राहात नाहींत असा मार.

११. **मुकी अर्जी**—एकाद्याची नालस्ती करण्यासाठी बिनसहीचा, किंवा खोट्या सहीनें केलेला, अर्ज; उ० मुक्या अर्ज्या करून गोंधानें आजपर्यंत किती तरी लोकांचीं नुकसानें केलीं आहेत!

१२. **मुका म्हसोबा**—हलक्या जातीच्या लोकांचा एक देव.

१३. **मुकी मण्यार**—हिरवट माणूस.

१४. **मुकें जनावर**—*ज्याला बोलतां येत नाहीं असें जनावर; ज्याला मारलें असतां ओरडून आपलें दुःख व्यक्त करतां येत नाहीं, असें जनावर.* उ० मुक्या जनावराला मारणें वाईट आहे.

**टीप**—येथें "मुकें" हा शब्द जनावराची दीन स्थिति जोरदार रीतीनें दाखविण्यासाठीं योजलेला आहे. असाच प्रयोग "भरतमढें" हा लक्ष्यांत ठेवण्याजोगा आहे.

### ७५०. मेला, किं० मेलेला.

१. (क) *ज्याच्या शरीरांतून प्राण निघून गेला आहे, असा (प्राणी); मृत.*
(ख) *ज्याची जीवनक्रिया आणि वर्धनक्रिया बंद झाली आहे, असें (झाड).*
(ग) *ज्याचें वीर्य, (म्ह० विरी), नष्ट झालें आहे असा (चुना वगैरे).*

२. **मेली भाकर**—*ज्याच्या अंगीं पोट भरण्याची धमक नाहीं, आणि जो दुसऱ्यावर भारभूत होऊन राहातो, तो जें अन्न खातो, त्याला "मेलेलें अन्न," " मेलेली भाकर," असें म्हणतात.*

३. **मेलें काम**—निरुत्साहानें केलेलें, किं० चालविलेलें, काम.

४. **मेलेलें तेल**—समई वगैरे दिवा मालविल्यावर जें अवशिष्ट तेल तें.

५. **मेलेलें पाणी**—आधण आणून नंतर पिण्यासाठीं गार केलेलें पाणी.

६. **मेलेलें रक्त**—*म्हातारपणामुळें अंगांतील रक्त कमजोर होतें तें.*

७. **मेलेलें हत्यार**—निरुपयोगी हत्यार.

८. **मेलेल्या आईचें दूध प्यालेला**—कर्तृत्वशून्य. उ० मला कशाला भीति घालतोस? मीं कांहीं मेल्या आईचें दूध प्यालेला नाहीं! तूं एक रद्दा चढविलास तर मी दहा चढवीन!

७५१. **यथास्थित**—जितकें पाहिजे असेल तितकें. खूप. मनमुराद. तृप्ति होण्याइतकें. उ० आम्ही माटेकराच्या दुकानांत यथास्थित भजीं खाल्लीं. उ० लोकांच्या घरीं जेवावयाला गेल्यावर यथास्थित पक्वान्नें खावीं! मागें पुढें पाहूं नये!

**टीपः**—" यथास्थित," ह्याचा मूळचा अर्थ " जसें होतें तसें, किं० तशा रीतीनें."

## ७५२. रिकामा.

१. ( क ) पोकळ. ज्याच्या आंत कांहीं नाहीं असा. उ० ही घागर रिकामी आहे, ( म्ह० पाण्यानें भरलेली नाहीं. ) उ० हें रिकामें घर आहे, ( म्ह० त्यांत कोणी राहात नाहीं ). ही खोली रिकामी आहे, ( म्ह० हींत कांहीं सामानसुमान नाहीं ).

( ख ) पुराव्यानें, प्रमाणानें, उदाहरणानें, वगैरे ज्याची सत्यता, किं० यथार्थता, सिद्ध करून देतां येत नाहीं, असा. उ० रिकामा डौल. रिकामी स्तुति.

( ग ) ज्या जागेवरचा अधिकारी, किं० कोणीही काम करणारा, गैर-हजर आहे, किं० अद्यापि नेमिलेला नाहीं, अशी. उ० ह्या कचेरींत तीन कारकुनांच्या जागा रिकाम्या आहेत.

( घ ) निरर्थक. निष्फळ. निष्प्रयोजन. उ० रिकामी दगदग. रिकामी पायपिटी. रिकामी चौकशी. रिकामें बोलणें.

( ङ ) जरूर ती सामुग्री, हत्यारें, वगैरे ज्याचेजवळ नाहींत असा. उ० माझीं हत्यारें सारीं घरीं आहेत. मी रिकामा तुमच्या घरीं येऊन काय करणार ?

( च ) ज्याला उद्योग, किं० धंदा, नाहीं असा. उ०

मायबापांवर रुसूं नको । दूर एकला बसूं नको ।
व्यवहारामधिं फसूं नको । कधीं रिकामा असूं नको ॥

अनंतफंदी.

उ० "रिकामा न्हावी भिंतीला, किं० कुडाला, तुंबड्या लावी." उ० मी बी. ए. पास झाल्यापासून रिकामा आहें. कोठें नोकरी असल्यास सांगा.

( छ ) एकटा. उ० मी तुला पुढें घालून घेऊन जाणार ! रिकामा परत जाणार नाहीं, ( म्ह० तुला बरोबर घेतल्याशिवाय ).

२. **रिकामटेकडा, रिकामटवळा**—निरुद्योगी.

३. **रिकामचावडी,** किं० **रिकामटेकडी**—निरुद्योगी लोकांची बसावयाची जागा.

४. **रिकामचेष्टा**—निरुद्योगी माणसाचे चाळे.

५. **रिकामे ढंग**—निष्फळ, निरुपयोगी, विलास, किं० इष्क्या.

६. **रिकामा वेळ**—फुरसुतीचा वेळ.

७. **रिकाम्या रानीं**—विनाकारण. फळाची आशा, किं० संभव, नसतां. उ० तुमचें तिकडे कांहीं का होईना ? मला काय त्याची पंचाईत ? रिकाम्या रानीं मी कशाला आपल्याला त्रास करून घेऊं ?

**टीपः**—ज्या रानांत शिकारी जनावरें सांपडण्याचा संभव आहे, त्याच रानांत शिकारी माणूस जातो. रिकाम्या रानांत जात नाहीं. ही चाल वरील प्रयोगाचें मूळ आहे.

### ७५३. रोकडा.

(क) नाण्याच्या रूपानें असलेला (पैसा). उ० आम्ही शेतकरी लोक श्रीमंत असतों, पंचवीस पंचवीस माणसांचीं कुटुंबें पोसतों, परंतु आमच्या जवळ कधीं रोकडा पैसा असावयाचा नाहीं.

(ख) रोखठोक. स्पष्ट.; शंकाबाह्य. संशय न राहूं देणारा. धडधडीत. उ०.

सध्या रोकडें प्रमाण । कांहीं करावें न लगे अनुमान ।
नाना प्रकारचें जीवन । पृथ्वीचे आधारें ॥

रामदास—दासबोध.

२. **रोकडा जबाब**—भीड, किं० मुरवत, न बाळगतां स्पष्ट शब्दांनीं दिलेलें उत्तर.

### ७५४. लंगडा.

१. (क) ज्याच्या पायांत कांहीं उणेपणा आहे, आणि म्हणून ज्याला नीट चालतां येत नाहीं, असा (माणूस, जनावर, इ०).

(ख) ज्यांत कांहीं उणेपणा असल्याकारणानें ज्यानें नीट चालतां येत नाहीं असा (पाय).

(ग) जरूर ती वस्तु, भाग, किं० अवयव, नसल्यामुळें कामाला निरुपयोगी असें (यंत्र वगैरे).

(घ) ज्याच्या मदतीला हुशार, किंवा कर्तबगार, इसम नाहीं असा माणूस.

७५५. लठ्ठ—स्थूल. जाडी. "लठ्ठ निरंजन," किं० "लठ्ठ भारती," ह्याचाही तोच अर्थ होतो.

७५६. **लब्धप्रतिष्ठ, किं० लब्धप्रतिष्ठित**—जो खरोखरीं प्रतिष्ठित नाहीं, पण प्रतिष्ठितपणाचा डौल दाखवितो, व लोकांनीं आपणाला विचारावें अशी इच्छा करतो, तो. [ सं० मिळविली आहे कीर्ति, किं० मानमान्यता, ज्याणें असा. व्यवहारांत "लब्धप्रतिष्ठ," "लब्धप्रतिष्ठित" ह्यांचा उपयोग नेहेमीं उपहासानें करतात. ]

७५७. **लोणकढें**—

(क) शुद्ध लोणी कढवून तयार केलेलें (तूप). साजूक (तूप).

(ख) अगदीं खोटा. बनावट. उ० लोणकढी थाप.

## ७५८. वांकडा.

१. (क) सरळ नाहीं तो. उ० वांकडा रस्ता.

(ख) प्रतिकूल. वैरी. उ० तो मला वांकडा होता म्हणून ती जागा मला मिळाली नाहीं.

(ग) योग्य तो मान, योग्य त्या माणसाला, किं० वस्तूला, जो देत नाहीं तो. उ० सन्मार्गाला वांकडा असूं नको.

२. **वांकडें पडणें**—सलोख्याचा, किं० मैत्रीचा, संबंध नाहींसा होणें. उ० गोविंदराव आणि लक्ष्मणराव ह्यांचें आज तीन वर्षें वांकडें पडलेलें आहे.

३. **एकाद्याला वांकडें दाखविणें**—त्याला वेडावणें. त्याच्यापुढें तोंडें वेडींवांकडीं करणें.

४. **वांकडी पगडी करून**—दिमाखानें. बेमुरवतीनें.

५. **वांकडें पाऊल पडणें**—भलत्याच मार्गानें जाणें. उ० उगीच भरमसाटपणें बोलूं नका. माझें कोठें वांकडें पाऊल पडलें तें दाखवा, आणि बेलाशक माझा कान उपटा !

६. **वांकडी नजर, किं० वांकडा डोळा**—

(क) नुकसान करावयाच्या इच्छेनें फेंकिलेली दृष्टि. नुकसान करावयाची इच्छा. उ० तूं माझ्याकडे वांकड्या नजरेनें पाहूं लागलास, तर मी

किती दिवस टिकाव धरूं शकेन ? उ० रामभाऊंच्या घराकडे दैवानें वांकडी नजर केली आहे खास !

(ख) पापी दृष्टि. उ० विठ्ठलराव वांकड्या नजरेनें स्त्रियांकडे पाहातात.

७. **वांकडी समजूत**—खोटा ग्रह. वस्तुस्थितीशीं न जमणारें मत.

### ७५९. वेडा.

१. (क) ज्याच्या मेंदूंत बिघाड झाला आहे असा. उ० हा वेडा आहे.

(ख) मूर्ख. मूर्खपणाचा. उ० वेड्यासारखा बोलूं नको. उ० ही वेडी कल्पना तुझ्या डोक्यांत कोणीं घातली ?

(ग) आसक्त. मोहित. उ० त्या गवयानें मला अगदीं वेडा करून सोडलें !

२. **वेडें पीक**—एकदा येऊं लागलें म्हणजे पुष्कळ येणारें पीक.

३. **वेडा पीर**—मूर्ख, मरगळ्या, माणूस.

४. **वेडा मधुरा**—एक प्रकारचा ताप.

५. **वेडे चार, वेडे चाळे**—मूर्खपणाचीं कृत्यें.

७६०. **शंभर नंबरी**—अत्यंत शुद्ध. शुद्धतेचे शंभर गुण धरले तर शंभरचे शंभर गुण ज्यांत आहेत असा. ज्यांत बिलकूल भेसळ नाहीं असा. उ० शंभर नंबरी सोनें.

७६१. **शुष्काशुष्की**—निरुपयोगी. कोरडा. रूक्ष.

७६२. **शेणामेणाचा**—अशक्त.

७६३. **सात ताड उंच**—अतिशय उंच. [ ताडाचें झाड बिनफांद्यांचें असतें म्हणून तें आहे त्यापेक्षां ज्यास्ती उंच दिसतें. एकावर एक सात ताड उभे करून होणारी जी उंची ती सात ताड उंची. ]

७६४. **साळसूद**—सरळमार्गी. [सं० शालाशुद्ध. "शाळा" म्ह० शिक्षण. ज्याला शुद्ध वळण आहे, ज्याच्या ठायीं लबाडी, किं० वक्रता, नाहीं असा. ]

७६५. **सुमाराचा**—मध्यम प्रतीचा. साधारण.

७६६. **सूर्यवंशी**—सूर्य उगवल्यानंतर उठणारा ( माणूस ).

७६७. **सोळा आणे**—पूर्ण. उ० त्याची सोळा आणे फजीती झाली. [ रुपयाचे सोळा आणे घेणें म्हणजे रुपया पूर्णपणें घेणें, सबंध रुपया घेणें. ]

७६८. **कानाचा हलका**—कोणीं कांहींही गोष्ट सांगितली तरी ती खरी समजून चालणारा.

# क्रियापदें.

७६९. नामें, सर्वनामें, किंवा विशेषणें, यांच्याशीं क्रियापदें साहचर्यानें येऊन जे वाक्प्रचार होतात, त्यांपैकीं शेंकडों आतांपर्यंत येऊन गेले, आणि हजारों अझून न आलेले असे आहेत. हे न आलेले वाक्प्रचार यापुढें क्रियापदांच्या सदरांत सामील करावयास पाहिजेत. परंतु त्यांची संख्या फारच मोठी आहे. एक एक क्रियापद घेऊन त्याचे वेगळे वेगळे अर्थ देणें, व त्याचे बरोबर योजिलीं जाणारीं जीं नामें वगैरे आहेत, तीं देऊन त्यांचें अर्थ देणें, व त्यांना उदाहरणें देऊन त्यांचें स्पष्टीकरण करणें, हें फार मोठें काम आहे. यासाठीं या क्रियापदांच्या सदरांत सुमारें ४० क्रियापदें नमुन्यादाखल घेऊन त्यांचे आम्ही अर्थ देतों. त्यांच्या विवरणावरून विद्यार्थ्यांना ह्या विषयाची दिशा समजेल. आम्हीं हीं जीं क्रियापदें नमुन्यासाठीं घेतलीं आहेत, तीं मुद्दाम महत्त्वाचीं म्हणून निवडून घेतलेलीं आहेत, असें समजूं नये.

## ७७०. आंचवणें.

१. भोजनानंतर हात आणि तोंड ह्यांना अन्नाचे अवशेप चिकटलेले असतात, ते पाण्यानें धुऊन टाकणें.

२. **एकाद्या माणसाच्या सहवासाला, एकाद्या सुखाला, किं० चैनीला, आंचवणें**—त्याचा उपभोग घेण्याला कोणत्याही कारणानें असमर्थ होणें, किं० न शकणें. उ० मी आदित्यवारीं आजारी पडलों म्हणून वनभोजनाच्या मौजेस मी आंचवलों.

## ७७१. अंतरणें.

१. **एकाद्या माणसाला, किं० पदार्थाला अंतरणें**,—त्याच्यापासून दूर अंतरावर जाणें जरूर पडणें, किं० होणें. त्याच्यापासून नाइलाजास्तव दूर होणें, किं० वियुक्त होणें; उ०

गुरुपदाप्रति अंतरलों हरे ! । मज नसे जनसेवन जाहलें ॥

लक्ष्मण गणेश शास्त्री लेले.

### ७७२. आठवणें.

१. स्मरणांत येणें. उ० तो श्लोक मला चांगला पाठ येत होता, पण तो आयत्या वेळीं मला आठवेना.

२. **भिकेचे डोहोळे आठवणें**—[ मागें ले० ४३५, ६ पहा. ]

३. **अवदसा आठवणें**--[ मागें ले० ७६, २ पहा. ]

### ७७३. आणणें.

१. घेऊन येणें; उ० तें पुस्तक इकडे आण.

२. अंतर्भूत करणें; उ० करणीचे पैसे हुंड्यांतच आणा, ( म्ह० सामील करा ).

३. **थोडक्यांत आणणें**—सारांशरूपानें सांगणें; संक्षेपानें देणें; उ०

व्यासकृत महाभारत लक्ष ग्रंथ प्रसिद्ध हा भारी।
आर्यावृत्तें रचितों, स्वल्पांतचि आणितों कथा भारी ॥ १ ॥

मोरोपंत.

४. **मनाला आणणें**—मनावर घेणें; महत्त्वाचें समजणें. उ० मी रागाच्या वेळीं तुम्हांला बोललों, तें मनाला आणूं नका.

५. **मनांत आणणें**—करावयाचा संकल्प करणें; पथकरणें. उ० तूं मनांत आणलेंस तर माझें काम होण्याजोगें आहे.

टीपः—"आणणें," हें क्रियापद "ईत" प्रत्ययान्त कोणत्याही क्रियापदाशीं जोडलें असतां त्या क्रियापदाचा अर्थ जोरदार होतो; उ० ही भिंत मीं बांधीत आणिली होती, म्ह० बहुतेक बांधिली होती.

### ७७४. आंबणें.

१. आंबट होणें; उ० ही हरभऱ्याची डाळ अद्यापि चांगलीशी आंबली नाहीं.

२. आंबट पदार्थ खाल्ल्यानें दांतांस कांहीं वेळपर्यंत कोणताही पदार्थ चाववत नाहीं. अशी स्थिति दांतांस आली म्हणजे "दांत आंबले," असें म्हणतात.

३. कोणत्याही अवयवाला एकदम फार श्रम झाले, किंवा त्याच्यावर तडाखा बसला, किंवा त्याला दुखापत झाली, म्हणजे तो अवयव कांहीं वेळानें ठणकूं लागतो, तेव्हां "तो आंवला" असें म्हणतात.

४. एकाद्या गोष्टीचा वीट येणें, किं० तिची किळस येणें.

५. **आंवत टाकणें** —अर्धेंच टाकणें; उ० हें काम तुम्ही फार दिवस आंवत टाकूं नका.

६. **आंवत पडणें**—दिरंगाईवर टाकल्यामुळें शेवटास न जातां अपुरतेंच राहणें; उ० हें काम आज सहा महिने आंवत पडलें आहे.

## ७७५. उघडणें ( सकर्मक ).

१. ( क ) मोकळा करणें; उ० दार उघड.

( ख ) एकाद्या वस्तूवरील आच्छादन काढणें, किं० बाजूस सारणें; उ० ती तसबीर राजेसाहेबांनीं मोठ्या समारंभानें उघडिली.

( ग ) प्रकट करणें—उ० मी आपला गुप्त बेत अद्यापि उघडिला नाहीं.

२. **डोळे उघडणें**—[ मागें ले० ३८, ९ पहा. ]

## ७७६. उघडणें ( अकर्मक ).

१. ( क ) मोकळा होणें; उ० खिडकी वाऱ्यामुळें उघडली.

( ख ) प्रकट होणें. उ० त्याचे विचार उघडले नाहींत.

२. **दैव उघडणें**—दैव अनुकूल होणें.

३. **पाऊस उघडणें**—पाऊस थांबणें, किं० खळणें. [ मागें ले० ३८, ११ पहा. ]

## ७७७. उचलणें ( सकर्मक ).

१. खालून वर घेणें; उ० हा धोंडा रामानें उचलला.

२. पथकरणें. स्वीकारणें. आपलासा म्हणणें. तत्परतेनें करूं लागणें. उ० सर्वांनीं आपापलीं कामें उचललीं असतां संसारांत घोटाळा होत नाहीं.

३. मालकास न विचारतां त्याची वस्तु घेणें, [ वाईट अर्थानें ].

४. **उचल्या**—अपहारबुद्धीनें दुसऱ्याची वस्तु त्याची नजर चुकवून घेतो तो. भामटा.

५. **विडा उचलणें**--तत्परतेनें करावयाचा बेत, निश्चय, किं० संकल्प करणें. उ० तूं मला छळण्याचा विडा उचलला आहेस! मागें ले० ५२४. पहा.

६. **पैजेचा विडा उचलणें**—अमुक गोष्ट करीन अशी प्रतिज्ञा भोगणें. [ मागें ले० ५२५ पहा. ] उ०.

विडा पैजेचा उचलुं नको, उणी तराजू तोलुं नको,
गहाण कुणाचें डुलवुं नको. अनंतफंदी.

७. **बेलभंडार उचलणें**—शपथ घेणें; [ शपथ घेतेवेळीं देवावरील बेलभंडार उचलण्याची चाल आहे. [ मागें ले० ४२२ पहा. ]

८. **जीभ उचलणें**--बोलण्यासाठीं, किं० बोलतांना, जीभ हालविणें. उ० उचलली जीभ आणि लावली टाळयाला हें निंद्य आहे (म्ह० विचारावांचून बोलणें निंद्य आहे ).

९. **तंटा उचलणें**—तंटा उत्पन्न, किं० उपस्थित, करणें.

१०. **एकाद्याला उचलून धरणें**--त्याचा पक्ष घेणें. त्याची तरफदारी करणें. उ० समर्थानें उचलून धरलें, म्हणजे वगलबऱ्याच्या वैभवाला काय उणें? उ० दहा रुपड्यासाठीं सावकारानें आज महिनाभर मला उचलून धरिलें आहे,(म्ह० तगादा लाविला आहे.)उ० त्या भिकाऱ्यानें मघापासून आम्हांला उचलून धरिलें आहे, ( म्ह० भिक्षेसाठीं तो आम्हांला, त्रास, उपद्रव, देत आहे. )

११. **उचलून देणें**—वेगळें काढून देणें; उ० तूं आमच्यांत जेवावयाला आलास, तर कसें तरी भागवितां येईल. पण तुला बोर्डिंगांत राहावयासाठीं पांच रुपये देखील उचलून देणें आम्हांला जड जाईल.

## ७७८. उचलणें ( अकर्मक ).

१. उत्पन्न होणें; फुगणें, उठणें. उ० गळूं कालच उचललें. उ० लाटा जोरानें उचलत होत्या. उ० हा उकिरडा भारी लवकर उचलला ( म्ह० वाढला, फुगला ). उ० ही जमीन शेणमातीनें सारवा म्हणजे ती लवकर उचलणार नाहीं ( म्ह० तिच्यावर पोपडे धरणार नाहींत ). उ० आभाळांत एकाएकीं ढग उचलले ( म्ह० दिसूं लागले ).

२. उंचीनें वाढणें; उ० दोन दिवस पाऊस लागतांच हीं रोपें उचललीं.

३. **उचलून येणें**, किं० **उचलणें**—वांतीची भावना होणें. कळमळणें. उ० कालच्या उपोषणामुळें आज मला क्षणोक्षणीं उचलतें.

४. **उचलून जाणें**—वऱ्हाडी माणसें बरोबर घेऊन वधुपक्षानें, किं० वरपक्षानें, वरपक्षाचे, किं० वधूपक्षाचे, गांवीं लग्नासाठीं जाणें.

५. **उचलून बोलणें**, किं० **उचलून गोष्टी सांगणें**—वढाईखोरपणानें, किं० ऐटीनें व आपला दर्जा न ओळखतां, बोलणें.

### ७७९. उठणें.

१. ताजा होणें. टवटवीत होणें. चकचकीत होणें. स्पष्टपणें, किं० खुलून, दिसणें. जोरानें वाढणें.

२. वटणें; आकृति उमटून दिसूं लागणें. उ० चाबकाचे, काठीचे, छडीचे, वळ बैलाचे अंगावर उठले आहेत.

३. **एखाद्या माणसावर उठणें**—त्याच्यावर हल्ला करावयास, त्याला निंदावयास, त्याची अपकीर्ति करावयास, किं० त्याला छळावयास, सरसावणें.

४. **उठून जाणें**—रागानें, किं० परवानगीवांचून, निघून जाणें. चालतें होणें. उ० त्याची थट्टा सुरू होतांच तो मंडळींतून उठून गेला.

५. **रोज उठून**, किं० **नित्य उठून**—रोजच्यारोज, दररोज. उ० रोज उठून तुम्हांला ताक आम्ही कोठून पुरवावें?

६. **मनुष्यांतून उठणें**—नीति, अनीति, पाप, पुण्य, वगैरेंची परवा न करतां वागत असणें.

### ७८०. उडणें.

१. पंखांना चालना देऊन गमन करणें. उ० पक्षी उडाला.

२. उडी मारणें. वलांडून जाणें.

३. हल्ला करणें.

४. अदृश्य होणें. पळून जाणें. अस्पष्ट होणें. उ० " दिवस बुडाला, मजूर उडाला. " उ० ह्या चित्राचे रंग उडाले.

५. खर्चला जाणें. उ० त्याचा सर्व पैसा चैनबाजींत उडाला.

६. **दोष,** किं० **टपका, उडणें**—तो नाहीसा होणें.

७. **मन उडणें**—[ मागें ले० ५३, ६ पहा. ]

८. **बंदूक उडणें**— बंदूक पेटून तींतील गोळी जोरानें सुटणें.

९. **उडून चरणें**—खाण्यापिण्याची चैन करून असणें, किं० राहाणें.

### ७८१. उडविणें.

१. **उडावयास लावणें**—उ० खबूतरें उडविणें, पतंग उडविणें.

२. **पैसे उडविणें**—अनावश्यक, किंवा विलासाच्या, वस्तूंवर खर्च करणें. उ० डोमेनिकोचा आजा पुरा दरिद्री होता व त्याच्या बापानें जे काय दोन पैसे मिळविले होते, ते त्याचे त्यानेंच मूर्खपणानें सट्याचे व्यापारधंदे व चैनबाजी करून उडवूनही टाकिले होते.

न० चिं० केळकर—ग्यारिबाल्डी.

३. **एकादी जिन्नस उडविणें**—ती खर्चून टाकणें.

४. **आपल्यावरचा दोष उडविणें**—त्या दोषास आपण पात्र नाहीं, असें सिद्ध करून देणें.

५. **प्रश्न उडविणें**—प्रश्न टाळणें.

### ७८२. उद्धरणें.

१. खालून वर नेणें; उचलणें.

२. हीन दीन स्थितींतून काढून वैभवाच्या स्थितीस नेणें; स्वर्गादि उत्कृष्ट लोकीं पोंचविणें; उ० भगीरथानें आपल्या भस्मीभूत पितरांना स्वर्गीय गंगा पाताळांत आणून उद्धरिलें.

३. वरील अर्थाची विपरीत लक्षणा होऊन "एकाद्याचे पितर उद्धरणें," ह्याचा अर्थ "त्याच्या पितरांना शिव्या देणें," असा झाला.

### ७८३. ओढणें.

१. खेचणें. आकर्षिणें. मोहित करणें. उ० रेघ ओढणें. उ० माझा हात ओढूं नको.

२. **चिलीम, तंबाखू, वगैरे ओढणें**—तींतील धूर आपल्या श्वासाच्या जोरानें तोंडांत आणणें.

३. **तपकीर ओढणें**—नाकाच्या श्वासानें तपकीर नाकांत कोंबून घेणें.

४. **ओढून धरणें**—ताणणें. एकादा सौदा, किं० व्यवहार, जुळविण्यांत आपला हेका न सोडणें.

५. **ओढून विकणें**—महागाईच्या दरानें विकणें.

६. **जमीन ओढणें**—ती लागवडींत आणणें.

७. **चावूक ओढणें**—चावूक मारणें.

८. **एकाद्याला गुवावरून ओढणें**—त्याची फजीती करणें. त्याला रागें भरणें. उ० त्याला मी रोज गुवावरून ओढतों, पण त्याचें आपलें आहे तें आहे!

## ७८४. ओढवणें.

१. वाईट, अनिष्ट गोष्ट, दुःख, इत्यादि येणें, प्राप्त होणें, किंवा भोगास येणें. उ० दैव, दुर्दैव, संकट, प्रसंग, कर्म, इत्यादि ओढवणें.

बहु वय भरलें, उरलें थोडें, तों काय कर्म ओढवलें ॥ १ ॥
सिंधु बहु तरुनि शेषीं कैसें बा! सत्त्व–उडुप फोडवलें ॥ २ ॥

मोरो०–द्रोण०अ० २२; अ० २०.

**टीपः**—चांगल्या अर्थानेंही " दैव ओढवणें " याचा उपयोग होतो. उ० दैव ओढवलें म्हणजे ऐश्वर्य भोगायास सांपडतें.

## ७८५. ओवाळणें.

१. पूजेच्या वेळीं निरंजन वगैरे पदार्थ देवापुढें फिरविणें.

२. मंगलप्रसंगीं निरंजन, किंवा लामण दिवा, वगैरे एकाद्याचे पुढें फिरविणें. ( आहेर वगैरेचे वेळीं. )

३. **सुतानें चंद्रास ओवाळणें**—शुद्ध द्वितीयेला वस्त्राचें सूत काढून तें चंद्राला अर्पण करून त्याचेपाशीं वस्त्राची समृद्धि मागणें.

४. **दिवा ओवाळणें**—एकादी वस्तु देवाप्रमाणें फारच पूज्य असें समजून तिच्यापुढें निरंजन फिरवून तिच्याविषयीं भक्तिभाव दाखविणें. विपरीत लक्षणेनें तिच्याविषयीं तिरस्कार दाखविणें, किं० तिची निंदा करणें. उ० आहाहा! काय तुझी अक्कल तरी! तिच्यावरून दिवे ओवाळावे!

५. **ओवाळून टाकणें**--तुच्छ, कुचकिमतीचा, म्हणून फेकून देणें. उ० हीं मोतीं उत्कृष्ट आहेत खरीं ! कालचीं मोतीं ह्यांच्यावरून ओवाळून टाकावीं !

## ७८६. करणें.

१. **अंगाचें पाणी करणें**—फार श्रम सोसणें.

२. **मला भोंवळ करते**—मला भोंवळ आली आहे.

३. **शर्थ करणें**, किं० **करून सोडणें**--अत्यंत आश्चर्यकारक कृत्य करणें; एकाद्या कामीं फार कष्ट सोसणें; कमाल करणें. उ० माझ्यावर डाव लावावा म्हणून त्यानें आपल्याकडून शर्थ केली, पण मी काय डाव लावून घेणार आहें ? उ० राम्या, तुझ्या खेळण्याची शर्थ झाली ! थोडा तरी अभ्यास करीत जा. उ० पावसानें तर शर्थ करून सोडली आहे; क्षणभर देखील खळत नाहीं !

४. **केलें, न केलेसें करणें**—निष्काळजीपणानें, कुचरपणानें, एकादें काम करणें.

५. **पंक्तिप्रपंच**, किं० **पंक्तिभेद करणें**--पक्षपात करणें; सर्वांशीं समभावानें न वागणें; आपल्या वशील्याच्या माणसांस ज्यास्ती देणें व इतरांस कमी देणें. उ० तुम्हांला जें देणें असेल तें सर्वांस सारखें द्या; असा पंक्तिप्रपंच करूं नका. उ०

> दशशत बाणांनीं तो एकेकातें रणांगणीं हाणी ।
> न करीच पंक्तिभेद श्रीकर्णाचा उदारवर पाणी ! ॥ मोरो०

## ७८७. कसणें.

१. दोरीनें बांधणें, किं० आवळणें.

२. कसोटीवर घासणें—( सोनें वगैरे. )

३. पारखणें. उ० ह्या गड्याला मीं कसून पाहिला आहे. तो चोरटा नाहीं.

४. व्यायामादिकांच्या योगानें बळकट करणें. उ० त्यांचें अंग व्यायामानें चांगलें कसलेलें आहे. ( उपयोग सकर्मक, किं० अकर्मक. )

५. **कास कसणें**--[ मागें ले० २७, ३ पहा. ]

## ७८८. काढणें--( सकर्मक ).

१. एकादी वस्तु एकाद्या विशिष्ट ठिकाणावरून, किं० आधारावरून, दूर करणें, किं० उचलणें. उ० मी पेटींतून पांच रुपये काढले. तरवार काढणें ( म्ह० उपसणें ).

२. निर्मिणें, उत्पन्न करणें, सुरू करणें. उ० चित्र काढणें, रेघ काढणें; मागावर लुगडें काढणें; शाळा, वर्तमानपत्र, वगैरे काढणें; चाल काढणें. उ० त्यानें शेतांतून पांच मण बाटाणे काढले.

३. लोटणें, घालविणें—आम्हीं तुझ्याशिवाय पांच दिवस काढले.

४. शोधणें. उ० वाट काढणें. उ० युक्ति, यंत्र, औषध, वगैरे काढणें.

५. **दोष काढणें**—दोष दाखविणें.

६. **दुखणें काढणें, भूक काढणें**—दुखणें, भूक, वगैरेची व्यथा, किं० त्रास, सोसणें. उ० "दुखणें काढावें पोरांनीं आणि भूक काढावी गुरांनीं."

७. **दैव काढणें**--वैभवास, उर्जितावस्थेस, चढणें.

८. **एकाद्याचें दुखणें काढणें**—त्याच्या आजारांत त्याची शुश्रूषा करणें.

९. **तोंड काढणें**--उपाय योजणें. अडचणींतून मोकळें होण्याची युक्ति करणें.

१०. **पाऊस तोंड बाहेर काढूं देत नाहीं**—पाऊस इतका जोराचा आणि एक सारखा पडत आहे, कीं घराच्या बाहेर पडणें मुष्किलीचें झालें आहे.

११. **एकाद्याची धिंड काढणें**--त्याला गाढवावर बसवून सर्व गांवभर फिरविणें, ( त्याची अपकीर्ति, किं० उपहास करण्यासाठीं-पूर्वी सरकारी शिक्षेचा हा एक प्रकार होता. )

## ७८९. काढणें ( अकर्मक ).

१. बंद पडणें. खळणें. शमणें. निघणें. कमी होणें. उ० पाऊस काढला म्हणजे मी बाजारांत जाईन. उ० तुझा ताप काढला म्हणजे तुला कोयनेल देईन.

## ७९०. कालवणें ( सकर्मक ).

१. एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाशीं मिसळेल अशा रीतीनें तो ढवळणें, हालविणें, किं० फिरविणें.

२. **विटाळ कालवणें**—विटाळाची शुद्धि झालेली नसतां इकडेतिकडे फिरून, किं० पदार्थांना शिवून, तो विटाळ पसरणें.

## ७९१. कालवणें ( अकर्मक ).

१. पोटांत पित्तादिकांमुळें ढवळल्याची भावना होणें. उ० आज सकाळीं मला चहा न मिळाल्यामुळें माझ्या पोटांत कालवत आहे.

२. घाबरा, किं० अस्वस्थ, होणें. घोटाळणें. गुरफटणें. संभ्रांत होणें. उ० त्याचे प्राण कालवत आहेत. उ०

भ्रमांत मन कालवे, प्रखर तेजही मालवे ।

बालकृष्ण अनंत भिडे.

## ७९२. खाणें.

१. अन्नादि पदार्थ चर्वण करून जठरांत घालणें.

२. खर्च करावयास लावणें, किं० भाग पाडणें. उ० तूं माझा अर्धा तास खाल्लास. उ० ह्या घरानें पांचशे रुपये खाल्ले. उ० ह्या खटल्यानें माझे १५०० रुपये खाल्ले.

३. पराजित करणें. उ० काशीकर शास्त्र्यानें पुण्याच्या रंगनाथशास्त्र्यांना एका क्षणांत खाऊन टाकलें.

४. ( खेळांत ) मारणें. निरुपयोगी करणें. उ० तुमच्या वजीरानें आमचा उंट खाल्ला.

५. हटविणें. कमजोर करणें. नाहींसा करणें उ० तुमच्या औषधानें माझ्या आजारास तीन दिवसांत खाऊन टाकिलें. उ० नैट्रिक आसिड तांबें, पितळ, वगैरे धातूंस खातें. उ० हें कापड मळ खाणारें आहे.

६. अन्यायाच्या मार्गानें घेणें. उ० लांच खाणें; पैसा खाणें.

७. अनुभविणें; भोगणें; सेवणें; उ० हवा खाणें. उ० विसावा खाणें.

८. **एकाद्याचा जीव खाणें**—त्याला छळणें. एकाद्याच्या जिवाला खाणें, म्ह० झोंबणें. उ० तसे शब्द माझ्या जिवाला खात आहेत.

९. **शब्द, अक्षरें, वगैरे खाणें**—उ० लिहितांना, किं० बोलतांना, शब्द वगळणें, म्ह० न लिहिणें, किं० न उच्चारणें.
१०. **दांत ओठ खाणें**—[ मागें ले० ४४, २१ पहा. ]
११. **तो डुलक्या खात आहे**—त्याला डुलक्या येत आहेत.
१२. **एकाद्याला खायाला उठणें**—त्याच्यावर हल्ला, किं० गहजब, करावयास, किं० त्याच्यावर दोष लादण्यास, आवेशानें सरसावणें.
१३. **गटांगळ्या खाणें**--पाण्यांत धडपडणें.

> ऐसें वदे रडे बहु, खाय गटकळ्या जळांत करि "का ! का !।"
> धांवे मराळ चरणीं कवळुनि काढी क्षणांत वरि काका ॥

१४. **टक्केटोणपे खाणें**--प्रतिकूल, किंवा दुःखकारक, स्थितीचा अनुभव प्राप्त होणें. उ० टक्केटोणपे खाऊनच माणसास शहाणपण येतें.

न० चिं० केळकर.

## ७९३. गाळणें.

१. शुद्ध करणें. मळ, वगैरे काढून टाकणें. उ० ह्या दुधांत शेळीचे केस आहेत; तें फडक्यावरून गाळून घेतलें पाहिजे. उ०

> आजि अकंटक केलें नृपनयनिपुणें सुयोधनें राज्य ।
> प्राज्यप्रीतिद झालें सुहृदांला, गाळिलें जसें आज्य ॥

मोरोपंत–भारत, सभापर्व.

२. वगळणें. काढून टाकणें.
३. **सोनें गाळणें**--सोनें आटवून, म्हणजे अग्निसंयोगानें त्याचा रस करून, त्यांतील भेसळ काढून टाकणें.
४. **पक्षी पिसें गाळतात**--अंगावरून पिसें झाडून टाकतात.
५. **हातपाय गाळणें**—खचणें. गलितधैर्य होणें.

## ७९४. घालणें.

१. एकाद्या पदार्थांत दुसरा पदार्थ शिरकावणें, किं० प्रविष्ट करणें. उ० पिशवींत पैसे घाल.
२. गहूं वगैरे दळावयाला घालणें, म्ह० दळावयाचें काम सुरू करणें. धुणीं

धुवायाला घालणें, घर बांधावयाला घालणें, म्ह० धुवावयाला, बांधावयाला, सुरवात करणें.

३. त्याणें मला हजार रुपयांस घातलें, म्ह० बुडविलें.

४. एखाद्यावर चोरीचा आळ घालणें, म्ह० तूं चोरी केलीस असें त्यास म्हणणें.

५. भिंत, कूड, वगैरे घालणें, म्ह० बांधणें.

६. वाद, गोंधळ, वगैरे घालणें, म्ह० करणें, किं० माजविणें.

७. सणाचे दिवशीं पुरण घालणें, म्ह० पुरण हें खाद्य खावयास, किं० नैवेद्यास, सिद्ध करणें.

८. एकाद्याला शपथ घालणें, म्ह० तूं अमुक गोष्ट कर, किं० करूं नको असें म्हणून त्याच्यावर शपथेचा जोर, किं० आग्रह, पाडणें.

९. जेवण, समाराधना, वगैरे घालणें, म्ह० मित्र, ब्राह्मण, जातवाले, वगैरेंस भोजन अर्पण करणें.

१०. उदाहरण, प्रश्न, कोडें, वगैरे घालणें म्ह० सोडवावयासाठीं देणें, किं० सांगणें.

११. एकाद्या कामाला हात घालणें, म्ह० तें पथकरणें, किं० पथकरून करूं लागणें.

१२. उडी घालणें, झेप घालणें, म्ह० उडी, किं० झेप, मारणें.

१३. भीड घालणें–[ मागें ले० ४३६, ४ पहा. ]

१४. दुकान, शाळा वगैरे घालणें, म्ह० सुरू करणें, किं० मांडणें.

१५. चाल, संप्रदाय, वगैरे घालणें, म्ह० प्रचलित करणें.

१६. एकाद्याच्या कानावर घालणें, म्ह० त्याला कळविणें, निवेदिणें, किं० सांगणें.

१७. **किरत्यावर घालणें**—अक्षरांचा कित्ता गिरवून त्याप्रमाणें कागदावर शाईनें अक्षर काढावयाला मुलाला शिकविण्याचा प्रारंभ करणें. उ० आपल्या इकडे मुलाला कित्त्यावर घालतात, तसा डोमेनिकोनें जोसफला लहानपणींच होडीवर घातला होता.

न० चिं. केळकर—ग्यारिबाल्डी.

१८. **धाड घालणें**—हल्ला करणें. उ०

प्रभु सेतुपथें उतरुनि शत्रुकडे वालिसूनुला धाडी ।
कीं कोणी न म्हणावें ' न कळत जाऊनि घातली धाडी ' ॥

मोरो० भारत.

## ७९५. जळणें.

१. अग्नीनें दग्ध होणें. उ० हें लाकूड सारें जळालें. उ० फोडणीचा जाळ छपराला लागून हें घर जळालें.

२. मनोविकार तीव्र झाल्यामुळें प्रक्षुब्ध होणें. उ० रागानें, ( किं० मत्सरानें ), तो जळत आहे.

३. ज्वरानें तापून जाणें. उ० नारायण तापानें जसा जळतो आहे.

४. **पीक जळणें**—पीक वाळून जाणें. उ० वेळेवर पाऊस न पडल्यामुळें पिकें जळून गेलीं.

५. **पत्ता, किं० गंजीफ, जळणें**—पत्ता, किं० गंजीफ, योग्य प्रसंगीं न टाकल्यामुळें निरुपयोगी होणें.

६. **अंगांत राग, गर्व, मस्ती वगैरे, जळणें**—अतिरेकाला पोंचलेला असणें.

७. **पैसा न जळणें**—पैसा न संपणें; उ० तो कशाला इतका कंजूषपणा करतो तरी ? त्याच्या घरांत जळतां जळणार नाहीं इतका पैसा आहे.

८. **जळत घर भाड्यानें घेणें**—हटकून नुकसान करणारी, किं० नाशास कारण होणारी, वस्तु पथकरणें, किं० स्वीकारणें; उ० जळत घर भाड्यानें आणि जुने जोंधळे काल्यानें कोण घेणार ?

९. **जळत खांब खांद्यावर घेणें**—दुसऱ्याचें उपद्रवकारक, किं० कष्टदायक, काम विनाकारण पथकरणें.

## ७९६. जागणें.

१. जागृत राहणें; झोंप न घेतां बसणें.

२. प्रसंगीं आठवणें, उपयोगीं पडणें, किं० कामास येणें. उ० मी कौमुदीची उजळणी तीन वर्षांत मुळींच केली नव्हती, परंतु त्या शास्त्र्याशीं वाद करतांना ती प्रसंगाला जागली म्हणून बरें झालें !

३. दक्ष असणें. सावध असणें. निष्काळजीपणा हातून होऊं न देणें उ०

स्वबांधवांना बुडवायाचा, राया ! करिशी यत्न किती ?
तत्प्रतिपालनिं जागशील तरि तुझिया पुण्या नसे मिती ॥

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

४. कायम राहणें.

सत्यपालनें धर्म राहतो, व्यासंगानें श्रुत जागे ।
रूप शुचित्वें, आचारें कुल, महोन्नतीतें धरुं लागे ॥

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

५. **सत्याला, किं० नीतीला, जागणें**--सत्य स्मरून, किं० नीतीचें महत्त्व मनांत आणून, वागणें; सत्याचें, किं० नीतीचें, उल्लंघन न होईल अशा रीतीनें वागणें.

६. **सत्त्वाला जागणें**--आपला मोठेपणा, आपली इभ्रत, कमी न होईल असें करणें, किं० अशा रीतीनें वागणें. उ०

त्या पात्राच्या कंठीं स्वल्पचि शाकान्न लागलें होतें ।
सत्परिचर्येंच जइही समयीं सत्त्वासि जागलें हो ! तें ॥

मोरोपंत.

## ७९७. जेवणें.

१. भोजन करणें. उ० जेवीन तर तुपाशीं नाहीं तर उपाशी.

२. अनुभविणें. उ० पूर्वी लक्ष्मणरावानें जीं दुष्ट कृत्यें केलीं, त्यांचें फळ तो आतां जेवीत आहे.

३. **दुसऱ्याच्या तोंडानें जेवणें**—दुसरा बोलेल त्याप्रमाणें बोलणें ( स्वताला विचार करण्याची अक्कल नसल्यामुळें, किं० आपले विचार प्रकट केल्यास एकाद्या समर्थास घुस्सा येईल म्हणून ). उ० त्या सभेंत सभासद पुष्कळ होते, पण बहुतेक दुसऱ्याच्या तोंडानें जेवणारेच होते !

४. **जेवूं घालणें**—

( क ) ब्राह्मणादिकांस भोजन अर्पण करणें.

( ख ) एकाद्याच्या जेवणाचा खर्च आपण सोसणें, किं० देणें.

५. **एकाद्याच्या बारशास जेवणें**—मूल जन्मल्या दिवसापासून बारावा जो दिवस, त्याला "बारसें" म्हणतात. ह्या दिवशीं इष्टमित्रांना जेवायास बोलवीत असतात. अशा प्रसंगीं जेवलेला मनुष्य त्या मुला-पेक्षां वयानें, अनुभवानें, व अकलेनें, मोठा असणारच. यावरून " मी तुझ्या बारशास जेवलों आहें, " याचा अर्थ " मी तुजपेक्षां मोठा आहें; तुजपेक्षां मला ज्यास्ती ज्ञान, अक्कल, अनुभव, आहे; तुझ्या डावपेचांनीं मी फसावयाचा नाहीं, " असा होतो.

**टीप**—बारशाच्या दिवशीं घुगऱ्या, म्ह० हरभऱ्यांची उसळ, करावयाचा प्रघात आहे. यावरून " मी तुझ्या बारशाच्या घुगऱ्या खाल्या आहेत, " ह्याचाही अर्थ वरच्याच सारखा होतो.

## ७९८. वसणें.

१. अधिष्ठित होणें. उ० तो झोपाळ्यावर बसला.

२. योग्य, उचित, किं० विवक्षित, ठिकाणीं जुळणें, किं० जडणें. उ० पेटीला कुलप बसलें. उ० दाराला कडी बसली.

३. **मार बसणें**—माराच्या क्रियेला पात्र, किं० विषय, होणें.

४. हें उदाहरण मला बसलें, म्ह० चांगलें समजलें.

५. गळूं बसणें, म्ह० दवणें, चेपणें.

६. वैभव बसणें, म्ह० वैभवानें अपकर्ष पावणें. वैभव कमी होणें.

७. दुकान बसणें, धंदा बसणें, व्यापार बसणें—निरुपयोगी, किं० बिन–किफायतीचा होणें, किं० चालेनासा होणें.

८. **तोटा बसणें, ठोकर बसणें**— नुकसान लागणें.

९. त्या स्मारकाची वर्गणी माझ्या डोक्यावर बसली, म्हणजे मला द्यावी लागली.

१०. **हा सदरा माझ्या अंगाला बसत नाहीं**, म्ह० ठीक होत नाहीं.

११. **हात बसणें**—एकादी विशिष्ट क्रिया करण्याची सफाई हातास प्राप्त होणें. उ० कातारकामावर माझा चांगलासा हात बसला नाहीं.

१२. हा श्लोक मला चांगला बसला, म्ह० उत्तम प्रकारें समजला, किं० मनांत ठसला.

१३. अक्षराचें वळण बसणें, म्ह० तें वळण पक्कें होणें.

१४. लिहीत, रडत, वाचीत, इ० बसणें म्ह० एकसारखें लिहीत, रडत, वाचीत, राहाणें.

१५. जेवायाला बसावयाचें, म्ह० जेवणाला सुरवात करावयाची.

१६. तूं दिलेल्या पैशांत आला तसला माल मी आणिला. मी पदरचे पैसे घालायाला थोडाच बसलों आहे!—म्हणजे पदरचे पैसे मी उगीच कशाला घालूं!

१७. **उलट्या अंबारींत बसणें**--हातांत झोळी घेऊन भिक्षा मागत हिंडणें. ( कारण भिक्षेची झोळी उलट्या अंबारीसारखी दिसतें. अंबारी= हत्तीवरची बैठक. उलटी अंबारी=भिक्षेची झोळी. )

१८. **माझें मन त्या मुलावर बसलें आहे**--तो मुलगा मला आवडता झाला आहे; त्याच्यावर माझें प्रेम जडलें आहे.

१९. **पांचावर धारण बसणें**--गर्भगलित होऊन जाणें.

२०. **घरीं बसणें**--उद्योगधंदा सोडून रिकामें बसणें.

## ७९९. पडणें.

१. *पतन पावणें. एकाद्या स्थानापासून भ्रष्ट होणें. आधाररहित होणें.* उ० झाडावरून फळ पडलें.

२. बंद होणें. चांगलासा न चालणें. कमी जोराचा होणें. मंदावणें. निरुपयोगी होणें. उ० वारा पडला. उ० यंदा दुष्काळामुळें शालजोड्यांचा व्यापार पडला. उ० गातां गातां त्याचा घसा पडला.

३. मित्रत्व, सलोखा, असणें. जुळणें. उ० त्याचें माझें पडत नाहीं.

४. कर्मधर्मसंयोगानें असणें. उ० तो पडला ब्राह्मण. नाहीं तर चढविले असते दोन रट्टे!

५. **एकाद्या वस्तूवर, किं० गोष्टीवर, पडणें**--ती तत्परतेनें करूं लागणें. ती स्वीकारणें, किं० अंगीकारणें. उ० आलीकडे तो कादंबऱ्यांवर पडला आहे, ( म्ह० त्यानें कादंबऱ्यांवर झोड दिली आहे. )

६. येणें, सुरू होणें, दिसणें, पसरणें, उद्भवणें, होणें, इ०. उ० अंधेर, प्रकाश, थंडी, इ० पडणें. उ० त्याचे हातपाय गार पडले. उ० लोणच्यांत किडे पडले. उ० ह्या फळींत दोन पाट पडतील.

७. रिकामें, निरुद्योगी, वसणें, उ० येथें काय पडला आहेस ? लाग एकदम कामाला !

८. लढाईंत मारला जाणें.

९. **एकाद्या कामांत पडणें**—तें पथकरणें. त्यांत मन घालणें. उ० ज्या कामांत विश्वंभरराव पडले, तें बिघडलें नाहीं, असें कधीं व्हावयाचें नाहीं ! उ० तुझ्या कामांत ब्राम्हण पडो !

१०. आवश्यक होणें, किं० जरूर केलें पाहिजे असें होणें. उ० तूं हातपाय गाळलेस म्हणून मला हा त्रास करणें पडतें.

११. एकादा पदार्थ विकत घेतांना किंमत द्यावी लागणें. उ० नागपुरी उपरण्यांना अकरा रुपये पडतात.

१२. घडून येणें.

१३. पराभूत होणें.

१४. **जीव खालीं पडणें**, किं० **भांड्यांत पडणें**—जिवाला शांतता, किं० स्वस्थता, प्राप्त होणें. काळजी दूर होणें.

१५. **उघडें पडणें**—हीन दीन होणें. आश्रयरहित होणें. उ०

वा ! ढळतां तिळहि पदर व्हावी व्यजनासि साग रामा जी ।
ती खळ सभेंत उघडी पडते न पडोनि सागरामाजी ! ॥

मोरोपंत.

१६. **एकाद्यावर तुटून पडणें**—

( क ) त्याच्यावर निकरानें हल्ला करणें. उ० मऱ्हाठ्यांची फौज निजामाच्या सैन्यावर एकदम तुटून पडली, तेव्हां मुसलमानी वीर सैरावैरा पळत सुटले.

( ख ) त्याच्यावर वाक्प्रहार करणें.

१७. **अनुमोदन पडणें**—रुकार मिळणें. संमत असणें. उ०

पडतां वानरांचें अनुमोदन । स्वयें पुसे रघुनन्दन ।
शिष्ट पाठवावा कोण । तो निवडोनि सांगा मज ॥

एकनाथ.

१८. **शरपंजरीं पडणें**—आजारानें, दुखण्यानें, खितपत असणें, किं० झिजत असणें.

**८००. पाहणें.**

१. ( क ) ( डोळ्यांनीं ) बघणें. अवलोकणें. उ० हें पहा माझें चित्र.
( ख ) कोणत्याही इंद्रियानें जाणणें, किं० जाणून घेणें. शिकणें. उ० ह्या आंब्याची चव पहा. उ० हें कापड किती उबदार आहे पहा !
( ग ) एकाद्या माणसाची, गोष्टीची, कारभाराची, प्रकरणाची, जबाबदारी, पथकरणें. त्याची तजवीज, व्यवस्था, वगैरे करण्याचें काम स्वीकारणें. उ० माझ्या मुलाचें गणित मी पाहीन. तुम्ही संस्कृत पहा, म्हणजे झालें.
( घ ) परवा करणें. उ० घर उत्तम बांधावयाचें असलें, तर पैशाकडे पाहूं नका.
( ङ ) पारखणें. उ० हें सोनें पहा. उ० ह्या मुलाच्या अक्षराचें वळण पहा.
( च ) इच्छिणें. उ० माझी नोकरी गोंद्या बुडवूं पहात आहे.

२. **एकाद्याचा अंत पाहणें**—त्याची कसून परीक्षा घेणें.

या जी ! उद्धार करा दीनाचा, पाहतां किती अंत ? ।
संत न अंत पहाती हातीं असतां समर्थ भगवंत ॥

मोरोपंत, नामरसायन.

३. **प्रश्न पाहणें**—भूत आणि भविष्य गोष्टींचें ज्ञान फलज्योतिष, रमल, इ० शास्त्रांवरून करून घेणें. उ० जोशीबोवा, आमचा येवढा प्रश्न पाहातां काय ?

४. **ढुंकून पाहणें**—एकाद्या वस्तूला आदर, किं० संमान, दाखविणें.

मधुपासि बहु प्रिय जो आत्मप्राणव्रजासम स्तवक ।
सकलरसिकप्रिया त्या न ढुकोनहि पाहती समस्त बक ॥

मोरो० भारत.

५. **बरें पाहणें**—चांगलें म्हणून समजणें. एकाद्याचें कल्याण चिंतिणें.

पंढरीचे ब्राह्मण देखतील कोणी ।
बरें मजलागोनी न पाहाती ते ॥

तुकाराम.

## ८०१. मरणें.

१. मरण पावणें—उ० तो पटकीनें मेला.

२. हें रोप सावटास लाविल्यामुळें मेलें, म्ह० वाळून गेलें.

३. आमच्या बाजूचे आतांपर्यंत तीन गडी मेले, म्ह० हा डाव खेळणाऱ्यांच्या संख्येंतून गळाले.

४. **मी थंडीनें मरतों आहें**—मी थंडीनें बेजार झालों आहे.

५. कोणच्या कृतीनें पारा मरतो हें वैद्य लोकांस ठाऊक असतें. पारा मरणें म्ह० पाऱ्याची अस्थिरता, चंचलता, नाहींशी होणें.

६. त्या पोराला बदडून काढल्यानें काय उपयोग व्हावयाचा आहे? रोज रोज मार खाऊन त्याच्या अंगाचें रक्त मेलें आहे, म्ह० त्याला मार लागावयाचा नाहीं, त्याचें अंग मदड आहे.

७. **जेवणाला फार उशीर झाल्यामुळें माझी भूक मरून गेली आहे. भूक मरणें**—भूक नाहींशी होणें. भुकेची भावना लोपून जाणें. त्याचप्रमाणें, तहान मरणें, इच्छा मरणें, महत्त्वाकांक्षा मरणें, इ० चा उपयोग होतो.

८. तुम्ही पाण्याला आधण आणून नंतर तें पितां, हा क्रम तुम्ही सोडून द्या, कारण मेलेल्या पाण्याला रुचि नसते. मेलेलें पाणी, दूध, इ० =ज्यांतील पुष्टिकारक, किंवा उपयुक्त, किंवा रुचिकर, अंश नाहींसा झाला आहे असें.

९. नारायणराव आज तीन वर्षें संग्रहिणीनें मरत पडला आहे, म्ह० झिजत आहे; कष्ट भोगीत आहे.

१०. हा व्यापारी साखरेच्या व्यापारांत दहा हजार रुपयांना मेला. मेला म्ह० बुडाला.

११. तुम्ही सर्वांनीं खुशालचंदाप्रमाणें बसावें, आणि मी एकट्यानें मरावें, हा काय न्याय झाला ? मरावें म्ह० काम करावें.

१२. पेढ्यासाठीं असा मरतोस कां ? जन्मांत तूं कधीं पेढा खाल्लाच नाहींस काय ? मरणें म्ह० उत्सुक, किं० उत्कंठित, होणें.

१३. आपण तीन असामी आहों आणि दरवडेखोर आहेत दहा; ते आपणास ठार तर मारणारच. पण आपण मरतां मरतां हातपाय झाडले पाहिजेत, म्ह० आपण मरावयाच्या आधीं प्रयत्नाची कमाल केली पाहिजे.

१४. गवळ्यानें तें रेडकूं मरूं घातलें आहे, म्ह० रेडकूं खास मरणार असें समजून गवळी त्याच्या खाण्यापिण्याची तजवीज करीत नाहीं.

१५. **मरून पडणें**--उत्कंठेनें जाणें. उ० प्रो० छत्रे यांची सर्कस पहावयाला चिनांतील लोक मरून पडत असत.

१६. **मरूं मरूं करणें**--लवकरच प्राण जाईल असा रंग दिसणें.

१७. हीं मुलें मला मरों मरोंसें करून सोडतात, म्ह० मला भारी सतावतात.

१८. तो चोर कुलुपांत किल्ली घालतो आहे, इतक्यांत मी तेथें गेलों; मला पाहतांच तो मेला जसा ! म्ह० लज्जित झाला !

१९. **मरीं मरणें**--जिवाची पर्वा न करतां कष्ट करणें.

२०. **पैसा मरणें**--निरुपयोगी होणें; व्याज, किं० फायदा, न मिळतां तो पैसा देखील परत येण्याची शक्यता नसणें; उ० तूं रामभाऊला पैसे उसने दिलेस ते मेलेच असें समज. उ० ह्या चिंचेच्या व्यापारांत पैसा घातलास तो मरणारच !

## ८०२. येणें.

[ ह्या क्रियापदाचे कांहीं अर्थ खालीं दिले आहेत. ]

१. **वळणीस येणें**--कबज्यांत येऊन आपली आज्ञा पाळावयास सिद्ध होणें उ०

तव विक्रमाविणें, पळभरिहि न येतींच खळवळें चळणी ।
श्रीमद्रामायणरस रसिकांला स्पष्ट लागतां अळणी ॥

मोरोपंत, नामरसायन.

२. **डोळ्याला पाणी येणें**—अश्रूंनीं डोळे भरणें; रडावयाला येणें. उ०

एका कोसावरि मज दुर्योधन भेटला गदापाणी ।
आलें डोळ्याला बहु, वर्षाकालीं जसें नदा, पाणी ॥ २९ ॥

मोरोपंत, शल्यपर्व, अ० ३०.

३. **हुकी येणें**--अनावर इच्छा उत्पन्न होणें. उ० लहानपणीं शाळेंत शिकत असतां जोसेफला समुद्रावर सफर करावयाची एक दिवस हुकी आली.

न० चिं० केळकर-ग्यारिबाल्डी.

४. **पणांत येणें**—वयांत येणें.

५. **संपुष्टांत येणें**--संक्षिप्त होणें, लहान होणें. [ पूजेच्या उपकरणांत संपुट म्हणून एक लहान पात्र असतें, त्यांत घातलेला पदार्थ थोडाच असतो. "संपुट" याचें "संपुष्ट" हें अपभ्रष्ट रूप होय ].

६. **सर येणें**--योग्यता प्राप्त होणें; एकाद्या वस्तूशीं बरोबरी होणें. उ० ही भाषा प्रगल्भ झाली तरी तिला संस्कृताची सर येणार आहे काय?

## ८०३. लावणें.

१. **अन्नास लावणें**--उपजीविकेचें साधन मिळवून देणें; नोकरी वैगेर लावून देणें.

२. **ममता लावणें**, किं० **लावून घेणें**--प्रेमळ वर्तनानें दुसऱ्याची ममता संपादणें.

३. **छातीला हात लावून म्हणणें, सांगणें**, इ०--खात्रीपूर्वक, न कचरतां, म्हणणें, सांगणें, इ०.

४. **शेणाचे दिवे लावणें**--दिवाळें काढणें.

# शब्दयोगी अव्ययें.

—:S:—

८०४. ज्या शब्दांस लिंग, वचन, विभक्ति, काळ, इत्यादि लागत नाहींत, त्यांस "अव्ययें" असें म्हणतात. ह्या अव्ययांत "शब्दयोगी अव्ययें" म्हणून एक प्रकार आहे. शब्दयोगी अव्ययें नेहेमीं दुसऱ्या शब्दांशीं जोडूनच योजावीं लागतात; जसें--'तो माडीवर चढला,' 'माझ्या दारापुढें तुळशीचीं झाडें आहेत.' शब्दयोगी अव्ययें हीं नामें किंवा सर्वनाम यांच्या पुढें येऊन त्यांपासून विभक्तिकार्य होतें. कांहीं क्रियाविशेषण अव्ययें हीं रूपानें शब्दयोगी अव्ययांप्रमाणेंच असतात, परंतु वाक्यांत इतर शब्दांसंबंधानें त्यांची मांडणी वेगळ्या प्रकारची होते. उ० 'पलंगाखालीं पुस्तक आहे,' येथें "खालीं" हें शब्दयोगी अव्यय आहे. "तो मुलगा खालीं बसला," येथें "खालीं" हें क्रियाविशेषण अव्यय आहे. दोन्ही ठिकाणीं "खालीं" ह्या शब्दाचा अर्थ वस्तुतः एकच आहे, परंतु वाक्यांतील इतर शब्दांशीं त्याची जुळणी वेगळ्या तऱ्हेची आहे. आम्ही पुढें शब्दयोगी अव्ययें ज्या वाक्यांत योजून दाखविलीं आहेत, त्यांच्यांत थोडासा बदल केला असतां तींच वाक्यें क्रियाविशेषण अव्ययांचीं उदाहरणें होऊं शकतील.

## ८०५. आंत.

१. माझ्या मनांत कपट नाहीं, ( म्ह० माझ्या ठायीं ). २. माझे पैसे एका महिन्यांत परत दे, ( म्ह० एक महिना सरावयाच्या अगोदर ). ३. मांडवपरतणें आज व्हावयाचें आहे. चिंगीला डोहाळेजेवणही आजच करा म्हणजे खर्चांत खर्च होऊन जाईल, ( 'खर्चांत खर्च' म्हणजे एका खर्चाबरोबर दुसरा खर्च ). ४. तूं आमच्यांतच जेवीत जा, म्हणजे पोटांत पोट भागवितां येईल, ( ह्म० वेगळा खर्च न करावा लागतां )५. तूं खुर्ची आणावयाला बाजारांत जात आहेस. मला एक स्टूल पाहिजे आहे तेंही घेऊन ये, म्हणजे कामांत काम होऊन जाईल, ( म्ह० ज्यास्ती वेळ खर्च करावा न लागतां). ६. येव्हढ्याशा तेव्हढ्याशा कारणावरून तो डोक्यांत राख घालीत असतो, ( म्ह० संतापत असतो ).

## ८०६. कडे.

१. मला कचेरींतून सुटावयास अगोदरच उशीर झाला होता, म्हणून मला वैद्याकडे जातां आलें नाहीं, ( वैद्याकडे म्ह० वैद्याच्या घरीं ). २. युरोपाच्या दक्षिणेकडे भूमध्यसमुद्र आहे, ( दक्षिणेकडे म्ह० दक्षिण दिशेस ). ३. त्याच्याकडे पुरेशी फौज नव्हती, ( म्ह० त्याच्यापाशीं ). ४. कौरवपांडवांच्या युद्धांत श्रीकृष्ण पांडवांकडे गेला, ( म्ह० पांडवांच्या पक्षाला मिळाला ). ५. तुमच्या मुलाची परीक्षा उतरली नाहीं, याचा दोष त्याच्याकडे आहे. ( म्ह० त्याच्याच माथीं ). ६. हें काम माझ्याकडे लागलें, ( म्ह० हें काम करण्याची जबाबदारी मी माझ्या शिरावर घेतों ). ७. हा इसम पागेकडे आहे, ( म्ह० पागेच्या कामावर आहे ). ८. हें काम त्या खात्याकडे सोपविण्यांत आलें, ( म्ह० हें काम त्या खात्यांत व्हावें, असें ठरविण्यांत आलें ). ९. मी तुला हे दहा रुपये देतों, आतां माझ्याकडे तुझे कांहीं पैसे नाहींत, ( म्ह० मी तुझे न फेडिलेले असे कांहीं पैसे नाहींत ). १०. तूं उद्याकडे मला भेट. उद्याकडे मी तुझ्या कामाचा निकाल करीन, ( उद्याकडे म्ह० उद्या ). हा प्रचार आशिक्षित लोकांत आढळतो.

## ८०७. खालीं.

१. टेबलाखालीं मांजर लपलें होतें, ( म्ह० जमीन आणि टेबलाची फळी यांच्या मधील जागेवर ). २. वर्गांत मोरेश्वर माझ्याखालीं आहे, ( म्ह० त्याचे अभ्यास माझ्यापेक्षा कमी दर्जाचे आहेत ). ३. कामाखालीं सारा दिवस गेला,( म्ह० काम करतां करतां ). ४. वहिवाटीखालीं, किं० परिपाठाखालीं पडणें, ( म्ह०वहिवाटींत, किं०परिपाठांत, येणें ). ५. नित्याखालीं पडणें, (म्ह०नित्याच्या क्रमांतील होणें ). ६. मोठ्या नांवाखालीं सारें पचून जातें, ( म्ह० भपकीच्या, किं० अधिकाराच्या,जोरावर दोष,अन्याय,लपवितां येतात. बड्या माणसानें कांहीही अपराध, किं० अन्याय, केले तरी त्यांचेवर टीका करावयाला कोणी धजत नाहीं ). ७. तुझ्या पायाखालीं काय आहे, किं० जळत आहे, तें पहा, ( म्ह० खुद्द तुझीं कृत्यें, किं० तुझी स्थिति, किं० परिस्थिति, वगैरे गोष्टी मनांत आण). ८. त्यानें पुतण्याचे पैसे हाताखालीं घातले, ( म्ह० त्या पैशाचा त्यानें अन्यायानें अपहार केला ). ९. दादोजी कोंडदेवाच्या शिक्षेखालीं शिवाजी लहानाचा

मोठा झाला, ( म्ह० शिक्षण मिळून ). १०. दिव्याखालीं अंधेर असतो, ( म्ह० मनुष्य मोठ्या अधिकाराच्या पदावर असला, तरी त्याच्या अंगीं निंद्य गुण असावयाचेच ). ११. मोठ्याखालीं लहानाची उघडीक होत नाहीं, ( म्ह० समर्थांच्या वगलवच्च्यानीं कांहीं केलें तरी खपतें ). १२. आमच्या घराखालीं बाग आहे, ( म्ह० घराच्या पलीकडे ). १३. ह्या मुलाला तुम्ही आपल्या देखरेखीखालीं घ्या, ( म्ह० तुम्ही ह्याच्यावर देखरेख करा ). १४. त्याच्या हाताखालीं दहा माणसें आहेत, ( म्ह० त्याचा हुकूम पाळणारीं ).

## ८०८. जवळ.

१. आमच्या घराजवळ एक विहीर आहे, ( म्ह० घराच्या सान्निध्याला ). २. त्याच्याजवळ पुष्कळ पैसा आहे, ( म्ह० त्याच्या संग्रहीं ). ३. माझ्याजवळ हल्लीं एक स्वयंपाकी ब्राह्मण आहे, ( म्ह० माझ्या घरीं, किं० माझ्यासाठीं स्वयंपाक करणारा ). ४. तुझ्याजवळ काय जादू आहे ? ( तुझ्याजवळ, ह्म० तुला ठाऊक अशी ). ५. माझे अभ्यास त्याच्या जवळ जवळ आहेत. ( म्ह० सरासरीच्या मानानें त्याच्या इतके ). ६. तुझें पुस्तक माझ्याजवळ नाहीं, ( म्ह० माझ्या पेटींत वगैरे ). ७. त्याच्याजवळ माया हा शब्द नाहीं, ( म्ह० त्याच्या अंतःकरणांत तिळमात्र माया नाहीं ). ८. माझ्याजवळ दुजा भाव, किं० परका भाव, नाहीं, ( म्ह० मी आपलपोट्या नाहीं. मी सर्वांशीं सारखा वागतों ).

## ८०९. पर्यंत.

१. त्याला मी त्याच्या घरापर्यंत पोंचविलें, ( म्ह० त्याचें घर आलें तेव्हां त्याला तेथें सोडून मी परतलों ). २. त्या घागरींत गळ्यापर्यंत पाणी आहे, ( म्ह० घागर अगदीं भरलेली आहे ). ३. त्याचा पक्ष मी मरेपर्यंत सोडणार नाहीं, ( म्ह० मी आमरण त्याच्या पक्षाला चिकटून राहीन ). ४. जीव आहे तोंपर्यंत औषधोपचार केले पाहिजेत, ( म्ह० मनुष्य जिवंत आहे तोंवर ). ५. लांवपर्यंत गर्दी दिसत होती, ( म्ह० पुष्कळ लांबच्या प्रदेशावर देखील लोक होते ). ६. माझ्या मर्जीविरुद्ध वागलास तर मी तुला पायापासून डोक्यापर्यंत फोडून, काढीन, ( म्ह० नखशिखान्त ). ७. सरड्याची धाव कुंपणापर्यंत, ( म्ह० थोड्या अवसानाच्या माणसाची गति थोडीच असावयाची ). ८. एक वर्षपर्यंत त्याणें हा नियम पाळिला, ( म्ह० एक वर्षभर ).

## ८१०. पलीकडे.

१. आमच्या घरापलीकडे स्मशान आहे, ( म्ह० घरापासून कांहीं अंतरावर ). २. मी त्याची जिवापलीकडे जोपासना केली, ( म्ह० त्याला प्राणापेक्षां अधिक समजून ). ३. हे कागदपत्र मीं जिवापलीकडे रक्षण करून ठेविले होते, ( म्ह० फार काळजीनें ). ४. पैशापलीकडे त्याला कांहीं दिसत नाहीं, ( म्ह० पैशापेक्षां अधिक मूल्यवान् असें त्याला कांहींच वाटत नाहीं ). ५. वृद्धेश्वराचें देऊळ नदीपलीकडे आहे, ( म्ह० नदीच्या पैल तीराला ).

## ८११. पाशीं.

१. तुला कोणी जोड्यापाशीं देखील उभें करणार नाहीं, ( म्ह० जोडे ठेवावयाच्या जागीं देखील तुला कोणी उभें राहूं देणार नाहीं, मग सतरंजीवर, किं० तक्क्याशीं, तुला बसूं देणें दूरच राहिलें! तूं अगदीं हलकट आहेस ) । २. माझ्यापाशीं त्याच्या कांहीं लटपटी चालत नाहींत, ( म्ह० तो मजपुढें कांहीं लवाड्या वगैरे करावयास धजत नाहीं. मी त्याची सोदेगिरी चांगली ओळखितों ). ३. महिना सरत आला; आतां तुला उसने पैसे द्यावयाला मजपाशीं मुळींच नाहींत, ( मजपाशीं, म्ह० माझ्या संग्रहास ).

## ८१२. पासून.

१. मुंबईपासून पुणें ११९ मैल आहे, ( म्ह० मुंबई आणि पुणें ह्याचे मधील अंतर ११९ मैल आहे ). २. माझेपासून त्यानें हा घोडा घेतला, ( म्ह० माझ्याजवळून ). ३. माझेपासून कोणतीही गोष्ट चोरून ठेवूं नको, ( म्ह० मला न कळवितां ). ४. उद्यापासून तूं संस्कृत शिकावयाला सुरवात कर, ( म्ह० उद्यां शीक आणि नंतर दररोज शीक ). ५. तूं कोणापासून हें कर्ज काढिलेंस ? ( म्ह० कोणाचें ? )

## ८१३. पुढें.

१. त्याच्या दारापुढें मोठें अंगण आहे, ( म्ह० घराच्या अग्रभागीं ). २. देवापुढें रांगोळी घाल, ( म्ह० देवांच्या समोर ). ३. ज्याचें कुढें त्याच्यापुढें, ( म्ह० ज्यानें खोटेपणा केला, त्याला तो जाचक होईल, किं० होवो! ). ४. हें मूल कोणापुढें जेवावयास बसतें ? ( म्ह० हें मूल जेवतांना त्याच्यावर कोणाचें लक्ष्य असतें? ). ५.माझ्या डोळ्यांपुढें उभा राहूं नको,( म्ह० माझ्या नजरेस पडशील अशा

ठिकाणीं; माझ्यासमोर ). ६. माझ्या आईचे मरणसमयींचे हाल सदासर्वदा माझ्या डोळ्यापुढें उभे राहतात, ( म्ह० त्यांची मला स्मृति होते; ते मला अंतश्चक्षूनें दिसतात ). ७. रामाचे अभ्यास माझ्यापुढें आहेत, ( म्ह० माझ्याहून चांगले ). ८. मूर्खापुढें वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता, ( म्ह० मूर्खाला बोध होण्यासाठीं ). ९. तो वरिष्ठाच्या पुढें पुढें करतो, ( म्ह० वरिष्ठाची खुशामत करतो, वरिष्ठाची थुंकी झेलतो ). १०. त्याच्या तोंडापुढें कोणाचा टिकाव लागणार ? ( म्ह० त्याच्यापाशीं बोलावयाला ). ११. गोविंदरावापुढें काशीराम फिक्का पडून गेला, ( म्ह० गोविंदरावाशीं तुलना केली असतां, किं० तुलना केल्यावर ). १२. त्या माणसाचें नांव माझ्या तोंडापुढें आहे, ( तोंडापुढें, म्ह० अगदीं आठवण्याच्या बेतांत ).

## ८१४. भर.

१. आम्ही एका तासांत कोसभर चालतों, ( म्ह० एका कोसाची मजल करतों ). २. तो दिवसभर खेळत असतो, ( म्ह० सारा दिवस ). ३. हें सोनें तोळाभर निघेल असें वाटत नाहीं, ( म्ह० तोळ्याच्या परिमाणाचें ). ४. तो महाबळेश्वरी मधासाठीं गांवभर हिंडला, पण तो त्याला कोणाच्याही घरीं मिळाला नाहीं, ( गांवभर, म्ह० साऱ्या गांवांत ). ५. अंगभर वस्त्र आणि हातभर बांगड्या देवानें द्याव्या म्हणजे झालें, ( अंगभर म्ह० सर्व अंग झांकण्याइतकें. ) ६. रेसभर म्ह० रेसाइतका देखील, किं० अगदीं थोडा.

## ८१५. भोंवतीं.

१. घराभोंवतीं बाग आहे, ( म्ह० घराच्या चारी बाजूंस ). २. समर्थाभोंवतीं कार्यसाधु लोकांची गर्दी असावयाचीच, ( म्ह० समर्थांच्या कच्छपीं लागलेली ). ३. माझ्याभोंवतीं किरकिर लावूं नको, ( म्ह० माझ्याजवळ ). ४. रखवालदार हातांत सोटा घेऊन घराभोंवतीं फिरत होता, ( म्ह० घराच्या सर्व बाजूंनीं ).

## ८१६. मागें.

१. तो माझ्यामागें उभा होता, ( मागें म्ह० पाठीशीं ). २. चंद्रगुप्तामागें अशोक राजा होता, ( मागें म्ह० पूर्वी ). ३. माझ्यामागें शंभर कामें आहेत, ( माझ्यामागें, म्ह० मला करावयास पाहिजेत अशीं ). ४. माझ्यामागें

मुलांचें कसें होईल याची मला काळजी वाटते, ( माझ्यामागें म्ह० मी घरीं नसतां, मी परगांवीं गेलों असतां, किं० मी मेल्यावर ). ५. मी आपल्या पुस्तकाची एक प्रत त्याला द्यावी म्हणून तो चार दिवस माझ्यामागें लागला होता, ( म्ह० मला तगादा करीत होता ). ६. त्यानें माझ्यामागें भारी तगादा लावला, ( म्ह० केला ).

## ८१७. मुळें.

१. खिळ्यासाठीं नाल गेला, नालासाठीं घोडा गेला, घोड्यासाठीं स्वार गेला, इतका अनर्थ खिळ्यामुळें झाला, ( खिळ्यामुळें म्ह० खिळ्याच्या कारणानें ). २. तूं आळसामुळें नापास झालास, ( म्ह० तूं आळशी आहेस म्हणून ).

## ८१८. वर.

१. मेजावर पुस्तक ठेव, ( म्ह० मेजाच्या पृष्ठभागाच्या आधारानें ). २. औरंगजेब मेल्यावर ( म्ह० तो मेल्यानंतर ) त्याच्या राज्याचा मालक कोण झाला ? ३. त्या सभेंत शंभरावर लोक नव्हते, ( म्ह० शंभराहून अधिक ). ४. माझ्या भाषणावर कोणीं टीका केली नाहीं, ( म्ह० माझ्या भाषणांतील मुद्दे वगैरेंच्यासंबंधानें कोणी कांहीं बोललें नाहीं ). ५. कचेरींत माझ्यावर कोणी अंमलदार नाहीं, ( म्ह० मजवर तावा चालविणारा ). ६. माझ्यावर दोन उमेदवार आहेत, त्यांना टाकून मला अगोदर नोकरी कशी मिळेल ? ( माझ्यावर, म्ह० माझ्या अगोदर आलेले ). ७. दारावर भाजी घेतलेली स्वस्ती पडते, ( दारावर म्ह० आपल्या घरीं विकणारानें विकावयास आणलेली ). ८. चोरावर मोर, (म्ह० एका चोरानें चोरलेली वस्तु त्याच्यापासून चोरणारा अट्टल चोर ). ९. हें काम दिरंगाईवर टाकूं नका, ( म्ह० हें काम लवकरच करावयाला घ्या ). १०. माझ्या घरावर त्याचा डोळा आहे, ( म्ह० माझें घर उपटण्याचा त्याचा विचार आहे ). ११. रामावर सदाशिवाचा दांत आहे, ( म्ह० रामाविषयीं वैरबुद्धि ). १२. धर्मावर सोमवार सोडणें, ( म्ह० लोकांच्या परोपकारबुद्धीमुळें मिळालेल्या भोजनानें सोमवारच्या उपासाचें पारणें फेडणें, म्हणजे सबंध दिवसाचें अन्न वांचविणें ). ( मागें लेखांक ३२४१५ पहा ). १३. अहो चंपकबाई, तुमचें लोणचें फक्कड झालें आहे ! एका लोणच्याच्या फोडीवर माझें सारें जेवण झालें ! ( फोडीवर, म्ह० फोड तोंडीं लावून, किं० फोडीच्या चवीनें ). १४

त्या गांवाचें नांव माझ्या अगदीं ओठावर आहे, ( म्ह० ओठांच्या पूर्ण परिचयाचें, किं० ओठांनीं हवें तेव्हां उच्चारतां यावयाजोगें आहे, परंतु आतां आठवत नाहीं ). १५. त्याला द्यावयाचें उत्तर अगदीं माझ्या ओठावर होतें, पण तो आणखी चिडेल म्हणून मी कांहीं बोललों नाहीं, ( ओठावर, म्ह० अगदीं तयार, ओठाच्या बाहेर केव्हां एकदा पडेन अशा उत्कंठेनें जणूंकाय ). १६. समर्थांना तोंडावर कोणी शिव्या देत नाहीं, ( म्ह० त्यांच्यासमक्ष ). १७. त्या यादींतील सारीं नांवें माझ्या अगदीं तोंडावर आहेत, ( म्ह० तीं मी हवीं तेव्हां उच्चारून दाखवीन ).

## ८१९. समोर.

१. मजसमोर उभा राहूं नको, ( म्ह० माझ्यापुढें ). २. आजोबांसमोर गोंद्या दांडगाई करीत नाहीं, ( म्ह० आजोबांच्या दृष्टीस पडेल अशा ठिकाणीं ). ३. त्यांचें नांव माझ्या डोळ्यासमोर आहे, ( म्ह० अगदीं आठवण्याच्या बेतांत आहे ). ४. शंकरासमोरचा, ( म्ह० नंदीबैल, म्ह० मूर्ख, अडाणी माणूस ).

# क्रियाविशेषणें.

८२०. १. कांहीं क्रियाविशेषणें हीं मूळचीं नामांचीं विभक्त्यन्त रूपें असून पुढें केवळ त्यांच्या अर्थावरून तीं क्रियाविशेषणांप्रमाणें योजण्यांत येऊं लागलीं. 'बुद्ध्या' हें मूळचें 'बुद्धि' ह्या संस्कृत शब्दाचें तृतीयेचें एकवचन असून त्याचा अर्थ हल्लीं 'मुद्दाम,' किं० 'जाणून बुजून,' असा घेण्यांत येतो. या प्रकारचे मराठी भाषेंत आणखी पुष्कळ शब्द आहेत.

२. कांहीं क्रियाविशेषणें वाक्यरचनेंत थोडासा फेरफार केला असतां शब्दयोगी अव्ययें होऊं शकतात. उ० घरापुढें अंगण आहे. तूं पुढें चालूं नको. येथें पहिल्या वाक्यांत 'पुढें' हें शब्दयोगी अव्यय आहे, आणि दुसऱ्यांत क्रियाविशेषण आहे. अशा प्रकारचीं अव्ययें व त्यांचीं उदाहरणें मागील प्रकरणांत वरचेवर आलेलीं असल्याकारणानें तीं बहुतेक ह्या प्रकरणांत वगळलेलीं आहेत. कारण उदाहरणादाखल दिलेल्या वाक्यांत थोडासा फेरफार करून तेंच वाक्य क्रियाविशेषण अव्ययाचें उदाहरण बनविणें हें विद्यार्थ्याला कठिण जाणार नाहीं.

३. कांहीं क्रियाविशेषणें क्रियापदांना कांहीं प्रत्यय लागून तयार होतात. उ० बोलतां बोलतां, बोलून चालून, रगडून, इ०.

४. वरील तिन्ही प्रकारच्या व इतर क्रियाविशेषणांचा संग्रह पुढील प्रकरणांत केला आहे.

## ८२१. खालीं.

१. झाडाखालीं दोन वाटसरू बसले होते, (म्ह० झाडाच्या बुडाशीं). २. पंक्तींत लाडू वाढून पन्नास खालीं राहिले, (म्ह० उरले, शिल्लक पडले). ३. मारवाड्याचें कर्ज फेडल्याशिवाय माझा जीव खालीं पडणार नाहीं, (म्ह० स्वस्थ होणार नाहीं). ४. आमच्या मंडळीपैकीं तीन मुलगे वर चढले, आणि दोन खालीं राहिले, (म्ह० खालच्या वर्गांत).

## ८२२. पुढें.

१. त्या कामीं माझें नांव पुढें करूं नको, ( म्ह० प्रकट करूं नको ). २. माझ्यावरोबर चाल, पुढें जाऊं नको, ( म्ह० ज्यास्ती वेगानें चालूं नको, चाललास तर तूं माझ्या शेजारीं असणार नाहींस ). ३. पुढें पाठ मागें सपाट, ( म्ह० नवा धडा शिकावयाचा पण जुन्या धड्याची उजळणी न केल्यामुळें तो विसरून जावयाचा ). ४. बरें, पुढें काय झालें ? ( पुढें म्ह० नंतर ).

## ८२३. मागें.

१. पुढें पाठ मागें सपाट, ( म्ह० नवीन विषय शिकणें आणि जुन्या विषयाची उजळणी न केल्यामुळें तो विसरणें ). २. मीं हें काम पथकरलें तें पथकरलें; आतां मी मागें घ्यावयाचा नाहीं, ( म्ह० तें सोडून देणार नाहीं ). ३. हा नियम आतां मागें पडला, ( म्ह० रद्द झाला; त्याची अंमलबजावणी होत नाहीं ). ४. तुम्ही आमच्यावरोबर फिरावयाला येत जा, म्हणजे तुमच्या आईच्या मरणाचें दुःख मागें पडेल, ( म्ह० कमी तीव्र होईल, किं० विसरलें जाईल ). ५. रामा महिनाभर आजारी होता म्हणून मागें पडला, ( म्ह० त्याचे अभ्यास कमी झाले ). ६. काटकसरीनें खर्च करा म्हणजे चार पैसे मागें पडतील, ( म्ह० शिलकीस पडतील, शिलक राहातील ). ७. मिरजकरबोवांच्या कथा पुण्यास सुरू होतांच इतर सर्व हरिदास मागें पडले, ( म्ह० फिके पडले; त्यांचें महत्त्व कमी झालें ). ८. मीं तुला मागें काय सांगितलें होतें, तें तुझ्या लक्षांत आहे काय ? ( मागें, म्ह० कांहीं दिवसांपूर्वी ). मागें आपल्या लोकांत मामाच्या मुलीशीं विवाह करण्याची चाल होती. हल्लीं तशी चाल नाहीं, ( मागें म्ह० गतकालीं; प्राचीन काळीं ). ९. तूं मागें राहिलास तर फसशील, ( मागें म्ह० पिछाडीला; लोकांना न दिसशील अशा ठिकाणीं ). १०. माझी पोटदुखी अगदीं मागें पडली, ( म्ह० नाहींशी झाली ). ११. हा नवा मुलगा वर्गांत येतांच रामा मागें पडला, ( म्ह० फिका पडला, रामाचें वैभव कमी झालें ).

## ८२४. मागून.

१. मी अगोदर जातों, तूं मागून ये, ( मागून म्ह० नंतर ). २. गाय पुढें चालली होती. मागून वासरूं चाललें होतें, ( मागून म्ह० तिच्या पाठोपाठ ).

## ८२५. मागेंपुढें.

१. मागेंपुढें पाहून चाल, दांडग्यासारखा चालूं नको, ( मागेंपुढें म्ह० आपल्या शेजारीं, किं० आजूबाजूस, कोण आहे हें पाहून ). २. तुम्ही असें करतां पण मागेंपुढें तें जाचेल, ( मागेंपुढें म्ह० केव्हांना केव्हांतरी ). ३. ह्या पोथीचीं पानें मागेंपुढें झालीं आहेत. तीं क्रमानें लावून दे, ( मागेंपुढें म्ह० अव्यवस्थित, भग्नक्रम ). ४. मीं सांगितलें आहे तशा रीतीनें औषध तयार कर; मागेंपुढें केलेंस तर तें गुणावह होणार नाहीं, ( मागेंपुढें म्ह० निष्काळजीपणानें, किं० योग्य क्रम न अनुसरतां ). ५. मला चोर भेटले तेव्हां मी मागेंपुढें न पाहातां, ( म्ह० तिळमात्र न कचरतां ), त्यांच्या अंगावर तुटून पडलों. ६. त्या बाईला बारा तेरा रुपयांपर्यंत लुगडें घ्यावयाचें होतें. मीं लुगड्याची किंमत सतरा रुपये सांगितली तेव्हां ती मागेंपुढें करूं लागली, ( म्ह० तितक्या किंमतीचें लुगडें घ्यावें किंवा नाहीं ह्याबद्दल ती साशंक झाली ). ७. त्याला मागेंपुढें कोणी नाहीं, ( म्ह० त्याला आईबाप, किं० मुलेंबाळें, नाहींत ). ८. मागेंपुढें पाहून वागावें, ( म्ह० दूरवरचा विचार करून, शहाणपणानें, वागावें ).

८२६. **ओकसाबोकशी**—म्ह० मोठ्या आवेशानें आणि हेल काढून. उ० मुलगी सासरीं जातांना ओकसाबोकशीं रडली.

८२७. **अद्वातद्वा**—हा " यद्वातद्वा " ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. " यद्वातद्वा " म्हणजे " हें कीं तें, " " हें किंवा तें "; संभाषणांत-खरें हें कीं तें, असा वाद उत्पन्न झाला म्हणजे भांडणापर्यंत मजल येऊन ठेपते. यावरून " अद्वातद्वा " म्हणजे " ताळतंत्र सोडून, " " मूर्खाप्रमाणें, " असा अर्थ झाला. क्रियापद " बोलणें " इ०.

८२८. **इतस्ततः**—इकडे तिकडे. उ० आजचा माझा सारा दिवस इतस्ततः भ्रमण करण्यांत गेला.

८२९. **उठतां बसतां, उठल्या बसल्या**—क्षणोक्षणीं; हरघडीला; सदासर्वदा; जेव्हां पाहावें तेव्हां. उ० चिंगीला उठल्या बसल्या, किं० उठतां बसतां, हातांत बाहुली लागते.

८३०. **उठल्या सुटल्या**—वेळ योग्य आहे किंवा अयोग्य आहे, याचा विचार न करतां. उ० तो उठल्या सुटल्या रामभाऊंच्या घरीं जातो. उ० उठल्या सुटल्या चहा पिण्याची प्रवृत्ति फार अपायकारक आहे.

८३१. **उडत उडत**—

( क ) कर्णोपकर्णी आल्यावरून. विशेष आधारपूर्वक नव्हे अशी. उ० आमचे हेड क्लार्क तीन महिन्यांची रजा घेणार आहेत अशी वातमी उडत उडत माझ्या कानावर आली आहे.

( ख ) संक्षेपानें. उ० त्यानें मला रासन्हाणीच्या वेळेच्या गमती उडत उडत सांगितल्या.

८३२. **एवंच**—एकून. सारांशरूपानें. सर्वांचा मथितार्थ हा कीं.

८३३. **कर्मधर्मसंयोगानें**—प्रारब्धयोगानें. दैवगतीनें. यदृच्छेनें.

८३४. **करतलामलकवत्**—

( क ) अगदीं स्पष्ट, किं० ठळक; उ०

ते करतलामलकसे दूरुनि दिसले अशेष मग तीतें ।
पाहुनि बहुत तळमळे, मानी यमपुरचि युद्धजगती ते ॥

स्त्रीपर्व अ. ४. आर्या ३.

( ख ) अत्यंत सुकर. उ० तुमच्या पुस्तकाला विनायकराव प्रस्तावना लिहितील. असलीं कामें त्यांना करतलामलकवत् आहेत.

**टीपः**—कर=हात. तल= तलवा, पृष्ठभाग. आमलक=आंवळा. वत्=प्रमाणें. ह्या व्युत्पत्तीवरून वरील दोन्ही अर्थ साहाजिकपणें निघणारे आहेत.

८३५. **कसेंबसें**—मोठ्या कष्टानें; अति श्रमानें. उ०

करुनियां स्थिर चित्त कसेंबसें
पदिं नमीं, दिन मी गमवूं कसे? ॥

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

८३६. **कांकणभर**—थोड्याशा अंशानें. उ० राम्या द्वाड आहे, आणि गोंद्या त्याच्याहून कांकणभर ज्यास्ती आहे. [ "कांकणभरानें," किं० "कांकणभऱ्यानें," अशींही रूपें ह्याच अर्थानें योजिलीं जातात. ]

८३७. **खाऊनपिऊन**—खाण्यापिण्याच्या संबंधानें पाहिलें असतां. उ० तो खाऊनपिऊन सुखी आहे, ( म्ह० त्याला खाण्यापिण्याची ददात नाहीं, किं० तो मध्यम स्थितींतील मनुष्य आहे. )

८३८. **गुण्यागोविंदानें**—प्रेमभावानें. भांडणें न करतां. उ०

पक्षीही लहान । घरटीं बांधून ।
गुण्यागोविंदानें । राहताती ॥

८३९. **घरबसल्या**--घरांतल्या घरांत; घरांत बसूनच. घर न सोडतां. उ० तुम्ही आपले पैसे मर्कंटाइल् व्यांकेंत व्याजीं लावा, म्हणजे तुम्हांला घर-बसल्या सालिना २४ रुपये मिळतील.

८४०. **घोड्याचे पाठीवर**—अत्यंत त्वरेनें.

८४१. **चालतां बोलतां**—विशेष श्रम न करितां. अनायासें. सहजासहजीं.

८४२. **जन्मजन्मांतरीं**—ह्या जन्मांत आणि इतर जन्मांत. [ मनुष्याला अनेक जन्म प्राप्त होतात असें समजण्यांत येतें;"जन्मांतर" म्ह० दुसरा जन्म. चालू जन्माहून वेगळा जन्म. ] उ० तुम्ही मजवर जे उपकार केले आहेत,ते माझ्याकडून जन्मजन्मांतरींही फिटावयाचे नाहींत !

८४३. **जन्मादारभ्य**—जन्मल्यापासून.उ० कोळ्यांच्या मुलांना जन्मादारभ्य पोहतां येत असतें. उ० रामाला जन्मादारभ्य खोटें बोलण्याची सवय आहे ! [ शुद्ध संस्कृत रूप " जन्मनः आरभ्य, " असें आहे. ]

८४४. **जेमतेम**—कसातरी; मोठ्या कष्टानें, किं० प्रयासानें, किं० अडचणीनें. उ० तीन रुपयांचें तूप आम्हाला जेमतेम पंधरा दिवस पुरतें.

८४५. **तिकडे**—" तिकडे, " म्ह० त्या दिशेस, किं० त्या ठिकाणीं. हा शब्द क्रियाविशेषण असून जनानी भाषेंत नामाप्रमाणें योजला जातो, आणि त्याचा अर्थ " माझे यजमान, " असा होतो. इतर विभक्तींचेही अर्थ " तिकडे " हा शब्द दर्शवितो. उ० तिकडे यायचें झालें काय? (म्ह० पतिराज आले काय ? ) उ० हीं लुगडीं तिकडे दाखवा, ( म्ह० पति-राजांना दाखवा ). उ० तिकडे आमंत्रण पथकरलें काय ? ( म्ह० पति-राजांनीं. ) तिकडून, म्ह० पतिरायांकडून. तिकडचा म्ह० पतिरायांचा.

८४६. **थंड्या पोटानें**—शांतपणानें. रागाच्या आवेशांत नसतां.

८४७. **दिवसाढवळ्या**—दिवसाच्या प्रकाशांत. उ० सोन्याबापू दिवसाढवळ्या दारूच्या पिठ्यांत जातो! त्याला जनलज्जा मनलज्जा काडीइतकी देखील नाहीं!

८४८ **नखशिखान्त**—नख=नख (पायाच्या बोटाचें). शिखा=शेंडी. अन्त=टोक. नखशिखान्त=पायाच्या बोटाच्या नखापासून तों शेंडीच्या केसाच्या टोकापर्यंत; साऱ्या शरीरीं; पूर्णपणें. उ० पावसानें मी नखशिखान्त भिजलों. उ० मी घामानें नखशिखान्त भिजून गेलों आहें.

८४९. **पोटांतून**—खरोखरीं. उ० मला हा बेत कांहीं पोटांतून आवडला नव्हता, परंतु तुझें मन मोडूं नये म्हणून मीं हो म्हटलें.

८५०. **बापजन्मीं**—सगळ्या आयुष्यांत. उ० तुला बापजन्मीं तरी असली खुर्ची बसावयास मिळेल काय?

८५१. **बोलून चालून**—उघडपणें. अगदीं उघड उघड. निर्विवादपणें. उ० तो बोलून चालून माझा शत्रु आहे, मग तो माझी निंदा कसा नाहीं करणार?

८५२. **भरल्या पोटीं**—पोट भरलेलें असतां. उ० भरल्या पोटीं मला एवढी मजल चालणें कठिण जाईल.

८५३. **मधल्या मधेंच**—

(क) आपला अधिकार नसतां. उ० तूं मधल्या मधेंच त्या मनुष्याला कसें परतविलेंस? (म्ह० माझ्याकडे त्या माणसाला न आणतां.)

(ख) पात्रता नसतां. उगीचच्या उगीच. उ० तुमचें दोघांचें वांकडें; आणि मधल्यामधेंच मला मात्र धनीसाहेबांच्या शिव्या खाव्या लागतात!

८५४. **मनच्या मनीं**—मनांतल्या मनांत. उ० तूं मनच्या मनीं नऊ मण जळलास, तर तुझी समजूत कोण पाडावयाला येईल?

८५५. **मन मोकळें करून**—उघड्या मनानें. संकोच, भीति, लाज, वगैरे सोडून देऊन. उ० तुमच्या दुःखाचें कारण मला मन मोकळें करून सांगा. तुमचें रहस्य माझ्या तोंडून बाहेर फुटणार नाहीं.

८५६. **मनापासून**—खरोखरीं. वैंबीच्या देठापासून. उ० नदीवर पोहावयाला

जा असें दादांनीं सांगतांच नान्याला मनापासून हसें आलें! उ० ही साडी तुला अगदीं मनापसून आवडते कांय?

८५७. **मनासारखा**—(विशेषण, किं० क्रियाविशेषण) इच्छिल्याप्रमाणें. आवडीचा. जसा हावा, किं० असावा, तसा. उ० सोलापुरास चार वर्षांत माझीं दहा विन्हाडें झालीं, पण मनासारखें एकहीं मिळालें नाहीं.

८५८. **म्हणण्यासारखा**—(क्रियावि०) फार चांगल्या रीतीनें. (विशेषण) फार चांगला. उ० तो लांबटांग्या असून शर्यतींत म्हणण्यासारखा पुढें आला नाहीं. उ० त्या हरदासाची कथा कांहीं म्हणण्यासारखी नसते.

८५९. **म्हणतां म्हणतां**—अगदीं अल्प काळांत. उ० वारा अनुकूल असल्यामुळें म्हणतां म्हणतां आमची होडी एक मैल गेली!

८६०. **मारूनमुटकून**—फार प्रयासानें. जबरदस्तीनें. उ० तो लग्न करून घ्यावयाला तयार नव्हता, पण चार मंडळी जमून त्यांनीं त्याला मारून मुटकून एकदाचें बोहोल्यावर उभें केलें!

८६१. **यथा यथा**—साधारणपणें. म्हणण्यासारखें समाधानकारक नाहीं अशा रीतीनें. उ० मुंबईमध्यें माझी भिक्षुकी चांगलीशी जमली नाहीं. सध्या माझें यथा यथाच चालतें, (म्ह० भिक्षुकीवर मला विशेषशी प्राप्ति होत नाहीं).

८६२. **येऊन जाऊन**—राहातां राहतां. सरते शेवटीं. अखेरीस.

८६३. **रगडून**—खूप जोरानें. पुष्कळपणीं. मनमुराद. आवेशानें. घट्ट. उ० आज मी रगडून पोहलों. उ० दोरी रगडून ओढली तर तुटणार नाहीं काय?

८६४. **राजरोस**—उघडपणें. उ० तो राजरोस इराणीच्या दुकानांत जाऊन चहा पितो.

८६५. **राजापासून रंकापर्यंत**—श्रीमंतांपासून तों गरीबापर्यंत. सर्व दर्जाच्या लोकांत. उ० ब्राह्मणाला राजापासून रंकापर्यंत मान मिळत असे.

८६६. **राहून राहून**—पुनःपुनः. उ० मला माझ्या मेलेल्या मित्राबद्दल राहून राहून दुःख होतें.

८६७. **रिकाम्या पोटीं**—अनश पोटीं. पोट रिकामें असतां, म्ह० जेवणाच्या अगोदर. उ० रिकाम्या पोटीं कलिंगड खाणें अपायकारक आहे.

८६८. **रिकाम्या हातानें**—

(क) जरूर अशा वस्तु बरोबर न घेतां. उ० बाळंतिणीच्या भेटीला जातांना चार तरी पानें बरोबर घेतलींच पाहिजेत. रिकाम्या हातानें जाऊं नये.

(ख) आणावयाची वस्तु न आणतां. उ० शिंप्याकडे तूं कपडे आणावयास म्हणून गेलास, तो रिकाम्याच हातानें परत आलास काय ?

८६९. **लाखाच्या ठिकाणीं**—अत्यंत मूल्यवान् वस्तूप्रमाणें. उ० आतां मला पैशाची भारी गरज आहे. तूं मला दहा रुपये दिलेस, तर ते मला लाखाच्या ठिकाणीं होतील !

८७०. **वरवर**—बाहेरून, वरपांगीं. उ० तो मला वरवर प्रेम दाखवितो खरा, पण तो कपटी आहे, हें मी पूर्णपणें ओळखून आहे !

८७१. **वेळेनसार**—प्रसंगविशेषीं. कदाचित्. सोयीची, किं० अनुकूल, वेळ असल्यास. उ० तुम्हांला टेबल पाहिजे असल्यास लिलावाला जात जा. वेळेनसार चांगलें टेबल अगदीं थोडक्या किंमतींत मिळेल !

८७२. **वेळेवारीं**—योग्य वेळीं. योग्य वेळ टळावयाच्या अगोदर. उ० मुलें वेळेवारीं संध्याकाळीं परत न आलीं, तर मला भारी काळजी लागते !

८७३. **शापादपि शरादपि**—शापापासून आणि शरापासून. शापानें आणि शरानें. शाप देऊन आणि बाण मारून. हा मूळचा अर्थ क्रियाविशेषणात्मक आहे. शाप देऊन किंवा लढून शत्रूचा विध्वंस करण्याचें सामर्थ्य द्रोणाचार्यांच्या अंगीं होतें. हल्लीं " शापादपि शरादपि " येवढी शब्दसंहति, विशेषणाप्रमाणें योजिली जाते, आणि तिचा अर्थ, " सर्वप्रकारें बलिष्ठ, किं० समर्थ," असा घेण्यांत येतो. उ० तुझें नुकसान रामभाऊनें केलें आहे, तें तूं निमूटपणें सोशिलें पाहिजे. सूड उगविण्याचा विचार करूं नको. कारण, तो आजकाल शापादपि शरादपि असा आहे !

८७४. **शिरीं**—ऐन घाईच्या वेळीं. उ० ह्या लग्नाच्या शिरीं त्या हरदासाची कथा करवावयास आम्हांला फुरसूद कसची मिळणार ?

८७५. **षट्कर्णी**—सहा कानांत शिरलेला, किं० सहा कानांस, म्ह० पुष्कळ लोकांस, कळलेला. [ एका माणसाला दोन कान आणि दोन माणसांना चार कान असतात. एकाद्या गोष्टीचा विचार दोन माणसांनींच केल्यास तो विचार गुप्त राहातो. आणखी दोन कान आले, ( म्ह० तिसरा मनुष्य घेतला ), तर विचार गुप्त राहत नाहीं. तो जगजाहीर होतो ]. उ० हा तुझा बेत षट्कर्णी होऊं देऊं नको, नाहींतर तुझी फसगत होईल!

८७६. **सटी ( सठी ) सामासीं**—कधींमधीं. अगदीं क्वचित् प्रसंगीं.

८७७. **साता सायासांनीं**--फार श्रमांनीं.

८७८. **सैरावैरा**--इतस्ततः. वाट फुटेल तिकडे. उ० आमच्या गोठ्याला आग लागली, तेव्हां गुरें दावीं तोडून सैरावैरा धावत सुटलीं. [ संस्कृतांत " स्वैर " म्ह० अनियंत्रितपणें; त्याचें अपभ्रष्ट रूप " सैरा " होऊन त्याच्याशीं केवळ यमकासाठीं "वैरा" हा शब्द लाविला आहे. "वैरा" हा शब्द अर्थहीन आहे. ]

८७९. **हातींमेटीं**—आळसांत. निरुद्योगीपणानें. उ० दिवस गेला हातीं मेटीं, मग चांदण्याखालीं कापूस वेटी. [ " हेटींमेटीं, " असाही प्रचार आहे. ]

८८०. **हातोंहातीं**--एकाच्या हातांतून दुसऱ्याच्या हातांत त्वरेनें जाईल, अशा रीतीनें.

---

# एकेरी शब्द, समस्त शब्द, आणि समस्तकल्प शब्द.

———:o:———

८८१. विशेष प्रसंगीं अर्थ आटोपसरपणें आणि जोरदाररीतीनें व्यक्त करणारे शब्द मराठी भाषेंत पुष्कळ आहेत. खरवड, खुशालचंद, ग्रंथ, वगैरेप्रमाणें कांहीं शब्द एकेरी आहेत. कर्णपिशाच, अरण्यरोदन, काकरव, कूपमंडूक, जांवईशोध, वगैरेप्रमाणें कांहीं सामासिक शब्द आहेत, आणि कांहीं शब्द असे आहेत कीं ते व्याकरणांत जरी सामासिक शब्द म्हणून गणले जात नाहींत, तरी अर्थावरून त्यांना सामासिक शब्द म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. करनकरीचा वसा, कानाचा कोपरा, कुत्र्याचें मूत, जन्माची गांठ, जमीन अस्मानाचें अंतर, जाडें प्रकरण, जुलमाचा रामराम, वगैरे ज्या शब्दसंहति, त्यांचे सामासिकशब्दाप्रमाणें विशिष्ट अर्थ उत्पन्न होतात. संस्कृतांत अलुक्समास म्हणून जो प्रकार आहे, त्या प्रकारांत अशा जातीचे कांहीं शब्द येण्याजोगे आहेत. परंतु मराठी व्याकरणकारांनीं ह्या शब्दसंहतींचा एक वर्ग बांधून त्याला स्वतंत्र असें नांव अद्यापि दिलेलें नाहीं. तथापि ह्या शब्दसंहति मराठी भाषेंत महत्त्वाच्या आहेत, आणि त्यांची माहिती विद्यार्थ्यांस असावयास पाहिजे असें मनांत आणून आम्ही त्यांना "समस्तकल्प" असें नांव देऊन त्यांचा संग्रह ह्या प्रकरणांत केली आहे.

८८२. एकेरी शब्द, समस्त शब्द, व समस्तकल्प शब्द हे एका दृष्टीनें कोशांतच समाविष्ट करावयास पाहिजेत. परंतु वाक्प्रचार, व्याकरण, आणि कोश, ह्यांचे विषय एकमेकांशीं फार संलग्न आहेत, ह्या कारणामुळें आम्हांस ह्या पुस्तकांत मधून मधून कोश आणि व्याकरण ह्यांच्या प्रदेशांतही आक्रमण करावें लागत आहे.

८८३. **अकलेचा खंदक**—खंदकांत जसें पुष्कळ पाणी असतें, पण ओंगळ म्हणून पिण्याच्या लायकीचें नसतें, त्याप्रमाणें ज्याच्या डोक्यांत अकल

आहे, पण कोणत्याही कामीं लावतां येण्याजोगी नाहीं, अशा मनुष्याला "अकलेचा खंदक" म्हणतात. मूर्ख, विनअकली, मनुष्य.

८८४. **अक्काबाईचा फेरा**—"अक्काबाई" हा शब्द लक्षणेनें दरिद्रस्थितीला लावला जातो. "अक्काबाईचा फेरा," म्ह० दारिद्र्याचें येणें. दारिद्र्य.

८८५. **अकांड तांडव**—"तांडव," हा शब्द शंकराच्या नृत्यास लावितात. हें नृत्य स्मशानभूमींत आणि पिशाचमंडळींत चालतें. अकांड=भलत्याच वेळीं केलेलें. यावरून "अकांडतांडव" ह्या शब्दाचा उपयोग वेळ अवेळ मनांत न आणतां जें वेड्यासारखें, किंवा मूर्खासारखें, केलेलें कृत्य तें. रागाच्या भरांत दुसऱ्यावर झाडलेला ताशेरा. [अनुरूप क्रियापद "करणें."]

८८६. **अंगदशिष्टाई**—रामानें रावणाकडे आपले तर्फे बोलणें करण्यासाठीं वालिपुत्र जो अंगद त्यास पाठविलें होतें. "शिष्टाई" म्ह० तटस्थपणानें केलेलें भाषण, किं० मध्यस्थी. "अंगदशिष्टाई" म्ह० अंगदानें केलेली शिष्टाई. ह्या मूळच्या अर्थाचा विपर्यास होऊन "अंगदशिष्टाई" ह्याचा हल्लींचा अर्थ लुडबुडेपणा असा झाला आहे.

८८७. **अघळपघळ भाषण**—पुष्कळसें आणि मन मोकळें करून बोलणें. अंगीं प्रामाणिकपणा, किंवा खरें प्रेम, नसतां त्याचा आविर्भाव करून केलेलें जें भाषण, त्यालाही "अघळपघळ भाषण" असें म्हणतात.

८८८. **अजागळ**—अजा=शेळी. गल=गळा. "अजागळ" हा शब्द "अजागलस्तन," ह्याचा अपभ्रंश, किं० ऱ्हस्व स्वरूप आहे. "अजा," म्ह० शेळी; "गल," म्ह० गळा; "स्तन," म्ह० लोंबता मांसल अवयव. ह्या अवयवाचा शेळीला कांहीं उपयोग नसतो. यावरून "अजागळ" शब्दाचा निरूपयोगी असा प्रथम अर्थ होऊन नंतर मूर्ख, कर्तृत्वशून्य, वावळट, असा अर्थ झाला.

८८९. **अडणीवरचा शंख**—देवपूजेंत लागणारा शंख सर्वांस ठाऊकच आहे. शंखाचें बूड गोल असतें, म्हणून तो देवांपुढें ठेवावयासाठीं एक बैठक केलेली असते, तिला "अडणी" म्हणतात. "शंख," हा शब्द व्यवहारांत लक्षणेनें मूर्ख, व अशिक्षित माणसास लावतात. जो मनुष्य मूर्ख

व विनअकली असल्याकारणानें कोठेंही ठेवतां येत नाहीं, म्हणजे कोणत्याही कामीं योजतां येत नाहीं, अशा माणसाला वशील्याच्या जोरावर एकादा हुद्दा मिळाल्यास त्याला डळमळून खालीं पडण्याची भीति नसते. यावरून "अडणीवरचा शंख" म्ह० उंचपदीं बसलेला मूर्ख, विनअकली, अधिकारी. "अडणी" म्ह० लक्षणेनें वशीला.

८९०. **अडेल तट्टू**—आडून बसणारा, हट्ट घेणारा, माणूस. [बुजरा तट्टू पदोपदीं अडतो, आणि पुढें चालत नाहीं, ह्या त्याच्या स्वभावावरून "अडेल तट्टू" हा शब्द निघाला आहे.]

८९१. **अढीच्या दिढी**—उथळेपणानें. सढळ हातानें. महागाईच्या दरानें. एकाच्या ठिकाणीं दीड खर्चून.

८९२. **अतिरथी, महारथी**.—मोठे योद्धे. वीर महावीर. एकाहून एक ज्यास्ती पराक्रमी पुरुष.

८९३. **अंधेर नगरी**—जेथें नेहेमीं अंधेर, ह्मणजे अन्याय, जुलूम, वगैरे चालतात, अशी नगरी. यावरून " अंधेरनगरी," म्ह० अव्यवस्थितपणाचा कारभार, बेबंदशाही, किं० घोटाळा.

८९४. **अनागोंदी**—"अनागोंदी" ह्मणून कर्णाटकांत एक शहर आहे, तेथील राज्य लहानच होतें, आणि तेथें व्यापाराची घडामोड व आसपासच्या राजांशीं व्यववहारही बेतावाताचा असे. परंतु तेथला राजा आपल्या राज्याचें वैभव गाजविण्यासाठीं भपकीदार जमाखर्च मांडीत असे. तो मोठमोठ्या रकमा जमेच्या बाजूस घालून तेवढ्याच रकमा पुन्हा खर्चाच्या बाजूस मांडून जमाखर्च समतोल करीत असे. यावरून " अनागोंदी" म्हणजे अव्यवस्थित कारभार, असा अर्थ झाला, व " अनागोंदी जमाखर्च " म्हणजे खोटा, किं० अव्यवस्थित, जमाखर्च असा अर्थ झाला.

८९५. **अमरपट्टा**—मरणापासून आपणांस भीति नाहीं, अशा प्रकारचें आश्वासन.

८९६. **अमृतसिद्धियोग**—रविवारीं हस्त, सोमवारीं श्रवण, मंगळवारीं अश्विनी, बुधवारीं अनुराधा, गुरुवारीं पुष्य, शुक्रवारीं रेवती, किंवा शनिवारीं रोहिणी, हीं नक्षत्रें आल्यास त्यास"अमृतसिद्धियोग"म्हणतात.

त्या त्या नक्षत्रानें युक्त असा तो तो वार कार्यसिद्धीस शुभ म्हणून गणिलेला आहे. ह्यासंबंधाचा जोतीषशास्त्रांतील श्लोक येणेंप्रमाणें आहे:—

आदित्यहस्ते गुरुपुष्ययोगे बुधानुराधा शनिरोहिणीच ।
सोमेच श्रवणं भृगुरेवतीच भौमाश्विनी चामृतसिद्धियोगः ॥

८९७. **अरण्यरोदन**—अरण्यांत रोदन केलें असतां तें निष्फल होतें. कारण सांत्वन करावयास, किं० समजूत घालावयास, तेथें कोणीही येत नाहीं. यावरून "अरण्यरोदन," म्हणजे निष्फल प्रयत्न; निरुपयोगी खटपट; व्यर्थ मेहेनत.

८९८. **अरेराव**—अरे! अरे! करणारा. अरे! अरे! करण्यांत पटाईत. सदा लोकांच्या अंगावर खेकसणारा. यावरून "अरेराव" म्ह०मगरूर, गर्विष्ठ, मनुष्य. अल्पाधिकारानें प्रमत्त झालेला माणूस.

८९९. **अर्धचंद्र**—अष्टमीचा चंद्र अर्धा असून तो अर्धवर्तुळाकृति असतो. गचांडी देतांना हाताचा अंगठा व पुढचें बोट हीं ताणलीं जाऊन अर्ध्या चंद्राचा आकार होतो. यावरून "अर्धचंद्र" म्हणजे गचांडी, असा अर्थ झाला. क्रियापद देणें, मारणें, मिळणें इ०.

९००. **अर्धांगी**—"अर्ध"म्ह०अर्धें."अंग" म्ह०शरीर.पत्नी ही पतीच्या शरीराचा अर्धा भाग आहे असें समजलें जातें. "अर्धं भार्या मनुष्यस्य," वगैरे वचनांवरून हेंच सिद्ध होतें. यावरून "अर्धांगी," म्हणजे भार्या.

९०१. **अलबत्या गलबत्या**—कोणी तरी. क्षुल्लक माणूस. वरिष्ठाची थुंकी झेलणाऱ्या लोकांचे ठायीं स्वाभिमानाचा लवलेश नसतो. वरिष्ठानें कांहींही विधान केलें, तरी त्यावर "अलबत्" म्हणून दुजोरा देणारे जे लोक, त्यांना "अलबते" किं०"अलबत्ये" असा शब्द प्रथम लावण्यांत आला. नंतर हे असले लोक हलकटच असतात, यावरून "अलबत्या" शब्दाचा अर्थ "हलकट, किं० यःकश्चित् माणूस; लुडबुड्या," असा झाला. "अलबत्या" च्या पुढें "गलबत्या" हा शब्द केवळ यमकासाठीं घातला आहे. उ० खुद्द त्याच्या कुटुंबांत चार पांच माणसें आहेत. परंतु पंक्तीला पंचवीस अलबते गलबते असतात. त्यांचेमुळें सारें माजघर भरून जातें.

९०२. **अलीजा दरबार**—अवाढव्य थाटमाट. अव्यवस्थित कारभार, किं० राहाटी.

९०३. **अलम् दुनिया**—"अलम्" म्ह० सर्व; "दुनिया" म्ह० जग. अलम्दुनिया म्ह० सारें जग.

९०४. **अवाचे सव्वा**—एकाच्या जागीं सव्वा. पुष्कळ. अव्यवस्थित. उ० अवाचे सव्वा किंमत देऊन हा धोतरजोडा विकत घेण्याचें तुला काय कारण होतें?

९०५. **आष्टाधिकार**—अनेक प्रकारचीं कामें. सारे कारभार.

९०६. **अस्मानी सुलतानी**—फारशींत आस्मान्=आकाश. सुलतान्=बादशाहा. यावरून "अस्मानी सुलतानी" ह्याचा अर्थ दुर्दैवामुळें, किंवा राजाच्या दुष्टपणामुळें, प्राप्त झालेलीं संकटें.

९०७. **अळवावरचें पाणी**—अळवाच्या पानावर पाणी पडलें, किंवा टाकिलें, असतां तें त्याला चिकटत, किं० लागत, नाहीं. यत्किंचित् धक्का लागला असतां तें खालीं पडतें. यावरून " अळवावरचें पाणी " म्हणजे चंचळ, अस्थिर, किं० क्षणभंगुर, वस्तु.

९०८. **अळीमिळी गूपचिळी**—स्वस्थ व न बोलतां गप्प बसण्याची ताकीद एकमेकांस करतांना मुलें या शब्दाचा उपयोग करतात. [अनुरूप क्रियापद "घालणें."]

९०९. **अक्षरशत्रु**—अक्षरांस शत्रु समजून त्यांना टाळणारा. ज्याला लिहितां वाचतां येत नाहीं, किं० ज्याला शिकण्याचा अतोनात कंटाळा आहे, असा.

९१०. **आऊट घटकांचा आनंद, आउट घटकांचें राज्य**—क्षणभंगुर आनंद, अधिकार, किं० अंमलदारी. [याच प्रकरणांत पुढें "शिराळशेट" हा शब्द पहा.]

९११. **आकाशाची कुऱ्हाड**—ईश्वरानें आणिलेली, किं० दिलेली, दुःखकारक स्थिति. ईश्वरी क्षोभामुळें प्राप्त झालेलें संकट.

९१२. **आकाशाची धाड**—[अर्थ वरच्याप्रमाणें.]

९१३. **आकाशपाणी**—मद्य, ताडी, किं० माडी.

९१४. **आकाशमुनि**—उंट.

९१५. **आकाशयान**—विमान.

९१६. **आकाशवाणी**— कोणातरी मनुष्याचे शब्द. जेव्हां एकादी वातमी आपण अमक्याच्या तोंडून, किं॰ अमक्या ठिकाणीं, ऐकिली, असें श्रोत्याला कळवावयाचें नसतें, तेव्हां त्या वातमीला "आकाशवाणी" म्हणतात. उ॰

खंडोपंत—मी कापडाचें दुकान काढणार हें तुम्हांला कोणीं सांगितलें ?
वंडोपंत—तशी आकाशवाणी माझ्या कानीं आली. पण तुम्ही दुकान काढणार हें खरें ना?"

९१७. **आकाशपाताळाचा भेद**—अति मोठा फरक. उ॰ तो म्हणाला, "आत्मा आणि बुद्धि हीं जर तूं एक समजत असलास, तर आकाश-पाताळाचा भेदच तूं नाहींसा केलास, असें म्हटलें पाहिजे!"

९१८. **आखाडसासरा**—नसता मोठेपणा आपणाकडे घेऊन दुसऱ्यावर करडा अमल चालवूं पाहाणारा माणूस. ह्याच प्रकारची स्त्री असल्यास तिला "आखाडसासू" म्हणतात.

९१९. **आगापिछा**—आगा—पुढची वाजू, पिछा—मागची वाजू. यावरून पुढील दोन अर्थ निघाले.

(क) "आगा" म्ह॰ आईबाप वगैरे मागच्या पिढीचीं माणसें. आणि "पिछा" म्ह॰ पुत्र, कन्या, वगैरे पुढच्या पिढीचीं माणसें "आगापिछा" म्ह॰ मागच्या आणि पुढच्या पिढीचीं माणसें. उ॰ आतां मला आगापिछा कांहीं नाहीं! काशीवासास जावें म्हणजे जन्माचें सार्थक होईल!

(ख) तपशीलवार वृत्तांत. पूर्वपीठिका. सुगावा. तपास करण्याचीं करण्याचीं साधनें. उ॰ त्या चोराचा कांहीं आगापिछा माहीत असल्याशिवाय त्याचा तपास कसा लागणार?

९२०. **आग्या वेताळ**—एका जातीचा वेताळ. वेताळ=एका जातीचें भूत. आग्या वेताळाचा मंत्र जपला म्हणजे ह्याच्या त्या माणसाला, किं॰ वस्तूला, आग घालतां येते, म्ह॰ जाळून तिचें भस्म करतां येतें. लाक्ष-

णिक रीत्या हा शब्द योजला म्हणजे त्याचा अर्थ "तामसी किंवा तडफड्या प्रकृतीचा माणूस," असा होतो. उ० आमचे रावसाहेब म्हणजे शुद्ध आग्या वेताळच आहेत!

९२१. **अठरा विश्वे दारिद्र्य**—कोणत्याही वस्तूचे वीस भाग कल्पिले, तर त्यांपैकीं ५ भाग म्हणजे पाव वस्तु, १० भाग म्हणजे निमी वस्तु, इत्यादि परिमाणें होतात. वीसांपैकीं १८ भाग म्हणजे बहुतेक पूर्ण वस्तु. "विसवा" म्ह० वीसावा भाग. "अठरा विसवे दारिद्र्य" म्हणजे पूर्ण दारिद्र्य.

९२२. **अठरा धान्याचें कडबोळें**—बाजरी, गहूं, तांदूळ, हरभऱ्याची डाळ, उडीद, वगैरे धान्यें भाजून त्यांचें जें पीठ, त्याला "भाजणी" म्हणतात. कडबोळीं भाजणीचीं करतात. अर्थात् अनेक धान्यांच्या मिश्रणापासून कडबोळें तयार होतें. यावरून "अठरा धान्यांचें कडबोळें" म्हणजे अनेक वस्तूंच्या मिश्रणापासून बनलेली, किं० बनविलेली, कोणतीही वस्तु. [येथें "अठरा" हा शब्द विशिष्ट संख्या दाखवीत नाहीं. केवळ मोठी संख्या दाखवितो.]

९२३. **अठरा पगड जात**—हिंदू लोकांची पगड्या बांधण्याची तऱ्हा जाती जातीस वेगळी आहे. जितक्या जाति, तितके पगड्यांचे प्रकार. यावरून "अठरा पगडजाति" म्हणजे सर्व जाति. सर्व जातींचे लोक.

९२४. **आंतबट्याचा व्यापार**—ज्या व्यापारांत फायदा न होता नुकसान झालें आहे, किं० नुकसान होणें हें खास आहे, तो आंतबट्याचा व्यापार.

९२५. **आतुर संन्यास**—आपला मरणकाल अगदीं जवळ येऊन ठेपला आहे अशी मनाची समजूत झाली असतां जो संन्यास घेतात तो.

९२६. **आंवळ्यायेवढें पूज्य**—"पूज्य" म्ह० अभाव. "आंवळ्यायेवढें पूज्य" म्ह० अत्यंताभाव. उ० त्याचें संस्कृत जरा बरें आहे, परंतु गणिताविषयीं म्हणाल, तर आंवळ्यायेवढें पूज्य! [ह्या वाक्प्रचारांत "पूज्य" हा शब्द अध्याहृत ठेविला तरी चालतो. तसेंच आंवळ्यायेवढें ह्याच्याबद्दल भोपळ्या येवढें म्हणण्याचा ही प्रघात आहे.]

९२७. **इळ्याभोपळ्याइतकें सूत**—इळयानें म्ह० विळ्यानें भोपळा चिरितात, म्हणून विळा हा भोपळ्याचा शत्रु. " विळ्याभोपळ्याइतकें सूत " म्हणजे शत्रुत्वाचा संबंध. " विळ्याभोपळ्याइतकें वाकडें," याचाही वरील अर्थानें उपयोग केला जातो.

९२८. **उंटावरचा शाहाणा**—मूर्खपणाची सल्लामसलत देणारा माणूस. याची उपपत्ति पुढें दिल्याप्रमाणें आहे:— कोण्या एका मनुष्याच्या घराच्या अंगणांत एक पाण्याचा रांजण होता. एके दिवशीं त्याच्या म्हशीनें पाणी पिण्यासाठीं रांजणांत तोंड घातलें. तें जातांना गेलें पण कांहीं केल्या बाहेर निघेना. त्या म्हशीला ह्या संकटांतून सोडविण्यासाठीं त्या घरांतील सर्व लोक व आळींतील सर्व माणसें अंगणांत गोळा झालीं. अनेकांनीं अनेक उपाय केले. कांहींनीं म्हशीची शेपटी खेचली, कांहींनीं तिच्या तंगड्या खेचल्या, कांहींनीं तिच्या बरगड्यांवर काठ्या मारल्या, परंतु म्हशीचें तोंड म्हणून कांहीं केल्या निघेना! इतक्यांत रस्त्यांतून एक उंटावर बसून मनुष्य चाललेला होता. ह्या घरांत गडबड कसली आहे म्हणून त्यानें विचारलें, तेव्हां त्याला मंडळींनीं सारी हकीगत सांगितली. तेव्हां तो म्हणाला, " मला उंटासकट आंत घ्याल तर मी इलाज सांगेन. " तेव्हां तेथें जमलेल्या मंडळीनें तें कबूल केलें, आणि लागलीच घराची भिंत पाडून त्या उंटावरच्या माणसास आंत घेतलें. ह्या उंटावरचा माणूस म्हशीची स्थिति पाहून म्हणाला, " म्हशीचें तोंड बाहेर निघणें शक्य नाहीं. यासाठीं तिची मान कापिली पाहिजे. " तेथील लोकांनीं ही गोष्ट नाइलाजास्तव पथकरली. मग तिची मान तोडण्यांत आली, परंतु तिचें मुंडकें जें रांजणांत अडकलेलें होतें तें तसेंच होतें! यावर त्या उंटावरच्या कल्पक स्वारानें म्हटलें, " आता दुसरा इलाज नाहीं, रांजण फोडला पाहिजे! " ह्या सूचनेवरून लोक रांजण फोडावयास सरसावले! इतक्यांत घराचा मालक—जो कांहीं कामानिमित्त बाहेर गेलेला होता तो—घरीं परत आला, आणि ही गडबड कसली म्हणून पाहातो, तों त्याला सर्व प्रकार समजला. तेव्हां त्याणें कपाळावर हात मारून घेतला, आणि म्हटलें, " नशीब माझें! हा उंटावरचा शाहाणा आला,

आणि माझी इतकी नुकसानी झाली! माझ्या घराची भिंत पडली, आणि माझी म्हैस मेली! अगोदरच रांजण फोडला असता तर हा सर्व अनर्थ टळला असता! "

९२९. **उणें उत्तर**—अपमानकारक, किं० तिरस्कारव्यंजक, भाषण, किं० जवाब. [ मागें ले० ६९१, २ पहा ]

९३०. **उंबराचें फूल**—व्यवहारांत ज्याला "उंबर" म्हणतात तें फळ नसून ती खरोखरीं झाडाची फांदी असते, व तिच्या पोकळींत असंख्य फुलें व फळें असतात. इतर झाडांचीं फुलें दिसून नंतर त्यांतून फळें उत्पन्न होतात, तशीं उंबरांचीं फुलें दिसत नाहींत, तर एकदम फळच ( व्यवहारांतील भाषेप्रमाणें फळ ) दिसतें. यावरून उंबराच्या झाडास फूलच नाहीं, अशी लोकांची समजूत आहे. यावरून " उंबराचें फूल " म्ह० सशाच्या शिंगाप्रमाणें असद्वस्तु, किं० अशक्य वस्तु, असा अर्थ व्हावयाचा, परंतु प्रचलित भाषेंत होणाऱ्या विपर्यासाप्रमाणें " उंबराचें फूल " ह्याचा अर्थ दुर्मिळ वस्तु, किंवा वारंवार दृष्टीस न पडणारी वस्तु, असा झाला आहे. उ० अहो गोजराबाई, तुम्ही आलीकडे उंबराचें फूल कां झाला आहां? ( म्ह० आम्हांला अगदींच भेटेनाशा कां झाला आहां? )

९३१. **उलटी अंबारी**—भिक्षेची झोळी. " उलट्या अंबारींत बसणें, " म्ह० भिक्षेची झोळी हातांत घेऊन भिक्षा मागत हिंडणें. [ मागें ले० ७९८, १७ पहा ]

९३२. **ऋणानुबंध**—पूर्वजन्मींचा संबंध. स्नेह. संबंध. घरोब्याचा संबंध. सलगी. उ०

> जन हो! मजपासुनिया सुखदुःखाशा मुळींच वर्जावी ।
> सरला ऋणानुबंधाचि, ईशस्मरणींच वेळ योजावी ॥
>
> वनवासी.

९३३. **ऋणायस्वरूपी**, किं० **ऋणाईतस्वरूपी**—निरुपयोगी आणि उपद्रवी माणूस.

[ टीप—ऋण देणारा, म्ह० पैसे उसने देणारा माणूस, ऋण घेणाऱ्या माणसास तगादा लावून उपद्रव देतो, ह्यावरून हा शब्द रूढ झाला आहे].

९३४. **एका माळेचे मणी**--एका माळेंतले सगळे मणि आकारानें, वर्णानें, व वजनानें सारखे असतात. यावरून "एका माळेचे मणि" ह्याचा विपरीत लक्षणेनें एका सारखे एक वाईट लोक ह्याअर्थी उपयोग होतो. उ० रामा खोडकर आहे आणि गोविंदा खोडकर नाहीं, असें कांहीं नाहीं. ते दोघेही एकाच माळेचे मणि आहेत !

९३५. **एरंडाचें गुऱ्हाळ**—गुऱ्हाळांतील चरकांत ऊस घातला असतां त्याचे पासून मधुर रस मिळतो; परंतु एरंड चरकांत घातला असतां त्यापासून गोड रस मिळणें तर दूरच, पण वांतिकारक रस निघतो; यावरून "एरंडाचें गुऱ्हाळ," म्ह० कंटाळवाणें, नीरस, व लांबच लांब भाषण.

९३६. **एळकोट**--खंडोबाचे भक्त खंडोबाची तळी उचलतांना, किं० भिक्षा मागतांना, " एळकोट ! " हा शब्द उच्चारतात. यावरून " एळकोट, " म्ह० सर्वांनीं हातभार लावून एकदिलानें केलेला प्रयत्न. तळी उचलतांना भक्तमंडळी गोंधळ आणि गडबड करीत असतात. ह्यावरून " एळकोट, " म्हणजे गोंधळ, किंवा अव्यवस्था, असा नंतर अर्थ झाला. उ० दहा घरचीं दहा माणसें आलीं, आणि त्यांनीं साऱ्याच कामाचा एळकोट करून टाकला !

९३७. **ओ कां ठो**—कांहीं देखील. उ० त्याला ओ कां ठो देखील कळत नाहीं! ( हें अक्षर " ओ " आहे किंवा " ठो" आहे, हें देखील त्याला समजत नाहीं. )

[ ह्या शब्दसंहतीचा उपयोग नेहमीं अकरणरूपीं होतो. ]

९३८. **ओनामा**--मुलें प्रथम अक्षरें शिकूं लागतात, तेव्हां पहिला धडा " ओम् नमःसिद्धम् " ह्या वाक्याचें अपभ्रष्ट रूप " ओनामासीधं " हा घेतात. ह्या अपभ्रष्ट अक्षरांत छाटाछाट होऊन " ओनामा " असा शब्द होऊन त्याचा अर्थ प्रारंभ असा झाला. **ओनाम्या**—ओनामा शिकणारा. कोणत्याही विद्येला, शास्त्राला, किंवा विषयाला, ज्याणें नवीनच सुरवात केली आहे असा.

९३९. **ओली आग**--अतिवृष्टीनें आलेलें संकट, किं० दुर्भिक्ष्य. उ० कोरडी आग पुरवेल, पण ओली आग पुरवणार नाहीं !

९४०. **ओली भिक्षा**—शिजविलेल्या अन्नाची भिक्षा म्ह० माधुकरी. याच्या उलट "कोरडी भिक्षा," म्हणजे तांदूळ, बाजरी, जोंधळे, वगैरेंची भिक्षा.

९४१. **कचकच**—कचकच हा आवाज होईल रीतीनें. उ० अन्नपूर्णाबाई आणि शारदाबाई एकमेकींशीं सदा कचकच भांडत असतात. [ माणसें रागावलीं म्हणजे दांत ओंठ खातात. दांत एकावर एक घासल्यानें "कचकच" असा आवाज होतो. ]

**टीप**—"कचाकची" ह्याचा "दांत ओंठ खाऊन भांडणें," ह्या अर्थानें उपयोग होतो.

९४२. **कडू कारलें**—अतिशय वाईट व न सुधारणाऱ्या स्वभावाचा माणूस. उ० नाऱ्या हें एक कडू कारलेंच आहे! त्याची संगत तूं धरलीस, तर तो तुझ्या जिवाला सुख लागूं देणार नाहीं!

९४३. **कत्तलची रात्र**—मोहरम महिन्याच्या दहाव्या तारखेला रात्रीं हसन व हुसेन यांच्यांत मोठी भयंकर लढाई होऊन मोठी कत्तल झाली. यावरून "कत्तलची रात्र" याचा अर्थ ऐन घाईची, गर्दीची, किं० आणीबाणीची, वेळ असा झाला.

९४४. **कथा काय**—मातब्बरी काय? महत्त्व काय?

९४५. **कपी**—एकाद्या मंडळींतलि, किं० टोळींतील, अत्यंत जुना माणूस.

**टीप**:—म्हातारीं माणसं हाडकीं, कुरूप, नरचेवर श्मश्रु न करविणारीं, वांकडींतिकडीं असल्यामुळें तीं माकडाप्रमाणें दिसतात; यावरून त्यांना "कपि," ( म्ह० माकड ), ही संज्ञा लावण्यांत येते!

९४६. **कपिलाषष्ठीचा योग**—फारच दुर्मिळ संधि. पुष्कळ कालानें प्राप्त होणारी संधि.

**टीपः**—भाद्रपद महिन्याची वद्य षष्ठी. ही तिथि मंगळवारीं येऊन त्या दिवशीं रोहिणी हें दिवसनक्षत्र, हस्त हें महानक्षत्र, आणि व्यतिपातयोग, इतक्या गोष्टी जुळल्या, तर त्या षष्ठीला "कपिलाषष्ठी" म्हणतात, व त्या संयोगाला "कपिलाषष्ठीचा योग," असें म्हणतात. इतका सात गोष्टींचा योग हा अर्थात् फार दिवसांनींच व्हावयाचा.

२४७. **कंबख्ती**—विपन्नावस्था; दुर्दैव; मार बसण्याची, खेटरें खाण्याची, शिव्या ऐकून घेण्याची वेळ, किं० शक्यता, किं० संभवनीयता, किं० स्थिति. [अनुरूप क्रियापद येणें, भरणें इ०]. उ० गोंद्याच्या हातून तो आरसा फुटला. बाबा दुपारीं घरीं आल्यावर आपली कंबख्ती निघणार ह्या भयानें गोंद्या जो पळून गेला, त्याचा अझून ठिकाण नाहीं!

२४८. **करनकरीचा वसा**—कर म्हटलें असेल तें करावयाचें नाहीं, आणि करूं नको म्हटलेलें असेल तें करावयाचें, अशी वागण्याची तऱ्हा.

२४९. **करणी**—

(क) लग्नांत वराला धोतरजोडा, पागोटें, वगैरे जे जिन्नस देतात, त्यांना "करणी" म्हणतात. उ० आमच्या व्याह्यांनीं १००० रुपये हुंडा देऊन शिवाय २०० रुपयांची करणी केली.

(ख) जारणमारणादिकर्म. उ० मांत्रिकानें विठोजीवर करणी करतांच विठोजी भडभडा रक्त ओकून मरण पावला!

२५०. **कर्णपिशाच**—एकादें वर्तमान गुप्तपणानें येऊन सांगणारा माणूस. उ० प्रश्नः– क्राफर्ड मार्केटांत केळ्याच्या सालीवरून माझा पाय निसरून मी पडलों, हें तुला कसें कळलें? उत्तरः—सांगितलें मला कोणी कर्णपिशाचानें! पण तूं पडलास ही गोष्ट खरी ना? उ० तुम्ही एक दोन कर्णपिशाचें आपलींशीं करून ठेवा. म्हणजे तुमच्याविषयीं कोण काय बोलतात, हें तुम्हांला तावडतोब समजेल.

[**टीप**:—आपल्या भक्ताला भूत, भविष्य, सांगणारें एक पिशाच असतें, ह्या समजावरून "कर्णपिशाच" ह्याचा अर्थ वरील प्रमाणें झाला.

२५१. **कर्णाचा अवतार**—अत्यंत उदार मनुष्य. कोणी कांहींही वस्तु मागितली असतां " देत नाहीं " असा शब्द न वदणारा. [ कर्णाला जन्मजात कवचकुंडलें होतीं, व तीं त्याच्या अंगावर असतील तोंपर्यंत त्याला युद्धांत पराभूत करणें अशक्य होतें. ही त्याची अद्भुत शक्ति हिरावून घेण्यासाठीं इंद्र ब्राह्मणरूपानें आला, आणि त्याणें कर्णाजवळ तीं कवचकुंडलें मागितलीं. कर्ण हा मोठा दाता असल्याकारणानें त्याणें

तीं त्या ब्राह्मणास दिलीं. मग पुढें युद्धामध्यें अर्जुनानें त्याचा पराजय करून त्यास ठार मारिलें ]

९५२. **कर्दनकाळ**--उग्र, भयंकर, रागीट, किं० तापट माणूस. अपराधाची क्षमा न करतां दंड करणारा. उ० गोदीसारख्या पोरीला कर्दनकाळ सासू मिळाली, तर तिचे हाल कुत्रा खाणार नाहीं !

**टीपः**—कदन=युद्ध, तंटा, बखेडा, किं० मारामारी. काळ=यम, जो सर्वांचा नाश करतो. " कदनकाळ, " म्ह० युद्ध करून शत्रूला शासन करणारा. या व्युत्पत्तीवरून वरील अर्थ झाला. "कर्दनकाळ" हें "कदनकाळ" हें अपभ्रष्ठ रूप.

९५३. **कर्मकटकट**--त्रासदायक, जिकीरीचें, नावडतें, असें काम. उ० मी झालों आतां म्हातारा. तुमच्या मुलाला पाडेविडे शिकवावयाला ठेवा एकादा मास्तर ! माझ्या मागें ही कर्मकटकट लावूं नका !

९५४. **कर्मधर्मसंयोग**--यदृच्छा. अकल्पित मेळ. प्रारब्धयोग. [ मागें ले० ८३३ पहा ].

९५५. **कल्याण**--रामदास स्वामींचा "कल्याण" या नांवाचा एक पट्ट शिष्य होता. तो त्यांची सर्व प्रकारची सेवाचाकरी करावयास सिद्ध असे. यावरून कोणाही भाविक शिष्यास हा शब्द विनोदानें, किं० उपहासानें, लावण्यांत येतो.

९५६. **कळस**—अतिरेक. पराकाष्ठा. उ० रामानें तर दांडगाईचा कळसच करून सोडला !

९५७. **कळसुत्री बाहुलें**—दुसऱ्याच्या प्रेरणेनें चालणारें बाहुलें. स्वाभिमान विसरून जाऊन दुसरा आज्ञा करील त्याप्रमाणें वागणारा हलकट माणूस. स्वतांचें मन घट्ट नसल्या कारणानें दुसरा कोणी जें कांहीं सांगेल, तें खरें व योग्य समजून त्याप्रमाणें वागणारा. पुळपुळीत माणूस. उ० गोंद्याला तुम्ही फार कडक रीतीनें वागवूं नका. तो विथरला, तर तो आपल्या कळसूत्री बाहुल्यांकडून तुमच्यावर निनांवी पत्रांचा भडिमार करील ! उ० वजीराच्या हातीं सर्व सत्ता असून बादशाहा त्याच्या हातांत नुसता कळसूत्री बाहुल्याप्रमाणें होता !

९५८. **कळीचा नारद**—कळ लावणारा, कलागती उत्पन्न करणारा माणूस. नारदमुनीचा स्वर्गलोक, मृत्युलोक, आणि पाताळलोक, या तिन्ही लोकीं संचार असल्यामुळें त्याला सर्वत्र घडणाऱ्या सर्व गोष्टी कळत असत, व अमुक ठिकाणीं अमुक घडलें, तमुक ठिकाणीं तमुक घडलें, वगैरे वर्तमानें तो इकडचीं तिकडे आणि तिकडचीं इकडे सांगे; आणि तेणेंकरून अर्थात् कधीं कधीं नाहक तंटे उत्पन्न होत. यावरून नारद हा कळ लावणारा, कलागती उत्पन्न करणारा, म्हणून प्रसिद्ध झाला.

९५९ **काकरव**—कावळ्यांची ओरड. निंदकांनीं केलेली निंदा. उ० मी जर पाप केलेलें नाहीं, तर चंडाळांच्या काकरवानें माझें काय नुकसान होणार? [काक=कावळा. रव=ध्वनि, आवाज, ओरड.]

९६०. **कानाचा कोपरा**—कोणीही. उ० मी मुंबईस जाणार आहें, ही गोष्ट मी कानाच्या कोपऱ्याला कळूं दिली नाहीं !

९६१. **काशीकर**—पक्का भामट्या. काशीचे भामटे फार कुशल असतात, यावरून "काशीकर" याचा अर्थ वरीलप्रमाणें झाला आहे.

९६२. **काळीचें उत्पन्न**—जमीनीचा महसूल. [मागें ले० ७०३, १ पहा.]

९६३. **काळें पाणी**—अपराधाबद्दल शिक्षा म्हणून जो दूरचा देश रहावयासाठीं ठरविलेला असतो तो. [मागें ले० ७०२, १० पहा.]

९६४. **कुडमुड्या जोशी**—हस्तसामुद्रिक, रमल, ज्योतिष, वगैरे आपणास समजतात, असा डौल घालून जो भविष्यकथन करीत असतो तो.

९६५. **कुत्र्याचें मूत**—तुसडा, चिरडखोर, त्रासिक, माणूस.

९६६. **कुबेर**—अतिशय संपत्तिमान् माणूस. कुबेर हा स्वर्गलोकचा धनाधिपति.

९६७. **कुंभकर्ण**—झोपाळू माणूस. कुंभकर्णी झोप—गाढ आणि पुष्कळ वेळ टिकणारी झोप. [ कुंभकर्ण हा रावणाचा भाऊ होता, व त्यानें तपश्चर्येनें शंकरास संतुष्ट करून त्याचेपासून गाढ आणि पुष्कळ महिने टिकणाऱ्या झोपेचा वर मागून घेतला होता. ]

९६८. **कूपमंडूक**—विहिरींतील बेडकाचें जग म्हणजे त्या विहिरींतीलच संकुचित जागा; त्या विहिरीच्या बाहेर काय आहे, याची त्याला मुळीं

कल्पना नसते. त्याप्रमाणें जो मनुष्य आपला गांव, किंवा देश, सोडून कधीं बाहेर गेला नाहीं, त्याला आपला गांव, किंवा देश, चांगला असा वाटत असतो, व इतर गांव, किंवा देश, यांना तो विनाकारण तुच्छ लेखीत असतो. यावरून "कूपमंडूक" म्हणजे ज्यानें जग पाहिलेलें नाहीं, व आपला गांव किंवा देश हेंच चांगले असें म्हणून जो आपले ठायीं धन्यता मानीत असतो, असा मनुष्य. आकुंचित मनाचा माणूस.

९६९. **कैकेयी**—दुष्ट, कजाग, व हट्टी स्त्री. [अयोध्येचा राजा जो दशरथ, त्याला तीन बायका होत्या. त्यांत कैकेयी ही त्याच्या प्रीतींतील होती. तिणें दशरथाला वचनांत पकडून रामाला चवदा वर्षें वनवास भोगावयास पाठविलें. राम वनास गेल्यावर दशरथ पुत्रविरहानें मरण पावला. ह्याचें तिला तिळमात्र दुःख न होता, आतां आपला मुलगा भरत ह्यास राज्य प्राप्त होईल म्हणून अति हर्ष झाला].

९७०. **कोटकल्याण**--(शुद्ध रूपः—कोटिकल्याण).

(क) फार मोठें कल्याण.

(ख) चांगला पुरण्याइतका व शिवाय पुरून उरण्याइतका. पदार्थ उ० सखाराम चार महिने रामभाऊंच्या कच्छपीं होता. रामभाऊंनीं त्याला दहा रुपयांची नोकरी लावून दिली. त्याचें कोटकल्याण झालें. उ० शेरभर दुधांत आमचें कोटकल्याण होतें! खायाला माणसें, तरी आहेत कोण?

९७१. **कोण्या झाडाचा पाला?**—त्याची काय मोठीशी मातबरी? तो काय यःकश्चित् माणूस? उ० हमजेखानाची मला कशाला भीति दाखवितोस? तो कोण्या झाडाचा पाला?

९७२. **कोरड्यास**—भाकरी वगैरे सारखा कोरडा पदार्थ चावावयाला कठिण असतो; त्याच्याबरोबर आमटी, वरण, वगैरे ओला किंवा पातळ पदार्थ आवश्यक असतो. ह्यावरून "कोरड्यास" म्ह० कोरडा पदार्थ सोयीनें खातां येईल असा कांहीं तरी पातळ पदार्थ. ["कोरड्यास" हें मूळचें चतुर्थ्यन्त नाम असून प्रथमेचें किंवा द्वितीयेचें रूप म्हणून नंतर योजण्यांत येऊं लागलें.]

९७३. **कोल्हेकुई**—हलकट लोकांनीं एकाद्याविरुद्ध केलेली ओरड. उ० माझा पक्ष बळकट आहे. लोकांनीं मजविरुद्ध कितीही कोल्हेकुई केली, तरी मी डगणार नाहीं!

९७४. **कोळशांतील माणिक**—अतिशय काळा माणूस. उ० आबाजीला बायको मिळाली आहे ती काय सांगूं? अगदीं कोळशांतलें माणीक.

९७५. **खडाजंगी**—मोठा तंटा. आवेशयुक्त भांडण. उ० बालविवाह ह्या विषयावर आम्हां दोघांची खूप खडाजंगी उडाली! [ खडा=उभ्यानें, चालविलेलें. जंग=युद्ध. ]

९७६. **खडान्खडा माहिती**—अगदीं बारीकसारीक गोष्टींची देखील माहिती. उ० त्या तंट्याची मला खडान्खडा माहिती आहे. [ जमीनींत माती असते, आणि मातींत खडे असतात. एकाद्या जमीनींतील ज्याला प्रत्येक खडा माहीत आहे, त्याला त्या जमीनीची, किं० जागेची, किं० ठिकाणाची, पूर्ण माहिती असणारच. ]

९७७. **खडाष्टक**—वैरभाव. शत्रुत्व. [ पुढें ज्योतिषप्रकरणांत खुलासेवार स्पष्टीकरण पहा ].

९७८. **खंडीभर लेंकरें**—पुष्कळ मुलें बाळें. [ खंडीच्या मापांत धान्याचे जितके दाणे असतात तितकीं. ]

९७९. **खप्पी दास**—वस्ताद, करारी, न कचरणारा, चिकाटी धरणारा, माणूस.

९८०. **खरवड**—त्रासदायक माणूस. [ दूध वगैरे पदार्थ तापविला असतां भांड्याच्या तळाला जो टणक थर बसतो, त्याला "खरवड" असें म्हणतात. तो काढण्याला भारी त्रास पडतो. यावरून त्रासदायक माणसाला "खरवड" ही संज्ञा साहजिक रीत्या लावण्यांत येऊं लागली ].

९८१. **खापरतोंड**—

(क) निपणतूचा मुलगा.

(ख) दुर्दैवी, अपशकुनी, माणूस.

९८२. **खिरींत सराटा**—

१. (क) अति उत्कृष्ट पदार्थांत चुकून राहिलेला बारीकसा वाईट पदार्थ

(ख) मंडळीच्या सुखाचा भंग करणारा त्रासदायक, व उपद्रवी माणूस.

२. **खिरींत हिंग**—मंडळीच्या रंगाचा भंग करणारा उपद्रवी माणूस.

९८३. **खुशालचंद**—कशाचीही काळजी न करतां सुखविलासांत जो आपले दिवस घालवितो तो.

९८४. **खुशीचा सौदा**—आपल्या इच्छेप्रमाणें जें काम करावयाची आपणाला पूर्ण मोकळीक आहे, असें काम.

९८५. **खोगीरभरती**—

(क) "खोगीर" म्हणजे घोड्यावर बसावयासाठीं केलेली मऊ आणि जाडी अशी एक प्रकारची बैठक. ती मऊ आणि जाडी करावयासाठीं तिच्या आंत चिंध्या, केश, वगैरे अन्य कामाला निरुपयोगी पदार्थ भरलेले असतात. यावरून "खोगीरभरती" म्हणजे केवळ संख्या, किंवा आकार, फुगविण्यासाठीं घेतलेले पदार्थ, किंवा माणसें.

(ख) पूर्वी स्वारांच्या गणतीमध्यें खरे शिपायी जेव्हां एकाद्या सरदाराला मिळत नसत, तेव्हां तो घोड्यांच्या खोगिरांवर शिपायाचा पोशाख घातलेले कोणी तरी लोक बसवून स्वारांची संख्या मोठी करून दाखवीत असे. अशा माणसांना "खोगीरभरतीचीं माणसें" असें म्हणत.

९८६. **गंगाजमनी**—गंगेचें पाणी पांढरें आहे, व जमुनेचें (यमुनेचें) काळें आहे. प्रयाग येथें त्या दोन नद्यांचा संगम झाला आहे, तेथें ते दोन्ही प्रवाह भिन्न रंगांचे स्पष्टपणें दिसतात. यावरून दोन भिन्न आणि विसदृश वस्तूंच्या समागमास, किंवा संयोगास, "गंगाजमनी" हें विशेषण लावितात.

९८७. **गंगाजळी**—

(क) भागीरथी वगैरे नद्यांचें तीर्थ, किंवा कोणतेंही पवित्र उदक, ठेवण्याचें जें पात्र तें.

(ख) शिलकीचा, किंवा कधींही खर्च करावा न लागणारा पैसा, ठेवावयासाठीं केलेलें जें भांडें तें.

९८८. **गची बांधा**--गर्वाची पीडा. "गर्व" ह्या शब्दाचें पहिलें अक्षर "ग" हें आहे. यावरून "ग" म्हणजे गर्व असा अर्थ घेण्यांत येतो.

९८९. **गजान्त लक्ष्मी**—अतिशय श्रीमंती. पूर्वी विलासाच्या, व थाटमाटाच्या सर्व वस्तु घेतल्यानंतर आणखीही पैसा ज्याच्या जवळ शिलक असे, तोच हत्ती विकत घेत असे. "गजान्त लक्ष्मी" म्ह० हत्ती विकत घेण्याइतकी श्रीमंती. अतोनात संपत्ति. [ सं० "गज" म्हणजे हत्ती आहे "अंतीं" म्हणजे शेवटीं जीच्या, अशी लक्ष्मी, म्हणजे संपत्ति. बहुव्रीहि समास. ]

९९०. **गटारयंत्र**--पुणें शहरांत भांग्या मारुती आणि सोमेश्वर, ह्या दोन देवळांच्या पुढील गटारावर भट, आचारी, पाणके, वगैरे लोक संध्याकाळीं दुसरे दिवसाच्या आमंत्रणाची वाट पाहात बसतात. तेथें त्या मंडळींत इकडच्या तिकडच्या अनेक विषयांवर गप्पा निघतात, व सर्व गांवच्या वातम्या आणि खबरा यांच्यावर काथ्याकूट चालते. येथील वातम्या आणि खबरा पुष्कळ वेळां निराधार व खोट्या ठरतात. यावरून निराधार वातमीस "गटारबातमी," व ती उत्पन्न करणाऱ्या माणसास "गटारयंत्र," असें म्हणण्याचा प्रघात अलीकडे पडला आहे.

९९१. **गडबडगुंडा**—अव्यवस्थितपणें आणि घाईघाईनें काम करणें, किं० केलेलें काम.

९९२. **गंडांतर**--अपमृत्यु. कोणतेंही मोठें संकट.

९९३. **गद्धेमलहार**—"मल्हार" हा गायनांतील एक राग आहे. गाढवाचें ओरडणें भारी कर्कश असतें. यावरून "गद्धेमलहार" म्हणजे कर्कश गायन किंवा भाषण, असा विनोदानें, किं० उपहासानें, अर्थ घेण्यांत येतो.

९९४. **गनीमी कावा**—"गनीमी" म्ह० लुच्चेगिरीचा. "कावा" म्ह० युक्ति.

९९५. **गम्य**—थोडेंसें ज्ञान, किं० माहिती. उ० भुजंगरावाला हस्तसामुद्रिकांत कांहीं गम्य आहे काय? (म्ह० त्याला तें कांहीं तरी समजतें काय?) उ० मला चित्रकलेंत गम्य नाहीं. तुझ्या चित्रांतील गुणदोष मला कसे सांगतां येतील?

९९६. **गर्गाचार्यांचा मुहूर्त**—मागील पांच घटिका रात्र शेष उरली म्हणजे उषःकाल होतो. तो गर्गमुनीच्या मतें शुभ, आणि बृहस्पतीच्या मतें, उत्तम शकुन. ह्या उषःकालाला " गर्गाचार्यांचा मुहूर्त " म्हणतात. [ पुढें ज्योतिषप्रकरण पहा. ]

९९७. **गर्भश्रीमंत**—गर्भावस्थेपासून जो श्रीमंत तो. ज्याच्या जन्मापासून घरांत पैसा मुबलक आहे असा माणूस.

९९८. **गळग्रह**--डोईजड माणूस. उ० रंगोपंत मला एक गळग्रहच होऊन बसला आहे!

९९९. **गाजरपारखी**--ज्याला गाजराचीही पारख करण्याची अक्कल नाहीं, असा माणूस. उ० ही १०० रुपये किमतीची मोत्यांची जोडी आहे, आणि तुम्हीं तिची किंमत १८।२० रुपये करतां! बरे गाजरपारखीच दिसतां!

१०००. **गाढवाचा खरारा**--मूर्ख, विनअकली, माणूस.

१००१. **गाय**--

( क ) अनाथ, हीन दीन माणूस. उ० तो गाय होऊन माझी क्षमा मागूं लागला.

( ख ) कन्या, ( जिच्या सुखदुःखाची जबाबदारी सर्वथैव आपणावर असते, आणि तिला आपण जेथें स्थळ पाहून देऊं तेथें जाऊन नांदावें लागतें.) उ० अहो हेमचंद्रपंत, तुम्ही दीड हजार रुपयांला भुलून त्या रक्तपित्या पोराशीं गाय गोवूं नका!

१००२. **गांवगुंड**—गांवांतील मंडळींत प्रमुख. गांवकऱ्यांच्या तर्फेनें बोलणारा. गांवढळच, पण त्यांतल्या त्यांत हुशार. उ० सोकरजी-सारख्या गांवगुंडाला कोणतीही गोष्ट अशक्य नाहीं!

१००३. **गाळीव मूर्ति**—सर्व दुर्गुण एकत्र करून बनविलेली मूर्ति. उ० बस्ते-सिंह म्हणजे एक गाळीव मूर्तीच आहे!

१००४. **गुरुकिल्ली**—मर्म. रहस्य. खुबी. [ प्रत्यक्ष गुरूच्याच ताब्यांत असलेली, किं० फक्त गुरूलाच चालवितां येते अशी, किल्ली ].

१००५. **गुरुमंत्र**—मंत्र शिकविण्याचा अधिकार गुरुकडेच असतो, आणि मंत्र सांगावयाचा तो गुप्त रीतीनें व एकांतांतच सांगितला पाहिजे असा परिपाठ आहे, यावरून "गुरुमंत्र," म्ह० यशस्वी होण्याचा गुप्त रीतीनें उपदेशिलेला मार्ग.

१००६. **गुलगुल गोष्टी**—हलक्या हलक्या स्वरांत बोलणें, म्ह० प्रेमाच्य आणि रहस्याच्या गोष्टी. उ० कसल्यारे तुमच्या गुलगुल गोष्टी मघापासून चालल्या आहेत ? अभ्यासविभ्यास कांहीं नाहीं वाटतें तुम्हांला करावयाचा ?

१००७. **गुलावाचें फूल**--नाजूक पुरुष, किं० स्त्री. गुलजार, गोजीरवाणें, मूल.

१००८. **गुलाबी थंडी**---सुखकर होईल, इतक्याच परिणामाची थंडी. अति तीव्र, किं० कडक, नव्हे अशी थंडी. उ० श्रीमंतांना गुलाबी थंडी भोगावयाला सांपडते. कुणबी माणसांना सूर्योदयाच्या अगोदर शेतावर जावें लागतें!

१००९. **गुळाचा गणपति**--मोठ्या पदीं असलेला, पण दुसऱ्यानें सांगावें तसें करणारा, माणूस. स्वताला बुद्धि नसल्याकारणानें ज्याला दुसऱ्याच्या तंत्रानें चालावें लागतें आणि म्हणून ज्याला उच्चपद भरून काढण्यापलीकडे कांहींच करतां येत नाहीं, असा माणूस. बुळगट माणूस.

१०१०. **गृहच्छिद्रें**--"गृह" म्ह० घर. छिद्र म्ह० मर्म, वर्म, उणेपणा, किं० निंदाविषय. "गृहछिद्र" म्ह० घरांतील दोष, उणीवा, किं० वर्में कर्मे. उ० सखाराम बोवाचीं सारीं गृहछिद्रें मला ठाऊक आहेत, माझ्यापुढें तोंड वर करून बोलावयाची त्याची छाती नाहीं !

११११. **गोगलगाय**--अगदीं निरुपद्रवी माणूस. अत्यंत गरीब मनुष्य.

१०१२. **गोडीगुलाबी**--सलोखा. मित्रता. प्रेमभाव.

१०१३. **गोमाजी कापशे**—कोणीतरी मनुष्य, ( ज्याचें नांव सांगण्याची जरूरी नाहीं. ) एक मनुष्य ( मग तो कोणी कां असेना ! ). नसता मोठेपणा आपणाकडे घेणारा मनुष्य.

१०१४. **गोमाजी तिमाजी**--कोणी तरी माणूस. ज्याचें कांहीं महत्त्व नाहीं असा मनुष्य-

१०१५. **गोरज मुहुर्त**--रानांत चरावयाला गेलेल्या ज्या गायी, व म्हशी, त्यांच्या पायांनीं धूळ उडते तो समय. संध्याकाळची वेळ.

१०१६. **गोळकाचें सोंवळें**--खोटें सोवळें. दिखाऊ आणि बाह्यात्कारी सोंवळें. उ० गोळकाचें सोवळें सारा वेळ विळविळे.

१०१७. **गौडबंगाल**—मंत्रतंत्र, किमया, जादू वगैरे. [ पूर्वी गौड आणि बंगाल, हे देश वरील विद्यांत प्रवीण होते. ]

१०१९. **ग्रंथ.**

(क) एका अनुष्टुभ् श्लोकाला एक ग्रंथ अशी संज्ञा आहे. ह्या श्लोकांत ३२ अक्षरें असतात. यावरून ३२ अक्षरांच्या समुदायास १ ग्रंथ म्हणतात. "भारत हा लक्ष ग्रंथ आहे," ह्या वाक्याचा अर्थ भारतांत एक लक्ष अनुष्टुभ् श्लोक आहेत.

(ख) विस्तार. अद्वातद्वा बोलणें, किं० लिहिणें. कुभांड. शिवीगाळ करणें उ० माझ्या मुलानें गोदूबाईच्या लेकीला नुसतें कुठें मूर्ख पोरगी म्हटलें, त्यावरून गोदूबाईनें जो कांहीं ग्रंथ केला तो पुसूंच नये !

१०१८. **ग्रामकेसरी**, किं० **ग्रामसिंह**--

(क) " ग्राम " म्ह० गांव. " केसरी " म्ह० सिंह. अरण्यांत सिंह जसा पराक्रमी, तसा गांवांत कुत्रा पराक्रमी. यावरून कुत्र्याला वरील शब्द विनोदानें, किं० तिरस्कारानें, लावतात. ]

(ख) लक्षणेनें हा शब्द बाहेरून धैर्य दाखविणाऱ्या आणि अंतर्यामीं भितऱ्या माणसास लावितात.

१०१९. **घटकेचें घड्याळ**--एकच घटकाभर चालत राहणारें घड्याळ, म्ह० मनुष्याचें क्षणभंगुर जीवित.

१०२०. **घटपटादि खटपट**--न्यायशास्त्राच्या विषयावर वादविवाद. नैयायिक विषयांसंबंधाची उरस्फोड. [ न्यायशास्त्रांत उदाहरणें घेतांना " घट " ( घागर ), आणि " पट " ( वस्त्र ), ह्या दोन पदार्थांचीं

उदाहरणें घेण्याची नैयायिकांची चाल आहे. ] उ०

नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती!

१०२१. **घटोत्कचाचा बाजार**—सोंदेगिरी. [ "घटोत्कच" हा भीमाला हिडिंबेपासून झालेला पुत्र. हा पांडवांचा हितैषी होता.यानें एके प्रसंगीं मायेचा बाजार निर्माण करून कौरवांना फसविलें. ]

१०२२. **घड्याळ टिपरूं**—खायाला भाकर आणि तोंडीं लावायाला मिरची, असें अगदीं साधें, गरीबाऊ, जेवण. [ भाकरी वाटोळी आणि पातळ असल्याकारणानें तिला वाजवावयाच्या तासाची, आणि मिरची लांब असल्याकारणानें तिला तासावर वडविण्याच्या टिपराची उपमा विनोदानें दिली आहे. ]

१०२३. **घमंडानंदन**—नेहेमीं वढाई मारणारा. आपल्या गुणांची, किं० कर्तृत्वाची, ज्याला फाजील थोरवी वाटते, व ती थोरवी ज्याच्या त्याच्या जवळ जो बोलून दाखवितो, तो.

१०२४. **घरकोंबडा**—जो सदा घरांतच, किं० आपल्या गांवांतच, राहतो तो. चार चौघांकडे ज्याचें जाणें येणें नाहीं असा.

१०२५. **घागरगडचा सुभा**—पाणी आणण्याचें काम. घागरगड=घागर नांवाचा गड, म्ह० किल्ला. तेथील सुभा म्ह० सुभेदाराचें काम."घागरगडचा सुभा" ह्या शब्दसंहतींत विनोद आहे. उ० मी कसची बाई आतां तुमच्या येथें वसावयास येणार? मला घागरगडचा सुभा घ्यावयाचा आहे ना?

१०२६. **घृतकुल्या मधुकुल्या**—चारी ठाव, चमचमीत, भोजन. घृत = तूप. कुल्या = पाट. मधु = मध. घृतकुल्या = तुपाचे पाट. मधुकुल्या =मधाचे पाट. उ० ह्या दिवसांत भिक्षुकमंडळींची चैन आहे! रोज घृतकुल्या आणि मधुकुल्या!

१०२७. **घेलाशेट**—अर्धवट माणूस. जरासा बावळट माणूस.

१०२८. **घोडनवरा**—मोठ्या वयाचा वर.

१०२९. **घोडनवरी**—मोठ्या वयाची कुमारिका.

१०३०. **घोड्याएवढी चूक**—फार मोठी आणि अक्षम्य अशी चूक.

१०३१. **घोड्याच्या पाठीवरचा कोस**—लांबलचक, कंटाळवाणा कोस.

१०३२. **चकारशब्द**—एक अक्षरसुद्धां. उ० तुमच्यापुढें तो चकारशब्द बोलावयाचा नाहीं !

१०३३. **चटकचांदणी**—सुंदर आणि नखरेबाज स्त्री.

१०३४. **चंडाळचौकडी**—दुष्ट माणसांचा समुदाय.

१०३५. **चढती**, किं० **उतरती**, **कमान**—उत्कर्षाची, किं० अपकर्षाची, स्थिति. वाढतें, किं० उतरतें, मान.

१०३६. **चतुर सावाजी**—मूर्ख माणूस.

१०३७. **चंदुलाल**—चैनी, उधळ्या, माणूस.

१०३८. **चर्पटपंजरी**—वायफळ भाषण, किं० लेखन. लांबलचक, कंटाळवाणें, वर्णन.

१०३९. **चर्वितचर्वण**—एकदा चावलेलें पुनः चावणें. ज्याची एकदा रुचि घेतली आहे, तेंच पुनः खाणें. तृप्ति न पावतां पुनः तेंच तें खाणें, भोगणें, इ०. ज्याची वाटाघाट अगोदर झाली आहे, त्याची पुनः पुनः वाटाघाट करणें. उ०

तुच्छें चर्वितचर्वणोपम सुखें जीं तींच तीं भोगितां
संसारीं न तिरस्कृती उपजते हे कोण निर्लज्जता ! ॥

वामन—स्फुट श्लोक.

१०४०. **चवदा चौकड्यांचें राज्य**—कृत, त्रेता, द्वापार, आणि कलि, हीं चार युगें मिळून जो काल, त्याला " चौकडी " असें म्हणतात. अशा चवदा चौकड्या मिळून जो काळ, त्या काळभर टिकणारें जें राज्य, तें चवदा चौकड्यांचें राज्य. असलें राज्य रावणानें केलें.

१०४१. **चवदावें रत्न**—मार. समुद्रमंथनीं जीं रत्नें समुद्रांतून निघालीं, त्यांत शेवटचें रत्न चाबूक अशा समजावर " चवदावें रत्न " ह्याचा चाबूक असा अर्थ झाला. उ० तुला चवदावें रत्न दाखविल्याशिवाय तूं ताळ्यावर येणार नाहींस !

**१०४२. चाणाक्ष**—धूर्त. हुषार. " चाणक्य " नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याणें धूर्तपणाचीं कारस्थानें करून नंदघराण्याचा उच्छेद केला, आणि चंद्रगुप्ताला गादीवर बसविलें. ह्यावरून " चाणाक्ष," किं० " चाणक्ष, " हा शब्द धूर्त माणसास लावतात. " चाणाक्ष " आणि " चाणक्ष " हीं "चाणक्य" ह्या मूळ शब्दाचीं अपभ्रष्ट रूपें होत. [ विशेष खुलासा आमचें "मराठी शब्दांचें उद्घाटन," पान ९० मध्यें पहा. ]

**१०४३. चापटपोळी**—चापटी.

**१०४४. चार अक्षरें**--थोडीशी विद्या.

**१४०५. चार लोक**—समाज. समाजांतील माणसें.

**१०४६. चार खुंट जाहगीर**—भिक्षेकऱ्याची स्थिति. अत्यंत दरिद्री स्थिति. [ "चार खुंट" म्ह० पृथ्वीचे चार कोपरे. तेथपर्यंत पसरलेली जहागीर, म्हणजे फार मोठी जहागीर. भिक्षेकऱ्याची झोळी चौकोनी फडक्याची असते. आंतील पदार्थ काढून घेण्यासाठीं हें फडकें जमीनीवर पसरलें, म्हणजे त्याचे चार कोपरे पूर्व, पश्चिम, दक्षिण, आणि उत्तर, ह्या चार दिशांकडे असतात. हा जो फडक्याचा विस्तार, तोच जहागिरीचा प्रदेश. ]

**१०४७. चारी ठाव जेवणें**—ताटाच्या चारी बाजूंस, (म्ह० सर्व बाजूंस), खाद्य पदार्थ वाढलेले असून जें जेवण, तें चारी ठाव जेवण. [ मागें ले० २२६ पहा. ]

**१०४८. चार्वाक**—"चार्वाक" हा नास्तिक मताचा प्रवर्तक होता. यावरून कोणाही नास्तिक मनुष्याला " चार्वाक " हा शब्द लावतात.

**१०४९. चालता काळ**—सद्दीचा, किं० वैभवाचा, काळ. उ०

वा तुझा चालता काळ, । खायाला मिळती सकळ ॥ अमृतराय.

[ " चालता काळ " ह्याच्या उलट " पडता काळ " म्ह० अपकर्षाचे दिवस. ]

**१०५०. चाळिशी**—चष्मा. उपनेत्र. ह्या वस्तूची जरूरी मनुष्याला बहुधा वयाच्या चाळीसाव्या वर्षी पडते, यावरून चष्मेला " चाळिशी, " असा प्रतिशब्द निघाला.

१०५१. **चिटपांखरूं**—कोणीही मनुष्य. उ० मी त्या वाड्यांत शिरलों, तेव्हां मला तेथें चिटपाखरूं आढळलें नाहीं! उ० मी त्या भुताटकीच्या घरांत निजत असे, तेव्हां माझ्या सोबतीला चिटपाखरूं तरी होतें काय? [ ह्या शब्दाचा उपयोग नेहेमीं नकारार्थीनें होतो. ]

१०५२. **चित्रगुप्त**—सर्व प्राण्यांच्या चांगल्या वाईट कृत्यांची नोंद ठेवणारा यमाचा जो कारकून, त्याचें नांव "चित्रगुप्त." जो लोकांचीं गुप्त व निंद्य कृत्यें दुष्ट हेतूनें पाहात असतो, त्याला "चित्रगुप्त" ही संज्ञा लावितात.

१०५३. **चिन्ह**—विचित्र असा दिसणारा. सोंग.

१०५४. **चिरंजीव**—वडिलानें लहानास उद्देशून लिहितांना, किंवा लहानाविषयीं लिहितांना, त्याच्या नांवामागें योजावयाचा हा शब्द आहे. [ चिर=पुष्कळ दिवस. जीव=जिवंत राहा. जग. ]

१०५५. **चिरीमिरी**—बक्षिशी. बक्षीस म्हणून दिलेला पैसा. घेणाराचा हक्क नसतां त्याला आपण होऊन दिलेले जे पैसे ते.

१०५६. **चुकारतट्टू**—आपणाला सांगितलेल्या, किं० नेमून दिलेल्या, कामाची जो अळंटळं करतो तो.

१०५७. **चुटक्यांचे मांडव**—एका दुखणाईत बाईनें असा नवस केला होता, कीं ह्या दुखण्यांतून मी बरी झालें, तर देवाच्या देवळापुढें मांडव घालीन. ती दुखण्यांतून उठली, तेव्हां तिला मांडव घालणें प्राप्त झालें, परंतु मांडव घालावयाला तिच्याजवळ पैसे नव्हते; तेव्हां तिणें असें केलें. देवळापुढें ज्या ज्या ठिकाणीं मांडवाचे खांब पुरावयाचे, त्या त्या ठिकाणीं जाऊन तिणें एक एक चिटकी, म्ह० टिचकी, वाजविली, आणि एका टिचकीच्या आवाजाबरोबर "हा एक खांब झाला!" असें ती म्हणाली. अशा रीतीनें खांब पुरणें झाल्यावर ती म्हणाली, "झाला मांडव! मीं नवस फेडिला!" यावरून "चुटक्यांचे मांडव" म्हणजे लुटपुटीचा पराक्रम, बढाई, वल्गना, रिकामी तोंडपाटिलकी, असा अर्थ झाला. [ अनुरूप क्रियापद "घालणें." ]

१०५८. **चोहोंचा आंकडा**—प्रशस्तपणें घातलेली मांडी. [आमचें "मराठी शब्दांचें उद्घाटन," पान ३१ पहा.]

१०५९. **चौकोनी चिरा**—ह्या त्या कामाला उपयोगी पडणारा माणूस. ह्या त्या मंडळींत साजणारा, किं० खपणारा माणूस. याच अर्थानें "अष्टपैलू माणूस," ह्याचाही उपयोग होतो.

१०६०. **चौपदरी**—भिक्षेची झोळी. उ० आज तूं विद्या न करतां पत्ते खेळून काळ घालवीत आहेस! उद्या चौपदरी हातीं धरणार आहेस कीं काय?

१०६१. **चौऱ्यांशीचा फेरा**—जीवाला चौऱ्याऐंशी लक्ष वेगळ्या वेगळ्या प्राण्यांचा देह धारण केल्यानंतर मोक्ष मिळतो, अशी हिंदूंची समजूत आहे. ह्या सर्व देहांत जें जीवाचें संक्रमण, त्याला "चौऱ्यांशीचा फेरा" म्हणतात. तो शब्द लक्षणेनें "अत्यंत गुंतागुंतीची स्थिति," किं० "घोटाळ्याचा प्रसंग," ह्या अर्थानें योजला जातो. वरील शब्द-संहतींत "फेरा" ह्याचे बद्दल "गरका" हाही शब्द घालतात.

१०६२. **छत्तीसाचा आंकडा**—विरोधभाव. प्रेमाभाव. वेबनाव. छत्तिसाचा आंकडा ३६ असा काढतात व त्याची आकृति परस्परांकडे पाठ करून बसलेल्या माणसांप्रमाणें दिसते. एकाचें तोंड पूर्वेकडेस तर दुसऱ्याचें पश्चिमेकडेस, अशी स्थिति असल्यास म्हणतात, "त्या दोघांत छत्तीशीचा आंकडा आहे." याच्या उलट "त्रेसष्टी" म्ह० "पूर्ण सलोखा." [आमचे "मराठी शब्दांचें उद्घाटन" पान ३१ पहा.]

१०६३. **जगत् शेट**—अति श्रीमंत माणूस. विरोधी लक्षणेनें भिकारी, किं० दरिद्री माणूस. या दुसऱ्या अर्थानें "जगत् शेटीचा नातू," अशीही शब्दसंहति योजण्यांत येते.

१०६४. **जड पारडें**—श्रीमंत, व वजनदार, माणूस. [ह्या शब्दांत तराजूचें रूपक आहे. ज्या पारड्यांत कांहीं जिन्नस असतो, तें दुसऱ्या किंवा रिकाम्या पारड्याहून जड असतें, आणि हेलकावे खात नाहीं.]

१०६५. **जडभरत**—सुस्त, व आळशी, माणूस.

१०६६. **जड बुडाचें मनुष्य**--श्रीमंत आणि वजनदार माणूस.

१०६७. **जडीबुट्टी**—औषधी काष्ठें, मुळें, पाळें, वगैरे. यावरून गुणावह वस्तु, अजब रीतीनें कार्य घडवून आणणारी अशी वस्तु, असा याचा अर्थ झाला.

१०६८. **जन्माची गांठ**—जन्मांत न सुटणारी गांठ, म्ह० विवाहसंबंध. हिंदू लोकांत विवाहसंबंध एकदा जडला, कीं तो कायमचा टिकणारा असतो.

१०६९. **जन्माची भाकर**--जन्मभर पुरणारी शेतकी, किं० नोकरी, किं० सावकारी, वगैरे चरितार्थाचें साधन. उ० महाराज, मजवर दया करा आणि माझी जन्माची भाकर तोडूं नका! [ याच अर्थानें " जन्माची वेगमी, " हा शब्द योजला जातो. ]

१०७०. **जांबुवंत**—श्रीरामाच्या बरोबर जे कपि योद्धे लंकेवर चालून गेले, त्यांपैकीं एक. हल्लीं " जांबुवंत " हा शब्द वृद्ध माणसास, किं० फार फार दिवस हजामत न करविणाऱ्या माणसास, लावतात.

१०७१. **जमदग्नि**--अतिशय तापट आणि रागीट माणूस. [ "जमदग्नि" हा अति रागीट ऋषि होता. यानें स्त्रीवर कोपून पुत्राकडून तिचा शिरच्छेद करविला. ]

१०७२. **जमीनअस्मानाचें अंतर**--फार मोठें अंतर. मोठी तफावत. [ फारशी भाषेंत जमीन=पृथ्वी. अस्मान्=आस्मान्=आभाळ. ]

१०७३. **जरीपटका**--पेशव्यांचें निशाण.

१०७४. **जाडें प्रकरण**--वजनदार माणूस. असामान्य प्रतीचा विद्वान्, किं० श्रीमंत, माणूस.

१०७५. **जांवईशोध**--भलतीच सुधारणा. जो बदल केल्यानें वस्तु मूळाहून वाईट होते, असा बदल.

१०७६. **जीवाजीपंत**—जीव. प्राण.

१०७७. **जुलमाचा रामराम**--निरुपायामुळें, किं० नाखुषीनें, पत्करलेली गोष्ट. [ श्रीमंत मनुष्य, किं० अधिकारी, पाजी असला तरी

त्याला नमस्कार, किं० रामराम, करावा लागतो. न केल्यास तो मनांत अढी धरून नुकसान करतो. अशा माणसास केलेला जो नमस्कार, किं० रामराम; तो "जुलमाचा रामराम."

०७८. **झांकलेलें माणिक**—जो बाहेरून मूर्ख, किं० बिनअकली, असा वाटतो, परंतु खरोखरीं जो विद्वान्, शाहाणा, किं० सुशिक्षित आहे, तो.

०७९. **झोटिंगबादशाही**—अव्यवस्था. अव्यवस्थितपणाचा कारभार. [ "झोटिंग" म्ह० पिशाचरूपानें भटकत असलेला मृत मनुष्याचा, (विशेषतः मुसलमानाचा ), आत्मा. यावरून शब्दशः "झोटिंग पादशाही," म्ह० भुतांचा, किं० पिशाचांचा, गोंधळ. लक्षणेनें, कोणताही गोंधळ, किं० अव्यवस्था. ]

०८०. **टुकटुक माकड**--आपणास कांहीं पदार्थ खावयाला मिळालेला असून दुसऱ्यास जर तो मिळालेला नसेल, तर त्याला खिजावण्यासाठीं मुलें वांकडें बोट हालवून हा शब्द उच्चारतात.

०८१. **टोळ भैरव**--निरुद्योगी माणूस. स्वतः रिकामटेकडा आणि दुसऱ्यांस उपद्रवकारक असा माणूस.

०८२. **ठणठणपाळ**--ज्याला विद्या नाहीं, आणि द्रव्यही नाहीं, असा मनुष्य.

०८३. **ढ**--मूर्ख. अडाणी. अक्षरशत्रु.

०८४. **ढंग**—चाळे. वेडीं वेडीं कामें. नाद. छंद.

०८५. **ढ्ढाचार्य**--ज्याला अगदीं विद्या नाहीं, त्याच्याविषयीं विनोदानें योजावयाचा हा शब्द आहे.

०८६. **ढालगजभवानी**—स्त्रियांची नैसर्गिक शालीनता सोडून देऊन वागणारी स्त्री. अचरट, किंवा मूर्ख गोष्टी करणारी, स्त्री.

०८७. **तरतें कूळ**—ज्याला पैसा उसना दिला असतां बुडावयाची भीति नाहीं, असा मनुष्य. ज्याला दिलेला पैसा वसूल होऊं शकेल, असा मनुष्य.

०८८. **तहानलाडू भूकलाडू**—फराळाचे पदार्थ. कांहीं वेळपर्यंत भूक शमविणारीं खाद्यें.

१०८९. **चालत्या, किं० ताज्या, घोड्यावरच्या गोमाशा**—घोडा जिवंत आहे, तोंपर्यंतच त्याच्या अंगावर गोमाशा बसतात. घोडा मेल्यावर त्या बसत नाहींत. यावरून लक्षणेनें ह्या शब्दसंहतीचा असा अर्थ कीं मनुष्याजवळ पैसा, अधिकार, वगैरे असतात, तोंपर्यंतच त्याच्या आश्रयाला असणारे लोक. कार्यसाधु लाळघोटे.

१०९०. **ताटाखालचें मांजर**—पूर्णपणें आज्ञांकित माणूस. उ० लक्ष्मणराव हा गोविंदरावाच्या ताटाखालचें मांजर आहे !

१०९१. **तापत्रय**—आधिभौतिक, आधिदैविक, आणि आध्यात्मिक, अशीं जीं तीन प्रकारचीं दुःखें, त्यांचा समूह. ताप=दुःख. त्रय=तिहींचा समुदाय. " तापत्रय, " हा शब्द सर्व प्रकारचीं दुःखें, या अर्थानें योजण्यांत येतो. उ० आमचें कुटुंब निवर्तल्यापासून आमचें तापत्रय चाललें आहे !

१०९२. **तारांवळ**—त्रेधा. धांदल. [ पुढें ज्योतिषप्रकरण शब्द पहा. ]

१०९३. **तिरशिंगराव**—तिरसट, चिरडखोर, माणूस.

१०९४. **तिसमारखान**—अंगीं शौर्य नसतां शौर्याची ऐट मिरविणारा.

१०९५. **तिसरा पाय**—अति उत्सुकता.

१०९६. **तीर्थ**—प्रत्यक्ष तीर्थच. तीर्थाप्रमाणें पवित्र आणि वंद्य. आई आणि बाप यांच्या नांवांमागें मुलानें पत्रांत योजावयाचा हा शब्द आहे. "तीर्थरूप" हा शब्द पिता, किं० बाप, ह्या अर्थानेंही स्वतंत्रपणें योजतात. उ० आमचे तीर्थरूप वारल्याला दहा वर्षें झालीं.

१०९७. **तुळशींत भांग**—चांगल्या, बालबोध, कुटुंबांत असलेला मूर्ख मुलगा. याच्या उलट "भांगेंत तुळस," म्ह० ज्या कुटुंबांतील सारीं माणसें बदमाष, त्यांत असलेला सुगुणी मुलगा.

१०९८. **तेलंगभट**—लोचटपणानें एकादा खाद्य, किं० उपभोग्य, पदार्थ मागत सुटणारा. [ तेलंगी ब्राह्मण आगांतुकी करण्यांत पटाईत असतात. ]

१०९९. **तोंडपाटीलकी**—हातांनीं, म्ह० स्वतः, कांहीं एक काम न करतां लोकांना हुकूम सोडणें.

११००. **तोळा मासा प्रकृति**—अति नाजुक प्रकृति. उ० हल्लीं माझी तोळा मासा प्रकृति झाली आहे.

११०१. **त्राटिका**—" ताडका " नांवाची एक दुष्ट राक्षसी होती. तिला श्रीरामचंद्रानें ठार मारिलें. " त्राटिका " हा "ताडका" शब्दाचा अपभ्रंश. "त्राटिका" म्हणजे कजाग, त्रासदायक, स्त्री.

११०२. **त्रिकूट**—तीन वस्तूंचा, किं० माणसांचा, समुदाय

११०३. **त्रिशंकु**—धड इकडे ना तिकडे. कोणत्याही पक्षांस न मिळालेला. "त्रिशंकु" या नांवाचा एक सूर्यवंशी राजा होता. त्यानें यज्ञ केला तेव्हां तो सदेह स्वर्गलोकीं गेला, परंतु देवांनीं त्याला प्रतिबंध केला आणि त्यास खालीं ढकलून दिलें. परंतु त्याला विश्वामित्र आपल्या तपाच्या सामर्थ्यानें पृथ्वीवर पडूं देईना. यामुळें तो मधल्या मधेंच लोंबत राहिला. यावरून "त्रिशंकु" ह्याचा वरील प्रमाणें अर्थ रूढ झाला.

११०४. **त्रिस्थळी यात्रा**—काशी, प्रयाग, आणि गया, या तीन स्थळीं जाऊन जी यात्रा, ती "त्रिस्थळी यात्रा." यावरून एका माणसाला एकाच कामासाठीं अनेक ठिकाणीं जाण्याचा प्रसंग येतो, त्याला "त्रिस्थळी यात्रा " किं० "तिस्थळी" असें म्हणतात. "त्रिस्थळी" याचा अपभ्रंश "तिरस्थळी" हाही याच अर्थानें योजिला जातो.

११०५. **थंडा फराळ**—नुसतें गार पाणी पिऊन राहणें.

११०६. **दगड**—अज्ञ, अडाणी, मूर्खमाणूस.

११०७. **दगडावरची रेघ**—न फिरणारे, खोटे न ठरणारे, शब्द. जें खोटें व्हावयाचें नाहीं, असें भाकीत [दगडावर कोरलेलीं अक्षरें पुसलीं जात नाहींत, त्याप्रमाणें जे शब्द खोटे म्हणून पुसून टाकण्याचा प्रसंग येणें संभवनीय नाहीं, असे शब्द.]

११०८. **दत्त**—दैवगति. उ० ज्या दत्ताला मी भीत होतों, तेंच माझ्या पुढें उभें राहिलें ! उ० जो जोडीदार इसम मला नको होता, तोच दत्त म्हणून माझ्या पुढें उभा राहिला ! उ० मीं रामभाऊंची आठवण काढिली, तोंच दत्त म्हणून दारांत रामभाऊ उभे !

११०९. **दशग्रंथी ब्राह्मण**---संहिता, ब्राह्मण, आरण्यक, शिक्षा, कल्प, व्याकरण, निघंटु, निरुक्त, छंद, जोतिष, या दहा ग्रंथांचें ज्यानें अभ्यसन केलें आहे, असा ब्राह्मण.

१११०. **दळूबाई**—ज्याच्या अंगीं कांहीं कर्तृत्व नाहीं, जो जात्यावर बसून दळण्याच्याच कामाला योग्य, असा माणूस. दळतांना म्हणावयाचें एक गाणें आहे, त्याचा आरंभ " दळूबाई " ह्या शब्दांनीं झालेला आहे.

११११. **दिवाभीत**—दिवा=दिवसास. भीत=भिणारा. घुबड दिवसाच्या प्रकाशांत येत नाहीं, म्हणून त्याला " दिवाभीत" असें नांव आहे. जो मनुष्य मंडळींत जावयास लाजतो, किं० भितो, त्याला "दिवाभीत" असें म्हणतात.

१११२. **दिल्लीचा सोदा**—अत्यंत पटाईत भामट्या. पूर्वीं मुसलमानी राज्यांत दिल्लीचे भामटे फसवेगिरीचें काम मोठ्या कुशलतेनें करीत असत.

१११३. **दुढ्ढाचार्य**—कानडी भाषेंत "दोड्ड" म्ह० मोठा, आणि "आचार्य" म्ह० गुरु, असे शब्द आहेत. सामान्य आचार्यांच्या वरच्या पायरीचा जो आचार्य, त्याला " दोड्डाचार्य" अशी संज्ञा आहे. नसता मोठेपणा आपणाकडे ओढून घेऊन प्रौढी मिरविणारा माणूस, असा मराठींत " दुढ्ढाचार्य" ह्याचा अर्थ झाला आहे.

१११४. **देवजी धसाडा**—माकडाच्या खेळांत नर माकडाला " देवजी धसाडा" ही पदवी दिलेली आहे. यावरून कोणाही कुरूप व दांडग्या माणसास हा शब्द लावतात.

१११५. **देवमाणूस**---देवतुल्य माणूस; म्हणजे ज्याच्या अंगीं लबाडी नाहीं, असा माणूस. सरळ व साधा माणूस.

१११६. **देवापुढचा देव**---शंखशिरोमणि.

१११७. **दौलतीचा खांब**---ज्याच्या भाग्यानें कुटुंबांतील माणसांस, किं० आश्रितांस, सुखविलास भोगावयास सांपडतात, असा पुरुष. कुटुंबांतील मुख्य मिळविता माणूस.

१११८. **द्राविडी प्राणायाम**--प्राणायाम करते वेळीं उजव्या हातानें नाक न धरतां द्रविड लोक डोक्यामागून हात नेऊन त्याचीं बोटें वळवून प्राणायाम करतात; याला"द्राविडी प्राणायाम"असें म्हणतात. व्यवहारामध्यें"द्राविडी प्राणायाम"म्हणजे एखाद्या साध्या गोष्टीसाठीं विनाकारण केलेला, किंवा करावा लागणारा, खटाटोप, असा अर्थ होतो.

१११९. **धन्वंतरी**--हा देवांचा वैद्य होता. व्यवहारामध्यें रोग हटकून बरा करणाऱ्या वैद्यास हा शब्द लावितात.

११२०. **धरमधक्का**--विनाकारण भोगावे लागणारे कष्ट.

११२१. **धांगडधिंगा**—दांडगाई.

११२२. **धारवाडी कांटा**—बरोबर किंवा तंतोतंत वजन करणारा कांटा.

११२३. **धारातीर्थ**--धारा=तरवारीची धार. तीर्थ=पवित्र स्थान. धारा–तीर्थ=तरवारीची धार हेंच कोणी तीर्थ; यावरून समरभूमि हा त्याचा अर्थ झाला. उ० आमचे वडील आणि चुलते धारातीर्थी मरण पावले.

११२४. **धूळभेट**—पहिली भेट. उभ्या उभ्या झालेली भेट.

११२५. **धेंड**--मोठा प्रतिष्ठित माणूस. जाडा विद्वान्.

११२६. **धोपट मार्ग**--सरळ मार्ग. ज्या मार्गानें गेलें असतां मनुष्य चुकण्याचा संभव नाहीं, असा मार्ग, म्ह० वाट. उ०

विकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडुं नको.

अनंतफंदी.

११२७. **नगद माल**--उत्कृष्ट माल. सोन्यारुप्याचीं नाणीं, किंवा अलंकार. उ० चोरट्यांनीं आमचा सारा नगद माल लांबविला.

११२८. **नंदी बैल**--मूर्ख, अविद्वान्, बेअकली, माणूस.

११२९. **नरहरदेवाची पालखी**--जें काम करावयाला सर्व लोकांची मदत अवश्य आहे, व ज्याची जबाबदारी कोणा एका विशिष्ट माणसावर नाहीं, आणि जें काम चांगल्या रीतीनें झाल्याची किंवा न झाल्याची कोणाला पर्वा नसते, असें काम. [नरहरदेवाची पालखी उचलण्याचें पुण्य आपल्याला लागावें म्हणून पालखीच्या दांड्याला आपला खांदा

लावण्याविषयीं भक्तमंडळी भारी उत्सुक असते. त्या प्रसंगीं अतिशय गोंधळ होतो, व ती पालखी स्वस्थानावर गेली म्हणजे हा गोंधळ शमतो. ]

११३०. **नवकोट नारायण**—अतिशय श्रीमंत मनुष्य.

११३१. **नारळाची आई**—करवंटी. दारिद्य स्थिति. भिक्षेकऱ्याची स्थिति. [ भिक्षेकरी लोक करवंटींत भिक्षा घेतात. ]

११३२. **नांवानें पूज्य**—अत्यंत अभाव. उ० आज माझ्याजवळ पैशाच्या नावानें पूज्य आहे.

११३३. **निर्वाणीचा बाण**—अखेरचा उपाय.[ निर्वाण=मुक्ति.शेवट. अगदीं निरूपायास्तव आणि अन्य साधनें निष्फल झाल्यानंतर सोडावयाचा बाण. ]

११३४. **नृसिंहावतार**—उग्र स्वरूप. उ० त्या पोरापुढें जेव्हां मी नृसिंहावतार धारण केला, तेव्हां त्यानें चोरी केलेली कबूल केली !

११३५. **पंक्तिपठाण, पंक्तिबारगीर**—यजमानाच्या पंक्तीस जेवायाला जे लोक असतात ते. यजमानाची पंगत लांबलचक होऊन त्याचें वैभव मोठें दिसावें, म्हणून जे लोक पंक्तीस घेतलेले असतात, आणि ज्यांचा उपयोग यथेच्छ भोजन झोडण्यापलीकडे कांहीं नाहीं, असे लोक.

११३६. **पंक्तिप्रपंच**—पंक्ति=ओळ. प्रपंच=काटकसर.पंक्तींत काटकसर करणें म्हणजे श्रीमंत, किंवा शिष्ट, किंवा आपल्याशीं परिचित, अशा मंडळींना उंचीं उंचीं खाद्यें वाढणें, आणि गरीब, किंवा तिऱ्हाईत,माणसांना हलकीं सलकीं खाद्यें वाढणें, हें आपल्या लोकांत अत्यंत निंद्य म्हणून गणलेलें आहे. सारख्याच योग्यतेचीं माणसें असून त्यांपैकीं वशीलेदारांस एका प्रकारें वागविणें, आणि इतरांस दुसऱ्या तऱ्हेनें वागविणें, ह्याला "पंक्तिप्रपंच" म्हणतात. अर्थात् "पंक्तिप्रपंच" ह्म० पक्षपात.

११३७. **पंच पंच उपःकाल**—सूर्योदयाच्या अगोदरच्या पांच घटकांचा काळ.

११३८. **पट्टीचा वैदिक**—अग्रगण्य वैदिकांत ज्याची गणना होते असा.

११३९. **पडचाकर**—चाकराचा चाकर. चुकारतट्टू चाकर आपलें काम ज्या च्यावर लोटतो, त्या इसमास "पडचाकर" म्हणतात.

११४०. **पडता काळ**—अपकर्षाची किंवा उतरती कळा. [ मागें लें० १०४ पहा. ]

११४१. **पढतमूर्ख**—शिकलेला असूनही जो मूर्खासारखें आचरण करतो तो

११४२. **पंढरीची वारी**—पुनः पुनः होणारी खेप. निष्फळ खेप.

११४३. **पदरचा माणूस**—आश्रित.

११४४. **परसांतली भाजी**—अनायासानें मिळणारी वस्तु. सुलभ रीतीनें करितां येण्याजोगें काम.

११४५. **पर्वणी**—दुर्मिळ शुभसमय. फार दिवसांनीं येणारा पुण्यकाल.

११४६. **पळतें पीक**—फळझाडांचा शेवटचा बहार.

११४७. **पागोट्याचा धनी**—व्यापारांत, किंवा व्यवहारांत, ज्याचा चांगल लौकिक आहे असा माणूस. पतीचा माणूस.

११४८. **पाण्यावरची रेघ**, किं० **रेषा**—निश्चयानें खोटें ठरणारें भाकीत

११४९. **पाप्याचें पितर**—पापी लोक श्राद्धादिक कर्में करीत नाहींत, त्यामुळें त्यांच्या पितरांस पिंडोदक मिळत नाहीं, म्हणून ते रोड असतात; यावरून रोड, किडकिडीत, माणसास, "पाप्याचें पितर," असें म्हणतात. [ "पितर" हा शब्द मराठींत पुल्लिंगी व नपुंसकलिंगी योजतात. ]

११५०. **पायाखालची वाट**—पूर्ण परिचयाची वाट.

११५१. **पिंगा**—हा मुलींचा खेळ आहे. व्यवहारांत त्याचा अर्थ भ्रमण किं० बखेडा, किं० घोटाळ्याचा कारभार, असा होतो. अनुरूप क्रियापद " घालणें. " उ०

> संसृतीस वदती बुध पिंगा । माजला चहुंकडे बहु दंगा ॥
> शांतता नच दिसे मज लोकीं । वाटतेंचि कलहा सजलों कीं ॥ १ ॥
>
> मनोहर.

११५२. **पिष्टपेषण**—पिष्ट=पीठ. पेषण=दळणें. चिरडणें. भुगा करणें. पिष्टपेषण=त्याच त्याच गोष्टीचा कंटाळा येईल असा पुन्हा पुन्हा खल करणें.

११५३. **पोटचा गोळा**--प्रत्यक्ष आपलें मूल. उ० म्हाताऱ्या नवऱ्याला पोटचा गोळा त्यानें १५०० रुपये घेऊन दिला !

११५४. **पोटाचा चाकर, पोटाचा पाईक**--ज्याला आपल्या चरितार्थासाठीं मेहेनत करावी लागते, असा माणूस.

११५५. **प्रमाण**--दुसऱ्याला आज्ञा, उपदेश, किं० सल्लामसलत, द्यावयाला योग्य म्हणून गणलेला माणूस. ज्याचा शब्द, किं० वचन, अनुल्लंघनीय आहे, असा माणूस, किं० ग्रंथ. सर्वमान्य, ग्राह्य. उ०

धर्म म्हणे, " गा भीमा ! तुज जरि आम्ही प्रमाण तरि सोडीं ।
न वदें निष्ठुर कांहीं, अभयवितरणें सदीव्य यश जोडीं " ॥

मोरोपंत---भारत.

११५६. **प्राणांतिक अवस्था**—मरण येतें कीं काय अशी स्थिति.

११५७. **फुटका मणि**--

( क ) अगदीं लहान किमतीचा दागीना. उ० माझ्या बायकोच्या अंगावर चोरी झाल्यानंतर फुटका मणि देखील राहिला नाहीं !

( ख ) अगदीं थोडें द्रव्य. उ० मी कर्जाचे पैसे सर्व वारिले. आतां माझ्याकडे फुटका मणिही नाहीं !

११५८. **बकध्यान**--साधेपणाचें ढोंग. प्रामाणिकपणाचा बहाणा.

बकाच्या खोट्या साधेपणाविषयींचा अन्योक्तिपर श्लोक येणेंप्रमाणें:—

उभा राहे एके चरणिं धरणीतें धरुनिया
तपश्चर्या वाटे करित जणुं डोळे मिटुनिया !
बका ! ऐशा ढोंगें तव अमति मासेच फसती
परी ज्ञाते तूझें कपट लवलाही उमगती ॥

कृ० शा० चि०.

११५९. **बगलबच्चा**--वशील्याचा माणूस.

११६०. **बगलबिल्ली**--

१. अति लाडांतलें मूल.
२. वशील्याचा माणूस.

११६१. **बगलभावार्थी**--दिसावयाला गरीब, साधाभोळा, पण संधि सांपडली कीं चोरी करणारा !

११६२. **वगल्या चोर**--जो चोरीच्या उद्देशानें आलेला नसतो, पण जो संधि सांपडतांच चोरी करावयाला सिद्ध असतो, तो.

११६३. **बादरायण संबंध**--अति लांबचा, किं० दूरचा, संबंध.

११६४. **बारभाई**--भिन्न भिन्न मतांच्या व स्वभावांच्या माणसांचा एकाद्या विशिष्ट कामीं झालेला संयोग, किं० अशा संयोगापासून उद्भवणारा घोटाळा, किं० गोंधळ. उ० घरांतील कर्ता पुरुष मरण पावतांच जी बारभाई माजली, ती सांगतां पुरवत नाहीं ! कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं असें होऊन गेलें !

११६५. **बारा पिंपळावरचा मुंजा**—एके ठिकाणीं स्थिर न वसणारा, म्ह० सदा हिंडत असणारा, माणूस.

११६६. **बालाग्र**--वाल=केश. अग्र=टोंक. बालाग्र=केशाच्या टोंकाइतकें. उ० तो माझें वालाग्र नुकसान करूं शकणार नाहीं !

११६७. **बावनकशी सोनें**—अत्यंत शुद्ध सोनें. सोन्याच्या शुद्धतेचे ५२ कस धरले, तर त्यापैकीं ५२ कस ज्याचे उतरतात, असें सोनें. लक्षणेनें "बावनकशी सोनें" म्ह० पवित्र, निर्दोष, माणूस, किं० पदार्थ.

११६८. **बाहेरची बाधा**--भूत, पिशाच, वगैरेंची पीडा.

११६९. **बाळकडू**--लहान मुलांना घालावयाच्या औषधांच्या घुटीला "बाळकडू" म्हणतात. उ० कोळ्याच्या मुलांना पोहोण्याचें बाळकडूच असतें, ( म्ह० त्यांना लहानपणापासून पोहोतां येतें. )

११७०. **बिनभाड्याचें घर**--तुरुंगवास.

११७१. **बुडीत खर्च**—जो खर्च केला असतां त्याच्या मोबदला कांहीं मिळत नाहीं, असा खर्च.

११७२. **बोकेसन्यासी**--संभावितपणाचें पांघरूण घेऊन जो आपले कपटविचार झांकीत असतो, असा मनुष्य.

११७३. **ब्र**—एक शब्द सुद्धां. उ० त्याला मी अपराधांत पकडून यथास्थित बोललों. त्यानें तोंडांतून ब्र काढिला नाहीं !

११७४. **ब्रह्मगांठ**—कधीं न सुटणारी गांठ, म्ह० संबंध. [ व्युत्पत्तिः—ब्रह्मदेवानें बांधिलेली गांठ. ]

११७५. **भाकडकथा**—निष्फळ, नीरस, आणि लांबलचक, गोष्टी, किं० हकीगत.

११७६. **भगीरथ प्रयत्न**—अतिनेटाचा प्रयत्न. भगीरथानें अनेक कष्ट सोसून स्वर्गीची गंगा पातालांत नेऊन आपले पितर उद्धरले, या पौराणिक कथेवरून वरील शब्द रूढ झाला.

११७७. **भ्रमाचा भोपळा**—ज्याच्याविषयीं प्रथम आपला चांगला ग्रह असतो, तो पदार्थ कुचकामाचा आहे, असें आपल्या निदर्शनास आलें, म्हणजे " भ्रमाचा भोपळा फुटला, " असें म्हणतात. " भ्रमाचा भोपळा फुटणें, " म्ह० खोट्या कल्पनेचें, किं० ग्रहाचें, निरसन होणें.

११७८. **मगरमिठी**—घट्ट मिठी.

११७९. **मंडूकप्लुति**—मंडूक=बेडूक. प्लुति=उडी. बेडूक उडीसाठीं अवसान न घेतां एकदम उडी मारतो. ह्या साम्यावरून, वर्णनांत मधली हकीगत जर कोणी एकदम वगळली, आणि जर तो पुढची हकीगत सांगूं लागला, तर " त्याणें मंडूकप्लुति केली " असें म्हणतात.

११८०. **मधुमक्षिकेचें व्रत**—प्रत्येक ठिकाणीं जें कांहीं आपणाला उपयुक्त असून घेण्याजोगें असेल, तें घेण्याची रीति. [ मधुमक्षिका=मधमाशी. व्रत= रीति, वर्तनक्रम. मधमाशी प्रत्येक फुलांतून मध गोळा करीत असते, ह्यावरून वरील शब्द रूढ झाला. ]

११८१. **मनाची आशा**—मनाची ओढ, किं० धाव. मनाचा वळकट कल.

११८२. **माकडाची जखम**—ज्यांत अनेक लोक पडल्यामुळें विचका झाला आहे, असें काम.

११८३. **मागला पाय**—नुकसानाची, किं० अपकर्षाची, स्थिति, किं० प्रसंग.

११८४. **मानभाव**—दिसण्यांत सभ्य, परंतु अंतर्यामीं कपटी, असा माणूस. [ मानभावी पंथाचे लोक बोलण्यांत गोड असतात, ह्यावरून "मानभाव" ह्याचा व्यवहारांत वरीलप्रमाणें अर्थ घेण्यांत येतो. ]

११८५. **मायपोट**—पोटाला देणारा माणूस. चरितार्थाचें साधन. ज्यांत पुष्कळांचा समावेश होऊन चरितार्थ चालतो असा उद्योग, धंदा, व्यापार, वगैरे. उ० रेलवे खातें हें सर्वांचें मायपोट आहे.

११८६. **मायेचा पूत**--कर्तबगार, किं० पराक्रमी, माणूस. [ शब्दशः अर्थ " आईचा मुलगा. " ]

११८७. **मारूतीचें शेंपूट**--कधीं न संपणारी हकीगत. आपल्या इच्छे-विरुद्ध एकसारखी वाढत जाणारी वस्तु, खर्च, वगैरे.

११८८. **माशानें गिळलेलें माणिक**—माशानें गिळलेलें माणिक परत आपल्या हातीं येणें अशक्य असतें; ह्यावरून "माशानें गिळलेलें माणिक" म्हणजे एकाद्यानें गिळंकृत केलेली वस्तु, जी परत मिळण्याची मुळींच आशा नाहीं.

११८९. **माहेर**—वसतिस्थान. उ० पोपयी हें फळ खरजेचें माहेर आहे !

११९०. **मुक्ताफळें**—मोतीं. विपरीत लक्षणेनें मूर्खासारखे बोललेले शब्द.

११९१. **मेषपात्र**—बावळट माणूस.

११९२. **म्हशीनें पाय दिलेलें नाक**—चपटें, किं० अपरें, नाक.

११९३. **यमाचें बोलावणें**—मरण. [ यम हा प्राण्यांच्या आयुष्याची नोंद ठेवणारा देव. एकाद्या प्राण्याची आयुर्मर्यादा किती आहे तें पाहून ती मर्यादा भरतांच तो त्या प्राण्यास स्वता, किं० आपल्या दूतांकडून, बोलावितो. यमाची जी राजधानी ती " यमपुरी. " येथें प्राण्यांनीं केलेल्या पापकृत्यांबद्दल यम त्यांस दंड करतो. यावरून व्यवहारांत "यम-पुरी" म्हणजे जेथें हाल अपेष्टा भोगाव्या लागतात, असें ठिकाण. ]

११९४. **रडतराव**—जो मनुष्य सदा सर्वदा रडत असतो, म्हणजे जो नेहेमीं रडकथा सांगत असतो, तो. ज्याचे ठायीं अवसान, किंवा हिंमत, नाहीं असा माणूस. " रडतराऊत " हाही शब्द वरील अर्थानें योजला जातो.

११९५. **यादवी**—भाऊबंदकीचीं भांडणें. [ कृष्णावतारीं यादवांमध्यें मोठें युद्ध जुंपून त्यांचा विध्वंस झाला ].

११९६. **राजश्री**—विचित्र माणूस. "राजश्री" हा शब्द संमानार्थ पुरुषाच्या नांवामागें लावितात. त्याचा विनोदी भाषणांत " तऱ्हेवाईक मनुष्य, " असा अर्थ केला जातो.

११९७. **राम**—सामर्थ्य, शक्ति, जोर. उ० त्या उपरण्यांत आतां कांहीं राम उरला नाहीं, ( "राम" ह्य० वापर सहन करण्याची ताकद. )

११९८. **रामाचें नांव**—बिलकुल कांहीं नाहीं. उ० आमच्या आपत्कालीं त्यांणीं आम्हास मदत केली अशी तुमची समजूत आहे काय? छे: ! रामाचें नांव! ( म्ह० त्यांणीं मुळींच मदत केली नाहीं ! )

११९९. **रामबाण औषध**—हटकून गुण करणारें औषध. [ रामाचा बाण कधीं फुकट जात नसे व तो लक्ष्याचा वेध करावयाला चुकत नसे. ]

१२००. **रामराज्य**—( क ) अत्यंत सुखाचें राज्य.

( ख ) जी व्यवस्था करतांना आपणांस हावें तसें वागावयाची मोकळीक असते, म्हणजे कोणीही मनुष्य आपणास रागें भरावयास नसतो, अशी व्यवस्था. उ० घरांत तीन दिवस कोणी वडील मनुष्य नव्हतें, तेव्हां मुलांनीं रामराज्य चालविलें होतें!

१२०१. **राक्षसी झोंप**—गाढ झोंप.

१२०२. **रुपेरी बेडी**—सेवावृत्ति. द्रव्याच्या लालचीनें करून घेतलेलें बंधन.

१२०३. **लंकेची पार्वती**—जिच्या अंगावर एकही दागिना नाहीं, अशी सौभाग्यवती स्त्री.

१२०४. **लटपटपंची**—घोटाळा. गोंधळ. दुसऱ्याला फसविण्याच्या उद्देशानें केलेलें धरसोडीचें, किं० गोंधळविणारें, भाषण. उ० माझ्यापुढें तुझी लटपटपंची चालावयाची नाहीं! उ० धनीसाहेबांनीं तुक्याच्या अंगावर डोळे वटारतांच त्याची लटलटपंची उडाली!

१२०५. **लंबकर्णाची स्वारी**—गाढव. [ गाढवाचे कान लांब असतात, ह्यावरून त्याला " लंबकर्ण " असें नांव आहे. ]

१२०६. **लांडा कारभारी**—ज्या कामांत आपला कांहीं संबंध नाहीं, त्यांत पडणारा. लुडबुड्या.

१२०७. **वर्षाचा दिवस**—जो दिवस वर्षांतून एकदाच येतो, म्हणून त्याचें महत्त्व मनांत आणून त्या दिवशीं योग्य त्या गोष्टी करणें जरूर आहे, असा दिवस.

१२०८. **वामकुक्षि**—दुपारच्या जेवणानंतर थोडा वेळ घेतलेली झोंप. [ निजतांना डाव्या कुशीवर निजण्याची रूढि, किं० वैद्यशास्त्राची आज्ञा, आहे.]

१२०९. **वितंडवाद**—मूर्खपणाचा वादविवाद.

१२१०. **वेडा पीर**—छांदिष्ट माणूस. अजागळ माणूस.

१२११. **वेड्यांचा बाजार**—वेड्यांचा जमाव.

१२१२. **वेळेचा गुण**—अमुक एका विशिष्ट वेळीं ही गोष्ट केली, तिचा हा परिणाम, किं० फल. उ० माझे अनरसे नेहमीं चांगले होतात, पण आजचे विघडले! वेळेचा गुण! दुसरें काय?

१२१३. **शतंभीष्म**—"भीष्म" हा भारतीय युद्धांत मोठा पराक्रमी वीर होता. "शतंभीष्म" ह्याचा व्यवहारांत "भीष्माहून शतपटीनें पराक्रमी पुरुष," असा घेण्यांत येतो. उ० अरे जा! तूं काय माझें वांकडें करणार आहेस! तुझ्यासारखे मी पुष्कळ शतंभीष्म लोळविले आहेत!

१२१४. **शाळू सोबती**—ज्याचा सहवास थोडे दिवसच आपणास लाभावयाचा आहे, असा माणूस. याचप्रमाणें "शाळू ऐश्वर्य," किं० "शाळू आयुष्य" म्हणजे क्षणभंगुर ऐश्वर्य, किं० आयुष्य. [ "शाळू" म्हणून जोंधळ्याची एक जात आहे. ह्या जातीचा जोंधळा हिंवाळ्यांत पिकतो, आणि हिवाळ्याचे दिवस फार लहान असतात, ह्यावरून "शाळू" म्ह० थोड्या मुदतीचा, अल्पकाळ टिकणारा, असा अर्थ रूढ झाला. ]

१२१५. **शिकंदर**—म्यासिडोनियाचा "शिकंदर" म्हणून एक पराक्रमी राजा होता. शिकंदर, अल्सिकंदर, व आलेक्झ्यांडर, हीं त्याच शब्दाचीं भिन्न भिन्न रूपें होत. लाक्षणिक अर्थानें "शिकंदर" ह्याचा अर्थ गांवचा पुंड, वात्रट, द्वाड माणूस, असा होतो.

१२१६. **शिखंडी**—"शिखंडी" हा प्रथम स्त्री असून नंतर त्यास पुरुषत्व प्राप्त झालें, अशी पौराणिक कथा आहे. यावरून ज्याच्या अंगीं कोणत्याही प्रकारची धमकदारी नाहीं, त्याला "शिखंडी" हा शब्द लावतात.

१२१७. **शिराळशेट**—पूर्वी दुर्गादेवी नांवाचा जेंव्हा १२ वर्षांच्या अवधीचा दुष्काळ महाराष्ट्रांत पडला होता, तेव्हां "शिराळशेट" नांवाच्या वाण्यानें लमाणी बैलांचे तांडे परदेशास पाठवून तिकडचें धान्य आणवून लोकांस पुरविलें. ह्या त्याच्या दयाशीलतेबद्दल विजापूरच्या राजानें "तुला काय बक्षिसी देऊं? म्हणून त्याला विचारलें. तेव्हां शिराळशेट म्हणाला, "मला औट घटका ( म्हणजे ३॥ घटका ) आपलें राजपद द्या, आणि मी ज्या कागदांवर सही करीन, ते आपण खरे म्हणून धरले पाहिजेत." राजानें

हें कबूल केले. तेव्हां शिराळशेट तख्तावर बसला, आणि त्यानें ह्या अवधींत हिंदू देवस्थानांच्या ज्या ज्या नेमणुका पूर्वी रद्द करण्यांत आलेल्या होत्या, त्या त्या पुन्हा सुरू केल्या, व कांहींना नवीन नेमणूका ठरवून दिल्या. हीं परोपकाराचीं कृत्यें करून पुन्हा ह्या महात्म्यानें स्वतासाठीं कांहीं एक नेमणूक करून घेतली नाहीं ! ३॥. घटका सरतांच तो तख्तावरून खालीं उतरला. राजानें त्याच्या सहीच्या सर्व सनदा, देणग्या, वगैरे पाळल्या. शिराळशेटाच्या महात्मतेचें स्मरण चिरस्थायी व्हावयासाठीं लोक त्याच्या नांवानें श्रावण शुक्ल ६ च्या दिवशीं उत्सव करूं लागले ! तो उत्सव अद्यापिही केला जातो ! "शिराळशेट" हा शब्द हल्लीं व्यवहारांत सुखवस्तु, रंगेल, व कसलीही काळजी न वाळगणाऱ्या माणसाला लावतात, व "शिराळशेटीचें राज्य" हा शब्द क्षणभंगुर वैभवास लावतात.

१२१८. **शिवस्व**—जिला स्पर्श देखील करतां कामा नये, अशी वस्तु, (अपवित्र म्हणून, किं० अतिपवित्र म्हणून). उ०

रावणा, तुझीं दहा शिरें । मीच छेदितों नखाग्रें ॥
परी तीं शिवस्व अपवित्रें । म्हणोनी करें स्पर्शीना ॥

एकनाथ, अंगदशिष्टाई.

१२१९. **शुष्क काष्ठ**—लचांड. झेंगट.

१२२०. **शुकाचार्य**—श्रीव्यास मुनींचा पुत्र. हा मोठा ब्रह्मचारी होता. यावरून कडकडीत ब्रह्मचर्याचें व्रत पाळणारा जो मनुष्य असेल, त्याला हा शब्द लावतात.

१२२१. **शुक्राचार्य**—असुरांचा गुरु शुक्राचार्य. हा एका डोळ्यानें अंध होता. यावरून एका डोळ्यानें अंध मनुष्याला हा शब्द विनोदानें लावण्यांत येतो.

१२२२. **शुंभ**—ज्याला विद्येचा कांहीं संस्कार नाहीं, असा माणूस.

१२२३. **शून्य**—फुकट. निष्फळ. निरर्थक.

आश्रमा आलिया अतिथी । जे कोणी पूजा न करिती । त्यांची शून्य पुण्यसंपत्ति । आश्रमस्थिति शून्य होय ॥ तुम्हीं नांगिकारितां पूजन ।

काहीं न घेतां बळीदान । गेलिया आश्रम हा होईल शून्य । यालागीं कृपा करोनि पूजा घ्यावी ॥ एकनाथ

१२२४. **शूर्पणखा**—या नांवाची रावणाची एक बहीण होती. ती शरीरानें हिडिस होती. स्वताच्या शरीराची जिला ऊर्जा नाहीं, जिचें अंग सदा मळलेलें, जिचे परकर किंवा साडीचोळी ओंगळ, जिचे केश फिसकरलेले असतात, अशा मुलीस, किं० स्त्रीस, हा शब्द लावतात. कुरूप, भांडखोर, अशाही स्त्रीस हा शब्द लावतात.

१२२५. **शेणाचा पोहो**—गायी, म्हशी, वगैरेंच्या विष्ठेची रास. यावरून "शेणाचा पोहो" म्ह० सुस्त, किं० आळशी, माणूस. ज्याच्या अंगांत यत्किंचित चपळाई, किं० तल्लखपणा, नाहीं, असा माणूस.

१२२६. **शेंदाडशिपाई**—भित्रा माणूस.

१२२७. **शेर**—ठरलेला भाग. अन्नोदकाचा संबंध. उ० सुनेच्या पायगुणानें मला वढती मिळाली, मुलाची परीक्षा उतरली, आणि एकंदरींत आम्हांला सुखाचे दिवस आले. पण बिचारी लग्न झाल्यावर पांच वर्षांतच मेली! तिचा आमच्या घरचा शेर संपला!

१२२८. **श्मशानवैराग्य**—श्मशानांत गेल्यानें जें त्या क्षणापुरतें वैराग्य, (म्ह० संसाराची किळस), मनांत उत्पन्न होतें तें.

१२२९. **श्रीगणेशा**—आरंभ. सुरवात. कोणत्याही विद्येचीं मूलतत्त्वें. उ० मीं अजून वैद्यकीचा श्रीगणेशा देखील घेतला नाहीं!

१२३०. **सतरा गुणांचा खंडोबा**—अनेक रोग, किं० दुर्गुण, ज्याच्या अंगीं आहेत, असा माणूस.

१२३१. **सहा महिन्यांची जांभई**—लवकर सिद्धीस न जाणारें काम.

१२३२. **साखरेची सुरी**—आपला दुष्ट हेतु प्रकट न होऊं देतां गोड गोड भाषण करून दुसऱ्याचा नाश करणारा.

१२३३. **साडेतीन शाहणे**—सखारामबापू, विठ्ठल सुंदर, आणि देवाजीपंत, हे तीन पुरते शाहाणे, आणि नाना फडणीस अर्धे शाहाणे, मिळून साडेतीन शाहाणे पेशवाईत होऊन गेले. हल्लीं व्यवहारांत कोणाही मूर्ख आणि वढाईखोर माणसाला हा शब्द विपरीत लक्षणेनें योजतात. ह्याचें

रूप अनेकवचनी असतें. उ० गोविंदराव, तुम्ही मोठे साडेतीन शाहाणे आहां!

१२३४. **सांबाचा अवतार**--अत्यंत भोळा माणूस. सांब म्ह० शंकर. जो कोणी शंकराची आराधना करी, त्याला शंकर मागावें तें देत असे, मग त्या देणगीचा कांहींही परिणाम होओ!

१२३५. **सुतळीचा तोडा**--अगदीं हलक्या किमतीची वस्तुसुद्धां. उ० माझ्या पुतण्याची जिंदगी वहिवाटीला पंधरा वर्षें माझ्याकडे होती. त्याच्या सुतळीच्या तोड्याला न शिवतां मी सारीं कामें करीत असें. मग तो वयांत येतांच ती जिंदगी मी त्याच्या हवालीं केली.

१२३६. **सुळावरची पोळी**--अत्यंत धोक्याचें, जिवावरचें, किं० जिकीरीचें, काम. जो लाभ मिळवावयाला जीव धोक्यांत, किं० संकटांत, घालावा लागतो, तो.

१२३७. **सूर्याचें पिलूं**--दिवा.

१२३८. **सूर्याचे पोटीं शनीश्वर**—सूर्याचा मुलगा शनि. शनीला त्याच्या मंदगतीवरून "शनैश्वर," (म्ह० सावकाश चालणारा), असें नांव आहे. सूर्य हा जगाचें कल्याण करणारा असून शनि हा ग्रह दुःख देणारा आहे. भाग्यशाली आणि पराक्रमी बापाचा मुलगा जर मूर्ख असा निपजला, तर त्याच्या संबंधानें "सूर्यापोटीं शनीश्वर" असें म्हणतात. [ "शनीश्वर" हा "शनैश्वर" याचा अपभ्रंश. ]

१२३९. **सोन्याचा दिवस**—अतिशय सुखाचा, किं० आनंदाचा, दिवस.

१२४०. **हिंगाचा खडा**—हिंग हा पदार्थ चवीला व वासाला उग्र आहे. त्याचा अगदीं बारीक खडा जरी खाद्य पदार्थाला लावला, तरी त्याचा वास व चव हीं त्या पदार्थास लागतात. यावरून "हिंगाचा खडा," म्ह० गडबड्या, किं० तल्लख, माणूस.

१२४१. **हिडिंबा**—कुरूप, कजाग, स्त्री. [ "हिडिंबा" म्हणून एक दुष्ट, कुरूप, भयंकर, राक्षसी होती, तिला कृष्णानें मारिलें, अशी एक पौराणिक कथा आहे. ]

# म्हणी.

—*—

१२४२. " म्हण " हें नाम "म्हणणें" ह्या क्रियापदापासून निघालेलें आहे. " म्हण " ह्या शब्दाचा अर्थ " लोकांनीं वारंवार म्हटलेलें किंवा उच्चारलेलें जें वाक्य तें. " " म्हण " ह्याची शास्त्रीय व्याख्या येणेंप्रमाणें आहे. ज्यांत कांहीं अनुभव किं० ज्ञान गोंविलेलें आहे, जें अल्पशब्दात्मक आहे, ज्यांत कांहीं चटकदारपणा आहे, आणि जें लोक संभाषणांत वगैरे वारंवार योजतात, असें वचन, किं० वाक्य. ह्या संबंधाचा ज्यास्ती खुलासा आमच्या " **म्हणी-विषयीं चार शब्द,** " नांवाच्या निबंधांत पहावा.

१२४३. **अचाट खाणें, मसणांत जाणें**—कोणत्याही गोष्टींत अत्याचार झाल्यास परिणाम वाईट होतो.

१२४४. **अडला नारायण गाढवाचे पाय धरी**—प्रसंगीं शाहाणा मनुष्य देखील मूर्ख व्यक्तीच्याही कच्छपीं लागतो.

१२४५. **अंतकाळापेक्षां मध्यान्हकाळ कठिण**—मरणाच्या वेदनांपेक्षां भुकेच्या वेदना अधिक दुखःदायक असतात.

१२४६. **अति तेथें माती**—कोणतीही गोष्ट अतिरेकास नेली असतां तिचा परिणाम दुःखकारक होतो.

१२४७. **अतिरागा भीक मागा**—ज्याला अतोनात राग येतो, किं० ज्याचा राग अनावर असतो, त्याला भिक मागण्याची पाळी येते.

१२४८. **अति शाहाणा त्याचा बैल रिकामा**—जो मनुष्य फार फार शाहाणपणा करावयास जातो, तो अंतीं फसतो; म्हणजे त्याचे हातून कोणतेंही उपयोगी, किं० मोठें, काम होत नाहीं. [ बैलाकडून इतर लोकां-प्रमाणें धोपट मार्गानें काम न घेतां जर कोणी मनुष्य " त्या बैलाकडून मी वेगळ्या कोणच्या प्रकारचें काम करून घेतल्यानें मला ज्यास्ती फायदा होईल बरें ? " असा विचार करीत बसला, तर त्याचा तो बैल रिकामा राहून त्याचें शेत नांगरलें जाणार नाहीं.

**१२४९. अंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे**—दैव अनुकूळ झालें असतां कधीं कधीं आपल्या इच्छेपेक्षां अधिकही देतें.

**१२५०. अंधळें दळतें आणि कुत्रें पीठ खातें**—अंधळा जात्यावर बसून दळ दळ दळतो, परंतु खालीं पीठ किती जमलें हें पाहतो, तों पीठ थोडें! कारण तें कुत्र्यानें खाऊन टाकलेलें त्याला कळलेलें नसतें. मनुष्य इमानानें काम करीत असतो, पण दुष्ट लोक त्याच्या सन्निध असले, किं० त्याचा यजमान अजाण असला, तर त्याच्या कामाचें चीज होत नाहीं. ह्या म्हणीनें अव्यवस्था, किं० अंदाधुंदीचा कारभार, दर्शविला जातो.

**१२५१. अंधळ्या गायींत लंगडी गाय प्रधान**—जेथें पुष्कळ अडाणी माणसें जमलेलीं असतात, तेथें जर कोणी एकादा माणूस थोडासा जाणता असला, तर तो त्या सर्व मंडळींत मोठा पंडित म्हणून गणला जातो.

**१२५२. अंधळ्याच्या गायी देव राखतो**—देव असमर्थांची काळजी घेत असतो.

**१२५३. अंधळ्यापुढें नाच आणि बहिऱ्यापुढें गायन**—अंधळ्याला नाच दिसत नाहीं, आणि बहिऱ्याला गायन ऐकूं येत नाहीं, म्हणून दोन्ही फुकट. मूर्खापुढें पांडित्य करणें, अजाण यजमानाची नोकरी करणें, वगैरेंसारख्या निरुपयोगी, किं० निष्फळ, कृत्यांचें वर्णन ह्या म्हणीनें केलें जातें.

**१२५४. अंधळ्याला अंधळा काय वाट दाखविणार?**—एका असमर्थाला दुसरा असमर्थ काय उपयोगीं पडणार? एका अडाण्याच्या मदतीला दुसरा अडाणी आला म्हणून काय कार्य व्हावयाचें आहे? कांहीं नाहीं.

**१२५५. अन्नाचा मारलेला खालीं पाही, तरवारीचा मारलेला वर पाही**—ज्याला आपण पोसतों, तो आपल्या मिंधेगिरींत असतो, व आपणाशीं नम्रपणानें वागतो. ज्याला आपण आधिकाराच्या, सत्तेच्या, किंवा श्रीमंतीच्या, जोरावर चिरडतों, तो आपणाशीं ताठ्यानें वागतो. सौम्यपणानें मनुष्य नरम करतां येतो, उद्दटपणानें तो आपला शत्रु होतो.

१२५६. **अर्थी दान महापुण्य**—तातडलेल्या म्हणजे गरजू माणसाला जें द्यावें, त्यानेंच मोठें पुण्य लागतें ! "तुरुत (त्वरित) दान महापुण्य," असाही पाठ आहे !"

१२५७. **अर्धी टाकून सगळीला धावूं नये**—सबंध वस्तु मिळविण्याचा प्रयत्न करतांना हातीं असलेली अर्धी वस्तु टाकून देणें, हा मूर्खपणा आहे.

१२५८. **असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ**—भलत्याच माणसाशीं गांठ पडली असतां, किं० मैत्री जडली असतां, आपले प्राण धोक्यांत पडतात.

१२५९. **असतील शितें तर मिळतील भुतें**—आपल्या जवळ पैसा असला, म्हणजे मित्रांची काय उणीव ?

१२६०. **असेल तेव्हां दिवाळी, नसेल तेव्हां शिमगा**—जवळ पैसा असेल तेव्हां मागचा पुढचा विचार न करतां तो पैसा चैनींत उधळावयाचा, आणि जवळ पैसा नसेल तेव्हां हाल काढीत बसावयाचे, अशा वर्तनासंबंधानें ही म्हण योजतात.

१२६१. **आईजीच्या जिवावर बाईजी उदार**—दुसऱ्याच्या पैशानें चैन करणारा, किं० दुसऱ्याचा पैसा खर्चून औदार्य दाखविणारा, जो मनुष्य, त्याच्या संबंधानें ही म्हण योजतात.

१२६२. **आकारे रंगती चेष्टा**—बाह्य चिन्हांवरून अंतर्गत स्वरूपाचें ज्ञान होतें.

१२६३. **आठ पुरभय्ये नऊ चौके**—पुरभय्ये लोक स्वताचा स्वयंपाक करून जेवतात. ते दुसऱ्याच्या हातचें खात नाहींत. म्हणून प्रत्येक पुरभय्याला एक एक स्वतंत्र चौका, ( म्हणजे स्वयंपाक करावयासाठीं आखून घेतलेली जागा ), लागतो. पुरभय्ये आठ असले, म्हणजे त्यांचे चौके आठ असावयाचे. आठाच्याबद्दल "नऊ" हा शब्द घालून आणि अतिशयोक्ति करून त्यांच्या चालीची थट्टा ह्या म्हणींत केली आहे.

१२६४. **आंथरून पाहून पाय पसरावे**—आपल्या स्थितीप्रमाणें वर्तन ठेवावें. आदा पाहून खर्च करावा. आपली ऐपत, किं० सामर्थ्य, पाहून जें कांहीं करणें तें करावें.

**१२६५. आधणांतले रडतात आणि सुपांतले हसतात**—आधणांत पडलेल्या तांदुळांचें अंग भाजत असतें म्हणून ते रडतात, आणि सुपांतले तांदूळ चैनीनें उड्या मारीत असतात ( पाखडणें होत असतां ). परंतु ह्या सुपांतल्या तांदुळांसही आधणांत जाऊन रडण्याचा प्रसंग लवकरच यावयाचा असतो. मनुष्यांच्या स्थितींचीं परिवर्तनें होत असतात. आज जे सुखांत आहेत, त्यांना उद्या दुःखाची स्थिति येणें, हें सृष्टिनियमाला अनुसरून आहे.

**१२६६. आधीं पोटोबा मग विठोबा**—आधीं स्वार्थ व मग परमार्थ.

**१२६७. आधीं बुद्धि जाते, मग लक्ष्मी जाते**—आधीं आचरण बिघडतें, मग अवदशा येते. मनुष्याला दारिद्र्य यावयाचें असलें, म्हणजे त्याला भलभलत्या गोष्टी करण्याची प्रवृत्ति होते.

**१२६८. आपला तो बाब्या, लोकांचा तो कारटा**—आपला मुलगा दुर्गुणी असला, तरी त्याचे लाड करावयाचे, आणि दुसऱ्याच्या मुलांत तेच दुर्गुण असले, तरी त्याची निंदा करावयाची, अशा पक्षपाती मनुष्याच्या वर्तनासंबंधानें ही म्हण लावतात.

**१२६९. आपला हात आणि जगन्नाथ**—आपली इच्छा तृप्त करून घेण्याची पूर्ण परवानगी असल्यावर कोण कमी करील? "जगन्नाथ" म्ह० देव. मनुष्याच्या सर्व कामना पुरविण्याचें सामर्थ्य ज्याच्या अंगीं आहे तो.

**१२७०. आपलींच नखें आपणांस विषें होतात**—आपलींच कृत्यें आपणास भोंवतात. [ नखांनीं अंग खाजविल्यानें त्वचा खरवडली जाऊन दुखापत होते, त्याला " नखांचें विष बाधलें, " असें म्हणण्याची रूढि आहे. ]

**१२७१. आपली पाठ आपणांस दिसत नाहीं**—आपले दोष आपणास दिसत नाहींत. आपल्या पाठीमागें काय चाललें आहे, तें आपणास कळत नाहीं.

**१२७२. आपापाचा माल गपापा**—जो माल, किं० वस्तु, मिळवावयाला श्रम पडले नाहींत, तो उधळेपणानें, किं० मूर्खपणानें, मनुष्य खर्चून टाकतो. अन्यायानें मिळविलेलें द्रव्य निष्काळजीपणानें खर्चिलें जातें.

**१२७३. आयत्या बिळांत नागोबा वळी**—मुंग्यांनीं, किं० अन्य कांहीं प्राण्यांनीं, स्वतःस रहावयासाठीं केलेल्या बिळांत नाग शिरून तें बळकावतो. त्याप्रमाणें दुसऱ्याला बाजूस सारून त्याच्या श्रमाच्या फळाचा उपभोग बलवान् माणूस घेतो.

**१२७४. उघड्या डोळ्यानें प्राण जात नाहीं**—भलतीच गोष्ट आपल्या डोळ्यादेखत घडत असतां तिचा प्रतिकार केल्यावांचून आपणास राहवत नाहीं.

**१२७५. उतावळा नवरा, गुडघ्याला बाशिंग**—कुणबी लोकांत लग्नाचे प्रसंगीं नवरा आणि नवरी यांच्या डोक्यांला बाशिंगें बांधावयाची चाल आहे. कोणी नवरा लग्नाचा सोहाळा करून घेण्याला उतावळा होऊन नवरी मिळावयाच्या आधींच तिच्याबद्दल आपल्या गुडघ्यालाच बाशिंग बांधून घेऊन हीच माझी नवरी असें म्हणून लोकांना, "आतां माझें लग्न ह्या नवरीशीं लावा" असें म्हणूं लागला, तर तें हास्यास्पद होईल. उतावळेपणानें कोणी मनुष्य मूर्खासारखें वर्तन करतो, तेव्हां सदरहू म्हण त्याचा उपहास करण्यासाठीं योजतात.

**१२७६. उथळ पाण्याला खळखळ भारी**—ज्याच्या अंगीं विद्वत्तेचा, किं० दुसरा कोणत्याही प्रकारचा, गुण नसतो, तो बढाई फार मारतो.

**१२७७. उंदराला मांजर साक्ष**—भोळ्या मनुष्यास फसविण्यासाठीं लुच्चा माणूस कांहीं काळ त्याच्या मर्जीप्रमाणें वागून विश्वास संपादितो, म्हणजे मग इष्ट कार्य करणें सुलभ जातें. आपल्या संकटसमयीं शत्रूचें साहाय्य मागणें हें परिणामीं नाश करतें!

**१२७८. उधाराचें पोतें सवाहात रितें**—माल उधार घेतल्यानें, वजनामापांत व भावांत नुकसान होतें.

**१२७९. उलट्या चोराच्या बोंबा**—एरव्हींचा चोर चोरी करून हळूच मुकाट्यानें पळून जातो. परंतु वस्ताद चोर असतो तो लागलाच पळून न जातां "चोरी झाली! चोर पकडा!!" अशी आपणच बोंब करून आपणावर वहीम न येईल अशी युक्ति योजतो. लोक जमा होऊन काय चोरी झाली, कोणीं चोरी केली, वगैरे तपासांत गुंतले असतां हा चोर

तेथून निसटून जातो. आपणच कांहीं गुन्हा करून पुनः आपणच ओरड करून गुन्हा छपविणाऱ्या माणसासंबंधानें ही म्हण योजतात.

१२८०. **ऊस गोड, पण मुळ्या सोड**—परोपकारी माणसास फार छळूं नये; फार छळल्यास तो वैतागून, किं० दरिद्री होऊन, मुळींच उपयोगीं पडणार नाहीं.

१२८१. **ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊं नये**—ह्या म्हणीचा अर्थ वरच्याचप्रमाणें आहे. उसाच्या बुडख्याला मुळ्या असतात, आणि कांहीं डोळे असतात. बुडखा जमीनींत रोविल्यानें नवीन झाड उत्पन्न होतें. मुळासकट ऊस खाल्ला तर तो वाईट लागेल, इतकेंच नव्हे, तर त्यापासून दुसरा ऊस उत्पन्न व्हावयाचा तोही होणार नाहीं.

१२८२. **एकदा कानफाट्या नांव पडलें कीं पडलें**—"कानफाटे" म्हणून एका जातीचे भिकारी आहेत, ते भिक्षा मागत हिंडतात, आणि संधि सापडल्यास चोऱ्या करतात. अर्थात् सारेच कानफाटे चोऱ्या करतात, असें नव्हे. एकादा कानफाट्या चोऱ्या न करणारा असला, तरी त्याचें नांव "कानफाट्या" येवढ्यावरूनच लोक त्याच्याविषयीं साशंक असतात. त्याप्रमाणें एकाद्या माणसाचा कांहीं व्यवहार लोकांना कांहीं कारणानें लबाडीचा असा वाटला, म्हणजे त्याचे सर्वच व्यवहार लबाडीचे आहेत, अशी शंका येऊं लागते.

१२८३. **एका कानानें ऐकावें, दुसऱ्या कानानें सोडून द्यावें**—नुसतें ऐकून घ्यावें, पण त्याप्रमाणें आचरण करावयाला आपण बांधील आहों असें समजूं नये, किंवा तें मनांत घोळींत बसूं नये.

१२८४. **एकाच हाताचीं बोटें, पण सारीं सारखीं नसतात**—सारख्या स्थितींतील आणि परिस्थितींतील माणसें असलीं, तरी त्यांच्यांत कांहीं तरी फरक हे असावयाचेच !

१२८५. **एकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरू मारूं नये**—एकानें चुकी केली म्हणून दुसऱ्यानें ती किंवा तसली चुकी करूं नये. कारण मग दोघेही दोषीच ठरतील.

१२८६. **एका म्यानांत दोन सुऱ्या राहत नाहींत**-- दोन तेजस्वी माणसें शेजारीं शेजारीं राहूं शकत नाहींत. त्यांच्यांत तेढ येण्याचा संभव असतो. दोन सवती शांततेनें नांदत नाहींत.

१२८७. **एका हातानें टाळी वाजत नाहीं**—भांडण एका पक्षाकडूनच होतें, असें नाहीं. दुसऱ्या पक्षाचाही त्यांत कांहीं तरी दोष असतोच !

१२८८. **ऐकावें जनाचें करावें मनाचें**-लोकांचें मत घ्यावें, आणि मग आपणांस प्रशस्त वाटेल तें करावें.

१२८९. **ओळखीचा चोर जिवा न सोडी**--ज्या चोरास एकादा मनुष्य ओळखितो, त्या चोरानें त्याला लुटलें म्हणजे तो त्याला जिवंत सोडीत नसतो. कारण, हा मनुष्य सोडून दिला असतां सरकारी अधिकाऱ्यांना त्याचें नांव आणि ठिकाण कळवून शिक्षा करवील, अशी त्या चोराला भीति असते.

१२९०. **कडू कारलें तुपांत तळलें, साखरेंत घोळलें, तरी कडू तें कडूच !**—दुर्जन कशानेंही सुधारत नाहीं. वाईट गोष्ट चांगली करण्याचा प्रयत्न फुगट जातो.

१२९१. **कर नाहीं त्याला डर नाहीं**—ज्याचे हातून पाप घडलेलें नाहीं, त्याला भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं.

१२९२. **करंगळी सुजली म्हणून डोंगरा एवढी होईल काय ?**—हाताची करंगली सुजली आणि मोठी झाली, तरी ती डोंगराएव्हढी कधींही होणार नाहीं. प्रत्येक पदार्थाच्या वाढीला मर्यादा म्हणून कांहीं तरी असतेच !

१२९३. **करावें तसें भरावें**—ज्या प्रकारचें कृत्य करावें, त्याप्रकारचे परिणाम भोगण्यास तयार असलें पाहिजे. म्हणजे वाईट कृत्य केल्यास वाईट परिणाम भोगण्यास, व चांगलें कृत्य केल्यास चांगले परिणाम अनुभवण्यास, प्रत्येकानें तयार असलें पाहिजे. [ ह्या म्हणीचा उपयोग नेहेमीं वाईट कृत्याच्या परिणामासंबंधानें होतो. ]

१२९४. **कसायाला गाय धारजिणी**-दुष्ट आणि कठोर माणसाशीं सारे लोक गरीबीनें वागतात !

१२९५. **काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाहींत**—थोड्याशा अधिकारानें जें काम होतें, तें पुष्कळशा पैशानें देखील होत नाहीं.

१२९६. **काडीचोर तो माडीचोर**—क्षुल्लक अपराध करणारा माणूस मोठा अपराधही करितो.

१२९७. **कान आणि डोळे यांच्यांत चार बोटांचे अंतर**—पाहिलेली गोष्ट व ऐकिलेली गोष्ट यांत केव्हां केव्हां अंतर असतें. ऐकिलेली गोष्ट पुढें खोटी ठरण्याचा संभव असतो, पण पाहिलेली गोष्ट सर्वथैव खरीच असते.

१२९८. **कामा पुरता मामा**—आपलें काम साध्य होईतोंपर्यंत एकाद्याला " अहो मामा, अहो मामासाहेब," वगैरे बहुमानाचे शब्द बोलावयाचे, आणि काम झाल्याबरोबर तो आपला कोणी नव्हे अशा रीतीनें त्याच्याशीं वागावयाचें, ह्या कृतघ्नपणाची द्योतक ही म्हण आहे.

१२९९. **कावळ्याच्या शापानें गाई ( ढोरें ) मरत नसतात**—मूर्खाच्या शिव्यानें साधूंचें अकल्याण होत नाहीं.

१३००. **कुचेष्टेवाचून प्रतिष्ठा नाहीं**—दुसऱ्याची टवाळकी केल्यावांचून आपला मोठेपणा वाढत नाहीं; ही मूर्ख लोकांची वृत्ति या म्हणींत वर्णिली आहे.

१३०१. **कुडास कान ठेवी ध्यान**—जपून हुशारीनें कोणतीही गुप्त गोष्ट करावी, कारण ती केव्हां कोणास कळेल, याचा नियम नसतो.

१३०२. **कुत्र्याचें शेंपूट नळींत घातलें तरी वांकडेंच**—मूर्खाच्या मनावर उपदेशाचा परिणाम होत नाहीं.

१३०३. **कुंभाराची सून कधीं तरी उकीरड्यावर येईल**—जी गोष्ट निश्चयानें कधीं तरी कळणारच, तिजविषयीं फाजील आतुरता दाखवूं नये.

१३०४. **कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ**—गोत=सं० गोत्र=वंश, कुळ, कुटुंब. कुऱ्हाडीचा दांडा लाकडाचा असतो. हा दांडा कुऱ्हाडीच्या पोलादी फाळाला बसविला, म्हणजे ती झाडें तोडण्याच्या उपयोगाला येते, आणि तो लाकडी दांडा आपल्या कुटुंबातील वृक्षांच्या नाशास

कारण होतो. देशद्रोही मनुष्य आपल्याच देशाच्या नाशास कारण होतो, म्हणून त्याच्याविषयीं बोलतांना ह्या म्हणीचा उपयोग करतात.

१३०५. **केश उपटल्यानें काय मढें हलकें होतें ?**—आपल्या कामाच्या अत्यंत लहानशा भागाला कोणी मदत केली, तर आपलें काम कितीकसें हलकें होणार ? आपल्याला करावयाच्या कामाचा अत्यंत थोडा भाग वगळला, म्हणून तें काम कमी त्रासानें होईल असें नव्हे.

१३०६. **कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तटाणी ?**—इंद्राचा ऐरावत आणि शामभटाची तटाणी यांची तुलना कसची ? एक अति थोर पदार्थ किं० माणूस, आणि दुसरा अति क्षुद्र पदार्थ किं० माणूस, ह्यांची बरोबरी कशी होणार ?

१३०७. **कोणाचो होऊं नये बायको, आणि कोणाचा होऊं नये चाकर**—बायको आणि चाकर ह्या दोघांनाही यजमानाच्या इच्छे-प्रमाणें वागावें लागतें. त्यांच्या दुःखकारक स्थितीवरून ही म्हण झाली आहे. बायकोची स्थिति आणि नोकराची स्थिति न यावी.

१३०८. **कोंबडें झांकलें म्हणून तांबडें फुटावयाचें राहत नाहीं**—जी गोष्ट होणारच होणार, ती क्षुल्लक अडथळ्यांस जुमानीत नाहीं.

१३०९. **कोरडी आग पुरवते, ओली आग पुरवत नाहीं**—पाठी-वर मारलेलें चालतें, पण उपासमार झालेली सोसवत नाहीं !

१३१०. **कोंड्याचा मांडा करून खावा**—कोंडा हें अति गरीबाचें व मांडा हें अति श्रीमंताचें खाणें आहे. गरीबांनीं कोंड्याचा पदार्थ संतोष-वृत्तीनें खाल्ला, तर त्यांना तो मांड्याप्रमाणें गोड लागेल. आपल्याला जें मिळत असेल त्यांत तृप्त राहावें !

१३११. **कोरड्याबरोबर ओलें जळतें**—चुलींत कोरडें लाकूड चांगलें जळतें, ओलें जळत नाहीं. परंतु ओलें म्हणजे न जळण्याजोगें लाकूड असलें, तरी तें कोरड्या लाकडाच्या साहचर्यानें जळतें. वाइटांच्या संग-तीस चांगला लागल्यास वाइटाच्या नाशाबरोबर चांगल्याचाही नाश होतो.

१३१२. **कोल्हा काकडीला राजी**—ज्या वस्तूवर आपला मुळींच हक्क नाहीं, ती वस्तु अल्प प्रमाणांत मिळाली तरी हलकट माणूस खूष होतो.

१३१३. **कोळसा किती जरी उगाळला तरी तो काळाच!**—कोळसा जसा बाहेरून काळा, तसाच आंतूनही काळा असतो. तो कितीही उगाळला, आणि वरचा पृष्ठभाग कितीही झिजविला, तरी आंतही तो काळाच असावयाचा! वाईट गोष्टीची कितीही वाटाघाट केली, तरी ती चांगली असें कधीं ठरावयाचें नाहीं!

१३१४. **खर्चणाराचें खर्चतें आणि कोठावळ्याचें पोट दुखतें**—यजमान उदारपणानें लोकांस भोजन घालण्याचें ठरवितो, परंतु हा परोपकार किं० दानधर्म दुष्ट आणि मत्सरी कोठावळ्यास पाहावत नाहीं, आणि तो काटकसर करूं पाहातो. आपण औदार्य दाखवावयाचें नाहीं तें नाहीं, आणि दुसरा कोणी औदार्य दाखवीत असला, तर त्याच्या आड यावयाचें, अशा दुष्ट माणसाविषयीं बोलतांना ह्या म्हणीचा उपयोग करतात.

१३१५. **खऱ्याला मरण नाहीं**—खरें कधीं लपत नाहीं; तें केव्हांना केव्हां तरी उघडकीस आणि प्रत्ययास येतें.

१३१६. **खाई त्याला खवखवतें**—तेलकट, किं० वाशेरा, पदार्थ एकाद्यानें खाल्ला असतां तो त्याच्या घशांत कंडू उत्पन्न करून त्याला अस्वस्थ करतो. त्याप्रमाणें कोणी कांहीं वाईट काम केलें असलें, तर तें त्याच्या मनांत सदासर्वदा डाचत राहातें आणि त्याला अस्वस्थ करतें.

१३१७. **खाऊ जाणे तो पचवूं जाणें**—जो मनुष्य धमकदारीनें एकादा पदार्थ खातो, तो मनुष्य तो पदार्थ पचविण्यास समर्थ असतो. अंगीं पचविण्याची शक्ति असल्याशिवाय कोणी मनुष्य कांहीं खात नाहीं. त्याप्रमाणें जो मनुष्य वाईट कृत्य करावयास तयार होतो, तो त्याची निस्तरणी करावयासही समर्थ असतो.

१३१८. **खाऊन माजावें, टाकून माजूं नये**—फार फार अन्न खाऊन मनुष्याला माज येतो आणि त्याची अन्नावर अरुचि होते, आणि तें पुढें आल्यास तो तें न खातां टाकून देतो. यावरून म्हणीचा अर्थ असा कीं

अन्न खाऊन माज आला तरी पुरवला, पण वाढलेलें अन्न न खातां तें टाकून देऊन माजूं नये. माजूं नये म्हणजे आपण माजलों आहों, असें दर्शवूं नये.

१३१९. **खाकेंत कळसा आणि गांवांत वळसा**--एकादी वस्तु आपल्याजवळच आहे याचें भान नसल्यामुळें ती साऱ्या गांवभर शोधीत सुटणें.

१३२०. **खाण तशी माती**—ज्या जातीची खाण असेल, त्याच जातीची त्या खाणींतील माती असावयाची.

१३२१. **खिळ्यासाठीं नाल गेला, नालासाठीं घोडा गेला, घोड्यासाठीं स्वार गेला, एवढा अनर्थ खिळ्यानें केला**--क्षुल्लक चुकीपासून परंपरेनें मोठा अनर्थ गुदरला म्हणजे ही म्हण योजितात.

१३२२. **खोट्याच्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव**--खोटें आचरण परिणामीं दुःखप्रद होतें.

१३२३. **खोरें माती आपणाकडे ओढतें**--प्रत्येक मनुष्य आप्पलपोटेपणानें वागत असतो. कोणत्याही कामांत आपल्याकडे ज्यास्ती नफा येईल, असें प्रत्येक मनुष्य करीत असतो.

१३२४. **गरजवंताला अक्कल नसते**--जरूर पडली म्हणजे भलभलत्या गोष्टी करण्याचीही पाळी येते. गरजू मनुष्य मूर्खासारखा वागतो.

१३२५. **गरज सरो वैद्य मरो**--आपलें काम होतांच त्या कामीं मदत करणाऱ्या माणसाशीं बेपर्वाईनें वागण्याची प्रवृति होते !

१३२६. **गर्जेल तो पडेल काय?**—बडबड करणाराचे हातून कार्य होत नसतें।

१३२७. **गर्वाचें घर खालीं**--अभिमानाचा परिणाम वाईट व्हावयाचाच !

१३२८. **गवयाचें पोर रडलें तरी सुरावरच रडणार**—कांहीं संस्कार आनुवंशिक असतात. परिचित गोष्टी सहजासाहजीं आपणाकडून घडतात !

१३२९. **गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीं तर मोडून खाल्ली**—झाल्यास फायदा होईल, नाहीं तर तोटा तरी खास होणार नाहीं, अशा अर्थी वरील म्हण योजण्यांत येते !

१३३०. **गांठचा एक बाहेरच्या शंभराबरोबर**—जें आपल्या कबजांत पूर्णपणें आहे, तें थोडें असलें तरी त्याची योग्यता ज्यास्ती आहे; आणि जें केवळ अपेक्षित आहे, तें पुष्कळ असलें तरी त्याची योग्यता कमी आहे.

१३३१. **गाड्याबरोबर नळ्याची यात्रा**—दोन परस्परसंलग्न वस्तूंपैकीं एकीची जी स्थिति, तीच निश्चयात्मक दुसरीचीही असते.

१३३२. **गाड्यावर नाव आणि नावेवर गाडा**—जो मनुष्य आज श्रीमंत आहे, आणि विपद्ग्रस्तांचा परामर्श घेतो, तो दैवगतीनें विपन्न दशेस येतो, आणि विपन्न दशेस आला म्हणजे त्याचा परामर्श त्यानें पूर्वी पोशिलेला मनुष्यच श्रीमंत होऊन घेऊं लागतो! संसारांत अशीं चमत्कारिक परिवर्तनें घडतात कीं, गरीबाचा श्रीमंत होतो आणि श्रीमंताचा गरीब होतो!

१३३३. **गाढवांचा गोंधळ, लाथांचा सुकाळ**--मूर्ख लोक मूर्खपणाचींच कृत्यें करितात!

१३३४. **गाढवानें शेत खाल्याचें पाप ना पुण्य.**—हलकटावर, किं० निरुपयोगी माणसावर केलेले उपकार अनाठायीं जातात!

१३३५. **गाढवापुढें वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता**--अरसिकापुढें रसयुक्त भाषण करणें व्यर्थ होतें. "गांवढ्यापुढें" हा पाठ अधिक शुद्ध आहे.

१३३६. **गाढवाला गुळाची चव काय माहीत?**—चांगल्या वस्तूचे गुण, तिच्याशीं परिचित नसणारास कळत नाहींत.

१३३७. **गांव आहे तेथें माहारवाडा आहेच**—समाजांत चांगलीं वाईट माणसें असतातच.

१३३८. **गांव करी तें राव न करी**—जुटीनें होईल तें एकटादुकटा करूं शकणार नाहीं.

१३३९. **गांवचा रांड्या पण घरचा देशपांड्या**—गांवांतल्या लोकांत जो बेवकूब म्हणून गणला जातो, तो आपल्या स्वताच्या घरांत मोठा अधिकार गाजवितो!

१३४०. **गांवचा राजा गांवांत वळी, परगांवीं,** किं० **परदेशीं गाढवें वळी**—जेथें आपला अधिकार चालतो, तेथेंच आपली वडेजावी केली जाते! दुसरीकडे आपणास कोणी पुसत नाहीं!

१३४१. **गांवढ्या गांवांत गाढवी सवाष्ण**—जेथें चांगल्यांचा अभाव असतो, तेथें एकाद्या क्षुल्लक वस्तूसही महत्त्व येतें!

१३४२. **गांवास गेला गांवचा झाला**—तो परगांवाला गेला आणि इकडच्या मित्रमंडळींस विसरून गेला!

१३४३. **गोगलगाय आणि पोटांत पाय**—मनुष्य दिसण्यांत गरीब दिसतो, पण अंतर्यामीं मतलबी असतो!

१३४४. **घटका पाणी पिते, घड्याळ टोले खातें**—वेगळ्या माणसांस त्यांच्या त्यांच्या कर्मानुसार वेगवेगळे सुखदुःखादि भोग प्राप्त होतात.

१३४५. **घरचें झालें थोडें आणि व्याह्यानें धाडलें घोडें**-आधींच कामाची गर्दी असतां दुसऱ्यानें कांहीं काम करावयास सांगितल्यास ही म्हण वापरितात.

१३४६. **घर फिरलें म्हणजे घराचे वांसेही फिरतात**--प्रतिकूळ परिस्थितींत लहानमोठे सर्वच उलट वागूं लागतात.

१३४७. **घर बांधून पाहावें आणि लग्न करून पाहावें**—घर बांधावयाला, किं० लग्न करावयाला, खर्च आपल्या आदमासापेक्षां ज्यास्ती होतोच होतो. घर बांधल्याशिवाय आणि लग्न केल्याशिवाय त्या त्या कामांस किती किती खर्च होतो, हें कळत नाहीं.

१३४८. **घरोघरीं मातीच्याच चुली**—सर्व साधारण स्थिति सर्वत्र एकच.

१३४९. **चढेल तो पडेल आणि पोहेल तो बुडेल**—जो कोणी कांहीं धमकदारीचें काम करावयास प्रवृत्त होईल, त्याला कधीं वेळेनुसार अपयश येईल, आणि तसें अपयश आल्यास त्यांत कांहीं कमीपणा आहे असें नाहीं!

१३५०. **चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा**—"जशास तसें" या न्यायानें वागणें चांगलें. आमचे "म्हणींविषयीं चार शब्द," पान ६५ पहा.

१३५१. **चार दिवस सासुचे आणि चार दिवस सुनेचे**—सासुच्या

वैभवाचे दिवस असतां ती सुनेवर अधिकार गाजविते; पुढें सून मोठी होऊन ती कर्ती सवरती झाली, म्हणजे घरांत तिचा अधिकार चालतो, आणि सासूचें महत्त्व कमी होतें.

१३५२. **चुकला फकीर मशीदींत**--फकीर दिसेनासा झाला असतां तो असणार कोठें ? तो मशीदींतच असणार ! निश्चयात्मक पत्ता सांगतांना वरील म्हण योजितात.

१३५३. **चोरांचीं पावलें चोरास ठाऊक**--चोरांचीं कृत्यें, वर्तनक्रम, लबाड्या, वगैरे चोरांस माहीत असतात.

१३५४. **चोराच्या मनांत चांदणें**.--चोराला अंधेर सोयीचा असतो; कारण, चोरी करून अंधेरांत गुपचुप रीतीनें पळून जाणें शक्य असतें. परंतु चांदण्यांत कोणी आपणास पाहील कीं काय, पकडील कीं काय, अशी त्याला भीति असते, म्हणून चांदणें पडलें कीं काय ? पडेल कीं काय? हे विचार त्याच्या मनांत डवचत असतात. यावरून ह्या म्हणीचा अर्थ असा कीं, ज्या कोणी कांहीं वद कर्म केलेलें असतें, त्याला तें उघडकीस येईल कीं काय अशी सदैव भीति असते. चोराला चांदण्याची भीति वाटते, ह्या गोष्टीचा उल्लेख पुढील आर्येत आहे.

> वाढति सद्गुण तों तों प्रेम करिति लोक पांडवांवरि, तें--।
> चोरासि चांदणेंसें तापचि देतें सुयोधना अरितें ॥
> मोरो० मंत्र भा०, स्कं० १०.

१३५५. **चोराच्या वाटा चोराला ठाऊक**--चोरांचीं वर्तनें, कावे, वगैरे चोरांसच माहीत असतात.

१३५६. **चोराच्या हातची लंगोटी**--चोर आपले कांहीं पदार्थ चोरून घेऊन पळत असतां त्याचा पाठलाग करून त्याला पकडून त्याच्यापासून लंगोटी, ( अल्प किमतीची वस्तु ), जरी हिसकावून घेतां आली, तरी घ्याची.

१३५७. **चोरावर मोर**--एका चोराला लुबाडणारा अधिक लुच्चा दुसरा चोर असणारच !

१३५८. **छडी लागे छमछम आणि विद्या येई घमघम**--शारीरदंड सोसल्यानें विद्याप्राप्ति लवकर होते.

१३५९. **जनीं जनार्दन**—पांचां मुखीं परमेश्वर. लोकांस संमत कार्य केल्यानें यश येतें.

१३६०. **जन्मा आला हेला पाणी वाहतां मेला**—रेडा जन्मास येऊन करणार काय? पाणीच वाहणार. पाणी वाहण्याशिवाय त्याच्यानें दुसरें काय व्हावयाचें? त्याप्रमाणें कर्तृत्वशून्य माणसाच्या हातून हलकीं सलकीं, किंवा हमालीचींच, कामें व्हावयाचीं!

१३६१. **जशी देणावळ तशी धुणावळ**—जसा मोबदला द्यावा, तसें काम व्हावयाचें!

१३६२. **जळत**, किं० **जळतें, घर भाड्यानें कोण घेतो?**—एकादी वस्तु आपलें नुकसान करील असें स्पष्ट दिसत असतां ती स्वीकारावयाला कोण तयार होईल?

१३६३. **जळांत राहून माशांशीं वैर**—जेथें आपणांस वागावयाचें, तेथें सलोख्यानें वागावें, द्वेष संपादन करूं नये.

१३६४. **जाईल तेथें हत्ती, नाहीं तेथें मुंगीसुद्धां जाणार नाहीं**—कित्येक बाबतींत सढळपणा आणि कित्येक बाबतींत फाजील चिकित्सा व घासाघीस घातली जाते.

१३६५. **जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे**—एकादी विशिष्ट स्थिति भोगिली, किं० अनुभाविली, म्हणजे तिच्या संबंधीं सर्व बाजूंची माहिती, अडचणी, वगैरे समजून येतात.

१३६६. **जित्याची खोड मेल्यावांचून जात नाहीं**—मनुष्याला जी खोडी लागलेली असेल, ती तो जिवंत आहे तोंपर्यंत राहावयाचीच!

१३६७. **जी खोड बाळा ती जन्मकाळा**—लहानपणीं ज्या संवयी लागतात, त्या जन्मभर टिकतात.

२३६८. **जेथें भरे डेरा तोच गांव बरा**—ज्या गांवांत आपला चरितार्थ चालेल, तोच गांव उत्तम.

१३६९. **ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी**—एका गांवांतील लोक एकमेकांना चांगले ओळखीत असतात. बोरींना कांटे

असतात, तसे बाभळींनाही असतात. "आम्ही गुळगुळीत आहों," असा बोरींचा डौल बाभळींपाशीं टिकावयाचा नाहीं, आणि बाभळींचा डौल बोरींपाशीं टिकावयाचा नाहीं. मनुष्यें दुसऱ्याचीं वर्मेकर्मे काढतांना ही म्हण योजतात. उ० तूं माझ्यापुढें ऐट कशाला मारतोस ? तुझीं सर्व काळींवेरीं मला ठाऊक आहेत! ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी!

१३७०. **ज्याच्या मणगटांत जोर तो बळी**--द्रव्याचें, अधिकाराचें, किंवा माणसाचें बळ, हें मणगटाच्या बळाहून कमी प्रतीचें होय!

१३७१. **ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी**--जो कोणी आपणांस खाऊं घालीत असेल, त्याच्या नांवानें टाळ्या वाजवाव्या. अन्न वगैरे देऊन जो आपला चरितार्थ चालवीत आहे, त्याची स्तुति करावी, किं० त्याची कीर्ति पसरीत असावें. ज्याचे आपणावर उपकार झाले असतील, त्याच्याशीं बेइमान, किं० निमकहराम, होऊं नये.

१३७२. **ज्याचें करावें बरें तो म्हणतो माझेंच खरें**--ज्याचें एकादा माणूस कल्याण करीत असतो, तो त्याच्या माथीं तो दोष लावून त्याचें करणें बरोबर नाहीं, आपलेंच म्हणणें, किं० वर्तन, बरोबर आहे, असें म्हणत असतो. ही म्हण कृतघ्नपणाची द्योतक आहे.

१३७३. **ज्याचें कुढें त्याच्या पुढें**--ज्याचीं कर्में त्याच्या बरोबर असतात. तीं त्यास भोगल्यावांचून गति नाहीं.

१३७४. **ज्याचें पोट दुखेल तो ओंवा मागेल**--ज्यास जरूर, तो यत्न करील. ज्याला कांहीं अडचण येईल, तो तिच्या निवारणार्थ उपाय योजील.

१३७५. **जशी कुडी तशी पुडी**--देहाच्या मानानें आहार असावयाचा.

१३७६. **ज्याचें मन त्याला ग्वाही देतें**--आपण पाप केलें आहे किंवा नाहीं, हें ज्याचें त्याचें मन सांगत असतें.

१३७७. **ज्याच्या हातीं ससा तो पारधी**--ज्याणें खरोखरी सशाची पारध केली असते, त्याच्या पराक्रमाकडे लोकांचें दुर्लक्ष्य होतें, आणि ज्याचे हातीं तो ससा असतो, त्यालाच पारध केल्याचें श्रेय देण्यांत येतें!

१३७८. **झाकली मूठ सव्वा लाखाची**—आपलें ज्ञान, संपत्ति, वगैरेंच्या-बद्दल आपण मुळींच बोललों नाहीं, तर तें आपलें ज्ञान, संपत्ति, वगैरे, हीं आहेत त्याच्यापेक्षा अधिक वाटतील. आपण बढाई मारूं लागल्यास तीं खरोखरीं आहेत त्याच्यापेक्षां कमी आहेत असें लोकांस वाटूं लागेल. आपण होऊन आपली स्थिति उघडी करून दाखविणें बरोबर नाहीं.

१३७९. **टांकीचे घाव सोसल्यावांचून देवपण येत नाहीं**—दगडा-वर टांकीचे घाव मारून मारून त्याच्यापासून देवाची मूर्ति घडविलेली असते. देवत्व प्राप्त व्हावयाला टांकीचे घाव सोसावे लागतात. त्याप्रमाणें अपरंपार कष्ट सोसावे तेव्हां वैभवाची स्थिति प्राप्त होते.

१३८०. **टिटवी देखील समुद्र आटविते**—क्षुद्र मनुष्य देखील प्रसंग-विशेषीं दीर्घ प्रयत्नानें मोठें कृत्य करतो.

१३८१. **डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर**—एके ठिकाणीं चुकी, किं० दोष, आणि दुसऱ्या ठिकाणीं दुरस्ती, किं० तजवीज, केल्यास तें करणें हास्यस्पद होतें.

१३८२. **ढवळ्या शेजारीं पोवळा बांधला, वाण नाहीं पण गुण लागला**—ढवळ्या बैलाच्या शेजारीं पोवळा बैल बांधला असतां ढवळ्याचे चांगले गुण पोवळ्यास न लागतां त्याचे वाईट गुण मात्र लागतात. चांगल्या माणसाच्या सहवासांत वाईट माणूस राहिला असतां चांगल्याचे चांगले गुण वाइटास न लागतां चांगल्याच्या अंगीं जो एकादा दुसरा वाईट गुण असेल, तेवढा मात्र तो वाईट माणूस चटदिशी उचलतो.

१३८३. **तळें राखी तो पाणी चाखी**—ज्याच्याकडे कांहीं वस्तु रक्षणा-साठीं ठेविलेली असते, त्या वस्तुचा तो स्वतः उपयोग करून घेतोच.

१३८४. **ताकाला जावें आणि भांडें कां लपवावें?**—दुसऱ्याजवळ भिक्षा मागावयाचा कमीपणा पथकरल्यावर मग तें भिक्षा मागणें छपवून ठेवण्याचें काय कारण? एवीतेवी कमीपणा पथकरला, मग तो कमी-पणा एकाच्या नजरेस आला काय आणि दहांच्या नजरेस आला काय एकच!

१३८५. **ताटांत सांडलें काय आणि वाटींत सांडलें काय एकच**— जेथें दोन माणसांचें हिताहित एकच असतें, तेथें एकादा लाभ ह्याला झाला काय आणि त्याला झाला काय एकच !

१३८६. **ता म्हणतां ताकभात समजावा**—थोडेंसें समजतांच एकंदर गूढ समजावें. [ मागें ले० २८९ पहा. ]

१३८७. **तीथ आहे तर भट नाहीं, भट आहे तर तीथ नाहीं**— कांहीं साधनें सिद्ध असलीं व दुसऱ्या कांहीं साधनांचा अभाव असला, म्हणजे ही म्हण योजतात. जेथें एकादें कार्य व्हावयाला दोन गोष्टी जुळाव्या लागतात, तेथें एक गोष्ट विद्यमान असल्यास तें कार्य होणें शक्य नाहीं. [ शुभसमय आणि उपाध्या ह्या दोहोंची जुळणी झाल्याशिवाय लग्न वगैरेंचा विधि होऊं शकत नाहीं. ]

१३८८. **तुम्ही आम्ही एक, कंठाळीला मेख**—बोलण्यांत मैत्रीचा आविर्भाव करणें, परंतु मित्राला कांहीं पदार्थ देण्याची वेळ आली असतां मागें हटणें, अशा प्रकारच्या बाह्यात्कारी स्नेहाचा प्रकार ह्या म्हणींत दर्शविला आहे.

१३८९. **तुरुत दान महापुण्य**—"तुरुत" म्ह० त्वरित, त्याच वेळीं केलेलें. योग्य वेळीं, म्ह० जेव्हांच्या तेव्हां दान, किं० धर्म, करण्यांतच मोठें पुण्य असतें. योग्य वेळ निघून गेल्यावर जें देणें तें फुकट.

१३९०. **तेरड्याचा रंग तीन दिवस**—कमजोर, किं० गरीब, माणसाचा भपका अल्पकाळच टिकतो !

१३९१. **तेल गेलें, तूप गेलें, हातीं धुपाटणें आलें**—हातचें गेलें, इच्छिलेलें गेलें, व पूर्ण फसगत झाली. [ आमचे "मराठी म्हणींविषयीं चार शब्द," पान ३२ पहा. ]

१३९२. **तो पाप देणार नाहीं तर पुण्य कोठून देणार ?**—तो इतका अदत्त आहे कीं तो अगदीं टाकाऊ पदार्थ, (पाप), देखील द्यावयाला कबूल होणार नाहीं, मग मौल्यवान् वस्तु तो कसचा देणार ? तो अगदीं कृपण आहे.

१३९३. **थेंबें थेंबें तळें साचे**—एक एक थेंब जमून जमून तळ्याच्या इतका पाण्याचा साठा होतो. पैपैनें पैसे वांचविले, तरी कालांतरानें मोठी रक्कम शिलकीस पडते.

१३९४. **दगडाचा दोर होत नाहीं**--भलत्याच वस्तूपासून एकादी वस्तु निष्पन्न करण्याची आशा बाळगणें व्यर्थ आहे!

१३९५. **दगडाचें नांव धोंडा, आणि धोंड्याचें नांव दगड**—ही गोष्ट स्पष्ट आहे! तिच्याबद्दल वाटाघाट करीत बसण्याचें कारण नाहीं! दगड म्हणा किंवा धोंडा म्हणा, एकच.

१३९६. **दगडापेक्षा वीट मऊ**--तिच्यापेक्षां ही गोष्ट कांहीं अंशीं बरी. त्यांतल्या त्यांत हें बरें.

१३९७. **दसकी लकडी एकका बोजा**—एकाएका माणसानें एकएक लाकूड जरी दिलें, तरी तीं लाकडें जमतां जमतां इतकीं जमतात, कीं तें एका माणसाचें ओझें होतें. सर्वांनीं जरी थोडा थोडा हातभार लावला, तरी एक मोठें कार्य होऊं शकतें.

१३.९८ **दांड्यानें पाणी तोडलें म्हणून निराळें होत नाहीं**—दृढ व खरी मैत्री लोकांनीं कलागती लावून देण्याचा प्रयत्न केल्यानें भग्न होत नाहीं.

१३९९. **दांत आहेत तर चणे नाहींत, आणि चणे आहेत तर दांत नाहींत**—पूर्ण सुदैव नाहीं. कांहीं तरी कमीपणा आहेच.

१४००. **दांत कोरून कोठें पोट भरत असतें?**—भलत्याच कामीं चिक्कूपणा करून कसें चालेल? मोठ्या कार्यास लहान साधन पुरत नसतें!

१४०१. **दाढीस वेगळें आणि डोईस वेगळें कोण देतो?**—मिळावयाचें तितकें मिळाल्यावरही जर कोणी मनुष्य कांहीं तरी सबबीवर ज्यास्ती मागूं लागला तर त्याला कोण देणार?

१४०२. **दाम करी काम आणि बिबी करी सलाम**--पैशानें सर्व कामें साध्य होतात, एकाद्याजवळ पैसा असला तरच बिबी, (त्याची स्त्री), त्याच्याशीं नमून राहील.

१४०३. **दिलमे चंगा तो काथवटमे गंगा**—अंतःकरण प्रसन्न असल्यास पवित्र गंगा आपणाजवळ असल्याप्रमाणेंच होय !

१४०४. **दिवस बुडाला मजूर उडाला**—टंगळ मंगळ करून जेमतेम कार्य करणाराविषयीं वरील म्हण योजितात.

१४०५. **दिव्याखालीं अंधार**—दिवा लोकांना प्रकाश देतो, पण त्याच्या स्वताच्या अंगाखालीं अंधेरच असतो ! मोठा, प्रतिष्टित, नामांकित, मनुष्य असला, तरी खुद्द त्याच्या अंगीं कांहीं तरी दुर्गुण असतात, त्यांची त्याला दादही नसते.

१४०६. **दुधानें तोंड भाजलें तो ताक सुद्धां फुंकून पितो**—एकदा एकाद्या बाबतींत कांहीं अद्दल घडली, म्हणजे मनुष्य प्रत्येक बाबतींत सावधगिरी बाळगितो, व ती सावधगिरी कधीं कधीं निष्कारण देखील असते !

१४०७. **दुभत्या गाईच्या लाथा गोड**—दूध देणारी जी गाय, ( म्ह० जी भाकड नव्हे ती ), तिच्या लाथा मनुष्य सोसतो. ज्याच्यापासून आपणाला कांहीं लाभ करून घ्यावयाचा असतो, त्याणें आपला कितीही तिरस्कार केला, तरी तो आपण मुकाट्यानें सोसतों.

१४०८. **दुरून डोंगर साजरे**—दुरून डोंगर सुंदर दिसतात, पण जवळ गेलें असतां त्याचें भयंकर स्वरूप कळून येतें. [ " जवळ जातां कांटेकुटे " ह्या शब्दांची जोड कधीं कधीं ह्या म्हणीस देतात. ]

१४०९. **दुसऱ्याच्या डोळ्यांत भसकिनी बोट शिरतें**—दुसऱ्याच्या दोषांवर टीका करावयास मनुष्य कचरत नाहीं.

१४१०. **दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें, पण स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं**—दुसऱ्याची क्षुल्लकही चूक दिसते, पण स्वतांचा मोठा दोष दिसत नाहीं !

१४११. **दृष्टी आड सृष्टी**—जें आपल्या देखत होणार नाहीं, त्याला आपण जबाबदार नाहीं, व त्याचा प्रतिकार करणें कठिण आहे.

१४१२. **देश तसा वेश**—ज्या मंडळींत आपण वागतों, त्यांच्या चालीरीती आपण स्वीकारल्या पाहिजेत; न स्वीकारल्यास आपण उपहासास, किं० द्वेषास, पात्र होतों !

१४१३. **दैव देतें आणि कर्म नेतें**—दैव अनुकूल असल्यास आपणास एकादी चांगली वस्तु प्राप्त होते, परंतु कर्म अनुकूल नसल्यास ती आपणाजवळ टिकत नाहीं, किं० फार वेळ राहात नाहीं.

१४१४. **दोन डोळे शेजारीं, भेट नाहीं संसारीं**—जवळ जवळ राहात असून ज्यांच्या गांठी क्वचित् पडतात, अशीं माणसें असूं शकतात !

१४१५. **द्यावें तसें घ्यावें, करावें तसें भोगावें**—ज्या प्रकारचें आपण लोकांस देऊं, त्या प्रकारचेंच लोक आपणास देतील. आपण जसें कर्म करूं तसें फळ आपल्या भोगास येईल.

१४१६. **दोही घरचा पाहुणा उपाशी**—दोन आधारांवर अवलंबून राहाणारा मनुष्य फशीं पडतो !

१४१७. **धर्म करतां कर्म उभें राहतें**—दुसऱ्यावर उपकार म्हणून करा-वयाला जावें, तों आपल्यावरच कांहीं तरी संकट ओढवतें !

१४१८. **धर्माचे गायी आणि दांत कांगे नाहीं ?**—धर्मकृत्यानिमित्त, किं० फुकट, दिलेली जी गाय, तिला दांत आहेत किंवा नाहींत, ही चिकित्सा करीत बसणें मूर्खपणाचें आहे. कारण जी गाय निरुपयोगी, तीच बहुत-करून धर्मार्थ, किं० फुकट, देतात. त्याप्रमाणें दुसऱ्यानें आपणावर उप-कार करण्याच्या बुद्धीनें आपलें कांहीं काम केलें, तर तें आपल्या इच्छे-इतकें चांगलें केलें नाहीं म्हणून त्याच्यावर रागावणें योग्य नाहीं. [ जनावरांचें वय वगैरे दांतांवरून ठरवितात, म्हणून " दांत पाहाणें," म्हणजे परीक्षा करणें. ]

१४१९. **नकटीच्या लग्नाला सत्राशें विघ्नें**—कार्य आरंभींच दुष्कर असलें, तर तें शेवटास जातां जातां फार अडथळे येतात.

१४२०. **नखानें काम होतें तेथें कुऱ्हाड कशाला ?**—जेथें क्षुल्लक साधनांनीं, किं० अल्प शक्तीनें, काम होण्याजोगें आहे, तेथें मोठें साधन, किं० पुष्कळ शक्ति, कशाला योजावी ? असाच विचार पुढील आर्याधांत आहे.

नखहि नको ज्या कार्या, त्या काढावा कशास करवाल ? ॥

मोरोपंत.

१४२१. **नवरा मरो कीं नवरी मरो, उपाध्यायाला दक्षिणेशीं प्रयोजन**—वधू आणि वर यांचें लग्न व्हावें आणि आपणास दक्षिणा मिळावी, येवढेंच काय तें उपाध्यायाचें पाहाणें असतें. लग्न झाल्यावर त्या नवरानवरींचें कांहीं झालें तरी उपाध्यायाला त्याची काय पर्वा असावयाची?

१४२२. **नाक धरलें म्हणजे तोंड उघडतें**—एकाद्याला पेंचांत आड-कावल्याशिवाय तो आपल्या म्हणण्यास कबूल होत नाहीं. [ आपला श्वासोच्छ्वास नाकानें चालतो तसा तोंडानेंही चालूं शकतो, आणि नाक आणि तोंड ह्या दोहोंपैकीं एक तरी उघडें असावें लागतें. ह्यासाठीं एकाद्याचें आपण नाक दाबलें कीं त्याला तोंड उघडावेंच लागतें. ]

१४२३. **नावडतीचें मीठ आळणी**—नावडत्या माणसानें कोणतीही गोष्ट, कितीही चांगली केली, तरी ती वाईटच दिसते. नावडत्या स्त्रीचें प्रत्यक्ष मीठ देखील आळणी लागतें!

१४२४. **नासलीं मिरीं जोंधळ्याला हार जात नाहींत**—समर्थ मनुष्य कितीही खालावला, तरी तो नादान आणि कर्तृत्वशून्य माणसाहून अधिक सामर्थ्यवान् असावयाचाच!

१४२५. **पडलेलें शेण माती घेऊन उठतें**—शेण जमिनीवर पडलें आणि तें आपण तेथून उचलून दुसरीकडे फेकून दिलें, म्हणजे त्या शेणाबरोबर जमिनीवरील कांहीं तरी माती जातेच जाते. जमीन जरी चांगली चोपलेली व स्वच्छ असली, तरी शेणाबरोबर कांहीं तरी मातीचे कण जातातच. त्याप्रमाणें चांगल्या मनुष्यावर कांहीं टपका आला, आणि त्या टपक्याचें जरी त्याणें सर्वांशीं निरसन केलें, तरी त्याची थोडी तरी बदनामी होतेच होते!

१४२६. **परदुःख शीतल**—दुसऱ्याच्या दुःखाची खरी कल्पना लोकांस होत नाहीं आणि म्हणून तें दुःख असेल त्याहून कमी तीव्र आहे असें लोकांस वाटतें!

१४२७. **पळणारास एक वाट, शोधणारास बारा वाटा**—लबाडी करणें सोपें, पण ती हुडकून काढणें कठिण असतें.

१४२८. **पळसास पानें तीनच**--कोठेंही गेलें तरी मनुष्यस्वभाव सारखाच असावयाचा; कोणतीही स्थिति घेतली, तरी तींत सुखदुःखें सारखींच असतात.

१४२९. **पांचा मुखीं परमेश्वर**—पांच माणसें जें बोलतील, तें खरें. पांच म्ह० अनेक लोक. पुष्कळ लोक जें बोलतात, तें देवाचेंच बोलणें धरून चालावयाला कांहीं हरकत नाहीं.

१४३०. **पांची बोटें सारखीं नसतात**—सर्व मनुष्यें सारख्या स्वभावाचीं नसतात. समानार्थक म्हण:—"मूर्ति तितक्या प्रकृति."

१४३१. **पालथ्या घागरीवर पाणी**—घागर पालथी असतां तिच्यावर घातलेलें पाणी फुकट जातें, तसा हट्टी माणसास केलेला बोध फुकट जातो।

१४३२. **पाण्यांत काठी मारली तर कां पाणी दोन जागा होतें?**--खरी दृढ मैत्री किरकोळ भांडणानें भग्न होत नाहीं, आणि लोकांनीं कलागती लावण्याचा प्रयत्न केला तर तो निष्फल होतो.

१४३३. **पायींची वहाण पायींच बरी**—मनुष्याला त्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें वागवावें, फाजील महत्त्व देऊं नये.

१४३४. **पिंडीं तें ब्रम्हांडीं**—जें आपल्या ठायीं आहे, तेंच सर्व जगांत आहे. जगाचें स्वरूप ओळखावयाचें असल्यास आपलें स्वरूप ओळखावें म्हणजे बस झालें.

१४३५. **पी हळद आणि हो गोरी**—हळद पिऊन कोणीही मनुष्य गोरा होत नाहीं, किं० होतो असें गृहीत घेतलें, तरी हळद पिण्याबरोबर तो लागलाच गोरा व्हावयाचा नाहीं. उतावळेपणानें हावें तें साधन घेऊन आपला मनोरथ सफल करून घेण्याच्या मूर्ख प्रयत्नासंबंधानें ही म्हण योजतात.

१४३६. **पुढच्यास ठेच मागला शहाणा**--एकाला अडचण आलेली पाहून इतर लोक सावध होतात.

१४३७. **पुराणांतील वांगीं पुराणांत**—जें पुराणांत वाचिलें, किं० जें पुराणिकानें सांगितलें, तें आचरणांत कोण पाळणार? उपदेश जागच्या

जागींच राहतो, आणि वर्तन मनुष्याच्या लहरीप्रमाणें घडत असतें ! [ आमचे "मराठी म्हणींविषयीं चार शब्द," पान ३० पहा. ]

१४३८. **पैसा दक्षिणा आणि लक्ष प्रदक्षिणा**--भटाला द्यावयाचा एक पैसा, आणि त्यानें आपल्यासाठीं देवाला लाख प्रदक्षिणा घालाव्या अशी अपेक्षा करावयाची, ह्या मूर्खपणासंबंधानें ही म्हण योजतात.

१४३९. **पोटांत एक आणि ओठांत एक**--लबाड माणसांचे विचार वेगळे असतात, आणि बोलणें वेगळें असतें. म्हणजे त्यांच्या खऱ्या विचारांत आणि बोलून दाखविलेल्या विचारांत तफावत असते.

१४४०. **फार झालें हसूं आलें**--कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाल्यास ती अंगवळणीं पडून कांहीं वाटेनासें होतें.

१४४१. **फुटका डोळा काजळानें साजरा करावा**—आपल्या अंगचा दोष युक्तीप्रयुक्तीनें झाकावा.

१४४२. **बडा घर पोकळ वांसा**—इमारत मोठी थोरली असली तरी तिचे वांसे पोकळ असावयाचे. त्याप्रमाणें एकादें कुटुंब दिसण्यांत श्रीमंत दिसलें, तरी खरोखरी तें श्रीमंत असतें असें नव्हे. दिसण्यांत श्रीमंत पण खरोखरी गरीब, असा प्रकार असावयाचा.

१४४३. **बळी तो कान पिळी**—ज्याच्या अंगीं पैशाचें, अधिकाराचें, वशील्याचें, किंवा पहिलवानगिरीचें, सामर्थ्य असतें, तो असमर्थाचा कान पिळतो, म्ह० त्याला छळतो, किं० त्याच्यावर आपला अंमल बसवितो.

१४४४. **बाजारांत तुरी, भट भटणीला मारी**—बाजारांतून तुरी विकत आणावयाच्या अगोदरच जर त्या तुरींच्या संबंधानें एकादा भट आपल्या बायकोशीं वादविवाद करून तिला मारूं लागला, तर तें जसें हास्यास्पद होतें, त्याप्रमाणें जी गोष्ट अझून घडली नाहीं, किं० घडणें संभवनीय नाहीं, तिच्यासंबंधानें वादविवाद करून एकमेकांस खिजविण्यांत काय अर्थ आहे ?

१४४५. **बाप तसा बेटा**--जे बापाच्या अंगचे गुण, तेच मुलाच्या अंगीं असावयाचे !

१४४६. **बाप दाखीव, नाहीं तर श्राद्ध कर**—मृत बापाचें श्राद्ध करणें, हें मुलाचें कर्तव्य आहे. तुझा बाप जिवंत असला तर दाखीव, नसला, तर श्राद्ध करावयास तयार हो! तुझें म्हणणें खरें असें सिद्ध करून दाखीव, किंवा माझें म्हणणें खरें म्हणून तें पथकर तरी.

१४४७. **बापाला बाप म्हणेना, मग चुलत्याला काका कोण म्हणेल?**—जवळच्या नातलगाला जो ओळखीत नाहीं, तो दूरच्याला काय ओळखणार? अत्यंत संमाननीय मनुष्याला जो मान देत नाहीं, तो साधारणपणें संमाननीय मनुष्याला मान देणार नाहीं हें उघडच आहे!

बापासि बाप न म्हणे, ऐशाला काय होय आजोबा? ॥

मोरोपंत.

१४४८. **बाबावाक्यं प्रमाणम्**—आमचे बाबा असें म्हणतात म्हणून हें असेंच! ज्याला स्वतःचा विचार म्हणून कांहींच नाहीं, आणि जो दुसऱ्याच्या विचाराला फाजील महत्त्व देतो, त्याच्या उपहासार्थ ह्या म्हणीचा उपयोग होतो.

१४४९. **बिगारीच्या घोड्याला तरवडाचा फोक**—भाड्याच्या घोड्याला मारावयाला तरवडाचा फोक घेतात. स्वतःच्या मालकीच्या घोड्याला मारावयाला कोणी असला फोक घेत नाहींत. परक्याच्या माणसाशीं लोक क्रूरपणा करतात, तसा स्वतःच्या माणसाशीं करीत नाहींत. तरवडाच्या झाडाचा फोक (म्हणजे फांदी) बारीक आणि सरळ असून भारी लवचिक असतो, म्हणून त्याचा मार चांगला लागतो.

१४५०. **बुगड्या गेल्या पण भोंकें राहिलीं**—उत्तम स्थिति गेली; ती स्थिति होती, असें सिद्ध करणारीं चिन्हें मात्र राहिलीं.

१४५१. **बुडत्याचा पाय खोलांत**—अवनति होऊं लागली म्हणजे ती हजार तऱ्हांनीं होते.

१४५२. **भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी**—मागऱ्या मनुष्याला कांहीं वस्तु दिली असतां तेवढ्यानें त्याची तृप्ति न होतां तो ज्यास्ती ज्यास्तीच मागत सुटतो!

१४५३. **भरल्या गाड्यास सूप जड नाहीं**!—मोठ्या कामांत एकादें बारीक काम सहज होऊन जातें।

१४५४. **भांडणाचें तोंड काळें**--भांडणाचा परिणाम लाजिरवाणा असतो.

१४५५. **भिकेची हंडी शिंक्यास चढत नाहीं**--लहान साधनानें मोठें कार्य होत नाहीं. भिक्षा मागून आणलेल्या पदार्थाला बरकत नसते. दुसऱ्यावर अवलंबून असणाऱ्याचे हातून मोठें कार्य काय होणार?

१४५६. **भित्याच्या पाटीस ब्रह्मराक्षस**—भिणारा माणूस आपणावर विघ्नें ओढून घेतो.

१४५७. **भीड भिकेची वहीण**--भलतीच भीड धरल्यास नुकसान होतें। [ मागें लें० ४३६, ६ पहा. ]

१४५८. **भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा**—सडकून भूक लागली, म्हणजे कोंड्यासारखा निःसत्व पदार्थही अति रुचकर लागतो; तसेंच झोंप येण्याजोगी शरीराची व मनाची स्थिति असली, म्हणजे धोंड्यावरही मऊ गादीवर निजल्यापेक्षां चांगली झोंप लागते.

१४५९. **मऊ सांपडलें म्हणून कोपरानें खणूं नये**--सवलतीचा दुरुपयोग करूं नये.

१४६०. **मन जाणे पापा**—आपण पाप केलें आहे कीं नाहीं, हें ज्याचें मन त्याला सांगत असतें.

१४६१. **मन राजा मन प्रजा**—हुकूम करणारें आपलें मन, आणि तो हुकूम पाळणारेंही आपलें मनच असतें. म्हणजे बरें वाईट करणें हें आपल्या इच्छेवरच असतें।

१४६२. **मनापरता ग्वाही त्रिभुवनांत नाहीं**--मनासारखा खरें सांगणारा साक्षीदार साऱ्या दुनियेंत नाहीं.

१४६३. **मनाची नाहीं पण जनाची तरी लाज बाळगावी**—मनाला जरी पाप करावयाची कचर वाटली नाहीं, तरी लोकांना भिऊन तरी पापापासून दूर राहावें!

**१४६४. मनांत मांडे पदरांत धोंडे**—
(१) भव्य मनोराज्य आणि अखेरीस निराशा.
(२) स्थिति दारिद्र्याची आणि बेत मात्र लांब लांब.

**१४६५. मनास मानेल तोच सौदा**—आपणाला आवडत असेल तोच सौदा करावा; सौद्याबद्दल लोकांनीं नापसंती दर्शविली,तरी तिकडे लक्ष्य देऊं नये.

**१४६६. मनीं असे तें स्वप्नीं दिसे**—ज्या गोष्टीचा आपणास निदिध्यास लागलेला असतो, ती गोष्ट स्वप्नांत देखील दिसते.

**१४६७. मनीं वसे ते स्वप्नीं दिसे**—ज्याचा निधिध्यास लागलेला असतो, त्या गोष्टी स्वप्नांतही दिसतात.

**१४६८. मस्करीची होते कुस्करी**—थट्टेचा परिणाम कित्येक वेळां भयंकर होतो.

थट्टा योग्य नसे, जरी क्षणभरी केली मनोरंजना
(एक अर्वाचीन कवि.)

**१४६९. मळमळीत सौभाग्यापेक्षां झळझळीत वैधव्य बरें**—प्रेम न करणारा पति असून जें सौभाग्य, त्याच्यापेक्षा पति मरून वैधव्याची स्थिति आलेली बरी!

**१४७०. मागून पुढून बापच नवरा!**—मुलाच्या लग्नासाठीं वधू पाहाण्याचें सोडून आपलपोट्या माणूस स्वतासाठींच वधू पाहातो.

**१४७१. मांजराचे गळ्यांत घांट कोणीं बांधावी?**—दुर्घट काम करावयास कोणी सरसावत नाहीं. [इसापनीतींतील एका प्रसिद्ध गोष्टीवरून ही म्हण निघाली आहे.]

**१४७२. मातीचे कुले लावल्यानें लागत नाहींत**—परक्याला आपला असें नुसतें म्हणून तो आपला होत नाहीं; खरें प्रेम असावें लागतें, तेव्हां तो आपलासा होतो.

**१४७३. मानला तर देव, नाहीं तर धोंडा**—धोंड्याची मूर्ति घडवून तिच्या ठायीं विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा करून तिला देव मानतात आणि त्या देवाची पूजाअर्चा वगैरे करतात. परंतु त्या मूर्तीला धोंडा म्हणणें

किंवा देव म्हणणें हें आपल्या इच्छेवर असतें. त्याप्रमाणें एकाद्या मोठ्या माणसाला आपण मान दिला तर तो मोठा; मान न देतां त्याला यःकश्चिताप्रमाणें लेखणें हेंही आपल्याच हातीं असतें. मी मोठा आहे, मला लोकांनीं मान दिला पाहिजे, व नमस्कार केला पाहिजे, असा कोणीं आग्रह धरला तर तो हास्यास्पद होईल.

१४७४. **मान सांगावा जना आणि अपमान सांगावा मना**--आपला संमान झाला असेल तो लोकांस सांगावा, आणि अपमान झाला असेल त्याची वाच्यता करूं नये, म्ह० तो अपमान मनांतल्या मनांतच ठेवावा.

१४७५. **मारत्याचा हात धरवतो, पण बोलणाराचें तोंड धरवत नाहीं**--दांडग्या माणसास आवरणें सोपें, पण वडवड्या माणसास गप्प करणें कठिण !

१४७६. **मुंगीला मुताचा पूर**--मुताचें पाणी अगदीं थोडें असतें, परंतु तें मुंगीला वाहवून नेण्याला पुरें इतकें असतें. जो पैशानें, शक्तीनें, किंवा सामर्थ्यानें, कमी दर्जाचा माणूस आहे, त्याला थोडकासा जरी खर्च आला, किं० आजार आला, किं० धोका, गोता, वगैरे आला, तरी तो त्याला असह्य होतो.

१४७७. **मुंगी होऊन साखर खावी, हत्ती होऊन लाकडें फोडूं नयेत**--नम्रता धारण करून आपला फायदा करून घ्यावा. ताठ्यानें वागून दुःखें भोगीत बसूं नये.

[ मुंगी लहान असून तिला साखर खावयाला मिळते; हत्ती मोठा आणि बळकट आहे म्हणून त्याला लाकडें फोडावीं लागतात, म्ह० ऊस खाण्याची पाळी येते. ह्या वस्तुस्थितीवरून ही म्हण उत्पन्न झाली आहे. ]

१४७८. **मुलाचे ( पोराचे ) पाय पाळण्यांत दिसतात**—मुलगा पुढें कसा निघेल हें त्याच्या लहानपणींच कळतें.

१४७९. **मूर्ति तितक्या प्रकृति**—निरनिराळीं माणसें निरनिराळ्या स्वभावाचीं असतात.

१४८०. **मेलें मढें आगीला भीत नाहीं**—लोचट, किं० निगरगट्ट, मनुष्याला कितीही बोललें, तरी त्याला शरम वाटत नाहीं. ज्याची एकदा आबरू गेली, त्याला जास्ती बेआबरूची भीति वाटत नाहीं.

१४८१. **मोर नाचतो म्हणून लांडोरही नाचते**—मोरास नाचतांना पाहून त्याची स्त्री नाचते, परंतु तिला मोरासारखा पिसारा नसल्या-कारणानें तिचें नाचणें हास्यास्पद होतें. त्याप्रमाणें एकानें कांहीं केलें, आणि तें त्यास शोभलें, म्हणून दुसऱ्यानें तसें केलें असतां तें शोभेल असें नाहीं. तें कदाचित् हास्यास्पद होईल.

१४८२. **म्हातारीनें कोंबडें झाकून ठेवलें, म्हणून उजेडावयाचें राहात नाहीं**—जी गोष्ट व्हावयाचीच, ती क्षुल्लक प्रतिकारानें थांबत नाहीं. मत्सरी लोकांनीं गुणवान् मनुष्याला कोण्याकोपऱ्यांत ठेवण्याचा प्रयत्न केला, किं० त्याची गुणवत्ता प्रसिद्ध न होऊं देण्याचा प्रयत्न केला, तरी तो पुढें येतोच, आणि आपल्या गुणवत्तेनें लोकांस दिपवून टाकतोच!

१४८३. **येरे माझ्या मागल्या, कण्या भाकरी चांगल्या**—दुसऱ्यानें केलेला उपदेश, लावून दिलेल्या सोयी; वगैरेंकडे मूर्ख मनुष्य दुर्लक्ष्य करतो, आणि पूर्वीच्या विपन्न स्थितीकडे ओढ घेतो, तेव्हां त्याचा तिरस्कार करतांना ही म्हण योजतात. ह्या अर्थाचा पुढील अभंग पहाः—

आधीं होता वाघ्या । दैव-योगें झाला पाग्या ॥ १ ॥
त्याचा येळकोट राहीना । मूळ-स्वभाव जाईना ॥ २ ॥ इत्यादि.

तुकाराम.

१४८४. **राजा बोले दळ हाले, काजी बोले दाढी हाले**—राजानें हुकुम देतांच सर्व सैन्य त्याच्या हुकूमाप्रमाणें चालतें, परंतु काजीनें हुकूम दिला, तर तो कोण ऐकणार? हुकूम देतांना त्याची दाढी हालेल हाच काय तो परिणाम होणार! समर्थाच्या शब्दाला मान मिळतो; क्षुल्लक माणसाच्या शब्दाला मिळत नाहीं!

१४८५. **राजाला दिवाळी काय माहीत?**—ज्याच्या घरीं नेहमींच उत्सव, त्याला उत्सवाचें महत्त्व वाटत नसतें!

१४८६. **रिकामा न्हावी भिंतीला तुंबड्या लावी**—अंगाला तुंबडी लावून रक्त काढणें, हें न्हाव्यांचें काम. न्हाव्याला कांहीं काम नसलें, म्हणजे तो भिंतीला तुंबड्या लावीत बसतो, म्हणजे कांहीं तरी भलत्या गोष्टी करीत बसतो. कोणी मनुष्य रिकामा असल्यामुळें जर कांहीं खोड्या करीत बसला, तर त्याच्यासंबंधानें ही म्हण योजतात.

१४८७. **लकडीवांचून मकडी वटणीस येत नाहीं**—माकडाच्या चेष्टा, किं० खोडकरपणाचीं कृत्यें, बंद करावयाला काठीचा मार द्यावा लागतो; सौम्य उपायांनीं माकड वळत नाहीं. त्याप्रमाणें द्वाड माणसाला सुधारण्यास कडकच उपाय योजले पाहिजेत.

१४८८. **पोटचें द्यावें पण पाठचें देऊं नये**—आपलें मुल पाहिजे तर दुसऱ्याच्या हवालीं करावें, परंतु आपलें धाकटें भावंड दुसऱ्यावर विसंबूं नये! [ ह्या म्हणींत "पाठचें" ह्याचा अर्थ "शरण आलेला, किंवा० आश्रयाला आसलेला, माणूस" असाही घेण्यांत येतो. ]

१४८९. **लंकेंत सोन्याच्या विटा**—लंकेंत सोनें फार, असें मानण्यांत येत असे, त्यावरून ही म्हण निघाली. लंकेंत सोन्याच्या विटा असून आपणाला काय उपयोग? आपण भिकारी ते भिकारी!

१४९०. **लाज नाहीं मना, कोणी कांहीं म्हणा**—मनाला लाजच नाहीं, मग कोणी कांहीं म्हटलें तरी त्याचा काय उपयोग होणार?

१४९१. **लाडें लाडें केलें वेडें**—मुलाचे फार फार लाड केले, म्हणजे तें मूर्ख होतें.

१४९२. **लेकीस बोले, सुनेस लागे**—सुनेला बोललें असतां, (रागें भरलें असतां), शेजारणी आपल्याला नांवें ठेवितील, म्हणून कित्येक सासवा लेकीला बोलतात; परंतु तें बोलणें खरोखरीं सुनेलाच उद्देशून असतें. सासूच्या ह्या काव्याचें स्वरूप ह्या म्हणींत दर्शविलेलें आहे.

१४९३. **लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण**—जो लोकांना असें करा तसें करा म्हणून उपदेश करीत असतो, पण ज्याचें स्वतानें आचरण त्या उपदेशाच्या उलट असतें, त्याच्या संबंधानें हें वाक्य योजतात.

**१४९४. वरातीमागून घोडें**—लग्नाची वरात निघते, त्या समारंभाचें मिरवणूकींत शृंगारलेले घोडे पुढें चालवितात. वरातीच्या पिच्छाडीस हे घोडे चालविले, किं० वरातीचा प्रसंग समाप्त झाल्यावर हे घोडे आणले, तर ते निरुपयोगी होत. त्याप्रमाणें प्रसंग निघून गेल्यावर, किं० जरूरीची वेळ कशीतरी पार पाडल्यानंतर, एकादी गोष्ट करणें, किं० तिची सामग्री जुळविणें, हें निरुपयोगी होय.

**१४९५. वळचणीचें पाणी आढ्याला जात नाहीं**—घराच्या छपराच्या पागोळ्यांजवळच्या भागाला "वळचण" म्हणतात. छपराचा जो सर्वांत उंच भाग, त्याला "आढें" म्हणतात. म्हणीचा अर्थ हा कीं, छपराच्या खालच्या भागावरचें पाणी आढ्याकडे कधींही जात नाहीं. वरून खालीं येणें हा पाण्याचा धर्म आहे. पाणी कधीं खालून वर जात नाहीं. वडील माणूस लहानाला नमस्कार करूं लागला, तर लहान माणूस म्हणेल, "मला कसचा नमस्कार करतां? वळचणीचें पाणी कधीं आढ्याला जातें काय?"

**१४९६. वाकड्या बोटाशिवाय तूप निघत नाहीं**--तुपाच्या तपेलींत बोट घालून तें वाकडें केल्याशिवाय तूप बाहेर काढतां येत नाहीं. सौम्य उपायांनीं व सरळ मार्गानें कठिण कार्य साधत नसतें.

**१४९७. वाघ म्हटलें तरी खातो, वाघोबा म्हटलें तरी खातो**—वाघ एकाद्याच्या अंगावर चवताळून आला असतां "अरे वाघा, मला खाऊं नको," असें त्यानें म्हटलें काय, आणि "अहो, वाघोबा, मला खाऊं नका," असें म्हटलें काय एकच! वाघ त्याला खाणारच! त्याप्रमाणें दुष्टाशीं गांठ पडली आणि तो आपला नाश करणारच, अशा प्रसंगीं त्याच्याशीं नरमाईनें वागून आपला कमीपणा कां दाखवावा? त्याच्याशीं ताठ्यानें वागावयास हरकत नाहीं.

**१४९८. वाणला तितका घाणला**--एकाद्याची फार फार स्तुति केल्यानें तो शेफरतो. पूर्वी जितका चांगला असेल, तितका तो स्तुति केल्यानें बिघडतो. "घाणणें" म्ह० घाण होणें, किं० बिघडणें.

१४९९. **वारा पाहून पाठ द्यावी**—आपणाला वाऱ्याचा उपद्रव न होईल अशा रीतीनें आपण पाठ फिरवावी. देश, काल, वर्तमान, वगैरे पाहून वर्तन करीत असावें.

१५००. **वासरांत लंगडी गाय शाहाणी**—जेथें सारेच अडाणी आहेत, तेथें एकादा किंचित् शाहाणा असला तरी त्याचा मान मरातब होतो.

१५०१. **विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर**—बिऱ्हाड=सामानसुमान, चीज-वस्त. ज्या माणसाचें सामान अगदीं थोडें असतें, त्याचें "बिऱ्हाड पाठीवर आहे," असें म्हणतात. त्याला स्थलांतर करावयाचें असतां कांहीं दगदग होत नाहीं. विंचवाला एका बिळांतून दुसऱ्या बिळांत राहावयाला जाणें असतां त्याला कांहीं सामानसुमान बरोबर न्यावयाचें नसतें. पाठीवर नांगी वळवून तो चालूं लागतो. ज्या माणसाचें सामान-सुमान फारसें नाहीं, तो स्थलांतर करतांना उठून चालूं लागतो. कारण, विंचवाच्या बिऱ्हाडाप्रमाणें त्याचें बिऱ्हाड पाठीवर असतें.

१५०२. **विटलें मन आणि फुटलें मोतीं सांधत नाहीं**—एकादी वस्तु आपणास आवडेनाशी झाली, म्हणजे ती पुन्हा आवडती होणें शक्य नाहीं; तसेंच मोतीं फुटलें म्हणजे तें पुन्हा धड करणें हेंही शक्य नाहीं. मन हें मोत्याप्रमाणें मूल्यवान्, किं० तेजस्वी, किं० स्वच्छ, असतें, पण तें एकदा फुटलें कीं गेलें !

१५०३. **विशीं विद्या तिशीं धन**—वयाच्या वीसाव्या वर्षी विद्या फलद्रूप होऊं लागते; एकाद्या माणसाला विद्या कितपत आली आहे, किंवा त्याची विद्या कितपत फलद्रूप होईल, ह्याची अटकळ त्याच्या वयाच्या विसाव्या वर्षी करतां येते, आणि तो पैसा कितपत मिळवील, ह्याची अटकळ त्याच्या तिसाव्या वर्षी करतां येते.

१५०४. **व्याप तितका संताप**—जितका पसारा अधिक घालावा, तितका त्रास अधिक होतो.

१५०५. **शाहाण्याला मार शब्दाचा**—शाहाण्या माणसाला एक शब्द बोलल्यानें तो ताळ्यावर येतो. मूर्खाला टोणप्याचा मार दिल्याशिवाय तो सुधारत नाहीं.

१५०६. **शिकविलेली बुद्धि आणि बांधलेली शिदोरी फार वेळ पुरत नाहीं**—"शिकविलेली बुद्धि जशी फार वेळ टिकत नाहीं, तशी फडक्यांत बांधलेली शिधोरीही फार वेळ उपयोगीं पडत नाहीं. ज्याप्रमाणें लोकांपाशीं कोणी जडधीनें बुद्धि शिकून घेतली, तरी अडचणीच्या वेळीं तो गोंधळून जावयाचा, त्याप्रमाणें लोकांनीं दिलेली शिधोरी गरीब मनुष्यास एका वेळेस पुरेल, पण त्यानंतर त्याला उपाशी राहाण्याची पाळी येणार!" म्ह० चा० श०, पान २० पहा.

१५०७. **शिंक्याचें तुटलें, आणि बोक्याचें पिकलें**—शिंक्यावरून कांहीं खावयाचा पदार्थ निसटून किंवा शिंकें तुटून, खालीं पडला असतां तेथें बसलेल्या बोक्याला तो आयता खावयाला मिळतो. कोणा माणसाची कांहीं जिन्नस त्याला भोगावयाला न मिळतां ती अकल्पित रीतीनें, किं० श्रम न करतां, दुसऱ्या कोणास भोगावयास मिळाली असतां ही म्हण योजतात.

१५०८. **शितावरून भाताची परीक्षा**—वस्तूच्या अत्यल्प भागावरून तिच्या समग्र स्वरूपाविषयीं अटकळ बांधतां येते. पुढें न्यायप्रकरणांत स्थालीपुलाकन्यायाचें स्पष्टीकरण पहा [ ले० १५४४. ]

१५०९. **शीर सलामत तो पगडी पचास**—आपण हयात असतां काय हावें तें मिळवूं. शीर शाबूत असल्यास पगड्या हाव्या तितक्या मिळवितां, किं० घालतां, येतील. आपल्या मनगटांत जोर आहे, किं० आपल्या अंगीं कर्तृत्व आहे, तोंपर्यंत आपणाला कशाची ददात आहे?

१५१०. **शेळी जाते जिवानिशी, खाणार म्हणतो वातड**—शेळी कापून तिच्या मांसाचे खावयाचे पदार्थ करतात. खाणाराला ते पदार्थ आवडले नाहींत, आणि त्याचें समाधान झालें नाहीं, तर शेळीचा जीव व्यर्थ गेला असें होतें. एकाद्यानें दुसऱ्याचें कांहीं काम जीव तोडून केलें, आणि तें त्यास पसंत पडलें नाहीं, तर तो ही म्हण योजतो.

१५११. **षट्कर्णी करणें आणि घोटाळ्यांत पडणें**—तीन माणसें मसलतींत जमल्यास ती मसलत फुटून काम विनसतें.

**१५१२. सत्तेपुढे शहाणपण नाहीं**—ज्याच्याजवळ अधिकाराचें बळ आहे, त्याच्या पुढें शाहाण्याचें कांहीं चालत नाहीं.

**१५१३. सदा मरे त्याला कोण रडे?**—अधिकाधिक कष्टमय स्थिति येत गेल्यास ती अंगवळणीं पडते, आणि तिच्याबद्दल त्रास वाटेनासा होतो.

**१५१४. समर्थांच्या घरचें श्वान, त्याला सर्व देती मान**—समर्थांच्या घरच्या हलक्या सलक्या माणसांस देखील लोकांकडून मान मिळतो! मोठ्या माणसाच्या बगलबच्चांची योग्यता मोठी असें समजण्यांत येऊन त्यांना मोठा मान देण्यांत येतो.

**१५१५. साखरेचा खाणार त्याला देव देणार**—ज्याच्या नशीबीं साखर खाणें आहे, (म्ह० सुख भोगणें आहे), त्याला साखर, (म्ह० सुखोपभोगाचीं साधनें), देवच पुरवितो. भाग्यवंताला कशाचीही उणीव पडत नाहीं!

**१५१६. सारीं सोंगें येतात पण पैशाचें सोंग येत नाहीं**—सर्व स्थितींची बतावणी करतां येते, परंतु श्रीमंतीची करतां येत नाहीं. जी स्थिति नाहीं, तिचा देखावा करणें शक्य आहे, परंतु जवळ पैसा नसतां आपण पैसेवाले आहों, असा खोटा डामडौल करतां येत नाहीं, किंवा केला तरी तो फार वेळ कायम ठेवतां येत नाहीं.

**१५१७. सुतासाठीं मणि फोडणें बरोबर नाहीं**—क्षुल्लक वस्तु वचावण्यासाठीं मूल्यवान् वस्तूचा नाश करणें योग्य नाहीं.

**१५१८. सुंभ जळेल पण पीळ जळणार नाहीं**—सुंभाची दोरी जळली तरी, तिचा पीळ शाबूत असतो. हट्टी मनुष्याचें हट्टामुळें नुकसान झालें, तरी त्याचा हट्ट नाहींसा होत नाहीं.

**१५१९. सोयऱ्यांत साडू, हत्यारांत माडू, भोजनांत लाडू**—सोयऱ्याधायऱ्या मंडळींत साडू हा उत्तम, कारण तो सोयरा असून मित्रही गणतां येतो. हत्यारांत माडू उत्तम, कारण त्याला दोहोंकडून टोंक असल्यामुळें पुढचे शत्रु आणि मागचे शत्रु यांच्याशीं एकदम लढतां येतें; आणि भोजनांत लाडू उत्तम, कारण तो आटोपसर आकाराचा व रुचकर असून सोयीनें खातां येतो.

१५२०. **हजीर तो वजीर**--जो ऐन वेळेला हजर असतो, त्याचा फायदा होतो. गैरहजर मनुष्याची आठवण धरून त्याचा वाटा तो हजर झाल्यावर त्याला द्यावयासाठीं बाजूस काढून ठेवण्याची कोणी तसदी घेत नाहीं!

१५२१. **हत्तीच्या पायीं येते, आणि मुंगीच्या पायीं जाते**--एकाद्या विशिष्ट ठिकाणीं जावयाचें असतां तेथें हत्ती लवकर जाऊन पोंचतो, मुंगीला फार वेळ लागतो. आजार, विपत्ति, वगैरे येतांना लवकर येतात, पण जातांना सावकाश जातात.

१५२२. **हात ओला तर मैत्र भला, नाहीं तर पडला अबोला**—जोंपर्यंत आपणाकडून आपल्या मित्रांस द्रव्यादिकानें मदत होत असते, तोंपर्यंत ते आपणाशीं चांगल्या रीतीनें वागत असतात. ती मदत मिळेनाशी झाली, म्हणजे ते आपणाशीं भाषणही करीत नाहींत!

१५२३. **हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागूं नयें**—जें आपल्या कवजांत पूर्णपणें आलेलें आहे, तें आपणांस दुसरा कांहीं मोठा लाभ होईल अशा आशेनें सोडून देऊं नयें. कारण जें हातांत असेल, तें गमावेल, आणि जें हातांत नाहीं, तेंही कदाचित् मिळणार नाहीं.

१५२४. **हातच्या कांकणाला आरसा कशाला?**—स्पष्ट, किं० अनायासें दिसणारी, वस्तु पहावयाला आरसा कशाला हावा? टीपः—आपलें कपाळ, नाक, डोळे, वगैरे आरशावांचून आपणाला दिसत नाहींत; आपलीं कांकणें आपणाला सहज दिसतात.]

१५२५. **हिरा तो हिरा आणि गार ती गार**--हिरा कितीही मळलेला असला आणि गार कितीही गुळगुळीत आणि चकचकित असली, तरी त्या दोहोंपैकीं हिरा कोणता आणि गार कोणती, हें ओळखतां येतें. साधु कितीही विपन्न स्थितींत असला, आणि दुष्ट कितीही वैभवशाली असला, तरी मनाच्या उदारतेवरून, साधु आपणास सहज ओळखतां येतो.

# संस्कृत न्याय.

१५२६. "**न्याय**" म्हणजे दाखला, किंवा दृष्टान्त. मराठीमध्यें म्हणींनी जें काम होतें, तें संस्कृतांत न्यायांनीं होतें. उ० तुला सबंध पुस्तक वाचावयाची तसदी घेण्याचें कांहीं कारण नाहीं. एक दोन पानें वाचली, म्हणजे तुला स्थालीपुलाक न्यायानें साऱ्या पुस्तकाचें स्वरूप कळून येईल. येथें मराठींत आपण "शितावरून भाताची परिक्षा होते," ही म्हण योजून अभिप्रेत अर्थ दर्शवितों.

१५२७. संस्कृतांत शेंकडों न्याय आहेत, त्यांपैकीं मराठींत जे वारंवार योजले जातात, त्यांचें स्पष्टीकरण आम्ही पुढें देतों.

१५२८. **अंधदर्पण न्याय**--अंधळ्याला आरशाचा कांहीं उपयोग होत नाहीं. ज्या वस्तूचा एकाद्याला कांहीं उपयोग नाहीं, त्याला ती दिली असतां ह्या न्यायाचा उपयोग करतात. उ० मी हा गांव सोडून जाणार आहें. आतां तूं मला आपल्या घरांत बिऱ्हाडाला जागा देत आहेस; मला ती अंधदर्पणन्यायानें निरुपयोगी होय.

१५२९. **अंधपरंपरा न्याय**--एका अंधळ्याच्या पाठीमागून दुसरा अंधळा, दुसऱ्या अंधळ्याच्या मागून तिसरा अंधळा, अशा रीतीनें अनेक अंधळे चालत असले, तर ते सारेच खड्यांत पडावयाचे; कारण, त्यांच्यांत चांगली वाट दाखविणारा असा कोणी असणें शक्य नाहीं. त्याप्रमाणें माणसें विचार न करतां मेंढरांप्रमाणें एका मागून एक अशीं जातात, आणि प्रसंगविशेषीं नुकसान सोसतात, तेथें ह्या न्यायाचा उपयोग करतात. उ० हे लोक अंधपरंपरान्यायानें चाललेले आहेत. त्यांच्यांत खरा विचार करणारा असा कोणी नाहीं; अर्थात् त्यांना परिणामीं दुःखच भोगावें लागणार!

१५३०. **अशोकवनिका न्याय**--रावणानें सीता चोरून नेऊन लंकेमध्यें अशोकांच्या वनांत ठेविली. सीतेला त्यानें त्याच स्थलीं कां ठेविलें,

दुसरीकडे कां ठेविलें नाहीं, हें सांगणें अशक्य आहे. जेथें दोन किंवा अधिक प्रकार सारखेच चांगले असतात, तेथें कोणचा तरी एकादा स्वीकारावा लागतो. हा प्रकार स्वीकारला हा पक्षपात झाला, असें म्हणतां यावयाचें नाहीं. यावरून, मनांत पक्षपात करण्याची मुळींच इच्छा नसतां एक प्रकार अंगीकारला जातो, तेथें ह्या न्यायाचा उपयोग केला जातो. उ० मी रामभाऊंच्या घरावरून बागेंत गेलों, आप्पासाहेबांच्या घरावरून गेलों नाहीं, हें केवळ अशोकवनिकान्यायानें झालें.

१५३१. **अहिनकुल न्याय**--"अहि" म्ह० साप, आणि "नकुल" म्ह० मुंगूस. साप आणि मुंगूस या दोन प्राण्यांत शत्रुत्वाचा संबंध आहे. दोन माणसांत शत्रुत्व दाखवावयाचें असतां ह्या न्यायाचा उपयोग करतात.

१५३२. **काकतालीय न्याय**—ताडाच्या झाडाच्या फांदीवर कावळा बसला, आणि त्याच वेळीं जर कर्मधर्मसंयोगानें ती फांदी मोडली, तर बसणें आणि मोडणें ह्या दोन क्रियांचा एकमेकींशीं कार्यकारणभाव नसतो. त्याप्रमाणें यदृच्छेनें किंवा अकल्पित रीतीनें एकादी गोष्ट घडून आली असून तिचा संबंध दुसऱ्या एकाद्या विशिष्ट गोष्टीशीं कोणी माणूस जोडूं लागला, तर तें करणें हास्यास्पद होतें. त्यावरून "काकतालीय न्याय" म्हणजे यदृच्छा, किं० कर्मधर्मसंयोग, असा अर्थ होतो, व "काकतालीय न्यायानें" म्हणजे यदृच्छेनें, किंवा कर्मधर्मसंयोगानें, असा अर्थ होतो.

१५३३. **कूपमंडूक न्याय**--"कूप" म्ह० विहीर, आणि "मंडूक" म्ह० बेडूक. बेडकाला आपली विहीर हें अत्यंत मोठें जग असें वाटत असतें. विहिरीच्या बाहेर किती मोठें जग पसरलेलें आहे, ह्याची त्याला कांहींच कल्पना नसते. जो मनुष्य आपला गांव किंवा देश सोडून गेलेला नाहीं, तो माझाच गांव किंवा देश मोठा, अशी धन्यता मानीत असतो. अशा मनुष्याचा उपहास करावयाचा असतां ह्या न्यायाचा उपयोग करतात.

१५३४. **कूपयंत्रघटिकान्याय**--कूप=विहीर. घटिका=लहान घट, म्ह० लोटा, किं० गाडगें. कूपयंत्रघटिकान्याय=विहिरीच्या राहाटगाडग्यांचा न्याय.

राहाटाच्या माळेतील एका बाजूचे लोटे रिकामे असतात, दुसऱ्या बाजूचे भरलेले असतात, खालचे लोटे भरत असतात, वरचे रिकामे होत असतात. कांहीं खालीं जात असतात, व कांहीं वर येत असतात, असा प्रकार होत असतो. त्याप्रमाणें जगांत श्रीमंतांचे गरीब, व गरीबांचे श्रीमंत होत असतात; अशीं जीं परिवर्तनें होतात, तीं कूपयंत्रघटिकान्यायानें होतात असें म्हणतात.

१५३५. **गतानुगतिकन्याय**--"गत" म्ह० पुढें गेलेला, "अनुगति" म्ह० मागून जाणें. एक पुढें गेला म्हणून दुसऱ्यानें विचार न करतां त्याच्या मागून जाणें, किंवा पूर्वीचे लोक अमूक अमूक करीत होते म्हणून पुढच्या लोकांनींही त्यांच्याप्रमाणें करणें, हें मूर्खपणाचें लक्षण होय. हा मूर्खपणा दाखवावयाचा असतां ह्या न्यायाचा उपयोग केला जातो.

१५३६ **नारिकेलपाकन्याय**--नारळाचें कवच ( करवंटी ) फार टणक असते, परंतु तें कवच फोडण्याची एकदा तसदी घेतली, म्हणजे आंत गोड खोबरें असतें तें खावयाला मिळतें. एकाद्या वस्तूचें बाह्य स्वरूप रूक्ष असें असलें, तरी अंतःस्वरूप आल्हादकारक असूं शकतें, असा अर्थ दाखवावयाचा असतां नारिकेलपाकन्यायाचा उपयोग करतात. उ० हा ग्रंथ प्रथम नीरस असा वाटतो, परंतु त्याच्या विषयांत जों जों आपली गति होत जाते, तों तों नारिकेलपाकन्यायानें त्यांत गोडी लागूं लागते.

१५३७. **नीरक्षीरन्याय**--दुधांत पाणी पूर्णपणें मिसळून जातें, आणि त्या दोहोंचा एक जीव होऊन जातो. दोन वस्तूंचा पूर्णपणें मिलाफ झाला असें बोलावयाचें असतां ह्या न्यायाचा उपयोग करतात.

१५३८. **पिष्टपेषणन्याय**--पिष्ट=दळलेलें, किं० धान्य वगैरे दळून तयार झालेलें, पीठ; त्याचें "पेषण" म्ह० दळणें, किं० पीठ करणें. पुनः तेंच तेंच करणें. व्यर्थ पुनरावृत्तीला हा न्याय लावतात. मराठींत "चर्वितचर्वण" ह्या संप्रदायाचा ह्याच अर्थानें उपयोग केला जातो.

१५३९. **बीजांकुरन्याय**—अगोदर बीज उत्पन्न झालें, किंवा अगोदर अंकुर उत्पन्न झाला, हें ठरवितां येत नाहीं. कारण, बीजापासून अंकुर होतो, आणि अंकुरापासून बीज होतें. जेथें दोन पदार्थ एकमेकांचीं कारणें असतात व कार्येंही असतात, तेथें हा न्याय योजतात.

१५४०. **वन्हिधूमन्याय**--जेथें धूर असतो तेथें अग्नि असतो. सातातिक साहचर्यसंबंधानें हा न्याय योजतात.

१५४१. **वीचितरंग न्याय**--पाण्यांत एक लाट उत्पन्न होते, तिला मागची लाट पुढें ढकलते, ह्या दुसऱ्या लाटेला तिच्या मागची लाट पुढें ढकलते, असें होत असतें, आणि क्रमाक्रमानें सर्व लाटा किनाऱ्यावर आपटून फुटत असतात. त्याप्रमाणें एका पिढीचीं माणसें मरण पावतात, त्यांच्या मागून त्यांच्या जागीं दुसऱ्या पिढीचीं माणसें येतात, पुढें तींही मरतात. ही जगाची राहाटी वीचितरंगन्यायानें घडत असते.

१५४२. **शाखाचंद्रन्याय**—एकाद्याला चंद्र दाखवावयाचा असतां "तो पहा, त्या बकुळीच्या फांदीच्या टोंकाला आहे," वगैरे सारख्या वाक्यानें चंद्राचें स्थान दाखवितात. खरोखरीं फांदीपासून शेंकडों मैलांच्या अंतरावर चंद्र आहे. ह्यावरून एकाद्या ज्ञात वस्तूशीं अज्ञात वस्तूचा नसता संबंध जोडून देऊन ती अज्ञात वस्तु ज्ञात करून देतात तें शाखाचंद्रन्यायानें.

१५४३. **सिंहावलोकनन्याय**--सिंह चालत असतां मधून मधून मागें वळून पाहात असतो. आपण एकादें काम करीत असतां तें किती झालें व कसें झालें, हें पाहण्यासाठीं आपण मागच्या कामाचें थोडक्यांत निरीक्षण करतों तें सिंहावलोकनन्यायानें करतों.

१५४४. **स्थालीपुलाकन्याय**–"स्थाली" म्ह० तपेली, आणि "पुलाक" म्ह० भात. एकाद्या तपेलींतील भात शिजला आहे किंवा नाहीं हें पाहावयाचें असतां एक शीत दोन बोटांत चेपून पाहातात. तें चांगलें शिजलेलें हाताला लागलें, म्हणजे सारा भात चांगला शिजला आहे, असें आपण अनुमान काढतों. एका लहानशा भागाची चांचणी करून सर्व वस्तूची परीक्षा आपण करतों, ती स्थालीपुलाकन्यायानें करतों. ह्याच अर्थाची मराठी म्हण, "शितावरून भाताची परीक्षा."

१५४५. **हंसक्षीरन्याय**--दुधांत पाणी मिसळलेलें असल्यास, तें पाणी न घेतां हंस दूधच घेऊन पितो, अशी आपल्या लोकांची कल्पना असे. एकाद्या वस्तूंतील दोषांकडे लक्ष्य न देतां तिच्या गुणांची वाखाणणी करतात ती हंसक्षीरन्यायानें. उ० आमच्या पुस्तकांतील दोषांकडे करडी नजर न करतां विद्वान् लोक हंसक्षीरन्यायानें गुणांचें ग्रहण करतील, अशी आम्ही उमेद बाळगून आहों.

---

# संस्कृत भाषेंतील वाक्यें किंवा वाक्यांचे खंड.

१५४६. संस्कृत भाषेंतील शेंकडों वाक्यें, किं० वाक्यांचें खंड, मराठींत हर• हमेश योजण्यांत येतात, त्यांचा संग्रह ह्या प्रकरणांत केला आहे. हीं संस्कृत वाक्ये व वाक्यांचें खंड सारेच व्याकरणशुद्ध असतात असें नव्हे. विष्णुस्य हृदयं शिवः, जिवश्च कंठश्च, शुभस्य शीघ्रं, वगैरे अशुद्ध आहेत. पुढील संग्रहांत आम्ही शुद्ध रूपें ठिकठिकाणीं दाखवून दिलीं आहेत.

१५४७. **अजापुत्रं बालिं दद्यात्**--गरीब, किं० निराश्रित मनुष्यालाच सर्व लोक छळतात. श्रीमंताच्या किंवा समर्थाच्या वाटेस कोणी जात नाहींत. [ यज्ञांत शेळीच्या पुत्रास, म्ह० बोकडास, बलि देतात, वाघ, सिंह, वगैरे हिंस्र पशूंस देत नाहींत, ह्या चालीवरून हें वाक्य निघालें. ]

१५४८. **अतिपरिचयादवज्ञा**--एकाद्याशीं आपली दाट ओळख झाली, किं० एकाद्या माणसाकडे आपण फार फार जाऊं लागलों, म्हणजे तो आपला अनादर करूं लागतो.

१५४९. **अति सर्वत्र वर्जयेत्**--कोणत्याही गोष्टींत अतिरेक करूं नये. मर्यादेबाहेर कोणतीही गोष्ट करूं नये. ह्याच अर्थाची मराठी म्हण " अति त्यांत माती."

१५५०. **अथपासून इतिपर्यंत**--आरंभापासून तों शेवटपर्यंत. [ संस्कृतांत "अथ" आणि "इति" ह्या शब्दांचा अर्थ अनुक्रमें आरंभ आणि शेवट असा आहे. ]

१५५१. **अधिकास्याधिकं फलं**--अधिक केल्यास अधिक फलप्राप्ति होते. विद्यार्थ्यानें अधिक मेहनत केल्यास तो अधिक हुशार होईल, वगैरें-सारख्या प्रसंगीं ह्या वाक्याचा उपयोग करतात.

१५५२. **अव्यापारेषु व्यापारः**--ज्या कामांत आपण पडूं नये, त्या कामांत पडणें; भलतीच गोष्ट करावयाला प्रवृत्त होणें. [ ज्या गोष्टीशीं आपला

कांहीं संबंध नाहीं, त्या गोष्टींत मन घालून आपण कांहीं पंचाइतींत पडलों असतां "हा माझा अव्यापारेषु व्यापार झाला" असें म्हणतात. [ पंचतंत्रांत एक खुंटी उपटणाऱ्या वानराची गोष्ट आहे, तींतील एका श्लोकाचा हा एक चरण आहे. ]

१५५३. **अहोरूपमहोध्वनिः**—ह्यानें त्याची स्तुती करावी, आणि त्यानें ह्याची स्तुति करावी, असा प्रकार जेथें होत असतो, तेथें "अहो रूप-महोध्वनिः" अशा वाक्यानें त्यांची निंदा किं० थट्टा करण्यांत येते.

१५५४. **इंद्राय तक्षकाय स्वाहा**— शत्रूला चुकविण्यासाठीं जर कोणी लाचार मनुष्य एकाद्या बलवान् इसमाकडे आश्रयासाठीं गेला, आणि शत्रु जर ह्या आश्रयदात्या इसमापेक्षां बलवत्तर असला, तर तो त्या आश्रयदात्या-सकट त्याचा विध्वंस उडवितो, म्हणजे दोघांचाही एकदम विध्वंस करितो. ह्याला "इंद्राय तक्षकाय स्वाहा" करणें असें म्हणतात. [ पूर्वी जनमेजय राजानें सर्पसत्र चालविलें होतें, त्यांत तो सर्व सर्पांची आहुति द्यावयाला लागला होता. इतर सर्पांप्रमाणें आपलीही आहुति अग्नींत पडणारच, असें मनांत आणून तक्षक इंद्राकडे आश्र-यार्थ गेला. हें जनमेजयास समजतांच तो म्हणाला, "इंद्राय तक्ष-काय स्वाहा !" म्हणजे "इंद्रासहवर्तमान तक्षकाची आहुति पडो !" ह्यावरून वरील वाक्याचा अर्थ, "शत्रूला आश्रय देणाऱ्यासकट शत्रूचा विध्वंस होवो !"

१५५५. **आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः**—दक्षिणी लोक एकाद्या कामाला सुरवात करून ठेवण्यांत पटाईत असतात. तें काम शेवटास नेण्याची त्यांना धमक नसते. ते प्रथम उत्साह दाखवितात, आणि नंतर उदासीन होतात किंवा आळसावतात.

१५५६. **इतो भ्रष्टस्ततोभ्रष्टः**—इकडे फजिती पावलेला आणि तिकडेही फजीती पावलेला. दोन्हीकडून ज्याची फसगत झाली आहे असा.

१५५७. **ऋणं कृत्वा घृतं पिबेत्**—ऋण काढून तूप प्यावें. चैन करावी, मग ती कर्जाऊ पैशावर केली तरी हरकत नाहीं. चार्वाकाच्या एका श्लोकाचा हा एक चरण आहे.

१५५८. **एरंडोऽपि द्रुमायते**—ज्या गांवांत वृक्ष नाहींत त्या गांवांत एरंडच वृक्ष गणला जातो. मूर्खांच्या मंडळींत एकादा जरासा अक्कलवान् असला, तरी त्याची वडेजावी होते; तेव्हां त्याची निंदा, किंवा थट्टा, करावयाची असतां ह्या वाक्याचा उपयोग करतात.

१५५९. **कर्तुमकर्तुं अन्यथा कर्तुम्** (समर्थः)—हावें ते करावयाला समर्थ–[ शब्दशः अर्थ असाः—जें अस्तित्वांत नाहीं तें अस्तित्वांत आणावयाला म्हणजे मनांत आल्यास एकादी गोष्ट करावयाला, मनांत न आल्यास न करावयाला, किंवा केलेली असेल तींत बदल करावयाला समर्थ ].

१५६०. **कर्मणो गहना गतिः**—कर्माची गति जाणणें शक्य नाहीं।

१५६१. **कोटस्थ कीटाय**—यःकश्चित्, क्षुल्लक.

१५६२. **क्वचित्काणा भवेत्साधु**—क्वचित्काणो भवेत्साधुः. काणा किंवा एका डोळ्यानें अंधळा मनुष्य प्रायः सुस्वभावी नसतो, म्ह० बहुतकरून लबाड असतो.

१५६३. **खटाटोपो भयंकरः**, किं० **फटाटोपो भयंकरः**—अंगीं सामर्थ्य किं० अवसान थोडकेंच असून अवडंबर मात्र मोठें.

१५६४. **खल्वाटो निर्धनः क्वचित्**—ज्याच्या डोक्यावर टक्कल आहे असा मनुष्य प्रायः दरिद्री नसतो.

१५६५. **गतं न शोचेत्**—गेलेल्या, म्ह० नष्ट झालेल्या, वस्तूबद्दल व्यर्थ शोक करीत बसूं नये.

१५६६. **गुणाः पूजास्थानं**—मनुष्याला आदर प्राप्त होतो, तो त्याच्या गुणांवरून.

१५६७. **चक्षुर्वै सत्यम्**—जें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेलें असेल, तेंच खरें, ( कानांनीं ऐकिलेलें असेल तें खोटें ). एकादी गोष्ट लोकांनीं सांगितलेली असेल ती खरी धरून चालूं नये, ती प्रत्यक्ष पाहिली असेल तरच खरी समजावी.

१५६८. **चंचुप्रवेशान्मुशलप्रवेशः**—चोंच शिरकावण्यापुरती जागा मिळाली म्हणजे मुसळ शिरकावण्याइतकी जागा करून घेतां येते. प्रथम थोडासा अवकाश मिळाला, म्हणजे तेवढ्यावर ज्यास्ती जागा मिळवितां येते.

१५६९. **जिवश्चकंठश्च**--शुद्धरूप "जीवश्च कंठश्च." जीव कीं गळा अशासारखी दृढ मैत्री.

१५७०. **दूरतः पर्वता रम्याः**—दूरून डोंगर साजरे ( जवळ जातां कांटे-कुटे. )

१५७१. **द्रव्येण सर्वे वशाः**—द्रव्य दिल्यानें सर्व लोक आपणास वश करून घेतां येतात.

१५७२. **धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्**—धर्माचें रहस्य गुहेंमध्यें ठेविलेलें असतें, ( म्ह० गूढ, किं० अज्ञेय, असतें ); किं० धर्माचें रहस्य गुहेच्या एकान्तवासांत जाऊन राहिल्याशिवाय समजण्याजोगें नाहीं.

१५७३. **धर्मस्य त्वरिता गतिः**—धर्माचें फळ तावडतोब मिळतें, किं० धर्म करावा असें मनांत येतांच तो करूं लागावा, उशीर लावूं नये.

१५७४. **न देवाय न धर्माय**--देवाच्या कार्याला नव्हे, आणि धर्माच्याही कार्याला नव्हे. व्यर्थ किं० अनाठायीं केलेला खर्च, किं० मेहनत, ह्यासंबंधानें बोलतांना ह्या शब्दांचा उपयोग केला जातो.

१५७५. **न भूतो न भविष्यति**—पूर्वी झाली नाहीं आणि पुढें होणार नाहीं अशी गोष्ट. उ० तैमूरलंगाचा क्रूरपणा न भूतो न भविष्यति असा होता.

१५७६. **न हिंदुर्न यवनः**—जो हिंदु धर्म पाळीत नाहीं, आणि मुसलमानी धर्महीं पाळीत नाहीं, असा माणूस.

१५७७. **निरंकुशाः कवयः**—कवींना कोणताही निर्बंध नसतो.

१५७८. **बहुरत्ना वसुंधरा**—पृथ्वीवर नानाप्रकारचीं रत्नें आहेत.

१५७९. **निर्वीरमुर्वीतलं**—सामना करावयास कोणी वीर उरला नाहीं, अशी स्थिति.

१५८०. **निःस्पृहस्य तृणं जगत्**--ज्याला कोणत्याही वस्तूची इच्छा नाहीं, त्याला जग हें तृणतुल्यच होय!

१५८१. **परोपदेशे पांडित्यम्**—दुसऱ्याला उपदेश करतेवेळीं शहाणे, पण स्वतः आचरण करतांना मूर्ख.

१५८२. **पुराणमित्येव न साधु सर्वम्**--एकादी वस्तु, गोष्ट, किं० चालरीत, जुनी आहे, म्हणजे पूर्वीपासून चालत आली आहे, येवढ्यावरूनच ती चांगली आहे असें ठरत नाहीं.

१५८३. **द्रविडो लुडबुडाम्यहम्**—शब्दशः अर्थः—मी द्राविड लुडबुडत आहें. पूर्वी पेशवाईमध्यें कोणी एक द्राविड ब्राह्मण श्रीमंतांची भेट घेऊन कांहीं दक्षिणा मिळेल, ह्या आशेनें पुणें येथें आला. परंतु पुण्यास आल्यावर त्याला असें कळलें कीं श्रीमंतांची स्वारी पुरंदरगडीं आहे. तेव्हां तो द्राविड पुरंदरगडास गेला. तेथें त्याला कळलें कीं श्रीमंत हल्लीं सासवडास आहेत, म्हणून तो सासवडास गेला. परंतु तो येथें आला, तों श्रीमंत पुरंदरगडास पुन्हा गेले, असें त्याला सांगण्यांत आलें! अर्थात् श्रीमंतांची गांठ पडली नाहीं! तेव्हां त्याणें त्रासून आपल्या स्थितीच्या वर्णनाचा पुढील श्लोक रचिलाः—

**गडाच्च सास्वडं यामि सास्वडाच्च पुनर्गडम् ।**
**गडसास्वडयोर्मध्ये द्रविडो लुड्बुडाम्यहम् ॥**

जेव्हां एकाद्या पदार्थाला, किं० मनुष्याला, कायमचें स्थान न मिळतां त्याची इकडून तिकडे व तिकडून इकडे अशी उचलबांगडी होत असते, तेव्हां म्हणतात, "त्याचें द्रविडो लुडबुडाम्यहम्" असें चाललें आहे!

१५८४. **प्रथमग्रासे मक्षिकापातः**—पहिल्याच घासाला माशी लागणें. जेवायाला बसल्यावर पहिला घास तोंडांत घालावा तोंच माशी तोंडांत गेली, तर सर्व जेवणाचा विचका होतो. त्याप्रमाणें इष्ट वस्तु अगदीं साध्य व्हावयाच्या वेळीं, किंवा एकाद्या गोष्टीला प्रारंभ करावयाच्याच वेळीं, कांहीं हरकत आली, तर "प्रथमग्रासे मक्षिकापातः" असें म्हणतात.

१५८५. **पिंडे पिंडे मतिर्भिन्ना**—जितकीं माणसें तितके स्वभाव. समानार्थक मराठी म्हणः—"मूर्ति तितक्या प्रकृति."

१५८६. **बालादपि सुभाषितं ग्राह्यम्**—लहान मुलाचें देखील चांगलें भाषण स्वीकारावें.

१५८७. **बुद्धिः कर्मानुसारिणी**—मागल्या जन्मींच्या कर्माप्रमाणेंच मनुष्याची बुद्धि होते, म्ह० कांहीं गोष्ट करण्याची प्रवृत्ति होते.

१५८८. **भवति न भवति**—"भवति" म्ह० होतें, 'न भवति' म्ह० होत नाहीं. अमुक वस्तु अशी होतें किंवा होत नाहीं असा वादविवाद, चर्चा, किं०

वाटाघाट. उ० ह्या विषयासंबंधानें आज पांच वर्षें भवति न भवति होऊन शेवटीं असें ठरलें कीं आहे तीच व्यवस्था पुढें चालू ठेवावी.

१५८९. **भिन्नरुचिर्हि लोकः**—भिन्न भिन्न लोकांच्या आवडी भिन्न भिन्न असतात. एकाला जें पसंत पडेल, तें दुसऱ्यालाही पसंत पडेल, असा नियम नाहीं.

१५९०. **मनःपूतं समाचरेत्**—मनाला योग्य वाटेल तें करावें.

१५९१. **महाजनो येन गतः स पंथाः**—मोठे मोठे लोक ज्या मार्गानें गेले, तोच मार्ग खरा, म्ह० त्याच मार्गानें जाणें हें बरें. ज्या श्लोकाचा एक चरण वरील वाक्य आहे, तो येणेंप्रमाणें:—

श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्नाः नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम् ।
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पंथाः ॥

१५९२. **मुखमस्तीति वक्तव्यम्**—तोंड आहे म्हणून बोलावयाचें. जेव्हां कोणी माणूस मूर्खासारखें कांहीं तरी बरळत असतो, म्ह० योग्य, अयोग्य, वगैरेंचा विचार न करतां बोलत असतो, तेव्हां त्याची निंदा करतांना ह्या वाक्याचा उपयोग करतात.

१५९३. **मूले कुठारः**—मूळावरच कुऱ्हाड. ज्या मुद्यावर एकादा सिद्धांत उभारलेला असतो, तो मुद्दाच खोडून टाकणें.

१५९४. **मौनं सर्वार्थसाधनम्**—मुकाट्यानें बसलें, म्हणजे सर्व हेतु सफल होतात.

१५९५. **यथा राजा तथा प्रजा**—जसा राजा असेल, तशी प्रजा असते. राजा नीतिमान् असल्यास प्रजाजन नीतिमान् असतात. राजा दुराचारी असल्यास प्रजाजन दुराचारी असतात.

१५९६. **यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नो करणीयं नाचरणीयं**—एकादी गोष्ट जरी योग्य असली, तरी ती लोकरूढीच्या उलट असल्यास करूं नये व आचरूं नये.

१५९७. **यावत्तैलं तावदाख्यानम्**—जोंपर्यंत दिव्यांत तेल असेल, तोंपर्यंतच आख्यान, गोष्ट, किं० संभाषण. तेलाच्या अभावामुळें दिवा विझला

कीं सर्व गोष्टी बंद पडावयाच्या. मनुष्याजवळ द्रव्य वगैरे असतें, तोंपर्यंत त्याच्या चैनी चालतात. द्रव्य संपलें म्हणजे त्या बंद पडतात.

१५९८. **यावच्चंद्रदिवाकरौ**—जोंपर्यंत चंद्र आणि सूर्य जगांत कायम आहेत तोंपर्यंत. अनंत काळपर्यंत. सदासर्वदा.

१५९९. **योजकस्तत्र दुर्लभः**—एकाद्या वस्तूचा योग्य स्थलीं आणि योग्य प्रसंगीं उपयोग करणारा माणूस दुर्मिळ असतो. उपयोगाच्या वस्तु जगांत पुष्कळ आहेत, त्यांची योजना करणारा मनुष्य मात्र मिळणें कठिण आहे. ज्या श्लोकाचा एक चरण वरील वाक्य आहे, तो असा आहेः--

अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।
अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥

१६००. **येन केन प्रकारेण**—कोणच्या नाहीं कोणच्या तरी प्रकारानें. कांहीं ना कांहीं तरी करून. योग्यायोग्याचा विचार न करतां. संबंध श्लोक येणेंप्रमाणें.

घटं भिंद्यात्पटं छिन्द्यात् कुर्याद्वा रासभध्वनिम्
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥

१६०१. **राजा कालस्य कारणम्**--राजा हा जसा चांगल्या काळास आणतो, तसा वाईट काळासही आणतो. राजा चांगला असल्यास प्रजेला चांगले दिवस येतात, आणि वाईट असल्यास वाईट दिवस येतात. प्रजेचीं सुखदुःखें राजावर अवलंबून असतात.

१६०२. **वचने किं दरिद्रता**—बोलण्यांत कमीपणा कशाला? अघळपघळ बोलावें, मग करणें किंवा देणें तें आपल्या इच्छेला येईल तितकेंच करावें किंवा द्यावें.

१६०३. **वचस्येकं मनस्येकम्**—बोलण्यांत एक आणि मनांत दुसरेंच. याला समानार्थक मराठी म्हण, " ओठांत एक आणि पोटांत एक. "

१६०४. **वादे वादे जायते तत्त्वबोधः**—वादविवाद केल्यानें एकाद्या

गोष्टीचें मर्म, म्ह० खरें स्वरूप, किं० रहस्य, समजतें. संबंध श्लोक असा आहे:—

मार्गे मार्गे निर्मलं ब्रह्मवृंदं वृंदे वृंदे तत्त्वचिंतानुवादः ।
वादे वादे जायते तत्त्वबोधः बोधे बोधे भासते चंद्रचूडः ॥

१६०५. **विनाशकाले विपरीतबुद्धिः**—विनाशकाल प्राप्त झाला असतां मनुष्याची बुद्धि फिरते. हानि होण्याचा काल आला, म्हणजे मनुष्यास भलभलत्या गोष्टी करण्याची बुद्धि होते.

१६०६. **विषादप्यमृतं ग्राह्यम्**—विषापासून जरी अमृत प्राप्त होण्याजोगें असलें, तरी तें घ्यावें, त्याचा अव्हेर करूं नये. वाइटापासून चांगलें मिळत असेल तें घ्यावयाला हरकत नाहीं.

१६०७. **शठे शाठ्यं समाचरेत्**—लबाडाशीं लबाडी खुशाल करावी.

१६०८. **शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णुस्य हृदयं शिवः**—शिवाचें हृदय विष्णु, आणि विष्णूचें हृदय शिव. शिव तोच विष्णु, आणि विष्णु तोच शिव. शिव आणि विष्णु हे दोन्ही एकच होत. दोन माणसांतील मैत्रीचा दृढपणा दाखवावयाचा असतां वरील वाक्य योजतात. " विष्णुस्य " हें " विष्णोः " याचें प्रचारांत असलेलें अशुद्ध रूप.

१६०९. **शिष्यापराधे गुरोर्दंडः**—शिष्याच्या अपराधाबद्दल गुरूला शिक्षा. अडाणी विद्यार्थ्यांनें बरोबर उत्तरें दिलीं नाहींत, म्हणजे गुरूनें कांहीं शिकविलेंच नाहीं असा त्याच्यावर टपका ठेवण्यांत येतो.

१६१०. **शिष्टागमने अनध्यायः**—कोणी संभावित गृहस्थ आपल्या घरीं आला असतां अध्ययनाला सुट्टी दिली पाहिजे; म्ह० अध्ययन बंद ठेवलें पाहिजे.

१६११. **शुभस्य शीघ्रम्**—( शुभंच शीघ्रं ) फायदेशीर गोष्ट केलली बरी !

१६१२. **शेषं कोपेन पूरयेत्**—निरुत्तर झालेला माणूस रागानें भरून काढतो ! वादांत हार येऊं लागली, म्हण येऊन तो चरफडूं, किं० शिव्या देऊं, लागतो.

१६१३. **सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः**—सर्व गोष्टींच्या आधीं मूठभर तांदुळांची जरूरी असते, म्ह० मूठभर अन्न पोटांत गेल्याशिवाय कोणत्याही कामास उत्साह चढत नाहीं; यावरूनच सर्व कृत्यांच्या आरंभीं तंडुल म्ह० तांदूळ, आणि लक्षणेनें द्रव्य, असावें लागतें. कोणतेंही कृत्य आरंभावयाचें, तरी पैशाची तजवीज अगोदर करावी लागते. उ० तुझे सर्व विचार जरी चांगले आहेत, तरी ते ह्या वेळीं मी निरुपयोगी समजतों. कारण, सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः ( म्ह० आधीं मूठभर भात पाहिजे; तो दे, मग नंतर काय तो विचार !

१६१४. **साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः**—शेपूट आणि शिंगें नसलेला हा खरोखर पशूच होय ! बुद्धिहीन, किं० अडाणी माणसाचें हें वर्णन आहे.

१६१५. **सुखं च मे शयनं च मे**—मला चैनींत राहून झोंपा ताणावयास पाहिजेत !

१६१६. **स्वभावो दुरतिक्रमः**—स्वभाव वदलतां येत नाहीं ! या वाक्याशीं समानार्थक मराठी म्हण, "स्वभावाला औषध नाहीं !"



# ज्योतिषांतील पारिभाषिक शब्दोत्पन्न वाक्प्रचार.

१६१७. **एकाद्याच्या राशीस लागणें, किं० बसणें**—त्याची पिच्छा पुरविणें; त्याच्या पाठीस लागणें; त्याला छळणें, किं० सतावून सोडणें. मेष, वृषभ, इत्यादि बारा राशि क्रांतिवृत्तावर आहेत, आणि ह्या राशींत रवि वगैरे ग्रह एक महिन्यापासून २॥ वर्षेपर्यंत असतात. यावरून "एकाद्याच्या राशीस बसणें," म्ह० सदासर्वदा त्याच्या जवळ राहून त्याला त्रास देणें, असा अर्थ झाला आहे.

१६१८. **त्याचा माझ्याशीं बारावा बृहस्पति आहे**—त्याचें माझ्याशीं वैर आहे. त्याचें माझ्याशीं पटत नाहीं. जन्मराशीपासून बाराव्या राशींत गुरु, ( म्ह० बृहस्पति ), असल्यास तो त्या माणसास फार दुःख देणारा असतो, असें फलज्योतिषांत सांगितलेलें आहे.

१६१९. **राहूसारखें मागें लागणें, किं० येणें; राहु केतु प्रमाणें पाठ घेणें**—पिच्छा पुरविणें; नाश करण्याची संधि मिळण्यासाठीं टपून बसणें. "राहु" आणि "केतु" ह्या नांवांचे दोन दैत्य असून ते सूर्य आणि चंद्र यांना संधि सांपडतांच ग्रासतात, म्ह० खाऊन टाकतात, तेणेंकरून सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण हे प्रकार होतात, अशी जुनी समजूत असे.

१६२०. **शनि, शनैश्चर**—शनि हा ग्रह आपल्या राशीपासून द्वादशस्थानीं असल्यास तो फार पीडा देतो. यावरून "शनि," किं० "शनैश्चर," ह्याचा अर्थ दुष्मान, अथवा वाइटावर टपलेला माणूस, असा झाला आहे. आकाशांत शनि ह्या ग्रहाचा एक फेरा व्हावयास सुमारें ३० वर्षें लागतात. हा काल इतर ग्रहांच्या कालाहून ज्यास्ती आहे, म्हणजे तो सावकाश चालतो, म्हणून त्याला म्ह० "शनैश्चर" (शनैस्+चर) सावकाश चालणारा, असेंही म्हणतात.

१६२१. **उदरीं शनि येणें**—समृद्ध, किं० श्रीमंत, होण्याचीं सर्व साधनें, किं०

कारणें, अनुकूल असणें. [ जन्मराशीला शनि हा ग्रह आला असतां वैभव प्राप्त होतें, असा फलज्योतिषाचा सिद्धांत आहे. ]

१६२२. **ओढून चंद्रबळ आणणें**—मौंजीबंधनाच्या विधीला मुलाच्या लग्नकुंडलींत चंद्राचें बळ असावें लागतें. तें नसल्यास तें आहे असें कसें तरी ठरवून मौंजीबंधन आपल्या हौसेसाठीं उरकून घेतात. एकादी गोष्ट मनांतून करावयाची असते, परंतु ती करावयाबद्दल लोकांनीं आपणास मोठेपणा देऊन आग्रहानें विनंती करावी म्हणून कित्येक लोक ती करावयाची नाकारतात. तेव्हां "ते ओढून चंद्रबळ आणतात," असें म्हणतात. उ० रावसाहेब, आपण " अप्रतिबंध व्यापार " ह्या विषयावर व्याख्यान द्यावेंच द्यावें अशी मंडळींची इच्छा आहे. मला काय येतें, मला वेळ कोठें आहे, वगैरे सबबी आम्हास खऱ्या वाटत नाहींत. आतां उगीच ओढून चंद्रबल आणूं नका. हो म्हणा म्हणजे झालें!

१६२३. **कापिलाषष्ठीचा योग**—अगदीं दुर्मिळ, किं० क्वचित् प्रसंगीं मिळणारी, संधी. कधींमधीं घडून येणारा संयोग, किं० पडणारी गांठ. [ ज्योतिषशास्त्रांत भाद्रपद महिना, कृष्णपक्ष, हस्त नक्षत्र, व्यतिपात, मंगळवार, व रोहिणी, ह्या गोष्टी एका वेळीं जुळून आल्या, म्हणजे त्याला " कपिलाषष्ठीचा योग, " असें नांव दिलेलें आहे. ]

१६२४. **खडाष्टक, किं० षडाष्टक**—एका माणसाच्या राशीपासून दुसऱ्याची रास सहावी, व दुसऱ्याच्या राशीपासून पहिल्याची रास आठवी, अशी असली, म्हणजे "त्या दोघांत खडाष्टक आहे," असें म्हणतात. उदाहरणार्थ एकाची मेष रास असून दुसऱ्याची कन्या रास असली, किंवा एकाची कर्करास आणि दुसऱ्याची कुंभरास असली, तर " त्या दोघांत खडाष्टक आहे " असें म्हणतात. हें खडाष्टक दोन प्रकारचें असतें; दोन माणसांतील प्रीति दाखविणारें तें प्रीतिखडाष्टक, आणि वैर दाखविणारें तें मृत्युखडाष्टक. परंतु व्यवहारांत " त्या दोघांत खडाष्टक आहे, " ह्याचा अर्थ वैर आहे असा समजतात.

१६२५. **गर्गाचार्यांचा मुहूर्त**—प्रातःकाळाच्या किंचित् अगोदरचा काळ. हा काळ शुभ म्हणून गर्गाचार्यांचें मत आहे.

१६२६. **घटका भरणें**—"घटका" म्हणून एक तांब्यांचें पात्र असतें; त्याच्या बुडाला एक बारीक छिद्र असतें. हें पात्र पाण्यांत तरंगत सोडलें, म्हणजे त्या छिद्रांतून पाणी आंत भरतें, व बरोबर घटकेच्या अवधीनें तें पात्र पाण्यांत बुडतें. लग्न, मुंज, वगैरे विधींमध्यें काल मोजण्यासाठीं हें पात्र पाण्यांत सोडतात. घटकेचा कालावधि संपतांच हें पात्र पाण्यांत बुडतें; यावरून " एकाद्याची घटका भरणें, " म्हणजे त्याच्या आयुष्याचा काल, किं० अवधि, भरणें, म्ह० समाप्त होणें, असा अर्थ समजतात.

१६२७. **घबाड मुहूर्त**—जेव्हां वाराचा अंक, व तिथीचा अंक, ह्या दोहोंच्या बेरजेच्या तिपटींत १५ मिळवून सातांनीं भागलें असतां बाकी तीन उरते, तेव्हां तो काळ कोणत्याही कामाला शुभ म्हणून ज्योतिषशास्त्राचा सिद्धांत आहे, व त्याला " घबाड मुहूर्त, " अशी संज्ञा आहे. यावरून "घबाड मुहूर्त " म्ह० अत्यंत शुभ समय, किं० अनुकूल काल, असा अर्थ समजतात.

१६२८. **तारांबळ होणें**, किं० **उडणें**—घाईमुळें बुझल्यासारखें होणें. उ० जेवायाची वेळ होऊन गेली होती, मंडळी पाटांवर येऊन बसली होती, इतक्यांत माझें मूल रडूं लागलें, तेव्हां माझी जी तारांबळ झाली ती कांहीं पुसूंच नये ! [ लग्न, मुंज, वगैरे विधींमध्यें शुभ मुहूर्त न चुकावा म्हणून उपाध्ये फार जपत असतात, आणि मंत्रतंत्रादि वेळच्यावेळीं आटोपण्यासाठीं घाई करीत असतात. ह्या घाईचा कळस " ताराबलं चंद्रबलं तदेव " वगैरे अक्षरें म्हणतांना होतो. यावरून " एकाद्याची तारांबळ उडणें, " ह्म० त्याची धांदल होणें, असा अर्थ झाला. ]

१६२९. **साडेसाती**, किं० **शनीचा फेरा**—दुर्दैवाचा फेरा. आपत्काल. उपद्रव. एकाद्या माणसाच्या जन्मराशीपासून शनि १२, १, आणि २ ह्या राशींत असतां "त्या माणसास साडेसाती आली आहे, " असें म्हणतात. ह्या तीन राशि क्रमण्यास शनीला ७॥ वर्षें लागतात. ह्या ७॥ वर्षांच्या मुदतींत त्या माणसास अतोनात दुःखें भोगावीं लागतात.

१६३०. **साडेतीन मुहूर्त**—कोणतेंही काम करावयास दसरा, बलिप्रतिपदा, आणि वर्षप्रतिपदा, हे तीन अत्यंत उत्कृष्ट मुहूर्त, आणि अक्षय्य तृतीया, ( किं० कित्येकांच्या मतें नागपंचमी ), हा साधारणपणें उत्कृष्ट, ( म्ह० अर्धवट उत्कृष्ट ), मुहूर्त असें समजतात.

१६३१. **व्यतिपात**—विष्कंभ, प्रीति, आयुष्मान् ,वगैरे सत्तावीस योग आहेत, त्यांत व्यतिपात हा सतरावा आहे. हा योग असतां संकट प्राप्त होतें. यावरून दुष्ट व खोडकर मुलाला " व्यतिपात " किं०" वितिपात, "म्हणण्याची रूढि पडली आहे.

१६३२. **शकुनगांठ बांधणें**—एकाद्या कार्याला निघालें असतां प्रथम जो शकुन होतो, तो चांगला किंवा वाईट असेल त्याप्रमाणें त्या कार्यांत यश किं० अपयश मिळतें, अशी त्या माणसास अटकळ बांधतां येते. त्या शकुनाची आठवण राहाण्याकरतां तो पदरास गांठ बांधतो, तिला " शकुनगांठ " म्हणतात. ही गांठ शुभाची, किं० अशुभाचीही, सूचक असते. उ० त्या माणसाची संगत तुझ्या नुकसानीस कारण होईल, अशी मी दोन महिन्यांपूर्वीच शकुनगांठ बांधून ठेविली होती, (म्ह० मी अटकळ करून होतों, किं० माझी खातरी होऊन चुकली होती. ) [ **टीप**— " शकुनगांठ " याच्याबद्दल " गांठ " किं० " खूणगांठ, " असेंही म्हणतात. ]

१६३३. **संक्रांत**—मेष, वृषभ, इत्यादि राशींपैकीं एका राशींतून दुसऱ्या राशींत सूर्याचें जे गमन, त्याला "संक्रांति" असें म्हणतात. ह्या गमनाची जी अधिदेवता, तिलाही " संक्रांति " असें म्हणतात. ही संक्रांति देवता दर वर्षी कोणच्या तरी वाहनावर बसून जात असते. त्या वर्षी ती ज्या वाहनावर बसली असेल त्या वाहनाचा, ज्या दिशेस जात असेल त्या दिशेस, ज्या पदार्थाकडे पाहात असेल त्या पदार्थाचा, अतोनात नाश त्या वर्षी होतो. यावरून " यंदा अमक्यावर संक्रांत बसली, " " यंदा आमच्या घरावर संक्रांत आली आहे,"वगैरे सारखे प्रयोग केले जातात." एकाद्यावर संक्रांत बसणें, " म्ह० त्याचा नाश किंवा नुकसान होणें.

[ समाप्त ]

## परिशिष्ट क.

### MARATHI AND ENGLISH

# PROVERBS OF SIMILAR IMPORT.

१. अडाणी कुणबी दुणा रावे—He that goes the contrary way must go over it twice. २. अति शहाणा त्याचा बैल रिकामा—Pennywise, poundfoolish. ३. अति सर्वत्र वर्जयेत्.—Avoid extremes. ४. आधीं अननं मग तननं—Food before song. ५. अन्नसत्रीं जेवणें आणि मिरपूड मागणें—To dine upon charity and call out for sauce. ६. अरे तर कां रे, अहो तर कांहो!—For the civil, civility; for the saucy, sauce. ७. असतीं मुलें लहान, परी तिखट त्यांचे कान—Little pitchers have great ears. ८. असतील शितें तर जमतील भुतें—He that is poor, all his kindred scorn him; he that is rich, all are kin to him. Where the carcase is the ravens will gather. ९. अडक्याची देवता तिला सापिक्याचा शेंदूर—You need not get a golden pen to write upon dirt. १०. आंत असे जसें, बाहेर पडे तसें—If better were within, better would come out. ११. आंथरूण पाहून पाय पसरावे—Stretch your legs according to your coverlet. १२. आंधळ्याशीं जन सारेच आंधळे—(1) You measure every one's honesty by your own. (2) You measure every one's corn by your own bushel. १३. मी हसे लोकां, शेंबुड माझ्या नाका—He that scoffs at the crooked had need go very upright himself

१४. आप भला तर जग भलें—Good mind, good find. १५. आभाळावर थुंके तो आपल्याच तोंडावर थुंके--He that hews above his height may have chips in his eyes. १६. (१) आयजीच्या घरावर बायजी उदार (२) हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण. (३) गोटणच्या गायी आणि माभळभट दान देई–(1) You are very free of another's pottage. (2) You cut large thongs out of another's hide. १७. ओल्या मडक्याचा कांठ लववावा तसा लवतो—Youth and white paper take any impression. १८. आंवळा देऊन कोहोळा काढणें—You bring a bit of wire, and take away a bar. १९. आस्वलाच्या आधीं किंकाळी--You cry out before you are hurt. २०. आळशास दुणें काम आणि लोभ्यास दुणा खर्च—Lazy folks take the most pains. २१. उथळ पाण्याला खळखळ फार--He that knows little, soon repeats it. २२. (१) एकादशीच्या घरीं शिवरात्र (२) हातीं धरल्या रोडका आणि डोई धरल्या बोडका—(1) 'Tis very hard to shave an egg. (2) Where nothing is, nothing can be had. २३. एका म्यानांत दोन सुऱ्या राहत नाहींत—Two of a trade seldom agree. २४. एका हातानें टाळी वाजत नाहीं—It needs two to make a quarrel. २५. काडीचोर तो पाडीचोर—(1) He that will steal a pin will steal a better thing. (2) He that will steal an egg will steal an ox. २६. कुंभारास मडकें धड नाहीं (२) पगडबंधाचें पागोटें मोडकें. (३) चांभाराचा जोडा फाटका—The shoemaker's wife and the smith's mare are always the worst shod. २७. खोल पाण्यांत शिरू नये—No safe wading in an unknown water. २८. कचित्काणो भवेत्साधु:—He that winketh with one eye, and seeth with the other, I would not trust him, though he were my brother.

२९. गर्जेल तो पडेल काय?—Barking dogs seldom bite. ३०. गळा कापला खोकला गेला—The remedy worse than the disease. ३१. गळ्यांत माळा पोटांत काळा—Beads about the neck and the devil in the heart. ३२. गुरु तसा चेला—Like priest, like people. ३३. गूळ नाहीं गुळाची वाचा तर खरी—He that has no silver in his purse, should have silver on his tongue. ३४. गूळ नाहीं तर गुळासारखी वाचा तरी असावी—He that in his purse lacks money, has in his mouth much need of honey. ३५. गेली घडी येत नाहीं—An occasion lost cannot be redeemed. ३६. घर जळल्यावरी पाण्याचा शोध करी—To shut the stable-door after the horse is fled (or stolen). ३७. घोडें खाई भाडें—The horse is eating his head off. ३८. चढेल तो पडेल, पोहेल तो बुडेल—Who never climed, never fell. ३९. चाकरी करावी आणि भाकरी मागावी—He who serves well need not be afraid to ask wages. ४०. चिखलांत धोंडा टाकला तर चिखल तोंडावर उडणारच!—He that handles pitch shall foul his fingers. ४१. चितेपेक्षां चिन्ता कठिण—Care will kill a cat. ४२. चोर सोडून संन्याश्याला सुळीं देणें (२) करतो एक आणि भरतो एक—One doth the scath, and another hath the scorn चोराचीं पाऊलें चोरास माहीत—Set a thief to catch a thief ४३. जमिनींतून पाऊस पडत नसतो—Pigs don't fly. ४४. जसें पेरावें तसें उगवतें—(1) As ye sow, so shall ye reap. (2) He that sows thistles shall reap prickles. ४५. जों-वर श्वास तोंवर आस—While there is life, there is hope. ४६. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी—Of whom you eat salt, him laud and exalt. ४७. टाका आगळें लिहावें आणि घासा आगळें जेवावें—Who eats and leaves,

has another meal good. ४८. टांकीचे घांव सोसल्यावांचून देवपण येत नाहीं --He that would have the fruit must climb the tree. ४९. तुम तांडेल हं तांडेल तो गमत कोण सांडेल ? (गमत=होडीमध्यें झिरपून आलेलें पाणी, हं न काढल्यास होडी बुडेल)—You stout and I stout, who shall carry the dirt out ? ५०. (१) तुळशींत भांगआणि भांगेंत तुळस (२) गांव तेथें म्हारवडा—Wholesome and poisonous herbs grow in the same garden. ५१. थेंबें थेंबें तळें सांचे—Step after step the ladder is ascended. ५२. दिव्याखालीं अंधेर—Every light has its own shadow. ५३. दुधानें भाजला तो ताक देखील फुंकून पितो—(1) He that hath been bitten by a serpent is afraid of a rope. (2) Once bit, twice shy. ५४. दोघांचें भांडण आणि तिसऱ्यास लाभ—Two dogs strive for a bone, and the third runs away with it. ५५. धर्माची गाय आणि ह्मणे दांत कां नाहींत ?—Don't look a gift-horse in the mouth. ५६. धारिष्टास दैव धार्जिणें —Fortune favours the brave. ५७. धुळीवर सारवण—You pour water into a sieve. ५८. (१) नको नको आणि पायलीचें चार्जों (२) जातो तेथें हत्ती जातो, नाहीं तेथें सुईही जात नाहीं— To strain at a gnat and swallow a camel. ५९. नव्याचे नऊ दिवस—Wonder lasts but nine nights in a town. ६०. नागेश्वराला नागवून सोमेश्वराला घांट बांधणें—(1) They steal the hog and give away the feet in alms. (2) Steal the goose and give the giblets in alms. ६१. नेसतां येईना लुगडें तोकडें ; नाचतां येईना अंगण वांकडें ; स्वयंपाक करितां येईना ओलीं लांकडें—A bad workman quarrels with his tools. ६२. परदुःख शीतल—No one knows the weight of another's burden. ६३. पळसाला पानें तीन--Where

shall the ox go but he must labour? ६४. पुराणमित्येव न साधु सर्वम्--जेव्हढें कांहीं जुनें तेव्हढें सारें चांगलें, किं० खरें, असें नव्हें. (एकादी गोष्ट जुनी आहे,स० फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे,येव्हढ्यावरूनच ती योग्य, किं० खरी, ठरते असें नव्हे --Antiquity is not always a mark of verity. ६५. पैशाचें तेल आणि दोन पैसे हेल--Burning a half-penny candle to find a farthing. ६६.(१) प्रत्यक्ष तें खरें. (२) चक्षुर्वै सत्यम्. (३) खऱ्या खोट्यांत अंतर चार बोटांचें. Seeing is believing. ६७. बाप तसा बेटा; खाण तशी माती; जाती तशी पुती--(1) As the old cock crows, so crows the young, [or, so the young learns.]. (2) The young pig grunts like the old sow. ६८. बुडत्याला हात कोण देणार?—He that is down, down with him! ६९. बैल गेला झोपा केला—To shut the stable-door after the horse is stolen. ७०. भटाला दिली ओसरी आणि भट हातपाय पसरी—Give him an inch and he will take an ell. ७१. भरले पोटा अंजीर कडू—A full stomach loathes the honey-comb. ७२. भित्याच्या पाठीस ब्रह्मराक्षस—He that makes himself a sheep shall be eaten by the wolf. ७३. मौनं सर्वार्थसाधनम्—Silence seldom doth harm. ७४. ज्ञात्याच्या माणसाचें लोणचें घालून ठेवावें--If you wish good advice, consult an old man. ७५. वळणाचें पाणी वळणानेंच जाईल--As the twig is bent the tree inclines. ७६. (१) वाघाची खोड काढूं नये. (२) सर्पाला जागा करण्यांत काय अर्थ?--Arouse not the sleeping lion. ७७. वांझेला कालबोळ कशाला?--He that hath no money needeth no purse. ७८. वाहात्या घोड्यावर दोन गोणी जास्ती--All lay a load on the willing horse. ७९. विकतचें शहाणपण थोर--Wit once bought is worth twice taught.

८०. (१) विहीण झालें नसलें तरी मांडवाखालून गेलें आहें. (२) लग्न झालें नसलें तरी मांडवाखालून गेलों नाहीं कीं काय ?—Many can pack the cards that cannot play. ८१. वैद्याचीं पोरें गालगुंडानें मेलीं —Who goes more bare than the shoemaker's wife or the smith's mare? ८२. शितावरून भाताची परीक्षा--You may know by a handful the whole sack. ८३. सतरा सुइणी, आणि विणारणीचे हाल--Too many cooks spoil the broth. ८४. (१) सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं (२) बळी तो कान पिळी–Might is right. ८५. (१) समुद्रीं मासा आणि घरीं भरंवसा (२) कशास नाहीं ठिकाण आणि म्हणे बुधवारचीं लग्नें. Counting chickens before they are hatched. ८६. (१) सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते (२) सदर तिकडे नदर--Wealth makes worship. ८७. सहज पडे दंडवत घडे--To make a virtue of necessity. ८८. हपापाचा माल गपापा--Ill gotten, ill spent. ८९. हात ओला तर मैत्र भला--Where wealth, there friends. ९०. हातचें सोडून पळत्याचे पाठीस लागणें हा मूर्खपणा–(1) He that leaves certainty, and trusts to chance, when fools pipe he may dance. (2) A bird in the hand is worth two in the bush. ९१. आयत्या बिळांत नागोबा बळी—(1) One beats the bush and another catcheth the bird (2) Foxes dig not their own holes. ९२. (१) शितावरून भाताची परीक्षा, (२) थाम्यावरून ताम्याची परीक्षा—A straw shows which way the wind blows. ९३. गर्वाचें घर खालीं—Pride will have a fall. ९४. घोडा मैदान जवळच आहे—The proof of the pudding is in the eating. ९५. छडी लागे छम् छम् विद्या ये घम् घम्—Spare the rod, and spoil the child. ९६. बोलणें सोपें, करणें कठिण—Saying and doing are two things.

## परिशिष्ट ख.

# Equivalent English and Marathi IDIOMS.

१

I. To add fuel to the fire—आगींत तेल ओतणें. 2. To give oneself airs—दिमाख करणें. तोरा मिरविणें. 3. To be on the alert—डोळ्यांत तेल घालून बसणें. 4. It is all over with him—त्याचे बारा वाजले. 5. At any rate—कांहीं झालें तरी. 6. They are at daggers drawn—त्यांचा बारावा बृहस्पति आहे. 7. To be at one's beck and call—एकाद्याच्यामागें कासोट्याप्रमाणें असणें. 8. At random—भरमसाटपणें. 9. His affairs are at sixes and sevens—त्याच्या कामाचा ब्रह्मघोटाळा झाला आहे. 10. They are at variance—त्यांच्या मधून विस्तव जात नाहीं. 11. His patience alone bore him up in his troubles—तो धीराचा माणूस ह्मणून त्याला संकटांत निभाव लागला. 12. He bids fair to become a good speaker—तो चांगला वक्ता होईल असा रंग दिसत आहे. 13. To blow one's own trumpet—आपल्याच तोंडाभोंवतीं दिवे ओंवाळून घेणें. 14. To burn ons's candle at both ends—अत्तराचे दिवे जाळणें. 15. To call one names—एखाद्याला शिवीगाळ करणें. 16. To carry coals to Newcastle—काशीस गंगा नेणें. 17. To pay one in the same coin—उट्टें काढणें; जशास तसें करणें. 18. To come to oneself—देहभानावर येणें. 19. Your words cut me to the quick—तुझे शब्द माझ्या काळजाला लागले. 20. To cut an acquaintance—मित्र तोडणें किंवा मैत्री तोडणें. 21. To cut one's coat according to one's cloth—आंथरूण पाहून पाय पसरणें. 22. To draw the long bow—

अतिशयोक्ति करणें. फुगवून सांगणें. 23. To play ducks and drakes with one's money--अत्तराचे दिवे जाळणें. पैशाची उधळपट्टी करणें. 24. To make faces--टिवल्याबावल्या दाखविणें. 25. To feather one's nest--आपलें घर भरणें. 26. To get by rote--घोकंपट्टी करणें. 27. Hand and glove--जीवश्च कंठश्च. 28. From head to foot--नखशिखान्त. 29. To lose heart--हातपाय गाळणें. 30. Be at home!--संकोच वाटूं नको! 31. To all intents and purposes--खरें पाहातां; वस्तुतः. 32. Let him alone--त्याच्या वाटेस जाऊं नको. 33. This fault lies at your door—हा दोष तुझ्या माथीं आहे. 34. The long and short—गोळा बेरीज. तात्पर्यार्थ. 35.In the nick of time—ऐन वेळीं. 36.Off and on--कधीं मधीं. मधून मधून. 37. To pick a quarrel—भांडण उकरून काढणें. 38. To dance attendance upon—कच्छपीं लागणें; भजनीं लागणें. 39. Rack and ruin—सत्यानाश. 40. In the long run—परिणामीं. अखेरीस. 41. To split the difference—तडजोड करणें. 42. To take the air—हवा खाणें. 43. To take to one's heels—पोबारा करणें. 44. I àm above such meanness—असला हलकटपणा माझ्या हातून व्हावयाचा नाहीं. 45. He is a man after my own heart—तो माझ्या मनाजोगा मनुष्य आहे. मला जसा हवा तसा तो आहे. 46. This boy takes after his father—हा मुलगा बापाच्या वळणावर गेला आहे. 47. I have my lessons at my fingers' ends—माझा धडा माझ्या जिव्हाग्रीं आहे. 48. A draft payable at sight—दर्शनी हुंडी. 49. I am between Scylla and Charybdis—मला इकडे आड आणि तिकडे विहीर असें झालें आहे. 50. By way of a joke—थट्टेनें. विनोदानें. 51. By accident—कर्मधर्मसंयोगानें. 52. As for me—मजविषयीं ह्मणाल तर. 53. She is brave for a woman—ती स्त्री ह्या दृष्टीनें शूर आहे. 54. Castles in the air—मनोराज्य.

55. His indolence is bred in the bone—आळस त्याच्या हाडीं मासीं खिळलेला आहे. 56. The news was soon in every body's mouth—ही बातमी तावडतोब सर्वतोमुखीं झाली. 57. The king was there in person—राजा तेथें जातीनें हजर होता. 58. He is off his head—त्याचें माथें फिरलें आहे. 59. Presence of mind—प्रसंगावधान. 60. The republic of letters—विद्वन्मंडल. 61. Off with you!—तोंड काळें कर! 62. He was out of countenance—तो शरमिंदा झाला. 63. I was much taken with him—तो माझ्या मनांत भरला. 64. I caught a glimpse of him—मी त्याला ओझरता पाहिला. 65. He ran through his fortune in a year—त्यानें आपला पैसा एका वर्षाचे आंत उधळून टाकला. 66. To turn tail—पाठ दाखविणें. 67. He lives from hand to mouth—त्याचें हातावर पोट आहे. 68. He has a head for mathematics—त्याचें गणितांत डोकें चांगलें चालतें. 69. There is no help for it—त्याला कांहीं इलाज नाहीं. 70. To rise to the occasion—कठिण प्रसंगीं न डगमगतां पार पडणें. 71. To ride roughshod—दांडगाईनें आपला हेका चालविणें. आरेरावी मांडणें. 72. To ride a hobby—आपला वेडगळ हेका पुढें ढकलणें, किं० धरून बसणें. 73. To remember one to—एकाद्याला एकाद्याचें प्रेमपूर्वक स्मरण करून देणें. 74. To give the reins—स्वच्छंदानें वागावयास मोकळीक देणें. 75. To stand to reason—समंजसपणाचा असणें. 76. To smell a rat—कांहींतरी बिघाड झाला आहे अशी शंका घेणें. 77. To raise the wind—कोणत्या नाहीं कोणत्या तरी रीतीनें रोख पैसा मिळविणें, किं० काढणें. 78. To quit scores—हिशेबाची तोंडमिळवणी करणें. 79. Light or empty purse—दारिद्र्य. 80. Long or heavy purse—संपत्ति. 81. To put up with—सोसून घेणें. 82. To prick up the ears—लक्ष्यपूर्वक कान देऊन ऐकणें. 83. To

keep the pot boiling--तरतरीतपणानें काम करीत राहणें. 84. Over and above--शिवाय. आणखी. ह्या उपर. 85. To thrust one's nose into--लुब्रेपणानें एकाद्या कामांत नाक खुपसणें, किं० लुडबुडणें. 86. Under one's nose--पाहातां पाहातां. डोळ्या देखत. 87. Neck and crop--पूर्णपणें. सपशेल. 88. Down in the mouth--खिन्न. विषण्ण. खचलेला. 89. To make merry--चैन मारणें. 90. A man of straw--काल्पनिक प्रतिपक्षी. 91. With heave and ho--नेटानें. 92. Out of one's own head--स्वकपोलकल्पित. 93. To hold with the hare and run with the hounds--दुटप्पी वर्तन करणें. 94. To fly in the face of--एकाद्याचा अपमान करणें. तुच्छ लेखणें. 95. To be one flesh--शरीरसंबंध जडलेला असणें. 96. The mind's eye--अंतश्चक्षु. 97. The fourth estate--एखाद्या देशाचीं सारीं वर्तमानपत्रें. 98. Face to face--उरूयुरू. रूबरू. 99. To make both ends meet--आदा पाहून खर्च करणें. 100. To feather one's nest--आपलें घर भरणें. 101. Kith and kin--सगेसोयरे. 102. To go to rack and ruin--सर्वस्वीं नाश होणें. सत्यानाश होणें. बारा वाजणें. तळपट वाजणें. 103. To be at a man's beck and call--कासोटा होणें. 104. In the nick of time--ऐन वेळीं. 105. To live from hand to mouth--हातावर पोट असणें. 106. To play fast and loose--धरसोड करणें. 107. To hold good--लागूं असणें. चालू असणें. 108. I am much beholden to you--मी तुमचा फार ऋणी आहें 109. This is above my comprehension.--हें माझ्या बुद्धीच्या आटोक्याच्या बाहेरचं आहे. 110. His conduct is above suspicion--त्याचें वर्तन शंकाबाह्य आहे. 111. To handle without the gloves or without mittens--असभ्यपणानें किंवा दांडगाईनें वागविणें. 112. Mother wit--नैसर्गिक धूर्तपणा किं० समजूतदारपणा.

113. To make a mountain of a mole-hill--राईचा पर्वत करणें. 114. By word of mouth—तोंडीं. 115. To move heaven and earth—सर्व शक्ति वेचणें. 116. In a state of nature—दिगंबर. 117. A son of Neptune—खलाशी. 118. To sow one's wild oats—तरूणपणच्या चैनी करणें. 119. Odds and ends—गपसप. सटरफटर बातम्या. 120. To be neither here nor there—हिशेबांत किंवा विचारांत घेण्याइतक्या महत्वाचा नसणें. 121. To get into a mess—ब्रह्मघोटाळ्यांत पडणें. 122. To give one a bit of your mind—त्याला रागें भरणें. 123. To give chapter and verse for a thing—पुरावा दाखविणें. 124. To go hand in hand–एकविचारानें, एकमतानें चालणें. 125. To set people together by the ears--कलागती लावून देणें. 126. Pros and cons--उलट सुलट मुद्दे. 127. To put in a word in a man's favour--त्याची शिफारस करणें. 128. To put in an appearance--हजर होणें. 129. To put heads together--एके ठिकाणीं बसून खलबत करणें. 130. To put up a person--त्याची राहण्याची वगैरे सोय लावून किंवा करून देणें. 131. To turn King's (or Queen's) evidence—केलेल्या गुन्ह्याची माफी मिळण्यासाठीं मित्रद्रोह करणें. 132. The three R's–Reading, (w)riting, and (a)rithmetic--वाचणें, लिहिणें, आणि जमाखर्च मांडणें. 133. At any rate—कांहीं असलें तरी. कांहीं झालें तरी. 134. A red-letter day--सणाचा दिवस. उत्सवाचा दिवस. 135. In round numbers--ठोकळ मानानें. सरासरीनें.

२

१. अक्काबाईचा फेरा—Visitation of poverty. Misfortune. २. अक्कल हुशारीनें—With all one's eyes about one. ३. अक्कलेचा संदूक—A wiseacre. A pretender of wisdom. ४. अंग

टाकणें—To grow thin. To be emaciated. ५. अंग धरणें—To become fat. To experience the painful stiffness of cold. ६. अंग मोडून येणें—To have the shivering preliminary to fever. ७. अंगाची लाही होणें—To be furious with rage. ८. अंगाचे चकदे काढणें—To lascerate the skin off. ( Metaphorically ), to revile, to abuse. ९. अंगाचा निळपापड होणें—To boil with anger. १०. अंगाचें पाणी करणें—To exert one's self to the utmost. ११. अंगावर शेकणें—To cause the ruin of. To result into loss. १२. अंगीं मिरच्या लागणें—To be irritated. १३. तळपायाची आग मस्तकास जाणें—To be excited by violent anger. १४. अंगवळणीं पडणें—To become habitual. १५. अठरा विश्वे दारिद्र्य—Extreme poverty. १६. अठरा धान्यांचें कोडबोळें—A mixture of various things. १७. अडणीवरचा शंख—A fool who has been raised, ( or who has risen ), to a high place by the influence of a great or rich man. १८. आडाकित्यांत सांपडणें—To fall into a dilemma. To be caught in a trap. १९. एकाद्याचीं अंडींपिलीं ठाऊक असणें—To know a man's ins and outs. २०. आढ्याला पाय लावून निजणें—To lie at ease with a feeling of security. २१. अंत पहाणें—To put to a severe test. To try or test to the utmost. २२. अंतर्यामींचें दुःख अंतर्यामास ठाऊक—The heart best knows its own bitterness. २३. अति तेथें माती—Extremes are ever bad. २४. अंधळ्यापुढें नाच, बहिऱ्यापुढें गायन—Casting pearls before swine. २५. अंधळ्याबहिऱ्यांची गांठ—Playing at cross purposes. २६. अन्नसत्रीं जेवणें आणि मिरपूड मागणें—To dine upon charity and call out for sauce २७. एखाद्याच्या अन्नांत माती कालविणें—To take away the means of livelihood of. २८. अन्नास

मोताद्—Extremely indigent. Wanting the bare necessaries of life. २९. अन्नास लावणें—To supply the means of livelihood to. ३०. उलट्या अंचारींन बसणें—To go begging. ३१. दोन बोटें स्वर्ग उरणें—To be elated with foolish pride. ३२. अल्लाची गाय--An extremely inoffensive man ३३. अळवावरचें पाणी--Any thing transient. ३४. आकाशची कुऱ्हाड--A visitation of God's anger. ३५. आकाश पाताळाचा भेद--A difference as great as that between the poles. ३६. आगींत उडी टाकणें--To rush recklessly into a peril. ३७. आगींत तेल ओतणें--To add fuel to the fire. ३८. आनंद ब्रम्हांडांत न मावणें--To be transported with joy. ३९. इमानास जागणें--To remain true and honest. ४०. इन मीन सव्वातीन or साडेतीन--Very few. ४१. उखळ पांढरें होणें—To become affluent. ४२. उखाणा घालणें--To propose a riddle. ४३. उडत बातमी.--A flying report. ४४. उदक सोडणें---To relinquish. ४५. उपट सूळ घे खांद्यावर.--To thrust oneself unnecessarily and foolishly into danger. To put oneself knowingly into a difficult and awkward position. ४६. उपड्या घड्यावर पाणी—A fruitless endeavour. ४७. उफराट्या काळजाचा--A mad cap. ४८. उंबराचें फूल—A person rarely seen. ४९. उंबरें फोडून कैंबरें काढणें—Much ado about nothing. ५०. उंबऱ्याची साल काढणें --To visit a man frequently; to tease a man by frequent visits. ५१. उभा जाळणें—To persecute. ५२. उंटावरून शेळ्या हाकणें, किं० वळणें–To be careless and sluggish in doing any work; not to devote oneself heart and soul to one's work. ५३. ऊर दडपणें--To be astounded. ५४. ऊर फाटणें--To be amazed. ५५. उरीं फुटणें --To be

knocked up. ५६. एक ना धड, भाराभर चिंध्या--Jack of all trades but master of none. ५७. एका माळेचे मणी--Birds of the same feather. ५८. एरंडाचें गुऱ्हाळ--Useless, meaningless, tiresome account or description. ५९. कच्छपीं लागणें--To follow obsequiously. ६०. कण्या खाऊन मिशास तूप लावणें--To pinch the belly to reach the height of fashion. ६१. भ्रमाचा भोपळा फुटणें--To be undeceived. ६२. बारा पिंपळावरचा मुंजा--A vagrant. ६३. नवकोट नारायण--A millionaire. ६४. निर्वाणीचा बाण--The last resource. ६५. पंक्तिप्रपंच--Partiality. ६६. द्राविडी प्राणायाम--A roundabout or circuitous procedure. ६७. ताटाखालचें मांजर--A tool, or a creature. ६८. तिसरा पाय--Unbecoming or ridiculous eagerness. ६९. कर्मधर्मसंयोग--An accidental or fortuitous coincidence. ७०. कळसूत्री बाहुलें--A puppet. ७१. शरपंजरीं पडणें--To die by inches. ७२. पांचावर धारण बसणें--To be nonplussed through terror. To sink through utter despondency. ७३. उलट्या अंबारींत बसणें--To beg. ७४. चुलींतून वैलांत--From the frying pan into the fire. ७५. चवाठ्यावर आणणें--To give improper publicity to. ७६. चक्री गुंग होणें--To be nonplussed. ७७. एखाद्याच्या घोड्यापुढें धावणें--To be obsequious. ७८. एखाद्याची घटका घातलेली असणें--To be on the point of death. ७९. गणेश टोपी घालणें--To deceive and defraud a man. ८०. जिवाला लावून घेणें--To lay to heart. ८१. खाऊन पिऊन सुखी--Well off. Well-to-do ८२. शिवरा--Foul mouthed. Foul spoken. ८३. एखाद्याच्या नाकांत काड्या सारणें--To irritate him. To vex him. ८४. त्याच्या पायावर भोंवरा आहे--He is a vagrant. ८५. पोटांत

पाय शिरणें—To be dejected. ८६. बोटांवर नाचविणें—To have under the thumb. ८७. एखाद्याची मूठ दाबणें—To bribe a man. ८८. दोन हाताचे चार हात होणें—To be married. ८९. एखाद्याला अंतर देणें—To forsake a man. ९०. इरेस चढणें—To be roused or stimulated to do one's best. ९१. उच्छाद देणें—To tease or harass. ९२. ओम् फस् होणें—To end in smoke. ९३. खडा टाकून पहाणें—To sound a man. ९४. एखाद्याच्या नांवानें खडे फोडणें—To vituperate or to revile him. ९५. पदरास खार लागणें--To incur a loss. ९६. एखाद्याला गंडा घालणें—To deceive. ९७. गुलदस्तांत ठेवणें—To keep concealed ९८. एखाद्याची घटका भरणें—To be at death's door. ९९. चवाठ्यावर आणणें—To bring into publicity. १००. एखाद्याचें स्तोम माजविणें---To exalt a man to the seventh Heaven. १०१. डोळ्यावर कातडें ओढणें—To connive at a thing. १०२. बारा वाजविणें—To make short work of. १०३. पदरांत घालणें—To hand over to. To consign to. १०४. पिकलें पान—A done up man. १०५. पावबारा करणें—To run away. To abscond. १०६. फळास येणें—To be fruitful. १०७. वाटाण्याची अक्षद लावणें—Not to comply with a man's request. १०८. अंगावरून वारें जाणें—To be palsied. १०९. समुद्रांत सुई शोधणें—To look for a needle in a bundle of hay. ११०. पैशा पासरी—Dog cheap. १११. पुढच्यास ठेंच मागचा शहाणा—By other men's faults wise men correct their own. ११२. फाटक्या अंगाचा—A bag of bones. ११३. बारा बंदरचें पाणी प्यालेला—A knave. ११४. बोके संन्यासी–A wolf in a sheep's clothing. ११५. भुकेलें गुरूं वळचण ओढतें—Hunger needs no law. ११६. मस्करीची कुसकरी होते—What begins in play may end in a fray. ११७. नेटाकुटीस येणें—

To be quite exhausted through overwork. ११८. लष्करच्या भाकरी भाजणें—To do a toilsome work which is destined to get no reward. ११९. वड्याचें तेल वांग्यावर—Punishing one man for the fault of another. Visiting anger against one upon another. १२०. वाघाची खोड काढूं नये—Rouse not the sleeping lion. १२१. सहा महिन्यांची जांभई—A suit in chancery. १२२. उजवा हात—Right hand man. १२३. वाळूची भिंत—A rope of sand. १२४. आंवळ्याएवढें पूज्य—A round O. १२५. मनांत मांडे खाणें—To build casstle in the air. १२६. मनगटावर तेल घालणें—To scold for idleness.



# सूचिपत्र.


अकरावा ... ... ६६३
अकलेचा खंदक ... ... ८८३
अक्काबाईचा फेरा ... ८८४
अकांडतांडव ... ... ८८५
अकुतोभय ... ... ६६४
अक्रीत ... ... ६६५
अखंड दंडायमान ... ६६६
अंग ... ... १९
अंगचा ... ... ६६७
अंगदाशिष्टाई ... ... ८८६
अंगाई करणें ... ... ६४
अग्निकाष्ठें भक्षण० ... ६५
अघळपघळ भाषण ... ८८७
अचाट खाणें० ... ... १२४३
अजागळ ... ... ८८८
अजापुत्रं वलिं दद्यात् ... १५४७
अटकेस झेंडा ... ... ६६
अठरा गुणांचा खंडोबा ... ६६८
अठरा विश्वे दारिद्र्य ... ९२१
अठरा धान्यांचें कडबोळें... ९२२
अठरा पगड जात ... ९२३
अडकित्त्यांत धरणें ... ८६
अडणीवरचा शंख ... ८८९
अडला नारायण गाढवाचे० १२४४
अंडीपिल्लीं बाहेर० ... ६७
अडेल तट्टू ... ... ८९०
अढी धरणें ... ... ९३
अढीच्या दिंढी ... ... ८९१
अंत ... ... ६८
अंतकाळापेक्षां मध्यान्ह० १२४५
अंतर ... ... ६९
अंतरणें ... ... ७७१
अति तेथें माती ... ... १२४६
अतिपरिचयादवज्ञा ... १५४८
अतिरथी महारथी ... ८९२
अतिरागा भीक मागा ... १२४७
अतिशाहाणा त्याचा० ... १२४८
अति सर्वत्र वर्जयेत् ... १५४९
अत्तराचे दिवे जाळणें ... ७०
अथपासून इतिपर्यंत ... १५५०
अदत्त ... ... ६६९
अद्दल ... ... ७१
अद्वातद्वा ... ... ८२७
अन्धदर्पण न्याय ... १५२८
अन्धपरंपरा न्याय ... १५२९
अंधळा ... ... ६७०
अंधळा मागतो एक० ... १२४९
अंधळें दळतें आणि कुत्रें० १२५०
अंधळ्या गायींत लंगडी० १२५१
अंधळ्याच्या गायी देव० १२५२
अंधळ्यापुढें नाच० ... १२५३
अंधळ्याला अंधळा काय० १२५४
अधिकस्याधिकं फलं ... १५५१
अंधेरनगरी ... ... ८९३
अनागोंदी ... ... ८९४
अन्न ... ... ७२

अश्राचा मारलेला० ... १२५५
अश्रास मोताद ... ... ६७१
अमरपट्टा ... ... ८९५
अमृतसिद्धियोग ... ... ८९६
अरण्यरोदन ... ... ८९७
अरेराव ... ... ८९८
अर्थी दान महापुण्य ... १२५६
अर्धचंद्र ... ... ८९९
अर्धांगी ... ... ९००
अर्ध्या वचनांत असणें ... ७३
अर्ध्या हळकुंडानें० ... ७४
अर्धी टाकून सगळीला ... १२५७
अलचल्यागलचल्या ९०१, ६७२
अलम्‌दुनिया ... ... ९०३
अलीजा दरबार ... ... ९०२
अवघड ... ... ६७३
अवजड ... ... ६७४
अवदसा ... ... ७६
अवाचे सवा ... ... ९०४
अवाक्षर न बोलणें० ... ७७
अव्यापारेषु व्यापार० ... ७८
अव्यापारेषु व्यापारम् ... १५५२
अशा तशांतला ... ... ६०८
अशोकवनिका न्याय ... १५३०
अष्टपैलू ... ... ६७५
अष्टाधिकार ... ... ९०५
अष्टाक्षरी मंत्र ... ... ६०५
असंगाशीं संग०... ... १२५८
असतील शितें०... ... १२५९
असाच ... ... ६०६
असा तसा ... ... ६०७
असेल तेव्हां दिवाळी० ... १२६०
अस्त्युत्तर ... ... ६७६
अस्मादिक ... ... ६११
अस्मानी सुलतानी ... ९०६
अहंपणा, किं० अहंता ... ६०९
अहमहमिका ... ... ६१०
अहिनकुल न्याय ... १५३१
अहोरूपमहोध्वनिः ... १५५३
अळंटळं करणें ... ... ७९
अळवावरचें पाणी ... ९०७
अळीमिळीगुपचिळी ... ९०८
अक्षता ... ... ८०
अक्षरशत्रु ... ... ९०९
आईजीच्या जिवावर० ... १२६१
आउट घटकांचा आनंद, राज्य ९१०
आ करणें ... ... ८१
आकारे रंगती चेष्टा ... १२६२
आकाश ... ... ८२
आकाशपाणी ... ... ९१३
आकाशमुनि ... ... ९१४
आकाशयान ... ... ९१५
आकाशवाणी ... ... ९१६
आकाशपाताळाचा भेद ... ९१७
आकाशाची कुऱ्हाड ... ९११
आकाशाची भाड ... ९१२
आखाडसासरा ... ... ९१८
आखाड्यांत उतरणें ... ८३
आग ... ... ८४
आगजाळी स्त्री ... ... ६७७
आगापिछा ... ... ९१९
आग्यावेताळ ... ... ९२०
आघाडी साधणें ... ... ८५
आंचवणें ... ... ७७०

आठ पुरभय्ये नऊ चौके... १२६३
आठवणें ... ... ७७२
आडवा ... ... ६७८
आडवें होणें ... ... ८७
आडून गोळी मारणें ... ८८
आढी धरणें ... ... ९३
आणणें ... ... ७७३
आंत ... ... ८०५
आंतवट्ट्याचा व्यापार ... ९२४
आतुरसंन्यास ... ... ९२५
आंथरूण पाहून पाय पसरावे १२६४
आधणांतले रडतात० ... १२६५
आधीं पोटोबा मग० ... १२६६
आधीं बुद्धि जाते मग०... १२६७
आपआपला, किं० आपापला ६१२
आपण ... ६१३, ६१४
आपण मेल्या० ... ... ८९
आपण होऊन ... ... ६१५
आपला ६१६, ६१७, ६१८
आपला तो बाब्या० ... १२६८
आपला म्हणणें ... ... ६२१
आपलासा म्हणणें ... ६२२
आपला हात आणि जगन्नाथ १२६९
आपलींच नखें० ... ... १२७०
आपली पाठ आपणास०... १२७१
आपली वाढवून खाणें ... ६२३
आपल्या आपण ... ... ६१९
आपसूक ... ... ६२०
आपापाचा माल गपापा ... १२७२
आपोआप ... ... ६२४
आंवट ... ... ६७९
आंबणें ... ... ७७४
आभाळ ... ... ९०
आम्ही ... ... ६२५
आयता ... ... ६८०
आयत्या पिठा० ... ... ९१
आयत्या बिळांत नागोबा वळी १२७३
आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः १५५५
आर्ष ... ... ६८१
आला गेला ... ... ६८२
आला दिवस ... ... ६८३
आली गेली ... ... ६८४
आव ... ... ९२
आंवळा देऊन कोहळा०... ९४
आंवळ्यायेवढें पूज्य ... ९२६
आहारीं असणें ... ... ९५
आळशावर गंगा येणें ... ९७
आळा घालणें ... ... ९६
इकडचा डोंगर०... ... ९८
इकडचा तिकडचा ... ६८८
इंगा फिरणें ... ... ९९
इजा बिजा तिजा ... ६८६
इतस्ततः ... ... ८२८
इतिश्री करणें ... ... १००
इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः ... १५५६
इंद्राय तक्षकाय स्वाहा ... १५५४
इमानास जागणें ... ... १०१
इळ्या भोपळ्याइतकें सूत ९२७
ईनमीन सवातीन ... ६८७
ईर ... ... १०२
उकळी फुटणें ... ... १०३
उकिरडा फुंकणें ... ... १०४
उखळ पांढरें होणें ... १०५
उखाळ्या पाखाळ्या० ... १०६

उघडणें ( सकर्मक ) ... ७७५
उघडणें ( अकर्मक ) ... ७७६
उघडा ... ... ६८९
उघड्या डोळ्यानें प्राण०... १२७४
उचलणें ( सकर्मक ) ... ७७७
उचलणें ( अकर्मक ) ... ७७८
उचलला, किं० उचललेला ६९०
उच्छाद ... ... १०७
उजेड पाडणें ... ... १०८
उंटावरचा शाहणा ... ९२८
उठणें ... ... ७७९
उठतांवसतां, उठल्या वसल्या ८२९
उठतां लाथ आणि० ... १०९
उठल्यासुटल्या ... ... ८३०
उडणें ... ... ७८०
उडत उडत ... ... ८३१
उडल्या पाखराचीं० ... ११०
उडविणें ... ... ७८१
उणा ... ... ६९१
उणें उत्तर ... ... ९२९
उतावळा नवरा० ... १२७५
उथळ पाण्याला खळखळ० १२७६
उदक सोडणें ... ... १११
उंदराला मांजर साक्ष ... १२७७
उदरीं शनि येणें ... ... १६२१
उद्धरणें ... ... ७८२
उधारानें पोतें सवा० ... १२७८
उबे उबे करणें ... ... ११२
उपटसुंभ ... ... ६९२
उंबर फोडून किंवरें काढणें. ११३
उंबरघाट ... ... ११४
उंबराचें फूल ... ... ९३०
उभा ... ... ६९३
उलटी अंबारी ... ... ९३१
उलट्या चोराच्या बोंबा ... १२७९
उष्टा ... ... ६९४
ऊत येणें ... ... ११६
ऊर ... ... २०
ऊस गोड पण मुळ्या सोड १२८०
ऊस गोड लागला० ... १२८१
ऊहापोह करणें ... ... ११७
ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ... १५५७
ऋणानुबंध ... ... ९३२
ऋणायस्वरुपी, किं० ऋणाईत० ९३३
एकछत्री राज्य ... ... ६९५
एकदा कानफाट्या नांव० १२८२
एक नाहीं कीं दोन० ... ११८
एका कानानें ऐकावें० ... १२८३
एकाच हाताचीं बोटें०... १२८४
एकानें गाय मारली० ... १२८५
एका नावेंत असणें ... ११९
एका पायावर० ... ... १२०
एका माळेचे मणि ... ९३४
एका म्यानांत दोन सुऱ्या० १२८६
एका हातानें टाळी० ... १२८७
एकूण क्षेत्रफळ सारखेंच १२१
एकेरी शब्द ... ... ८८१
एरंडाचें गुऱ्हाळ ... ... ९३५
एरंडोऽपि द्रुमायते ... १५५८
एवं च ... ... ८३२
एळकोट ... ... ९३६
ऐकावें जनाचें करावें मनाचें १२८८
ओकसाबोकसी ... ... ८२६
ओ कां ठो ... ... ९३७

ओंचा ठो० ... ... १२२
ओंटी ... ... २१
ओठ ... ... २२
ओढणें ... ... ७८३
ओढवणें ... ... ७८४
ओढून चंद्रबळ आणणें ... १६२२
ओनामा ... ... ९३८
ओम् फस् होणें ... ... १२३
ओ म्हणतां ठो० ... १२४
ओला ... ... ६९७
ओली आग ... ... ९३९
ओली भिक्षा ... ... ९४०
ओंवाळणें ... ... ७८५
ओळखीचा चोर जिवा न सोडी १२८९
औषधाला नसणें... ... १२५
कचकच ... ... ९४१
कच्चा ... ... ६९८
कच्छपीं लागणें ... ... १२६
कंठ ... ... २३
कडू कारलें तुपांत ... १२९०
कडू कारलें ... ... ९४२
कडे ... ... ८०६
कडेलोट ... ... १२८
कढी पातळ होणें ... १२९
कणीक तिंबणें ... ... १२७
कण्या टाकून० ... ... १३०
कत्तलची रात्र ... ... ९४३
कथा काय ? ... ... ९४४
कपाळ ... ... २४
कपाळमोक्ष करणें ... १३१
कपिलाषष्ठीचा योग ... ९४६
कपिलाषष्ठीचा योग ... १६२३
कपी ... ... ९४५
कंबख्ती ... ... ९४७
कंबर ... ... २५
करंगळी सुजली म्हणून० १२९२
करणी ... ... ९४९
करणें ... ... ७८६
करतलामलकवत् ... ८३४
करनकरीचा वसा ... ९४८
कर नाहीं त्याला डर नाहीं १२९१
करावें तसें भरावें ... १२९३
कर्णपिशाच्च ... ... ९५०
कर्णाचा अवतार ... ९५१
कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् ... १५५९
कर्दनकाळ ... ... ९५२
कर्मकटकट ... ... ९५३
कर्मणो गहना गतिः ... १५६०
कर्मधर्मसंयोग ... ९५४
कर्मधर्मसंयोगानें ... ८३३
कलम करणें ... ... १३२
कल्पांत करणें ... ... १३३
कल्याण ... ... ९५५
कस ... ... १३४
कसणें ... ... ७८७
कसपटाप्रमाणें मानणें ... १३५
कसा काय ? ... ... ६२६
कसा झाला तरी० ... ६२९
कसायाला गाय धारजिणी १२९४
कसाबसा ... ... ६२८
कसें ? ... ... ६२७
कसेबसे ... ... ८३५
कळ लावणें ... ... १३६
कळस ... ... ९५६

कळस होणें ... ... १३७
कळसूत्री बाहुलें ... ९५७
कळी उमलणें ... ... १३८
कळीचा नारद ... ... ९५८
कांकणभर ... ... ८३६
काकतालीय न्याय ... १५३२
काकरव ... ... ९५९
काकुळती ... १३९, ६३१
कांकू करणें... ... १४०
कागदी ... ... ६९९
कांगाव करणें ... ... १४१
कांटा ... ... १४२
काडीचा ... ... ७००
काडीची सत्ता आणि० ... १२९५
काडीचोर तो पाडीचोर... १२९६
काडीनें औषध लावणें ... १४३
काडी मोडून देणें. ... १४४
काढणें ( सकर्मक ) ... ७८८
काढणें ( अकर्मक ) ... ७८९
काणा ... ... ७०१
काथ्याकूट करणें... ... १४५
कान ... ... २६
कान आणि डोळे यांच्यांत० १२९७
कानाचा कोपरा ... ९६०
कानाचा हलका ... ७६८
कापूस महाग करणें ... १४६
कापूस सवंग करणें ... १४७
काम ... ... १४८
कामापुरता मामा... ... १२९८
काय ... ... ६३३
कालवणें ( सकर्मक ) ... ७९०
कालवणें ( अकर्मक ) ... ७९१
कालवाकालव होणें ... १४९
कावळ्याच्या शापानें० ... १२९९
काशीकर ... ... ९६१
कास ... ... २७
कांहीं ... ... ६३२
कांहीं तरी ... ... ६३४
काळा ... ... ७०२
काळांतून ओढलेला ... ६९६
काळी ... ... ७०३
काळीचें उत्पन्न ... ९६२
काळीज ... ... २८
काळें पाणी ... ... ९६३
किती ... ६३१, ६३५
किती केलें तरी ... ... ६३०
किती तरी ? ... ... ६३६
किंतू येणें ... ... १५२
किल्ली फिरविणें ... ... १५०
कीस काढणें ... ... १५१
कुचेष्टेवांचून प्रतिष्ठा नाहीं १३००
कुडमुड्या जोशी ... ९६४
कुडास कान ठेवी ध्यान... १३०१
कुत्र्याचे पाय० ... ... १५३
कुत्र्याचें मूत ... ... ९६५
कुत्र्याचें शेंपूट नळींत० ... १३०२
कुबेर ... ... ९६६
कुंभकर्ण ... ... ९६७
कुभांड रचणें ... ... १५४
कुंभाराची सून०... ... १३०३
कुरघोडी करणें ... ... १५५
कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ १३०४
कूपमंडूक ... ... ९६८
कूपमंडूक न्याय ... ... १५३३

कूपयंत्रघटिका न्याय ... १५३४
केश उपटल्यानें० ... १३०५
कैकेयी ... ... ९६९
कोटकल्याण ... ... ९७०
कोटश्च कीटाय ... ... १५६१
कोठें इंद्राचा० ... ... १३०६
कोड पुरविणें ... ... १५६
कोंड्याचा मांडा करून खावा १३१०
कोण? ... ... ६३७
कोणचा कां ... ... ६३८
कोणची होऊं नये०... ... १३०७
कोणी ... ... ६४०
कोणी का ... ६३९
कोणी तरी ... ... ६४१
कोण्या झाडाचा पाला ?... ९७१
कोंवडें झांकलें० ... ... १३०८
कोरडी आग० ... ... १३०९
कोरड्याबरोबर ओलें जळतें १३११
कोरड्यास ... ... ९७२
कोरा करकरीत ... ... ७०४
कोलीत लावणें ... ... १५७
कोल्हा काकडीला राजी... १३१२
कोल्हेकुई ... ... ९७३
कोळशांतील माणिक ... ९७४
कोळसा किती जरी० ... १३१३
क्रिया करणें ... ... १५८
क्रियापदें ... ... ७६९
क्रियाविशेषणें ... ... ८२०
क्वचित्काणा भवेत्साधुः ... १५६२
खटाटोपो भयंकरः ... १५६३
खडा ... ... १५९
खडाजंगी ... ... ९७५
खडान्खडा माहिती ... ९७६
खडाष्टक ... ... ९७७
खडाष्टक, किं० षडाष्टक ... १६२४
खंडीभर लेंकरें ... ... ९७८
खंत घेणें ... ... १६०
खप्पीदास ... ... ९७९
खरडपट्टी काढणें ... ... १६१
खरपूस ताकीत करणें ... १६२
खरपूस समाचार घेणें ... १६३
खरवड ... ... ९८०
खर्चणाराचें खर्चतें० ... १३१४
खऱ्याला मरण नाहीं ... १३१५
खल्वाटो निर्धनः क्वचित्... १५६४
खसखस पिकणें ... १६४
खळखळ करणें ... १६५
खाई त्याला खवखवतें ... १३१६
खाऊं जाणे० ... ... १३१७
खाऊन ढेकर देणें ... १६६
खाऊन पिऊन ... ... ८३७
खाऊन माजावें० ... १३१८
खाक ... ... २९
खाकेंत कळसा० ... १३१९
खाखा सुटणें ... ... १६७
खाजवून खरूज काढणें... १६८
खाण तशी माती ... १३२०
खाणें ... ... ७९२
खातेंपोतें बरोबर० ... १६९
खापरतोंड ... ... ९८१
खापर फोडणें ... ... १७०
खार लागणें ... ... १७२
खालीं ... ... ८०७
खालीं ... ... ८२१

| | | | |
|---|---|---|---|
| खालच्या घरचे वांसे० ... ... | १७१ | गनीमी कावा ... ... | ९९४ |
| खिरींत सराटा ... ... | ९८२ | गप्पा छाटणें ... ... | १८७ |
| खिळ्यासाठीं० ... ... | १३२१ | गम ... ... | १८८ |
| खुंटी पिरगाळणें... ... | १७३ | गमजा ... ... | १८९ |
| खुशालचंद ... ... | ९८३ | गम्य ... ... | ९९५ |
| खुशीचा सौदा ... | ९८४ | गयावया करणें ... ... | १९० |
| खोगीरभरती ... ... | ९८५ | गरजवंताला अक्कल नसते | १३२४ |
| खो घालणें ... ... | १७४ | गरज सरो वैद्य मरो ... | १३२५ |
| खोटयाच्या कपाळीं० ... | १३२२ | गर्गाचार्यांचा मुहूर्त ... | ९९६ |
| खोड ठेवणें ... ... | १७५ | गर्गाचार्यांचा ,, ... ... | १६२५ |
| खोंड मोडणें ... ... | १७६ | गर्जेल तो पडेल काय ? ... | १३२६ |
| खोद्खोदून विचारणें ... | १७७ | गर्भगळित होणें ... | १९१ |
| खोरें माती० ... ... | १३२३ | गर्भश्रीमंत ... ... | ९९७ |
| गंगाजमनी ... ... | ९८६ | गर्वाचें घर खालीं... ... | १३२७ |
| गंगाजळी ... ... | ९८७ | गवयाचें पोर० ... ... | १३२८ |
| गंगेस घोडे न्हाणें ... | १७८ | गवऱ्या मसणांत जाणें ... | १९२ |
| गचांडी देणें ... ... | १७९ | गळग्रह ... ... | ९९८ |
| गची बाधा ... ... | ९८८ | गळ घालणें ... ... | १९३ |
| गच्छंतीं ... ... | १८० | गळा ... ... | ३० |
| गजान्त लक्ष्मी ... ... | ९८९ | गाजरपारखी ... ... | ९९९ |
| गट, किं० गट्ट करणें ... | १८१ | गाजराची पुंगी० ... ... | १३२९ |
| गटारयंत्र ... ... | ९९० | गांठचा एक० ... ... | १३३० |
| गडप करणें ... ... | १८२ | गांठ पडणें ... ... | १९४ |
| गडबडगुंडा ... ... | ९९१ | गाडी सुटणें ... ... | १९५ |
| गंडा ... ... | १८३ | गाड्यावरोबर नळ्याची यात्रा | १३३१ |
| गंडांतर ... ... | ९९२ | गाड्यावर नाव० ... ... | १३३२ |
| गडी फू करणें ... ... | १८४ | गाढवाचा खरारा ... | १००० |
| गणेशटोपी घालणें ... | १८५ | गाढवांचा गोंधळ० ... | १३३३ |
| गतं न शोचेत् ... ... | १५६५ | गाढवाचा नांगर फिरविणें | १९६ |
| गतानुगतिक न्याय ... | १५३५ | गाढवानें शेत० ... ... | १३३४ |
| गंध नसणें ... ... | १८६ | गाढवापुढें वाचली० ... | १३३५ |
| गदेमल्हार ... ... | ९९३ | गाढवाला गुळाची० ... | १३३६ |

गादीला पाय लावणें ... ... १९७
गाय ... ... १००१
गाल ... ... ३१
गांव ... ... १९८
गांव आहे तेथें० ... १३३७
गांव करी तें० ... ... १३३८
गांवगुंड ... ... १००२
गांवचा राजा० ... ... १३४०
गांवचा रांड्या० ... ... १३३९
गांवल्या गांवांत० ... १३४१
गांवास गेला० ... ... १३४२
गाशा गुंडाळणें ... ... १९९
गाळण उडणें ... ... २००
गाळणें ... ... ७९३
गाळींव मूर्ति ... ... १००३
गुंगारा देणें ... ... २०१
गुण उधळणें ... ... २०२
गुणाः पूजास्थानं ... १५६६
गुण्यागोविंदानें ... ... ८३८
गुरुकिल्ली ... ... १००४
गुरुमंत्र ... ... १००५
गुलगुल गोष्टी ... ... १००६
गुलदस्तांत ठेवणें... ... २०३
गुलाबाचें फूल ... ... १००७
गुलाबी थंडी ... ... १००८
गुळखोबरें देणें ... ... २०४
गुळाचा गणपति ... ... १००९
गृहच्छिद्रें ... ... १०१०
गेला बाजार तरी... ... ७०५
गोगलगाय ... ... १०११
गोगलगाय आणि पोटांत पाय १३४३
गोंडा घोळणें ... ... २०५
गोडीगुलाबी ... ... १०१२
गोता ... ... २०६
गोंधळ घालणें ... ... २०७
गोमाजी कापशे ... ... १०१३
गोसाजी तिमाजी ... १०१४
गोरज मुहूर्त ... ... १०१५
गोंवऱ्या मसणांत जाणें ... ४४९
गोळकाचें सोंवळें ... १०१६
गोळा होणें ... ... २०८
गौडबंगाल ... ... १०१७
ग्रंथ ... ... १०१९
ग्रामकेसरी ... ... १०१८
घटका ... ... २०९
घटका पाणी पिते० ... १३४४
घटका भरणें ... ... १६२६
घटकेचें घड्याळ ... ... १०१९
घटपटादि खटपट ... ... १०२०
घटोत्कचाचा बाजार ... १०२१
घडा भरणें ... ... २१०
घड्याळ टिपरूं ... ... १०२२
घवाडमुहूर्त ... ... १६२७
घवाड साधणें ... ... २११
घमंडानंदन ... ... १०२३
घर ... ... २१२
घरकोंबडा ... ... १०२४
घरचें झालें थोडें० ... १३४५
घर फिरलें० ... ... १३४६
घरबसल्या ... ... ८३९
घर बांधून पाहावें० ... १३४७
घराचा उंबरठा चढणें ... ११५
घरीं आलेली ... ... ६८५
घरोघरीं मातीच्याच चुली १३४८

घागरगडचा सुभा ... १०२५
घालणें ... ... ७९४
घाला घालणें ... ... २१३
घाशीरामी ... ... ७०६
घृतकुल्या मधुकुल्या ... १०२६
घेलाशेठ ... ... १०२७
घोडनवरा ... ... १०२८
घोडनवरी ... ... १०२९
घोडा ... ... २१४
घोडें ... ... २१५
घोड्याएवढी चूक ... १०३०
घोड्याचे पाठीवर ... ८४०
घोड्याचे पाठीवरचा कोस १०३१
घोरपड ... ... २१६
चकार शब्द ... ... १०३२
चक्री गुंग होणें ... ... २१७
चंग बांधणें ... २१८
चंगीभंगी ... ... ७०७
चंचुप्रवेशान्मुशलप्रवेशः ... १५६८
चटकचांदणी ... ... १०३३
चंडाळचौकडी ... ... १०३४
चढती, किं० उतरती० ... १०३५
चढेल तो पडेल०... ... १३४९
चतुर सावाजी ... ... १०३६
चतुर्भुज करणें ... ... २१९
चंदन करणें ... ... २२०
चंदुलाल ... ... १०३७
चंदूगवाळें आटोपणें ... २२१
चर्पटपंजरी ... ... १०३८
चर्वितचर्वण ... ... १०३९
चव्हाट वळणें ... ... २२२
चवदा चौकड्यांचें राज्य १०४०
चवदावें रत्न ... ... १०४१
चवाठ्यावर आणणें ... २२३
चक्षुर्वै सत्यम् ... ... १५६७
चाणाक्ष ... ... १०४२
चांदरात झडणें ... ... २२४
चांदी उडणें ... ... २२५
चापटपोळी ... ... १०४३
चांभाराच्या देवाला० ... १३५०
चार अक्षरें ... ... १०४४
चार खुंट जहागीर ... १०४६
चार दिवस सासूचे० ... १३५१
चार लोक ... ... १०४५
चारी ठाव जेवणें ... ... २२६
चारी ठाव जेवणें ... १०४७
चारी दिशा मोकळ्या होणें २२७
चार्वाक ... ... १०४८
चालता काळ ... ... १०४९
चालतां बोलतां ... ८४१
चालत्या गाड्यास० ... २२८
चालत्या, किं० ताज्या, घोड्या० १०८९
चावून चिकट ... ... ७०८
चाळा ... ... २२९
चाळिशी ... ... १०५०
चिटपाखरूं ... ... १०५१
चित्रगुप्त ... ... १०५२
चिन्ह ... ... १०५३
चिरंजीव ... ... १०५४
चिरीमिरी ... ... १०५५
चीत करणें ... ... २३०
चुकला फकीर मशीदींत... १३५२
चुकल्या चुकल्या० ... २३१
चुकारतट्टू... ... १०५६

चुटक्यांचे मांडव ... ... १०५७
चुटपुट लागणें ... ... २३२
चुडेदान देणें ... ... २३३
चुरमुरे खात० ... ... २३४
चुलींतून निघून० ... २३५
चुलीला अक्षत देणें ... २३६
चोरांचीं पावलें चोरांस ठाऊक १३५३
चोराच्या मनांत चांदणें ... १३५४
चोराला सोडून० ... ... २३७
चोराच्या वाटा० ... ... १३५५
चोराच्या हातची लंगोटी... १३५६
चोरावर मोर ... ... १३५७
चोरी असणें ... ... २३८
चोहोंचा आंकडा घालून० २३९
चोहोंचा आंकडा ... १०५८
चौकोनी चिरा ... ... १०५९
चौपदरी घेणें ... ... २४०
चौपदरी ... ... १०६०
चौऱ्यांशीचा फेरा ... १०६१
छक्केपंजे ... ... २४१
छडी लागे छम छम० ... १३५८
छत्तिसाचा आंकडा ... १०६२
छाती ... ... ३२
छांदिष्ट ... ... ७०९
जगत्शेट ... ... १०६३
जंग जंग पछाडणें ... २४३
जगांतून उठणें ... ... २४२
जड पारडें ... ... १०६४
जड बुडाचें मनुष्य ... १०६६
जडभरत ... ... १०६५
जडीबुट्टी ... ... १०६७
जनीं जनार्दन ... ... १३५९
जन्मजन्मांतरीं ... ... ८४२
जन्मा आला हेला० ... १३६०
जन्माची गांठ ... ... १०६८
जन्माची भाकर ... ... १०६९
जन्मादारभ्य ... ... ८४३
जपमाळ घेणें ... ... २४४
जमदग्नि ... ... १०७१
जमीनअस्मानाचें अंतर ... १०७२
जरीपटका ... ... १०७३
जवळ ... ... ८०८
जशी कुडी तशी पुडी ... १३७५
जशी देणावळ० ... ... १३६१
जळणें ... ... ७९५
जळत घर० ... ... २४५
जळत, किं० जळतें, घर० १३६२
जळांत राहून माशांशीं वैर १३६३
जाईल तेथें हत्ती० ... १३६४
जागणें ... ... ७९६
जागा ... ... ७१०
जाडें प्रकरण ... ... १०७४
जातीचा ... ... ७११
जातीवर जाणें ... ... २४६
जानवें तोडण्यास उठणें ... २४७
जांबुवंत ... ... १०७०
जांवईशोध ... ... १०७५
जावें त्याच्या वंशा० ... १३६५
जित्याची खोड० ... ... १३६६
जिभेवर असणें... ... २४८
जिवश्चकंठश्च ... ... १५६९
जिवाजीपंत ... ... १०७६
जिव्हा ... ... ३३
जिव्हाळीं लागणें... ... २४९

जी खोड वाळा० ... १३६७
जीभ ... ... ३४
जीव ... ... २५०
जुलमाचा रामराम ... १०७७
जेथें भरे डेरा० ... ... १३६८
जेमतेम ... ... ८४४
जेवणें ... ... ७९७
जो उठला तो ... ... ६४५
जो जो करणें ... ... २५१
जोडे फाडणें ... ... २५२
जो तो ... ... ६४२
जो पाहावा तो ... ... ६४६
ज्या गांवच्या बोरी० ... १३६९
ज्याचा तो ... ... ६४७
ज्याचा त्याला ... ... ६४८
ज्याची खावी पोळी० ... १३७१
ज्याचें करावें बरें० ... १३७२
ज्याचें कुडें त्याच्या पुढें ... १३७३
ज्याचें नांव तें ... ... ६४९
ज्याचें पोट दुखेल० ... १३७४
ज्याचें मन० ... ... १३७६
ज्याच्या मनगटांत० ... १३७०
ज्याच्या हातीं ससा० ... १३७७
ज्यांत त्यांत ... ... ६४४
ज्याला त्याला ... ... ६४३
झक मारणें ... ... २५३
झक मारीत बसणें ... २५४
झाकली मूठ सव्वा लाखाची १३७८
झांकलेलें माणिक ... १०७८
झांकल्या पाठीचा ... ७१२
झुरणीस लागणें ... ... २५५
झेंडा नाचविणें ... ... २५६
झोटिंग बादशाही ... १०७९
टकमक पाहणें ... ... २५७
टक्केटोणपे खाणें ... २५८
टंगळमंगळ करणें ... २५९
टफ करणें ... ... २६०
टला ट जुळविणें ... २६१
टळटळीत दुपारीं ... ७१३
टाकणें टाकणें ... ... २६२
टांकी ... ... २६३
टांकीचे घाव० ... ... १३७९
टाके ढिले होणें ... ... २६४
टाच ... ... ३५
टाळी ... ... ३६
टिटवी देखील० ... ... १३८०
टिवल्याबाहुल्या करणें २६५, २६६
टुकटुक माकड ... ... १०८०
टुरटुर लावणें ... ... २६७
टेकीस येणें ... ... २६८
टेंभा ... ... २६९
टोळभैरव ... ... १०८१
ठणठणपाळ ... ... १०८२
ठाव घेणें ... ... २७०
डवघाईला येणें ... ... २७१
डल्ला मारणें ... ... २७२
डांगोरा पिटणें ... ... २७३
डाव साधणें ... ... २४७
डावें उजवें कळणें ... २७५
डाळ ... ... २७६
डोकें ... ... ३७
डोक्यावर केस न ठेवणें ... २७७
डोंगर पोखरून उंदीर काढणें २७८
डोळस ... ... ७१४

| | |
|---|---|
| डोळा ... ... | ३८ |
| डोळ्यांत केर० ... ... | १३८१ |
| डोळ्यांतील काजळ चोरणें | २७९ |
| डोळ्यावर कातडें ओढणें | २८० |
| ढ ... ... | १०८३ |
| ढंग ... ... | १०८४ |
| ढब्बाचार्य ... ... | १०८५ |
| ढवळ्या शेजारीं पोवळा० | १३८२ |
| ढालगज भवानी ... ... | १०८६ |
| तत्त्वमसि ... ... | २८१ |
| तंबी देणें ... ... | २८२ |
| तरतें कूळ ... ... | १०८७ |
| तहानलाडू भुकलाडू ... | १०८८ |
| तळपट होणें ... ... | २८३ |
| तळी भरणें ... ... | २८४ |
| तळीराम गार करणें ... | २८५ |
| तळें राखी तो पाणी चाखी | १३८३ |
| ताकपिठ्या ... ... | ७१५ |
| ताकापुरतें रामायण ... | २८६ |
| ताकाला जावें० ... | १३८४ |
| ताटाखालचें मांजर ... ... | १०९० |
| ताटांत सांडलें काय० ... | १३८५ |
| तापत्रय ... ... | १०९१ |
| तापल्या तव्यावर० ... | २८७ |
| तांबडें फुटणें ... ... | २८८ |
| ता म्हणतां ताक० ... | २८९ |
| ता म्हणतां० ... ... | १३८६ |
| तारांबळ ... ... | १०९२ |
| तारांबळ होणें, किं० उडणें | १६२८ |
| तारे तोडणें ... ... | २९० |
| ताळ सोडणें ... ... | २९१ |
| ताळू, किं० टाळू ... ... | ३९ |
| तिकडे ... ... ... | ८४५ |
| तिखट ... ... ... | ७१६ |
| तिखटमीठ लावून० ... | २९२ |
| तिरपीट उडणें ... ... | २९३ |
| तिरशिंगराव ... ... | १०९३ |
| तिलांजलि देणें ... ... | २९४ |
| तिसमारखान ... ... | १०९४ |
| तिसरा पाय ... ... | १०९५ |
| तिळपापड होणें ... ... | २९५ |
| तीथ आहे० ... ... | १३८७ |
| तीर्थ ... ... ... | १०९६ |
| तीर्थी गेल्यावांचून० ... | २९६ |
| तीळ खाऊन० ... ... | २९७ |
| तुणतुणें वाजविणें... ... | २९८ |
| तुंबडी भरणें ... ... | २९९ |
| तुमचा, किं० तुमचा तो ... | ६५० |
| तुम्ही आम्ही एक० ... | १३८८ |
| तुरत दान० ... ... | ३०० |
| तुरत दान महा० ... ... | १३८९ |
| तुळशींत भांग ... ... | १०९७ |
| तूट पडणें ... ... | ३०१ |
| तेरड्याचा रंग तीन दिवस | १३९० |
| तेरा वारा चालणें ... | ३०२ |
| तेरीमेरी ... ... | ६५१ |
| तेलंगभट ... ... | १०९८ |
| तेल गेलें तूप गेलें० ... | १३९१ |
| तैलबुद्धि ... ... | ७१७ |
| तोंड ... ... | ४० |
| तोंडपाटीलकी ... ... | १०९९ |
| तो पाप देणार० ... ... | १३९२ |
| तोफेच्या तोंडीं देणें ... | ३०३ |
| तोरा मिरविणें ... ... | ३०४ |

तोलास तोल देणें ... ३०५
तोळामासा प्रकृति ... ११००
त्राटिका ... ... ११०१
त्राहि भगवान् करणें ... ३०६
त्रिकुट ... ... ११०२
त्रिशंकू ... ... ११०३
त्रिस्थळी यात्रा ... ... ११०४
त्रेधा उडणें ... ... ३०७
थक्क ... ... ७१८
थंडा फराळ ... ... ११०५
थंड्या पोटानें ... ... ८४६
थुंकी झेलणें ... ... ३०८
थेंबें थेंबें तळें सांचें ... १३९३
थेर करणें० ... ... ३०९
थैक म्हणतां० ... ... ३१०
दगड ... ... ३११
दगड ... ... ११०६
दगडाचा दोर० ... ... १३९४
दगडाचें नांव० ... ... १३९५
दगडापेक्षां वीट मऊ ... १३९६
दगडावरची रेघ ... ... ११०७
दंड ... ... ४१
दंडी देणें ... ... ३१२
दत्त ... ... ११०८
दम ... ... ३१३
दरिद्रनाम संवत्सरे ... ७२०
दर्भ्या ... ... ... ७१९
दशग्रंथी ब्राह्मण ... ११०९
दसकी लकडी एकका बोजा १३९७
दस गेले० ... ... ३१४
दहीं खाऊं कीं० ... ३१५
दक्षूबाई ... ... १११०
दांडयानें पाणी तोडलें० १३९८
दाढ ... ... ४२
दाढी ... ... ४३
दाढीस वेगळें० ... ... १४०१
दांत ... ... ४४
दांत आहेत तर० ... १३९९
दांत कोरून कोठें० ... १४००
दादाबावा करणें... ... ३१६
दाम करी काम० ... १४०२
दिलमे चंगा० ... ... १४०३
दिल्लीचा सौदा ... ... १११२
दिवटा ... ... ७२१
दिवस ... ... ३१७
दिवस बुडाला० ... १४०४
दिवसा ढवळ्या ... ८४७
दिवा ... ... ३१८
दिवाभीत ... ... ११११
दिव्याखालीं अंधार ... १४०५
दीड दमडीचा शिपाई ... ७२३
दीड शाहणा ... ... ७२२
दुःख ... ... ३१९
दुष्टाचार्य ... ... १११३
दुधानें तोंड भाजलें० ... १४०६
दुभत्या गाईच्या लाथा गोड १४०७
दुरून डोंगर साजरे ... १४०८
दुसऱ्याच्या डोळ्यांत० ... १४०९
दुसऱ्याच्या डोळ्यांतलें० १४१०
दूरतः पर्वता रम्याः ... १५७०
दृष्टीआड सृष्टि ... ... १४११
देव ... ... ३२०
देवजी धसाडा ... ... १११४
देव तुमचें भलें करो! ... ६५३

देवमाणूस ... ... १११५
देवापुढचा देव ... ... १११६
देश तसा वेश ... ... १४१२
दैव देतें आणि०... ... १४१३
दोन डोळे शेजारीं० ... १४१४
दोन हातांचे चार० ... ३२१
दोही घरचा पाहुणा उपाशी १४१६
दौलतीचा खांब... ... १११७
द्यावें तसें घ्यावें० ... १४१५
द्रविडो लुडवुडाम्यहम् ... १५८३
द्रव्येण सर्वे वशाः ... १५७१
द्राविडी प्राणायाम ... १११८
द्राक्षापाकात्मक ... ... ७२४
धडकी भरणें ... ... ३२२
धन्वंतरी ... ... १११९
धरमधक्का ... ११२०
धरमधक्का बसणें, किं० मिळणें ३२३
धर्म ... ... ३२४
धर्म करतां कर्म उभें राहतें १४१७
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम् १५७२
धर्मस्य त्वरिता गतिः ... १५७३
धर्माचे गायी० ... ... १४१८
धांगडधिंगा ... ... ११२१
धार काढणें ... ... ३२५
धारवाडी कांटा ... ... ११२२
धारातीर्थ ... ... ११२३
धुमश्चक्री चालविणें ... ३२६
धूळ चारणें ... ... ३२७
धूळभेट ... ... ११२४
धेंड ... ... ११२५
धोंडभट्टी करणें ... ... ३२८
धोपट मार्ग ... ... ११२६
नकटीच्या लग्नाला सत्राशें विघ्नें १४१९
नख ... ... ४५
नखशिखान्त ... ... ८४८
नखानें काम होतें० ... १४२०
नगद माल ... ... ११२७
नंदीबैल ... ... ११२८
न देवाय न धर्माय ... १५७४
न भूतो न भविष्यति ... १५७५
नरहर देवाची पालखी ... ११२९
नवकोट नारायण ... ११३०
नवरा मरो० ... ... १४२१
नव्याचे नऊ दिवस ... ३२९
नसता ... ... ७२५
न हिंदुर्न यवनः ... ... १५७६
नक्षत्र पडणें ... ... ३३०
नाक ... ... ४६
नाक धरलें० ... ... १४२२
नाकाला चुना० ... ३३१
नाकावर माशी० ... ३३२
नांगी टाकणें ... ... ३३३
नागेश्वराला नागवून० ... ३३४
नारळाची आई ... ... ११३१
नारिकेलपाक न्याय ... १५३६
नावडतीचें मीठ अळणी... १४२३
नांवाचा ... ... ७२६
नांवानें पूज्य ... ... ११३२
नासलीं मिरीं० ... ... १४२४
नाहीं तेंच ... ... ६५४
निमित्तावर टेकणें ... ३३५
निरंकुशाः कवयः ... १५७७
निर्वाणीचा बाण... ... ११३३
निर्वीरमुर्वीतलम् ... ... १५७९

निःस्पृहस्य तृणं जगत् ... १५८०
नीरक्षीर न्याय ... ... १५३७
नीळ नासणें ... ... ३३६
नृसिंहावतार ... ... ११३४
न्याय ... ... १५२६
न्हातीधुती ... ... ७२७
पंक्तिपठाण,पंक्तिवारगीर... ११३५
पंक्तिप्रपंच ... ... ११३६
पगडा बसविणें ... ... ३३७
पगडी फिरविणें ... ... ३३८
पंच पंत्र उपःकाल ... ११३७
पंच प्राणांची० ... ३३९
पट्टीचा वैदिक ... ... ११३८
पड घेणें, खाणें ... ... ३४०
पडचाकर ... ... ११३९
पडणें ... ... ७९९
पडता काळ ... ... ११४०
पडलेलें शेण माती० ... १४२५
पंडितंमन्य ... ... ७२९
पढत मूर्ख ... ... ११४१
पंढरीची वारी ... ... ११४२
पथ्यावर पडणें ... ... ३४१
पदर ... ... ३४२
पदरचा माणूस ... ... ११४३
परदुःख शीतळ ... ... १४२६
परसांतली भाजी ... ११४४
परोपदेशे पांडित्यम् ... १५८१
पर्यंत ... ... ८०९
पर्वणी ... ... ११४५
पलीकडे ... ... ८१०
पळ काढणें ... ... ३४३
पळणारास एक वाट० ... १४२७
पळतें पकि ... ... ११४६
पळसास पानें तीनच ... १४२८
पाऊल ... ... ४७
पांग ... ... ३४४
पागोटें ... ... ३४५
पागोट्याचा धनी ... ११४७
पांघरूण घालणें ... ... ३४६
पांचा मुखीं परमेश्वर ... १४२९
पांचांवर धारण बसणें ... ३४७
पांची बोटें० ... ... १४३०
पाट लावणें ... ... ३४८
पाठ ... ... ४८
पाड नसणें ... ... ३४९
पांढरा ... ... ७३०
पाढा वाचणें ... ... ३५०
पाणी ... ... ३५१
पाण्यांत काठी मारली० ... १४३२
पाण्यावरची रेघ, किं० रेषा ११४८
पाताळयंत्री ... .. ७३१
पात्रें पुजणें ... ... ३५२
पान हलणें ... ... ३५३
पाप्याचे पितर ... ... ११४९
पाय ... ... ४९
पायलीचे पंधरा ... ... ७३२
पायाखालची वाट ... ११५०
पायींची वहाण पायींच बरी १४३३
पारडें फिरणें, किं० फिरविणें ३५४
पारणें फेडणें ... ... ३५५
पारावार नसणें ... ... ३५६
पालथा ... ... ७३३
पालथ्या घागरीवर पाणी... १४३१
पाशीं ... ... ८११

पासंगास न० ... ... ३५७
पासून ... ... ८१२
पाहणें ... ... ८००
पाळतीवर असणें... ... ३५८
पिकलें पान ... ... ३५९
पिंगा ... ... ११५१
पिंगा घालणें ... ... ३६०
पिंडीं तें ब्रम्हांडीं ... १४३४
पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ... १५८५
पितर उद्धारणें ... ... ३६१
पित्त उसळणें ... ... ३६२
पिष्टपेषण ... ... ११५२
पिष्टपेषण न्याय ... १५३८
पी हळद० ... ... ... १४३५
पुल्खा झोडणें ... ... ३६३
पुंगी बंद करणें ... ... ३६४
पुढच्यास ठेंच मागला शहाणा १४३६
पुडीस जाणें ... ... ३६५
पुढें ... ८१३, ८२२
पुराणमित्येव न साधु सर्वम् १५८२
पुराणांतील वांगीं पुराणांत १४३७
पेंच ... ... ३६६
पेढे चारणें ... ... ३६७
पैजेचा विडा उचलणें ... ३६८
पैठणी आदर ... ... ३६९
पैशाचा धूर ... ... ३७०
पैसा दक्षिणा० ... ... १४३८
पोकळ ... ... ... ७३४
पोट ... ... ... ५०
पोटचा गोळा ... ... ११५३
पोटचें द्यावें० ... ... १४८८
पोटाचा चाकर ... ... ११५४
पोटांत एक० ... ... १४३९
पोटांतून ... ... ८४९
पोटीं घालणें ... ... ३७१
पोपटपंची करणें ... ... ३७२
पोबारा, पावबारा करणें ... ३७५
पोवाडे गाणें ... ... ३७३
पोळी ... ... ३७४
प्रताप, किं० गुण उधळणें ३७६
प्रथमग्रासे मक्षिकापातः ... १५८४
प्रमाण ... ... ११५५
प्रस्थ करून० ... ... ३७७
प्रस्थान करणें ... ... ३७८
प्राणप्रतिष्ठा करणें ... ३७९
प्राणांतिक अवस्था ... ११५६
फट् म्हणणें ... ... ३८०
फडशा उडविणें... ... ३८१
फत्ते होणें. ... ... ३८२
फरारी होणें ... ... ३८३
फर्शी पडणें. ... ... ३८४
फळास येणें ... ... ३८५
फाटक्या अंगाचा ... ७३५
फांटा ... ... ३८६
फारकत होणें. ... ... ३८७
फार झालें हासूं आलें ... १४४०
फावड्यानें, किं० खोऱ्यानें० ३८८
फांसा ... ... ३८९
फुकट ... ... ७४४
फुटका डोळा० ... ... १४४१
फुटका मणि ... ... ११५७
फुटक्या तिन्ही सांजा ... ७३६
फुटाण्यासारखा उडणें ... ३९०
फुली घालणें ... ... ३९१

फुलें विकलीं तेथें० ... ... ३९२
फुसकुली सोडणें. ... ... ३९३
फू करुन टाकणें ... ... ३९४
वकध्यान ... ... ११५८
वगलवच्च्या ... ... ११५९
वगलविल्ली ... ... ११६०
वगलभावार्थी ... ... ११६१
वगल्या चोर ... ... ११६२
वगल ... ... ५१
वजवजपुरी करणें ... ३९५
वडा घर पोकळ वांसा ... १४४२
वडीजाव करणें ... ... ३९६
वत्तीस गुणी किं० लक्षणी, ७३८
वत्तीशी ... ... ३९७
वदू होणें ... ... ७३७
वंद्र वाजणें ... ... ३९८
वभ्रा करणें ... ... ३९९
वलवलपुरी ... ... ४००
वसणें ... ... ७९८
वस्तान विघडणें ... ... ४०१
वहुरत्ना वसुंधरा ... १५७८
वळी पडणें ... ... ४०२
वळी तो कानपिळी ... १४४३
वाऊ करून ठेवणें ... ४०३
वाऊ वाटणें ... ... ४०४
वांगडी ... ... ४०५
वाजार करणें ... ... ४०६
वाजारांत तुरी० ... ... १४४४
वाजीराई ... ... ७३९
वाजू ... ... ४०७
वाणा मिरविणें ... ४०८
वात झोकणें ... ... ४०९
वादरायणसंबंध ... ... ११६३
वापजन्मीं ... ... ... ८५०
वाप तसा बेटा ... ... १४४५
वाप दाखीव० ... ... १४४६
वापशेटीची पेंड ... ४१०
वापाला वाप म्हणेना०... १४४७
वावावाक्यं प्रमाणम् ... १४४८
वार उडविणें ... ... ४११
वार भरणें ... ... ... ४१२
वारभाई ... ... ... ११६४
वारा घरचे वारा ... ... ७४०
वारापंधरा करणें... ... ४१४
वारा पिंपळांवरचा मुंजा ११६५
वारा वंदरचें० ... ... ७४१
वारावा वृहस्पती ... १६१८
वारा वाजविणें ... ४१५
वालवोध ... ... ७४२
वालाग्र ... ... ११६६
वालादपि सुभाषितं ग्राह्यम् १५८६
वावनकशी सोनें ... ११६७
वाहेरचा ... ... ७४३
वाहेरची वाधा ... ... ११६८
वाळकडू ... ... ११६९
वाळकडू असणें ... ... ४१६
विगारीच्या घोड्याला० १४४९
विनभाड्याचें घर ... ११७०
विव्वा घालणें ... ... ४१७
विऱ्हाड ... ... ४१८
विलंदर लुच्चा ... ... ७४५
वीजांकुर न्याय ... १५३९
वुगड्या गेल्या०... ... १४५०
वुडत्याचा पाय खोलांत... १४५१

बुडीत खर्च ... ... ११७१
बुद्धि फांकणें ... ... ४१९
बुद्धिः कर्मानुसारिणी ... १५८७
बेगडी ... ... ... ७४६
बेचाळीस उद्धरणें ... ४२०
बेंड बाहेर पडणें ... ... ४२१
बेलभंडार उचलणें ... ... ४२२
बोकेसंन्यासी ... ... ११७२
बोट ... ... ५२
बोऱ्या उडणें ... ... ४२३
बोल ... ... ४२४
बोलवाला होणें ... ... ४१३
बोलून चालून ... ... ८५१
बोळवण करणें ... ... ४२५
बोळ्यानें दूध पिणें ... ४२६
ब्र ... ... ११७३
ब्रह्मगांठ ... ... ... ११७४
ब्रीद ... ... ४२७
भगीरथ प्रयत्न ... ... ११७६
भटाला दिली ओसरी० १४५२
भट्टी ... ... ४२८
भंडार उधळणें ... ... ४२९
भर ... ... ... ४३०
भर ... ... ... ८१४
भरतें येणें ... ... ... ४३१
भरल्या गाड्यास सूप० ... १४५३
भरल्या पोटीं ... ... ८५२
भरारी मारणें ... ... ४३२
भवति न भवति ... ... १५८८
भाकडकथा ... ... ... ११७५
भांडण, किं० कलह० ... ४३३
भांडणाचें तोंड काळें ... १४५४
भिकेची हुंडी० ... ... १४५५
भिजत कांबळें ... ... ४३४
भिन्नरुचिर्हि लोकः ... १५८९
भित्याच्या पाठीस ब्रह्मराक्षस १४५६
भीक ... ... ... ४३५
भीड ... ... ... ४३६
भीड भिकेची बहीण ... १४५७
भुकेला कोंडा० ... ... १४५८
भोग ... ... ... ४३७
भोंवतीं ... ... ... ८१५
भोंवऱ्यांत सांपडणें ... ... ४३८
भ्रमाचा भोपळा फुटणें ... ४३९
भ्रमाचा भोपळा ... ... ११७७
मऊ सांपडलें० ... ... १४५९
मक्ता घेणें ... ... ... ४४०
मखलाशी करणें... ... ४४१
मगरमिठी ... ... ... ११७८
मट्ट्यास येणें ... ... ४४२
मंडूकप्लुति ... ... ... ११७९
मधल्या मधेंच ... ... ८५३
मधुमक्षिकेचें व्रत... ... ११८०
मधून विस्तव जात० ... ४४३
मन मिळणें ... ... ४४४
मन ... ... ... ५३
मनगट ... ... ... ५४
मनच्या मनीं ... ... ८५४
मन जाणे पापा ... ... १४६०
मनःपूतं समाचरेत् ... ... १५९०
मन मोकळें करून ... ... ८५५
मन राजा मन प्रजा ... ... १४६१
मनाएवढा ग्वाही त्रिभु० ... १४६२
मनाची आशा ... ... ११८१

मनाची नाहीं पण० ... १४६३
मनांत मांडे० ... ... १४६४
मनांतल्या मनांत जळणें ... ४४५
मनापासून ... ... ८५६
मनाला द्रव येणें ... ... ४४६
मनास मानेल तोच सौदा ... १४६५
मनासारखा ... ... ८५७
मनीं असे तें स्वप्नीं० ... १४६६
मनीं वसे तें स्वप्नीं० ... १४६७
ममता ... ... ६५५
मरणें ... ... ८०१
मरतमढ्यासारखा ... ७४७
मरतां मरतां हातपाय० ... ४४७
मरे मरेसें करणें ... ... ४४८
मस्करीची होते कुस्करी ... १४६८
महाजनो येन गतः स पंथाः १५९१
मळमळीत सौभाग्या० ... १४६९
माकडाची जखम ... ११८२
माग ... ... ४५०
मागला पाय ... ११८३
मांग शिरणें, किं० येणें ... ४५१
मागून आलेलें लोण० ... ४५२
मागून पुढून यापच नवरा १४७०
मागून ... ... ८२४
मागें ... ८२३, ८१६
मागेंपुढें ... ... ८२५
मांजरांचे गळ्यांत घांट० ... १४७१
माझा मी ... ... ६५७
माटमूट करणें ... ... ४५३
मात करणें ... ... ४५४
माती ... ... ४५५
मातीचे कुळे लावल्यानें० १४७२
मात्रा न चालणें ... ... ४५६
मान ... ... ५५
मानभाव ... ... ११८४
मानला तर देव० ... ... १४७३
मान सांगावा जना० ... १४७४
माभळभट्टी ... ... ७४८
मायपोट ... ... ११८५
माय विणें ... ... ४५७
मायेचा पूत ... ... ११८६
मारत्याचा हात धरवतो० १४७५
मारुतीचें शेंपूट ... ... ११८७
मारूनमुटकून ... ... ८६०
माशानें गिळलेलें माणिक ११८८
माशा मारीत बसणें ... ४५८
माशी शिंकणें ... ... ४५९
माहेर ... ... ११८९
माळ गळ्यांत घालणें ... ४६०
मिरच्या लागणें ... ... ४६१
मिशा ... ... ५६
मिशांवर ताव देणें ... ४६२
मी तूं करणें, मी तूंवर येणें ६५९
मी म्हणणें ... ... ६५६
मीं मी म्हणणें ... ... ६५८
मुका ... ... ७४९
मुक्ताफळें ... ... ११९०
मुखमस्तीति वक्तव्यम् ... १५९२
मुंगीला मुताचा पूर ... १४७६
मुंगी होऊन साखर खावी० १४७७
मुंग्या येणें ... ... ४६३
मुंडी ... ... ५८
मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात १४७८
मुली उजविणें ... ... ४६४

मुळें ... ... ८१७
मूग गिळणें ... ... ४६५
मूठ ... ... ५७
मूर्ति तितक्या प्रकृति ... १४७९
मूले कुठारः ... ... १५९३
मूळ जाणें ... ... ४६६
मेख मारणें ... ... ४६७
मेतकूट जमणें ... ... ४६८
मेला, किं० मेलेला ... ७५०
मेलें मढें आगीला० ... १४८०
मेल्या म्हशीस मण० ... ४६९
मेषपात्र ... ... ११९१
मोट वांधणें ... ... ४७०
मोडशी जिराविणें... ... ४७१
मोर नाचतो म्हणून० ... १४८१
मोळी वुचकळणें ... ४७२
मौनं सर्वार्थसाधनम् ... १५९४
म्हणण्यासारखा ... ... ८५८
म्हणतां म्हणतां... ... ८५९
म्हणी ... ... १२४२
म्हशीनें पाय दिलेलें नाक ११९२
म्हातारीनें कोंवडें० ... १४८२
यथा यथा ... ... ८६१
यथा राजा तथा प्रजा ... १५९५
यथास्थित ... ... ७५१
यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं०... १५९६
यमाचें वोलावणें ... ११९३
यादवी ... ... ११९५
यावच्चंद्रदिवाकरौ ... १५९८
यावत्तैलं तावदाख्यानम्... १५९७
युष्मादिक ... ... ६६०
येऊन जाऊन ... ... ८६२
येणें ... ... ८०२
येन केन प्रकारेण ... १६००
येरे माझ्या मागल्या० ... १४८३
येचव्याशा तवेव्याशावरून ६६१
योगक्षेम चालविणें ... ४७३
योजकस्तत्र दुर्लभः ... १५९९
रग जिराविणें ... ... ४७४
रगडून ... ... ८६३
रंगणांत येणें ... ... ४७५
रंगारूपास आणणें ... ४७६
रंगास येणें ... ... ४७७
रंजक पिणें ... ... ४७९
रजाचा गज करणें ... ४७८
रडकुंडीस येणें ... ... ४८०
रडतराव, किं० रडतराउत० ४८१
रडतराव ... ... ११९४
रमारमी होणें ... ... ४८२
राईचा पर्वत करणें ... ४८३
राखरांगोळी करणें ... ४८४
राग ... ... ४८५
राजरोस ... ... ८६४
राजश्री ... ... ११९६
राजा कालस्य कारणम् ... १६०१
राजापासून रंकापर्यंत ... ८६५
राजा वोले दळ हाले० ... १४८४
राजाला दिवाळी काय माहीत? १४८५
रातांवे पिकणें ... ... ४८६
रान खवळणें ... ... ४८७
राम म्हणणें ... ... ४८८
राम ... ... ११९७
रामवाण औषध ... ... ११९९
रामराज्य ... ... १२००

रामाचें नांव ... ११९८
राशीस लागणें, किं० बसणें १६१७
राहून राहून ... ८६६
राहूसारखें मागें लागणें० १६१९
राळ करणें ... ४८९
राक्षसी झोंप ... १२०१
रिकामा ... ७५२
रिकामा न्हावी० ... १४८६
रिकाम्या पोटीं ... ८६७
रिकाम्या हातानें ... ८६८
रुपेरी बेडी ... १२०२
रेच उतरणें ... ४९०
रेघा उमटणें ... ४९१
रोकडा ... ७५३
लकडा लावणें ... ४९२
लकडीवांचून मकडी० ... १४८७
लंकेची पार्वती ... १२०३
लंकेंत सोन्याच्या विटा ... १४८९
लंगडा ... ७५४
लघुशंकेस जाणें ... ४९३
लटपटपंची ... १२०४
लठ्ठ ... ७५५
लंबकर्णाची स्वारी ... १२०५
लब्धप्रतिष्ठ, किं० लब्धप्रतिष्ठित ७५६
लवनभंजन करणें ... ४९४
लाखाच्या ठिकाणीं ... ८६९
लाज राखणें ... ४९५
लाज नाहीं मना० ... १४९०
लाड पुरविणें ... ४९६
लांडा कारभारी ... १२०६
लांडे कारभार करणें ... ४९७
लाडें लाडें केलें वेडें ... १४९१
लावणें ... ८०३
लावालावी करणें ... ४९८
लाही होऊन जाणें ... ४९९
लेकीस बोले सुनेस लागे ... १४९२
लेखणीचा धड ... ७२८
लेंड्या टाकणें ... ५००
लोकां सांगे ब्रह्मज्ञान० ... १४९३
लोणकढें ... ७५७
वकीलपत्र घेणें ... ५०१
वचने किं दरिद्रता ... १६०२
वचपा काढणें ... ५०२
वचस्येकं मनस्येकम् ... १६०३
वज्रलेप होणें ... ५०३
वडाची साल पिंपळा० ... ५०४
वड्याचें तेल० ... ५०५
वणवण करीत० ... ५०६
वनवास आणणें ... ५०७
वन्हिधूम न्याय ... १५४०
वयांत येणें ... ५०८
वर ... ८१८
वरचष्मा करणें ... ५१०
वरवंटा फिरविणें ... ५०९
वरवर ... ८७०
वरातीमागून घोडें ... १४९४
वर्षाचा दिवस ... १२०७
वळचणीचें पाणी० ... १४९५
वांकडा ... ७५८
वांकड्या बोटाशिवाय० ... १४९६
वांकुल्या दाखविणें ... ५११
वाघ म्हटलें तरी खातो० ... १४९७
वाचा ... ५१२
वाचाळपंचविशी लावणें ... ५१३

वाच्यता करणें ... ... ५१४
वाट ... .... ... ५१५
वाटाण्याची अक्षत लावणें ५१६
वाटोळें होणें, किं० करणें ५१७
वाणला तितका घाणला ... १४९८
वादे वादे जायते तत्त्वबोधः १६०४
वामकुक्षि ... ... ... १२०८
वारा ... ... ५१८
वारा पाहून पाठ द्यावी ... १४९९
वारें ... ... ५१९
वासरांत लंगडी गाय शहाणी १५००
वाहत्या गंगेंत० ... ... ५२१
वाहिली ती गंगा० ... ५२२
वाळींत घालणें, किं० टाकणें ५२०
विकत श्राद्ध० ... ... ५२३
विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर... १५०१
विटलें मन आणि फुटलें० १५०२
विडा उचलणें ( कामाचा ) ५२४
विडा उचलणें ( पैजेचा ) ५२५
वितंडवाद ... ... ... १२०९
विधिनिषेध नसणें ... ५२६
विनाशकाले विपरीतबुद्धिः १६०५
विभु ... ... ५२७
विरजण घालणें ... ... ५२८
विल्हेस लावणें ... ... ५२९
विशीं विद्या तिशीं धन ... १५०३
विशेषणें ... ... ६६२
विषादप्यमृतं ग्राह्यम् ... १६०६
विळा मोडून० ... ... ५३०
विळ्या भोपळ्या इतकें उजू ५३१
वीचितरंग न्याय ... ... १५४१
वीट येणें ... ... ५३२
वेड ... .... ... ५३३
वेडा ... ... ... ७५९
वेडा पीर ... ... १२१०
वेड्यांचा बाजार .... ... १२११
वेळ मारून नेणें ... ... ५३४
वेळेचा गुण .. .... ... १२१२
वेळेनसार .. .... ... ८७१
वेळेवारीं .. .... ... ८७२
व्यतीपात ... .... ... १६३१
व्याप तितका संताप.. ... १५०४
शकुनगांठ बांधणें... ... १६३२
शंख . .. ... ... ५३५
शठे शाठ्यं समाचरेत् ... १६०७
शतपावली करणें ... ... ५३६
शतं भीष्म ... .... ... १२१३
शनि, शनैश्वर .... ... १६२०
शब्द ... .... ... ५३७
शब्दयोगी अव्ययें... ... ८०४
शंभर नंबरी सोनें.... ... ७६०
शंभर वर्षे भरणें .... ... ५३८
शरण जाणें ... .... ... ५३९
शह देणें ... .... ... ५४०
शहानिशा करणें .... ... ५४१
शाखाचंद्र न्याय .... ... १५४२
शापादपि शरादपि ... ... ८७३
शास्त्रार्थ करणें .... .... ५४२
शाहण्याला मार शब्दाचा... १५०५
शाल सोवती .... ... १२१४
शिकंदर ... .... ... १२१५
शिकविलेली बुद्धि० ... १५०६
शिंक्याचें तुटलें०... ... १५०७
शिखरास हात पोंचणें ... ५४३

शिखंडी ... ... १२१६
शितावरून भाताची० ... ५४४
शितावरून भाताची परीक्षा १५०८
शिंतोडा टाकणें ... ... ५४५
शिर ... ... ५९
शिराळशेट ... ... १२१७
शिरीं ... ... ८७४
शिवस्य हृदयं० ... ... १६०८
शिवस्व ... ... १२१८
शिष्टाई करणें ... ... ५४६
शिष्टागमने अनध्यायः ... १६१०
शिष्यापराधे गुरोर्दण्डः ... १६०९
शीर सलामत तो पगडी पचास १५०९
शुक, शुकशुकाट होणें ... ५४७
शुक्राचार्य ... ... १२२०
शुक्राचार्य ... ... १२२१
शुंभ ... ... १२२२
शुष्क काष्ठ ... ... १२१९
शुभस्य शीघ्रम् ... ... १६११
शुष्काशुष्की ... ... ७६१
शून्य ... ... १२२३
शूर्पणखा ... ... १२२४
शेंडी फुटणें ... ... ५४९
शेंडी ... ... ६०
शेण ... ... ५४८
शेणाचा पोहो ... ... १२२५
शेणासेणाचा ... ... ७६२
शेंदाड शिपाई ... ... १२२६
शेर ... ... १२२७
शेषं कोपेन पूरयेत् ... १६१२
शेव्ही जाते जिवानिशीं० ... १५१०
शोभा ... ... ५५०
श्रीगणेशा ... ... १२२९
षट्कर्णी ... ... ८७५
षट्कर्णी करणें आणि० ... १५११
संक्रांत ... ... १६३३
संगनमत करणें ... ... ५५१
सटी सामासीं ... ... ८७६
सतरा गुणांचा खंडोबा ... १२३०
सत्तेपुढें शहाणपण नाहीं १५१२
सत्त्व ... ... ५५२
सदा मरे त्याला कोण रडे ? १५१३
संपुष्टांत येणें ... ... ५५३
समस्त, समस्तकल्प, शब्द ८८१
समर्थांच्या घरचें श्वान० १५१४
समाचार ... ... ५५४
समीकरण बसविणें ... ५५५
समुद्रांत सुई शोधणें ... ५५६
समोर ... ... ८१९
सर ... ... ५५७
सर करणें ... ... ५५८
सर्वनामें ... ... ... ६०४
सर्वारंभास्तंडुलाः० ... १६१३
संस्कृत न्याय ... ... १५५६
संस्कृत वाक्यें, किं० वाक्यखंड १५४६
सहा महिन्यांची जांभई ... १२३१
साखर पसरणें, किं० पेरणें ४५९
साखरेचा खाणार त्याला० १५१५
साखरेची सुरी ... ... १२३२
सांगड घालणें ... ... ५६०
सांगून येणें ( मुलगी ) ... ५६१
साठी उलटणें ... ... ५६२
साडेतीन मुहुर्त ... ... १६३०
साडेतीन शाहाणे... ... १२३३

साडेसाती, किं० शनीचा फेरा १६२९
साततांड उंच ... ... ७६३
सात पांच करणें... ... ५६३
साता समुद्रांच्या० ... ५६४
साता सायासांनीं ... ८७७
साप साप म्हणून० ... ५६५
सांबाचा अवतार ... १२३४
सारीं सोंगें येतात पण० ... १५१६
साळसूद ... ... ७६४
साक्षात् पशुः० ... ... १६१४
सिंहावलोकन न्याय ... १५४३
सुखं च मे शयनं च मे ... १६१५
सुतळीचा तोडा ... ... १२३५
सुतासाठीं मणि फोडणें०... १५१७
सुपारी देणें ... ... ५६८
सुंभ जळेल पण० ... १५१८
सुमाराचा ... ... ७६५
सुळावरची पोळी ... १२३६
सूं करणें ... ... ५६९
सूत ... ... ५६६
सूप फडफडणें ... ... ५६७
सूर वाहणें ... ... ५७१
सूर्यवंशी ... ... ७६६
सूर्याचीं पिल्लें० ... ... ५७०
सूर्याचें पिलूं ... ... १२३७
सूर्याचे पोटीं शनीश्वर ... १२३८
सैरावैरा ... ... ८७८
सोनारानें कान टोचणें ... ५७२
सोनें होणें ... ... ५७३
सोन्याचा दिवस ... १२३९
सोन्याचा धूर० ... ... ५७४
सोमवती घालणें ... ५७५
सोयऱ्यांत साहू० ... ... १५१९
सोस करणें ... ... ... ५७६
सोळा आणे ... ... ७६७
सोक्ष मोक्ष होणें... ... ५७७
स्तोम माजविणें ... ... ५७८
स्थालीपुलाक न्याय ... १५४४
स्मशान वैराग्य ... ... १२२८
स्वभावो दुरतिक्रमः ... १६१६
स्वर्ग ... ... ५७९
स्वाहा करणें ... ... ५८०
हजीर तो वजीर ... १५२०
हट्ट जिरणें, किं० जिरविणें ५८१
हट्टास पेटणें ... ... ५८२
हत्तीच्या पायीं येतें० ... १५२१
हत्ती झुलत असणें ... ५८३
हबेलंडी ... ... ... ५८४
हमरी तुमरी ... ६५२, ५८५
हरताळ ... ... ५८७
हरबऱ्याचे झाडावर चढणें ५८६
हरामाचा माल... ... ५८८
हलका ... ... ७६८
हंसक्षीर न्याय ... ... १५४५
हसून गोड करणें ... ५८९
हळकुंडासाठीं लग्न० ... ५९०
हळद ... ... ५९१
हांक ... ... ५९२
हात ओला तर मैत्र० ... १५२२
हात ... ... ६१
हातखंडा असणें ... ५९३
हातचें सोडून पळत्याच्या० १५२३
हातच्या कांकणाला आरसा० १५२४
हात पाय ... ... ६२

हातीं भेटीं ... ... ... ८७९
हातोहातीं ... ... ... ८८०
हाय खाणें, किं० घेणें ... ५९४
हायदोस घालणें ... ... ५९५
हार ... ... ५९६
हाल कुत्रा खाईना ... ५९७
हिंग लावून विचारणें ... ... ५९८
हिंगाचा खडा ... ... १२४०
हिडिंबा ... ... १२४१
हिरा तो हिरा आणि० ... १५२५
हुतुतू घालणें ... ... ... ५९९
हो ना करणें ... ... ... ६००
होस हो देणें, किं० मिळविणें ६०१
होळी करणें ... ... ... ६०२
क्षिति न बाळगणें ... ६०३

# विक्रीस तयार !

## रा. रा. विद्याधर वामन भिडे, बी. ए. कृत

# निबंधलेखन आणि अनुवाद.

म्याट्रिक्युलेशन, स्कूलफायनल्, पब्लिक् सर्व्हिस्, वगैरे परीक्षांस मराठी भाषा हा एक विषय असून विद्यार्थ्यांना मराठींत निबंध लिहावा लागतो, व दिलेल्या पद्यांचा अनुवाद करावा लागतो. यासंबंधानें विद्यार्थ्यांना माहिती देणारें सोयीचें पुस्तक नाहीं, ही अडचण दूर करण्यासाठीं मथळ्यावर निर्दिष्ट केलेलें पुस्तक रचण्यांत आलें आहे.

ह्या पुस्तकाचे दोन भाग असून पहिल्यांत निबंधलेखन हा विषय आहे. यांत पहिल्यानें निबंध म्हणजे काय हें सांगून निबंधांचे तीन प्रकार कोणते, हें सांगितलें आहे. ह्या तिन्ही प्रकारच्या निबंधांच्या सदरवाऱ्या कशा पाडाव्या, हें उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे. नंतर ठळक ठळक अशा विषयांवर सुमारें ५० निबंध लिहून दाखविले आहेत.

दिलेल्या विषयांचीं सदरें कशीं पाडावीं, हें विद्यार्थ्यांस समजण्यासाठीं अनेक निबंधांचीं सदरें पाडून दाखविलीं आहेत, आणि नंतर निबंधांसाठीं नानाविध विषयांच्या यादी दिल्या आहेत. सारांश, निबंधलेखन हा विषय विद्यार्थ्यांना तयार करावयाला जी जी सामुग्री पाहिजे, ती ती यांत सर्व दिलेली आहे.

अनुवाद ह्या भागांत अनुवाद म्हणजे काय हें सांगून तो कसा करावयाचा, ह्यासंबंधाच्या तपशीलवार सूचना देऊन अनेक प्रकारच्या पद्यांचा अनुवाद करून दाखविला आहे, आणि नंतर कांहीं पद्यसमूह विद्यार्थ्यांना अनुवाद करावयासाठीं दिले आहेत.

ह्या पुस्तकाच्या स्वरूपाचें वर जें आम्हीं दिग्दर्शन केलें आहे, त्यावरून तें विद्यार्थ्यांस फारच उपयोगीं पडण्यासारखें आहे, असें सहज दिसून येईल. आरंभीं पुस्तकाची एक प्रत विद्यार्थ्यानें संग्रहास ठेवून तिचा उपयोग केल्यास त्याचा फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं.

पुस्तकें सदाशिव पेठेंत, चित्रशाळा छापखान्यांत, किंवा काळकादेवी रोडवरील चित्रशाळा दुकानांत विकत मिळतील.

पृष्ठसंख्या १४४, किंमत आठ आणे ट. हा. ८१ आणा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# सुबोध वचनें अथवा म्हणी.

हीं साधुसंतांचीं वेदवाक्यें अनादि कालापासून निरनिराळ्या सा-
ंतांनीं आपआपल्या ग्रंथांतून गोंवून ठेवलेलीं आहेत. हीं वाक्यें
ानथोर स्त्रीपुरुषांना सदैव दृग्गोचर व्हावींत म्हणून आम्हीं मुद्दाम
त्रविचित्र रंगांत व मोठ्या ठळक अक्षरांनीं वरील २१ प्रकार-
ा म्हणी छापून काढलेल्या आहेत. प्रत्येक शालागृहांतून, सभा-
ांतून, वाचनालयांतून किंबहुना प्रत्येक घरांतून ज्या ज्या ठिकाणीं
पतः लहान मुलें, तरुण स्त्री-पुरुष, वृद्ध माणसें यांचें सहज
ा जाईल अशा ठिकाणी हीं सोन्याचीं अक्षरें ठिकठिकाणीं टांगून
ों, हें प्रत्येक संस्थेच्या चालकास, प्रत्येक मंदिराचे व्यवस्थापकास,
क शाळेचे शिक्षकास, प्रत्येक बोर्डिंगचे सुप्रिन्टेन्डेन्टास, प्रत्येक
ईबापास किती श्रेयस्कर, किती नीतिकारक, किती हितावह आहे
ी कल्पना प्रत्यक्ष ही गोष्ट केल्याशिवाय समजणार नाहीं. लहान
ंच्या हृत्पटलावर हीं वाक्यें पूर्णपणें कोरलीं जावीं व त्यांनीं
ल्या पुढील आयुष्यांत नीतिमान् निपजावें अशी ज्या थोर आई-
ांची इच्छा असेल त्यांनीं तर वरील म्हणी अवश्यच आपल्या घरीं
ाव्यात. वरील म्हणी नकाशाप्रमाणें कापडावर लाऊन रूळपट्टी व
ॅनिशसहही विक्रीस तयार आहेत. एकेठिकाणीं तीन म्हणी अशा
ाशास किं. ८१०, २१ म्हणींचे ७ नकाशे एकदम घेणारास किंमत
ै८. प्रत्येक म्हणीस किं. ८८९. एकदम २१ म्हणींची किं. ८१४, ट.
८१. पुठ्यावर लाविलेल्या प्रत्येकास ८२ पुठ्यावरील २१ म्हणींचे
ास रु.२.

**म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.**